# पैगंबर मुहम्मद (स.)

# यांचे

# पवित्र जीवन


लेखक

**अब्दुल हमीद सिद्दीकी**

अनुवाद

**अब्दुल हमीद शेख**



* प्रकाशक *

**इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स ट्रस्ट**

4, हामिद बिल्डिंग, 96, हाफीज अली बहादुर मार्ग, मोमिनपुरा, भायखळा (प.),
मुंबई-400011. फोन : 022-23018387, 23082820
फॅक्स : 2305 2002 मोबाईल : 9699167700
ई-मेल : imp_trust@yahoo.com / imptmumbai@gmail.com
वेबसाइट : www.islamdarshan.org,wwwislamvision.org
www.islamicmarathipublications.com



**LIFE OF PROPHET MUHAMMAD (PBUH)** (English)
**PAIGAMBAR MUHAMMAD (S.) YANCHE PAVITRA JEEVAN** (Marathi)

IMP Series No. :- **02**

Written by :- **Abdul Hameed Siddiqui**

Translated by :- **Abdul Hameed Shaikh**

Copies :- **2000**



**© All Rights Reserved**



Edition **:- V$^{th}$ (August 2014)**

IMPT

Published by :-
**ISLAMIC MARATHI PUBLICATIONS TRUST**
4, Hamid Building, 96, Hafiz Ali Bahadur Marg, Mominpura, Byculla (W),
MUMBAI - 400 011. Tel. : 022-23018387, 23082820
Fax : 2305 2002, Mob.: 9699167700
Email: imp_trust@yahoo.com / imptmumbai@gmail.com
Website : www.islamdarshan.org, www.islamvision.org
www.islamicmarathipublications.com

**ISBN-81-87634-01** **PRICE (MULYA) : 160/**

**-**

# अनुक्रमणिका


| क्र. प्रकरण | पृष्ठ |
|---|---|
| **दोन शब्द** | **७** |
| **प्रस्तावना** | **९** |
| **१ इस्लामपूर्वीचा अरबस्तान** | **११** |
| * अरबस्तानची स्वाभाविक सृष्टीरचना | ११ |
| * अरबांचा स्वभाव | १४ |
| * अरब लोकांचे समाजजीवन | २५ |
| * आर्थिक जीवन | ३१ |
| * इस्लामपूर्व काळातील अरबांचा धर्म | ३४ |
| **२ उष:काल** | **४६** |
| * ते वचन | ४६ |
| * पूर्तता | ४७ |
| * पैगंबर मुहम्मद (स.) यांचे बालपण | ४९ |
| * बाल-मुहम्मद | ५२ |
| * मेंढपाळ म्हणून पैगंबरांच्या अनुभवांबद्दल लावलेले काही चुकीचे अर्थ | ५४ |
| * पैगंबर मुहम्मद (स.) यांचे तारूण्य | ५६ |
| * व्यापार व्यवसायी | ५८ |
| * माननीय खदीजा (रजि.)यांच्याशी पैगंबर मुहम्मद (स.) यांचा विवाह | ६० |
| * विश्वासार्हता | ६२ |
| **३** अल्लाहकडे येण्याचे आवाहन | **६३** |
| * सत्याची हाव | ६३ |
| * कार्यासाठी तयारी | ६५ |
| * दिव्यप्रकाश येतो | ६६ |
| * धर्मप्रसार कार्य व त्याची मोहीम | ७१ |
| * राष्ट्राला हाक | ७४ |
| * आरंभी मुस्लिम झालेले | ७६ |
| * छळणूक | ७८ |
| * ताइफचा दौरा | ८० |
| * प्रारंभीच्या सोबत्यांचे त्याग | ८३ |
| * ॲबिसीनियाला स्थलांतर | ८४ |
| * जुलूम करणारांची उद्दिष्ट्ये | ८८ |
| * सामाजिक बहिष्कार | ८८ |
| * मोठी व्यक्तिगत हानी | ८९ |





| क्र. प्रकरण | पृष्ठ |
|---|---|
| **४ पैगंबरांच्या विरूध्द उघडलेली प्रचार मोहीम** | **९१** |
| * नवे व जुने टीकाकार | ९२ |
| * आरोपांचे खंडन | ९३ |
| * चमत्कार दाखविण्याच्या मागण्या | १०२ |
| **५ मक्काकालीन जीवनाची शेवटची अवस्था** | **११३** |
| * नवे बळ | ११३ |
| * मेअराज | ११८ |
| * पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दाखविलेले चमत्कार | १२४ |
| * धर्म प्रसारकार्याचे प्रयत्न (इस्लामी जीवनपद्धतीचा प्रचार) | १२७ |
| * मदीनेहून निमंत्रण | १२८ |
| * मदीनेला प्रयाण | १३२ |
| * पैगंबर मुहम्मद (स.) यांचे प्रयाण | १३५ |
| * पैगंबर मुहम्मद (स.) मदीनेत पोहोचतात | १४४ |
| * मक्केतील यश | १४४ |
| **६ पैगंबर मुहम्मद (स.) यांना बळ मिळते** | **१४६** |
| * मस्जिद - नव्या अनुयायींचे केंद्रस्थान | १४६ |
| * अजान | १४८ |
| * बंधुभाव | १५० |
| * नवा तह व करार | १५२ |
| * मदीना करार | १५३ |
| * पैगंबर मुहम्मद (स.) यांचे कुटुंब | १५५ |
| * रमजान महिन्याचे रोजे (उपवास) | १५७ |
| * जकात | १५८ |
| * ‘किबला’चा बदल | १५९ |
| * जिहाद, त्याचे स्वरूप व महत्त्व | १६१ |
| **७ पैगंबर मुहम्मद (स.) युद्धभूमीवर** | **१८३** |
| * मदीनातील सल्ला-मसलत | १८४ |
| * बदरचे युद्ध | १८७ |
| * बदर येथील अद्‌भूत चमत्कार | १८९ |
| * बदरच्या युद्धाचे परिणाम | १९४ |
| * उहूदचे युद्ध | १९६ |
| * रणकंदन | १९९ |
| * उहूदच्या युद्धाबद्दल कुरआनचे निष्कर्ष | २०३ |
| * अरबी आणि यहुदी टोळ्यांवर उहूदच्या युद्धाचा परिणाम | २०८ |
| * आकस व वैराचे नवे लोंढे | २०९ |
| * खंदकाचे युद्ध | २११ |

| क्र. | प्रकरण | पृष्ठ |
|---|---|---|
| | * भावी विजयांची भाकिते | २१५ |
| | * प्रत्यक्ष युद्ध | २१६ |
| **८** | **विजयाच्या वाटेवर** | **२१८** |
| | * पैगंबर मुहम्मद (स.) यांचे घर | २१८ |
| | * जहशची कन्या माननीय जैनब (रजि.) | २१९ |
| | * हुदैबियाचा तह | २२२ |
| | * कुरैशी लोकांचा चढेलपणा | २२५ |
| | * तहनाम्यातील कलमे | २२७ |
| | * पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपले वचन पाळले | २२९ |
| | * तो तहनामा मुस्लिमांना अनुकूल ठरला | २३१ |
| | * इस्लाम हा विश्वधर्म | २३२ |
| | * अरबस्तानच्या बाहेर इस्लामी संदेशाचा प्रसार करण्याची पैगंबरांची योजना | २३२ |
| | * परकीय सत्ताधीशांकडे दूत | २३३ |
| | * हेराक्लिअसकडे दूत | २३३ |
| | * अबू सुफयानची साक्ष | २३४ |
| | * पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या खलित्यातील मजकूर | २३४ |
| | * खुस्रोला पत्र | २३५ |
| | * ॲबिसीनियाकडे शिष्टमंडळ | २३५ |
| | * राजा अत्यंत आदराने दूतांचे स्वागत करतो | २३६ |
| | * हौझाकडे दूत पाठविला | २३७ |
| | * खैबरचा पाडाव | २३७ |
| | * पैगंबर मुहम्मद (स.) यांची खैबरवर स्वारी | २३८ |
| | * युद्धला प्रत्यक्ष सुरवात | २३८ |
| | * सफियाशी विवाह | २३९ |
| | * मुस्लिमांची मक्केला भेट | २३९ |
| | * मैमुना बिन हारिसची पैगंबर मुहम्मद (स.) यांचा विवाह | २४२ |
| | * बहुपत्नित्व ही मानव समाजातील प्रस्थापित संस्था आहे | २४२ |
| | * पुरूष स्वभावसिद्ध बहुपत्नित्ववादी आहे | २४४ |
| | * पैगंबर मुहम्मद (स.) यांचे विवाह | २४६ |
| | * मक्केवर विजय | २५१ |
| | * मक्केवरील स्वारीची तयारी | २५३ |
| | * अबू सुफियानची मुस्लिमांच्या तळाला भेट | २५४ |
| | * सार्वत्रिक क्षमा | २५६ |
| | * पैगंबर मुहम्मद (स.) मक्केत प्रवेश करतात | २५७ |
| | * काबागृह स्वच्छ केले | २५८ |
| | * मानवाबद्दल बंधुभाव | २६० |



| क्र. | प्रकरण | पृष्ठ |
|---|---|---|
| | * अन्सार लोकांचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावरील प्रेम | २६० |
| | * माननीय अबू बकर (रजि.) यांनी आपल्या वयोवृद्ध पित्याला पैगंबरांकडे आणले | २६१ |
| | * महिलांनीही प्रतिज्ञा केली | २६२ |
| | * फक्त चौघांना मृत्यूदंड देण्यात आला | २६२ |
| | * त्याग केलेली मालमत्ता परत देण्याचा प्रश्न | २६३ |
| **९** | **संदेशकार्याची परिपूर्ती** | **२६५** |
| | * हुनैनचे युद्ध | २६५ |
| | * युद्धप्राप्त माल | २६९ |
| | * अन्सार लोकांवरील पैगंबर मुहम्मद (स.) यांचा विश्वास | २७२ |
| | * व्यक्तिगत दु:खे | २७३ |
| | * तबूकवर चाल | २७४ |
| | * तबूकमधील पैगंबर मुहम्मद (स.) यांचे भाषण | २७८ |
| | * पैगंबर मुहम्मद (स.) शत्रुच्या शरणागतीचा स्वीकार करतात | २८० |
| | * पैगंबर मुहम्मद (स.) यांना ज्यांच्याशी व्यवहार करावा लागला ती माणसे | २८२ |
| | * दांभिक लोकांची मस्जिद पाडली | २८३ |
| | * पैगंबर मुहम्मद (स.) यांची विशालहृदयता | २८४ |
| | * उर्वाचा इस्लाम प्रवेश | २८५ |
| | * ताईफकडून शिष्टमंडळ | २८६ |
| | * नमाजचे वैशिष्ट्यपूर्ण मुख्य घटक | २८९ |
| | * धर्मप्रचारक पाठविले | २९० |
| | * अरबस्तानच्या सर्व भागांतून शिष्टमंडळे गर्दी करू लागली | २९२ |
| | * शेवटचे भाषण | २९४ |
| | * हजयात्रेनंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हालचाली | ३०१ |
| | * आजार | ३०२ |
| | * अखेरच्या सूचना | ३०३ |
| | * शेवटचा दिवस | ३०८ |
| | * पैगंबर (स.) शेवटचा श्वास घेतात | ३०९ |
| | * पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या निधनानंतर सोबत्यांना चिंता | ३१० |
| | * माननीय अबू बकर (रजि.) यांनी परिस्थिती हाताळली | ३११ |
| | * पैगंबर मुहम्मद (स.) यांचा स्वभावाचा एक सर्वसाधारण आढावा | ३१४ |
| | * त्यांचा चेहरा-मोहरा व त्यांचे व्यक्तिगत स्वरूप | ३१४ |
| | * पैगंबर- एक आदर्श | ३१४ |
| | * साधी राहणी व साधी सवय | ३१५ |
| | * शांत व निग्रही स्वभाव | ३१७ |
| | * अल्लाहवर मन:पूर्वक अढळ विश्वास | ३१८ |
| | * दैनंदिन कार्यक्रम | ३१९ |

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे"

## दोन शब्द

मानवजातीच्या इतिहासात पैगंबर मुहम्मद (स.) यांचे स्थान अद्वितीय व निरुपम आहे. त्यांच्यामध्येच पैगंबरत्वाच्या शृंखलेची अंतिम परिपूर्ती झाली. जीवनव्यवस्था पूर्णत्वास पोहोचली आणि माणसांच्या जीवनात एका नव्या युगाचा आरंभ झाला. पैगंबरत्वाचा अखेर होण्याचा असा अर्थ आहे. माणसाला ईशमार्गदर्शनाची मोठी गरज असते. माणसाचे आदर्श व्यक्तिगत जीवन तसेच सामूहिक जीवन, ज्यावर आधारले व उभारले जाऊ शकते, अशा नैतिक आणि सामाजिक जीवनपद्धतींसाठी आवश्यक असणाऱ्या परिपूर्ण मूल्यांचे व चिरंतन तत्त्वांचे, तेच खरेखुरे उगमस्थान आहे.

निर्माणकर्त्याने माणसाला असा मूल्यांचा व तत्त्वांचा शोध काळोखात घेत अडखळत ठेचा खाण्यासाठी एकटे सोडून दिलेले नाही. माणसांच्या उपक्रमानेच हे मार्गदर्शन आले आहे. दोन स्वरूपात ते आलेले आहे. एक ग्रंथ आणि दुसरे पैगंबर. ईशग्रंथामध्ये अनिवार्यत: तेच संदेश होते. या ग्रंथामध्ये चिरंतन ईशमार्गदर्शन आहे आणि पैगंबर स्थलकालात, ते मार्गदर्शन साकार करून, त्यानुसार आचरण करून दाखवित असतात. ग्रंथातील संदेश आणि पैगंबरांचे आदर्श उदाहरण एकत्र मिळूनच पूर्णत्व येते जे अविभाज्य असते आणि ते वेगळे करता येत नाही आणि सर्वच ग्रंथ आणि सर्वच पैगंबर हे या सोनेरी मालिकेतील अविच्छेद्य दुवे आहेत. पैगंबर मुहम्मद (स.) आणि त्यांच्यावर दिव्यबोधाने अवतरलेला ग्रंथ-कुरआन, त्या मालिकेतील अंतिम दुवे आहेत. त्यांच्याद्वारे त्या मार्गदर्शनाची सांगता झाली असून ते परिपूर्णतेला नेले गेले आहे. आता माणसाला परिपूर्ण मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्याची विवेकशक्ती इतकी जागृत करून मार्गबद्ध करून सोडण्यात आली आहे की, मार्गदर्शनाच्या या आचारसंहितेच्या प्रकाशात, तो आपला जीवनक्रमाचा नकाशा तयार करू शकतो. आता कोणत्याही नवीन दिव्यबोध अवतरण्याच्या प्रक्रियेची गरज उरली नाही. माणसाच्या अस्तित्वकाळातील नैतिक क्षेत्रात, आध्यात्मिक क्षेत्रात तसेच सामाजिक क्षेत्रात, त्याने परिपूर्तीसाठी चालविलेल्या अविरत प्रयत्नात आणि झटण्यात, कुरआन व पैगंबर मुहम्मद (स.) यांचे आदर्श जीवन हे शाश्वत काळापर्यंत मार्गदर्शक आहेत. यामुळेच पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जीवन अद्वितीय व अनुपम ठरते आणि प्रत्येक मानवप्राण्याशी, मग तो जगाच्या पाठीवर कोठेही असो, ते सबंधित ठरते.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनचरित्रावर अफाट साहित्य जरी असले, तरी इंग्रजी भाषेत त्यांच्या जीवनचरित्राची उणीव जाणवत होती. अशा जीवनचरित्रात त्यांच्या जीवनाचे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि त्यांच्या धर्मप्रसार कार्याचे संपूर्ण दृश्य दिसावे कारण याच पुरुषोत्तमाने इतिहासाच्या प्रवासाची दिशा बदलून मानवजातीच्या जीवनात एका नव्या युगाचा प्रारंभ केला. इंग्रजीत जे साहित्य आहे, ते अशा लोकांपासून निर्माण झालेले आहे, ज्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनाकडे काळ्या चष्म्यातून, मर्यादित दृष्टिकोनातून पाहिले आहे आणि त्यांच्या नजरेसमोर हे संपूर्ण चित्र नव्हते. इस्लामिक रिसर्च अकॅडमीने, बेगम आएशा बावरी वक्फच्या सहकार्याने हा संकल्प हाती घेतला. प्राध्यापक अब्दुल हमीद



सिद्दीकी यांच्याकडे हे कार्य सोपविण्यात आले होते. त्यांनी त्यांच्या संशोधनाचा व अभ्यासाचा निष्कर्ष दोन पुस्तकांत सादर केला. पहिल्या पुस्तकाचे शीर्षक 'इस्लाममध्ये प्रषित्व' असे होते आणि ते इ. स. १९६८ मध्ये प्रकाशित करण्यात आले. त्यात प्रषित्वाची गरज, पैगंबर मुहम्मद (स.) यांचे प्रषित्व आणि ते अंतिम पैगंबर असण्यावर सखोल स्पष्टीकरण आहे. पवित्र पैगंबराच्या जीवनाच्या अभ्यासाची ती नांदी आहे. मूळ साधनांवर विसंबून त्याच्या आधारेच पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जीवन व त्यांचा संदेश, यांचे वर्णन देण्याचे पुरेपूर प्रयत्न करण्यात आले आहेत. शब्द व शब्दांची कसरत करून केलेला हा धार्मिक वादविवादाचा भाग नाही तर इस्लामच्या पैगंबराच्या जीवनाचे आणि त्यांच्या संदेशकार्याचे स्पष्ट, नेमके व निर्विवाद निवेदन व हकीगत सादर करण्याचाच उद्देश आहे. इंग्रजी वाचकांच्या मनात काही अपसमज, तीच तीच गोष्ट सतत कानी-कपाळी ओरडून मनावर ठसविली गेली आहे, तीही आता दुरुस्त करण्यात आली आहे.

शेवटी आमच्या मुस्लिमेतर वाचकांसाठी काही सांगावेसे वाटते. आमची अशी श्रद्धा व दृढ विश्वास आहे की ईशमार्गदर्शन सर्वकाळी आणि सर्व लोकांपर्यंत आलेले आहे. एकाच उगमस्थानापासून ते मार्गदर्शन येणे, यात चुकीचे असे काही नाही. जी काही चूक आहे, ती दुसरीकडेच आहे. ज्यांनी मार्गदर्शनाचा प्रत्यक्ष स्वीकार केला अथवा त्यांना वंशपरंपरागत वारसात तो मिळाला, त्यांनी त्याला (मार्गदर्शनाला) उचित न्याय दिला नाही. गतकाळात त्यांच्यापैकी बहुतेकांनी दुर्दैवाने ते मार्गदर्शन नष्ट करून टाकले, त्याला दुर्लक्षित केले आणि त्यात भेसळ करून टाकली. आता या प्रवृत्तीला आणखी एक विस्तार देण्यात आला आहे, जे त्यांचे नाही. अशा आदिकाळापासून आलेल्या मार्गदर्शनांबद्दल असहिष्णुता-जेव्हा ते अन्य धर्माकडे आणि त्यांच्या पैगंबरांकडे येतात, विशेषत: इस्लामकडे आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे जेव्हा वळतात, तेव्हा त्यांच्या मनात खोलवर एक प्रकारचा आकस दडलेला असतो. त्यांच्या दृष्टीत एक प्रकारची विकृती येते, परंतु वास्तविकत: ते स्वत:ला, मार्गदर्शन व प्रकाशाच्या एका महान स्रोतापासून वंचित करून घेतात. ते खुल्या अंत:करणाने अनेक सुधारणावाद्यांचे जीवनचरित्र आणि त्यांचे कार्य वाचण्यास तयार असतात, त्यांच्या मर्यादित धार्मिक परंपरांच्या बाहेर असलेल्या पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनचरित्राबद्दल आणि त्यांनी दिलेल्या शिकवणींबद्दल मात्र तसे नाही. ही प्रवृत्ती तशीच अविवेकी व अशास्त्रीय आहे, जशी इतर साधनांकडून आलेल्या अणुसंशोधनाचे व अंतराळसंशोधनाचे निष्कर्ष नाकारणे, हे अविवेकी व अशास्त्रीय आहे. हा दुटप्पीपणा कशासाठी? आम्ही त्यांना खुल्या मनाने इस्लामचा आणि त्याच्या पैगंबराच्या जीवनचरित्राचा अभ्यास करण्याचे आवाहन करतो, जसा ते अन्य सर्व गोष्टींचा अभ्यास करीत असतात. असे झाल्यास सर्व पैगंबरांच्या संदेशांचे अधिक चांगल्या रीतीने आकलन व त्याचे रसग्रहण विकसित होण्यास ते सहाय्यभूत ठरेल आणि मानवजातीच्या अनेक आध्यात्मिक, नैतिक आणि सामाजिक समस्यांची उत्तरे शोधण्यात त्याची मदत होईल. यामुळे अखिल मानवजातीवर चांगले परिणाम घडून येतील.

**- खुर्शिद अहमद**

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे"

## प्रस्तावना

एका उत्तुंग विषयावर केलेला हा एक विनम्र प्रयत्न आहे. हा विषय इतका अफाट व इतका खोल आहे, कोणालाही त्याचे सांगोपांग आकलन होणे शक्य नाही. माझ्या विनयशील व विनम्र पध्दतीने मी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या भव्य व आदरणीय व्यक्तिमत्त्वाच्या काही बाबींचे वर्णन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. माझ्या अडीच वर्षाच्या परिश्रमांचे निष्कर्ष अल्लाहसमोर आणि माणसांसमोर ठेवले आहेत आणि त्याच्यावर कसलाही निवाडा देणे, हे खचितच माझे काम नाही. लेखकाला पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनावर शास्त्रशुध्द इतिहास लिहिल्याचा दावा करायचा नाही, ही गोष्ट प्रामाणिकपणे व विनम्रतेने, येथे नमूद केली पाहिजे. तो पांडित्यप्रचुर रीतीने पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे आलेला नसून, त्या मानवजातीच्या कल्याणकर्त्याकडे, प्रेम व निष्ठेच्या सरळ मनाच्या स्वरूपात तो आलेला आहे. घटनांचा कालक्रम काटेकोरापणे पाळण्यात आलेला नाही. पैगंबरांच्या पवित्र जीवनाचे संपूर्ण व एकसंघ चित्र सादर करण्याच्या उद्देशाने, तसे केले गेले आहे. काही संबंधित घटना व विचार एकत्र गोळा करून एकाच ठिकाणी त्यांच्यावर चर्चा केली आहे. वर्णन करताना त्यांना इतस्तत: विखुरलेले ठेवण्यात आलेले नाही. या पध्दतीत काही घटना अगदी संक्षिप्तपणे देण्यात आल्या आहेत आणि काही घटना रूढ पध्दतीपेक्षा अधिक दीर्घ केल्या आहेत. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे कोणतेही जीवनचरित्र, त्यांच्या शिकवणुकीचा आणि मानवी जीवनावरील घडून आलेल्या त्यांच्या प्रत्यक्ष परिणामांचा उल्लेख केल्याविना परिपूर्ण होत नाही. त्यांचे उचित आकलन होण्यासाठी आणि ईशसंदेशाचे अचूक रसग्रहन होण्यासाठी, ते मूलभूत महत्त्वाचे आहे. नि:संशयपणे धावते उल्लेख व संदर्भ देण्यात आलेले आहेत. परंतु पैगंबर मुहम्मद (स.) यांनी ज्या आदर्शांची शिकवण दिली आणि त्यांना प्रत्यक्षात साकार करून दाखविले, त्यांचा सखोल परिचय लोकांना करुन द्यायचा झाल्यास, दुसरा एक स्वतंत्र ग्रंथ लिहिण्याची आवश्यकता आहे.

मी, मौलाना अबुल आला मौदूदी, इब्राहीम बावानी, प्रा. खुर्शिद अहमद, गुलाम मुहम्मद, मलिक गुलाम अली, मिसबाहुल इस्लाम फारूकी, शहजाद मुहम्मद, डॉ. आबिद अहमद अली, यांचा त्यांनी सतत दिलेल्या साहाय्यासाठी आणि प्रोत्साहनासाठी, अंत:करणपूर्वक ऋणी आहे. प्रा. जफर इसहाक अन्सारी यांनी माझ्या हस्तलिखिताचे, अत्यंत कृपाशिलतेने वाचन व दुरूस्त्या केल्या आणि त्यात बहुमोल सूचना दिल्या त्यांचाही मी अंत:करणापासून ऋणी आहे. गुलाम सरवर यांनी अंतिम हस्तलिखिताचे टंकलेखन केले आणि सय्यद अता हुसैन आणि अश्रफ दार यांनी छपाईसाठी देण्यास त्याची तयारी केली. त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे. या साहित्यिक कृतीत, जाणीव होण्याइतकी थोडीही गुणवत्ता असेल, तर अल्लाहच्या दयाकृपेलाच त्याचे सर्व श्रेय जाते आणि सर्व कृताकृत दोषांसाठी, त्रुटींसाठी केवळ लेखकच जबाबदार आहे.

**अब्दुल हमीद सिद्दीकी**
**लाहोर, ८ जुलै १९६९**



## दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

माझ्या विनम्र प्रयत्नाला, माझ्या कल्पनेत नव्हती, इतकी लोकप्रियता मिळवून देण्याची अमर्याद कृपा केल्याबद्दल, माझ्या स्वामीची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी माझ्याजवळ उचित व पुरेसे शब्द नाहीत. या पुस्तकाचे चहुकडे मोठे स्वागत झाल्याकारणाने, त्याची दुसरी आवृत्ती काढण्यात आली आहे. पहिल्या आवृत्तीत मोलाच्या सूचना आणि सुधारणा केल्याबद्दल मी मलिक गुलाम अली आणि वकार हुसैन गरदेझी, यांचा अत्यंत ऋणी आहे. माझा भाऊ मुहम्मद इकबाल शाइक याने अत्यंत कुशलतेने अनुक्रमणिका तयार केली आणि अन्य प्रकारेही मला फार मदत केली, त्यासाठीही मला कृतज्ञता वाटते.

**अब्दुल हमीद सिद्दीकी**
**लाहोर,** २६ मे १९७५

## अनुवादकाचे दोन शब्द

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जीवनचरित्र अत्यंत परिश्रमपूर्वक आणि अत्यंत विद्वत्ताप्रचुर भाषाशैलीत प्रा. अब्दुल हमीद सिद्दीकी यांनी लिहिलेल्या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद करण्याची संधी मला उपलब्ध करून दिल्याबद्दल असीम दयावंत व कृपावंत अल्लाहचे यथोचित आभार शब्दांत व्यक्त करण्यास मी असमर्थ आहे.

विषय अत्यंत उत्तुंग व अथांग असल्याने व लेखकाचा प्रत्येक शब्द अत्युच्च भाषाशैलीत असल्याने, मूळ भावार्थ जसाच्या तसा राखून मराठीत अनुवाद करण्याचा हा माझा नम्र प्रयत्न आहे. त्यात मला कितपत यश आले हे अल्लाहने व वाचकांनी ठरवायचे आहे.

असीम दयावंत व कृपावंत अल्लाहने ही सेवा रूजू करून घ्यावी, अशी त्याच्यापाशी कळकळीची याचना आहे. अनुवादातील त्रुटींबद्दल आणि दोषांबद्दल अल्लाहकडे क्षमायाचना करतो.

**शेख अब्दुल हमीद**
**मिरज, १३ जून १९९३**

प्रकरण १

# इस्लामपूर्वीचा अरबस्तान

## अरबस्तानची स्वाभाविक सृष्टीरचना

तांबडा समुद्र आणि पर्शियन आखाताच्या मध्ये एक रखरखीत व पाण्याचे दुर्भिक्ष असलेला ओसाड भूखंड पसरलेला आहे. कधीतरी येणाऱ्या प्रासंगिक पुरामुळे, तेथील वातावरणात ओएसिस टवटवितपणा आणि आकर्षण आणतो. त्या भूखंडाचा अधिकांश भाग भौगोलिकदृष्ट्या, अनाकर्षक व अमित्रत्वाचा आहे. चहुकडे कित्येक मैल पसरलेल्या उघड्या बोडक्या टेकड्यांना आणि चकाकणाऱ्या व भाजून काढणाऱ्या वाळवंटाला अंतच नसल्यासारखे भासते. खजुरीची झाडे व पाणी असणारी काही हिरवळीची ठिकाणे, जी भटक्या अरबांना विश्रांती देतात, ती वगळता विस्तवप्रमाणे भाजून काढणाऱ्या उन्हापासून आश्रयाचे व विसाव्याचे स्थानच नाही. पाण्याचे ओढे किंवा नाले क्वचितच आहेत आणि ते समुद्राला कधीच जाऊन मिळत नाहीत. त्यांपैकी अधिकांश ओढे, प्रासंगिक पावसाने आलेल्या पाण्यामुळे पूर आल्याने अस्तित्वात येतात आणि वाळवंटी मैदानात जाऊन गडप होतात.

प्राचीन भूगोलकारांनी या द्वीपकल्पाचे तीन भाग केले होते. त्यांची नावे 'अरेबिया पेट्रीया', 'अरेबिया फेलिक्स' व 'अरेबिया डेझर्टा' अशी ठेवली होती. अरेबिया पेट्रीया हा भाग म्हणजे वर्तमान हिज्जाझ आणि नज्द प्रदेशाचा पूर्वेकडील भाग, अरेबियन फेलिक्स म्हणजे येमेन आणि हाड्र माऊंट आणि अरेबियन डेझर्टा म्हणजे देशाचा उर्वरित भाग.

उत्तरेत डोंगर व टेकड्यांचा पट्टा पसरलेला असून, पूर्वी तेथे हेब्रू कराराचे पालन करणारे इडोमाइट व मिडियानाइट टोळ्यांच्या यहुदी लोकांची वस्ती होती. मग खुद्द हिज्जाझचा प्रदेश आहे. तो प्रदेश तांबड्या समुद्राला लागून, उत्तरेस सीरियापर्यंत आणि दक्षिणेस येमेनपर्यंत आहे. याच भागात प्रसिध्द शहरे मक्का, मदीना आणि जेद्दाह वगैरे वसलेली आहेत. याच भागात सुएज कालव्याला जोडणाऱ्या चिंचोळ्या भूभागापासून ते हिंद महासागरापर्यंत लहानमोठ्या टेकड्यांनी विखुरलेला आहे.

प्राचीन अरबस्तानच्या बाहेरील जगाशी संपर्काचे काही थोडे दुवे होते. सीरियापासून युफ्रेटिस नदीपर्यंत पसरलेला प्रदेश इ. सनाच्या दुसऱ्या शतकात एतद्देशीय टोळ्यांनी व्यापलेला होता. स्थानिक लोककथनानुसार या टोळ्या दक्षिणेकडून स्थलांतर करून आल्या होत्या. नंतर रोमन साम्राज्याच्या इतिहासात त्या टोळ्यांबद्दल अनेकदा आपल्याला



ऐकायला मिळते. पूर्वेस युफ्रेटिस नदीच्या काठाने हिराचे राज्य होते. गस्सानचे राज्य रोमनांशी चिकटून होते तर 'हिरा' पर्शियन साम्राज्याला धरून होता.

अरबस्तानच्या इतिहासातील प्राचीन नोंदी, ही वास्तवता स्पष्टपणे दाखवून देतात, की या द्वीपकल्पाच्या दूरवर असलेल्या सरहद्दीतूनच बाहेरील सुधारलेल्या जगाशी अरबस्तानचा संपर्क होता. बाकीचा अरबस्तान अगदी अज्ञात होता. हा संपर्क देशातील व्यापार करणाऱ्या लोकांच्या माध्यमातून व सीरियाच्या सरहद्दीजवळ वसाहत केलेल्या लोकांच्याद्वारे होत होता. खुद्द अरब लोकांना त्याच्या वाळवंटापलीकडची कसलीही माहिती व ज्ञान नव्हते.

देशाच्या सरहद्दीच्या आत, मक्का शहराला प्रमुख स्थान होते. ते एक छोटेखानी शहर होते. ते चहुबाजूंनी ज्वालामुखीच्या खडकांनी व डोंगरांनी वेढलेले होते आणि एका सपाट मैदानात ते वसले होते. तांबड्या समुद्राच्या किनाऱ्यापासून त्याचे अंतर पन्नास मैल होते. तांबड्या समुद्रापासून जमिनीचा भाग चढणीचा होता. ती चढण क्रमाक्रमाने वाढत जाऊन अरबस्तानच्या अंतर्भागातील सर्व लोकांचे मक्का शहर आकर्षण बनले होते. असंख्य लोक दरवर्षी यात्रेसाठी तेथे येत असत.

काबागृहाच्या व्यवस्थापनाचा ताबा आपल्या हातात असावा, हीच महत्त्वाकांक्षा आणि मुख्य उद्दिष्ट सर्व अरबी टोळ्यांच्या मनात असे. याचे कारण असे की काबागृहाच्या संचालकांचा अरब जनतेवर फार मोठा प्रभाव व वर्चस्व होते, म्हणून ते महत्त्वाचे स्थान प्राप्त करण्यासाठी व अल्लाहच्या गृहाचा ताबा आपल्या हातात राहावा म्हणून वारंवार संघर्ष व झगडे होत असत.

इतिहास आम्हाला दाखवून देतो की, इस्माईलच्या वंशातील लोकांच्या हातात, काबागृहाचा ताबा फार दीर्घ काळापासून चालत आला होता. नंतर तो जुरहाम घराण्याकडे आणि नंतर अमालीक घराण्याकडे आला. पुढील काळात इस्माईली आणि जुरहाम वंशजांनी युती करून त्यांचा समान शत्रू असलेल्या अमालीक लोकांना मक्केबाहेर हुसकून लावले व शेवटी जुरहाम घराण्याचे लोक काबागृहाचे पालक व व्यवस्थापक बनले.

बनू बकर व बनू खुजाह या टोळ्यांच्या लोकांना, काबागृहाचा ताबा व व्यवस्थापनाचा अग्रहक्क याचा मोठा हेवा वाटत होता आणि जुरहाम लोकांच्या हातातून काबागृहाचा ताबा काढून घेण्यासाठी त्या दोन टोळ्या एकत्र आल्या. त्यानंतर कुरैशने बनू किनानाह टोळीशी संगनमत करून बनू बकर आणि बनू खुजाहा या दोन्ही टोळ्यांचा पराभव करून मक्केवर आणि काबागृहावर आपली सत्ता प्रस्थापित केली.

अशा रीतीने मक्का शहराचे व काबागृहाचे नियंत्रण चारशे वर्षांच्या खंडानंतर,

पुन्हा एकदा कुरैश लोकांच्या हातात आले.

नंतर काबागृहाच्या व्यवस्थापनाचा ताबा, पहिल्यांदा अब्द-द्दारकडे आला व पुढे त्याच्या पुत्रांच्या हातात व नातवंडाच्या हातात चालत राहिला.

**इतिहासकार मुर लिहितोः-** 'अब्द-द्दारच्या घरात सर्व मूळ-सार्वजनिक पदे होती, परंतु हाशिम घराण्यांशी झालेल्या त्यांच्या संघर्षात, प्रतिष्ठेची व महत्त्वाची अनेक पदे त्यांना गमवावी लागली आणि आता त्यांचे स्थान कनिष्ठ व दुय्यम दर्जाचे झाले होते. त्यांच्या हातात अद्याप उरलेली पदेही नि:संशयपणे मोलाचीच होती. परंतु कुटुंबातील सदस्यात त्यांची वाटणी झाली होती आणि एकत्रितपणाचे जे लाभ होते, ते नष्ट झाले होते. गमावलेला सामाजिक प्रभाव आणि राजकीय सत्ता पुन्हा मिळविण्यासाठी आणि परिस्थिती सुधारून अनुकूल करून घेण्यासाठी, एकत्रितपणे कोणतेही प्रयत्न सातत्याने केले जात नव्हते. मक्का शहराच्या प्रमुखत्वाचा मान, खऱ्या अर्थाने अब्दे मुनाफच्या वंशजाकडे आला होता. त्यांच्यामध्येसुध्दा दोन मुले हाशिम व अब्दशम्स यांची ती दोन कुटुंबे होती. यात्रेकरूना अन्न व पाणी पुरवठा करण्याचे बहुमानाचे पद हाशिम घराण्याकडे आले आणि आता अब्दुल मुत्तलिब या त्यांच्या पुत्राकडे आले. त्यांचा पिता हाशिमप्रमाणेच अब्दुल मुत्तलिब यांना मक्केतील सर्व शेखांचे प्रमुख मानण्यात येऊ लागले.'

अशा प्रकारे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जन्मसमयी या आदर-प्रतिष्ठेचा उपभोग त्यांच्या घराण्यात होता आणि काबाच्या भोवताली स्थापन झालेल्या धार्मिक लोकसमाजाचे ते आदरणीय प्रमुख मानले जात होते.

**पी. डी. लेसी जॉन्स्टन नुसार–** 'अरबांच्या परंपरेनुसार मदीनेत मूळ वस्ती अमालीक वंशियांची होती. पण यहुदी घुसखोर आक्रमकांनी, त्यांना त्यांच्या भूमीतून हुसकून लावले. कदाचित नेबुचदने झार आणि त्यांच्यानंतरच्या विजेत्यांनी केलेल्या हल्ल्यामुळे, त्यांच्यावर ती राष्ट्रीय आपत्ती कोसळली असावी. त्यांच्यापैकी प्रमुख टोळ्या नजीर, कुरैजा आणि केनुका या होत्या. इ. स. ३०० मध्ये अझ्द कुळातील औस व खजरज टोळ्यांनी घस्सान येथील नातलगाकडून दक्षिणेत हल्ला केला. यहुद्यांनी त्यांचे अतिथ्यशीलतेने स्वागत केले आणि सुरूवातीला त्यांच्याशी चांगले संबंध राखले. परंतु त्यांची संख्या जशी वाढली आणि त्यांच्या शक्तीची त्यांना जेव्हा जाणीव झाली, तेव्हा इ. सनाच्या पाचव्या शतकाच्या अखेरीस, सत्तेत सहभागी असलेल्या यहुदी लोकांविरूध्द त्यांनी उठाव केला. त्यांच्या प्रमुखांची कत्तल केली, त्यांच्या उत्तमोत्तम जमिनी बळकावल्या आणि हत्याकांडाचा आणि रक्तपाताचा सूड अबू कारिब या राजपुत्राने घेतला. त्यांच्या प्रमुखांना ठार केले, त्यांची तयार झालेली उभी पिके उद्ध्वस्त केली, पण नंतर तो निघून गेला. त्यानंतर प्रतिस्पर्धी घराण्यामंध्ये सतत वीस वर्षे कलह व संघर्ष चालत राहीला.



त्यानंतर दोघांमध्ये झालेला शांतता करार पन्नास वर्षे टिकला. नंतर पुन्हा युद्ध सुरू झाले. या युद्धाचा शेवट इ. स. ६१६ मध्ये झालेल्या घनघोर रणसंग्रामात झाला. (त्यात यहुद्यांची शक्ती दोन्ही प्रतिस्पर्ध्यात विभागली गेली आणि वाळवंटी टोळयाच्या युती झालेल्या मित्रांनी युद्धात भाग घेतला) त्या युद्धात खजरज विजय झाला. त्याचा प्रमुख अब्दुल्लाह इब्न उबई याला मदीनेच्या राजेपदावर बसविण्यात येणार होते, तोच मक्केहून स्थलांतर करून माणसे आली आणि शहराचे भाग्य पालटले.'

तेलाचा आधुनिक प्रचंड लोंढा व त्यामुळे अरबांकडे आलेल्या या सोन्याच्या ओघापूर्वी, अरबांची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची होती. जमीन निकृष्ट प्रतीची होती. सतत नांगरणी करूनही त्यांना अनिश्चित उत्पन्न मिळे. त्यांच्या उपजीविकेचे साधन उंट पाळणे, घोडे, गुरे-ढोरे, मेंढ्या व शेळ्या पाळणे असे होते. भरपूर गवत व पाणी असलेल्या पाणथळ जागेच्या जवळपास तंबू ठोकून तेथेच मुक्काम करीत असत. तसेच व्यापारी मालाची ने-आण वाळवंटातील ठराविक मार्गाने करून ते आपला चरितार्थ चालवित असत.

## अरबांचा स्वभाव

अरब नि:संशयपणे गरीब होते, परंतु ते आनंदाने जीवन जगत होते. आधुनिक काळाचे वैशिष्ट्य असलेल्या मानसिक ताण-तणावापासून, ते वास्तविकपणे मुक्त होते. अत्यंत भावनाप्रधान, तापट स्वभावाचे, जिवापाड प्रेम करणारे व द्वेषातही अत्यंत कट्टर असणारे, लढाईत व पाठलाग करण्यात फार रस असणारे, मेजवान्या देण्यात मोठी हौस बाळगणारे, मेजवान्यात एक पेलाभराही मद्य शिल्लक न ठेवणारे, असे अरब लोक होते. जेव्हा गरज पडेल तेव्हा अत्यंत कडक थंडीत तसेच जीवघेणी तहान व भूक सोसण्याची व सहन करण्याची त्यांची शक्ती असाधारण होती. ते फार बोलके होते आणि त्यांना अद्भूत वक्तृत्वकलेची देणगी लाभली होती. काव्य कसल्याही स्वरूपाचे असले तरी त्यांची मने हेलावून जात. त्यांची नातलगांची व मित्रांची स्तुती केल्यास व त्यांच्या शत्रूवर कडवट टिका केल्यास व त्यांच्यावर दोषारोप केल्यास ते फार खूष होत असत.

लेखन जवळजवळ नव्हतेच, वाळवंटातील साहित्य, लोकांच्या जीभेवर खेळत असे आणि अंत:करणाच्या पटलावर कोरले गेलेले होते. एक उत्कृष्ट योध्दा हा एक नामांकित कवीही असे. अनेक कवयित्रींची नावेही अरबी वैभवाच्या मालिकेत शोभा वाढवित असत.

त्यांच्या काव्यांचा मुख्य विषय बहुतेक वेळा लढाईच्या आनंदाचे वर्णनच असे. तसेच वर्चस्वासाठी केलेल्या संघर्षाचे, ओसाड वाळवंटातून अंधारात केलेल्या दीर्घ

प्रवासात सोसलेल्या हालअपेष्टांचे वर्णन, तसेच त्यांच्या एकनिष्ठ व इमानी उंटांचे व इमानी घोड्यांचे वर्णन, लढाईच्या धुमश्चक्रीत वेगाने तळपणाऱ्या तलवारीचे वर्णन त्यांच्या भाल्यांच्या टोकदार अणीचे आणि धनुष्यबाणाचे वर्णन, डोंगरावरून व सपाट वाळवंटावरून अतिवेगाने घोंघावणाऱ्या तुफानी वादळाचे वर्णन, विजेच्या प्रचंड कडकडाटांचे, मुसळधार पावसाचे वर्णन आणि महापुरांमुळे मोठा खळखळाट करीत वाहणाऱ्या अक्राळविक्राळ प्रवाहांचे वर्णन, हे सर्व त्यांच्या काव्यांचे मुख्य विषय असत. प्रचंड वादळाने जीव वाचविण्यासाठी सुसाट धावणाऱ्या हरणांचे व शेळयामेंढ्यांचे वर्णनही काव्यात असे. प्रत्येक दीर्घ काव्याच्या सुरूवातीस, एकेकाळी आपली प्रिय प्रेयसी राहत असलेली आणि काही दिवसांनी आपली राहुटी उचलून सोडून दिलेल्या स्थानावर शोक विलाप केलेला असे. मानवी दु:खांचा अश्रूंनी भिजलेल्या शोकगितांचे विलाप, त्यात सामावलेले असत. एक काव्य प्रकार व एक विषय मात्र कटाक्षाने त्यांच्या काव्यात नसे. ईश्वरावरील निष्ठा-प्रार्थना व ईशस्तवन त्यांच्या काव्यात कधीही ऐकण्यात येत नसे. परंतु भयानक व अघोरी शपथा यांचा मात्र अभाव नसे. प्राचीन अरब माणूस मुख्यत: आत्मकेंद्रित असे. स्वत:वरच विसंबणार असे. त्याच्या स्वत:च्या उजव्या हाताच्या बळावर तो आपले भाग्य जिंकू शकतो असा त्याचा दृढ आत्मविश्वास होता. त्यांचे जीवन व त्यांचे विचार यावर उपासनेचा फारसा प्रभाव नव्हता. देवतांचा प्रसाद म्हणून एखादा योध्दा, त्यांचे बाण घेत असे, परंतु त्यांच्या इच्छेनुसार त्यांची फलनिष्पत्ती झाली नाही, तर रागाने तो देवतेने दिलेले बाण तिरस्काराने व उपहासाने त्या देवतेच्या मूर्तीच्या तोंडावरच भिरकावून देत असे.

काही गाण्यांची संक्षिप्त शब्दचित्रे आम्ही खाली उद्धृत करीत आहोत, ज्यामुळे वाचकांना अरब माणसाच्या इंद्रिय सुखलोलुपतेची, त्यांच्या विलासाची, त्यांच्या सुख-दु:खाची आध्यात्मिक श्रध्दांची नीट कल्पना येईल.

*‘तो एक देखण्या चेहऱ्याचा आकर्षक मुलगा आहे,*
*तो होतकरू वाटतो आणि हारिसच्या परिपूर्णतेने वाढत आहे,*
*वय आणि यौवन यांचा सुंदर मिलाफ असून, ती सर्वोत्तम माणसांपैकी आहेत.*
*त्यांच्या थोर पूर्वजांबद्दल काय सांगावे, तो सर्वोत्तम मद्यपी होते.*
*जेव्हा ती सन्याशाच्या डोळ्यांपूढे विजेसारखी संचारते*
*तो सन्याशी गिरीकंदराच्या शिखरावर असतो तिच्या लावण्याने तोही मोहित होतो,*
*तिचे बोलणे ऐकून पर्णकुटीच्या बाहेर येतो*
*आणि म्हणतो, तू जर माणूस नसतीस तर पूर्णचंद्रच असतीस.’*

इस्लामच्या आगमनापूर्वीच्या अरबस्तानात अशा प्रकारच्या काव्याची अगणित



उदाहरणे दिसून येतात. त्या काव्यपंक्तीवरून अशी वास्तवता आढळून येते की विषयासक्ती आणि इंद्रियसुखलोलुपता असतांनाही अरब लोक अतिशय शूर होते आणि कोणत्याही प्रकारच्या परिस्थितीला ते हिंमतीने सामोरे जाऊ शकत होते.

‘मांस भाजा, कडक मद्य काटोकाट भरा उंटावरून भरधाव जाण्यासाठी आणि खचितच तुमचा जीव जर तिच्यावर जडला असेल तर एकांतात या गोऱ्यापान ललना, पुतळ्यासारख्या सोनेरी झालर लावलेले त्यांचे भारी किंमतीचे झगे रस्त्याने फरफटत आहेत, खूप श्रीमंत आहे, सुखासीन मंडळी, दुष्परिणामाची भीती नाही, बासरी ऐकण्यासाठी, सारंगीची कंप पावणारी दोरी ही सुखे आहेत आयुष्याची कारण माणूस काळाचे खेळणे आहे, काळ निघून जात आहे जीवन अल्प असो की दीर्घ असो, संपन्न असो वा नसो, काळाला सर्व समान आहे, मृत्यू सर्वांना आहे.’

आता एका शूर प्रमुखाने म्हटलेले एक शोकगीत आहे, जे त्याच्या शत्रूने त्याला खाली पाडल्यावर मृत्यूपूर्वी त्याने म्हटले होते,

*‘माझी आणखी दुसरी निर्भर्त्सना करू नका,*
*ही लाजिरवाणी अवस्था मला पुरेशी आहे,*
*मी आता आहे त्या अवस्थेत माझी निर्भर्त्सना करणे*
*तुम्हालाही लाभदायक नाही आणि मलाही नाही.*
*तुम्हाला ठाऊक नाही काय की खडसावून बोलण्यात*
*माणसांचा कसलाही फायदा नसतो?*
*मी स्वतंत्र होतो तेव्हा माझ्या भावाला दोष देण्याची मला सवय नव्हती*
*मुलैका, माझी पत्नी चांगल्या प्रकारे जाणते की मी सिंहासमोर जात असे,*
*माझ्या योद्ध्यांच्या पुढे असे आणि माझ्यावर धावून येणाऱ्यांशी निकराने झुंजत असे,*
*ठार केलेले कैक प्राणी मी शिकाऱ्यांना देऊन टाकीत असे.*
*अनेकदा मी धोक्याच्या वाटेने प्रवास करीत असे आणि*
*माझ्याबरोबर त्या वाटेने येण्यास कोणीही साहस करीत नसे आणि*
*कैक वेळा माझ्या स्वारीचे जनावर कापून माझ्या साथीदारांना मेजवानी देत असे.*
*अनेकदा मी माझे दोन भारी किंमतीचे झगे गायिका युवतींना दिले आहेत.*
*भाल्याच्या दबावाखाली माझे घोडे मागे फिरत असत, खाली पडून मरत असत.*
*तरी माझी युध्दकुशल बोटे त्यांच्या रांगावर व तलवारीवर विजेसारखी फिरत असत.*
*एखाद्या टोळधाडीप्रमाणे शत्रूसैन्य माझ्या एकट्यावर तुटून पडत असे आणि*
*माझे हात त्यांचे तुकडे पाडून त्यांच्या भाल्यांची एकत्र मोळी बांधत असत.*
*आता मी असा आहे की एखाद्या उमद्या घोड्यावर मी कधी स्वार झालोच नाही.*

*किंवा माझ्या घोडेस्वारांना चाल करून जाण्याचा कधी आदेश दिलेला नाही.*
*मुक्त श्वास घेण्यासाठी कधी प्रदेश काबीज केलाच नाही किंवा*
*सोन्याची रास कधी आणली नाही की पखाल भरून उंची मद्यही आणले नाही*
*आणि खेळात रमलेल्या, रंगलेल्या हृदयांना अशी कधी हाक दिलीच नाही की,*
*आमच्या विजयप्राप्तीच्या इशाऱ्याच्या ज्वाला खूप उंच जाऊ द्या.'*

या कवितेच्या ओळी 'हमसाह'मधून घेतलेल्या आहेत. त्यावरून अरबांचा आदर्श सहगुण व नीती कशी होती ते स्पष्टपणे कळून येते. ते 'मुरूव्वाह' (हिम्मत) आणि 'इर्द (प्रतिष्ठा) या दोन शब्दांनी व्यक्त केले जाऊ शकते.

रेनॉल्ड ए निकलसन म्हणतो, 'हा निव्वळ योगायोग नाही की अबू तम्मामच्या प्रसिध्द कवितासंग्रहाला 'हमसाह' या गुणाला अरब लोकांत सर्वाधिक मोल होते, रणांगणात शौर्य, दुर्दैवात धीर आणि सहनशीलता, सूड उगविण्यात सातत्य व चिकाटी, दीनदुबळ्यांचे रक्षण आणि बलदंडांना आव्हान आणि दुर्दम्य इच्छाशक्ती.'

टेनिसन म्हणतो, 'झुंजत राहणे, शोध घेत राहणे, मिळविणे आणि कधीही शरण न जाणे ही त्यांची दुर्दम्य इच्छा असे.'

एक आदर्श अरब वीर अझ्दच्या शनफार आणि लढ्यातील त्याचा साथीदार तआब्ता शर्रचे उदाहरण घोडदौड करणारे व उत्कृष्ट कवी असे होते.

अझ्दच्या शनफारबद्दल असे सांगितले जाते की तो बाल्यावस्थेत असताना त्याच्या टोळीतून बनू सलमान याने पळवून नेले होते आणि त्यांच्यामध्येच तो लहानाचा मोठा झाला होता. मोठा होईपर्यंत त्याला त्याच्या जन्माची व त्याच्या मूळ कबिल्याची माहिती नव्हती. ती माहिती कळल्यावर त्याला पकडून कैद करणाऱ्यांचा सूड घेण्याची त्याने प्रतिज्ञा केली आणि आपल्या टोळीमध्ये परत आला. त्याने प्रतिज्ञा केली होती की, सलमानच्या टोळीतील शंभर माणसांची तो मुंडकी उडवील. त्यापैकी अठ्ठ्याणव माणसांची त्याने मुंडकी छाटली होती. त्याच्यावर शत्रूच्या लोकांनी अचानक छापा घालून त्याला पकडून कैद केले. कैद करताना झालेल्या झटापटीत तलवारीच्या वाराने त्याचा एक हात तुटला, तरी दुसऱ्या हातात तलवार घेऊन त्याने सलमान टोळीतील एकाच्या तोंडावर वार केला आणि त्याला ठार केले. त्याने ठार केलेल्यांची संख्या आता नव्व्याणव झाली होती. नंतर त्याला चीत करण्यात आले व ठार करण्यात आले. त्याने प्रतिज्ञा केलेल्या संख्येत अद्याप एकाची उणीव होती. त्याचे मुंडके रक्त ठिबकत जमिनीवर पडलेले होते. शत्रूकडील एकजण तेथून जात होता. त्याने पायाने ते मुंडके ठोकरले. ठोकर मारताना मुंडक्याच्या एका अणकुचीदार हाडाचा तुकडा त्याच्या पायाच्या तळव्यात घुसला. ती



जखम मोठी झाली आणि तो इसम मरण पावला. अशा रीतीने शंभर माणसे मारण्याची त्याची प्रतिज्ञा पूरी झाली.

खालील उतारा हा शनफारनच्या तेजस्वी लघुकाव्यातून अनुवाद करून घेण्यात आला आहे. त्याचे शीर्षक 'लमीय्यतुल अरब' असे असून त्यात त्याने स्वत:ची शौर्यगाथा आणि लुटारू जीवनातील हालअपेष्टांचे वर्णन केले आहे.

*'आणि महाकुलीन व श्रीमान माणूस इजा व अपाय होण्यापासून दूर*
*आपला आश्रय घेतो, बंडखोर मात्र एकाकी जागेत आश्रय घेतो,*
*तेथे द्वेषाने जळणारे कोणीही नात्याचे नसते.*
*तो कधीही दूरदर्शी नसतो,*
*भीतीची आशा मनी धरून तो रात्रीचा संचार करतो.*
*भूतलावर तो अत्यंत बिकट अवस्थेत असतो,*
*तरीसुध्दा त्याला भटकायला आणि आश्रयाला जागा मिळतेच.*
*तुमच्याऐवजी आता न दमलेले लांडगे माझे खरे मित्र आहेत,*
*गुबगुबीत चित्ते,केसाळ तरस, हेच माझे खरे मित्र आहेत,*
*त्यांना विश्वासाने सांगितलेली गुपिते ते कधीच फोडत नाहीत*
*आणि हानीचे मूळ आणले, म्हणून नीचपणे ते मैत्रीही सोडत नाहीत.'*

अरबांना एकोप्याच्या फायद्यांची पुरेपूर जाण होती आणि त्यांच्या घराण्यांना एकोप्याने राहण्याचा ते आग्रह करीत असत,

*'तुम्हावर अरिष्ट कोसळो, कारण तुम्ही विखुरलेले आहात,*
*उलटपक्षी दुसरे लोक एकीने राहात आहेत,*
*पर्शियाचे राजपुत्र तुमच्यावर हल्ला करण्यासाठी एक होतात,*
*किल्ल्यांच्या संरक्षणाची ते तमा बाळगत नाहीत,*
*ते पूर्णपणे शस्त्रसज्ज होऊन तुम्हावर चालून येत आहेत,*
*ते तुमची मानखंडना करतील, तुम्ही कंबरा बांधा आणि त्यांच्यावर तुटून पडा,*
*जो दुसऱ्यावर आघात करून त्याची मती गुंग करतो, त्यालाच सुरक्षितता मिळते,*
*तुम्ही धैर्यशील आणि शूर प्रमुख निवडा, जो सौम्य नाही आणि*
*खडतर अपेष्टांना स्तुत्य रीतीने तोंड देणार असा नेता निवडा,*
*जो अनुभवी आहे, सेवा कशी करावी व करून घ्यावी हे जो चांगले जाणतो,*
*मजबूत आणि भक्कमपणे निर्धाराने उभा ठाकणार,*
*तो वयस्कर नसावा व दुबळाही नसावा.'*

वरील ओळी अरब लोकांच्या शौर्य, भक्कमपणा आणि शक्ती या गुणांच्या मूलबीजांचे वर्णन करतात. अरबांचे शौर्य हे प्राचीन ग्रीक लोकांप्रमाणे आहे. ते प्रोत्साहन व उत्तेजनाने तळपते आणि ताणतणावापुढे आणि विलंबापुढे ते शांतपणे विरून जाते. म्हणून अरब नायक उद्दाम, मग्रूर व बढाई करणारा व फुशारकी मारणारा असतो. त्याची तशी भूमिका अम्र बिन कुलसुमच्या 'मुअल्लका'मध्ये ते उत्कृष्टपणे रेखाटले आहे.

इस्लामपूर्व काळातील अरबांच्या काव्याचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, अरब माणसे सर्वसाधारणपणे आनंदी होते. परंतु वार्धक्याचा जेव्हा त्यांच्या डोक्यात विचार येई, तेव्हा त्यांचा आनंद लोप पावून ते खिन्न होत असत.

एक प्राचीन अरब कवी हारिस बिन कआब आपल्या निघून गेलेल्या तारूण्यावर विलाप करीत शोकगीत लिहितो,

*'मी माझे तारूण्य थोडे थोडे करून घालविले व ते पूर्णपणे नष्ट झाले*
*शेकडो महिन्यांचा कालावधी मी वाया दवडला.*
*माझ्या डोळ्यांनी, तीन पिढ्या होऊन जाताना मी पाहिल्या.*
*ते सर्व निघून गेले, कायमचे गेले, अरेरे! मी वृध्द झालो,*
*ज्याला मनाचा संतोष होईपर्यंत खाता येत नाही, सहजपणे चालताही येत नाही,*
*मी अगतिकतेचा बळी आहे, झोपेशिवाय मी रात्रीच्या रात्री तारे मोजत घालवितो.*
*नबीघाहसुध्दा अत्यंत करूणरसपूर्ण कविता म्हणतो, परंतु दीर्घायुष्य त्याच्यासाठी*
*दु:खकारक आहे, आनंदी चेहऱ्यापासून तो वंचित झाला आहे, आणि त्याच्या*
*जीवनाचा पेला दु:खाने भरला आहे, आणि वयाने त्याला जबरदस्त धोका दिला*
*आहे, आणि जीवनात त्याला आनंद मुळीच आढळत नाही.'*

मनाचा मोठेपणा, औदार्य आणि आतिथ्यशीलता हे सर्व वाळवंटातील ठळक गुण होते आणि आजही अरब माणसांचे ते ठळक गुणवैशिष्ट्य आहे. टोळीप्रमुखाच्या तंबूबाहेर राखेचे आणि हाडांचे मोठमोठे ढीग पडलेले असणे, हे त्यांच्या प्रतिष्ठेचे व मोठेपणाचे प्रतीक मानले जाई कारण त्यामुळे अनेक पाहुण्या माणसांना त्याने मेजवान्या दिल्या हे सिध्द होई.

ग्रामीण अरबांचे औदार्य व आतिथ्यशीलता यांचे हुबेहूब चित्र 'हातीम ताई'च्या अनेक कथांमध्ये रेखाटले गेले आहे.

हातीम स्वत:च कवी होता. खालील ओळी त्यांनी पत्नी 'मुआवियाहला' उद्देशून लिहिल्या आहेत,



*'हे अब्दुल्लाह व मालिकच्या कन्ये!*
*आणि तो ज्याने येमेनहून आणलेले दोन झगे अंगावर घातले होते,*
*मगजी रंगाच्या घोड्यावर स्वार असलेला वीरनायक तू*
*जेव्हा दोन भोजनांची तयारी केली आहेस,*
*तर त्याचा आस्वाद घेण्यासाठी तूच मनधरणी कर,*
*अतिथी हवा, मी कंजूष माणसाप्रमाणे एकटा जेवणार नाही.*
*रात्रभर प्रवास करून दमला-भागलेला एखादा वाटसरू,*
*अथवा समाधानासाठी शेजारी राहणार माणूस तरी,*
*माझ्या पश्चात लोकांनी मला टाकून बोलण्याची भीती वाटते,*
*मी पाहुण्या माणसाचा दास आहे, माझ्या घरात तो असेपर्यंत हे खरे आहे,*
*तरी माझ्या स्वभावात दास्यत्वाची लक्षणे मुळीच नाहीत?'*

अरब माणसांच्या मनाचा उदारपणा, ज्याने त्याच्यापाशी मदत सांगितली, त्याला कसलाही अवमान न करता, स्वत: कितीही झळ सोसून ती प्रसन्नचित्ताने देणे, यातच सामावलेले असे. तो उदार मनाचा कसलेही दान देण्यास मागे पुढे पाहात नाही आणि सर्व प्रकारच्या अन्याय-अत्याचारास तो धैर्याने तोंड देतो.

*'मी उंटावरून कैक दऱ्या पार केल्या आहेत,*
*अशी दरी सर्वांत शूरही मरण पावतील,*
*घुबडांचे धुत्कार आम्ही तेथे ऐकले, जणू का भिन्न अंधारातील घंटानादच होता,*
*टेकडाच्या माथ्यावर आमच्यासमोर एक लांडगा आला,*
*आणि आमच्या चुलीशेजारी येऊन थांबला,*
*मी त्याच्याकडे एक हाड टाकले*
*आणि माझ्या साथीदारांशी कसलाही कंजुसपणा दाखविला नाही.*
*लांडगा आनंदाने डोके हलवित मागे वळला आणि*
*भरपूर लूट घेऊन परत आलेल्या एखाद्या वीरयोध्यासारखा वाटू लागला.'*

अरब माणसांच्या जीवनाचे आणखी एक अंग दाखवून देणे गरजेचे वाटते. ग्रामीण अरबाच्या मनांत त्याच्या कुटुंबाशी, त्याच्या कुळाशी आणि कदाचित त्याच्या कबिल्याशी भावनिक बंधन इतके दृढ असे व त्याचा इतका अभिमान असे की, तीच त्याची सर्वांत बळकट भावना बनत असे.

प्रोफेसर निकलसन लिहितो - आदर-प्रतिष्ठेच्या कल्पनेत मोडणारे सर्वच गुण हे व्यक्तिगत गुणधर्म किंवा संपादित गुणवैशिष्ट्य मानले जात नसून, पूर्वजांकडून माणसाला मिळालेला तो वंशाचा वारसा मानला जात असे. त्या वारशाचे विश्वस्त म्हणून तो आपण

बाळगतो आणि त्याला कसलाही कलंक न लावता आपल्या संततीकडे तो वारसा द्यायचा असतो अशी त्यांची धारणा होती. स्वत:ला पराक्रमाने अमरपद प्राप्त करण्याच्या कल्पनेपेक्षा, आपल्या पूर्वजांची प्रतिष्ठा व कीर्ती वरचढ दाखविण्याची व ती उचलून धरण्याची धारणाच प्रबळ असे. म्हणून अरब असे म्हणे की, 'महाकुलीन व थोर माणसाचे बोल बोला आणि त्यांची कृत्ये करीत राहा.'

सुप्रसिध्द वंशपरंपरागत 'हसब' (कुळ), हा पूर्वजांनी व कुलपुरूषांनी त्यांच्या मुलांसाठी बांधलेल्या एखाद्या भक्कम किल्याप्रमाणे असे किंवा कसल्याही हल्ल्याला आव्हान देणाऱ्या उत्तुंग पर्वताप्रमाणे असे. कवीजन सतत 'मफाखी'ची प्रौढी मिरावताना तसेच 'मथालिबी'चे गुणगान करताना आढळून येत असत. त्या काव्यात ते आपल्या पूर्वजांची थोरवी मोठमोठ्याने घोषित करीत असत, त्यांच्या वैऱ्यांची प्रतिमा डागळण्याचा प्रयत्न करीत असत आणि त्यात कसलाही शिष्टाचार व सभ्यतेचा अभाव नसे.

एका रक्ताचे असण्याच्या सिध्दांतानेच अरब लोकांना सामाजिक एकतेमध्ये बध्द केले आहे. अशी एकाच रक्ताचे असल्याच्या भावनेने मातृसत्ताक कुटुंबपध्दती निर्माण झाली होती. 'पितृसत्ताक' कुटुंबपध्दतीचा शिरकाव झाल्याने एक प्रकारची सामाजिक क्रांती घडून आली आणि समाजात अमूलाग्र बदल घडवून आणला.

त्यापूर्वी घर आणि मुले आईच्या मालकीची असत. वारसा आईकडूनच मिळे आणि पती हा पत्नीकडे येत असे, पत्नी पतीकडे जाऊन राहत असे.

नात्याचे स्वरूप कसलेही असले तरी अरब लोकांच्या धारणेनुसार ते कबिल्यातील प्रत्येकाच्या नसानसात खेळणाऱ्या एकाच रक्ताचा अंश व हिस्सा होता; ही गोष्ट ठळकपणे दिसून येते. एका शब्दात सांगायचे तर ते टोळीचे एक बंधन होते व एकाच समूहाच्या माणसांना एकत्र गुंफीत असे, त्यांच्यावर समान कर्तव्ये व जबाबदाऱ्या टाकत असे. त्यापासून समूहातील कोणीही सदस्य बाहेर पडू शकत नसे, हे बंधन त्यांना मोठ्या अभिमानाचे व गर्वाचे स्त्रोत वाटत असे.

टोळीची घटना लोकशाहीप्रधान असे आणि महाकुलीन रक्त ज्याच्या नसात आहे, ज्यांचे नैतिक चारित्र्य उच्च आहे, ज्यांच्यापाशी संपत्ती, बुध्दी व अनुभव आहे, अशा प्रमुखांकडून तिला मार्गदर्शन व दिशा मिळत असे.

ग्रामीण अरब कवीने त्याच्या मायबोलीत म्हटले आहे,

*'ज्या लोकांचा प्रमुख नाही, त्यांचा लवकर ऱ्हास झालाच पाहिजे,*
*आणि प्रमुख त्यांच्यात नसतात, जेव्हा अशिक्षित गावंढळ लोकांचा अंमल असतो,*
*केवळ खांब उभारल्यानेच तंबू अखेर तयार होतो,*



*आणि खुंटीला मजबूत बांधल्याशिवाय खांब उभे राहात नाहीत,*
*परंतु खांब व खुंट्या एकत्रितपणे जेव्हा कार्यरत असतात,*
*तेव्हा इच्छित आकाराचा तंबू उभा राहतो।'*

ज्या उत्साहाने भर देऊन टोळीतील माणसांना एकोप्याने राहून आपल्या प्रमुखाची निवड करण्यास जोर दिला गेला आहे, तो प्रमुख बुध्दिमान, चतुर व शूर असला पाहिजे, ही त्यांची धारणा खाली ओळीवरून कळते,

*'प्रमुखाविना काहीही मिळू शकत नाही, निर्बुध्दाचे नेतृत्व हे नेतृत्वच नाही,*
*बुध्दिवंतांच्या अनुमतीने व्यवहार सुरळित केले जातात,*
*अन्यथा खोडसाळ लोकांच्या हातात खेळणे व्हावे लागेल.'*

अरब लोक आपल्या टोळीशी नि:संशयपणे बध्द असत आणि नेत्यांवर त्यांची मोठी प्रीती असे. तरी ते स्वत:चे स्वातंत्र्य व्यक्तिमत्त्व सोडून द्यायला तयार नसे आणि डोळे झाकून त्यामागून जात नसे. प्रत्येकजण स्वत:वर शासन करीत असे आणि दुसऱ्यावर आढ्यतेचा 'शब्दमार' करण्यास मोकळा असे. 'जर तुम्ही आमचे प्रमुख असाल (सरदाराने जसे यथोचितपणे वागावे, तसे तुम्ही वागला) तर तुम्ही आम्हावर नेतृत्व लादू शकता, परंतु तुम्ही जर गर्विष्ठ झाला तर जा आणि खुशाल गर्व करा, आम्हाला तुमच्याशी काहीच कर्तव्य नाही.'

विविध टोळ्यांमध्ये युती करून व महासंघाची स्थापना करून टोळ्यांचा भक्कमपणा आणखी वाढविला जाई. टोळ्यांमधील अशी युती 'हल्फ' म्हणजे परस्परातील आणाभाकांनी केली जात असे अथवा 'जिवारा' म्हणजे महासंघ व घटकटोळी, हे महासंघाचे सदस्य मानले जात, जेणेकरून त्यांचे अस्तित्व टिकून राहावे.

टोळी किंवा महासंघ हे उच्च राजकीय एकक असले तरी, अरबामध्ये एकोप्याची जाण होती, ही वास्तवता दिसून येते. हा एकोपा बोली भाषेत विविध फरक असूनही, समान भाषेवर आधरित असे. तसेच समान राजकीय परंपरा, समान रूढी आणि समान विचार-कल्पना आणि समान वंशावर आधरित असे. अरब व अजम (अरबेतर) यातील फरक मूलत: भाषेवरच आधारलेला आहे.

अरब लोकांमध्ये आपण इतर लोकांपेक्षा वेगळे आहोत, ही विचारधारणा फार बळकट होती आणि आपले श्रेष्ठत्व ते सतत दर्शवित असत. टोळ्यांचा भक्कमपणा हाच त्यांच्या एकोप्याच्या पायाचा दगड आहे आणि त्यामुळेच त्यांच्या सर्वोत्तम लोकांचे आचरण नियंत्रित होते, हे नाकारणे उचित नाही. तो भक्कमपणा व एकोपासुध्दा अखेरचा नव्हता, ही वास्तवताही विसरून चालणार नाही. अरब माणूस हा हाडाचा व्यक्तिस्वातंत्र्यवादी

आहे. यंत्राप्रमाणे आपल्या धन्याच्या संकेतांचे कुरकूर न करता पालन करण्याची अवस्था त्याला कधीच स्वीकारार्ह नसते.

विश्वासूपणा आणि एकनिष्ठपणा हेही (अरबांचे) महत्त्वाचे गुण आहेत. टोळीतील एखाद्याने मदतीसाठी जर हाक दिली तर त्याच्या मदतीला धावून जाणे हा आदर्श त्यांच्या माणसासमोर असे. त्या वेळी त्या प्रकरणाच्या गुणा-अवगुणाची चौकशी करण्यासाठी थांबून वेळ घालविण्याची त्यांना गरज नव्हती. आपण मागे पाहिल्याप्रमाणे अरब माणूस त्याच्या टोळीशी व प्रमुखांशी एकनिष्ठ असतो आणि त्यांचा आदर व प्रतिष्ठा राखण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावण्यास तयार असे, तितक्याच प्रखरतेने त्याच्या मनांत शत्रूबद्दल तीव्र द्वेष खदखदत असे. ज्याच्यावर वार केला गेला, त्याने जर वार केला नाही, तर त्याला भित्रा समजले जाई.

'ज्याने तुमचा पाणउतारा केला, त्याची तुम्ही मानखंडना करा. मग त्याच्याशी कितीही निकटचे रक्ताचे नाते का असेना. तुम्हाला लगेच त्याची मानखंडना करता आली नाही तर तो तावडीत येण्याच्या योग्य संधीची वाट पाहात टपून असे. गरज असल्यास त्याच्याशी मैत्री करा आणि योग्य वेळ येताच जोरदार प्रहार करा.'

मूर्तिपूजक अरब लोकांच्या मनावर सूड उगविण्याची पूर्तता करण्याचा जबर पगडा होता - सूड घेणे हे त्यांना शारीरिक गरजे इतके आवश्यक होते आणि सूडभावनेच्या आज्ञेचे जर पालन केले नाही तर त्यांना झोप लागत नसे, भूक लागत नसे आणि त्यांची प्रकृती ढासळून जात असे. ती अशी क्लेशकारक तहान असे जी रक्ताखेरीज अन्य कशानेही शमत नसे. प्रतिष्ठेचा हा रोग 'लागलेला रोगी' आपले दैनंदिन काम चहूकडे नजर ठेऊन शांतपणे करीत असला तरी सूडाच्या रोगाचे वेड त्याच्या डोक्यात पक्के बसलेले असे.

प्रत्येक टोळी स्वतंत्र असल्याने शस्त्राचा वापर करणे त्यांना वारंवार भाग पडत असे. नेहमीच्या कलहामुळे लढाया सतत होत असत. आपले सर्व वादग्रस्त प्रश्न ते तलवारीच्या साहाय्यानेच सोडवित असत.

प्राचीन अरबांचा सगळा कायदाच लढायांच्या कायद्याभोवती रक्ताचे हाडवैर, रक्ताचा मोबदला आणि लुटीचा माल या केंद्रबिंदूभोवती फिरत असे. खालील ओळीमध्ये अरबांची खरी भावना दर्शविली गेली आहे.

*'तलवारीच्या माझ्या अपमानाचा डाग मी धुवून काढीन*
*मग ईश्वराचा कोप माझ्यावर काय कोसळणार असेल ते कोसळू द्या.'*

अरबांच्या स्वभावगुणांचा सारांश घेताना आम्ही असे म्हटले की, मूर्तिपूजक अरब



माणूस हा हुज्जतखोर, तुसडा, भौतिकवादी होता. त्याचा दृष्टिकोन अतिशय तर्कसंगत असे. स्वत:च्या प्रतिष्ठेची त्याला फाजील जाणीव होती आणि मानाचा व प्रतिष्ठेचा त्याचा सोस जीवघेणा होता. अद्‌भूत गोष्टीला त्याच्या मनात जागा नसे. भावनांना त्याहूनही जागा त्याच्या मनात नसे. प्रत्यक्ष व्यवहारात ज्या गोष्टींचा फायदा नाही, अशा बोध-उपदेशाकडे त्याचा कल नसे आणि त्याची तो कधी पर्वाही करत नसे. स्वत:च्या आदर-प्रतिष्ठेची त्याची भावना इतकी प्रबळ असे की कसल्याही अधिकाराविरूध्द तो बंडखोरीने पेटून उठे. दुसरीकडे त्या कबिल्याच्या पुरातन परंपरांशी तो अत्यंत एकनिष्ठ व आज्ञाधारक असे. आतिथ्यशीलतेची कर्तव्ये, युध्दातील युतीची व मैत्रीची कर्तव्ये आणि अशाच प्रकारची अनेक कर्तव्ये मान्यताप्राप्त पध्दतीने तो पार पाडीत असे. त्याच्या टोळीच्या रूढींवर आधरित व अलिखित कायद्याचे शब्दश: बारकाईने तो पालन करीत असे पण शब्दश: अर्थापलीकडे त्याच्यावर कसलेही बंधन नसे.

अरबांची वक्तृत्व कला आणि जिभेचे परिपूर्ण नैपुण्य याखेरीज त्यांच्या कसल्याही अन्य कलेचा त्यांनी विकास केला नाही. ग्रीक लोकांचे वैभव जर मूलत: स्थापत्यकलेत आणि पुतळे घडवण्यात होते तर अरब लोकांची शान 'कसीदा' (स्तोत्रगीत) आणि हेब्रू लोकांची स्तोत्रगीते रचण्यात होती. अभिव्यक्तीचा तो सर्वोत्कृष्ट प्रकार होता. एक जुनी अरबी म्हण आहे की, 'माणसाचे सौंदर्य त्याच्या जिभेच्या वक्तृत्व-निपुणतेवर अवलंबून असते.'

अलीकडची आणखी एक म्हण आहे, 'बुध्दिमत्ता ही तीन गोष्टींवर उतरली आहे, फ्रेंच लोकांच्या मेंदूवर, चिनी माणसांच्या हातावर आणि अरबांच्या जिभेवर. 'वक्तृत्वकला'- आपले म्हणणे प्रभावशाली रीतीने गद्य आणि पद्यात जोरदारपणे व्यक्त करणे आणि त्याचबरोबर तिरंदाजीत व घोडेस्वारीत पारंगत असणे, हे गुण अज्ञानकाळात परिपूर्ण माणसाचे गुण मानले जात असत. (अल कमिल) त्यांची भाषणे दोन प्रकारची असत. गद्यात आणि लयबध्द पद्यात. गद्याला माळेत ओवलेल्या मोत्यांची उपमा देत असत आणि पद्याला सुटे मोती म्हणत.

काव्याची आवड व कदर गद्यापेक्षा अधिक असे, ती एक मोठी संपादणूक असल्याचे ते मानत असत. व्यक्तीच्या अभिव्यक्ती-क्षमतेचे ते सार मानले जाई कारण सहजपणे व सुंदर रीतीने आपले विचार विशेषप्रसंगी तो काव्यात सांगू शकतो. त्यांच्या सर्वसाधारण व्यवहारातही त्यांच्या प्रसिध्द कवीच्या काव्याच्या ओळी म्हणून दाखवित असत. त्यांच्या काव्यात त्यांच्या वंशजांची वैशिष्ट्ये जतन केलेली असत त्यांच्या टोळीचे हक्क व अधिकार जोपासलेले असत. त्यांनी संपादलेले वैभव व यश, त्यांनी केलेली महान कर्तृत्वे आणि त्यांच्या भाषेची गुणवैशिष्ट्ये वगैरे गोष्टींचा समावेश असे.

## अरब लोकांचे समाजजीवन

आपापल्या कवींची सरशी व श्रेष्ठत्व दाखविण्यासाठी अरबस्तानातील टोळीवाले वर्षातून एकदा नख्ला व ताईफच्या दरम्यान असलेल्या उकाझ या ठिकाणी मेळावा आयोजित करीत असत. या मेळाव्याने रोमच्या महान वैभवातील मौज मजेच्या आणि बेताल उच्छुंखलपणाच्या दृश्यांच्या आठवणी ताज्या होत असत. सर्व टोळ्यातील योध्दे, उघड्या उपहारागृहात व खानावळीत वेगवेगळे बसत. वेगवेगळ्या टोळींचे हाडवैरी वेगवेगळ्या जागी बसत. मद्याचे पेले भरले जात आणि अतिवेगाने रिकामे केले जात असत. या मौजमजेच्या गदारोळातच कवीजन आपले काव्य वाचन करीत. मानाचे प्रथमस्थान मिळण्यासाठी ते एकमेकांशी मोठ्या ईर्ष्येने स्पर्धा व प्रतिवाद करीत असत. याच ठिकाणी कवीलोक आपले टोपणनाव ठेवून घेत असत.

मद्य पिणे ही सवय अरब माणसाच्या हाडामांसी खिळलेली उपजात सवय होती. ही जणू त्यांचे बाळकडूच होते. मदिरा आणि मदिराक्षी एकत्रच जात असतात. परिणामस्वरूप बेबंद व बेताल मद्यपानामुळे व्यभिचार फार फोफावला होता. मक्केहून स्थानिक व्यापारी माल घेऊन बायझंटाईन साम्राजाकडे, सीरियाकडे, पर्शियाकडे व हिंदुस्तानकडे जाणारे व्यापारी तांडे तेथून परत येताना सर्व प्रकारच्या भोगविलासी सवयी व दुर्गुण शिकून येत. झाक व सीरियाहून बटीक नवयुवतींची आयात करीत. त्या बटीक नवयुवतींमुळे त्यांच्या गायिका व नर्तिका तरूणींकडून मुक्त कामसुखाची संधी श्रीमंत लोकांना उपलब्ध होत असे. त्यांच्याशी ते स्वैरपणे अनाचार करीत असत. काव्याच्या काही ओळी आम्ही खाली उद्धृत करीत आहोत, त्यावरून इस्लामपूर्व काळात किती स्वैराचारी व अनैतिक जीवन व्यतीत करण्याची सवय जडली होती, हे दिसून येईल,

*'सकाळ किंवा संध्याकाळ तुझा निरोप घेऊन जाईल*
*म्हणून तू कोठे विश्रांती घेशील ते ठरव,*
*डोळ्यांत सुरमा घातलेल्या, अंगाला भरपूर कस्तुरीचे लेप लावलेल्या नखरेलरामींचा*
*पडद्याखालचा सहवास, ज्यांना भारी कपडे,*
*सुखासीन जीवन आणि रेशमी पोषाखांचे आकर्षण असते*
*अशा ललना, ज्या कोनाड्यात ठेवलेल्या संगमरवरी पुतळ्यासारख्या किंवा बागेतील*
*उमलत्या फुलासारख्या दिसतात।*
*माझ्या कानशिलावरील केस पांढरे होत असल्याची चिन्हे प्रगटली आहेत काळ्याचे*
*पांढरे होणे ही दुष्ट काळाची आगमनाची पूर्वसूचना आहे आणि त्यानंतर जीवन*
*जगण्यात कसला रस उरातो।'*



विषयसुखाच्या या बेबंद आसक्तीमुळे, अरब लोक कामसुखलोलुप, बदफैली व व्यभिचारी बनले. टोळीतील सर्व सदस्य पुरूष, स्त्रिया व मुले मद्यपान करण्यासाठी, नृत्यासाठी व जुगार खेळण्यासाठी वरचेवर एकत्र जमत असत. या वाईट सवयीपासून दूर राहण्याचा जे लोक प्रयत्न करीत, त्यांना नीच, कंजूष, माणूसघाणे व एकलकोंडे मानले जात असे.

*'आणि मी जेव्हा मरेन, तेव्हा तू हलक्या दीन-दुबळ्याशी व जुगार न खेळणाऱ्या*
*एकलकोंड्या माणसाशी लग्न करू नकोस.'*

असे मृत्यूपत्र पती त्याच्या पत्नीसाठी ठेवून मरत असे. तत्कालीन रंगेल मेजवान्यांच्या मौजेचे वर्णन करताना म्हणत,

*'या। मित्रांनो आणि लोकांनो या!*
*चूक काही वेळेपुरती फार मधुर असते,*
*म्हणून तुम्ही या! मद्याने काठोकाठ ओसांडणारे,*
*चकाकते पेले हाती घेतलेल्या मद्यपींना आपण अभिवादन करू या,*
*भरलेले पेले हाती घेऊन,*
*हृदयात सलणारे शहाणपणाचे शब्द आपण धुवून टाकू या,*
*आणि हसत खेळत, मौज करीत जीवनातील दु:खे आपण कमी करू या.'*

इस्लामच्या उदयापूर्वीच्या काळात सार्वजनिक मद्यपानाचे मोठमोठे कार्यक्रम होत असल्याच्या कथा, प्राचीन अरबी काव्यामध्ये कितीतरी आढळून येतात. त्यांचे हे कार्यक्रम म्हणजे मद्य उफाळणारे झरे व जुगारीचे अड्डे असत. अरब माणसाच्या मनाला मद्यामुळे फार समाधान लाभत असे आणि मद्यपान केल्याचा त्याला मोठा गर्व वाटत असे,

*'कधी कधी मद्यात मला शांती लाभत असे,*
*चांदीची नाणी देऊन सायंकाळचा उष्मा घालविण्यासाठी*
*मी उत्तम प्रतीचे मद्य पित असे.*
*केसरी रंगाच्या कुंभात ते मद्य भरलेले असे,*
*फिक्कट रंगाची पांढरी लकेर असणारी दारू.*
*माझ्या हाताशी असणार त्यांचा सोबती डाव्या हाताला मद्याचा कुंभ,*
*खरे तर या गोष्टीने वारशाने आलेली माझी निम्मी मालमत्ता मी घालविली आहे.*
*कोणाही माणसाने त्यावर आघात केलेला नाही!'*

मद्यपानाच्या चैनीने माणसातील शीलता, सभ्यता आणि लज्जाशीलता पार वाहवून गेली होती. मद्यपानाची ही चैन व मौजमजा इतकी सार्वत्रिक व इतक्या वारंवार

होत असे आणि समाजाची कसलीही बंधने व शिस्त नसल्याने मूर्तिपूजक अरबांना माता-भगिनींच्या पवित्र नात्यांचाही काही आदर नसे. त्या पवित्र नात्यांचा आदर धाब्यावर बसविण्यात आणि त्यांच्या व्यभिचारी साहसाचे जाहीरपणे रसभरित वर्णन करण्यात त्यांना अद्‌भुत सुख मिळत असे. उदाहणार्थ, इम्रा अल कैस निर्लज्जपणे म्हणतो,

*'तुझ्यासारख्या कित्येक रूपवतींकडे, पण तुझ्यासारखे कौमार्य नसलेल्याकडे मी*
*रात्रीच्या समयी गेलो आहे, आणि कित्येक सुंदर मातांचे लक्ष,*
*अनेक ताईतांनी सजविलेल्या त्यांच्या छबकड्या बाळापासून वळवून*
*माझ्याकडे वेधले आहे, तिच्या पाठीमागे असलेले सानुले जेव्हा रडे,*
*तेव्हा अर्धे शरीर त्याच्याकडे वळत असे, पण माझ्या आलिंगनाच्या दाबाखाली*
*असलेला शरीराचा अर्ध भाग माझ्यापासून वळत नसे'*

वैवाहिक निष्ठेची कल्पनाच वास्वविकपणे अनेक अरब टोळ्यात नव्हती. प्राचीन अरबस्तानात, पती त्याच्या पत्नीच्या एकनिष्ठेबद्दल इतका बेपर्वा असे की कधीकधी तो स्वत:च त्याच्या पत्नीला दुसऱ्या पुरुषाशी संभोग करायला पाठवित असे, हेतू असा की चांगल्या बीजाची तिला गर्भधारणा व्हावी. वेश्येच्या संततीला अवैधतेचा कसलाही कंलक लागत नसे.

बहुपतित्वाची चाल, ज्यात एका स्त्रीला एकापेक्षा अधिक पती असत, अरबस्तानामध्ये सर्वसाधारण चाल बनली होती. याचा सर्वांत प्राचीन व थेट पुरावा 'स्ट्रॅबो' याचा आहे. मूर्तिपूजक अरबांच्या जीवनावर तो मोठा प्रकाश टाकतो. भावांना मुलांवर प्राधान्य आहे, तसेच नातलगांवरही आहे आणि ज्येष्ठतेच्या आधारावर कुटुंबातील सदस्याद्वारा अधिकाराची सर्व पदे भरली जात असत सर्व नातलगाची संपत्ती व मालमत्ता सामूहिक असे, सर्वांत ज्येष्ठ त्यांचा स्वामी असे. सर्वांची मिळून एक पत्नी असे. जो आधी आला त्याची सेवा आधी, हे सूत्र होते. आधी आलेल्याने हातात सतत असणारी त्याची काठी, पत्नीच्या खोलीत शिरताना, दाराशी ठेवायची असे. परंतु रात्र केवळ ज्येष्ठ पुरूषाबरोबरच ती घालवित असे. म्हणून परिवारातील सर्वजण एकमेकांचे भाऊच असत. त्याच्या मातेशीही त्यांचे शरीरसंबंध असत आणि व्यभिचार करणाऱ्याला मृत्यूदंडाची शिक्षा असे. येथे व्यभिचाराचा अर्थ परिवारच्या बाहेर शरीरसंबंध ठेवणार असा आहे.

जेव्हा स्त्री ही सगळ्या कुटुंबाची मालमत्ता आहे, अशी धारणा असण्याच्या परिस्थितीत आणि परिवारतील कोणत्याही पुरूषाला ती नकार देऊ शकत नसल्याने, अनैतिकतेची व अपवित्रतेची कल्पनाच उरली नव्हती. त्यांची मुले पूर्णपणे टोळीपैकीच मानली जात असत. कारण त्यांची आईही टोळीची महिला होती आणि वैध-अवैध संततीमध्ये कसलाही फरक नव्हता, जसा फरक आपण मानतो. वैयक्तिक पितृत्व ही



कल्पना तुलनात्मक आधुनिक काळाची आहे. त्याची परिपूर्ण व्याख्या इस्लामने केलेली आहे. मूर्तिपूजक अरब लोक वास्तविकपणे त्यांच्या मातेच्या स्वामींच्या रक्ताचे असल्याचे मानले जात. त्यानंतरच ते एका पुरूषाची मुले गणली जाऊ लागले.

अरबस्तानातील समाज-जीवन, विपरीत वाटणारे आणि विरोधाभासात्मक चित्र दर्शविणारे आहे. अरब लोक एकीकडे इतके उदार अंत:करणाचे व अतिथ्यशील होते की त्यांच्या अतिरेकाने, तो दुर्गुण वाटावा. उदार मनाने, खाऊपिऊ घालण्याचा त्यांना मोठा अभिमान वाटे. माणसांनाच नव्हे तर प्राण्यांनाही ते तशीच औदार्याची वागणूक देत असत. दुसरीकडे त्यांच्या डोक्यावर दारिद्र्याची तलवार सतत टांगती असे. त्यामुळे खाऊपिऊ घालण्याचा बोजा टाळण्यासाठी ते आपल्या मुलींना जन्मत:च जिवंत पुरून टाकीत असत. त्याचप्रमाने, एकीकडे नैतिक पावित्र्याची त्यांना अगदी चाड नसे व आपल्या स्वैर कामलीलांची ते मोठ्या अभिमानाने रसभरित वर्णने जाहीरपणे करीत असत. तर दुसरीकडे त्यांच्यात मान-प्रतिष्ठेबद्दल एक विकृत विचारधारणा रूजली होती. त्या विकृत कल्पनेने मुलगी जन्मत:च तिला जिवंत पुरून टाकण्याची प्रथा त्यांच्यात रूढ झाली. त्यामागील समज असा की स्त्रिया आणि विशेषत: मुली, म्हणजे कुळाला कलंक लागण्याचे साधन आहे.

अर्भकांना कशा प्रकारे जिवंत पुरले जात त्याचे वर्णन पवित्र कुरआनमधील सूरह अल-तकवीर, आयत ८ मध्ये आले आहे.

त्यावर भाष्य करताना, प्रसिध्द भाष्यकार 'झमक्षारी' त्याच्या वरील सूरहवरील भाष्यात लिहितात,

''मुलगी जेव्हा सहा वर्षे वयाची होई, तेव्हा पती त्याच्या पत्नीला म्हणे, 'तिला अत्तर व सुगंधी द्रव्ये लाव, तिच्या अंगावर सर्व दागिने घाल.' मग तो मुलीला घेऊन पत्नीच्या नातलगांकडे जात असे आणि तेथून ओसाड जागी जात असे. तेथे एक मोठा खड्डा खणण्यात येई. मुलीला खड्ड्याच्या काठावर उभे केले जात असे. तिचा बाप तिला सांगे, 'तू तूझी दृष्टी खड्ड्यात ठेव' आणि पाठीमागून तिला खड्ड्यात लोटले जात असे. खड्ड्यात पडल्यावर तो दुर्दैवी जीव केविलवाणे हंबरडा फोडून अगतिकपणे रडत असे. लागलीच खड्ड्यात माती लोटून जमीन सपाट केली जात असे.''

तेथे अशी म्हण पडली होती की, मुलीला सासरी पाठविणे हे दयाळूपणाचे कृत्य आहे. अरबी काव्यामध्ये सर्वाधिक हृदय हेलावून टाकणाऱ्या ओळी त्या आहेत, ज्यामध्ये दारिद्र्याने रांजलेला व गांजलेला एक बाप अशी इच्छा बाळगतो की त्याची एकुलती एक मुलगी त्याच्या डोळ्यांसमोर मरावी आणि त्याला भूक व अपमानाच्या क्लेश यातनापासून वाचवावे.

*'केवळ उम्मय्या वंशाखातर मी दु:ख केले नाही*
*की रात्रीच्या काळ्याकुट्ट भयाला धैर्याने तोंड दिले नाही,*
*की अन्नाचा एक घास तरी तिला मिळावा.*
*तिला दिर्घायुष्य मिळावे अशी माझी इच्छा नाही*
*कारण त्या पोरक्या मुलीचे नशीब मला ठाऊक आहे,*
*हे दारिद्र्य एक दिवस माझ्या मुलीला घेऊन जाईल असे मला भय वाटते*
*आणि प्रत्येक रानटी वासनेला ती बळी पडून लाजिरवाणी होईल,*
*मी जगावे असे तिला वाटते.*
*पण ती मरावी अशी इच्छा करणे मला भाग आहे, माझ्यावर शोक कर,*
*एका अगतिक कुमारिकेसाठी मृत्यू हाच एक उदात्त प्रियकर आहे,*
*मला असे भय वाटते की चुलता कठोर असेल किंवा बंधु निष्ठूर असेल,*
*तिच्या मनाला बोचणारा एक शब्दही मी कधी उच्चारणार नाही.'*

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या काळापर्यंत किती मोठ्या प्रमाणात मुलींची हत्या केली जात असे, याचा पुरावा या वास्तवतेपासून आपणाला मिळतो की एकट्या 'ससाआ'ने एकशे आठ मुलींना हत्या होण्यापासून वाचविले, असा त्याने दावा केला होता. अशी नोंद आढळते की मुहम्मद (स.) यांनी जेव्हा मक्का शहर जिंकले आणि महिलांनी केलेला सत्कार स्वीकारला आणि तोसुध्दा अरबी संस्कृतीत अग्रेसर असलेल्या केंद्रात, तरीसुध्दा मुलींची हत्या करणार नाही असे वचन महिलांकडून घेण्याची औपचारिक गरज त्यांना वाटली.

केवळ इस्लामच्या शिकवणीमुळेच मुलींची हत्या करण्याची ही दुष्ट प्रथा, जी फार मोठ्या प्रमाणात अनेक अरबी टोळ्यांमध्ये रूढ झाली होती, ती संपुष्टात आली. या अमानुष प्रथेचा पवित्र कुरआनने किती जोरदारपणे धिक्कार केला आहे,

"खचितच नुकसानीत आले ते लोक ज्यांनी आपल्या मुलांना अज्ञानाने व नादानपणे ठार केले आणि अल्लाहच्या दिलेल्या उपजीविकेला अल्लाहवर थोतांड रचून निषिद्ध मानले. निश्चितच ते मार्गभ्रष्ट झाले व कदापि ते सरळमार्ग प्राप्त करणाऱ्यांपैकी नव्हते." (दिव्य कुरआन, ६ : १४०)

"आपल्या संततीला दारिद्र्याच्या भीतीने ठार करू नका. आम्ही त्यांनाही उपजीविका देऊ आणि तुम्हालासुद्धा. वस्तुत: त्यांना ठार करणे एक मोठा अपराध आहे."

(दिव्य कुरआन, १७ : ३१)

"आणि जेव्हा जिवंत गाडलेल्या मुलीला विचारले जाईल की ती कोणत्या अपराधापायी ठार केली गेली?" (दिव्य कुरआन, ८१ : ८–९)



वास्तविकपणे मुलीचा जन्म अरब लोकांना अस्वीकारार्ह होता. मुलगी झाल्याच्या बातमीने सर्व कुटुंबाला मोठा धक्का बसे आणि संपूर्ण परिवारात संतापाची लाट उसळत असे. पवित्र कुरआनने आपल्या बोलक्या शैलीत त्या दु:खद घटनांचे स्पष्ट चित्र रेखाटले आहे,

" हे अल्लाहसाठी मुली निश्चित करतात. पवित्र आहे अल्लाह! आणि यांच्यासाठी ते जे यांना हवे आहे? जेव्हा यांच्यापैकी एखाद्याला मुलीच्या जन्माची खुशखबर देण्यात येते तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर काळिमा पसरतो व तो रक्तासमान घोट गिळून बसतो. लोकांच्यापासून लपत छपत फिरतो की या वाईट बातमीनंतर कोणाला काय तोंड दाखवावयाचे, विचार करतो की अपमानित होऊन मुलीला घेऊन रहावे अथवा मातीत गाडावे? पहा, कसे वाईट निर्णय आहेत, जे हे ईश्वरासंबंधी लावतात."

(दिव्य कुरआन, १६ : ५७-५९)

अर्भक मुलींना ते जिवंत पुरत असत, इतकेच नाही, तर ज्या मुलींना जिवंत राहू दिले गेले, त्यांच्या हालअपेष्टांना व दु:खांना पारावार उरत नसे. त्या बाजारातील वस्तूप्रमाणे असत आणि सर्वाधिक किंमत देणाऱ्याला त्या खुल्या बाजारात विकल्याही जात असत. पतीच्या ताब्यात त्यांना देताना त्यांची अवस्था आणखी दु:खमय होत असे. त्यांना लग्न म्हणजे एक प्रकारचे दास्यत्वच असे आणि पतीचे वैवाहिक अधिकार स्वामीत्वाचे असत. त्याला हव्या तशा पध्दतीने तिचा वापर करण्याचा व पत्नीरूपी मालमत्तेची विल्हेवाट लावण्याचा अधिकार होता. विवाहित महिलांबद्दल सखोल माहिती देणाऱ्या एका लेखातील उतारा आहे. बनू अमीर इब्न सअसा टोळीच्या एका महिलेचा विवाह त्या टोळीच्या एका पुरूषाशी झाला होता, तिने काढलेल्या उद्‌गाराच्या पहिल्या दोन ओळींनी त्या उताऱ्याची सुरूवात झाली आहे,

*"एका बहिणीला तिच्या भावाची स्तुती कधीही करून देऊ नका,*
*एका मुलीला तिच्या पित्याच्या मृत्यूवर मुळीच शोक करू देऊ नका,*
*कारण त्यांनीच तिला अशा ठिकाणी आणले आहे, जेथे ती स्वतंत्र स्त्री असत नाही,*
*आणि त्यांनीच तिला पृथ्वीच्या दूरवरच्या ठिकाणी घालवून दिले आहे."*

लग्नानंतर पतीला काही विशिष्ट मालकी हक्क प्राप्त होत असत आणि त्यांचा उपभोग तो अबाधितपणे घेत असे. किंवा त्याच्या मर्जीने तो मालमत्तेचे हस्तांतर करीत असे. हा हक्क त्याच्या वारसांनाही प्राप्त होत असे. अशीही नोंद करण्यात आली आहे की, मूर्तिपूजक अरबस्तानात मृतांच्या विधवा, वारसाहक्काने एखाद्या वस्तूप्रमाणे, त्याच्या वारसांना प्राप्त होत असत. सर्वांत ज्येष्ठ पुत्रांचा त्यांच्यावर जास्त हक्क असे. पण जर मृताला मुलगाच नसेल, तर विधवांना, मृताच्या भावाकडे किंवा त्याच्या पुतण्याकडे जावे

लागे. त्यांच्यावर आपला मालकी हक्क दर्शविण्यासाठी त्यांच्या अंगावर एक चादर पांघरली जात असे. अशा प्रकरणात मृताचे वारस त्यांना आपली पत्नी म्हणून घेऊन जात किंवा मोठी रक्कम त्यांची किंमत म्हणून घेऊन दुसऱ्या पुरूषांशी त्यांचा विवाह करून घेईपर्यंत त्यांना बंदिस्त करीत. या दुष्ट रूढींचा पवित्र कुरआनने खालील ओळीत धिक्कार केला आहे,

''हे श्रद्धावंतांनो! तुमच्याकरिता हे वैध नाही की तुम्ही बळजबरीने स्त्रियांचे वारस बनावे.'' (दिव्य कुरआन, ४ : १९)

स्त्रियांना, त्यांच्या पतीच्या, मातापित्यांच्या व नातलगांच्या मालमत्तेत वारसाहक्काची परवानगी नसे, 'मृताच्या विधवांना, वारसाहक्क मिळत नसे कारण ही गोष्ट स्वयंसिध्द आहे की ती स्वत:च मृताची पत्नी, म्हणजे त्याच्या मालमत्तेचाच एक भाग असल्याने तिचे स्वातंत्र्य व तिचे शरीर, याची विल्हेवाट लावण्याचा अधिकार मृताच्या वारसांना असे,'

एका पुरूषाने किती बायका कराव्यात यावर कसलेही बंधन नव्हते. एखादा माणूस त्याच्या मर्जीनुसार बायका करीत असे आणि त्याच्या मर्जीनुसार त्यांना सोडून देत असे. पुरूषांच्या या लालसेवर कसलेही बंधन नसे. गर्भवती पत्नीला पतीच्या घरातून बाहेर काढले जात असे आणि कशावरही तिचा हक्क राहात नसे आणि तिच्या पतीच्या संमतीने दुसरे पुरूष तिला आपल्या घरी नेत असत.

## आर्थिक जीवन

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे पवित्र जीवन चरित्र आणि हदीसच्या नोंदींचा बारकाईने अभ्यास केल्यास आपणाला इस्लामपूर्व काळातील अरबस्तानच्या अर्थिक जीवनाची नीट कल्पना येते. एक गोष्ट मात्र चांगली लक्षात घ्यायला हवी की, 'अरबस्तान' हा शब्द वापरायला सोईस्कर असला तरी त्याच्या एका भागापुरतेच आमचे लक्ष केंद्रित आहे, मक्का आणि मदीना सभोवतालचा परिसर, ज्याला व्यापक अर्थाने 'हिज्जाझ' म्हणतात आणि शेजारच्या नज्दचा माळरान प्रदेश.

अरब लोकसंख्येचा अधिकांश भाग असणाऱ्या भटक्या अरबांच्या टोळ्या, त्यांच्या उदरनिर्वाहासाठी जनावरे विशेषत: उंट पाळून जीवन व्यतीत करीत असत. 'ओॲसिस'च्या पाणथळ परिसरात आणि डोंगरमाध्यावरील काही उंच जागी शेतीवाडी केली जाई. ओॲसिसमधील मुख्य पीक खजुराचे असे, आणि डोंगरमाथ्यावर अन्नधान्ये पिकत असत. यसरिब (अलीकडचे नाव मदीना) हे मोठे व भराभराटीचे ओॲसिस पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कालावधीत होते. खैबरसारख्या यहुदी लोकांच्या शेतीवाडीच्या अनेक वसाहती तेथे होत्या. याउलट, मक्केत कसलीही शेतीची लावगड शक्यच नव्हती.



येमेन किंवा अरेबियन फेलिक्स हा सुपीक शेतीवाडीचा प्रदेश होता. तेथे फार पूर्वीपासून कालवे व पाटबंधारे काढून कृत्रिम जलसिंचन केले जाई.

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे अर्धशतकापर्यंत राहण्याचे ठिकाण असलेले मक्का शहर, मागे वर्णन केल्याप्रमाणे लागवडीस व शेती करण्यास योग्य ठिकाण नव्हते, 'जमजम'च्या विहिरीभोवती आणि पवित्र काबागृहाच्या सभोवती विकसित झालेला शहराचा भाग, हा गोऱ्या माणसाच्या आशिया खंडाच्या आणि काळ्या वर्णाच्या लोकांच्या आफ्रिका खंडाच्या टोकाशी होता. मध्ये सना-डोंगराच्या रांगा तुटल्या होत्या. बाबिलोनिया आणि सीरियाकडून येमेनच्या पठाराकडे तसेच हिंदी महासागराकडे आणि तांबड्या समुद्राकडे जाणाऱ्या महामार्गाच्या संगमापासून जवळच असल्याने त्याचे स्थान अनुकूल व सोईचे होते.

म्हणून मक्केमध्ये चारी दिशांनी तांड्यावरून वस्तूंची खरेदी करण्यासाठी भटके अरब मक्केतील लोक त्या वस्तूंचे दलाल असत व किरकोळ दुकानदार असत. तरी ते तांड्यांचे आयोजन करणारे व आयात करणारे नव्हते. परंतु इ. सनाच्या सहाव्या शतकाच्या अखेरीस येमेन ते सीरियापर्यंत बहुतेक सर्व व्यापारावर त्यांनी कब्जा केलेला हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा होता. त्या मार्गानेच हिंदुस्तानच्या चैनीच्या वस्तू आणि दक्षिण अरबस्तानातील चंद्रासेनी ऊद (धूप) पाश्चात्यदेशात नेला जात असे. मक्केतून जाणाऱ्या मार्गाने येणाऱ्या-जाणाऱ्या व्यापाऱ्यांवर विविध कर बसविले जात असत. उदाहरणार्थ, शहरात प्रवेश करण्याचा कर, तेथे मुक्काम करण्यासाठी परवानगी मिळण्यासाठी एक विशेष कर, शहर सोडून जातानाचा एक कर, थोडक्यात म्हणजे परकीय व्यापाऱ्यांना एका क्लिष्ट कर-पध्दतीला तोंड द्यावे लागे. मग ते मक्केत स्थायिक होवोत की तेथून जात-येत असोत. विशेषकरून ज्यानी स्थानीय अमीर-उमरावांकडून किंवा स्थानीय टोळीकडून हमी घेतली नसेल, त्यांना अधिक कर बसे.

मक्केला व्यापारी लोकांचे प्रजासत्ताक राज्य असे म्हणणे उचित ठरेल. खूप गुंतागुंतीच्या मोठमोठ्या व्यापारी उलाढाली तेथे चालत असत. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कालावधीत मक्केतीत अमीर-उमराव, धार्मिक नेते व विविध घराण्यांचे प्रमुख (शेख) हेच भांडवल पुरविणारे लोक होते. ते विश्वास व श्रध्देला धाब्यावर बसवून लबाडीने वापर करण्यात तरबेज असत. सट्टेबाजी व अनुमान करण्यात ते धुर्त होते. संभवनीय फायदेशीर भांडवल गुंतवणूक, एडनपासून ते गाझापर्यंत व दमास्कसपर्यंत करण्यास ते सतत तयार असत. त्यांच्या या भांडवली जाळ्यात केवळ मक्केतील लोकांनाच त्यांनी अडकवून ठेवले होते इतकेच नाही, तर सभोवतालच्या अनेक प्रमुख टोळ्यांनाही अडकविले होते. पवित्र कुरआन वाळवंटी वातावरणात अवतरले नाही, तर

मोठ्या भांडवल गुंतवणुकीच्या वातावरणात अवतरले होते. 'या व्यापारी उपजत प्रेरणेत महिलांचाही वाटा होता. अबू जहलच्या आईचा अत्तरांचा व्यापार होता. ताजिर खालिदाचे उद्योग सुप्रसिध्द आहेत. अबू सुफयानची पत्नी हिंदा तिचा व्यापारी माल सीरियात कल्बींना विकत असे.'

'रिबा' (व्याज) हीच पध्दत तिच्या क्रूरतेनिशी प्रचलित होती आणि इस्लामपूर्व काळातील भांडवली आणि आर्थिक व्यवस्थेचा तोच कणा होता. पैसे कर्जाऊ देण्याची आणि ती वसूल करण्याची पध्दत फारच शोषण करणारी होती. सावकार अवाजवी व्याजदराने लोकांना पैसे कर्जाऊ देत असत आणि ठरलेल्या मुदतीत जर कर्जाची परतफेड झाली नाही, तर ती रक्कम दुसऱ्या वर्षी दुप्पट व तिसऱ्या वर्षी तिप्पट केली जात असे. अशा तऱ्हेने दिवस जितके लोटत जातील तशी कर्जाची रक्कम वाढत जात असे. जर ऋणको कर्जाची रक्कम व्याजासहित परत करण्यास चुकला, तर सावकार कधीकधी ऋणकोची बायकामुले कब्जात घेत असे.

सट्टेबाजीही जोरात चालत असे. हुंडी व विनियमाच्या दरावर, तांड्याने आयात केलेल्या आणि खरेदी करण्याची इच्छा असलेल्या मालाच्या वजनावर, उभ्या पिकांवर, मेंढ्याच्या व उंटांच्या कळपांवर, तसेच शहरातील मालाच्या पुरवठ्यावर सट्टेबाजी होत असे. दिखाऊ संघटना स्थापन करून विक्री केली जात असे व त्यासाठी कर्जे घेतली जात असत.

मक्का शहराशी व्यापारी उलाढालीत स्पर्धा करणारे दुसरे महत्त्वाचे शहर ताईफ या नावाने प्रसिध्द होते. ते सकीफ या मोठ्या व महत्त्वाच्या टोळीचे राजधानीचे ठिकाण होते. मक्केवर त्या शहराने अशी कडी केली होती की प्रमुख व्यापारी केंद्र असण्याबरोबरच तेथील शेतजमीन अत्यंत सुपीक होती. निर्यात व्यापारासाठी सभोवतालच्या परिसरातून तेथील उत्पादनाचा भरपूर पुरवठा होत असे. विशेष करून हिज्जाझसारख्या निसर्गरूष्ट असलेल्या भागात माल खपविला जात असे. तेथील द्राक्षे, तेथील प्रसिध्द झबीब यावरून ते पश्चिम अरबस्तानातील ओसाड प्रदेशाचा भाग नसून सीरियाचा भाग आहे, असे सूचित होत असे.

ताईफ हे औद्यौगिक शहर होते. तेथे कातडी कमावली जात असे. कातडी कमावण्याचा कारखान्यांची संख्या इतकी होती की सगळ्या वातावरणात दुर्गंधी पसरत असे, असे सांगितले जाते. वाळूचा समुद्र वाटणाऱ्या प्रचंड वाळवंटात प्रवेश करण्याचे व तेथून परत येण्याचे ते द्वार होते. येणाऱ्या-जाणाऱ्या उंटांच्या तांड्यांना त्या जमिनीत उत्पन्न होणाऱ्या विविध मालाचा आणि कारखान्यातील उत्पादित माल ने-आण करण्याचा, ते शहर पुरवठा करीत असे.



मक्का आणि ताईफचे मित्रत्वाचे संबंध होते आणि कुरैशी लोक आणि अहलाफ यांच्यातील लग्न संबंधाने ते अधिक दृढ झाले होते. मक्केतील परिस्थितीपेक्षा, तेथील फरक डोळ्यांत भरण्यासारखा होता. अरबस्तानात सगळीकडे पाण्याचे दुर्भिक्ष्य असताना मदीन्यात पाणी अतिशय मुबलक होते. तेथील जमीन खारवट रेतीची, चुनखडीची आणि चिकणमातीची होती. सगळीकडे, विशेषतः दक्षिणेकडे जमीन फार सुपीक होती. म्हणून त्याला शेतकऱ्यांचे शहर म्हटले जात असे. मदीनेतील लोक शेतीवाडीत फार निपुण होते. कलम करण्यात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी रोपे लावण्यात ते तज्ञ होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कालावधीत मक्का आणि मदीनेतील लोकांच्या व्यवसायावर प्रकाश टाकणारे एक कथन आहे. सही बुखारीमध्ये ते कथन माननीय अबु हुरैरा (रजि.) यांच्या कथनाच्या आधारावर नोंदलेले आहे. ते कथन करतात,

*'माझे मुहाजिरीन बंधु (मदीन्याला स्थलांतर करून आल्यानंतर) बाजारात माल खरेदी-विक्रीचा व्यवसाय करीत असत आणि माझे अन्सार बंधु शेतीची, फळबागांची लागवड करण्यात व्यस्त असत.'*

मदीनेतील यहुदी लोक शेतीवाडीही करीत आणि शिवाय व्यापार आणि उद्योगधंद्यातही त्यांना स्वारस्य होते.

## इस्लामपूर्व काळातील अरबांचा धर्म

इस्लामपूर्व काळातील अरबांच्या धर्माचा आढावा घेतल्याविना, त्या काळाचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. दुर्दैवाने इतिहासाची जी साधने आम्हाला उपलब्ध आहेत, त्यावरून त्या काळाच्या अरबांच्या धर्माचे स्पष्ट चित्रण आम्ही करू शकत नाही. त्याबद्दल आम्हाला जी माहिती मिळते, ती ग्रीक लेखकांनी केलेल्या एखाद्या दुसऱ्या लिखाणावरून मिळते, ग्रीक आणि सेमिटिक शिलालेखावरून, प्राचीन कवींच्या काव्यावरून आणि नंतरच्या काळातील इस्लामी साहित्यामधील आख्यायिका आणि कथनावरून मिळते. काही माहिती आम्हाला कुरआनमधील चर्चात्मक उल्लेखांच्या संदर्भावरून मिळते. प्रारंभीच्या काही मुस्लिम विद्वानांनी अविरत कष्ट करून जी माहिती गोळा केली, तिचे पध्दतशीर संकलन केले आणि मूर्तिपूजक अरबांच्या धर्माची व उपासनांची जी माहिती भावी पिढ्यांना उपलब्ध करून दिली, त्यांच्या कष्टांनाही याचे मोठे श्रेय जाते. या विद्वानात अग्रेसर स्थान हिश्शाम अल-कल्बी, जे इब्न अल-कल्बी या नावाने ओळखले जात असत, त्यांना दिले पाहिजे. 'किताबुल अस्नाम' (मूर्तीचे पुस्तक) या पुस्तकाचे ते लेखक होते.

जो तुरळक पुरावा उपलब्ध आहे, त्यांच्या प्रकाशात पाहता, पैगंबर मुहम्मद (स.)

यांचे समकालीन लोक आणि त्यांच्या पूर्वीचे लोक, यांच्यात कोणताही धर्म जवळजवळ नव्हताच, असा निष्कर्ष निघतो.

आध्यात्मिक प्रेरणा, त्यांच्यात (मूर्तिपूजक अरबांत) फारशी नव्हतीच. त्याबद्दल त्यांच्यात मोठी अनास्था होती. धार्मिक विधीचे जे काही आचरण ते करीत असे, त्यामागेही टोळीचे निष्क्रियत्व असे आणि रूढीचा आदर करण्यासाठी व जुन्याला चिकटून राहण्याची वृत्ती त्यामागे प्रभावशाली होती. कोणत्याही दैवताबद्दल त्यांना अंत:करणापासून निष्ठा असल्याचे आपणास आढळून येत नाही. इम्रा उल कैस बद्दल सांगितलेली एक कहाणी ही गोष्ट स्पष्ट करते. त्याच्या बापाच्या हत्येचा बदला घेण्यासाठी तो बाहेर पडला होता. जाताजाता धु-अल-खलासाहच्या मंदिरात तो गेला. बाण टाकून त्याने शकून पाहिला, तीन वेळा बाणांनी संकेत दर्शविला, की बदला घेण्याचा प्रयत्न त्याने करू नये. रागाने त्याने ते मोडून टाकले व त्याचे तुकडे देवीच्या तोंडावर भिरकावून तो उद्गारला, ''तुझे तळपट होवो। तुझ्या बापाचा जर खून झालेला असता, तर मात्र मला सूड घेण्यापासून तू रोखले नसतेस,''

अरब लोक नि:संशयपणे धर्माबद्दल उदासीन होते, परंतु त्यांना धर्माची कसलीच कल्पना नव्हती, असा निष्कर्ष कोणी काढू नये. संपूर्ण विश्वावर नियंत्रण असणाऱ्या सर्वोच्च शक्तीच्या सत्तेची त्यांना कल्पना होती. त्या शक्तीची कृपा, तिचा क्रोध, तसेच पारलौकिक जीवनाची व फरिश्त्यांची (देवदूत) त्यांना जाण होती. परंतु या सर्व कल्पनांची व विचारधारणांची, मूर्तिपूजेशी सरमिसळ झालेली होती. दृश्य वस्तूंवर निष्ठा, जे डोळ्यांना दिसते आणि हाताने स्पर्श करता येते, त्यावरील निष्ठा, ही माणसातील हीन प्रवृत्तीमुळे निर्माण होणारी उत्कंठा व ओझ असते. त्याची फलनिष्पत्ती शेवटी निर्मात्याची उपासना-आराधना करण्याऐवजी, निर्मित वस्तूंची पूजा करण्यात होते. अरब लोकांना सर्वशक्तिमान स्वामीची कल्पना होती, ही गोष्ट खालील उदाहरणावरून स्पष्ट होते. आणखीही अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. नाबिध म्हणतो,

*'अल्लाहखेरीज दुसरा कोण माणसाला साहाय्य करू शकतो, याची मी शपथ घेतली आणि संशयाला काहीच जागा ठेवली नाही.'*

जहीर बिन अबी सलामा, त्याच्या काव्याच्या दोन ओळीत, अंतिम निवाड्याच्या दिवसावर विश्वास व्यक्त करतो,

*'अंतिम निवाड्याच्या दिवशी सादर करण्यासाठी माणसांची कृत्ये एका भूजपत्रावर नोंदली जातात, या जगातही बदला (शिक्षा) दिला जाऊ शकतो.'*

पवित्र कुरआनने बोलक्या शब्दांत ग्वाही दिली आहे की, अरबस्तानातील अश्रध्द लोक आणि अनेकेश्वरवादी लोक, सर्वोच्च सत्तेच्या अस्तित्वाचा इन्कार करीत



नव्हते, तसेच पृथ्वी आणि आकाशांचा निर्माता केवळ एकमेव अल्लाहच आहे, ही गोष्ट ते नाकारत नव्हते, सृष्टीच्या निसर्गक्रमाची यंत्रणा त्याच्या आदेशानुसारच चालत असते, हेही ते मानत असत. तोच पाऊस पाडतो, वारे वाहवितो, सूर्य, चंद्र व पृथ्वी यांचे भ्रमण तोच नियंत्रित करतो, अन्य निसर्गक्रमावर त्याचीच हुकूमत असते, हेही त्यांना मान्य होते. पवित्र कुरआन सांगतो,

''जर तुम्ही या लोकांना विचारले की पृथ्वी आणि आकाशांना कोणी निर्माण केले आहे, आणि चंद्र व सूर्याला कोणी अधीन केले आहे तर अवश्य म्हणतील की अल्लाहने,मग कोठून हे फसगत करून घेत आहेत?''(दिव्य कुरआन, २९ : ६१)

'' आणि जर तुम्ही यांना विचारले, कोणी आकाशांतून पाणी वर्षविले आणि त्याद्वारे मृत पडलेल्या जमिनीला जिवंत केले तर ते अवश्य म्हणतील, अल्लाहने.''

(दिव्य कुरआन, २९ : ६३)

''या लोकांना जर तुम्ही विचारले की जमीन आणि आकाशांना कोणी निर्माण केले तर हे स्वत:च म्हणतील की अल्लाहने. यांना विचारा, जेव्हा सत्य असे आहे तर तुमची काय कल्पना आहे की अल्लाहने जर मला काही नुकसान पोहचविण्याचे इच्छिले तर काय तुमचे हे उपास्य ज्यांचा तुम्ही अल्लाहला सोडून धावा करता,''

(दिव्य कुरआन, ३९ : ३८ )

''जर तुम्ही यांना विचारले की, पृथ्वी व आकाशांना कोणी निर्माण केले आहे तर हे जरूर म्हणतील की, अल्लाहने. म्हणा, सर्व स्तुती अल्लाहसाठीच आहे परंतु यांच्यापैकी बहुतेकजण जाणत नाहीत.'' (दिव्य कुरआन, ३१ : २५)

वरील आयती मोठ्या प्रमाणात हे स्पष्ट करतात की, इस्लामपूर्व काळात अरब लोक, एकमेव सर्वोच्च दैवताचे अस्तित्व मान्य करीत होते. परंतु त्याचबरोबर ते ही गोष्टही मान्य करीत असत की सर्वशक्तिमान स्वामीने त्याची सत्ता त्याच्या काही पवित्र व्यक्तित्वांना आणि वस्तूंना सोपविली आहे. सजीव व निर्जीव- ते मध्यस्थांचे काम करतात, ज्यांच्याद्वारे उपासना करणारा त्याच्याशी संपर्क साधू शकतो आणि त्याची प्रसन्नता मिळवू शकतो. या अपसमजुतीमुळेच ते संतांच्या मूर्तींची पूजा करू लागले. तसेच सूर्य-चंद्राची आणि पाषाणाची (दगडधोंड्यांची) पूजा करू लागले. कधीकधी त्यांना ईश्वर न मानता, ईश्वराचा अवतार मानला जाई.

मागे आपण पाहिले आहे की अरबांना त्यांच्या टोळीबद्दल अंत:करणापासून प्रेम होते. आपल्या टोळीच्या मोठेपणावरील आणि सद्गुणावरील त्यांच्या विश्वासामुळे त्यांनी वेगवेगळी दैवते ठरवून, त्यांच्या मूर्ती बनविल्या आणि त्यांची प्रसन्नता मिळविण्यासाठी त्यांची स्तुती स्तोत्रे व भक्तीगीते गाण्याची सुरूवात केली. कल्ब टोळीने वद्दा देवतेची,

तर हुझैल टोळी सुवा देवीची पूजा करू लागले. मदहिजची टोळी व कुरैशचे लोक यगुस देवीची पूजा करू लागले. खैवान टोळी यऊक देवतेची पूजा करू लागले. खैवान या त्यांच्या गावात ती मूर्ती बसविली होती. ते ठिकाण मक्केच्या बाजुला दोन रात्रीच्या प्रवासाच्या अंतरावर स्थित होते. त्याचप्रमाणे हिमैर टोळीने नस्त्रची दैवत म्हणून निवड केली आणि बल्खा येथे तिची स्थापन करून पूजा करू लागले. हिमैर टोळीचे (बैत) एक मंदीर सनआ येथे होते. त्या दैवताचे नाव रिआम होते. लोकांचा त्या दैवताबद्दल मोठा आदरभाव होता. त्याला अनेक बळी दिले जात असत.

या दैवतांपैकी सर्वांत जुने दैवत मनाहाचे होते. अरब लोक त्याच्या नावावरून, त्यांच्या मुलांची नावे 'अब्द मनाह', 'जैद मनाह' अशी ठेवीत असत. मनाह देवीची स्थापना मुशल्लल परिसरात कुदैद येथे समुद्रकिनारी करण्यात आली होती. हे ठिकाण मक्का व मदीना यांच्यामध्ये होते. सर्व अरब त्या देवीचा मोठा मान राखत असत आणि तिला अनेक बळी देत असत, औस व खजरज हे तिचे अत्यंत एकनिष्ठ भक्त होते.

दुसरी एक देवता, जिची अरब लोक मोठ्या भक्तिभावाने पूजा करीत तिचे नाव अल-लात असे होते. तो एक घनाकार पाषाण (दगड) होता आणि त्याच्या शेजारी एक यहुदी माणूस दररोज जवाची खीर शिजवित असे. त्या देवतेच्या व्यवस्थापनाचा ताबा सकीफ टोळीच्या बनू अत्ताब इब्न मलिक याच्या हातात होता. त्याने एक मोठा इमला तिच्यावर बंधला होता. कुरैशचे लोक आणि अरबस्तानातील जवळपास सर्वच टोळ्यांना, तिच्याबद्दल मोठा आदरभाव होता आणि तिच्या नावावरून आपल्या मुलांची नावे जैद-अल-लात, तैन अल-लात अशी ठेवीत असत. सकीफच्या टोळीने इस्लाम धर्माचा स्वीकार करेपर्यंत, अरब लोक तिची पूजा करीत असत. त्या प्रसंगीच पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मुगिराह इब्न शुब्तह याला पाठवून ती मूर्ती नष्ट करून टाकायला सांगितले. अल-लात देवतेची मूर्ती जेव्हा नष्ट केली तेव्हा शद्दाद इब्न आरिद-अल-जुश्माई याने काव्यामध्ये सकीफ टोळीला खालील भयसूचना दिली,

*'अल-लातच्या मदतीला धावून येऊ नका,*
*अल्लाहने तिला सर्वनाशाची शिक्षा दिली आहे.*
*जो विजयी झालेला नाही, त्याच्याकडून तुम्हाला कशी मदत मिळू शकेल.*
*खचितच जेव्हा तिला पेटविले गेले तेव्हा तिने ज्वालांचा प्रतिकार केला नाही,*
*किंवा आपले कीर्तीहीन व टाकाऊ पाषाणही वाचवू शकली नाही,*
*म्हणून पैगंबर मुहम्मद (स.) जेव्हा तुझ्या ठिकाणी येतील,*
*तेव्हा परत जाताना तिच्या भक्तांपैकी कोणीही शिल्लक राहणार नाही.'*

अरब लोकांचा मोठा आदरभाव असणारी आणखी एक देवता अल-उज्जा होती.



झलीम इब्न असद नावाच्या एक माणसाने, लोकांना तिचा परिचय करून दिला होता. तिची मूर्ती नख्लत अल शमिया या दरीत उभी करण्यात आली होती. हुराद हे तिच्या ठिकाणाचे नाव असून अलगमियार शेजारी मक्का -इराक मार्गाच्या उजव्या बाजुला धतइराकपासून काही अंतरावर आणि अल-बूस्तानपासून दहा मैलावर होते. तिच्या सभोवताली मोठे भव्य आणि शानदार बांधकाम करण्यात आले होते. लोकांचा जमाव तेथे बसून तोंडी प्रवचने ऐकत असत. त्या देवतेच्या नावावरून आपल्या मुलांची नावे ठेवणे, हा अरब लोकांचा रूढ झालेला शिरस्ता होता. कुरैशी लोकांना काबागृहाची प्रदक्षिणा करण्यास पाठविले जाई आणि या देवतांची तेथे स्तुतीस्तोत्रे गायिली जात असत, कारण त्यांना 'अल्लाहच्या मुली' असे ते म्हणत असत. अल-लातची शपथ, अल-उज्जा व मनाहची शपथ, शेजारी तीन देवता, खचितच त्या अत्युच्च स्त्रिया आहेत, त्यांच्या मध्यस्थीची याचना केली जाते.

पवित्र कुरआनने अशा प्रकारच्या मूर्ख कल्पनांचे नि:संदिग्धपणे फारच जोरदार शब्दांत खंडन केले आहे,

''आता जरा सांगा की तुम्ही कधी या 'लात' आणि या 'उज्जा' आणि तिसरी एक देवी 'मनात'च्या वस्तुस्थितीवर काही विचार तरी केला आहे? काय मुले तुमच्यासाठी आहेत आणि मुली त्याच्यासाठी? ही तर मग मोठ्या गोंधळाची वाटणी झाली! वास्तविकत: या काहीच नाहीत परंतु काही नावे जी तुम्ही आणि तुमच्या वाडवडिलांनी ठेवली आहेत, अल्लाहने यांच्या बाबतीत कोणतेही प्रमाण उतरविले नाही. वस्तुस्थिती अशी आहे की हे लोक केवळ भ्रामक कल्पनांचे अनुसरण करीत आहेत आणि मनोवासनाचे अंकित बनलेले आहेत. वस्तुत: त्यांच्या पालनकर्त्याकडून त्यांच्यापाशी मार्गदर्शन आलेले आहे.'' (दिव्य कुरआन, ५३ : १९-२३)

कुरैशच्या लोकांनी आणखी कितीतरी मूर्ती काबाभोवती बसविल्या होत्या. त्यांच्यापैकी सर्वांत मोठी मूर्ती हुबलची होती. ही मूर्ती लाल रंगाच्या वज्र (या नावाच्या इमारती बांधण्याच्या दगडातील घटक पदार्थांचे कण वेगळे दिसतात) दगडात कोरलेली होती. तिला उजवा हात तुटलेल्या पुरूषाचे रूप दिलेले होते. ती मूर्ती काबागृहामध्ये उभी होती. तिच्या शेजारी शकुन पाहण्यासाठी मंतरलेले बाण ठेवलेले होते आणि भविष्य सांगणार (जोशी) ते शकुन, बाण टाकून पाहात असे. त्यातील एका बाणावर 'सरीह' असे शब्द कोरलेले होते. दुसऱ्या बाणावर 'मुलसक' म्हणजे परके असे लिहिले होते. एखाद्या बालकाचा जन्म वैध आहे की अवैध आहे, असा प्रश्न उद्‌गारला की अरब लोक ते बाण एकत्र घोळून टाकीत असत. बाणाच्या टोकाने जर 'शुध्द' या शब्दाकडची दिशा दाखविली, तर ते मूल वैध आहे, असे निर्णायकपणे ठरे, पण दुर्दैवाने जर बाणाचे टोक

‘मुलसक’ असे लिहिलेल्या शब्दाकडे असले, तर त्या मुलाला अवैध व अनौरस ठरविले जाई. तसेच शकुन दाखविणारे आणखी काही बाण होते, जे लग्नकार्य, मृत्यू, महत्त्वाच्या कामात यश किंवा अपयश मिळणारे शकुन दर्शवित असत. तसेच प्रवास सुखाचा होईल किंवा नाही, हे दाखविणारेही बाण होते.

हुबलच्या मूर्तीबद्दल अरब लोकात फार विस्तृत प्रमाणात भक्तीभाव व आदर होता. विशेषत: मक्केतील लोकात तो जास्तच होता. अबू सुफयान इब्न हर्बने उहुदच्या लढाईत विजयी झाल्यावर याच देवतेला संबोधून उद्‌गार काढले होते ‘‘हुबल तुझे स्थान उच्च असो.’’ (म्हणजे तुझ्या धर्माचा विजय होवो.)

त्याच्या उत्तरदाखल पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले होते, ‘‘अल्लाह सर्वांत उच्च आणि जास्त वैभवशाली आहे.’’

अन्य मूर्तींमध्ये ‘उसाफ’ व ‘नाइला’ प्रसिध्द आहेत. त्यांच्यापैकी एक ‘काबा’ला लागूनच उभी होती तर दुसरीची स्थापना ‘जमजम’ शेजारी करण्यात आली होती. नंतर दोन्ही मूर्तींना त्या पवित्र झऱ्याशेजारी एकत्र ठेवण्यात आले. अरब लोक त्या दोन्ही देवतांना बळी देत असत.

इब्न अल-कल्बी लिहितो -अरब लोकांना मूर्तीवरील निष्ठेचे मोठे वेड होते आणि ते अत्यंत तळमळीने त्यांची पूजा करीत असत. काही लोकांनी त्या मूर्ती भोवती बांधकाम करून इमले उभारले, तेथे पूजा करू लागले, तर इतर लोकांनी आदराने व श्रध्देने इतर देवतांचा अंगीकार केला. ज्या माणसाला स्वत:साठी वेगळे मंदिर बांधण्याची ऐपत नसे किंवा मूर्ती बनविणे जमत नसे, तो पवित्र काबागृहासमोर किंवा इतर कोणत्याही मंदिरासमोर स्वेच्छेनुसार एक दगड उभा करून, काबाभोवती तो जशी प्रदक्षिणा घालीत असे, तशीच त्या दगडालाही प्रदक्षिणा घालू लागे.

त्या मूर्तीवर त्यांची इतकी प्रीती जडलेली होती की एखाद्या प्रवासाला निघताना, घरच्या लोकांचा निरोप घेण्यापूर्वी त्यांचे शेवटचे कृत्य म्हणजे त्या मूर्तीला जाऊन स्पर्श करणे आणि प्रवास चांगल्या रीतीने पार पडण्याची आशा बाळगणे, असे होते. जेव्हा तो प्रवासाहून घरी परत येई, तेव्हा सर्वप्रथम त्या मूर्तीला जाऊन स्पर्श करणे आणि सुखरूपपणे परत आल्याबद्दल तिला आदरपूर्वक कृतज्ञता दाखविणे, असे ठरलेले असे. ते ज्या दगडांना आदर देत, त्यांना ‘अन्साब’ असे म्हणत. जेव्हा त्या दगडाला मानवी आकार असे तेव्हा त्याला मूर्ती (अस्‌नाम) असे म्हणत आणि कोरलेल्या मूर्तींना (अवेसान) असे म्हणत. त्यांना घातल्या जाणाऱ्या प्रदक्षिणांना फेऱ्या (दौर) असे म्हणत असत.



तरी अरब लोकांना काबागृहाच्या श्रेष्ठत्वाची आणि उच्च पावित्र्याची पुरेपूर जाणीव होती आणि त्यामुळे त्यांची पावले काबागृहाच्या यात्रेसाठी वळत असत. प्रवासामध्ये जाताना, काबागृहाला ते ज्या निष्ठेने प्रदक्षिणा घालीत असत, त्यांची स्मृती जागृती ठेवण्यासाठीच, त्या दगडांचीही पूजा करीत असत.

ही प्रथा अशी पडली की ते लोक जेव्हा प्रवासाला निघत, तेव्हा काबावरील त्यांची मोठी भक्ती व निष्ठा असल्याने त्या पवित्र आवारातील एक दगड उचलून घरी आणीत असत. तो दगड आपल्या बरोबर प्रवासात नेत असत आणि प्रवासात कोठेही ते जात, तेथे तो ठेवून त्याला फेऱ्या घालीत असत, जसे ते काबागृहाला प्रदक्षिणा घालीत तशी प्रदक्षिणा घालीत असत. शेवटी शेवटी तर कोणताही चांगला दगड दिसल्यास त्याची पूजा करू लागले आणि आपला मूळ धर्म विसरून गेले. आदरणीय इब्राहीम (अ.) आणि आदरणीय इस्माईल (अ.) यांच्या धर्मश्रध्देऐवजी ते मूर्तींची व पुतळ्यांची पूजा करू लागले.

काबागृहात त्या काळी रूढ असलेल्या प्रथांचा थोडक्यात उल्लेख करणे, येथे अनाठायी ठरणार नाही. या प्रथांपैकी काही थेट आदरणीय इब्राहीम (अ.), आदरणीय इस्माईल (अ.)च्या काळापासून चालत आलेल्या होत्या, याची नोंद घेणे स्वारस्याचे ठरते. काबागृहाला आदराने प्रदक्षिणा घालणे, हज यात्रा करणे, अराफात व अल-मुजदलफा येथे रात्रीचे जागराण (अल-वुकुफ) करणे. सांडणीचा बळी देणे आणि अल्लाहच्या नावाचा मोठ्यामोठ्याने जयघोष (तहलील) करणे. परंतु मक्का येथील लोकांनी त्या पवित्र विधीमध्ये मूर्तिपूजक प्रथांची सरमिसळ करून टाकली. उदाहरणार्थ, ते जेव्हा मोठ्याने अल्लाहच्या नावाचा जयघोष (तहलील) करीत तेव्हा अल्लाह एकमेव असल्याचा तर ते उच्चार (तलबिया) करीत, परंतु ते एकमेवत्व शुध्द व सरळ नसे. अल्लाहशी त्यांच्या दैवतांचाही ते संबंध जोडीत असत. त्यांची तलबिया अशा रीतीने खालील शब्दात केली जात असे,

*‘‘आम्ही येथे आहोत, हे स्वामी! येथे आहोत.*
*तुझा कोणीही सहभागी नाही, त्यांच्याखेरीज ते तुझे आहेत.*
*तुझा त्यांच्यावर संपूर्ण प्रभाव व वर्चस्व आहे,*
*आणि त्यांच्याजवळ जे काही आहे त्यावरही तुझा प्रभाव आहे.’’*

अरब पुरूष व महिला पूर्णपणे विवस्त्र होऊन टाळ्या वाजवीत काबागृहाला प्रदक्षिणा घालीत असत. आरडाओरडा करीत गाणी म्हणत असत. तसे करणे अत्यंत भक्तीभावाचे मानले जाई.

त्यांच्या त्या अश्लील व अभद्र कृत्याचे समर्थन करण्यासाठी त्यांचा युक्तिवाद असा होता की, जे कपडे अंगावर घालून त्यांनी अनेक पापकर्मे केली, तेच कपडे घालून तो पवित्र विधी करणे, अयोग्य ठरते. या मुद्यावर मोठा भर देत ते ठासून म्हणत,

''ज्या कपड्यात आम्ही अनेक पापे व गुन्हे केलेले आहेत, ते घालून आम्ही कधीच प्रदक्षिणा घालणार नाही. जो पोषाख घालून आमच्या हातून निर्घृण अपराध घडले आहेत, त्या पोषाखात आम्ही अल्लाहची उपासना-आराधना करणार नाही. ज्या कपड्यात आम्ही आामच्या स्वामीच्या आज्ञांचा भंग केला, त्यांचे उल्लंघन केले, ते कपडे प्रदक्षिणा घालताना आम्ही आमच्या शरीरावर ठेवणार नाही.''

इस्लामपूर्व काळाचा अरबस्तानचा इतिहास या गोष्टीवर मोठा प्रकाश टाकतो की त्या काळी अरब लोक मूर्तिपूजा तर करीत होतेच, परंतु त्याचबरोबर ग्रह-ताऱ्यांची, वृक्षांची व त्यांच्या टोळीतील मृत वीरांचीही ते पूजा करीत असत. सूर्य (शम्स) स्त्रीलिंगी मानून अत्यंत भक्तीभावाने त्याची मूर्तीप्रमाणे पूजा करीत असत. 'अब्द शम्स' हे पुरूषाचे नाव देशात सर्रास आढळून येत असे. उगवत्या सूर्याची आराधना म्हणून, अब्द-अल-शर्क, म्हणजे उगवत्या सूर्याचा सेवक असेही पुरूषाचे नाव ठेवले जाई; असाही पुरावा आढळून येतो. ग्रह-ताऱ्यांमध्ये विशेषकरून आकाश (सुहैल), तारे (अल-शी-रा) वृषभ राशीचे आणि ग्रहांपैकी बुधची (उत्तरिह), अल-जुहरा, गुरूची (अल-मुश्तरी) पूजा करीत असत. मक्का येथील एक मंदिर शनीला (जुहल) वाहण्यात आले होते.

सूर्य, चंद्र व ग्रहतारे यांच्यावरील अरबांची निष्ठा व भक्ती संशयातीत होती, परंतु त्यावरून असा निष्कर्ष काढणे चुकीचे ठरते की, अरबांचा धर्म, अथवा यहुद्यांचा धर्म केवळ ग्रह-ताऱ्यांची पूजा व आराधना करण्यावरच आधारलेला होता. या गोष्टीला वास्तवतेचा आधार नाही. अरबांची अशी कित्येक दैवते होती. उदाहरणार्थ, यऊकचे रूप घोड्याचे होते, नस्त्रचे रूप गिधाडाचे मानले जात असे, यऊक हे हमदान टोळीचे किंवा मोराद टोळीचे अथवा दोन्ही टोळ्यांचे दैवत मानले जात असे. गिधाडस्वरूप दैवत नस्त्र हे हिम्मैर टोळीचे होते.

अरबांची काही दैवते केवळ काल्पनिक व अमूर्त होती, पण त्यांनाही साकार करण्यात येऊन भयानक रूपे देण्यात आली होती. पूर्वीच्या काळापासून अरब लोकांचा असा विश्वास होता की त्यांचे भाग्य घडविणारी एक अलौकिक शक्ती अस्तित्वात आहे, ही गोष्ट विशेषकरून लक्षात ठेवण्यासारखी आहे. म्हणून उदाहरण द्यायचे झाल्यास अमूर्त 'कालचक्र' हे पृथ्वीवरील सर्व मानवी दु:खाचे खरे कारण आहे, असा लौकिक समज होता. मक्कावासियांच्या या अपसमजावरील विश्वासाचाही पवित्र कुरआनने उल्लेख केला आहे.



''हे लोक म्हणतात की, ''जीवन केवळ हेच आमचे जगातील जीवन होय, येथेच आमचे मरणे व जगणे आहे, आणि कालचक्राव्यतिरिक्त कोणतीही गोष्ट नाही जी आम्हाला नष्ट करील. वास्तविक याबाबतीत यांच्याजवळ कोणतेच ज्ञान नाही. हे केवळ कल्पनेच्या आधारे या गोष्टी करतात.'' (दिव्य कुरआन, ४५ : २४)

अरब कवीही कालौघाला अनुलक्षून (दहर-जमाने) त्याच्या कृत्याने माणसांना दु:खे व आपत्ती येते, असे म्हणत असत. माणसाचे असे एक प्रारब्ध असते, जे माणसाचा जीवनक्रम निर्धारित करते आणि अनिवार्यपणे माणसाला त्याच्या ठरलेल्या शेवटाकडे हाकून नेत असते. प्रारब्धाने घडविलेल्या गोष्टीत कोणीही बदल करू शकत नाही. कितीही खडतर प्रयत्न व कृती केली, तरी जे अटळ आहे, त्याला कोणीही टाळू शकत नाही किंवा ते बदलू शकत नाही. काव्यात आढळून येणारी एक अभिव्यक्ती, 'मनियाह' आहे. जी अरबांच्या दैववादी दृष्टिकोनावर प्रकाश टाकते. अरब लोकांचा असा विश्वास होता की स्वामीनेच या विश्वाची निर्मिती केली आहे. परंतु विश्व अस्तित्वात आल्यानंतर, त्याने मूक प्रेक्षकाची भूमिका घेतली आहे आणि आता कालप्रवाहाची शक्ती आणि माणसांचे प्रारब्ध, हे विश्वाला ठरलेल्या अंताकडे वाहवून नेत आहेत, नवनव्या घटना घडवून आणीत आहेत आणि माणसांच्या जीवनात उपकथा निर्माण करीत आहेत.

या देवी-देवतांखेरीज, अरब लोक त्यांच्या पुरोहितांना व पुजाऱ्यांनाही त्यांच्या ईश्वराइतक्याच आदराच्या दृष्टीने पाहात असत. या वर्गात, मंदिरांची व अन्य पवित्र स्थानांची व्यवस्था पाहणाऱ्यांचा समावेश होतो. मंदिरातील पुजारी हा मंदिराचे रक्षण करणार (सादिन) असे. नॉर्ड वंशीय लोकांच्या आचारासंहितेत त्यांच्या आदरणीय पुरोहिताला पवित्र स्थानाचा मालक ठरविले जात असे. पवित्र स्थानाच्या मालकीचा व त्याच्या संचालनाचा हक्क व अधिकार, अशा घराण्याकडे जात असे, ज्यांचा माणूस पुजारी असे. असा एक अलिखित नियमच झाला होता पण टोळीतील कोणीही माणूस पुरोहिताचे कार्य करू शकत असे. पुरोहिताच्या कार्याखेरीज, पवित्र स्थानाचे रक्षण करणे, मूर्ती तयार करणे, मोठमोठ्या देणग्यांचा वर्षाव होत असल्याने त्यांचा संचय व सांभाळ करणे, महत्त्वाच्या प्रश्नाबाबत ईश्वराची इच्छा व त्याचा उपदेश जाणून घेण्यासाठी बाण टाकून शकून पाहाणे, या कामाचाही समावेश असे. पुरोहित हा मर्त्य माणूस आणि त्याचा धनी (ईश्वर) यांच्यातील मध्यस्थ होता.

या पुरोहित वर्गाखेरीज भूत-पिशाच्च पाहाणाऱ्यांचे एक मंडळ होते. अदृश्य शक्तीने त्यांना गुप्त ज्ञान मिळे. त्यांना 'काहीन' (जोशी) असे म्हणत. त्यांच्या येणाऱ्या भविष्यकाळतील घटनांचे भविष्य सांगण्याची आणि इतर अनेक अद्‌भूत कृत्ये करून दाखावण्याची शक्ती होती, असे मानले जाई. ज्या कोणाला आपले भवितव्य जाणण्याची

इच्छा असे, तो त्यांच्यासमोर जाऊन अन्न व जनावरे यांची देणगी त्यांच्या पुढे ठेवी. त्यांच्या पायापाशी बळी दिले जात. मग तो 'काहीन' (जोशी) ला उत्तर मिळाल्यावर संबंधित माणसाला तो ते उत्तर सांगत असे.

मूर्तिपूजक अरब लोक कवींचाही अलौकिक ज्ञान असलेल्या गूढ माणसांच्या पंक्तीत समावेश करीत असत. अदृश्य आत्म्याशी (जिन्न) किंवा सैतानाशी (शयातीन) मैत्री असणारा जादूगार आणि तो दाखवीत असलेल्या जादूच्या शक्तीसाठी त्यांच्यावर विसंबून असणारा कवी (शायर) हा मूर्तिपूजक टोळीचा कौल असतो. शांतीच्या काळात तो त्यांचा वाटाड्या व मार्गदर्शक असतो आणि युध्दकाळात त्यांचा पाठीराखा समर्थक असतो. नवी चराऊ कुरणे घेताना सल्ला घेण्यासाठी ते त्याच्याकडे जात असत. त्याच्या शब्दावरच ते तंबू ठोकीत किंवा काढीत असत.

केवळ मूर्तींची व ग्रहतारे व संत यांचीही अरबस्तानात पूजा केली जात असे, इतकेंच नव्हे तर भूत-पिशाच्च आणि जिन्न यांचा समाजातील सर्व थरांत मोठा आदर-सन्मान केल जात असे. 'हे जिन्न त्याच्या मूळ स्वभावात देवतांपेक्षा वेगळे नसत, तर माणसांशी त्यांच्या संबंधात ते देवतांपेक्षा भिन्न असत. देवता सर्वस्वी मैत्रीपूर्ण असत, तर जिन्न हे वैर करणारे होते. वाळवंटातील भय आणि रानटी श्वापदांचे भय यासंबंधी त्यांच्यामध्ये ज्या विस्मयकारक कल्पना होत्या, त्यांचे मूर्तस्वरूप जिन्न होते. माणसांचे जाणे-येणे असलेली स्थाने देवतांची होती आणि जिन्नांचे स्थान म्हणजे वाळवंटातील अज्ञात आणि दुर्गम भाग असे.' अरब लोक त्यांच्या पूर्वजांच्या कबरीची व थडग्यांचीही पूजा करीत आणि त्या मृतात्म्याकडून संकटसमयी मदतीची विनंती ते करीत. त्यांचा असा विश्वास होता की त्या मृतात्म्यांना मानवी किंवा अमानवी रूप धारण करून अवतार घेण्याचे सामर्थ्य होते.

विविध प्रकारच्या चिन्हांवरून व शकुनांवरून आगामी घटना कळतात, या गोष्टीचा विश्वास केवळ अरब लोकांतच नव्हे तर इतर लोकांतही होता. काही पक्षी शुभशकुनी तर काही अपशकुनी मानले जात. एखाद्या माणसाच्या वाटेवरून एखादे जनावर आडवे गेले किंवा उलट दिशेला गेले, तर त्यालाही मोठा अर्थ असे. अशी अनेक चिन्हे होती, जी प्रत्येक माणसाला समजू शकत होती. काही चिन्हांचा अर्थ अनाकलनीय असे आणि विशेष प्रशिक्षण घेतलेल्या माणसांनाच त्याचा अर्थ समजे. पक्षांना भिववून त्यांच्या उड्डाणावरून अशुभ गोष्टींचे भविष्य सांगितले जाई. या कृतीला 'झज्र' या नावाने ओळखले जाई.

इतिहासाच्या पानांत ही वास्तवता आढळते की अरबस्तानात दैवी शक्तीचे प्रतीक म्हणून अग्नीचीही पूजा केली जात असे. या प्रथेचा शिरकाव अरबस्तानात शेजारील



पर्शिया देशातून झाल्यासारखे वाटते, कारण तेथे अग्नीपूजेची पालेमुळे खोलवर रूजली होती. हा अग्नीपूजेचा धर्म तमीमच्या टोळीमध्ये विशेष लोकप्रिय होता.

रोमन लोकांनी भयानक विध्वंस केल्यामुळे, मोठ्या संख्येत अरबस्तानात आश्रयार्थ पळून आलेल्या यहुदी लोकांमुळे अनेक अरब टोळ्यांमध्ये धर्मांतर घडून आले. किनानाह, अल हारिस इब्ने कबाह आणि किंदाह या टोळ्यांमध्ये विशेषकरून धर्मांतर झाले. काळाच्या ओघाबरोबरच या टोळ्या अतिशय बलशाली बनल्या आणि त्यांच्या ताब्यात अनेक गावे आणि किल्ले आले. परंतु अरब लोकांना मागील एक शतकापासून यहुदी धर्म अनोळखी नव्हता, येमेनचा राजा अबू करीब असद याने मूर्तिपूजक हिम्मैर टोळीमध्ये यहुदी धर्माचा परिचय करून दिला होता.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या उदयापूर्वी, अरब लोकांमध्ये ख्रिश्चन धर्माचीही फारशी प्रगती झाली नव्हती. या धर्माचा या देशात शिरकाव कसा झाला, ही बाब अनिश्चितच आहे. परंतु इ.सनाच्या तिसऱ्या शकतकाच्या सुरूवातीला, ईस्टर्न चर्चमध्ये जो गोंधळ माजला आणि लोकांचा छळ करण्यात आला, त्यामुळे मोठ्या संख्येत तेथील ख्रिश्चनांना तेथून पळ काढावा लागला आणि ते स्वातंत्र्याच्या या देशात आश्रयासाठी आले होते. ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केलेल्यापैकी प्रमुख टोळ्या हिम्मैर, गस्सान, राबीया, तग्‌घाब, बहरा, तूनुख या टोळ्या, तसेच ताय व कुंदाहा टोळ्यांचा काही भाग नज्रानचे रहिवाशी आणि हिरा येथील अरब लोक झुनुवासच्या काळात धर्मांतर करून ख्रिश्चन बनले होते.

एक धर्म म्हणून ख्रिश्चन धर्माने अरबस्तानात कायमची पकड कधी घेतलीच नाही व मूर्तीपूजेच्या पुढेही तो जाऊ शकला नाही. ख्रिश्चन तपस्वी आपल्या मठात एकांतवासात बसून राहून अरब लोकातून माणसांच्या तुरळक धर्माला मदत करीत असत. ख्रिश्चन मठवासी जोगी लोकांना, अरब लोकांमध्ये 'शुभवार्तेचा' प्रसार करण्यात आलेल्या अपयशाचे कारण, या वास्तवतेचे असू शकते की, अरबस्तानात त्या धर्माचा शिरकाव हाईपर्यंत, एक जिवंत शक्ती म्हणून त्याचे अस्तित्व संपले होते. ठराविक तत्त्वांची व मतांची त्यात खिचडी झाली होती. प्रत्यक्ष व्यवहारी जीवनाशी ज्याचा काही संबंध नाही, अशा अनुभवातीत व अगम्य आशावादाची त्यात सरमिसळ झाली होती- त्या धर्माचे प्रवर्तक असलेले धर्मगुरू सद्‌गुरू होऊन त्यांचा एक स्वार्थशोधक वर्ग बनला,

''धर्मगुरूंनी बारीक सारीक अगम्य व गुढ गोष्टीवरून वाद निर्माण केला, ख्रिश्चन लोकात विभागण्या व उपविभागण्या करून त्यांच्यात अनंत भेद व तट निर्माण केले, तसेच त्यांच्यात भांडणे व विवाद निर्माण केला. असे करून ज्या 'शुभसंदेशाने' प्रेम, शांती व दयाभाव वाढीस लावायचा होता, त्या तत्त्वालाच सुरूंग लावून त्यांनी द्वेषभावना,

हाडवैर व खुनशीपणा व सर्व दुष्कृत्ये वृध्दिंगत केली की त्यांनी त्यांचा धर्माचा गाभाच गमावून बसले. ख्रिश्चन धर्माबद्दल त्यांच्या कल्पनाबाबतच ते आपापसात असे भांडत बसले की त्यांच्या वादाच्या मुद्यावरुनच ख्रिश्चन धर्माची जणू जगातून हकालपट्टी झाली. त्या अंधाराच्या युगात, अंधश्रद्धा व भ्रष्टाचार, अशा ज्या गोष्टींचा रोमच्या चर्चमध्ये आज आपण तिरस्कार व निषेध करतो; त्या सर्व गोष्टींचा त्या काळी कळस झाला होता आणि त्या रूढ व प्रस्थापित झाल्या होत्या. याच गोष्टींची पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या धर्मप्रसाराला मोठी मदत झाली. विशेषत: संतांची व मूर्तींची पूजा अशा लज्जास्पद व कलंक लावणाऱ्या अवस्थेत येऊन ठेपली होती की रोमनवाद्यात आज जे आचरले जात आहे, त्यावर त्याने कडी केली होती.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या आगमनापूर्वी, अशी अरबांच्या धर्माची परिस्थिती होती. मूर म्हणतो,

''उघडपणे अयोग्य व अकार्यक्षम दिसणाऱ्या प्रतिनिधींच्या अकृतत्वाने झालेल्या परिणामांची कारणे, कल्पनाशक्तीला ओढून ताणून शोधण्यात येऊ लागली. पैगंबर मुहम्मद (स.)चा उदय झाला, अरबांना जागृत करून तत्काळ त्यांच्यात चेतना निर्माण केली आणि एक अध्यात्मिक श्रध्दा रूजविली. म्हणून त्यावरून असे तात्पर्य निघते की अरबस्तानात बदल घडून येण्यासाठी लोक प्रक्षुब्ध होते आणि तो बदल अंगीकारण्याची तयारी करू लागले. शांतपणे गतकाळाचा आढावा घेतला, इस्लामपूर्व काळाचा इतिहास पाहिला तर आपण आधाराविना गृहित धरलेल्या गोष्टींचा ताठा खोटा पडतो. शुभवर्तमानाचा उपदेश करीत पाच शतके लोटून गेल्यानंतर थोडेसे इकडे थोडेसे तिकडे अशी धर्मांतर केलेल्यांची तुरळक हिरवळ आपण दाखवू शकतो. नज्रानचे बनी हारिस, येमेनचे बनी हनीफा, तैमाच्या बनी तायपैकी काही लोक आणि यापेक्षा क्वचितच थोडेसे अधिक, इतक्याच लोकांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला. त्यापेक्षा अधिक बलवान असलेल्या यहुदी धर्माने, त्यांच्या स्तोत्रगीत पध्दतीने धर्मांतराचे प्रयत्न केले होते, परंतु सचेत व क्रियाशील धर्मांतर करणार म्हणून यहुद्यांचा धर्म सक्रीय राहिला नव्हता.

खरे तर धर्माच्या दृष्टीने पाहिल्यास अरबस्तानच्या पृष्ठभागावर अधून मधून ख्रिश्चन धर्माचे कमजोर तरंग उमटत होते, यहुदी धर्माच्या निश्चयी व कठोर प्रयत्नांचा प्रभाव अधिक खोलवर आणि खळखळाटाच्या प्रवाहात काही प्रसंगी दिसून येई. परंतु स्थानिक मूर्तीपूजा आणि इस्लामी वंशीयांची श्रध्देची लाट सर्व दिशांनी काबागृहाकडे वाढत गेली आणि या गोष्टीचा भक्कम व भरपूर पुरावा दिला की मक्केतील अरब लोकांच्या मनांवर त्या धर्माची, धर्मश्रध्देची व उपासनेची जोरदार पकड होती आणि त्यांना मानसिक दास्यत्वाच्या संशयातीत बंधनात जखडून ठेवले होते.



**प्रकरण २**

# उष:काल

काळोख्या रात्रीनंतर अतिप्रकाशमान दिवस उगवतो. तशीच गोष्ट जिवंत माणसासंबंधीही असते. संपूर्ण अरबस्तान अत्यंत घोर अंध:कारात व अंधश्रध्देत बुडालेले होते. बाहेरच्या जगातील अवस्थाही फारशी चांगली नव्हती. परंतु युगायुगाच्या अंधकारानंतर पैगंबर मुहम्मद (स.) नावाचा महामानव प्रगटला, तो मानवी इतिहासाच्या आकाशातील दैदिप्यमान सूर्य होता.

## ते वचन

पूर्वीच्या पवित्र ग्रंथात त्यांच्या उदयाची भाकिते सांगितली गेली होती. पैगंबर मुहम्मद (स.) यांचा जन्माचे भाकीत त्यांच्या आधीच्या सर्वच पैगंबरांनी वर्तविले होते आणि त्यांच्या हस्ते त्यांच्या लोकांकडून असा कारारनामा करण्यात आला होता की पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जेव्हा आगमन होईल तेव्हा ते त्यांचा स्वीकार व स्वागत करतील. ही गोष्ट पवित्र कुरआन जोरदारपणे प्रतिपादन करतो.

अल्लाहाने जेव्हा (त्याचा) पैगंबर मुहम्मद (स.) यांना नियुक्त केले, तेव्हा

*''मी जे ग्रंथ व ज्ञान तुम्हाला प्रदान केले आहे त्याकडे लक्ष द्या. नंतर तुम्हाकडे एक संदेष्टा येईल जो तुमच्यापाशी असलेल्याची मंजुरी व बळकटी देईल. तुम्ही त्याच्यावर विश्वास बाळगा आणि त्याला साहाय्य करा.''*

ईश्वर म्हणाला,

*''तुम्हाला हे कबूल आहे काय? आणि हा जो भार तुम्हावर टाकला आहे, तो तुम्ही वाहाल काय?''*

त्याचप्रमाणे इस्त्राईलचे शेवटचे पैगंबर इसा (अ.) यांनी (येशूने) त्यांच्या लोकांना एका दु:ख परिहारकाच्या आगमनाची खात्री दिली.

*''माझ्यावर जर तुमचे प्रेम आहे, तर माझ्या आज्ञांचे पालन करा. मी पालनकर्त्या पित्याकडे प्रार्थना करीन आणि तो तुम्हाला दुसरा दु:ख परिहारक देईल, तो तुम्हाकडे सतत राहील, तुम्ही त्याचे अनुसरण करा.'' (जॉन १४ : १५ - १६)*

पैगंबर मुहम्मद (स.) आगमन आपल्यानंतर निश्चित आहे आणि ते पैगंबर मुहम्मद (स.)- सत्ताधीश होणार आहेत, या गोष्टीची पुरेपूर जाण असल्याने येशू पुढे म्हणाले,

*''तथापि मी तुम्हाला एक सत्य सांगून ठेवतो. मी तुम्हासाठी उपयुक्त आहे, कारण मी जर निघून गेलो नाही तर त्या दुःख परिहारकाचे तुम्हाकडे आगमन होणार नाही. पण मी जर निघून गेलो तर त्याला मी तुमच्याकडे पाठवीन आणि तो जेव्हा येईल तेव्हा तो पापचारी जगताचे निर्दलन करील. नेकी, सदाचरण व न्याय प्रस्थापना करील.''(जॉन १६:७)*

ईशग्रंथांची परिपूर्णता झाल्याचे, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकरवी सर्व सत्यांचे प्रकटीकरण व प्रदर्शन, ईशसंदेशांचे त्यांच्यावर होणाऱ्या आविष्करणाचे व त्यांच्या भाकितांचा उल्लेख करताना येशूने सांगितले,

*''तुम्हाला सांगण्यासारख्या अनेक गोष्टी माझ्यापाशी आहेत. परंतु त्या तुम्हाला आताच सहन होणार नाहीत. तथापि तो सत्यशील पैगंबर मुहम्मद (स.) जेव्हा येईल, तेव्हा सर्वच सत्याप्रत तुम्हाला तो मार्गदर्शन करील, कारण तो स्वतःतर्फे काहीही सांगणार नाही. तो जे (ईशसंदेश) ऐकेल, तेच तो सांगेल. तो तुम्हाला भविष्यात होणाऱ्या गोष्टी दाखवील.''*

*(जॉन १२:१३)*

आणखी येशूने सांगितले,

*''मी त्यांच्या बांधवांमधूनच तुमच्यासारखाच एक पैगंबर उभारीन (जन्माला घालीन) आणि माझे शब्द त्याच्या मुखात घालीन. मी जो आदेश देईन, तेच तो त्यांना सांगेल आणि जो कोणी माझे शब्द ऐकणार नाही, जे शब्द तो माझ्या नावाने सांगेल, मी त्याला ते करण्यास घडवून आणीन.''*

'त्यांचे बांधव' या शब्दांचा निर्देश पैगंबर मुहम्मद (स.) आदरणीय इस्माईल (अ.) यांच्या संततीकडे आहे, जे इस्त्राईलवासीयांचे बांधव आहेत.

## पूर्तता

हे सर्व पैगंबर मुहम्मद (स.) यांचे भविष्यसूचक शब्द अगदी स्पष्टपणे एका आध्यात्मिक प्रकाशाच्या उषःकालाचे भाकीत वर्तवितात. हा दैदिप्यमान प्रकाश इसवी सनातील दि. २२ एप्रिल ५७१ रोजी म्हणजे दिनांक ९ रब्बिऊल अव्वल रोजी आणि ॲबिसिनीयनांच्या मक्केवर मोठ्या संख्येत हत्तीनिशी केलेल्या हल्ल्याच्या पहिल्या वर्षी झाला.

पैगंबर मुहम्मद (स.) यांची वंशावळी पैगंबर इस्माईल (अ.) यांच्या महाकुलीन घराण्यापासून चाळीसावी पिढी असल्याचे निःसंशयपणे सिध्द झाले आहे, ते अब्दुल्लाहचे पुत्र होते. अब्दुल्लाह अब्दुल मुत्तलिबचे पुत्र होते, अब्दुल मुत्तलिब अब्दुल मुनाफचे पुत्र होते, अब्दुल मुनाफ कुस्सैयचे पुत्र होते, कुस्सैय हे किलाबचे पुत्र होते, कुस्सैय हे मक्केचे



कार्यक्षम सत्ताधीश होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांची आई आमीना ही जहरा घराण्याच्या वहाब बिन अब्द मनाफ यांची कन्या होती. अशा रीतीने पैगंबरांचे पिता आणि माता हे दोन्हीही घरंदाज व प्रतिष्ठित घराण्याचे व उच्च नैतिक चारित्र्याने विभूषित कुटुंबांपैकी होते.

मक्का शहर परतल्यानंतर आपल्या धर्मप्रचाराच्या जीवन हेतूला अनुसरून, आपल्या शेजारील राष्ट्राकडे अनेक दूत धाडून त्यांना इस्लामच्या छत्रछायेखाली येण्याचे निमंत्रण दिले होते, या गोष्टीची इतिहासात नोंद आहे. ज्यांच्याकडे असे दूत धाडण्यात आले होते, त्यामध्ये बायझंटाइनच्या हेराक्लियसचा समावेश होता. त्याने दूताचा मोठा आदर-सन्मान केला. सीरिया सोडण्याआधी हा संदेश पाठविला होता, त्या माणसाच्या चारित्र्याचा थोडा परिचय करून घेण्याचा त्याने प्रयत्न केला. या उद्देशाने अरबस्तानातून आलेल्या व गाझा पट्टीपध्ये तळ टाकलेल्या अरब व्यापाऱ्यांपैकी काही अरबांना त्याने पाचारण केले. या अरब व्यापाऱ्यांच्या समूहात अबू सुफियान नामक व्यापारीही होता, तो पैगंबर मुहम्मद (स.) यांचा आणि त्यांचा धर्मप्रचाराचा कट्टर विरोधक होता. त्यालाही दरबारात बोलावणे पाठविण्यात आले. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या नैतिक चारित्र्याविषयी, शिकवणीविषयी आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल हेराक्लियसने ज्या काही चौकशी केल्या, त्यापैकी एक चौकशी त्यांच्या वंशावळीबद्दल होती. मुहम्मद (स.) बद्दल आकस जोपासला असतानाही, ते प्रतिष्ठित व आदरणीय महाकुलीन घराण्याचे वंशज आहेत ही वास्तवता अबू सुफियान नाकारू शकला नाही. त्यावर हेराक्लियस तत्काळ उद्‌गारला, ''अल्लाहचे पैगंबर नेहमी उच्चकुलीन व प्रतिष्ठित कुटुंबातीलच असतात.'' म्हणून मुहम्मद (स.) यांचा जन्म दीन व साधारण दर्जाच्या कुळात झाला होता, या गोष्टी दृष्टीत्म्यांचे खोटे आरोप व निंदानालस्ती आहेत. ते सर्व निराधार आहेत आणि कोणाही गंभीरपणे विचार करणाऱ्या माणसाचे लक्ष वेधून घेण्यास विसंगत आहेत.

विवाह झाल्यानंतर अब्दुल्लाह, पैगंबर मुहम्मद (स.) यांचे वडील, व्यापारासाठी सीरियाकडे गेले. सीरियाहून परतीच्या प्रवासात ते गंभीर आजारी झाले आणि मदीना मुक्कामी त्यांचे निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय जेमतेम २५ वर्षे होते आणि अमीना तेव्हा गर्भार होत्या. पित्याच्या निधनानंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांचा जन्म झाला. त्यांची देखभाल करण्याची जबाबदारी त्यांचे आजोबा अब्दुल मुत्तलिब यांच्यावर येऊन पडली. अब्दुल मुत्तलिब ही मक्केतील अत्यंत प्रभावशाली व्यक्ती होती. तसेच पैगंबर मुहम्मद (स.) यांची सुशील व विदीर्ण अंतःकरण असलेल्या माता-अमीनाचीही त्यांच्यावर जबाबदारी आली. त्या थोर वृध्दाला नातू जन्मल्याची सुवार्ता कळली, तेव्हा आनंद व दुःखाच्या संमिश्र भावना त्यांच्या हृदयात उचंबळून आल्या. आपल्या दिवंगत मुलास

पुत्ररत्न झाल्याचा त्यांना मोठा आनंद झाला, परंतु या आनंदात सहभागी होण्यास त्यांचा पुत्र राहिला नाही, याचे त्यांना अतीव दुःख झाले. ते लगबगीने जन्मलेल्या मुलाच्या घरी गेले, त्या वेळी त्यांच्या गालारून अश्रू ओघळत होते. त्यांनी मुलाला उचलून घेतले आणि काबागृहाकडे चालू लागले. काबागृहात जाऊन ते उभे राहिले आणि अल्लाहचे त्यांनी फार फार आभार मानले.

आजोबाने मुलाचे नाव 'मुहम्मद' असे ठेवले. हे नाव आणि दुसरे 'अहमद' हे नाव, समानार्थी आहे कारण या दोन्ही नावांची व्युत्पत्ती, अरबी शब्द 'हम्द' (स्तुती करणे) या मूळ शब्दापासूनच झालेली आहे.

## पैगंबर मुहम्मद (स.) यांचे बालपण

जन्मानंतर लवकरच अर्भक 'मुहम्मद' यांना सुवैबाह या दाईच्या सुपूर्द करण्यात आले. ही दाई पैगंबर मुहम्मद (स.) यांचे चुलते अबु लहब यांची सेविका होती आणि काही दिवसांपूर्वी तिने 'हमजा' यांना स्तनपान केले होते. तिने अल्पकाळच स्तनपान देऊन संगोपन केले असले तरी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्या नात्याची कायमची जाणीव ठेवली. तिच्याबद्दल आणि तिच्या कुटुंबियांबद्दल त्यांच्या मनात खोलवर आदराची व कृतज्ञतेची भावना होती. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे लग्न माननीय खदीजा (रजि.) यांच्याशी झाले तेव्हा सुवैबाह वारंवार त्यांचे घरी येऊन भेटत असे व त्यांना प्रेमळ पुत्राचे प्रेम व माया मिळत असे. मुहम्मद (स.) त्यांना कधीही विसरू शकले नाहीत. मदीनेला स्थलांतर केल्यानंतर तेथून ते तिच्यासाठी कपडे व अन्य भेट वस्तू आपल्या प्रेमाचे प्रतीक म्हणून न चुकता पाठवीत असत. मक्का शहरावर विजय मिळविण्याच्या प्रसंगी त्यांनी तिच्याबद्दल आणि तिच्या मुलांबद्दल खूप चौकशी केली, पण असे कळले की ते निधन पावले होते आणि त्याचा शोक करण्यास मागे कोणीही वारस नव्हते.

आपल्या नवजात अर्भकांना स्तनपानासाठी आणि त्यांचे संगोपन करण्यासाठी ग्रामीण भागातील 'बदावी' दाईकडे पाठविण्याची रूढी होती. असे केल्याने वाळवंटातील मोकळ्या व आरोग्यदायक वातावरणात त्यांची वाढ होई. त्यांची शरीरे धष्टपुष्ट होत. त्यांची भाषा शुध्द व सरळ बने. त्यांचे शिष्टाचार व संस्कार सुधारत असत कारण ग्रामीण भागातील बदावी अरब लोक सरळ स्वभावाचे व शहरी अवगुणापासून अलिप्त असत. नागरी समाजात भौतिक संपत्तीच्या विपुलतेने निर्माण होणारे दोष तिथे आढळत नसत.

नंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांना दाई हलीमाच्या स्वाधीन करण्यात आले. दाई हलीमा ही बनू सादच्या कबिल्यातील हवाजिनच्या एका शाखेतील एक बदावी महिला होती. ती दाई खुषीने पैगंबर मुहम्मद (स.) यांचा स्वीकार करण्यास तयार नव्हती कारण



पितृहीन अर्भकाला स्तनपान देऊन आणि त्याचे संगोपन करून त्यांना काही मोठा आर्थिक धनलाभ होणार नव्हता, जो हयात अरबांच्या अर्भकांना स्तनपान देऊन मिळत असे. परंतु स्वीकार केल्यानंतर तिने आपल्यावरील विश्वास सार्थ करून दाखविला. त्या बाळाची अत्यंत काळजीने व प्रेमाने तिने निगा राखली आणि एका सुदृढ व निकोप प्रकृतीच्या मुलासारखी त्याची वाढ होऊ लागली. पाच वर्षाचे वय झाल्यानंतर बालकाला त्याच्या मातेच्या स्वाधीन करण्यात आले. बाळ पाच वर्षेपर्यंत संगोपनासाठी दाई हलीमाच्या घरी असताना तिला आणि संपूर्ण कुटुंबाला सुदैवाचे व भरभराटीचे कित्येक प्रसंग लाभले. याबद्दलचे वर्णन आजही अनेक लोककथामधून आनंदाने केले जाते. याबद्दल एकाच प्रसंगाचा उल्लेख पुरेसा वाटतो, ज्याची नोंद इब्ने हिश्शामच्या ग्रंथात आढळते. जहीम बिन अबू जहीम जे अल हारिस बिन हलीबचे आश्रित होते, असे निवेदन करतात की अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या दाईने सांगितले की, एकदा मी पतीसह व एका अर्भकासह स्तनपानासाठी काही अर्भक मिळविण्यासाठी आमच्या गावातून बाहेर पडले. माझ्या घराण्याच्या अन्य महिलाही बरोबर होत्या.

"ते एका तीव्र दुष्काळाचे वर्ष होते. आमच्यापाशी खायला काहीही नव्हते. तपकीरी रंगाच्या एका गाढवीवर मी स्वार होते. आमच्यापाशी एक म्हातारी सांडणीही होती. अल्लाह शपथ आम्हाला दुधाचा एक थेंबसुध्दा मिळाला नाही. भुकेने आमच्या जवळील बाळ रात्रभर रडत असल्याने आमच्या डोळ्याला डोळा लागला नाही. माझ्या स्तनात पुरेसे दूध नव्हते आणि सांडणीलासुध्दा दूध नव्हते. आम्ही कसेबसे मक्का शहरात पोहचलो आणि संगोपनासाठी मुले मिळविण्याचा शोध घेऊ लागलो. माझ्याबरोबरच्या एकाही महिलेने संगोपनासाठी अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांचा स्वीकार केला नाही. ते पितृहीन आहेत असे कळल्याबरोबर त्यांनी नकार दिला. संगोपन करण्यापोटी बाळाच्या पित्याकडून मिळणाऱ्या मोठ्या मोबदल्यावर आमची दृष्टी होती. एक पितृहीन अर्भकाचे आजोबा आणि आई काय देणार आहेत? म्हणून आम्ही त्या बाळाला नाकारले. माझ्यासह आलेल्या प्रत्येक महिलेला संगोपनासाठी एकेक मूल मिळाले. आम्ही परत फिरण्याच्या तयारीत असताना मी माझ्या पतीला म्हटले, "अल्लाह शपथ! संगोपनासाठी मूल न मिळविता अन्य महिलांबरोबर जाणे मला पसंत नाही. मी त्या पितृहीन बालकाकडे जाऊन येते." माझ्या पतीने सांगितले, "तसे करायला काही हरकत नाही. कदाचित त्याच्यामुळे आपल्यावर कृपावृष्टी होईल व आपले भाग्य उजडेल." मी गेले आणि त्या बाळाला घेतले, कारण मला दुसरा पर्यायच नव्हता. मी बाळाला उचलून घेतले आणि माझ्या ठिकाणी आले. मी त्याला माझ्या स्तनाशी लावले, मात्र मला आश्चर्याचा धक्का बसला. माझे स्तन दुधाने घट्ट भरले होते. बाळाने मनसोक्त दुग्धपान केले. तसेच त्याच्या

दूधबंधुनेही पोटभर दुग्धपान केले आणि ती दोन्ही बालक स्वस्थपणे झोपली. माझे बाळ आदल्या रात्री किंचितही झोपले नव्हते. माझे पती दूध काढायला म्हणून सांडणीपाशी गेले आणि तिलाही भरपूर दूध असल्याचे पाहून त्यांनाही मोठा अचंबा वाटला. त्यांनी सांडणीचे भरपूर दूध काढले. आम्ही आकंठ दूध प्यालो आणि रात्रभर शांत झोप लागली. दुसऱ्या दिवशी माझे पती म्हणाले,''अल्लाह शपथ, हलीमा! तू एका महान भाग्यशाली बालकाची निवड करण्यात सफल झाली आहेस.'' मी म्हणाले, ''अल्लाहच्या कृपेने, मलाही तशीच आशा वाटते.''

निवेदनावरून असे कळते की दाई हलीमाचा परतीचा प्रवास आणि तिच्या सहवासात पैगंबर मुहम्मद (स.) यांचे वास्तव्य होते. तोपर्यंतचा कालावधी तिच्या सभोवताली भाग्यशाली, सुदैवी घटनांचा व भरभराटीचा गराडा पडला होता. ज्या गाढवीवर बसून ती मक्का येथे आली होती ती अत्यंत दुर्बल होती. चालतांना होलकांडत होती. परंतु परतीच्या प्रवासात ती इतकी बलवान झाली व तिची चाल, गती इतकी वाढली की, ती पाहून हलीमाचे सहप्रवासी स्तंभीत झाले. साद वंशाच्या हद्दीत पोहोचून तेथे तळ टाकीपर्यंत त्यांना आढळून आले की नशीब सर्व बाजूंनी त्यांना अनुकूल झाले होते. ओसाड व नापीक जमिनीत हिरवेगार गवत डोलू लागले. त्यांची जनावरे त्यात मनसोक्त चारून त्यांची कास दुधाने भरलेली होती. बाळाची प्रकृती निकोप व दणकट होती आणि ते वाळवंटातील शुध्द सरळ भाषा शिकले. पैगंबराला या संपादनाची जाण होती. अबू बकर (रजि.) एकदा म्हणाले, ''हे अल्लाहच्या पैगंबरा! तुमची अभिव्यक्ती फारच वक्तृत्वपूर्ण व भावनादिपक आहे.'' पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उत्तर दिले, ''मी कुरैशी घराण्यातील एका घराण्यात जन्मलो असून बनू सादच्या कबिल्यातील एका महिलेने मला स्तनपान दिलेले आहे.''

पैगंबर मुहम्मद (स.) पूर्ण पाच वर्षे शांततेच्या आणि प्रसन्नचित्ततेच्या ग्रामीण भागातील वाळवंटी वातावरणात दाई हलीमा व तिच्या कुटुंबियांसमवेत राहिले. ते देखणे मूल स्वभावत: कृतज्ञतेच्या भावनेने परिपूर्ण असल्याने, त्याने हलीमावर आणि तिच्या मुलांवर अतीव प्रेम केले आणि निरोप पोहचविण्याच्या कार्यात त्यांना खूप मदतही केली. दाई हलीमावर त्यांचे अतूट प्रेम असल्याने, पुढील जीवनातही तिच्या कुटुंबियाशीही तेच प्रेम राखले. दाई हलीमा अधून मधून मक्केला जाऊन त्यांना भेटत असत. त्यावेळी माननीय खदीजा (रजि.) यांच्याशी पैगंबरांचा विवाह झाला होता. एकदा एक भीषण दुष्काळ पडला होता. अनेक जनावरे मृत्युमुखी पडली होती. पैगंबर मुहम्मद (स.) यांची प्रेमळ दाई हलीमा माननीय खदीजा (रजि.) यांना जाऊन भेटली. त्या औदर्यवान महिलेने एक स्वारीचा उमदा उंट व चाळीस मेंढ्याचा कळप भेट देऊन त्यांना परत पाठविले.



दुसऱ्या एका प्रसंगी पैगंबर (स.) यांनी आपली चादर त्यांना बसण्यासाठी अंथरून त्यांच्याबद्दलची आदराची भावना व्यक्त केली. काही वर्षांच्या कालावधीनंतर 'ताएफ'च्या मोहीमेत बंदी बनविलेल्या लोकांना आणले गेले. त्यांच्यात त्यांची दूध-बहिण होती. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी पृच्छा केली की ''ती त्यांची दूध-भगिनी आहे याची खूण कोणती?'' त्या महिलेने उत्तर दिले, ''एकदा तुम्हाला मी पाठीवर घेतले असताना तुम्ही माझ्या पाठीचा चावा घेतला होता.'' पैगंबरांनी ती खूण ओळखली आणि त्या महिलेला बसण्यासाठी स्वत:ची चादर पसरली व बसण्यास सांगितले. तिची इच्छा असल्यास तिने सुखा-समाधानाने व सन्मानाने पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कुटुंबियांसमवेत राहावे असे तिला सांगितले. परंतु पैगंबरांनी तिला दिलेल्या भेटवस्तू घेऊन तिने आपल्या कुटुंबियांकडे जाण्याचे पसंत केले.

दाई हलीमाकडे वास्तव्य असताना फरिश्त्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांचे अंत:करण स्वच्छ केले होते. यासाठी अरबी भाषेतील एका प्रार्थनेची ओळ आहे, ''माझे अंत:करण निर्मळ कर, हे पालनकर्त्या!''

## बाल-मुहम्मद

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे वय जेमतेम सहा वर्षांचे होते, तेंव्हा त्यांच्या आईचे निधन झाले आणि त्यांची देखभाल व सांभाळ करण्याची सारी जबाबदारी त्यांचे आजोबा अब्दुल मुत्तलिब यांच्यावर येऊन पडली. त्यांना मुहम्मद (स.) अत्यंत प्राणप्रिय होते. परंतु पैगंबर मुहम्मद (स.) यांचे दु:ख अजून संपलेले नव्हते. दोन वर्षानंतर ब्याऐंशी वर्षाचे त्यांच्या वृध्द आजोबांचेही निधन झाले. आठ वर्षे वयाचे पैगंबर मुहम्मद (स.) विदीर्ण अंत:करणाने आजोबांच्या प्रेतयात्रेत चालत गेले. आजोबांच्या मृत्युनंतर मुहम्मद (स.) यांचा सांभाळ करण्याचा ताबा, त्यांचे चुलते अबू तालिब यांच्याकडे आला. अबू तालिब हे पैगंबरांचे वडील अब्दुल्लाह यांचे बंधु होते. त्या वयाच्या इतर मुलांप्रमाणेच पैगंबर (स.) ही मक्केस भोवतालच्या डोंगर-टेकड्यांवर आणि दऱ्या-खोऱ्यात आपल्या शेळ्या-मेंढ्यांचे कळप चरण्यासाठी नेत असत. मदीनेतील नंतरच्या वास्तव्यात त्यांना त्या आठवणी पुन:पुन्हा येऊन ते उद्गारत असत, ''सर्वच पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कार्यातील ते एक साम्य आहे, आदरणीय मूसा (अ.) यांनी शेळ्यांचा कळप सांभाळला होता. तशीच गोष्ट आदरणीय दाऊद (अ.) यांची होती. आता माझ्यावर ते कार्य सोपविण्यात आले आहे आणि मीही माझ्या कुटुंबियांसाठी 'अज्यद' नामक स्थानी माझ्या शेळ्या-मेंढ्या नेऊन चारीत असे.''

शेळ्या-मेंढ्या चरण्याची व त्यांचा सांभाळ करण्याची व्यस्तता, कोणत्याही

पैगंबरासाठी आवश्यक असणाऱ्या ध्यान-चिंतन आणि कृतज्ञतेच्या भावनांना अनुकूल व साधर्म्य असणारी होती. चरणाऱ्या कळपात पाहात असताना त्यांचे लक्ष एका अदृश्य शक्तीच्या सभोवताली विखुरलेल्या चिन्हांवर खिळलेले असे. चमकणाऱ्या तारका, निळ्या काळोख्या आकाशात स्तब्धपणे पूढे सरकणारे तेज:पुंज नक्षत्रगण, त्यांना एक विशेष संदेश देण्याचे कार्य करीत असत. सर्वत्र मनुष्यवाणीने प्रत्येक दिवशी बनणाऱ्या मतांपेक्षा कितीतरी अधिक पटीने वाळवंटातील नीरव व नि:स्तब्ध शांततेत ठाम व निश्चित मत व विश्वास त्यांना प्राप्त झाला. निसर्गातील चिन्हांचा क्षीण ध्वनी या चिंतनशील मुलाने सतत ध्यानपूर्वक ऐकला, त्या ध्वनीचे प्रताप व भव्यतेत रूपांतर होत असे आणि विजांच्या कडकडाटाने आणि मेघांच्या गडगडाटाने डोंगर-दऱ्यातील नीरव शांतता व एकांताचा भंग होत असे.

पवित्र कुरआनही मानवाला सचेत करून त्याला आवाहन करतो की त्याने आपल्या सभोवतालच्या पर्यावरणाचा, अंतरिक्षाचा अभ्यास, निरीक्षण व चिंतन करावे. बाह्य वस्तूंबद्दल विचारचिंतन करावे आणि त्याप्रमाणे अंतर्मुख होऊन आपल्यातील अंतरंगाचाही अभ्यास व निरीक्षण करावे. असे केल्यानेच माणसाला, पवित्र कुरआनच्या कथनानुसार, केवळ जगन्नियंत्या अल्लाहची चिन्हे दिसून येतील, इतकेच नाही, तर त्यातच सुसंवाद आणि संतुलन यांची शाश्वत तत्त्वेही आढळतील.

''आम्ही हे आकाश आणि पृथ्वी व जे काही त्याच्यात आहे, काही खेळ म्हणून बनविलेले नाही. जर आम्हाला एखादे खेळणे बनवायचे असते आणि जर असेच काही आम्हाला करावयाचे असते तर आपल्यापासूनच करून घेतले असते.''

(दिव्य कुरआन, २१ : १६-१७)

पवित्र कुरआन या गोष्टींवर जोर देऊन प्रतिपादन करतो की, सूर्य, चंद्र, सावल्यांचे लहान मोठे आकार, दिवस-रात्र यांचे आगमन, माणसांचे विविध वर्ण व विविध भाषा माणसांचे जयापजय, उत्कर्ष व ऱ्हास, थोडक्यात ज्ञानचक्षूंना तसेच मानवाच्या गतकाळातील नोंदी व अनुभव एकाच अंतिम सत्याची व वास्तवतेची चिन्हे व निशाण्या आहेत. त्या 'वास्तवते'शी जो कोणी प्रामाणिक राहू इच्छित असेल त्याचे हे पहिले कर्तव्य ठरते की या निशाण्याजवळून जाताना किंवा त्या डोळ्यांपुढे आल्या असताना ''आंधळ्या व बहिऱ्याप्रमाणे पुढे निघून न जाता, त्यांच्याबद्दल विचार-चिंतन करावे.'' ''आंधळ्या व बहिऱ्याप्रमाणे या शब्दात फार खोल महत्त्व दडलेले आहे'' आणि ''यात भविष्यसूचक गोष्टी आहेत आणि विचार-चिंतन करण्यासाठी यांमध्ये निशाण्या आहेत'' ''ज्ञानी माणसांसाठी यात चिन्हे दडलेली आहेत'' जे लोक लक्ष देतात, जे लोक प्रतिध्वनी ऐकतात आणि जाणतात आणि पवित्र कुरआन ज्या विचार-चिंतनावर भर देतो त्यानुसार प्रतिक्रिया



करतात. तसेच 'आम्हाला सर्व गोष्टींचे खरे स्वरूप दाखव' असे पैगंबर मुहम्मद (स.) यांची अल्लाहपाशी नेहमी प्रार्थना असे, त्यानुसार विचार चिंतन व अंतर्शोध घेतात. त्या मार्गावरचे पहिले पाऊल म्हणजे विचार-चिंतन होय. अशा प्रकारे निसर्गाच्या सान्निध्याने पैगंबराला ध्यान-चिंतनाची संधी उपलब्ध झाली.

*''झाडांच्या प्रत्येक पानात जिव्हा आहे, प्रत्येक झऱ्याच्या खळखळाटात ध्वनी आहे.*
*पुराच्या लोंढ्यात निरभ्र व सुरेख वातावरणात, धरणीत आणि हवेच्या आवरणात,*
*सर्वत्र एकच ध्वनी गुंजत असतो, हा ध्वनी कधीही स्तब्ध नसतो.''*

## मेंढपाळ म्हणून पैगंबरांच्या अनुभवांबद्दल लावलेले काही चुकीचे अर्थ

पाश्चिमात्य चरित्रलेखकांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जीवनचरित्र लिहिताना, मेंढपाळ म्हणून त्यांच्या मानसिक अनुभवांवर अधिक महत्त्व दिले आहे. त्यांना असे चित्र रंगवायचे आहे की पैगंबर ज्याला साक्षात्कार म्हणत, ते अन्य काही नसून त्यांच्या मेंढपाळ जीवनाच्या पूर्वस्मृती होय. म्हणून विख्यात मूर लिहितो,

''पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपल्या अंत:करणात खोलवर प्रामाणिकपणे ही धारणा ठेवली होती, की अल्लाह सर्वसाक्षी आहे आणि तोच सर्वाधिकारी आहे. याच प्रगाढ श्रध्देचा अभ्यस्तपणे पूर्वस्मृतीतून त्यांनी आपल्या जीवनाच्या उत्तरार्धात वक्तृत्वपूर्ण व हृदय हेलावणारी आवाहने केली आणि निसर्गाच्या आणि चराचर सृष्टीत सर्वत्र आढळणाऱ्या ईशऔदार्याचा उच्चार केला.''

हा दृष्टिकोन सर्वस्वी चुकीचा आहे. निसर्गाच्या थेट सान्निध्यामुळे पैगंबर मुहम्मद (स.) यांना चराचर सृष्टीचे जीवन अभ्यासण्याची संधी नि:संशयपणे मिळाली आणि त्यांच्या दर्पणात त्यांना त्यांच्या निर्माणकर्त्या सृजनकाराची अनुभूती मिळाली. परंतु या काळात मिळालेले सर्व अनुभव त्यांनी नंतरच्या आयुष्यात 'साक्षात्कार' म्हणून रंगविले हे पूर्णत: चुकीचे आहे. दृश्यचमत्काराबद्दल आणि माणसाच्या अंतरंगाबद्दल विचार-चिंतन केल्याने आपली बुध्दी प्रकाशमान बनते, आपल्या भावनांचे शुध्दीकरण होते, आपली ज्ञानेंद्रिये उल्हासित होतात आणि आपल्या आत्म्यांना शांती व समाधान लाभते. अशा रीतीने सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या वाणीचे चांगले रसग्रहण करता येते. पण या सर्व गोष्टी 'प्रकटीकरणाला' पर्याय ठरू शकत नाहीत. फार तर या गोष्टीना जगन्नियंत्या अधिपतीची वाणी स्वीकृत करण्यासाठी, त्यांचे मानसिक व भावनिक प्रशिक्षणासाठी साहाय्यभूत ठरली असे म्हणता येईल.

निसर्गचमत्कार पाहून आपणास विश्वाचे आणि त्याच्या निर्माणकर्त्याचे उचित निष्कर्ष काढण्यासाठी निर्देश मिळतो, परंतु केवळ इतकेच पुरेसे नसते. प्रत्येक चराचर

वस्तूत कार्यरत असलेल्या निसर्गतत्त्वाची ओळख करून घेणे आवश्यक असते. ही गोष्ट आपणास निगमात्मक अनुमानानेही मिळत नाही, तसेच हा विषयच असा आहे की प्रत्यक्ष निरीक्षण-अवलोकनानेही त्याचे अचूक निर्देशन होत नाही. म्हणून केवळ ईशबोध हाच एक मार्ग शिल्लक उरतो. जड वस्तू व उर्जा विश्वातील सर्व गोष्टींचा फडशा पाडून आपण संपवू शकत नाही. त्यांच्या पलीकडे 'काहीतरी' आहे. हे 'काहीतरी' अत्यंत महत्त्वाचे, किंबहुना मानवी जीवनासाठी अनिवार्य आहे, जे नैसर्गिक दृश्य देखावे नाहीत. तसेच ते उर्जेच्या रूपांतरातही नाही तिच्या सतत परिवर्तनशील चारूदर्शकतेत नाही, तर या सतत फेराबदल होणाऱ्या निसर्गदृश्यांच्या भडिमारात होणाऱ्या आध्यात्मिक तथ्यात आणि एका अमर्याद सत्यात आहे. कोणीही माणूस, किंबहुना पैगंबरसुध्दा केवळ स्वत:च्या बौध्दिक बोधाने त्या 'अमर्याद सत्याचे' पूर्ण दर्शन करू शकत नाहीत. या मर्यादेचे पैगंबर मुहम्मद (स.) यांना पवित्र कुरआनच संदेश देतो,

''हे पैगंबर (स.), या परोक्षाच्या वार्ता आहेत ज्या आम्ही तुमच्याकडे दिव्यप्रकटन करीत आहोत. यापूर्वी तुम्ही त्यांना जाणत नव्हता आणि तुमचे लोक देखील.''

(दिव्य कुरआन, ११ : ४९)

पवित्र कुरआन आणखी निवेदन करतो की, दिव्यबोध करून सत्यमार्ग प्रकाशमान करण्याची जबाबदारी सृजनकर्त्याची असून ते कार्य तो आपल्या पैगंबरांवर (त्या सर्वांवर शांती असो) दिव्य संदेशांचे प्रकटीकरण करूनच करीत असतो. ही गोष्ट पक्की लक्षात ठेवण्यासारखी आहे की शेळ्यामेंढ्यांचे कळप राखण्याचा कालावधी हा मानव जातीला मार्गदर्शन देण्याच्या प्रशिक्षणाचा काळ होता. मेंढपाळ आपल्या कळपाच्या जतनासाठी सर्वकाळ दक्ष असतो. तो सतत आपल्या प्राण्यांची काळजी वाहत असतो आणि एखादे जनावर वाट चुकून कळपातून बाहेर फुटून जाऊन हिंस्त्र वनचरांच्या तावडीत सापडू नये म्हणून काळजी वाहत असतो. तशीच गोष्ट पैगंबर मुहम्मद (स.) यांचीही असते. तो जनसमुदायाचा पालक असतो. तो सतत त्यांच्या कल्याणाचाच विचार करीत असतो आणि त्यांना सुस्थिती देणाऱ्या ठिकाणाकडे जाणाऱ्या सरळमार्गानेच नेण्यासाठी सतत प्रयत्नशील असतो. मेंढ्या राखण्याच्या या अनुभवातूनच मानव जातीबद्दल अतीव प्रेम आणि अज्ञानामुळे त्यांना भोगाव्या लागणाऱ्या क्लेश-यातनांतून त्यांना मुक्ती मिळवून देण्याची कळकळ निर्माण झाली. लोकांना अल्लाहच्या मार्गावर आणण्याची पैगंबराला इतकी पराकाष्ठेची चिंता होती की तिचा अनिष्ट परिणाम त्यांच्या प्रकृतीस्वास्थ्यावर झाला आणि अल्लाहला त्यांना खालील शब्दांत ताकीद द्यावी लागली...

''हे पैगंबर (स.), कदाचित तुम्ही या दु:खाने आपले प्राण गमावून बसाल की हे लोक श्रद्धा ठेवत नाहीत.'' (दिव्य कुरआन, २६ : ३)



## पैगंबर मुहम्मद (स.) यांचे तारूण्य

पैगंबर मुहम्मद (स.) जेव्हा बारा वर्षांचे झाले, तेव्हा त्यांच्या व्यापार करणाऱ्या चुलत्याने अबू तालीब यांना-व्यापारधंद्यासाठी सीरियाचा दौरा केला. प्रवासातील खडतर त्रासामुळे मुहम्मद (स.) यांना बरोबर घेण्यास ते इच्छुक नव्हते, परंतु पैगंबर मुहम्मद (स.) चुलत्यापासून दूर राहण्यास राजी नव्हते. त्यांनी चुलत्याला घट्ट मिठी मारली आणि बराच वेळ मनधरणी केल्यानंतर बरोबर सीरियाला घेण्यास चुलत्याला त्यांनी उद्युक्त केले. या प्रवास काळातच त्यांची एक ख्रिश्चन मठाधिपती- बहिराशी- गाठ पडली होती. या भेटीबद्दल अनेक ख्रिश्चन विद्वानांनी फार जोर दिला आणि असे अनुमान केले की बहिराकडूनच पैगंबर मुहम्मद (स.) यांना मूर्तीपूजा विरोधाची शिकवण प्राप्त झाली.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अधिकृत जीवनचरित्रांवरून संशयातीतपणे हे सिध्द होते की, वरील अनुमानात सत्याचा लवलेशही नाही. बहिराची गाठ पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी पडली होती हे सत्य आहे परंतु एकेश्वरत्व आणि मूर्तीपूजेचा निषेध मुहम्मद (स.) बहिराकडून शिकले, ही गोष्ट धादांत खोटी आणि निराधार आहे. याउलट पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपल्या पहिल्याच वक्तव्यात, त्याच्या सभोवताली खोलवर रूजलेल्या मूर्तिपूजेच्या रूढींची निर्भर्त्सना केल्याचे आम्हाला समजते. इब्न हिश्शामच्या लिखाणातील खालील उतारा आम्ही उद्धृत करीत आहोत. यावरून बहिरा आणि पैगंबरांच्या भेटीमधून काय बाहेर आले. हे कळून येईल.

''बहिराने जेव्हा त्यांना पाहिले तेव्हा तो एकटक निरखून पाहू लागला. त्यांच्या देहयष्टीचे तो बारकाईने निरीक्षण करू लागला, जेणेकरून त्यांच्यातील पैगंबरत्वाची लक्षणे त्याला सापडावीत. ती लक्षणे कोणती, हे त्याला त्याच्या पवित्र धर्मग्रंथावरून आधीच ठाऊक होते. जेव्हा त्यांचा भोजनाचा कार्यक्रम संपला तेव्हा बहिरा त्यांच्याकडे गेला आणि म्हणाला, ''हे तरूण माणसा! मी अल-लात व अल-उझ्झाची तुला शपथ घालून विचारतो की माझ्या प्रश्नांची तू उत्तरे द्यावीस.'' बहिरा असे म्हणाला कारण त्यांचे लोक याच दोन देवतांची शपथ घेताना त्याने ऐकले होते. असे म्हटले जाते की अल्लाहच्या पैगंबराने (त्यांच्यावर शांती असो) असे उत्तर दिले, ''अल-लात व अल-उझ्झा यांची शपथ घालून विचारू नका, कारण त्या दोघांइतका मला अन्य कोणाचाही तिरस्कार वाटत नाही.'' मग बहिरा म्हणाला, ''तर अल्लाहच्या नावाखातर माझ्या प्रश्नांची उत्तरे द्यावी.'' नंतर बहिराने निद्रेतील काही अवस्थांबाबत विचारावयास सुरूवात केली. अल्लाहच्या पैगंबराने त्याच्या प्रश्नांची उत्तरे देण्यास सुरूवात केली. त्यांनी उत्तरदाखल जे काही सांगितले ते बहिराच्या (पवित्र ग्रंथातील) वर्णनानुसार तंतोतंत जुळले.

त्यावर तो (बहिरा) त्यांचे चुलते अबू तालीबपाशी गेला आणि म्हणाला, ''तुम्ही तुमच्या पुतण्याला घेऊन तुमच्या देशाकडे परत जा आणि यहुद्यांपासून त्याच्या रक्षणाची काळजी घ्या. अल्लाह शपथ! त्यांनी जर याला पाहिले आणि मला जे काही कळले ते जर त्यांनी जाणले, तर ते दुष्टपणा करू इच्छितील. तुमच्या भाग्यात महान यश साठलेले आहे. म्हणून त्याला घेऊन तुम्ही तात्काळ स्वदेशी परतावे.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या चुलत्याने त्यांच्यासह सीरियाचा दौरा लगबगीने आटोपता घेतला आणि व्यापारधंदा संपवून त्यांच्यासह ते लवकरच मक्केला येऊन पोहचले.

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे वय जेमतेम पंधरा वर्षाचे होते तेव्हा अवैध युध्द (हर्ब-अल फिजार) भडकले. हे युध्द अनेक वर्षे चालू राहिले. त्यात अतोनात मनुष्यहानी व वित्तहानी झाली. हे युध्द उकाझ या ठिकाणी एका बाजुला कुरैशी व बनू किनानह आणि दुसऱ्या बाजुला कैस आयलान यांच्या दरम्यान झाले. या युध्दातील एका लढाईत पैगंबर स्वत: त्यांच्या चुलत्यांना भेटण्यास गेले होते परंतु प्रतिपक्षावर त्यांनी शस्त्र उचलेले नाही. शत्रूपक्षाचे इत:स्तता पडलेले बाण गोळा करून आपल्या चुलत्यांना पुरविण्याचे कार्य ते करीत होते.

या युध्दाचा शेवट झाल्यानंतर जेव्हा शांतता प्रस्थापित झाली, तेव्हा हिंसाचारावर काबू राखण्यासाठी, अन्याय रोखण्यासाठी आणि दुर्बलांच्या, हलाखीतल्या माणसांच्या हक्काला वाचा फोडून दाद मिळविण्यासाठी मक्केमध्ये एक संयुक्त समिती स्थापन करण्याची लोकांची इच्छा झाली. त्याच्या जडणघडणीत पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली. या संयुक्त समितीचा अरबस्तानातील अन्य टोळ्यांवर फार मोठा प्रभाव पडला.

अधिकारवाणीने लिहिणारे सर्वजण ही गोष्ट मान्य करतात की पैगंबर मुहम्मद (स.) यांचा तारूण्यकाळ, विनम्र आचरणाचा व शुध्द नीति-चारित्र्याचा व सुसंस्काराचा होता. हीच गोष्ट त्या काळात मक्केतील लोकामध्ये दुर्मिळ होती. या सबंध काळात त्यांचे नैतिक चारित्र्य उदात्त व निष्कलंक असल्याचे विश्वासू मित्र, सहाय्यकर्ता आणि मार्गदर्शक असल्याचे त्यांनी आपल्या आचरणाने सिध्द करून दाखविले. ते अत्यंत प्रेमळ स्वभावाचे असून आपल्या देशबांधवांशी फार दयाळूपणाने व सहानुभूतीने वागत असत. ते सतत दुसऱ्याच्या टाकलेल्या विश्वासाबाबत व इतरांना दिलेल्या वचनांबाबत फार जागरूकतेने पालन करीत. त्या काळी त्यांच्या इतर देशबांधवांमध्ये मोठ्या प्रमाणात रूढ असलेले मद्यपान, जुगार, लैंगिक विलास व निर्लज्ज रंगढंगापासून त्यांनी स्वत:ला अलिप्त राखले होते. आपल्या सर्व व्यवहारात ते नेकीने, औदार्याने, सचोटीने वागत. आपल्या मित्रांना



व उपकारकर्त्यांना ते सतत मदत करीत व औदार्याने वागत. अरबस्तानातील अत्यंत उर्मट, हेकेखोर आणि रक्तपिपासू जनसमूहाच्या घोळक्यात रस्त्याने अत्यंत नम्रतेने व विचारमग्न स्थितीत चालत असत. बालकांच्या बोलण्याकडे ते त्वरित लक्ष देत असत. तसेच हलाखीत असणाऱ्यांचे, वृध्दाचे व शारीरिक दुर्बलता व अपंगत्व असणाऱ्यांचे क्लेश व दु:ख कमी करण्यात ते कसलीही कसूर ठेवीत नसत. त्यांच्या समंजस, शांत व धर्मनिष्ठ चेहऱ्याची आणि परम दयाळूपणा व त्यांच्या आकर्षक शिष्टाचाराची छाप, त्यांच्या लोकांवर तात्काळ पडत असे. कोणत्याही दुर्गुणाचा मोह सहजपणे टाळून अगदी राजेशाहीपणे तेथून ते निघून जात असत. निष्कलंक चारित्र्य आणि आदरशील वर्तणूक आणि कोणाच्याही आड न येण्याच्या सवयीमुळे या तरूणाने आपल्या देशवासियांची प्रशंसा मिळविली. त्यांना लोकांनी उत्स्फूर्तपणे 'अल-अमीन' (विश्वासपात्र) व 'अल-सादीक' (सच्चा) हे मानाचे किताब बहाल केले होते.

## व्यापार व्यवसायी

अशा रीतीने लोकांच्या आदर-प्रतिष्ठेस पात्र ठरून पैगंबर मुहम्मद (स.) निवांतपणे अबू तालीब यांच्या कुटुंबात राहात होते. त्यांच्यात अभिलाषा, लोभिष्टपणा कधीही नव्हता. संपूर्ण हयातीत धनार्जनाबद्दल ओढ व उत्साह त्यांनी दर्शविला नाही. त्यांच्या मर्जीवर सोडले असते, तर त्यांनी सतत निवांत जीवन व्यतीत करणेच पसंत केले असते. परंतु चुलत्याला मदत करण्याची त्यांना सतत चिंता असे. कारण त्यांच्यावर एका मोठ्या कुटुंबाच्या पोषणाची जबाबदारी होती. म्हणून संधी मिळे, तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) आनंदाने आपल्या चुलत्याला मदत करण्यास तयार असत.

इब्ने सादने, दिलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

''पुतण्याचे वय पंचवीस वर्षाचे झाले असताना अबू तालीबने त्यांना सांगितले, ''तू जाणतोस माझी उत्पन्नाची साधने तुटपुंजी आहेत व माझ्यावर बिकट आर्थिक प्रसंग आहे. तुमच्या टोळीच्या लोकांचा एक तांडा व्यापारासाठी सीरियाकडे निघाला आहे आणि खुवैलिद याची कन्या माननीय खदीजा (रजि.) यांना त्यांचा व्यापारी माल घेऊन जाऊन विकण्यासाठी व त्याचा सांभाळ करण्यासाठी आपल्या टोळीतील एका माणसाची (चाकराची) गरज आहे. या मोहीमेवर जाण्याचे धैर्य तू दाखविलेस, तर तुझी नेमणूक ती नक्कीच करील.'' पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उत्तर दिले, ''तुम्ही सांगता तसेच होवो.'' अबू तालीब तिच्याकडे आले आणि त्यांचा व्यापारी माल पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे सोपविण्यास ती तयार आहे काय याची चौकशी केली. माननीय खदीजा (रजि.)यांना पैगंबर मुहम्मद (स.) यांचा प्रामाणिकपणा, विश्वासार्हता आणि उच्च नैतिक चारित्र्य

याबद्दल आधीच माहिती होती. त्यांनी ती सूचना त्वरीत स्वीकारली आणि सांगितले, ''तुमच्या टोळीतील कोणालाही एरवी मी जो कामाचा मोबदला दिला असता, त्याच्या दुपटीने द्यायला मी राजी आहे.''

अशा रीतीने व्यवहार ठरला आणि पैगंबर मुहम्मद (स.) प्रवासाला निघाले. तांडा प्रवासाला निघताना चुलत्याने पैगंबर मुहम्मद (स.) यांचा परिचय व शिफारस तांड्याबरोबर असणाऱ्या काही लोकांकडे केली. माननीय खदीजा (रजि.)यांचा दुसरा एक सेवक मयसरा प्रवासात मुहम्मद (स.) यांच्या सोबत होता. तांडा नेहमीच्या मार्गाने सीरियाकडे चालू लागला. याच मार्गाने पैगंबर आपल्या चुलत्यासह पूर्वी गेले होते. दमास्कसच्या मार्गावरच मध्ये बसरा शहर लागते. एका दाट सावलीच्या झाडाखाली विश्रांतीसाठी पैगंबर याच मार्गावर थांबले होते. नजीकच एक ख्रिश्चन योगी राहात होता. पैगंबरांकडे पाहून तो धावतच त्यांच्यापाशी आला व म्हणाला, ''मेरीपुत्र येशूपासून ते आजतागायत या झाडाच्या सावलीत पैगंबर सोडून दुसरे कोणीही बसलेले नाही. नंतर तो मयसराकडे तोंड फिरवून म्हणाला.'' ही प्रकाशरेषा त्याच्या डोळ्यात कायम दिसते काय?'' मयसराने होकारार्थी उत्तर दिले. यावर तो म्हणाला, ''हा पैगंबर आहे. पैगंबर शृंखलेतील अंतिम पैगंबर.''

''त्या वेळी पैगंबर मुहम्मद (स.) व्यापार करण्यात गढलेले होते. तेवढ्यात एका गिऱ्हाईकाशी काही बाचाबाची झाली. गिऱ्हाईकाने आग्रह धरला की, 'लात' आणि 'उझ्झा' यांची शपथ घेऊन सांगावे. ''मी ते कधीच केले नाही.'' पैगंबरांनी चटकन उत्तर दिले, ''मला त्यांच्या मूर्तीसमोरून जेव्हा जाण्याची वेळ येते, तेव्हा तो मार्ग मुद्दाम टाळून दुसऱ्या रस्त्याने जातो.'' ते ऐकून तो माणूस स्तंभित झाला व उद्गारला, ''तू खरोखर प्रामाणिक आहेस आणि तुझे म्हणणे अगदी खरे आहे. अल्लाहची शपथ हाच तो माणूस आहे ज्याची कीर्ती व महती आपल्या विद्वानांनी गायिली आहे आणि आपल्या ग्रंथात ती भाकीत झाली आहे.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या चरित्रात आढळणारी ही अधिकृत संपूर्ण माहिती आहे. पाश्चिमात्य चरित्र लेखकांनी हेतुपुरस्सर रचलेल्या खोटारड्या कहाण्यांचा त्यात लवलेशही आढळत नाही. एका नेस्टोरियन ख्रिश्चन योग्याशी मुहम्मद (स.) यांची गाठ पडली आणि त्याच्याकडून ख्रिश्चन धर्मतत्त्वांचे ज्ञान मिळविले आणि त्याच्यापासूनच ते मूर्तीपूजेचा निषेध करण्यास शिकले, ही गोष्ट धादांत खोटी व बिनबुडाची आहे.

मूर्तिपूजक समाजात आढळणाऱ्या चुकीच्या सर्वच, रूढींपासून पैगंबर मुहम्मद (स.) त्यांच्या आधीच्या सर्व पैगंबरांप्रमाणेच विन्मुख व विरूध्द होते. ते स्वभावतःच एकेश्वरवादी होते आणि अल्लाहखेरीज अन्य कोणाचीही करूणा त्यांनी कधीच भाकली नाही, कारण एकमेव तोच संपूर्ण विश्वाचा सृष्टा व पालनकर्ता आहे.



त्या काळी एकेश्वरत्वाचा अर्थ फार मोठ्या प्रमाणात लोप पावला होता. त्रिमूर्ती पूजावादाचे प्रमाणवचन लोकांच्या मनांवर मोठ्या प्रमाणात लादले गेले होते. जेकोबाइट आणि युटिशियन यांच्या भागीदारीबद्दल लोकांना मार्गभ्रष्ट करून त्यांच्यात 'मेरी'ची पूजा करण्याची प्रवचने दिली जात असत. पैगंबर मुहम्मद (स.) यांना ती आवाहने कधीच पटली नाहीत, कारण त्यांच्या जीवनाच्या आरंभापासूनच ते एकेश्वरत्वाचे कट्टर श्रध्दाळू होते.

सीरियामध्ये पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दूरदर्शीपणाने व कर्तव्यबुध्दीने असा व्यापार केला की परत जाताना त्यांच्यापाशी नेहमीपेक्षा फार अधिक धन होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांची इमानदारी आणि बुध्दीकौशल्य पाहून माननीय खदीजा (रजि.) इतकी प्रभावित झाली की तिने त्यांच्याशी विवाहबध्द होण्याचे ठरविले. तिने आपल्या एका दासीजवळ विवाहाचा प्रस्ताव देऊन पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे पाठविले. या दासीचा व पैगंबर मुहम्मद (स.) यांचा जो संवाद झाला त्यावरून अशा विवाहाची कल्पनाही त्यांच्या डोक्यात नव्हती, ही गोष्ट स्पष्ट होते.

## माननीय खदीजा (रजि.)यांच्याशी पैगंबर मुहम्मद (स.) यांचा विवाह

ती दासी म्हणाली, ''लग्न करण्यात तुम्हाला कोणत्या गोष्टीचा अडथळा आहे?'' पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उत्तर दिले, ''लग्नाचा खर्च भागविण्यासाठी माझ्याजवळ काहीच नाही.'' दासी म्हणाली, ''पण ती अडचण जर दूर झाली आणि एक सौंदर्यवती, खानदानी व श्रीमंत महिला विवाहासाठी प्रस्ताव तुम्हाला देते आणि तुम्हाला ती समृध्दतेत ठेऊ इच्छिते, तर तुम्ही या विवाहाला तयार व्हाल?'' पैगंबरांनी या नव्या कल्पनेचे विस्मयचकित होऊन विचारले, ''कोण अशी महिला असू शकते?'' दासीने उत्तर दिले, ''माननीय खदीजा (रजि.).'' ''पण त्यांच्यापर्यंत पोहचण्याचा आवाका मला कसा मिळेल?'' पैगंबर मुहम्मद (स.) यांनी पृच्छा केली. ''ते माझ्यावर सोपवा.'' दासी म्हणाली. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी थोडावेळ विचार करून ठाम निश्चय करून म्हटले, ''या विवाहास मी राजी आहे.''

दासी परतली आणि माननीय खदीजा (रजि.)यांना तिने संपूर्ण वृत्तान्त सांगितला. तिच्याशी विवाह करण्यास पैगंबर मुहम्मद (स.) राजी आहेत, हे कळताक्षणीच माननीय खदीजा (रजि.)यांनी आपल्या चुलत्यास निरोप पाठविला आणि त्यांच्या भेटीचा दिवस व वेळ निश्चित केली. निर्धारित दिवशी पैगंबर मुहम्मद (स.) आपले चुलते अबू तालीब व हमजा आणि त्यांच्या टोळीच्या अनेक प्रमुखांसह माननीय खदीजा (रजि.)यांच्या निवासस्थानी गेले. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनचरित्राचा ख्यातनाम लेखक सुहैली लिहितो की

माननीय खदीजा (रजि.)यांचे वडील खुवैलिद यांचे निधन 'फिजार' युध्दात झाले होते, म्हणून त्यांचा चुलता आम्र बिन साद याने त्यांचा विवाह पैगंबरांशी करून दिला.

पैगंबर मुहम्मद (स.) आणि माननीय खदीजा (रजि.) यांच्या विवाहसमयी माननीय खदीजा (रजि.)यांचे वय चाळीस वर्ष आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांचे वय पंचवीस वर्षाचे होते. तेव्हापासून सुमारे पावशतकाच्या कालावधीपर्यंत माननीय खदीजा (रजि.) या पैगंबरासाठी आशेचा व दु:खपरिहाराचा घटक बनून राहिल्या. त्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांना खडतर परिस्थितीत मानसिक स्वस्थता, दैनंदिन जीवनाच्या चिंतेतून मुक्ती दिली. तसेच अतीव प्रेम व सुख देऊन त्यांचे मनोबल वृध्दिंगत केले. हीच गोष्ट पैगंबर मुहम्मद (स.) यांना ईशसंदेशाच्या प्रसार व प्रचारासाठी साहाय्यभूत झाली.

दोहोंच्या वयात डोळ्यांत भरण्याइतके अंतर असतानाही पैगंबर मुहम्मद (स.) यांचे माननीय खदीजा (रजि.)वरील प्रेम तिळमात्रही कमी झाले नाही. माननीय खदीजा (रजि.)यांच्या निधनानेच त्यांना एकमेकांपासून विभक्त केले. ईशसंदेश प्रचार-प्रसाराच्या आरंभीच्या काळात पैगंबर मुहम्मद (स.) यांना अनेक प्रकारच्या कसोट्यांना, दूषणांना व तिरस्काराला सामोरे जावे लागले होते. अशा कसोटींच्या काळात माननीय खदीजा (रजि.)यांनी दिलेले सहकार्य, त्यांचे मनोबल वाढविणारा दिलासा, वगैरे आठवून पैगंबर मुहम्मद (स.) यांना मनस्वी दु:ख झाले. एकदा तर माननीय आएशा (रजि.) यांनी विचारले, ''ती एकटीच पत्नी तुमच्या प्रेमास पात्र होती काय?'' पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सद्गदित स्वरात उत्तर दिले, ''तिने माझ्यावर विश्वास ठेवला होता, जेव्हा अन्य कोणीही ठेवला नव्हता. लोकांची माझ्यावर श्रध्दा व विश्वास नव्हता, तेव्हा तिने इस्लामचा स्वीकार केला होता. तिने मला मदत केली, माझे सांत्वन केले, ते अशा वेळी जेव्हा मला मदतीचा हात पुढे करणारा कोणीही नव्हता.''

त्यांच्याबद्दलच्या कृतज्ञतेची आणि प्रेमळपणाची आठवण पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हयातभर टिकून होती. त्यांच्या सर्व मैत्रिणींशी त्यांनी दयाळूपणाचे आचरण केले. अधूनमधून त्यांना देणग्याही पाठविल्या. माननीय आएशा (रजि.) एकदा उद्गारल्या. ''मी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कोणत्याही पत्नींशी इतका हेवा वाटला नाही, जितका हेवा मी माननीय खदीजा (रजि.)यांचा केला होता. खरेतर मी त्यांना पाहिलेही नाही. पैगंबर मुहम्मद (स.) यांना त्यांचीच सतत आठवण येते.'' या गोष्टीवर एकदा मी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या भावना दुखावल्या तेव्हा त्यांनी गंभीरपणे उत्तर दिले, ''तिच्यावरील गाढ प्रेमाचे अल्लाहने मला वरदान दिले आहे.'' माननीय खदीजा (रजि.) यांना मुहम्मद (स.) यांच्यापासून बरीच अपत्ये झाली. पहिल्या अपत्याचे नाव कासिम ठेवण्यात आले. तत्कालीन अरब रूढींनुसार मुहम्मद (स.) यांना 'अबुल कासिम' (कासिमचे वडील) असे



टोपन नाव देण्यात आले. नंतर तय्यिब व ताहिर जन्मले. त्यांचे बाल्यावस्थेतच निधन झाले. मुलीमध्ये माननीय रूकय्या (रजि.) सर्वांत मोठी होती. त्यांच्यानंतर माननीय जैनब उम्मे कुलसुम (रजि.) झाल्या. शेवटी सर्वांना ज्ञात असलेली माननीय फातिमा (रजि.) यांचा जन्म झाला.

## विश्वासार्हता

ईशसंदेश प्रसाराच्या आरंभापूर्वीची ही एक घटना आहे, जिच्यातून पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या चातुर्याची आणि त्यांच्या लोकप्रियतेची कल्पना येते. एकदा अतिवृष्टीतून आलेल्या पुरामुळे काबागृहाची पडझड झाली. काबागृहाच्या पुनर्बांधणीचे काम प्रमुख घराण्यांमध्ये वाटले गेले आणि ते एकवाक्यतेने निश्चित झाले. अखेरीस पवित्र काळा दगड चर्चित जागी बसविण्याची वेळ आली. तो पवित्र काळा दगड कोणी बसवायचा याबद्दलचा प्रस्ताव, प्रमुखांमध्ये सर्वाधिक वयस्कर असलेल्या अबू उमैय्या बिन मुगिरा यांनी मांडला आणि सर्वांनी तो मान्य केला. तो म्हणाला, ''जो उद्या काबागृहात सर्वांच्या आधी प्रवेश करील, त्याने काळा दगड कोणी बसवावा याचा निर्णय घ्यावा.'' दुसऱ्या दिवशी सकाळी पैगंबर मुहम्मद (स.) यांनीच पहिल्या प्रथम काबागृहात प्रवेश घेतला. इतर लोक प्रवेश करण्यासाठी आले तेव्हा मुहम्मद (स.) तेथे उपस्थित असल्याचे त्यांना दिसले. एकसुराने ते ओरडले, ''अल-अमीन विश्वासपात्र आलेले आहेत. आम्ही त्यांचा निर्णय कबूल करण्यास तयार आहोत.'' शांत व निग्रही पैगंबर मुहम्मद (स.) यांना अधिकार मिळाला आणि उपयुक्त तोडगा काढण्याचा निश्चय केला ज्यामुळे सर्वांचे समाधान व्हावे. त्यांनी आपल्या खांद्यावरील चादर जमिनीवर अंथरली आणि पवित्र काळा दगड तिच्या मध्यभागी ठेवला. मग कुरैश घराण्याच्या वेगवेगळ्या प्रतिनिधींना सांगितले की सर्वांनी मिळून चादरीसह तो काळा दगड उचलावा. काळा दगड त्याच्या जागी पोचला तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी तो योग्य तऱ्हेने आपल्या हाताने बसविला. अशा प्रकारे काळा दगड बसविण्याच्या मानापोटी निर्माण झालेली तणावाची स्थिती निवळली आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या चातुर्याने हिंसाचाराच्या उद्रेकाचा एक भीषण प्रसंग टळला.

अल्लाहच्या अंतिम पैगंबरांपाशी केवळ सर्वोच्च ध्येय व आदर्श होते, इतकेच नाही तर ते प्रत्यक्ष आचरणात आणण्यासाठी आवश्यक असणारे बुध्दिचातुर्यही होते.

**प्रकरण ३**

# अल्लाहकडे येण्याचे आवाहन

लोकांमध्ये त्या काळी सर्रास आढळणाऱ्या नैतिक अधोगतीमुळे आणि मूर्तीपूजेच्या चलनामुळे पैगंबर मुहम्मद (स.) यांचे अंत:करण सतत व्यथित राही. त्या काळचा अरब समाज कलहामुळे फाटाफुट झालेला होता. सूड-वैराने वर्षानुवर्षे चाललेल्या लढायांमुळे फाटलेला होता. जगातील अन्य भागातसुध्दा परिस्थिती यापेक्षा अधिक चांगली नव्हती. तत्कालीन जगामध्ये नैतिक बळ देणाऱ्या दोन प्रमुख धर्मामध्ये (ख्रिश्चन व यहुदी) सतत कडवे संघर्ष व भांडणे होऊन तेही खिळखिळे झालेले होते. तीन शतकांपासून भक्कम पायावर असलेले बलाढ्य रोमन साम्राज्य उभे होते, परंतु सततच्या संघर्षात त्यांना टायबर नदीच्या किनाऱ्यावरून बॉस्फरस समुद्राच्या किनारी येऊन स्थिरावे लागले. ते लुळे-पांगळे बनून अस्त होण्याच्या मार्गावर होते. त्याचे वैरी असलेले पर्शियाचे साम्राज्य, त्याच्या आरंभी फार बलवान होते. मानवता अत्यंत कठीण काळात वाटचाल करीत होती. विचारवंत व विवेक असणारी सर्व ठिकाणची माणसे या मानवी बंडखोरीच्या धांदल व गडबडीच्या काळोखातून प्रकाशाचा शोध घेत धडपडत होते, जेणेकरून त्यांच्या वंशियांचे भवितव्य सुंदर व ईशमय व्हावे. हे इहलोकीय जीवन नियंत्रित करण्यासाठी एखाद्या बोधशब्दाची ते अत्यंत आतुरतेने प्रतिक्षा करीत होते. मानवी समाजाचे फाटाफुटीपासून रक्षण करण्यासाठी आणि मानवाला पाखंडी व खोट्या देव-दैवतांपासून मुक्त करून, पृथ्वीवर सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी एका नव्या सूत्र शब्दांची गरज होती.

## सत्याची हाव

दु:खीजनांकडे पाहून पैगंबर मुहम्मद (स.) यांचे अंत:करण कळवळत असे. ते तासनतास विचारमग्न राहात. एकांतवासात मनन-चिंतन करण्यासाठी ते दीर्घ काळापर्यंत मक्का शहराच्या सभोवताली असणाऱ्या डोंगरात किंवा घाटीत एकटेच बसत. अशा एकांताच्या जागेपैकी त्यांची आवडती जागा अन-नूर डोंगरातील 'हिरा' नावाची गुहा होती. सृष्टीच्या निर्मितीचे गूढ जाणण्यासाठी तसेच, जीवन आणि मृत्यू, नेकी व दुष्टता यांचे रहस्य आकलन करून घेण्यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांचा आत्मा झगडत होता. या गुहेच्या एकांतात खोल विचारात बुडून त्यांचे मन त्या अदृश्यपण सर्वव्यापी अशा विश्वनिर्माणकर्त्याशी सुसंवाद साधण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांच्या शिरावर किती अवाढव्य जबाबदाऱ्या येऊन पडणार आहेत यापासून ते बेसावध होते. या टप्प्यात जेव्हा



अल्लाहने आपला दिव्यबोध त्यांच्यावर अवतरला नव्हता तेव्हा अंतिम सत्याचे एखादे ओझरते दर्शन ते टिपत असत. पूर्णत: भानावर असताना नव्हे, तर खोल विचारात बुडवून स्वत:चे अस्तित्व विसरून आणि वर उल्लेख केलेल्या निसर्ग-चमत्काराशी तादात्म्य पावून आणि हृदय हेलावणाऱ्या निसर्गाच्या कानगोष्टी ऐकून. ते केवळ एक रहस्यमय व प्रेरणा देणारे ज्ञान होते, जे अनेकदा त्यांच्या अंतर्मनात येत असे. ते त्याचा आनंद घेत असत, परंतु त्याला काही नाव देऊ शकत नव्हते. तसेच इतरांनाही ते कळवू शकत नसत. ते सर्वकाही स्वप्नांच्या स्वरूपात असे. ती अशी स्वप्ने होती, ज्यात ईशरहस्य ओथंबलेले असे आणि मानवी बुध्दीच्या आकलन शक्तीच्या बाहेरचे होते. त्या अंतिम सत्याची काही ओझरती झलक त्यांना दिसून येत असे. अशी दृश्ये सत्याचा खोलवर ठाव घेणाऱ्या चिंतनाने व चंचल बुध्दीच्या अंदाजापासून अलिप्त असल्याने दिसून येते. ती सर्व ईशउज्ज्वलता होती आणि स्पष्टोच्चारक नसली तरी अत्यंत महत्त्वाची होती. खरे तर ती प्रत्यक्ष साक्षात्कारी प्रकटनांची प्रस्तावनाच होती. माननीय आएशा (रजि.) यांच्या कथनावरून या गोष्टीची नोंद झालेली आहे की प्रत्यक्ष ईशवाणीच्या प्रकटनापूर्वी पैगंबर मुहम्मद (स.) यांना पहाटे तांबडे फुटण्याच्या वेळी खरी दृश्ये (अल्-रूया-अल सादिक) दिसत असत.

मुहम्मद (स.) यांना मुळीच कल्पना नव्हती की अंतिम पैगंबर म्हणून त्यांची नियुक्ती अल्लाहकडून होणार होती. त्यांचे मन एखाद्या धार्मिक मोहिमेचा आराखडा तयार करीत होते, अशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सूचना व संकेत आढळत नाही. त्यांचे जीवन शांत व स्वाभाविकपणे अव्यक्त गूढतेत व्यतीत होते आणि त्यांच्यावर येणाऱ्या जबाबदारीबद्दल अनभिज्ञ होते. जे तोतये व फसवे लोक त्यांच्यापाशी आध्यात्मिक व पारमार्थिक जादू असल्याचा विचार करतात; ते त्यांच्या योजनेबरोबरच स्वत:चाही विश्वासघात करीत असतात. त्यांचा उमाळा व त्यांच्या हालचालीवरून स्पष्ट दिसून येत असते की त्यांच्या अंतर्मनात काहीतरी शिजत आहे. त्यांच्यापूढे काही साहसी कामगिरी आहे आणि ती पार पाडण्यासाठी त्यांना काही योजना तयार करायच्या आहेत, याची जाण त्यांना असते. किती उच्च व उन्नत पदावर आपणास नियुक्त करण्यात येणार आहे, याबद्दलची अनभिज्ञता व बेसावधपणा, हा पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या प्रांजळ व मोकळ्या मनाचा सर्वांत मोठा पुरावा आहे.

त्यांचे कसलेही शालेय शिक्षण झाले नव्हते. लेखन-पध्दत अरबस्तानात त्या काळी नुकतीच सुरू झाली होती, पैगंबर मुहम्मद (स.) यांना कधीही लिहिता येत नव्हते, ही गोष्ट खरी आहे. मक्का येथील वास्तव्यात आलेल्या अनुभवाचे जीवन हेच त्यांचे शिक्षण होते. जीवनाचा काही भाग शांतपणे व्यतीत करून झाल्यानंतर त्यांच्या खांद्यावर

एका महान संदेशाचा भार आकस्मितपणे वाहण्यास त्यांना सांगण्यात आले. या गोष्टीला पवित्र कुरआन खालील शब्दांत साक्ष देतो.

''तुम्ही या गोष्टीचे मुळीच पात्र नाहीत की तुम्हावर ग्रंथ अवतरला जाईल. हा तर केवळ तुमच्या पालनकर्त्याच्या कृपेने (तुमच्यावर अवतरला आहे) म्हणून तुम्ही अश्रद्धावंतांचे सहायक बनू नका.'' (दिव्य कुरआन, २८ : ८६)

रशीद रिझा याने वरील आयतीचा अर्थ खालीलप्रमाणे दिला आहे. पवित्र कुरआनचे तुम्हावर अवतरण करून सर्वशक्तिमान अल्लाहने अखिल मानवजातीवर आपली कृपा परिपूर्ण केली आहे. तुमच्या स्वत:च्या ज्ञानाच्या बळावर किंवा तुमच्या पुण्यशील आचरणांवर हे उन्नत पद तुम्हाला कधीही मिळाले नसते आणि तुम्हाला त्याची अभिलाषाही नव्हती. आपणाला पैगंबरत्व लाभणार आहे आणि अल्लाहकडून त्यांची निवड उच्च पदासाठी होणार आहे, अशी पुसटशीही कल्पणाही मुहम्मद (स.) यांना होती किंवा नव्हती, याबद्दल हदीसचे पूर्ण ज्ञानभंडार स्तब्ध आहे.

## कार्यासाठी तयारी

पैगंबर मुहम्मद (स.) यांना त्यांच्यावर सोपविण्यात येणाऱ्या महान कामगिरीची कल्पना नव्हती, तरी सर्वसाधारण माणसांप्रमाणे त्यांना वाढू दिले नव्हते. त्यांच्या जीवनाची व त्यांच्या सर्व कृत्यांची जडणघडण थेट अल्लाहने केली होती. अशा रीतीने भविष्यात त्यांच्यावर येऊन पडणाऱ्या खडतर कार्यासाठी त्यांची मानसिक व नैतिकदृष्ट्या तयारी करण्यात आली. एका पैगंबराला आवश्यक असणारी बुध्दीची व अंत:करणाची गुणवत्ता, सर्वशक्तिमान अल्लाहने अगदी आरंभापासूनच बहाल केली होती.

इब्न हिश्शामने संक्षिप्तपणे लिहिले आहे,

''पैगंबर मुहम्मद (स.) यांचा तरूणपणाचा काळ अल्लाहच्या थेट देखरेखीखाली गेला. अज्ञानकाळातील सर्व अपवित्र व घाणेरड्या सवयींपासून त्यांचे जीवन शुध्द होते, कारण त्यांना पैगंबरत्व बहाल करण्याची अल्लाहची इच्छा होती. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जीवन दयाळू व विनम्र, आचरणात संयम, क्षमाशीलता, सच्चेपणा व ईशनिष्ठेत परिपूर्ण होते. त्यांचे चारित्र्य निष्कलंक होते आणि त्यांच्या देशबांधवात ते 'अमीन' (विश्वासार्हता) म्हणून ख्याती पावलेले होते.''

खलीफा माननीय अली (रजि.) यांच्या निवेदनाच्या आधारे असे कथन केले जाते की पैगंबर मुहम्मद (स.) यांना एकदा विचारले गेले, ''तुम्ही मूर्तीची पूजा कधीतरी केली काय?'' पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उत्तर दिले, ''नाही.'' पुन्हा प्रश्न करण्यात आला, ''तुम्ही मद्याची चव कधी घेतली काय?'' पैगंबर मुहम्मद (स.) यांनी ठामपणे उत्तर



दिले, ''नाही.'' आणि पुढे म्हणाले, ''अशा सर्व कृत्यांकडे बेशरमपणाचे व 'कुफ्र'चे लक्षण म्हणून मी तिरस्काराने पाहिले आहे. पवित्र कुरआन माझ्यावर अवतरण्यापूर्वी आणि इमानची कल्पना नसतानाही ती कृत्ये कधी केली नाहीत.'' दुसऱ्या एका प्रसंगी पैगंबर म्हणाले, ''माझ्या जन्मापासूनच मी मूर्तीबद्दल आणि अश्लील कवितांबद्दल (शायरी) सखोल द्वेष व वैरभाव जोपासला आहे.''

इब्न इल-कय्यिमने त्याच्या सुप्रसिध्द 'जाद-अल मआद' या पुस्तकात या मुद्यावर बरेच विवरण केले आहे. तो म्हणतो,

''पैगंबरत्व ही काही अशी गोष्ट नाही, जी अर्जित करता येते. ती सर्वशक्तिमान अल्लाहकडूनच बहाल करण्यात येते; तरी अल्लाह त्याचे वाटप अगदी सरसकटपणे करतो, असे म्हणणे चुकीचे आहे. अल्लाहच्या योजनेनुसार पैगंबर मुहम्मद (स.) यांना वाढविले जाते, परंतु अद्वितीय व दुर्मिळ गुणवत्ता असलेल्या माणसांनाच या उच्च पदापर्यंत नेले जाते. या पदाला आवश्यक असणारी काही अंगभूत गुणवत्ता व सात्विकपणा पूर्वअट म्हणून पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या ठायी असावे लागते. पवित्र कुरआनमध्ये याची नोंद आहे की, अल्लाहची चिन्हे व निशाण्या कुरैश लोकांनी सतत पाहिल्या, परंतु इस्लामचा स्वीकार करण्यास ते तयार नव्हते. जेव्हा ते अल्लाहची निशाणी पाहात असत ते म्हणत की, अल्लाहच्या पैगंबरांना जे लाभले ते आम्हाला मिळे पर्यंत आम्ही इमान (श्रध्दा) धारण करणार नाही. यावर अल्लाहने फर्मावले, ''पैगंबरत्व कोणाला बहाल करावे, ही गोष्ट अल्लाह सर्वांत चांगले जाणतो.'' या आयतीने हा मुद्दा स्पष्ट होतो की सर्वसाधारण असणारा प्रत्येक माणूस ते उच्चपद मिळण्यास पात्र नसतो. अल्लाह ज्या कोणाला पात्र व लायक समजतो, त्यांनाच ते पद मिळते.''

## दिव्यप्रकाश येतो

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनाचे ते चाळीसावे वर्ष होते. एकदा रमजान महिन्यात हिराच्या गुहेत प्रार्थना व ध्यान-चिंतन करीत असताना, ईशबोधाचा दिव्य प्रकाश अकस्मात त्यांच्यावर आला. एका दैदिप्यमान ईशदुताने त्यांना निद्रावस्थेतून जागे केले. तीनदा एक भव्य स्वर त्यांच्या कानी पडला आणि तीन वेळा एका जबरदस्त पकडीने स्थिर राहण्यास त्यांना भाग पाडले. सुरूवातीला ते अगदी भांबावून गेले आणि काय करावे हे त्यांना समजेना, परंतु त्या ईशदूताने त्यांना जेंव्हा तिसरी हाक दिली, तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपल्या स्वामीचा संदेश स्वीकारला. ही अत्यंत महत्त्वपूर्ण घटना 'सही अल्-बुखारी'मध्ये खालीलप्रमाणे वर्णन केली गेली आहे.

''एकांतवासाच्या (खरे दृष्टींत होण्याचा) कालावधी संपल्यानंतर जो पैगंबर

मुहम्मद (स.) यांना फार आवडीचा झाला होता. पैगंबर मुहम्मद (स.) ‘हिरा’ गुहेत जाऊन काही रात्री ध्यानस्थ बसून मगच आपल्या कुटुंबात परत येत असत आणि त्यांच्या गरजा भागवून पुन्हा तशा संधीची प्रतिक्षा करीत असत. सरतेशेवटी अकस्मात तो ‘सत्य (ईशदूत जिब्रिल (अ.) ) त्यांच्यापाशी आला व म्हणाला, “वाच.” “मला वाचता येत नाही.” त्यांनी उत्तर दिले. त्या दूताने पुन्हा त्यांना घट्ट आवळून धरले आणि त्यांची पूर्ण दमछाक होईपर्यंत त्यांना सोडले नाही.

मग तो ईशदूत म्हणाला, “अल्लाहच्या नावाने वाच.” त्यांनी पुन्हा म्हटले, “मला वाचता येत नाही.” त्याने तिसऱ्यांदा त्यांना घट्ट धरले आणि सोडून म्हटले, “अल्लाहच्या नावाने वाच ज्याने रक्ताच्या गुठळीपासून माणसाची निर्मिती केली, कारण तुझा स्वामी मोठा उपकार करणारा आहे.” त्यावर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आयती तोंडाने उच्चारल्या. ते भयाने थरथर कापू लागले व त्या अवस्थेत ते त्यांची पत्नी माननीय खदीजा (रजि.) यांच्यापाशी घरी आले. माननीय खदीजा (रजि.) यांनी सांगितले, “अल्लाह तुम्हावर मानहानीचा कलंक कधीही येऊ देणार नाही. तुम्ही दुरावलेल्या आप्तसंबंधात एकोपा साधता तुम्ही दीन-दुबळ्यांचा भार उचलता, तुम्ही गरिबांच्या व गरजूंच्या अडचणी भागवता, तुम्ही पाहुण्यांचे आदरातिथ्य करीत असता आणि सत्याच्या मार्गाने जाताना येणारी संकटे झेलत असता.”

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर प्रकट झालेल्या दिव्यबोधातील काही आयतींची बारकाईने छानणी केल्यास असे दिसून येते की, ते काही पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या स्वत:च्या मनाने त्यांच्या मुखातून बाहेर पडलेले शब्द नसून तो ईशप्रकटीचा संदेश होता. पहिली गोष्ट अशी की अशा प्रकारच्या आध्यत्मिक अनुभवासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांचे स्वत:चे मन जर प्रयत्नशील असते, तर ईशदूताला पाहून त्यांचे काळीज भयाने धडधडले नसते. माणूस ज्याच्या प्रकट होण्याची प्रतीक्षा करतो, त्याच्याबद्दल आत्मभाव बाळगतो. ईशदूताचे आगंतुक येणे आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांना वाटलेली भीती, निर्णायकपणे हे सिध्द करते की त्यांचे मन कसल्याही प्रकारच्या भ्रमापासून किंवा चुकीपासून पूर्णपणे मुक्त होते. तो (ईशदूत जिब्रिल (अ.)) काही मन:कल्पित निर्मिती नव्हती. ते त्यांच्याकडे आलेली सज्जड वास्तवता होती. दुसरी गोष्ट अशी की ईशसंदेशाची भाषाशैली आणि पैगंबर बोलत असणारी भाषा, यामध्ये ठळक आणि लक्षणीय फरक होता. पवित्र कुरआनच्या भाषाशैलीत अद्‌भूत मधूर जुळणी होती, अभिव्यक्तीचा रेखीवपणा आणि विचार-सौंदर्य होते. शब्दांचा चपखल योजनेमुळे आणि यमक अनुभासयुक्त शब्दरचनेमुळे व अचूक शब्दप्रयोगामुळे आलेले आहे. तसेच ते आकर्षक विचार व कल्पनाविलासामुळे आले आहे. ती अद्‌भूत भाषाशैली अरबांना अपरिचित होती, इतकेच



नाही तर त्या काळी ज्ञात असलेल्या संपूर्ण जगालाही ती अपरिचितच होती. माणसाच्या लिखाणामध्ये इतका ओजस्वी प्रभाव आढळणे अशक्य आहे. मनाला इतका गोडवा देणारी, अंत:करण व आत्मा आकर्षुन घेणारी, सत्कर्मांचा हुकूम देणारी व कुकर्मांना सक्त मनाई करणारी, स्वर्गप्राप्तीसाठी झटण्याची अभिलाषा चेतविणारी आणि नरकाग्नीपासून स्वत:ला वाचविण्याची भयसूचना देणारी ही भाषा आणि तरीसुध्दा एका निरक्षर माणसाच्या तोंडी शक्य नाही.

तिसरी गोष्ट अशी की जर असे म्हटले जाते की पैगंबरांची सर्व उक्ती व कृती, त्या काळी सर्वत्र बोकाळलेल्या अनीतिमुळे, हिंसाचारामुळे त्यांचे मन व्यथित झाल्याच्या परिणामस्वरूप होती तर मग त्याचा अप्रत्यक्ष का होईना उल्लेख त्यांच्या पहिल्याच आयतीत झाला असता कारण त्या दुर्वर्तनामुळेच त्या काळाचा अरब समाज पोखरला गेला होता. त्या आयतीत अरब जनतेला उद्देशून आवाहन हवे होते की त्यांनी त्या सर्व कुप्रथांचा व वाईट सवयींचा त्याग करावा. तसेच त्या आयतीत त्यांच्या अंत:करणाची व्यथा प्रतिबिंबित व्हायला हवी होती. परंतु पवित्र कुरआनच्या पहिल्या आयतीमध्ये असे काहीही आढळत नाही. ते तर एक शांत गंभीर विधान आहे ज्याद्वारे पैगंबर मुहम्मद (स.) यांना वाचण्याचा आदेश देण्यात आला.

तसेच त्या काळी प्रचलित असणाऱ्या धर्ममतांपासून क्रांतिकारी फारकत करणारा तो पहिला संदेश होता. लोकांना अद्‌भूत पुराणकथांची सवय होती. जर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी स्वत:च त्या आयतींची रचना केली असती तर लोकांच्या अद्‌भूत चमत्कारांच्या उत्कंठेला पोषक अशी त्यांच्या मनात भय व आश्चर्य निर्माण करणारी काव्यरचना केली असती.

परंतु येथे तर आपणाला वेगळाच सूर आढळतो. धार्मिक नेत्याकडून त्या काळच्या जनसमूहाला जी अलौकिक व अद्‌भूत गुणवत्ता उत्कंठेने अपेक्षित होती, ती गुणवत्ता व सामर्थ्य आपणाकडे आहे, असा खोटा दावा करण्याऐवजी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्या काळच्या धर्मकलाविरूध्द, उदाहरणार्थ अंधानुकरण वगैरे, त्यांची मने गाफीलपणाच्या निद्रेतून जागृत करून माणसांना बाह्य विश्व आणि अंतर्मन यांचे दोषदर्शी अवलोकन व निरीक्षण करण्याचे आवाहन केले. पैगंबर मुहम्मद (स.) यांचा संदेश अनेक मूलभूत तत्त्वामध्ये अरबांच्या धार्मिक दृष्टिकोनाशी विसंगत व मेळ न बसणारा होता आणि त्या काळासाठी अधिक पुरोगामी व पुढारलेला होता. धर्मशक्तीकडे भयाच्या व चमत्काराच्या दृष्टीने पाहण्याचा अरबांचा कल होता आणि त्यांच्यात अलौकिक व अद्‌भूत सामर्थ्य असल्याचे त्यांचे मत होते.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जी काही शिकवण दिली, ती त्यांच्या काळच्या

सर्वसाधारण प्रस्थापित कलापेक्षा वेगळी होती. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे अद्वितीय स्थान असे होते की त्यांनी कसलेही अमानवी दैवी सामर्थ्य व अद्‌भूत चमत्काराची शक्ती आपल्याकडे असल्याचा दावा न करताच माणसांना प्रेरणा दिली. त्यांच्या उद्दिष्टांचा निखालस प्रांजळपणा हा याबद्दलचा सर्वांत मोठा पुरावा आहे.ज्या युगात धर्म म्हणजे केवळ माणसांच्या विवेकबुध्दीला गुंगी आणणारी गोष्ट होती, अशा काळात पुढे सरसावून लोकांना आपल्या मन-मस्तिष्काचा विकास करणारे गुण वृध्दिंगत करण्याचे आणि सर्व बाबी वैचारिक कसोटीवर पारखण्याचे आवाहन हे विलक्षण नव्हे काय? हे एक असे पाऊल होते, ज्यामुळे माणसांच्या धार्मिक दृष्टिकोनाची क्रांतिकारकपणे संपूर्ण दिशाच बदलली. पवित्र कुरआनमध्ये अशा कितीतरी 'आयती' आहेत, ज्या निर्णायकपणे हे सिध्द करतात की संदेश प्रकटीकरणातील शब्दरचना स्वत: पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या मनाची नाही. 'सूरह अबस'मधील पहिली ओळ उदाहरण म्हणून घ्या.

'' क्रोधिष्ट झाला आणि उपेक्षा केली,या गोष्टीवर की तो अंध त्याच्याजवळ आला.तुम्हाला काय कल्पना कदाचित तो सुधरेल '' (दिव्य कुरआन, ८० : १-३)

'सुरह तहरीम'ची आयत-

'' हे नबी (स.), तुम्ही का त्या वस्तूला निषिद्ध ठरविता जी अल्लाहने तुमच्यासाठी वैध केली आहे? (काय अशासाठी की) तुम्ही आपल्या पत्नीची मर्जी सांभाळू इच्छिता?''
(दिव्य कुरआन, ६६ : १)

'सुरह तौबा'ची आयत-

''हे पैगंबर (स.)! मग तुम्ही अशा लोकांसाठी क्षमेची याचना करा अथवा न करा, जर तुम्ही सत्तर वेळा देखील त्यांना क्षमा करण्याची विनवणी कराल तरी अल्लाह त्यांना कदापि क्षमा करणार नाही. '' (दिव्य कुरआन, ९ : ८०)

वरील आयती स्वच्छपणे हे दर्शवितात की, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या काही कृती अल्लाह पसंत पडल्या नाहीत. एखाद्या माणसाच्या मनावरच एखादी गोष्ट सोपविली, तर आपल्या कृत्याबद्दल नापसंतीचे कायमचे बोल त्यात त्याने राखले नसते. म्हणून पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर अवतरलेल्या संदेशाचे उगमस्थान अल्लाहच होय.

शेवटी दिव्यबोधाची खोटी रचना पैगंबर मुहम्मद (स.) यांनी स्वत:च केली असती, तर दिव्यबोध तीन वर्षांच्या खंडित कालावधीत जेव्हा अवतरलेच नाहीत, त्या काळात ते थांबलेच नसते. तो कालावधी अन्य कसल्या तयारीसाठी होता किंवा कसे, हा वेगळा प्रश्न असून येथे त्याबद्दलची चर्चा करण्याचे प्रयोजन नाही. महत्त्वाचा मुद्दा असा की स्वत:च्या प्रयत्नांनी आयतींची शब्दरचना एखाद्याला करण्यासाठी अशी तीन वर्षे



'थांबायचे आणि प्रतीक्षा करायचे' काही कारण नव्हते. खरे त्यामुळे त्यांच्या विरोधकांना व शत्रूंना उपहास व टर-टवाळी करण्याचे निमित्तच मिळाले. दिव्यबोध जर त्यांच्या मनाची प्रेरणा व सूचना असती, तर जेव्हा लोकांनी मागणी केली, तेव्हा ते मनाचा संदेश घेऊन येण्यास तयार झाले असते. पैगंबर मुहम्मद (स.) यांना या प्रदीर्घ कालावधीत दिव्यबोधाची अत्यंत उत्कंठेने ईशसंदेशाची वाट पाहावी लागली होती (फतराह). परंतु आकाशातून कसलाही प्रतिसाद मिळाला नाही. ही गोष्ट पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पैगंबर असण्याबद्दलचा अखंडणीय पुरावा आहे, ही बाब स्पष्टपणे प्रस्थापित करते की पैगंबर स्वत:च्या वतीने काही बोलतच नसत. पवित्र कुरआनमध्ये याचे भरपूर पुरावे उपलब्ध आहेत.

''तो आपल्या इच्छेने बोलत नाही, हा तर एक दिव्यबोध आहे जो त्याच्यावर अवतरला जातो.'' (दिव्य कुरआन, ५३ : ३-४)

ईशसंदेश अल्लाहच्याच संकेतानुसार जेव्हा पाठविला जाई, तेव्हाच तो संदेश ते लोकांना देत असत. स्वत:बद्दल अजाणतेपणीसुध्दा एक मानसिक प्रतिमा निर्माण करून व उघड करून केवळ दिखाऊपणे ईशसंदेश, असे म्हणून त्याचा प्रचार करणे वेगळे आणि काही क्षण एक अमानवी भव्य अस्तित्व पाहून आणि त्याने आणलेला निर्मात्याचा संदेश लक्षात आत्मसात करणे, ही वेगळी गोष्ट आहे. अंतरात्म्याला प्रगट करणाऱ्या या अंतस्थ चेतनेला पैगंबर आवाहन करीत. त्यांना जे काही दिसे व आकलन होई, ते त्यांच्या स्वत:च्या मनाच्या निर्मितीच्या स्वरूपात नव्हते. जे ज्ञान त्यांना प्राप्त होई ते त्या अमर्याद ईशदूताच्या अंत:करणाचा ठाव घेऊन नव्हे, तर त्या अमर्याद शक्तीचा प्रसाद लीनतेने स्वीकार केल्यामुळे होत असे.

अल्लाहकडून संदेश येण्याच्या स्थगितीचा कालावधी संपल्यांनतर पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पाशी ईशदूत जिब्रिल (अ.) पुन्हा प्रगट झाले आणि त्यांना ईशआज्ञा पोचविली. त्या संदेशाच्या सत्यतेबद्दल खात्री दिली आणि त्यांच्या लोकांत ती पोहाचविण्यास सांगितले.

त्यानंतर मात्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जाहीरपणे आपण अल्लाहचे पैगंबर आहोत, अखिल मानवजातीला अल्लाहच्या सत्यमार्गावर बोलविण्याचे कार्य त्यांच्यावर सोपविण्यात आले आहे. पैगंबर मुहम्मद (स.) पैगंबरांच्या मालिकेतील अंतिम पैगंबर आहेत. अखिल मानवजातीला संदेश देण्याचे त्यांचे कर्तव्य आहे; हे ठामपणे सांगायला सुरूवात केली. याबद्दलची पवित्र कुरआनमध्ये कित्येक आयतींनी पुष्टी दिली आहे.

''हे मुहम्मद (स.), आम्ही तुम्हाला लोकांसाठी पैगंबर बनवून पाठविले आहे आणि यासाठी अल्लाहची साक्ष पुरेशी आहे.'' (दिव्य कुरआन, ४ : ७९)

"हे मुहम्मद (स.) सांगा की, "हे मानवांनो, मी तुम्हा सर्वांकडे त्या अल्लाहचा पैगंबर आहे जो पृथ्वी व आकाशांच्या राज्यांचा स्वामी आहे."

(दिव्य कुरआन, ७ : १५८)

## धर्मप्रसार कार्य व त्याची मोहीम

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपल्या पवित्र प्रसारकार्याचा आरंभ स्वत:च्या घरापासून केला. माननीय खदीजा (रजि.) ही पहिली भाग्यवान व्यक्ती होती ज्यांना पैगंबरत्व लाभल्याची सुवार्ता सर्वप्रथम ऐकायला मिळाली आणि त्यांनी किंचितही किंतु अगर आशंका न दर्शविता जे काही स्वामीकडून लाभले आहे, ते त्रिवार सत्य असल्याची साक्ष दिली. इस्लाम धर्मात प्रवेश करणारी ती पहिली व्यक्ती होती, इस्लामसाठी पतीसह संकटांना सामोरे जाणारी पहिली व्यक्ती होती. त्यानंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांचे चुलतभाऊ अली (रजि.) जे लाहनपणापासून त्यांच्यासमवेत राहत होते त्यांनी इस्लामचा स्वीकार केला. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे मानलेले पुत्र व जिवलग मित्र हारिस यांचा मुलगा माननीय जैद (रजि.) हे सुरूवातीला इस्लामचा स्वीकार करणाऱ्यापैकी एक होत. माननीय खदीजा (रजि.), माननीय अली (रजि.) व माननीय जैद (रजि.) हे सर्व पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कुटुंबियांपैकी होते, म्हणून ते अत्यंत निकटचे होते.

पैगंबर मुहम्मद (स.) जेव्हा आपल्या निवास्थानाच्या चार भिंतींच्या बाहेर पाऊल टाकले, तेव्हा मुहम्मद (स.) यांच्या हाकेला साद देणारी कुरैशी घराण्यातील प्रसिध्द व्यक्ती माननीय अबू बकर (रजि.) हे होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या मित्रगणांत हे मानले गेले की इस्लामचा स्वीकार करणारे माननीय अबू बकर (रजि.) हे पहिले होते. पैगंबरांशी कित्येक वर्षे त्यांचा अत्यंत निकटचा संबंध होता. या निकट संबंधामुळेच पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कथनातील थोरवी व सत्यता त्यांना पटली आणि शेवटी ते अल्लाहचे पैगंबर असल्याची त्यांनी ग्वाही दिली. एकदा आदरणीय पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले.

"मी ज्यांना ज्यांना इस्लाममध्ये येण्याचे आवाहन केले त्यांपैकी प्रत्येकाने किंचितसा का असेना किंतु व आशंका दर्शविली होती, परंतु माननीय अबू बकर (रजि.) याला एकमेव अपवाद होते. मी माननीय अबू बकर (रजि.) यांना जेव्हा इस्लाममध्ये येण्याचे सांगितले, तेव्हा किंचितही अनमान न करता त्यांनी त्वरीत स्वीकार केला."

माननीय अबू बकर (रजि.) यांच्या रूपाने एक 'महान नेत्याचा महान अनुयायी' यापेक्षा अधिक चांगले उदाहरण जगात कोठेही सापडत नाही. ते धनवान होते, उदार मन, शांत, सात्त्विक आणि निश्चयी स्वभाव ही त्यांची गुणवैशिष्ट्ये होती. त्यांनी



इस्लामची व पैगंबर मुहम्मद (स.) यांची अत्यंत मोलाची सेवा केली. त्यासारखे उदाहरण मानवी इतिहासात अन्य कोठेही आढळत नाही. इस्लामचा स्वीकार केल्यादिवसापासून त्यांनी आपला सर्व वेळ व शक्ती आणि आपली सारी धन-दौलत इस्लामच्या ईशश्रध्देच्या प्रचार-प्रसारासाठी वाहिली. त्या दिवसापासून त्यांच्या मनात एकच गोष्ट सदासर्वदा घोळत असे, ती म्हणजे आपल्या गुरूकडून मिळालेल्या संदेशाचा प्रचार करणे. त्यांचे योग्यताप्राप्त गुरू त्यांना जे सांगत, ते सर्व यथासांगपणे ते करीत असत. ते माणसांना इस्लाममध्ये येण्याचे आवाहन करीत. जे गुलाम इस्लामचा स्वीकार करीत त्यांचा अनन्वित छळ करण्यात येई. अशा दुर्दैवी लोकांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी ते आपले धन मुक्त हाताने खर्च करीत असत. संपूर्ण हयातभर माननीय अबू बकर (रजि.) पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावरील त्यांचे नितांत प्रेम व अढळ विश्वास तसूभरही कमी पडला नाही.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या निधनानंतर श्रध्दावानांचे सेनाधिकारी म्हणून त्यांची जेव्हा निवड झाली तेव्हा माननीय अबू बकर (रजि.) यांनी आपल्या सैन्याची नीट रचना केली. ईशसंदेशाच्या प्रसारासाठी ते अत्यंत तळमळीने व उत्साहाने बाहेर पडले. इस्लामी तत्त्वांचे संरक्षण सर्व शक्ती पणाला लावून त्यांनी केले. त्याला अपकर्ष, मानहानी व कलंकित होण्यापासून वाचविले. नुकतेच वाढीस लागलेल्या इस्लामी समाजाचा एकोपा टिकविला आणि तो एकोपा फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या शत्रूंना दडपून टाकले. याशिवाय दूरदूरच्या देशात, जेथे इस्लामचा संदेश तोवर पोहोचला नव्हता, तेथे पोहोचविण्याची त्यांनी व्यवस्था केली.

सुरूवातीला इस्लाम धर्माचा स्वीकार करणारे लोक हे पैगंबर मुहम्मद (स.) यांचे निकटवर्ती आणि त्यांच्याशी सान्निध्य असणारे होते. त्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांना अगदी जवळून पाहिले होते, ते चांगल्या रीतीने जाणत होते. पैगंबराच्या आचरणातील त्रुटी त्यांच्या नजरेतून सुटल्या नसत्या आणि दांभिकतेचा बुरखा पांघरून जर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी तसा प्रयत्न केला असता, तर तेसुध्दा त्यांच्या तीक्ष्ण नजरेतून खरे स्वरूप बाहेर पडल्यावाचून राहिले नसते हे महत्त्वाचे आहे.

विलियम मूर लिहितो,

"मुद्दा पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या प्रामाणिकतेला पुष्टी देणारा आहे की प्रारंभीच्या काळात ज्या लोकांनी इस्लाम धर्म स्वीकारला, ती सर्व माणसे सरळ स्वभावाची, प्रामाणिक व सच्ची होती. इतकेच नव्हे, तर ते त्यांचे जिवलग मित्र आणि त्यांचे कुटुंबिय होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे खाजगी जीवन ते चांगले जाणत होते. फसवणूक करणारा दांभिक जसे बाहेर एक बोलत असतो आणि स्वत:च्या घरात त्याचे आचरण

वेगळेच असते, तशा प्रकारच्या उणिवा जर असत्या तर या निकटवर्तीयांच्या नजरेतून त्या नक्कीच सुटल्या नसत्या.''

स्टॅन्ले लेनपूल पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या यशाच्या बाबीने फार प्रभावित झाला होता. तो लिहितो,

''त्यांचे अत्यंत निकटचे नातेवाईक आणि जे त्यांच्या घरात राहिले त्यांनीच सर्वप्रथम इस्लामवर श्रध्दा आणली व तेच सर्वाधिक खंदे पुरस्कर्ते बनले. या वास्तव घटनांच्या महत्त्वाची फाजील किंमत करणे शक्य नाही. पैगंबर मुहम्मद (स.) यांना त्यांच्या स्वत:च्या घरातच जो आदर होता, त्यापेक्षा अधिक मोठा पुरावा त्यांचा प्रामाणिकपणा सिध्द करण्यासाठी गरजेचा नाही.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांचा प्रांजळपणा, त्यांची कार्यनिष्ठा, ध्येयाबद्दलचा त्यांचा जोम व उत्साह, तसेच त्यांचा गाढ विश्वास बाळगणारे, उच्च चारित्र्याचे त्यांचे एकनिष्ठ अनुयायी आणि इस्लामी श्रध्दा त्यांनी स्वीकारल्यामुळे होणारा छळ शांतपणे सोसण्याची त्यांच्या मनाची तयारी पाहून; अनुयायांचा एक छोटासा समूह त्यांच्याकडे आकर्षित होऊ लागला होता. त्यांच्यात उल्लेखनिय माननीय उस्मान बिन अफ्फान, जुबैर बिन अबि अल्-अव्वाम, अब्दुल रहेमान बिन औफ, तलहा बिन उबैदुल्लाह, सआद बिन वक्कास, अरकाम बिन अरकम, उबैद बिन हारिस, सईद बिन जैद, अम्र बिन नुफैल व त्यांची पत्नी फातिमा- अल-खत्ताबची कन्या (उमरची बहीण), अबू बकरची कन्या असमा, अब्दुल्लाह बिन मसऊद, जाफर बिन अबू तालिब आणि इतर प्रतिष्ठित माणसे होती.

अशी नि:स्वार्थ व निष्ठावान अनुयायी मंडळी त्यांच्या भोवती गोळा झाल्यावर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी पुढचे पाऊल उचलले. आतापर्यंत त्यांनी दिलेल्या सिध्दांतांच्या शिकवणीत नवीन असे काही नव्हते. ते एखाद्या नवीन धर्माची शिकवण देणारे संदेष्टे नव्हते तर ते जुन्याच श्रद्धेचे पुनरूज्जीवन व पुन:प्रस्थापना करीत होते; जिची शिकवण आदरणीय आदम, नूह, मूसा व इसा (अ.) आणि अल्लाहच्या अन्य सर्वच पैगंबरांनी दिली होती.

म्हणून ते काही नवीन धर्माचे संस्थापक नव्हते, तर तीच पताका त्यांनी धारण केली होती जी एकेकाळी सर्व अरबांची होती. परंतु पुढे या पताकेच्या खऱ्या अंतिम उद्दिष्टांचा त्यांना विसर पडला होता. मूर्तीपूजा आणि अंधश्रध्दा, यामुळे ती मूळधारणा झाकोळून गेली होती, ती वाढत वाढत गेली. विशुध्दपणे केवळ एकमेव अल्लाहचीच उपासना, ज्यासाठी थोर धर्माधिकारी पुरूष पैगंबर इब्राहीम (अ.) यांनी पवित्र काबागृहाची उभारणी केली होती; ती जवळजवळ संपुष्टात आली होती.



## राष्ट्राला हाक

पहिल्या तीन वर्षाच्या कालावधीत, त्यांच्या कुटुंबियांचा, निकटच्या मित्रांचा आणि मोजक्या अन्य माणसांचा समावेश असणाऱ्या छोट्याशा वर्तुळातच शिकवण देण्यावर मुहम्मद (स.) यांनी संतोष मानला. आता आपल्या स्वामीची श्रध्दा उघडपणे प्रचार व प्रसार करण्याची वेळ आली होती. ईशदूत जिब्रिलने आणखी एक ईश-आज्ञा आणून पोचविली होती, तीनुसार पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्या मिळालेल्या आज्ञांची जाहीर घोषणा करण्याचे व मूर्तिपूजकापासून अलिप्त राहण्याचे म्हटले होते,

''तुमच्यातर्फे आम्ही त्या चेष्टा करणाऱ्यांचा समाचार घेण्यास पुरेसे आहोत,जे अल्लाहबरोबर अन्य इतरांना देखील ईश्वर ठरवितात, लवकरच त्यांना माहीत होईल. आम्हाला माहीत आहे ज्या गोष्टी हे तुमच्यावर रचतात, त्यामुळे तुमचे अंत:करण दु:खी होत आहे.'' (दिव्य कुरआन, १५ : ९५-९७)

''आपल्या निकटतम नातेवाईकांना भय दाखवा. आणि श्रद्धावंतांपैकी जे लोक तुमचे अनुकरण करतील, त्यांच्याशी आदरभावाने वागा. परंतु जर त्यांनी तुमची अवज्ञा केली तर त्यांना सांगा की, जे काही तुम्ही करीत आहात त्या जबाबदारीपासून मी मुक्त आहे.'' (दिव्य कुरआन, २६ : २१४ - २१६)

या आज्ञांच्या पालनाखातर मुहम्मद (स.) यांनी आपल्या सर्व आप्तेष्टांना व भाऊबंदाना अल्-सफा या छोट्याशा डोंगराच्या पायथ्याशी गोळा होण्यास सांगितले. त्या डोंगराच्या माथ्यावर स्वत: उभे राहून प्रश्नार्थक मुद्रेने पाहात असलेल्या सर्व स्त्री-पुरूषांवर दृष्टिक्षेप टाकला व म्हणाले-''अहो कुरैशी घराण्याच्या लोकांनो! मी सांगितले की या डोंगराच्या दुसऱ्या बाजूने एक भलेमोठे सैन्य तुमच्यावर चाल करून येत आहे, तर तुम्ही विश्वास ठेवाल काय?''

प्रत्येकाने प्रतिसाद दिला, ''होय, तुम्ही आम्हाला नेहमी सत्यवचनी असल्याचे आढळले आहे.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपली मान तुकविली. मग आवाज उंचावून ते सांगू लागले, ''मी तुम्हाला भय-सूचना देणारा म्हणून आलो आहे आणि माझी ताकीद जर तुम्ही मानली नाही, तर अल्लाहकडून शिक्षा तुमच्यावर कोसळेल. हे बनू अब्दुल मुत्तलिब! हे बनू अब्दे मुनाफ! हे बनू जहराह! अल्लाहने मला आज्ञा केली आहे की मी तुम्हाला भय-सूचना देऊन सावध करावे, माझ्या भाऊबंदांनो! मी या जगातही तुमचे रक्षण करू शकणार नाही पारलौकिक जीवनातही तुम्हाला तोपर्यंत वाचवू शकणार नाही; जोपर्यंत 'अल्लाहखेरीज अन्य कोणीही उपासणेस पात्र नाही.' ही श्रध्दा तुम्ही स्वीकारत

नाही.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांचा चुलता अबू लहब त्यांचे बोलणे मध्येच तोडीत उर्मटपणे ओरडला, ''हे सांगण्यासाठीच तुम्ही आम्हाला येथे बोलविले होते काय?''

पैगंबर मुहम्मद (स.) यांना निराशा झाली नाही. त्यांनी अब्दुल मुत्तलिबच्या परिवारातील भाऊबंदांना नंतर भोजनाच्या निमित्ताने बोलाविले होते आणि भोजनाचा कार्यक्रम उरकल्यानंतर आपला गांभीर्यपूर्ण संदेश देण्याचा त्यांचा मानस होता. तसा पहिला प्रयत्न अबू लहबने उधळून लावला. पण दुसऱ्या वेळी तसा प्रयत्न केला तेव्हा त्यांना बरेच श्रोते मिळाले. तेव्हा त्यांनी थोडक्यात पण संयुक्तिकपणे आपले भाषण केले व प्रतिसाद मिळविला व काय पणास लागले आहे हे विशद करून सांगितले. ते म्हणाले,

''सबंध अरब भूमीत एकही असा माणूस मी जाणत नाही जो तुमच्यासमोर यापेक्षा अधिक चांगली गोष्ट ठेऊ शकतो, जी तुमच्यासमोर मी आता ठेवणार आहे. मी तुमच्यासमोर या जगातील सुख व समाधान तसेच नंतरच्या जीवनातील सुख-समाधानाची बाब ठेऊ इच्छितो.''

आपल्या भाऊबंदांची मूर्तीपूजेची खोडी तोडण्यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अत्यंत त्रासदायक व खडतर कष्टाची तीन वर्षे काढली. पण प्रत्यक्षात यश त्यांच्या हाती पडले नाही. एक गोष्ट उल्लेख करण्यासारखी आहे की या बहूदेववादी समाजामध्येही 'हूनफा' नावाने (सरळमार्गी) ओळखले जाणारे काही लोक होते, जे आदरणीय इब्राहीम (अ.) यांच्या मूळधर्माच्या शोधार्थ बाहेर पडले होते, ते ओळखले गेले. ही गोष्ट हे दर्शविते की, एकेश्वरत्वाची धारणा माणसाच्या मूळ स्वभावातच आहे व मूर्तीपूजेच्या कल्पनेने ती कधी कधी झाकोळून गेली असली तरी ती संपूर्णपणे लोकांच्या अंत:करणापासून कधीही लोप पावली नाही, ही गोष्ट नैसर्गिक आहे. माणूस हा स्वभावानेच एकेश्वरवादी आहे. भ्रष्ट वातावरणाचा प्रभावच त्याला खऱ्या श्रध्देच्या मार्गावरून भटकवितो. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी याचा सारांश त्यांच्या एका प्रसिध्द सुवचनात संक्षिप्तपणे असा दिला आहे,

''प्रत्येक मूल निसर्गाशी एकनिष्ठ जन्म घेत असते, परंतु त्याचे आई-बाप त्याला ख्रिश्चन, ज्यू अगर अग्निपूजक बनवित असतात. अरब समाजावर त्या काळी पसरलेल्या काळोखामध्ये माननीय अबू बकर, उस्मान बिन बजऊन, अबू जर गफ्फारी, आदींसारखे उज्ज्वल तारे ज्यांनी तोपर्यंत अरबस्तानच्या भटक्या समाजाला मार्गदर्शन केले होते; ठायी ठायी विखुरलेले होते. ती सर्व थोर माणसे पापभीरू होती आणि त्या काळी समाजामध्ये सर्रास फोफवलेल्या अनिष्ट सवयींपासून पूर्णत: अलिप्त होते. त्यांची आध्यात्मिक तृष्णा शमविणाऱ्या एखाद्या धर्मश्रध्देची ते उत्स्फूर्तपणे चातकासारखी वाटच पाहात होते.''



## आरंभी मुस्लिम झालेले

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या श्रध्देकडे सर्वप्रथम आकर्षित होणाऱ्यांमध्ये अशी माणसे होती, जी 'अल्लाह एकच आहे' या गोष्टीवर अटळ विश्वास बाळगत होती. एकेश्वरत्वाची कल्पना जरी त्यांना ज्ञात नव्हती, जी इस्लामने पुढे मांडली होती; तरीसुध्दा त्यांच्यामध्ये सदाचाराची ठिणगी दिसून येत असे. पुढे मोठी वाढ होऊन ज्वालेत रूपांतरित होणे शक्य होते. जैद बिन अम्र चा मुलगा सईद हा पैगंबर मुहम्मद (स.) यांचा अत्यंत एकनिष्ठ व विश्वासू अनुयायी बनला, तो याच समूहापैकी होता.

काही माणसांचा समूह वास्तवत: घराणेशाहीच्या बाहेरचा होता, तरी नावाला का होईना कोणत्यातरी एका घराण्याशी त्यांचा संबंध होता. त्या त्या घराण्यांनी त्यांचा संबंध महत्त्वाचा मानला नाही अथवा त्यांना घराण्याचे रक्षण देण्यास ते घराणे स्वत:ला दुर्बल समजत असे आणि उद्दाम अत्याचारी लोकांपासून त्यांचे संरक्षण करण्यास असमर्थ होते. ही माणसे गर्विष्ट कुरैश लोकांपेक्षा शारीरिक दृष्टीने अगर बुध्दीने काही कमी नव्हते, परंतु दुर्दैवाने त्यांच्या पाठीशी घराण्याचे भक्कम पाठबळ नव्हते. त्यांना सत्ता व प्रतिष्ठा लाभली नव्हती. त्यांच्यात माननीय अम्मार, अबू फुकैहा सुहैब (रजि.) चा समावेश होता. या निष्पाप माणसांची वेळी अवेळी टर टवाळी व टिंगल केली जात असे. त्या लोकांचा उल्लेख करून कुरैशी धनदांडगे तुच्छेतेने व उपहासाने पैगंबर मुहम्मद (स.) यांना प्रश्न करीत असत- ''आम्हा लोकांत केवळ या माणसांनांच अल्लाहचा कृपाप्रसाद लाभला आहे काय?''

आणखी थोडेसे लोक मुस्लिमांपैकी होते, ज्यांना कुरआनच्या शब्दात 'मुस्तदअफीन' (पद्दलित) म्हटले गेले. इब्न साद त्यांचे विश्लेषण असे करतो, ''ज्यांना घराण्याचे भक्कम पाठबळ रक्षणासाठी नाही.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हाकेला ज्या स्थितीच्या लोकांनी प्रतिसाद दिला, त्यांना दिल्या गेलेल्या वागणुकीचे आपण थोडे सखोल अवलोकन करू या. तसेच मक्कावासियांनी पैगंबरांशी कशा प्रकारचे वर्तन केले आणि तशा वर्तनाची कारणे आपण पाहू या.

प्रारंभीच्या काळात मक्का शहरातील प्रतिष्ठितांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांची आणि त्यांच्या शिकवणीची काही फिकीर केली नाही. ते अनाथ असल्याने, त्यांच्यात यश मिळविण्या इतकी क्रांतिकारक शक्ती व बळ असणार नाही असे त्यांना वाटले. त्यांना ते अतिउत्साही वेडे समजत होते. परंतु काही दिवसातच बेपर्वाईचे रूपांतर सक्रिय विरोधात झाले. त्यांच्या चळवळीचा वाढता जोर पाहून त्यांना चिंता वाटू लागली, या वाढत्या लाटेला थोपविण्यासाठी ते एकत्र आले आणि मोर्चेबांधणी करू लागले. पैगंबर

मुहम्मद (स.) यांच्या पैगंबरत्वाची तीन-चार वर्षे लोटल्यानंतर मात्र त्यांच्या विरूध्द एक भक्कम आघाडी उभी करण्यात आली. पहिल्याप्रथम त्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांचे चुलते अबू तालीब यांची भेट घेऊन त्यांच्या पुतण्याने निर्माण केलेली संपूर्ण परिस्थिती त्यांच्या कानावर घातली. ते म्हणाले, ''हे अबू तालीब! तुमचा पुतण्या आमच्या दैवतांना दुषणे देतो, आमच्या जीवनपध्दतीला नावे ठेवतो, आमच्या धर्माची कुचेष्टा करतो आणि आमच्या पूर्वजांची नालस्ती करतो. म्हणून तुम्ही तरी त्याचा बंदोबस्त करा किंवा आम्हाला त्याच्यापर्यंत पोहोचू द्या. कारण त्याच्या विरोधात तुमचे व आमचे स्थान सारखेच आहे. आम्ही त्याच्यापासून तुम्हाला मुक्त करतो.'' अबू तालीबने शांतपणे व नम्रतेने उत्तर देऊन त्यांचा राग घालविण्याचा प्रयत्न केला.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपले प्रचारकार्य पुढे चालूच ठेवले आणि ईशधर्माकडे येण्याची हाक लोकांना देत राहिले. कुरैशच्या लोकांचा संताप वाढला आणि दुसऱ्यांदा त्यांनी अबू तालीबची गाठ घेतली आणि निक्षुन सांगितले की त्यांनी त्यांच्या पुतण्याच्या कार्याला त्वरित बंदी करावी. जर ते तसेच अनिर्बंधपणे चालू ठेवले तर कुरैशांच्या कट्टर शत्रुत्वांमध्ये ते गुरफटले जातील. आपल्याच लोकांपासून दुरावण्याचा आणि त्यांच्याशी शत्रुत्वाच्या कल्पनेने अबू तालीबचे मन खट्ट झाले. परंतु पैगंबर मुहम्मद (स.) यांनाही ते सोडून जाऊ शकत नव्हते. त्यांनी पुतण्याला बोलावून घेतले व लोक काय म्हणतात ते सांगितले. ते म्हणाले, ''माझी व तुझी स्वत:ची गैरसोय करून अडचणीत टाकू नकोस. माझ्या सहनशक्तीपेक्षा जास्त भार माझ्यावर टाकू नकोस.''

यावर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उत्तर दिले, ''अहो काका! अल्लाहशपथ! त्या लोकांनी माझ्या उजव्या हातावर सूर्य आणि डाव्या हातावर चंद्र जरी ठेवले आणि सांगितले तरी अल्लाहने मला यशस्वी करेपर्यंत अथवा मी नष्ट होऊन जाईपर्यंत हा मार्ग मी कदापिही सोडणार नाही. मी तो मार्ग मुळीच सोडणार नाही.''

इतके बोलून पैगंबर मुहम्मद (स.) उभे राहिले आणि जाऊ लागले. तेव्हा अबू तालिब यांनी त्यांना परत बोलाविले व सांगितले, ''पुतण्या,परत ये.''

ते परत आल्यावर म्हणाले, ''जा तुझ्या मर्जीनुसार प्रचार कर, अल्लाह शपथ मी तुला कधीही वाऱ्यावर सोडणार नाही.''

कुरैशच्या लोकांनी जेव्हा पाहिले की अबू तालीबनी त्यांच्या मागणीकडे मान तुकवायला नकार दिला आणि त्यांना रक्षण देण्याचाच त्यांनी निश्चय केला तेव्हा त्यांनी स्वत:च पैगंबर मुहम्मद (स.) यांची व त्यांच्या सोबत्यांची छळणूक करण्याच्या योजना तयार केल्या व संघटितपणे तशी मोहीम आखली. कुरैशांच्या अत्यंत आदराचे स्थान



असलेल्या काबागृहापासूनच मोहीमेची सुरूवात करण्यात आली. ते त्यांचे धर्मस्थळ होते. त्यांच्या निष्ठेचा केंद्रबिंदू होता आणि त्यांच्या बहुदेववादी मूर्तीश्रध्देचाही केंद्रबिंदू होता. म्हणून इस्लामच्या वाढत्या प्रभावापासून कोणतीही किंमत देऊन रक्षण करण्याचा त्यांनी चंग बांधला.

दुसऱ्या बाजूचे चित्र असे होते की अल्लाहच्या त्या पवित्र गृहाला मूर्तीपूजेपासून स्वच्छ करण्याची पैगंबर मुहम्मद (स.) यांची अंत:करणात प्रखर इच्छा धगधगत होती. असे म्हटले जाते की एकदा पैगंबर काबागृहात गेले आणि लोकांना एकमेव अल्लाहकडे येण्याची हाक दिली. अचानक मोठा हलकल्लोळ उडाला आणि लोक चहूकडून त्यांच्यावर तुटून पडले. हारिस इब्न अबि हालाह धावत आले आणि त्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांचा जीव वाचविला. कडाक्याचे भांडण जुंपले. तलवारीचा एक घाव थोर हारिसच्या मस्तकावर बसला. ते गतप्राण होऊन जमिनीवर कोसळले. इस्लामखातर आपले प्राण वेचणारे ते पहिले हुतात्मे होते.

## छळणूक

प्रत्येक प्रसंगी मुहम्मद (स.) यांचा उपहास केला जाई. कधी कधी दुष्टजन रस्त्यात गोळा होत आणि पैगंबराकडे बोटे दाखवून म्हणत, ''तो पाहा. अब्दुल मुत्तलिबच्या संततीपैकी, केवळ स्वर्गलोकाबद्दल बोलणार माणूस जात आहे.''

त्यांच्यावर घाण टाकली जाई. एकदा काबागृहात प्रार्थना करीत असताना अबी मुईतचा मुलगा उकबाने आपल्या अंगावरील चादर पिळून दोरीसारखी गुंडाळी केली आणि ती पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या मानेभोवती टाकून त्यांचा गळा आवळण्याचा प्रयत्न करू लागला. जेव्हा पैगंबर प्रार्थनेत आपले कपाळ जमिनीवर टेकू लागत तेव्हा तो बळाने मागे ओढून धरी. तरी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी शांतपणे आपली नमाज चालू ठेवली. तेवढ्यात माननीय अबू बकर (रजि.) त्या ठिकाणी आले. त्यांनी उकबाला मागे खेचले आणि उद्गारले, ''तू एका व्यक्तीचा प्राण केवळ एवढ्यासाठी घेत आहेस की ती व्यक्ती असे म्हणते की अल्लाहच माझा स्वामी आहे आणि तुमच्यासाठी ती व्यक्ती स्पष्ट निशाण्या घेऊन आली आहे.''

तारिक इब्न अब्दुल्लाह अल मुहारिबीच्या आधाराने असे म्हटले जाते की, एकदा आपल्या प्रचारात पैगंबर मुहम्मद (स.) सांगत होते, ''अल्लाहखेरीज कोणीही ईश्वर नाही.''

तेव्हा एक माणूस त्यांच्या मागे चालत गेला आणि निर्दयीपणे त्याने दगडधोंडे त्यांना फेकून मारले. पैगंबरांचा रक्तस्राव होऊ लागला. तेव्हा तो दृष्टात्मा ओरडू लागला,

''लोकांनो! सावध राहा, हा माणूस खोटारडा आहे.''

ही गोष्ट नोंदलेली आहे की पैगंबरांचा कट्टर वैरी असलेला त्यांचा चुलता अबू जहल यांने त्यांच्या डोक्यात माती घातली आणि ओरडून म्हणाला, ''लोकहो! याच्या शब्दाला फसू नका. हा माणूस इच्छितो की तुम्ही 'लात' व 'उज्जा' यांची पूजाअर्चा सोडून द्यावी.'' इतके झाल्यावरही पैगंबरांनी त्याच्या बोलण्याकडे लक्ष दिले नाही.

उस्मान बिन अफ्फानचे कथन आहे, एकदा पवित्र काबागृहाला प्रदक्षिणा घालताना मी पैगंबरांना पाहिले. टवाळखोरांचे एक टोळके अबू जहलच्या नेतृत्वाखाली तेथे बसले होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या परिक्रमेची प्रत्येक फेरी पुरी होऊन त्यांच्या समोरून जाताना त्यांची कुचेष्टा व कुत्सित उद्‌गार त्यांनी काढले. पैगंबर मुहम्मद (स.) तेथेच थांबले. त्यांच्या चेहऱ्यांचा रंग बदलला आणि ते निर्धारपूर्वक म्हणाले, ''तुम्ही असली अपकृत्ये करण्याचे कधीही सोडणार नाही.'' उस्मान आणखी पुढे कथन करतात, असे होताच सर्वजण भयाने थरारले. मग पैगंबर मुहम्मद (स.) काबागृहाबाहेर पडले. आम्हीही त्यांच्या पाठोपाठ गेलो. रस्त्याने जाताना पैगंबर उद्‌गारले, ''मी तुम्हाला बातमी देतो की अल्लाह त्याच्या श्रध्देला नक्कीच वर्चस्व प्रदान करील, आपले वचन पूर्ण करील आणि आपल्या 'दीन' चे (धर्माचे) रक्षण करील. आज जे तुम्हाला बलवान दिसतात, ते तुमच्या हातून मारले जातील.'' उस्मान पुढे म्हणतात, अल्लाहची शपथ, आम्ही आमच्या डोळ्यांनी हे पाहिले की अल्लाहने त्यांचा नाश आमच्या हातांनीच केला.

एकदा काबागृहात प्रार्थना करताना पैगंबर आपले कपाळ जमिनीवर टेकलेल्या अवस्थेत असताना, अबू जहलने आपल्या मित्रांकरवी सांडणीचा घाणयुक्त कोथळा आणून तो त्यांच्या पाठीवर टाकण्यास सांगितले. दुष्ट व अभागी उकबा हे लांच्छनीय काम करायला धावला. दुर्गंधीयुक्त घाण पाठीवर टाकताच त्या अश्रद्ध धर्मनिंदकांमध्ये हास्याचा मोठा कल्लोळ माजला. दरम्यान पैगंबर मुहम्मद (स.) यांची सुकन्या फातिमा (रजि.) ज्यांचे वय जेमतेम चार-पाच वर्षे होते, तेथून जात होत्या, त्यांनी पित्याच्या पाठीवरची सर्व घाण काढून टाकली व साफ केली. पैगंबर मुहम्मद (स.) यांची त्या माणसांवर विशेषत: अबू जहल, उकबा बिन रबीआह, शैबा इब्ने रबीआह, वलीद बिन उतबाह, उमैया इब्ने खल्लफ आणि उकबाह इब्ने अबी मुऐत यांच्यावर अल्लाहचा प्रकोप कोसळण्याचा शाप दिला. 'सही बुखारी' मध्ये या गोष्टीची नोंद आहे की, यापैकी बहुतेकजण 'बदर'च्या लढाईत मारले गेले. एकदा दु:खाने कळकळून पैगंबर मुहम्मद (स.) यांनी म्हटले, ''मी सर्वांत दुष्ट अशा दोन शत्रूंसमवेत राहिलो, त्यांपैकी एक अबू लहब आणि दुसरा अकबाह इब्ने अबी मुऐत होता. ते दोघेही माझ्या दारावर घाण टाकीत असत.''



## ताइफचा दौरा

पाषाणहृदयी मक्कावासियांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांचे आपले लक्ष ताइफकडे वळविण्यास भाग पाडले. तेथे तरी त्यांच्या हाकेला प्रतिसाद मिळेल अशी पैगंबर मुहम्मद (स.) यांना आशा वाटली. गुलामगिरीतून मुक्त केलेल्या जैद या सोबत्यासह ते तेथे पोहोचले. तेथे प्रतिष्ठित असलेल्या उम्मैर कुटुंबापाशी गेले. तेथे पैगंबर मुहम्मद (स.) यांचे म्हणणे कोणीही ऐकून घेतले नाही म्हणून त्यांना खेद झाला. दहा दिवस त्यांनी तेथे वास्तव्य केले आणि कित्येकजणांना त्यांनी आपला संदेश कळविला, पण सर्वच व्यर्थ. या आगंतुक नावडत्या पाहुण्याने तेथून लवकर निघून जावे, म्हणून तेथील लोकांत चलबिचल सुरू झाली. त्यांना पळून जाण्यास भाग पाडण्यासाठी निर्दयी व निष्ठूर लोकांची झुंबड त्यांच्या पाठी लागली. धोंडेमारीने त्यांचे पाय जखमी झाले व रक्त ओघळू लागले. त्यांना वाचविण्याच्या प्रयत्नात जैदच्या डोक्याला मोठी खोक पडली. दोन तीन मैलपर्यंत धोंडेमारी करीत पाठलाग करून सभोवतालच्या डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या सपाट वाळवंटात त्यांना घालवून दिल्याशिवाय जमाव मागे फिरला नाही. अतिश्रमाने व जखमांनी अत्यंत दमलेल्या अवस्थेत, वाटेत असलेल्या अनेक फळबागांपैकी एका बागेत एका वृक्षाखाली त्यांनी आश्रय घेतला. द्राक्षबागेच्या कुंपणाच्या भिंतीला पाठ टेकून ते बसले. त्यावेळी त्यांच्या दृढविश्वासाला थांगपत्ताही नव्हता की दहा वर्षापेक्षा कमी कालावधीत, त्याच जागी एका विजयप्राप्त सैन्याचे सरसेनापती म्हणून ते उभे राहतील आणि 'ताईफ' दैवताची विशाल मूर्ती, त्यांच्या भक्तांची आर्जवे व विनवण्या झुगारून देऊन त्यांच्या हुकूमाने उद्‌ध्वस्त केली जाईल.

मक्का शहराचा धनाढ्य नागरिक असलेल्या रबीहाच्या दोन मुलांच्या उतबाह आणि शैबाच्या द्राक्षबागा शेजारीच होत्या. ते दु:खी मनाने पैगंबर मुहम्मद (स.) यांची अवस्था पाहात होते. त्यांची मने द्रवली. त्यांना मोठी सहानुभूती वाटली. त्यांनी द्राक्षाचे एक ताट भरून आपल्या एका ख्रिश्चन चाकराच्या हस्ते ते पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे पाठविले. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी भक्तीभावाने त्याचा स्वीकार करीत उद्‌गारले, ''अल्लाहच्या नावाने स्वीकार करतो.''

अद्दास नावाच्या त्या ख्रिश्चन चाकराला ते शब्द ऐकून विस्मय वाटला व तो प्रभावित झाला आणि म्हणाला, ''या प्रदेशातील लोक साधारणत: असे शब्द उच्चारत नाहीत.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्याची चौकशी केली की तो कुठला आहे व त्याचा धर्म कोणता आहे. अद्दासने उत्तर दिले, ''मी श्रध्देने ख्रिश्चन असून निनेवाहचा राहणारा आहे.''

त्यावर पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले, ''मत्ताचा पुत्र पुण्यशील यूनुसच्या शहराचा तू रहिवाशी आहेस.''

अद्दासने उत्कंठतेने विचारले, '' तुम्हाला यूनुसबद्दल काही माहीत आहे काय?''

पैगंबर मुहम्मद (स.) ठामपणे उत्तर दिले, ''तो माझा बंधु आहे. ते पैगंबर होते, जसा मी पैगंबर आहे.''

त्यावर अद्दासने पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याबद्दल मोठा आदरभाव दर्शविला आणि त्यांच्या हातांची चुंबने घेतली. त्या कृत्यासाठी त्याच्या मालकांनी त्याला खडसावले पण अद्दास म्हणाला, ''यांच्यापेक्षा सर्व जगात अधिक चांगले कोणीही नाही. त्यांनी मला जे 'सत्य' सांगितले, ते केवळ एक पैगंबरच सांगू शकतो.

त्याच्या धन्यांनी दरडावून पुन्हा त्याची खरडपट्टी काढली आणि म्हणाले, ''तुझ्या पूर्वजांच्या धर्मश्रद्धेचा त्याग केल्यास त्याचा परिणामाबद्दल आम्ही तुला पूर्वसूचना व ताकीद देतो, तुला आकर्षण वाटणाऱ्या धर्मापेक्षा तुझा आत्ताचा धर्म कितीतरी अधिक चांगला आहे.''

एकेकाळी संपूर्ण जग त्यांच्याविरूध्द फिरले होते. तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) अल्लाहकडे वळून प्रार्थना करू लागले. त्यांच्या अत्याचारपीडित हृदयातून जे शब्द दु:खाने पिळवटून बाहेर पडले होते, हृदय हेलावणाऱ्या त्या बोलांची नोंद झालेली असून त्यांचे जतन केले गेले आहे. ते अतिशय थकलेले व जखमी असूनही अल्लाहच्या साहाय्यावर त्यांना अढळ विश्रास होता.

''हे अल्लाह! माझ्या असहाय्येतेचे गाऱ्हाणे मी केवळ तुलाच सांगतो. साधनांच्या अभावाची आणि मानवांसमोर माझ्या नगण्येतेची तक्रार फक्त तुझ्याकडेच करतो. तू परम दयाळू, दया करणारा आहेस. तू दीन-दुबळ्यांचा व अगतिक-सहाय्यहीन माणसांचा स्वामी आहेस. हे माझ्या अल्लाह कोणाच्या हातात लोटून तू मला सोडून देत आहेस? कठोरपणे माझ्या अंगावर येणाऱ्या सहानुभूतीशून्य शत्रूंच्या हातात की माझ्या कार्याचे नियंत्रण ज्याच्या हातात आहे अशा वैऱ्याच्या हातात? परंतु तुझा प्रकोप माझ्यावर कोसळण्याखेरीज अन्य कशाचीही मला चिंता नाही. तुझ्या उज्ज्वल प्रकाशात मला शरण देऊन माझे रक्षण कर, तुझ्या उज्ज्वल प्रकाशानेच पृथ्वी, आकाश व तारे प्रकाशित झाले असून तिमिर दूर पळतो. पृथ्वीवरील तसेच परलोकातील सर्वच गोष्टींवर तुझ्याच प्रकाशाचे नियंत्रण आहे. तुझा कोप माझ्यावर कधीही होणार नाही व तू माझ्यावर क्रोधायमान कधीही होणार नाहीस, असे कर. तुझ्याखेरीज मला अन्य कोणतीही शक्ती अगर साधन नाही.''



अल्लाहचे ऐश्वर्य व भव्यता, त्याच्या सर्वप्रभावी अधिशासनाची परिपूर्णता आणि माणसांच्या लहानमोठ्या सर्व कृत्यांची दखल घेणारी त्याची क्षमता, खोलवर हृदयात प्रतिबिंबित झाल्याखेरीज वरील प्रार्थनेचे वाचन कोणीही करू शकत नाही. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अंत:करणात काय चालले होते, या गोष्टीचे ज्ञान वरील प्रार्थनेत होते. त्यावरून त्यांच्या विचारांचा उत्तुंगपणा, त्यांच्या मनाचा निखालस प्रांजळपणा आणि त्यांच्या भावनांचा उदात्तपणा आपणास कळतो. बोलण्यात दुटप्पीपणा धरसोड नाही, लपवाछपवी नाही, सत्य दडपण्याची बाबही, कविकल्पनेसारखी शब्दांची लयलूट तसेच शब्दछल नाही. उलट अल्लाहवरील गाढ प्रेमाची उत्स्फूर्त अभिव्यक्ती, त्याच्या दयाकृपेवर व साहाय्यावर अढळ विश्वास आहे. आपल्या निर्मितीवर स्वत:ला वाहून घेणे हेच दिसून येते. माणसांच्या आकलनशक्तीच्या व कल्पनाशक्तीच्या मर्यादेपलीकडे तो असून त्रिकालबाधितपणे सर्व परिणामांचे तोच कारण आहे.

कोणीही तोतया अगर ढोंगी इतक्या उदात्त व भव्य कल्पनांना मोकळीक देऊन व्यक्त करू शकत नाही. एक पैगंबर, ज्याचा थेट संपर्क त्याच्या निर्माणकर्त्याशी असतो, त्यांच्यापाशी असे उद्‌गार काढण्याची क्षमता असते. जणू ते शब्द आंतरात्म्यातूनच बाहेर आलेले असतात. पैगंबर मुहम्मद (स.) दयनीय अवस्थेत घराविना होते, तरीसुध्दा शांतचित्त व निश्चयी होते. त्यांच्या वाणीत जी शुध्दता व सरलता होती, त्यावरून ही गोष्ट ठळकपणे दिसून येते की त्यात मनाचा दु:खकारक ठिसूळपणा नव्हता. भयाचे, लोभाचे तसेच इंद्रियव्यापार निग्रहाचे सावटही त्याच्यावर मुळीच नव्हते, जे एरवी ढोंगी माणसांच्या बाष्फळपणात सर्वधारणपणे दिसून येतात. 'सर्व सच्चा माणसांना त्याच्यात एका सच्चा मनाची, चांगल्या आणि सर्वोत्तम ध्येयासाठी चाललेली प्रामाणिक धडपड असल्याचे दिसून येईल. काही वेळा ही धडपड भांबावलेली होती, बुडत्या जहाजासारखी नाश पावणारी वाटत होती. परंतु तो संघर्ष कधीही थांबला नाही. डोळ्यांत अश्रू घेऊन, पश्चात्तापदग्ध होऊन खऱ्या अजिंक्य उद्दिष्टांच्या दिशेने नव्या जोमाने वाटचाल करीत राहिली.'

विल्यम मूर लिहितो, ''पैगंबर मुहम्मद (स.) यांचा ताइफच्या प्रवासात उत्तुंगपणा व मर्दपणा होता, कारण त्यांच्या स्वत:च्या लोकांनी तिरस्कार करून त्यांना नाकारले होते. म्हणून अल्लाहच्या नावाने साहस करून ते एकटे बाहेर पडले, ज्याप्रमाणे आदरणीय यूनुस (अ.) निनेवाहकडे निघाले होते. एका मूर्तिपूजक शहरामध्ये जाऊन तेथील लोकांना पश्चात्ताप करण्याची व त्यांच्या चळवळीला पाठिंबा देण्याची हाक देऊ लागले. ही गोष्ट त्यांच्या ईशसंदेशावरील विश्वासाची दृढता होती, यावर प्रखर प्रकाशझोत टाकते.''

## प्रारंभीच्या सोबत्यांचे त्याग

उमैय्या बिन खलफचे गुलाम माननीय बिलाल (रजि.) यांच्या धन्याला जेव्हा कळले की बिलालने इस्लाम धर्माचा स्वीकार केला, तेव्हा त्यांना अमानुष मारझोड करण्यात आली. कधी कधी त्यांच्या मानेभोवती दोरी अडकवून रस्त्यावरील उनाड पोरांना रस्त्यावर ओढत, फरफटत न्यायला सांगितले जाई. काही वेळा मक्काभोवतालच्या खडकाळ टेकड्यांवर फरफटत नेले जाई. कधी दीर्घ काळापर्यंत त्यांना अन्नपाण्याअभावी ठेवले जाई. तर कधी त्यांचे हातपाय करकचून घट्ट बांधून त्यांना तापलेल्या वाळूवर उताणे झोपवून छातीवर मोठमोठे दगड ठेवले जात. त्यांनी इस्लाम धर्मातून परतावे म्हणून अशा प्रकारचे अनेक छळ केले जात असत. परंतु तसे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले, अशीच त्यांची छळणूक चालू असताना माननीय अबू बकर (रजि.) तेथून जाताना त्यांना हे दिसले. त्यांचे हृदय करूणेने द्रावले. त्यांनी मालकाला धन देऊन माननीय बिलाल (रजि.)ना विकत घेतले आणि त्यांना मुक्त करून टाकले.

कुरैशांच्या उद्दामपणाचा व दडपशाहीचा छळ भोगणारे माननीय यासिर (रजि.) आणि त्यांचे पुत्र माननीय अम्मार (रजि.) होते. दोघांनाही टोळीचे प्रभावी पाठबळ नव्हते कारण ते मूळचे मक्कानिवासी नव्हते. माननीय अम्मार (रजि.)ला सुध्दा विस्तवाप्रमाणे तापलेल्या वाळूवर उघड्या अंगाने झोपविले जाई. काही वेळा इतकी पाशवी मारझोड करण्यात येई की त्यांची शुध्द हरपत असे. काही वेळेस त्यांना जळत्या निखाऱ्यावर ढकलून दिले जाई. माननीय अम्मार (रजि.) व त्यांच्या कुटुंबावर केल्या जाणाऱ्या अत्याचारामुळे पैगंबर मुहम्मद (स.) यांना त्यांची करूणा वाटली. त्यांचे सांत्वन करून पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अल्लाहची करूणा दोन्ही हात उंचावून भाकली.

माननीय अली (रजि.) यांच्या कथनाच्या आधारे असे म्हटले जाते की, एकदा पैगंबर मुहम्मद (रजि.) यांनी उद्‌गार काढले, ''माननीय अम्मार (रजि.) हा दृढविश्वासाचे कोठार आहे.'' या काळात भाजलेले आणि जखमांचे व्रण-खुणा माननीय अम्मार (रजि.) आणि त्यांच्या काही सोबत्यांच्या अंगावर मरेपर्यंत होत्या. त्यांच्या वयोवृध्द बापाला, माननीय यासिर (रजि.) यांनाही त्याच प्रकारची वागणूक दिली गेली. नंतरच्या काळात आपल्या अंगावरील छळणुकीच्या आणि 'इमान'च्या स्थैर्याच्या खुणा आश्चर्यचकित होणाऱ्या युवकांना व पिढ्यांना दाखवित असत. अखेरीस मिळालेल्या साफल्याने व वैभवाने, छळ सोसणे ही इस्लामची पूर्वअट होती, या गोष्टीचे जवळजवळ विस्मरणच पडत होते.

छळणूक आणि क्लेश, ही गोष्ट माननीय सुहैब, अबू फुकैहा, यासिर, अम्मार



(रजि.) आदी असाहाय्य लोकांपुरतीच मर्यादित नव्हती, तर कुलीन परिवारातील माणसे आणि टोळी प्रमुखसुध्दा अशा छळणुकीचे बळी ठरले होते. तिसरे खलीफा उस्मान बिन अफ्फान यांना त्यांच्या चुलत्याने अमानुष वागणूक दिली होती. काही प्रतिष्ठित आणि उच्चपदस्थ मुस्लिमांना उंटाच्या ओल्या कातड्यामध्ये गुंडाळून दूरवर टाकून देण्यात येई. काही जणांना पत्र्यांची चिलखते अंगात अडकवून अरबस्तानातील रणरणत्या उन्हातील तप्त वाळूवर झोपविले जाई.

## ॲबिसीनियाला स्थलांतर

अशी मानखंडना व असह्य छळणूक टाळण्यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी टोळीचे पाठबळ नसलेल्या सोबत्यांनी स्थलांतर करून दुसऱ्या देशात आश्रय घेण्याची अनुमती दिली. पश्चिमेकडे बोट दाखवून पैगंबर म्हणाले, ''पलीकडे ॲबिसीनियाचा प्रदेश आहे. तेथे जो राजा आहे, त्यांच्या राज्यात कोणावरही अन्याय-अत्याचार केला जात नाही तो सदाचरणांचा देश आहे. तेथे जाऊन राहा आणि अल्लाह अनुकूल परिस्थिती निर्माण करेपर्यंत परतण्याची प्रतीक्षा करीत राहा.''

पैगंबरत्व प्राप्तीच्या पाचव्या वर्षाच्या सातव्या महिन्यापर्यंत अकरा पुरूष आणि पाच महिलांनी ॲबिसीनियाकडे प्रयाण केले. तेथे ख्रिश्चन राजा नेगूस (नजाशी) राज्य करीत होता. स्थलांतर करणाऱ्यांमध्ये माननीय उस्मान बिन अफ्फान (रजि.) व त्यांची पत्नी म्हणजे पैगंबर मुहम्मद (स.) यांची कन्या माननीय रूकय्या, अब्दुल रहेमान बिन औफ, जुबैर बिन अव्वाम, अबू हुजाफा व त्यांची पत्नी, मुसआब बिन उमैयर, अबु सलामा व त्यांची पत्नी उम्मे सलमा, उस्मान बिन मजउन, अमीर बिन रबिहा व त्यांची पत्नी, सुहैल बिन बोधा, अम्रचा मुलगा सबर आणि हातिब बिन अम्र (रजि.) वगैरे माणसे होती.

स्थलांतर करणाऱ्या या छोट्या समूहाने जगाला हे दाखवून दिले की नव्याने आत्मसात केलेली त्यांची धर्मश्रद्धा ही घरादाराची आसक्ती आणि नात्यागोत्याच्या ओढीपेक्षा अधिक महत्त्वाची अहे. त्या धर्मश्रध्देचा त्याग ते कधीही करणार नाहीत मग तिचे मोल काहीही असो. त्यामुळे त्यांना भौतिक गोष्टीच्या मालकी वहिवाटीपेक्षा आत्म्याचे वैभव व उदात्तता लाभली आहे. त्यांचे नेगूसने (नजाशीने) व त्यांच्या प्रजेने मोठे स्वागत केले आणि तेथे शांततेने व सुखसमाधानाने ते राहू लागले. कुरैशच्या दूतांनी त्या माणसांना मक्का येथे परत नेण्यासाठी आपल्या ताब्यात द्यावे अशी मागणी केली. त्या वेळी स्थलांतरितांमध्ये आणि दूतांमध्ये जो संवाद झाला, त्याचे वर्णन निवेदनावरून चांगल्या प्रकारे मिळते.

कुरैशचे दोन दूत भरपूर मौल्यवान देणग्या व नजराणे राजासाठी व त्यांच्या दरबारी लोकांसाठी घेऊन आले आणि काही दरबारी सरदारांची मने आपल्या बाजुला जिंकली. परंतु राजाने दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकून घेण्याचे ठरविले आणि त्यासाठी दरबार भरविला. मूर्तिपूजकांच्या दूताने म्हटले की त्या मुस्लिम शरणार्थींना देशातून हुसकून काढावे व आपल्या ताब्यात द्यावे. याचे कारण असे की त्यांच्या धार्मिक नेत्याने पूर्वजांच्या धर्माचा त्याग केला आणि त्यांच्या धर्मापासून व खुद्द राजाच्या धर्मापासून वेगळ्या नवीन धर्माची शिकवण देत आहे.

राजाने मुस्लिमांना दरबारात बोलावले आणि त्यांच्या धर्मनेत्याची शिकवणी काय आहे याचा खुलासा मागितला. यावर जाफर बिन अबू तालीब उभे राहिले आणि राजाला संबोधून त्यांनी खालील वक्तव्य केले,

''हे राजन! आम्ही अज्ञानात आणि रानटीपणात बुडालेलो होतो. आम्ही मूर्तींची सजावट केली. आम्ही अपवित्रतेत आणि भ्रष्टतेत राहिलो. आम्ही मृत मांस खाल्ले, आम्ही अश्लाघ्य व घाणेरडी वाणी बोललो. माणुसकीच्या प्रत्येक भावनेला आम्ही पायदळी तुडविले. शेजारधर्माची, अतिथ्यशीलतेची सर्व कर्तव्ये विसरून सोडली. 'बळी तो कान पिळी' यापेक्षा दुसरा कायदा आाम्हाला ठाऊक नव्हता. तेव्हा अल्लाहने आमच्यातील एक माणूस उभा केला. त्या माणसाचा जन्म, त्याचा सच्चेपणा, प्रामाणिकपणा आणि त्याचे निष्कलंक नैतिक आचरण आम्हाला चांगल्याप्रकारे ठाऊक होते. त्याने एकेश्वरत्वाकडे आम्हाला बोलाविले आणि एकमेव अल्लाहबरोबर कोणालाही सहभागी न करण्याबद्दल त्याने आम्हाला शिकवण दिली. मूर्तीपूजा करण्यापासून त्याने आम्हाला मनाई केली. नेहमी खरे बोला, विश्वस्त बाबीत विश्वसार्ह राहा, शेजाऱ्यांशी दयार्द्रपणे वागा व त्यांच्या हक्कांचे भान राखा; अशी आज्ञा केली. महिलांबद्दल अश्लील अभद्र बोलू नका, अनाथांची व पोरक्या मुलांची मालमत्ता हडप करू नका, दुष्कृत्यापासून, पापकर्मापासून व वाईट सवयींपासून दूर राहा, नमाज अदा करीत राहा, गोरगरिबांना दानधर्म करा आणि उपवास करीत जा; अशी आज्ञा केली. आम्ही त्यांच्यावर अढळ विश्वास बाळगला आणि त्यांच्या शिकवणींचा अंगीकार केला. अल्लाहचीच उपासना करण्याचा आणि अन्य कोणासही त्याच्याबरोबर सहभागी न करण्याचा स्वीकार केला. याच कारणासाठी आमच्याच लोकांनी आमच्याविरूध्द उठाव केला. आम्हाला लाकडाच्या आणि पाषाणांच्या मूर्तींची पूजा करण्यास भाग पाडण्यासाठी त्यांनी आमचा अनन्वित छळ केला. त्यांनी आम्हाला शारीरिक क्लेश व यातना दिल्या, आम्हाला जायबंदी केले आणि या सर्व छळातून सुटका मिळविण्यासाठी आम्ही स्थलांतर करून तुमच्या देशात आलो आहोत. आम्हाला आशा आहे की अशा छळ व जुलूमांपासून तुम्ही आमचे रक्षण



कराल.''

या वक्तव्याने राजा फार प्रभावित झाला आणि अल्लाहकडून अवतरलेल्या काही आयती म्हणून दाखवायला मुस्लिमानांना सांगितले. जाफरने 'सूरह-ए-मरयम' असे शीर्षक असलेल्या अध्यायातील आरंभीच्या काही आयती उच्चारल्या. त्या 'सूरह'मध्ये याहया आणि येशू ख्रिस्ताच्या जन्माची हकीकत सांगितलेली आहे. तसेच 'मेरी'ला चमत्कारकरीतीने अन्नपुवरठा केल्याचा वृत्तांत आहे. यावर नेगुस राजा आणि त्याच्या राज्यातले सर्व धर्मोपदेशकांच्या डोळ्यांत घळघळा आसवें ओघळू लागली. तो सद्‌गदित होऊन म्हणाला, ''असे वाटते की हे शब्द आणि येशू ख्रिस्तावर अवतरलेले शब्द हे दोन्हीही एकाच स्थानापासून निघालेली व परावर्तीत झालेली प्रकाशकिरणे आहेत.'' खिन्न व उदास झालेल्या कुरैशांच्या दूतांकडे वळून तो म्हणाला, ''मला हे सांगायला खेद वाटतो की शरणार्थींना मी तुमच्या ताब्यात परत देऊ शकत नाही. माझ्या राज्यात त्यांच्या मर्जीनुसार राहण्यास आणि उपासना करण्यास ते स्वतंत्र आहेत.''

दुसऱ्या दिवशी ते दोन्ही दूत पुन्हा एकदा राजाकडे गेले व म्हणाले, ''पैगंबर मुहम्मद (स.) यांनी व त्यांच्या अनुयायांनी प्रभू येशू ख्रिस्ताची निंदानालस्ती केली आहे.''

मुस्लिमांना पुन्हा दरबारात पाचारण करण्यात आले आणि येशू ख्रिस्ताबद्दल त्यांचे मत विचारले. जाफर (रजि.) पुन्हा उभे राहिले व म्हणाले, ''आम्ही येशूबद्दल तेच बोलतो जशी शिकवण आमच्या पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आम्हाला दिली आहे, अर्थात येशू हे अल्लाहचे दास आहेत, अल्लाहचे पैगंबर आहेत, कुमारी मेरीमध्ये त्यांचा आत्मा व त्यांचे शब्द फुकले गेले आहेत.''

राजा चटकन म्हणाला, ''आम्हीही तसेच मानतो. तुम्हावर व तुमच्या धन्यावर अल्लाहची कृपा असो.''

रागावलेल्या मुद्रेने त्या दूतांकडे तोंड फिरवून राजा म्हणाला, ''तुम्ही शब्दांची कितीही सुंदर जुळणी व सजावट करीत राहा. परंतु जाफरने जे आता सांगितले त्यापेक्षा अधिक काही प्रभू येशू नाही.'' नंतर त्याने मुस्लिमांना संपूर्ण संरक्षणाचे आश्वासन दिले.

कुरैशच्या दूतांनी आणलेल्या सर्व देणग्या व नजराणे त्यांना परत दिले आणि त्यांना निरोप दिला. मुस्लिम लोक कसल्याही उपद्रवाविना तेथे बरीच वर्षे राहिले आणि नंतर मदीनेला आले.

एक गोष्ट या संदर्भात लक्षात घेण्यासारखी आहे की, ज्या लोकांनी ॲबिसीनियाला स्थलांतर केले होते ते सर्वजण स्वतंत्र होते आणि त्या तांड्यात असहाय्य व अगतिक गुलामांचा समावेश नव्हता, ज्यांचा मक्केतील लोकांनी अवर्णनीय छळ केला.

अखाह बिन जुबैरच्या कथनाच्या आधारे असे म्हटले जाते की जाफरने राजा नेगूसला म्हटले होते, ''महाराज! आमच्या विरूध्द तुम्हाला चिथवण्यासाठी आलेल्या दूतांना मी काही प्रश्न तुमच्यामार्फत विचारू इच्छितो.''

नेगूसने प्रश्न विचारण्याची परवानगी दिल्यावर जाफरने खालीलप्रमाणे प्रश्न विचारले.

''आपल्या धन्यांना सोडून पळून आलेली गुलाम माणसे आम्ही आहोत काय? तसे असले तर परत जाण्याची आम्हावर सक्ती व्हावी.''

राजाने कुरैशच्या दोन्ही दूतांपैकी उम्र बिन अल-आस याला प्रश्नाचे उत्तर देण्याचा आदेश दिला. त्याने उत्तर दिले, ''ते गुलाम नाहीत. ती सर्व स्वतंत्र माणसे आहेत.''

जाफर : आम्ही कोणाचे खून केले आहेत काय?

अम्र : त्यांनी कोणाच्या रक्ताचा एक थेंबही सांडलेला नाही.

जाफर : मक्का येथील कोणाही माणसाचे देणे आम्ही लागतो काय?

अम्र : नाही. एक दिरहम सुध्दा नाही.

मुस्लिमांचे ॲबिसीनियाकडे स्थलांतराचे विवरण करताना विल्यम मूर लिहितो,

या प्रसंगी स्थलांतरीतांची संख्या फारच थोडी होती. परंतु त्यांनी पार पाडलेलेल्या भूमिकेचे इस्लामी इतिहासात फार खोलवर महत्त्व होते. त्यामुळे कुरैशांची खात्री झाली की धर्मांतरितांचा निर्धार व त्यांचा प्रांजळपणा पक्का आहे. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आणलेल्या धर्मश्रध्देचा त्याग करण्याऐवजी कितीही खडतर कष्टसायास व हानी सोसण्याची तयारी असल्याचे सिध्द झाले. श्रद्धावान लोकांच्या संपूर्ण समूहाला आत्मदमनाचा एक महान आदर्श त्यांनी दर्शविला. ईशमार्गात येणाऱ्या संकटांना आणि देशत्यागाला विशेष हक्क व प्रतिष्ठा मानण्याचा त्यांनी आदर्श घालून दिला. त्यामुळे असेही सूचित झाले असावे की, आपल्याच लोकांकडून मिळणारी शत्रुत्वाची वागणूक आणि आपल्या पंथाचे सद्‌गुण यांच्या मिलाफाने, ॲबिसीनियाच्या राजाने दाखविलेली सहानुभूती, संपूर्ण अरबस्तानात त्यांना मिळू शकते. म्हणून विशाल हिजरतची संकल्पना आली आणि मदीनेकडे स्थलांतर झाले.



## जुलूम करणारांची उद्दिष्ट्ये

अगतिक मुस्लिमांची छळणूक करून ज्या पध्दतीने मक्केतील प्रमुखांनी निर्दयपणे ॲबिसीनियाकडे जाणाऱ्या शरणार्थी माणसांचा पाठलाग केला होता, त्यावरून मक्केतील लोकांच्या मनांत त्यांच्याबद्दल धुमसणाऱ्या द्वेषभावनेची कल्पना येऊ शकते. इब्ने इसहाकने अबू जहलचे त्या पाठलागातील रौद्र स्वरूपाचे अचूक वर्णन खालीलप्रमाणे केले आहे.

''दुष्ट अबू जहल लोकांना त्यांच्याविरूध्द (मुस्लिमांविरूध्द) चिथावण्या देत होता. एका उच्चकुलीन आणि बलशाली मित्रगण असलेल्या एका माणसाने इस्लामचा स्वीकार केल्याचे त्याला कळले, तेव्हा त्याला भेटून त्याने वादविवाद केला, त्याची घोर निर्भर्त्सना केली, त्याला लज्जित केले आणि बेभान होऊन त्याच्या अंगावर चिखल फेकला व ओरडला, ''तुझ्या वडिलांच्या धर्माला तू कलंक फासलास, ते तुझ्यापेक्षा कितीतरी चांगले होते. तुझ्या बुध्दीची व दूरदर्शीपणाची अवनती होईल, तुझी निर्णयक्षमता क्षीण होईल आणि तुझी प्रतिष्ठा व आदर दलदलीत जाऊन पडेल.'' तो व्यापारी असता तर इस्लाम स्वीकारल्याबद्दल त्याच्या मालावर बहिष्कार टाकून त्याचे गंभीर नुकसान करण्याची धमकी दिली असती. त्याची संपत्ती नष्ट झाली असती. साधारण माणसाने इस्लामचा स्वीकार केल्यास त्याला अमानुष मारझोड करून लोकांना त्याच्याविरूध्द चिथावण्या दिल्या असत्या.

## सामाजिक बहिष्कार

अबू जहलच्या वक्तव्यावरून ही गोष्ट स्पष्टपणे दिसून येते की इस्लामविरोध हा अपघाताने झालेला नव्हता व समाजातील एखाद्या विशिष्ट थरापुरताच मर्यादित नव्हता. तो विचारपूर्वक संघटितपणे व सर्व आघाड्यांवर केला गेला होता. इस्लामची प्रगती रोखण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न अगदी शर्थीने केले गेले. पैगंबरत्व मिळाल्याचा सातव्या वर्षाच्या दहाव्या महिन्यापासून ते दहाव्या वर्षापर्यंत, तीन वर्षाच्या काळात मुहम्मद (स.) यांना आणि बनू हाशिम घराण्याचा सर्व लोकांना मक्केपासून काही अंतरावर असलेल्या एका खिंडीतच वास्तव्य करायला लावले. अन्य कोणत्याही दुसऱ्या घराण्याचा लोकांनी त्यांच्याशी आर्थिक व्यवहार करायचा नाही, त्यांच्याशी बेटी-व्यवहार करायचा नाही असा बहिष्कार घालण्यात आला. अन्नधान्याचा त्यांना पुरवठा बंद करण्यात आला आणि बहिष्कृतांना मोठ्या हालाखीत दिवस काढावे लागले. विशेषकरून लहान मुलांची अवस्था अत्यंत दयनीय झाली. नियमित अन्नधान्य पुरवठा नव्हता, त्यामुळे काहीप्रसंगी झाडांची पाने खाऊन माणसांना गुजराण करावी लागली.

या बहिष्काराने मक्केतील लोकांमध्ये फाटाफूट झाली कारण त्या वेढलेल्या

बहिष्कृत माणसांचे रक्ताच्या नात्याचे बरेच नातेवाईक मक्केमध्ये होते. अवर्णनीय हालअपेष्टा सोसून पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आणि त्यांच्या सोबत्यांनी शरण येण्याची कसली चिन्हे दर्शविली नाहीत आणि मक्केतील लोकांमधील मतभेद व दुही त्रासदायक बनत चालली होती. शेवटी वेढा उठविण्यात आला आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांना व त्यांच्या सोबत्यांना मक्केत घरी परतण्याची अनुमती देण्यात आली.

## मोठी व्यक्तिगत हानी

बहिष्कार संपल्यानंतर थोड्याच दिवसांत मुहम्मद (स.) यांचे चुलते निधन पावले. त्यांचे चुलते अबू तालीब हे त्यांचे रक्षणकर्ते होते. त्याचप्रमाणे त्यांची अत्यंत विश्वासू व मदतनीस प्रेमळ पत्नी माननीय खदीजा (रजि.) यांचेही निधन झाले. मुहम्मद (स.) अबू तालीबसह शेवटपर्यंत राहिले. वयाची ऐंशी वर्षे उलटलेल्या या चुलत्याने इस्लामचा स्वीकार करावा यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अखेरपर्यंत त्यांची मनधरणी केली. परंतु तो वृद्ध माणूस शेवटपर्यंत हट्टीच राहिला. तरीसुद्धा पैगंबर मुहम्मद (स.) वर त्याचे प्रेम होते. चाळीस वर्षे अबू तालीब त्यांचे विश्वासू मित्र राहिले. त्यांच्या बालपणाचे संगोपन, तारूण्यातील हितरक्षक पालक आणि पुढील जीवनात त्यांच्या संरक्षणाचा भक्कम तट बनून ते राहिले. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सच्चेपणाची व प्रामाणिकपणाचीही ओळख पटते. स्वार्थीवर व स्वहितावर डोळा असणाऱ्या ढोंगी तोतयाला अबू तालीबने अशी वागणूक दिली नसती, कारण पैगंबर मुहम्मद (स.) यांचे खरे मनोगत व त्यांचा उद्देश तपासून पारखण्याची विपूल साधने अबू तालीबपाशी होती.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अत्यंत प्रेमळ पत्नीचे, माननीय खदीजा (रजि.) यांचे निधन पैगंबर मुहम्मद (स.) यांना अत्यंत दुःखदायक झाले. पंचवीस वर्षापर्यंत त्या पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या मदतनीस आणि सल्लागार म्हणून राहिल्या. त्यांच्या पैगंबरत्त्वावर सर्वांच्या आधी त्यांनी इमान (श्रध्दा) धारण केला. त्या श्रद्धेच्या प्रसार-प्रचाराच्या कार्यात कसलीही कुरकुर न करता त्या सदैव मदत करीत. छळणुकीच्या व अपेष्टा-यातनांच्या वादळी काळात त्या भक्कमपणे त्यांच्या पाठीशी उभ्या राहिल्या. पैगंबर मुहम्मद (स.) यांशी विवाह होण्यापूर्वी त्यांनी अत्यंत श्रीमंतीत व सुखात जीवन व्यतीत केले होते, ते पाहता त्यांची पैगंबरांवरील निष्ठा व विश्वास उठून दिसतो. पैगंबरांवरील त्यांची प्रीती किंचितही ढळली नाही अथवा त्यांच्यावरील गाढ विश्वास डळमळला नाही. त्यांच्या पतीला पैगंबरत्व लाभल्यानंतर दहा वर्षांनी रमजान महिन्यात त्यांचे निधन झाले, तेव्हा त्यांचे वय पासष्ट वर्षांचे होते आणि त्यांच्या पतीचे वय त्या वेळी पन्नास वर्षे होते. त्यांच्या निधनाने पैगंबर मुहम्मद (स.) यांना तीव्र दुःख झाले. पत्नीच्या



प्रेमाची व निष्ठेची आठवण पैगंबर मुहम्मद (स.) यांनी संपूर्ण हयातभर जतन केली.

माननीय खदीजा (रजि.) यांच्या निधनाने पैगंबर मुहम्मद (स.) एकाकी पडले, विवाहासाठी माननीय सौदा (रजि.)यांच्या नावाचा प्रस्ताव त्यांच्यापुढे आला. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्याला मान्यता दिली. त्या स्त्रीने इस्लामखातर अनेक संकटे सोसली होती. इस्लाममध्ये त्यांनी नुकताच प्रवेश केला होता. ॲबिसीनियाला स्थलांतर केल्याच्या दुसऱ्या वर्षी माननीय सौदा (रजि.) त्यांच्या पतीसह गेल्या, त्या तेथून मक्का शहरी परत येताना त्यांच्या पतीचे निधन झाले होते आणि त्यांची अगदी निराधार स्थिती झाली होती. त्या काळी मुस्लिम समाज मुळातच फार अल्पसंख्य असल्यामुळे पंचावन वर्षाच्या प्रौढ महिला पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या प्रतिष्ठित कुटुंबात आश्रय शोधण्याखेरीज त्यांना अन्य कोठे थारा आढळणार होता? म्हणून त्यांच्याशी केलेला विवाह, हे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अनुकंपेचे व दिलदारपणाचे कृत्य होते.

प्रकरण ४

# पैगंबरांच्या विरूध्द उघडलेली प्रचार मोहीम

बनू हाशिम परिवारावर दबाव चालू होता, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सोबत्यांचा अनन्वित छळ होत होताच, पैगंबराना अल्लाहकडून संदेश प्रगट होत आहेत, किंबहुना या दिव्यबोधाच्या कल्पनेवरच कडाडून चौफेर टीकास्त्रे सोडण्यात येत असत. ही टीकास्त्र चार वेगवेगळ्या साधनांद्वारे सोडली जात असत.

पहिले असे की पैगंबर मुहम्मद (स.) यांना आलेली धर्माची अनुभूती, हिला ईशदिव्यबोध असे न म्हणता विविध अन्य नावाने त्यांचे स्पष्टीकरण देऊन पैगंबर मुहम्मद (स.) यांना मानसिक क्लेश व यातना पोचविणे.

दुसरे असे की पैगंबराशी अद्‌भूत चमत्कार करून दाखविण्याची अलौकिक शक्ती आहे असा दावा न करणारा माणूस अल्लाहचा पैगंबर होऊच शकत नाही अशी विरोधकांच्या विश्वासाची धारणा होती.

तिसरी गोष्ट अशी की जर मानवाला इतक्या उत्तुंग पदाप्रत न्यायचेच होते, तर दुसरे अनेक लोक होते जे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यापेक्षा खूप अधिक धनवान आणि प्रभावशाली होते. या सर्व लोकांना पूर्णत: नजरेआड करून एका साहाय्यहीन व पोरक्या कुरैशी माणसालाच अल्लाहने पैगंबरत्व बहाल करण्याचा मान कसा दिला, हा प्रश्न ते खवळलेले शंकेखोर विचारित होते.

शेवटची गोष्ट अशी की पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या ठायी कसलीही असाधारण क्षमता-पात्रता नव्हती, कसलीही दाखवून देण्यायोग्य अलौकिक व अद्‌भूत शक्ती नव्हती, ज्यामुळे त्यांनी केलेल्या पैगंबरत्वाच्या दाव्याला पुष्टी मिळावी.

पुढील काही पृष्ठामध्ये आपण या आक्षेपांवर व आरोपांवर विचार करू या आणि पवित्र कुरआनने त्या आक्षेपांचे कसे खंडन केले ते पाहू या.



## नवे व जुने टीकाकार

''पैगंबर मुहम्मद (स.) हे 'मजनू' होते, म्हणजे त्यांना एखाद्या 'जिन्नाने' भारले होते, हा आरोप सर्रासपणे व सर्वसाधारणपणे केला जात असे. ते भविष्य सांगणारे ज्योतिषी होते, ते जादुगार होते, मंत्र-तंत्र व चेटुकशास्त्र जाणणारे होते, ते कल्पनाविलासी कवी होते, असाही सामान्य लोकांचा समज व आरोप होता.''

मक्कामधील त्याकाळचे लोक हे जे आरोप पैगंबर मुहम्मद (स.) वर करीत होते त्यांची पुनरूक्ती आजमितीलाही केली जाते ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे पैगंबरत्त्व म्हणजे अपस्मार किंवा फेफरे होते, ते एक मानसिक रोगनिदानाचा विषय होते, असे सिद्ध करण्याची निष्फळ धडपड प्रा. मॅक डोनल्डने केली. ते ही गोष्टही मान्य करतात की पैगंबर मुहम्मद (स.) हे कुशाग्र बुद्धीचे होते. परंतु त्याबद्दल स्पष्ट विश्लेषण अगर व्याख्या त्याने दिली नाही. याचा खुलासा असा आहे की पैगंबर मुहम्मद (स.) हे जुन्या अरब कवींसारखे काव्याला लागणारे कौशल्य नसलेले होते, त्यांच्या काव्याला भावी सूचकतेचा व पैगंबरत्वाचा रंग होता आणि त्यांचा दिव्यबोध म्हणजे 'ज्यूंच्या व ख्रिश्चनांच्या धर्मकल्पनांच्या गुंतावळीचा विलक्षण नमूना' होता; याच साधनांचा वापर त्यांनी त्यांच्या ईशदिव्यबोधासाठी केला.

पैगंबर मुहम्मद (स.) कवी होते, मॅक डोनाल्डचे मत आणि मूरचे मत यात सूक्ष्म फरक आहे. मूर असे सूचित करण्याचे साहस करतो की अरबी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या आत्म्यावर प्रभाव टाकणारी अलौकिक शक्ती ही दृष्टीत्म्यापासून आणि त्याच्या गुप्त टेहळणी करणाऱ्याकडून आलेली असावी. तरीसुद्धा पैगंबरत्वबद्दल मुहम्मद (स.) यांच्या जाणिवेचा जो भाव व्यक्त होतो, तो मात्र त्या प्रकारचा नाही.

मॅक डोनाल्ड प्रतिपादन करतो की, ''कवी हस्सानने त्याची बायको जिन्नाकरवी त्यांना जिंकून अंकित केले होते आणि त्यांच्या मुखातून काव्यांच्या ओळी काढायला भाग पाडले. म्हणून (करिन) पैगंबर मुहम्मद (स.) यांचा सोबती झाला आणि त्यांच्या दिव्यबोध प्रेरणेचा तोच स्त्रोत होता.'' मॅक डोनाल्ड पुढे म्हणतो, ''मुहम्मद (स.) हे कोणत्याही अत्युच्च अर्थाचे खरे पैगंबर नव्हतेच. हिब्रू अधिक भाषामध्ये यहुदी लोकांचे थोर पैगंबर मुहम्मद (स.) यांचे प्रगटीकरण झालेले मला कोठेही आढळले नाही. अगदी खरे सांगायचे तर हा मुस्लिमातील प्रथम माणूस, हा जोशी उपदेशक, भयसूचना देणारा व तंबी देणारा आणि शुभवर जादुमय धर्मसिद्धांत निवेदने जोरात उच्चारणारा, या सर्व गुणवैशिष्ट्यांच्या अंशाचा मिलाफ होता. तरीसुद्धा त्यांच्यापाशी काही विचारकल्पना अशा होत्या, ज्यामुळे त्यांचे स्थान सामान्यांच्या दर्जाहून उंचावले. त्यावरून ते एक निष्ठावान आत्मा, तसा जर असलाच तर असल्याचे सूचित करते. त्याच्या धर्ममतांतही तो आत्मा

गूढ होता आणि त्या सागरलाटावरून वाहात जात तो किनाऱ्याच्या जवळ येत होता.''

## आरोपांचे खंडन

मी मॅक डोनाल्डच्या पुस्तकामधून मोठमोठे उतारे यासाठी दिले आहेत की इतक्या शतकांचा प्रदीर्घ कालावधी लोटल्यानंतरही पैगंबरांवर केले जाणाऱ्या आरोपांचे व आक्षेपांचे स्वरूप बदलले नाही. जुन्या काळच्या मक्कानिवासी लोकांप्रमाणेच इस्लामचे आधुनिक टीकाकारही अजून असाच विश्वास बाळगतात की पैगंबर मुहम्मद (स.) यांचा दिव्यबोधाचा दावा अथवा अल्लाहची वाणी, हे मनाच्या अत्यानंदच्या अवस्थेतील चित्तभ्रमाची अभिव्यक्ती होय, अन्य काही नाही.

पवित्र कुरआनने या आरोपाचे ठामपणे खंडन केले असून पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या मुखाने निघालेले शब्द ही अल्लाहची वाणी एखाद्या हिणकस स्त्रोतामधून उगम पावलेली आहे, असे जे लोक दिव्यबोधाबद्दल आक्षेप घेतात, त्यांना एक मोठे आव्हान देते. कधी ते एका दिव्यस्वप्ने पाहणाऱ्या सुधारकाच्या मानसिक वेदना म्हणतात, तर कधी एका उन्मादवायू झालेल्या कवीचे कल्पनाविलास अथवा एखाद्या वेड लागलेल्या माणसाची असंबद्ध बडबड असे म्हणतात. पवित्र कुरआन या आरोपांचे खंडन कारतो. उदा. 'पैगंबर हे कवी आहेत.' या आक्षेपावर कुरआनमध्ये आहे : 'आम्ही त्याला काव्य शिकविले नाही. त्याच्यासाठी ते उचितही नाहीत.' दुसऱ्या ठिकाणी कुरआन ही बाब विशद करून सांगतो की पैगंबर मुहम्मद (स.) यांना कवी म्हणणे कसे विक्षिप्तपणाचे आहे. कवी हा सामान्यत: कल्पनाविलास करणारा असतो आणि त्याच्या कल्पनेच्या भरारीत त्याच्या स्वच्छंद लहरीला आणि गतीशील भावनांना जी अनुभूती होती तिची शब्दात गुंफन करून सुंदर काव्य निर्मिती होते. कवीचा प्राथमिक संबंध अमूर्त, कल्पित आणि दूरच्या गोष्टींशी असतो. त्याच्या अनुमानाचा मानवी जीवनाच्या प्रत्यक्ष समस्यांशी कसलाही संबंध नसतो. त्याबद्दल पवित्र कुरआन फर्मावितो: 'कवीबद्दल सांगायचे तर जे त्यांच्यामागे जातात तेच चूक करीत असतात. प्रत्येक दऱ्याखोऱ्यातून ते कसे भरकटत असतात, ते तुम्ही पाहिले नाही काय?'

म्हणून कवी जे सांगतो, ते सुसंगत आणि नीटपणे गुंफलेले नसते. कवीने व्यक्त केलेली भावना व विचार ती उच्छृंखल भावनांची अभिव्यक्ती असल्याने त्यामध्ये सुसंगती आणि एकवाक्यता आढळणे शक्य नाही. तसेच कवीच्या प्रत्यक्ष जीवनात आणि त्याच्या काव्यातील उद्‌गारात जमीन अस्मानाचे अंतर असते. काव्य केवळ त्याची भावनिक लहर दर्शविते. म्हणून कवीला त्याची कल्पना प्रत्यक्ष जीवनात मूर्तरूप करून दाखविण्याची गरज नसते. पवित्र कुरआन म्हणतो,



''हे लोकहो ज्यांनी श्रद्धा ठेवली आहे, तुम्ही का ती गोष्ट सांगता जी तुम्ही करीत नाही?'' (दिव्य कुरआन, ६१ : २)

याच्या उलट पैगंबर हा एक प्रत्यक्ष कृती करणारा सुधारणावादी असतो. तो जे बोलतो, तेच त्याच्या मनात असते आणि जे त्याच्या मनात असते तेच तो बोलत असतो. तो जी काही शिकवण देतो त्यानुसार प्रत्यक्ष आचरण करीत असतो. ज्या महान अंतिम नीतिमूल्यांची शिकवण तो देतो, ती त्याच्या महान व्यक्तिमत्त्वामुळे रक्तमांसाचे रूप धारण करते.

त्याशिवाय पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शिकवणीच्या विविध घटकांमध्ये परिपूर्ण सुसंगती व एकवाक्यता असते. प्रत्येक संदेश पूर्णत: दिव्यबोधाची स्वरमेळ राखतो. त्यात विसंगत असे काहीही नाही, तसे अवाजवी आणि वायफळ असेही काही नाही.

शेवटची गोष्ट अशी की पैगंबराच्या एकूण कार्याचा परिणामकारक प्रभाव मानवजातीच्या विशुद्धीकरणाच्या व उदात्तीकरणाच्या फलनिष्पत्तीवर होत असतो, कवींच्या बाबतीत याउलट घडते. आत्म्यांना दुष्ट प्रवृत्तीकडे खेचणाऱ्या वासनारूपी राक्षसाचा पराभव, पैगंबर इतिहासाच्या मैदानात करीत असतात. राष्ट्रीयतेच्या वैरभावाने भगधाडे पडलेल्या, वर्गकलहाने खिळखिळी झालेल्या आणि भौतिकवादाच्या हव्यासाने अन्याय व अत्याचार यांनी पीडित मानवजातीला दुष्ट शक्तींच्या विळख्यातून, दासत्वातून मुक्त करून एकाच विशाल ईशकुटुंबाचे घटक म्हणून जगायला शिकविले. माणसांच्या विविध रंगांच्या लोकांत शांतता प्रस्थापित करीत असतात आणि माणसांच्या जीवनात एकसुत्रीपणा व एकवाक्यता आणतात. हावरटपणा, स्वार्थांधपणा, भौतिक लाभाची आसक्ती, सत्ताप्राप्तीची लालसा या सर्व हिणकस गुणधर्मांचे विशुद्धीकरण करून त्यांच्याऐवजी स्वत्व विसरून त्यागी जीवन कंठण्याची लोक सुरूवात करू लागले. तसेच ईशपरायण होऊन राहू लागले व मानवतेची सेवा करणे आणि समाजातील भ्रष्टाचार व अन्याय-जुलूम यांचे निर्मूलन करणे; हे त्यांच्या जीवनाचा उत्कट हेतू बनला.

एखाद्या कवीला या सर्व गोष्टी साध्य होऊ शकतात? त्याच्या स्वत:च्या शिकवणुकीच्या अन्य बाबींशी मेळ बसणारी व मुळीच विसंगत न ठरणारी अभिव्यक्ती करणे त्याला शक्य आहे काय? या प्रश्नांना इतिहासाचे उत्तर निर्णयात्मक असल्याचे आणि माणसांचे विपुल व स्पष्ट अनुभव असल्याचे वाटते. दोन्हीही प्रश्नांना इतिहासाचे उत्तर नकारार्थीच आहे.

पैगंबरांवर एखाद्या दुष्ट आत्म्याचा प्रभाव होता, ते भारावलेले होते, या आरोपाचेही पवित्र कुरआन अगदी स्पष्ट शब्दांत खंडन करतो. जो माणूस दुष्ट आत्म्याच्या प्रभावाने भारावलेला, ईशशक्तीखेरीज अन्य कोणत्याही हिणकस अशा अमानवीय शक्तीच्या

प्रभावाखाली असेल तर, विश्वावर अधिपत्य असणाऱ्या ईशशक्तीशिवाय तो असेल. तर तो स्वत:साठी इतके महान उद्दिष्ट कसे निर्धारित करू शकतो की अल्लाहच्या आणि माणसांच्यामध्ये आड येणारी अंधश्रद्धा संपूर्णपणे नष्ट करून टाकील भौतिकवादाच्या आणि वेडीवाकडी घडविलेल्या मूर्तीपूजेच्या गदारोळात, पूर्ण विवेकावर अधिष्ठित पवित्र एकेश्वरत्वाची संकल्पना तो रूजवून सोडील. अधोगतीची ओहोटी जी पराकाष्ठेला पोहोचली होती त्यातून सामाजिक चेतना पुन्हा जागृत करील. तसेच मानवजातीला एक उत्कृष्ट आचरणसंहिता उपलब्ध करून देईल, ती जीवनपध्दती माणसाला त्याच्या व्यक्तिगत सदाचरणातच उपयुक्त ठरेल, इतकेच नाही, तर अर्थशास्त्र, राजकारण, कायदा व नैतिकता या क्षेत्रातही अजोड मार्गदर्शक ठरेल. पैगंबर जगात संतुलित आणि इतकी थोर महान संस्कृती निर्माण झाल्याचे जगाच्या इतिहासात एकही अल्लाहच्या पैगंबरांचे जीवन-चरित्र अभ्यासणाऱ्या कोणालाही, जो हे नीट जाणतो की, त्यांची शिकवण काय होती आणि त्यांनी कशा प्रकारचे जीवन व्यतीत केले; त्याने त्या महान व्यक्तिमत्त्वाला आदरभाव दर्शविल्याखेरीज अल्लाहच्या थोर पैगंबराला मनोभावे आदर वाहण्याखेरीज अन्य काही करणे प्राय: अशक्य आहे. दृष्टीत्म्याच्या प्रभावाखालील माणसाला आपल्या अंतरीची इतकी खोलवर सजगता निर्माण करणे शक्य आहे? त्या अंतरीचे विविध पैलू अल्लाहच्या अनेक गुणवैशिष्ट्यांसह त्या सर्वशक्तिमान अल्लाहची जाणीव आपल्या संदेशकार्याची उदात्ततेची जाणीव, त्यांच्या मार्गात असणारे मोठे व भक्कम अडथळ्यांची जाणीव आणि तसेच आपल्या साथीदारांच्या एकनिष्ठेची जाणीव आणि आपल्या अंतरंगात संपूर्ण सुसंगती निर्माण करणे शक्य आहे. अशा प्रकारची दुर्मिळ तसेच त्यांच्या शत्रूंच्या कट्टरपणाची जाणीव आणि दृष्टीत्म्याच्या प्रभावाने झपाटलेल्या माणसामध्ये कधीही आढळू शकत नाही. पवित्र कुरआन म्हणतो,

''लोकहो, काय तुम्हाला मी सांगू की, शैतान कोणावर उतरत असतात? ते प्रत्येक बनावटगिरी करणाऱ्या दुराचाऱ्यांवर उतरत असतात. ऐकीव गोष्टी कानांत फुंकतात आणि त्यांच्यापैकी बहुतेक खोटे असतात.''

(दिव्य कुरआन, २६ : २२१-२२३)

तसेच पैगंबर मुहम्मद (स.) हे 'जिन्न'च्या प्रभावाखाली बोलत असतात, हा आक्षेपही पवित्र कुरआनने अत्यंत जोरदारपणे खंडीत केला आहे.

''आणि काय या लोकांनी कधी विचार केला नाही? यांच्या मित्रावर वेडेपणाचा काहीच परिणाम नाही. तो तर एक सावध करणारा आहे जो (वाईट परिणाम समोर येण्यापूर्वी) स्पष्टपणे खबरदार करीत आहे.'' (दिव्य कुरआन, ७ : १८४)

येथे साथी हा शब्द पैगंबर मुहम्मद (स.) यांना उद्देशून आहे. पवित्र कुरआन



लोकांना आग्रहाने उपदेश करून प्रवृत्त करतो की, इतकी प्रचंड बुद्धीमत्ता व थोरवी असलेल्या माणसांने सबंध आयुष्य प्रामाणिकपणे उत्कृष्ट आचरण दर्शविण्यात वेचले. स्वहिताच्या फुशारकी व अवडंबर दाखविण्याचा स्रोत व ढोंग माजविण्याचा लवलेशही त्याच्या वागण्यात नव्हता. त्या आकर्षक व्यक्तिमत्त्व असलेल्या, पारदर्शक निष्कलंक नैतिक आचरणाचा सच्चा निष्ठावान महामानव तो होता. त्याने मानवजातीला जीवनाच्या एकाच अंगाचे मार्गदर्शन यशस्वी रीतीने केले असे नसून जीवनाच्या सर्वच क्षेत्रांसाठी त्याने मार्गदर्शन केले. तर असे दैदिप्यमान यश कोणी माणूस दृष्टात्म्याच्या प्रभावाने कशी साध्य करू शकतो? इतिहास सांगतो की दृष्टात्म्याच्या प्रभावाखालील माणूस वैभवाच्या इतक्या उंचीवर कधीही पोहोचू शकलेला नाही, जितक्या उंचीवर पैगंबर मुहम्मद (स.) ते स्थान पैगंबरत्वाचा काळाच्या तेवीस वर्षाच्या अल्प मुदतीत गाठू शकले. त्याबद्दल अभिमान व गर्व वाटावा असे कोणते गतवैभव नसणाऱ्या प्रदेशातून व लोकातून येऊन, त्यांना थोरवीच्या इतक्या उच्चपदी नेऊन त्यांनी बसविले, मोठमोठी साम्राज्ये मोडली, दीर्घ प्रस्थापित धर्मश्रद्धा ढासळून टाकल्या, असंख्य स्त्री-पुरूषांचे आत्मे नव्या मुशीत ओतून काढले आणि नवेच जग उभारले- इस्लामी जग (इस्लामी जीवनपद्धतीने आरासलेले जग). ही महान क्रांती, जिने जगाचा नकाशाच बदलून टाकला, इतकेच नाही तर नैतिकता सर्वत्र फैलावली, ज्ञानाच्या मर्यादा रूंदावल्या, ती क्रांती एका झपाटलेल्या माणसाने आणणे शक्य आहे? असे शुद्धीवर असणारा कोणता माणूस मानू शकेल?

विरोधक त्यांच्यावर जे आक्षेप घेत असत त्याबाबतही त्यांच्यात एकवाक्यता नसे, ही बाबच त्यांच्या खोटारडेपणाचा स्पष्ट पुरावा आहे. अविवेकाने ते पैगंबरांवर चिखलफेक करीत व अशी आशा करीत असत की थोडासा तरी चिखल चिकटून बसेल, म्हणूनच टीका करण्यात ते ठाम राहात नसत. ते काही वाटेल ते बोलत. कधी म्हणत ते कवी होते, कधी कधी त्यांना भविष्य सांगणारा ज्योतिष व जादुगार म्हणत. ही खरोखरच एक विलक्षण गोष्ट आहे की एक निरक्षर माणूस, ज्याला पूर्वीच्या धर्मग्रंथांची कसलीही माहिती वा ज्ञान नाही, त्याच्या माध्यमाने जगाला पवित्र कुरआनसारखा महान ग्रंथ लाभला, ज्याची प्रगल्भ रचना आणि अतुलनीय साहित्यिक उत्कृष्टपणा स्वत:च ते सर्व सांगून जातो आणि त्याचे उगमस्थान अल्लाहच आहे, याबद्दल अखंडनीय पुरावा देतो.

दुसरा असाही एक आक्षेप होता की पैगंबर एक सर्वसामान्य माणूस आहे, जो बाजारात हिंडतो, ज्याला पत्नीं आहेत, मुलेबाळे आहेत, त्यांच्यात अलौकिक व अद्‌भूत असे काही नाही. या मुद्याचे पवित्र कुरआनने विवरण केले आहे आणि निर्णायक रीतीने दर्शवून दिले आहे की जे पैगंबर मानवजातीला सदाचाराकडे, सत्कर्माकडे मार्गदर्शन करण्यासाठी पाठविण्यात येतात, ती सर्व माणसेच असतात, म्हणून ईशत्वाचे गुण त्यांना

अकारण चिकटविले जाऊ नयेत. खचितच पवित्र कुराआनमध्ये अशी विपुल विधाने भरलेली आहेत, जी या गोष्टीवर भर देतात की मुहम्मद (स.) हे मानवच होते.

''हे पैगंबर (स.)! सांगा, मी तर एक मनुष्य आहे तुम्हासारखाच, माझ्याकडे 'दिव्यबोध' पाठविला जातो की तुमचा ईश्वर केवळ एकच अल्लाह आहे.''

(दिव्य कुरआन, १८ : ११०)

''हे पैगंबर (स.), यांना सांगा, ''मी तर एक मनुष्य आहे तुम्हासारखा. मला दिव्यबोधाद्वारे सांगण्यात येते की तुमचा उपास्य तर केवळ एकच उपास्य (अल्लाह) आहे, म्हणून तुम्ही सरळ त्याच्याकडेच रोख ठेवा, आणि त्याच्याकडे क्षमायाचना करा.''

(दिव्य कुरआन, ४१ : ६)

पैगंबर मुहम्मद (स.) यांना माणसातूनच का निवडून उभे केले जावे, याच्या कारणांचे पवित्र कुरआनने स्पष्टीकरण केले आहे. मानवजातीला मार्गदर्शन करण्यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांना पाठविण्यात आले हे कार्य केवळ माणूसच करू शकतो. त्याने माणसारखेच जगावे, त्याने मानवी जीवनाची सुखदु:खे भोगावीत, जेणेकरून त्याच्या भोवताली असणाऱ्यांनी त्याचे अनुकरण करावे. त्याच्या व्यक्तिमत्त्वामध्ये सद्‌गुणांचे व भाविकतेचे मूर्तरूप त्यांना पाहता यावे. त्याचे जीवन ईशगुणवैशिष्ट्ये व्यक्त करणारे असावे. मानवजातीबद्दल त्याला अतीव प्रेम व कणव असावी. माणसाचे जीवन कसे आदर्श असावे, हे तो प्रतिबिंबित करून दाखवितो. हा उद्देश तेव्हा साध्य होऊ शकतो जेव्हा एक पैगंबर, माणूस या नात्याने त्याच्या प्रत्यक्ष जीवनात तसे आचरण करून आदर्श घालून देतो. एक माणूसच लोकांना सरळ मार्ग दाखवू शकतो आणि त्यांच्यामध्ये धार्मिक निष्ठा व ईशभीरूता जागृत करू शकतो.

ज्या माणसात अलौकिक ईशशक्ती नाही असे तो स्वत:च सांगतो, त्याला मानवजातीला सुधारण्यासाठी आणि त्यांच्यात चैतन्य निर्माण करणाऱ्यांसाठी, अल्लाहकडून पाठविण्यात येणे शक्य नाही; या मोठ्या अपसमजाखाली मानवजात एका अज्ञात काळापासून धडपडत आहे. हा घोर अपसमज साफ करून पवित्र कुरआनने ईशदूताकडे खूण करून म्हटले आहे की देवदूत मानवी भावना बाळगत नाहीत, म्हणून मानवांना ते चांगले मार्गदर्शक ठरू शकत नाहीत. मानवजात केवळ मानवी भावना असणाऱ्या माणसांच्या कार्यावरून आणि त्यांच्या व्यवहारचातुर्यावरून शिकू शकते आणि मानवी जीवनाच्या विविध अंगांत स्वारस्य घेऊ शकते. म्हणून अल्लाहचा संदेश पोचविण्यासाठी आणि लोकांना त्यांच्या जीवनाचा अंतिम हेतू समजावून निर्माणकर्त्याच्या आज्ञानुसार तंतोतंतपणे जीवन व्यतीत करण्यास प्रेरित करण्यासाठी; केवळ माणसेच पाठविण्यात आली आहेत. पैगंबर मुहम्मद (स.) यांची कृती व उक्ती ही प्रत्येक दृष्टीने आदर्श असते,



कारण ते सतत त्या महान अंतिम सत्याच्या छत्रछायेखाली असतात. पवित्र कुरआनचे कथन आहे.

''लोकांसमोर जेव्हा कधी मार्गदर्शन आले तेव्हा त्याच्यावर श्रद्धा ठेवण्यासाठी त्यांना कोणत्याही गोष्टीने रोखले नाही परंतु त्यांच्या याच वचनाने की, ''काय अल्लाहने मानवाला पैगंबर बनवून पाठविले?'' यांना सांगा, जर भूतलावर ईशदूत समाधानाने वावरू लागले असते, तर जरूर आम्ही आकाशातून एखाद्या ईशदूतालाच त्यांच्यासाठी पैगंबर बनवून पाठविले असते. '' (दिव्य कुरआन, १७ : ९४-९५)

वरील आयतीवरून स्पष्ट खुलासा मिळतो की माणसांना मार्गदर्शन करण्याची क्षमता-पात्रता फक्त मानवातच असते, कारण त्याचे जीवनच लोकांना व्यवहारी मार्गदर्शन उपलब्ध करून देत असते. पृथ्वीवर तर पूर्वीपासून माणसे आहेत आणि त्यांच्या उद्धारासाठीच पैगंबर पाठविले जातात. म्हणून हे महान कार्य माणसेच सफलतेने करू शकतात.

दुसऱ्या जागी कुरआन विशद करतो की जर हे बिकट कार्य ईशदूतांकडे सोपविले गेले असते, तरी माणसाचे रूप धारण करूनच त्यांना माणसांत जावे लागले असते व त्यांच्या जीवनावरूनच मार्गदर्शन उपलब्ध होऊ शकले असते.

''ते म्हणतात की या पैगंबरावर एखादा दूत का अवतरला गेला नाही?जर आम्ही एखादा दूत अवतरला असता तर आतापावेतो केव्हाच निर्णय झाला असता, मग यांना कोणतीच सवलत दिली गेली नसती. आणि आम्ही दूत जरी अवतरला असता तरी देखील त्याला मानवी रूपातच अवतरला असता. '' (दिव्य कुरआन, ६ : ८-९)

विरोधकांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या विरूद्ध उघडलेल्या अपप्रचाराच्या उपहासात्मक मोहिमेचा एक सूर असा होता की जे काही दिव्यबोध म्हणून सांगितले जाते ती पूर्णत: मानवाची निर्मिती आहे, मुहम्मद (स.) यांची स्वत:ची तरी ती कृती असावी अगर त्यांच्या साहाय्यक सोबत्यांपैकी कोणाची तरी असावी, अथवा त्या नुसत्या गतकाळाच्या कथा-कहाण्या असाव्यात, अपसमजाचे खंडन कुरआन खालीप्रमाणे करतो,

''ज्या लोकांनी पैगंबरांची गोष्ट मान्य करण्यास नकार दिलेला आहे ते सांगतात की, 'हा कुरआन' एक स्वरचित गोष्ट आहे जी या व्यक्तीने स्वत:च रचली आहे आणि अन्य काही लोकांनी या कामात याला मदत केली आहे.'' मोठा अत्याचार आणि अतिशय खोटेपणा आहे ज्यावर हे लोक उठले आहेत. म्हणतात, ''या जुन्या लोकांनी लिहिलेल्या गोष्टी आहेत ज्या हा माणूस उद्‌धृत करवितो आणि त्या याला सकाळ-संध्याकाळ ऐकविल्या जात असतात.'' हे पैगंबर (स.) यांना सांगा, ''याला अवतरले आहे त्याने,

जो पृथ्वी व आकाशांचे रहस्य जाणतो.'' वस्तुस्थिती अशी आहे की तो अत्यंत क्षमाशील, दयावान आहे.'' (दिव्य कुरआन, २५ : ४-६ )

याच हवाल्याचा निर्देश पवित्र कुरआनच्या विविध आयतीमध्ये वेगळ्या रीतीने करण्यात आला आहे.

''आम्हाला माहीत आहे हे लोक तुमच्याविषयी असे म्हणतात की या व्यक्तीला एक मनुष्य साक्षर करतो वस्तुत: ज्या मनुष्याकडे यांचा संकेत आहे त्याची भाषा अरबी नाही आणि ही स्पष्ट अरबी भाषा आहे. वस्तुस्थिती अशी आहे की जे लोक अल्लाहच्या संकेतांना मानीत नाहीत अल्लाह कधीच त्यांना खऱ्या गोष्टीपर्यंत पोहचण्याची सद्‌बुद्धी देत नाही आणि अशा लोकांसाठी दु:खदायक प्रकोप आहे. (खोट्या गोष्टी पैगंबर रचीत नाही तर) असत्य ते लोक रचीत आहेत जे अल्लाहच्या वचनांना मानीत नाहीत. वास्तविक पाहता तेच खोटे आहेत.' (दिव्य कुरआन, १६ : १०३-१०५)

कुरआनला तुच्छ लेखण्याच्या अनेक प्रयत्नांमध्ये, हाच एक मोठा आक्षेप होता. म्हणून संक्षेपाने त्यांनी कुरआनची महत्ता असे म्हणून बडतर्फ करून टाकली की ती सर्व निव्वळ लबाडी व खोटारडेपणाच आहे, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. हा आक्षेप इतका मूर्खपणाचा व भोंगळ आहे की त्याच्याविषयी अधिक विचार करण्याची त्याची योग्यताच नाही.

या संदर्भात ज्या माणसांचा उल्लेख केला गेला आहे, त्यांची नावे जाबिर, यासिर, ऐश किंवा याइश, कोस व अद्दास अशी होती. ही माणसे म्हणे, पैगंबर मुहम्मद (स.) यांना पैगंबरत्वाची कला शिकवीत होती आणि या व्यवसायासाठी गतकाळाल्या काही कथा-कहाण्या सांगून त्यांची तयारी करून घेत होते. इस्लामी श्रद्धेचा स्वीकार करणाऱ्यात हेच लोक सर्वप्रथम असायला पाहिजे होते. ते तर कुरआनचे उगमस्थान ईशवाणी असल्याचे मानून त्यासाठी आपल्या स्वामीची गैरमर्जी ओढवून घेऊन त्याचा प्रकोप सोसण्यास त्यांनी तयार राहायला हवे होते.

याशिवाय ही सर्व माणसे अरबेतर वंशाचे होते. ते सर्व परके लोक होते आणि अरबस्तानच्या बाजारात गुलाम म्हणून त्यांची विक्री झाली होती. अरबेतर वंशाची माणसे पवित्र कुरआनसारखा महान ग्रंथ निर्माण करू शकली, हे खरोखर आश्चर्य करण्यासारखी बाब आहे. जो ग्रंथ भाषेच्या सौंदर्यात, शब्दांची व वाक्यांची चपखल रचना, अद्वितीय वर्णनशैली, ओळींचा असाधारण आरंभ व शेवट, ओघवती विचारधारा, उपदेशात्मक दाखले देण्यात आणि घटनांचे समग्र वर्णन करण्यात, ताकीद आणि भयसूचना देण्यात आणि कार्यकारण मीमांसा व विश्लेषण करण्यात मानवी इतिहासात ज्याला दुसरी तोड



आठवत नाही. असा महान ग्रंथ ती अरब वंशाची नसलेली माणसे निर्माण करू शकली? विविध विषयांशी संबंध असूनही कुरआनचे साहित्य उल्लेखनीय आहे. अरबांना गद्य आणि काव्य या दोहोंची सवय होती. त्यांचे गद्य यमकाविना व यमकासह असे दोन प्रकारचे असे. बुद्धीजीवी लोकांना काव्याचा सराव होता. साधारण माणसे गद्याचा वापर करीत. त्या काळच्या गद्याशी अगर पद्याशीही पवित्र कुरआनचे साम्य नव्हते कारण त्याच्या ओळींचा शेवट काव्याच्या ओळींच्या शेवटापासून अगदी वेगळा होता. आणि गद्याच्या शेवटापेक्षाही वेगळा होता. खरे तर पवित्र कुरआनने अभिव्यक्तीची एक नवीनच शैली निर्माण केली जी सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरची होती.

अशा रीतीने पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या दाव्यातील प्रामाणिकपणा कोणत्याही समंजस माणसाला कबूल केला पाहिजे, ज्या वाणीला ते दिव्यबोध म्हणत, ती काही गुप्तपणे ख्रिश्चन गुलामांकडून शिकलेली गोष्ट नव्हती, तर ती थेट पृथ्वीच्या स्वामीकडूनच आली होती.

हॅरी गेलॉर्ड डॉर्मन लिहिता,

''कुरआन हे अक्षरश: अल्लाहचा दिव्यबोध असून जिब्रिलने ते पैगंबर मुहम्मद (स.) यांना सांगितले आहे. त्याचे प्रत्येक अक्षर परिपूर्ण आहे. स्वत:च स्वत:बद्दल आणि अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) बद्दल निर्णायक साक्ष व पुरावा देणारा, सर्वकाळी उपलब्ध असणारा चमत्कार आहे. त्याची आश्चर्यजनक गुणवत्ता त्याच्या शैलीत आहे. ती शैली इतकी परिपूर्ण व इतकी उत्तुंग आहे की, माणूस अथवा 'जिन्न' त्याच्या छोट्याशा एका ओळीशी तुलना करणारी रचना करू शकले नाहीत. तसेच त्याची उपदेशात्मक शिकवण, भविष्याबाबतची त्याची भाकिते आणि त्यांची तंतोतंत अचूक माहिती; निरक्षर पैगंबर मुहम्मद (स.) स्वत:च कधीही गोळा करू शकले नसते.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर आक्षेपांचा हल्ला चढविण्याचा दुसरा मुद्दा होता की, ते काही अशा योग्यतेचे नव्हते की त्यांच्याकडे पैगंबरत्व यावे. त्यासाठी त्यांच्यापाशी पुरेशी क्षमता-पात्रता नव्हती. सर्वसाधारण अरब माणसे अशी कल्पना करू शकत नव्हते की, पितृनिधनानंतर जन्मलेले आणि आपल्या कबील्यातील प्रमुख पुरूषांचा पाठिंबाही गमावून बसलेले, ज्याच्यापाशी दाखविण्यासाठीही काही धन-संपत्ती नाही, असा माणूस पैगंबरपदाच्या उच्चस्थानी बसविला जाईल. यांना वाटे की पैगंबरत्व त्यांच्या कबिल्यातील धनाढ्य प्रमुखांपैकी कोणा एकाला बहाल करायला हवे होते.

''म्हणतात, हा कुरआन दोन्ही शहरांच्या मोठ्या माणसांपैकी कुणावर का अवतरला गेला नाही?'' (दिव्य कुरआन, ४३ : ३१ )

या आक्षेपांचे खंडन करताना पवित्र कुरआन हे दाखवून देतो की पैगंबरत्व बहाल होणे ही अल्लाहची विशेष-कृपा करण्याचा हक्क असून कोणावर ती बहाल करायची, ही गोष्ट तो चांगली जाणतो. अल्लाहच्या निवडीवर प्रश्न करण्याचा हक्क कोणाही मानव प्राण्याला नाही. तसेच कोणाला निवडावे व कोणाला वगळावे याबद्दल अल्लाहला आदेश देण्याचा अधिकारही कोणाला नाही.

''परंतु अल्लाह ज्याच्यासाठी इच्छितो त्याला आपल्या कृपेसाठी खास निवडता आणि तो अत्यंत कृपावंत आहे. '' (दिव्य कुरआन, २ : १०५)

अश्रद्ध लोक म्हणतात की ते मुहम्मद (स.) वर तोपर्यंत इमान धारण करणार नाहीत, जोपर्यंत त्यांना स्वत:ला पैगंबरत्वाच्या अनुभवाचा आनंद उपभोगण्याक्षम केले जात नाही.

''ग्रंथधारक व अनेकेश्वरवाद्यांपैकी जे लोक अश्रद्धावंत होते, (ते आपल्या द्रोहापासून) परावृत्त होणारे नव्हते जोपर्यंत त्यांच्यापाशी उज्ज्वल प्रमाण येत नाही. (अर्थात) अल्लाहकडून एक प्रेषित ज्याने पवित्र पत्रिका वाचून दाखवाव्यात, ज्यांच्यात अगदी रास्त आणि यथायोग्य लिखाण लिहिलेले असेल.'' (दिव्य कुरआन, ९८ : १-३)

'एक विलक्षण मागणी' असे म्हणून कुरआन ती फेटाळून लावतो आणि पुढे कथन करतो, ''त्याच्या कृपाप्रसादाचा वर्षाव कोणावर करावा, हे ठरविण्यास अल्लाह सर्वोत्तम निर्णय घेणारा आहे. आपल्या संदेशाचे प्रकटीकरण कोणावर करावे, हे त्याला सर्वोत्कृष्टपणे ठाऊक आहे.''

या मुद्यावर कुरआन खालील शब्दांत भर देतो.

''हे नबी (स.)! जर अल्लाहची कृपा तुमच्यावर नसती व त्याची दया तुमच्या सोबत नसती तर त्यांच्यातील एका गटाने तुमचा गैरसमज करण्याचा निश्चय केला होता. खरे पाहता वस्तुस्थिती अशी होती की ते स्वत: आपल्या व्यतिरिक्त इतर कोणाचा गैरसमज करीत नव्हते, आणि तुमचे काही नुकसान करू शकत नव्हते. अल्लाहने तुमच्यावर ग्रंथ व विवेक अवतरित केला आहे. आणि तुम्हाला ते सर्वकाही ज्ञात करून दिले आहे जे तुम्हाला माहीत नव्हते, आणि त्याची कृपा तुम्हांवर मोठी आहे.''

(दिव्य कुरआन, ४ : ११३)

पुढे 'जुमुआ' (प्रार्थनेसाठी जमलेला समुदाय) हे शीर्षक असलेल्या अध्यायात हाच मुद्दा पवित्र कुरआनने आणखी विवरण करून सांगितला आहे.

''तोच आहे ज्याने निरक्षर लोकांत एक पैगंबर खुद्द त्यांच्यापैकीच उभा केला जो त्यांना त्याची वचने ऐकवितो, त्यांचे जीवन सावरतो आणि त्यांना ग्रंथाची आणि



बुद्धिमत्तेची शिकवण देतो, वास्तविक पाहता यापूर्वी ते उघड पथभ्रष्टतेत पडलेले होते. आणि (या पैगंबरांचे उभे केले जाणे) त्या दुसऱ्या लोकांसाठीदेखील आहे जे अद्याप त्यांना मिळालेले नाहीत. अल्लाह जबरदस्त आणि बुद्धिमान आहे. ही त्याची कृपा आहे, ज्याला इच्छितो देतो आणि तो मोठा कृपा करणारा आहे.'' (दिव्य कुरआन, ६२ : २-४)

## चमत्कार दाखविण्याच्या मागण्या

विरोधकांचा शेवटचा गट अशा लोकांचा होता, ज्यांची अशी अपेक्षा होती की दिव्यबोधाबरोबरच काही अलौकिक व अद्‌भूत चमत्कारही असायला हवेत. जे सर्वांना पाहता यावेत. तेव्हा त्यांनी पाहिले की पैगंबर मुहम्मद (स.) सुद्धा इतर माणसांप्रमाणे रस्त्याने व बाजारात हिंडत फिरत असत, रोज लागणाऱ्या वस्तू खरेदी करीत, इतर माणसांप्रमाणेच कडाक्याच्या थंडीपासून आणि भाजून काढणाऱ्या उन्हाळ्याच्या उष्णतेपासून स्वत:चे रक्षण त्यांना करावे लागत असे, तेव्हा असे सिद्ध करण्याचा प्रयत्न करू लागत की जो माणूस इतर मर्त्य माणसांच्या जीवनातली सर्व सुखदु:खे भोगतो, त्याच्यात अलौकिकत्व असे काही नाही, म्हणून तो अल्लाहचा पैगंबर होऊ शकत नाही. त्याच्यात सर्वसाधारण माणसांचे सामान्य गुण नसावेत.

म्हणून अश्रद्ध लोक पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पैगंबरत्वाबद्दल शंकाकुशंका दर्शवित आणि म्हणत,

''ते म्हणतात, ''कसा हा पैगंबर आहे जो अन्न खातो आणि बाजारात हिंडतो फिरतो? याच्याजवळ एखादा दूत का पाठविला गेला नाही जो याच्यासोबत राहिला असता व (नकार देणाऱ्यांना) त्याने धमकावले असते? अथवा याच्यासाठी एखादा खजिनाच उतरविला गेला असता अथवा याच्यापाशी एखादी बागच असती जिच्यापासून (समाधानाची) याने उपजीविका प्राप्त केली असती?''आणि हे अत्याचारी म्हणतात, ''तुम्ही लोक तर एका जादू केल्या गेलेल्या माणसाच्या नादी लागला आहांत.''

(दिव्य कुरआन, २५ : ७-८)

'बनीइस्राईल' शीर्षक असलेल्या अध्यायात पैगंबर मुहम्मद (स.) पाशी अलौकिक व अद्‌भूत शक्ती असल्याचे दाखविण्याच्या मागणीने जास्तच जोर धरलेला आढळतो.

''आणि त्यांनी सांगितले, ''आम्ही तुझे म्हणणे मान्य करणार नाही, जोपर्यंत तू आमच्यासाठी जमीन चिरून एक झरा प्रवाहित करीत नाहीस. अथवा तुझ्यासाठी खजूर व द्राक्षांची एक बाग निर्माण व्हावी आणि तू त्यात कालवे प्रवाहित करावेस. अथवा तू आकाशाचे तुकडे-तुकडे करून आमच्यावर कोसळवावेस जसा की तुझा दावा आहे. अथवा अल्लाह आणि दूतांना आमच्या समक्ष समोरासमोर आणावे. अथवा तुझ्यासाठी

सोन्याचे एक घर बनवावे. अथवा तू आकाशावर चढून जावे आणि तुझ्या चढण्यावरदेखील आम्ही विश्वास करणार नाही, जोपर्यंत तू आमच्यावर एक असा लेख उतरवून आणत नाहीस ज्यास आम्ही वाचावे'' (दिव्य कुरआन, १७ : ९०-९३)

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे अलौकिक शक्ती दाखविण्याची जी मागणी केली जात असे, त्यात वरीलप्रमाणे थोडाफार फरक असावा, परंतु त्यामागील मूलभूत समज असा गृहित धरलेला होता की पैगंबरांपाशी अलौकिक व अद्‌भूत शक्ती असायला पाहिजे, जिच्या बळावर त्याने जेव्हा त्याच्या इच्छेस येईल तेव्हा निसर्गरचना थांबवून दाखविली पाहिजे किंवा निसर्गक्रम बदलून दाखवायला हवा. या मागणीच्या उत्तरादाखल पैगंबर मुहम्मद (स.) यांना अशी घोषणा करण्याचा आदेश अल्लाहने दिला.

''हे पैगंबर (स.), यांना सांगून टाका की माझ्या व तुमच्या दरम्यान केवळ एक अल्लाहची साक्ष पुरेशी आहे. तो आपल्या दासांच्या स्थितीची खबर राखणारा आहे आणि सर्व काही पहात आहे.'' (दिव्य कुरआन, १७ : ९६)

निसर्गरचनेत गंभीर अस्ताव्यस्तता करून दाखविण्यात ईशशक्ती असते, हा समज किती मूर्खपणाचा आहे, ही गोष्ट वरील ओळ अगदी सुंदर रीतीने विशद करते. पैगंबर मुहम्मद (स.) केवळ सावधान करणारे व भयसूचना देणारे आहेत. म्हणून विश्वाच्या अलौकिक शक्ती त्यांच्या कक्षेत नाहीत. जमिनीतून अचानक कारंजे उफाळून येणे, नदीचे लोंढे अकस्मात जमिनीतून निघून घोंगवत जाणे, आकाशाचे तुकडे होऊन खाली कोसळणे व शुद्ध सोन्याने मढलेली वैभवशाली इमारत अकस्मात निर्माण होणे; या सर्व बाबी एका सच्चा पैगंबरासाठी आवश्यक नाहीत. उलट एका सच्चा पैगंबराला आवश्यक असणारी गुणवत्ता म्हणजे त्याचे अत्यंत उच्च दर्जाचे पुण्यशील सदाचारी जीवन, त्याची परिपूर्ण निष्ठा, त्याचे निष्कलंक व चकचकीत नैतिक चारित्र्य आहे. तसेच त्याची त्यागी वृत्ती व मानवतेशी त्याचे निस्सीम प्रेम अल्लाहच्या कार्याशी आणि त्याच्या उदात्त शिकवणीशी त्याची अढळ व भक्कम निष्ठा सच्चा पैगंबरासाठी आवश्यक असणारी गुणवत्ता आहे.

पवित्र कुरआनने हा मुद्दा अन्य कित्येक ठिकाणी विशद करून सांगितला आहे. अगदी सुरूवातीलाच त्याने सांगून टाकले की चमत्कार घडवून दाखविण्याची बाब पैगंबराच्या हातातच नाही.

''कोणत्याही पैगंबराचे हे सामर्थ्य नव्हते की अल्लाहच्या आज्ञेविना स्वत:च एखादा संकेत घेऊन यावा. मग जेव्हा अल्लाहचा आदेश आला तेव्हा सत्याबरहुकुम निर्णय लावला गेला आणि त्यावेळी मिथ्याकारी लोक तोट्यात आले.''

(दिव्य कुरआन, ४० : ७८)



आपण स्वेच्छेने कसलाही चमत्कार करून दाखविण्याची असमर्थता खुद्द पैगंबरानीच कबूल केलेली आहे, कारण ती सर्वस्वी सर्वशक्तिमान अल्लाहच्याच हातात आहे. ते स्पष्टपणे सांगतात की पैगंबर हा केवळ अल्लाहचा पैगंबर असतो आणि तो प्रामाणिकपणे आपल्या स्वामीच्या आज्ञा पार पाडीत असतो.

''हे पैगंबर (स.), यांना सांगा, ''मी तुम्हाला असे सांगत नाही की माझ्याजवळ अल्लाहचे खजिने आहेत. मला परोक्षाचे ज्ञानही नाही व असेही सांगत नाही की मी ईशदूत आहे. मी तर केवळ त्या 'वह्य' (दिव्य अवतरण) चे पालन करतो जे माझ्यावर अवतरले जाते.'' (दिव्य कुरआन, ६ : ५०)

''हे पैगंबर (स.), यांना सांगा की, ''मी स्वत:करिता कोणत्याही नफा तोट्याचा अधिकार बाळगत नाही, अल्लाहच जे काही इच्छितो ते होते आणि जर मला परोक्षाचे ज्ञान असते तर मी पुष्कळसे लाभ स्वत:साठी प्राप्त करून घेतले असते व मला कधीही एखादे नुकसान पोहचले नसते. मी तर केवळ एक खबरदार करणारा व खुषखबर ऐकविणारा आहे त्या लोकांसाठी जे माझे म्हणणे मान्य करतील.''

(दिव्य कुरआन, ७ : १८८)

लेखक अमीर अली, त्या अरबी गुरूच्या अनुयायांना श्रेय देताना लिहितो की, त्यांनी कधीही त्यांच्या गुरूकडे चमत्कार करून दाखविण्याची मागणी केली नाही. अभ्यासक, व्यापारी व सैनिक असणाऱ्या त्या लोकांनी गुरूच्या धर्मप्रसार कार्याच्या नैतिक पुराव्यावरच आपली दृष्टी ठेवली. त्यांनी आपल्या मित्रहीन धर्मप्रचाराकांभोवती कडे केले आणि आपल्या भौतिक आशा-आकांक्षाचा परित्याग करून जीवन-मरणात अशा मानवी व्यक्तिमत्त्वाभोवती चिकटून राहिले की, तशा प्रकारचे समांतर व्यक्तिमत्त्व आढळणे जगाच्या इतिहासात दुर्मिळ आहे.

अशा काळात जेव्हा साध्या संताकडूनही अद्‌भूत चमत्काराची सामान्यपणे अपेक्षा केली जात असे. जेव्हा संपूर्ण वातावरणच अद्‌भूतच्या व अलौकिकत्वाच्या कल्पनेने भारलेले व चैतन्यमय झालेले होते, केवळ अरबस्तानातच नव्हे तर शेजारच्या देशात, जेथे संस्कृतीने बरीच प्रगती साधली होती तेथेसुद्धा बुद्धिवादाचा शोध घेणाऱ्या या मार्गदर्शकाने, अगदी नि:शंकपणे चमत्कारासाठी आसुसलेल्या मूर्तिपूजकांना म्हटले,

''ईश्वराने मला अद्‌भूत चमत्कार करून दाखविण्यासाठी पाठविले नाही. तुम्हाला शिकवण देण्यासाठी त्याने मला पाठविले आहे. स्तुती असो माझ्या स्वामीची! माणसापेक्षा काही अधिक करून दाखविण्यासाठी मला पैगंबर म्हणून पाठविले गेले आहे?''

कसलेही असाधारण सोंग-ढोंग नाही, कसल्याही अतिशयोक्तींची किंवा अत्युक्तीच्या

भाषेची अनावर आसक्ती नाही. आपल्या चारित्र्याभोवती व व्यक्तिमत्त्वाभोवती मोहिनीचे वलय किंवा झालर नाही.

''मी केवळ ईशवाणीचा प्रचारक आहे, मानवजातीला अल्लाहचा संदेश आणून पोहोचविणारा आहे.''

हे शब्द त्यांच्या मुखातून नेहमी बाहेर पडत असत. अगदी प्रारंभापासून ते अखेरपर्यंत एकही असा शब्द त्यांच्या मुखातून बाहेर पडला नाही की ज्यातून असा अर्थ निघावा की,''त्यांनी मानवाची उपासना करण्याची विनवणी केली होती.''

सुरूवातीपासून शेवटपर्यंत अभिव्यक्तीचे एकसारखे गांभीर्य होते, ही बाब तो काळ आणि त्यावेळची सभोवतालची परिस्थिती पाहता विस्मयावह व आश्चर्यकारक वाटते. सुरूवातीपासून ते अखेरपर्यंत त्यांचा स्वर साधा आणि आपल्या निर्माणकर्त्यासमोर विनम्रतेने व लीनतेने झुकलेला होता.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी चमत्कार करून दाखविण्याची कसलीही शक्ती नसल्याचे सांगितले आणि त्यांच्या ईशसंदेशाच्या सत्यतेचा पाया केवळ त्यांच्या शिकवणीवर आधारित ठेवला. ते कोणाही चमत्कार दाखविणाऱ्याकडे गेले नाहीत व आपला प्रभाव पाडण्यास त्यांना सांगितले नाही. हदीसमध्ये अशी नोंद आहे की, एकदा एका सूर्यग्रहणाच्या प्रसंगी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या काही सोबत्यांना ते सूर्यग्रहण म्हणजे एक अशुभचिन्ह वाटले कारण नुकतेच पैगंबर मुहम्मद (स.) यांचा पुत्र इब्राहीम याचे निधन झाले होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सरळपणे सोबत्यांना सांगितले की सूर्य आणि चंद्र हे अल्लाहच्याच आज्ञांचे पालन करीत आहेत आणि पुत्राच्या मृत्यूशी त्यांचा काहीही संबंध नाही. त्यांनी ठामपणे उद्‌गार काढले, ''खचितच सूर्य आणि चंद्र हे दोन्ही अल्लाहच्या अनेक निशाण्यांपैकी आहेत. कोणाच्याही जन्माच्या अगर मृत्यूच्या कारणाने, त्यांना ग्रहणे लागत नाहीत. जेव्हा तशा अवस्थेत त्यांना तुम्ही पाहाल तेंव्हा अल्लाहची प्रार्थना करा आणि त्याच्या वैभवाचे गुणगाण करीत जा.''

स्वत:च्या भोवती भय आणि गुढतेचे तेजोवलय निर्माण करण्याऐवजी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी माणसांच्या आंतरात्म्याला आणि त्यांच्या श्रद्धाळुपणाला चेतना देत म्हटले, ''तुम्ही तुमच्या सभोवतालचे निरीक्षण करा.'' (हे शब्द कुरआनचे आहेत) हे थक्क करणारे विश्व, सूर्य, चंद्र व तारे निळ्या आकाशात गतीने व स्तब्धपणे आपला निर्धारित मार्ग आक्रमित आहेत, तसेच विश्वातील निसर्गाचे नियम व पद्धतींचे अवलोकन करा, शुष्क झालेल्या भूमीला चैतन्य देण्यासाठी आकाशातून कोसळणारे पावसाचे थेंब पाहा, माणसाला हितकारक असणाऱ्या वस्तूंनी गच्च भरलेली व समुद्रावरून ये-जा करणारी जहाजे, खलबते, तसेच सोनेरी रंगाच्या फळांनी गच्च भरलेली, सुंदर दिसणारी



खजुरीची झाडे सर्व बाबी तुमच्या काष्ठ्याच्या अगर पाषाणांच्या मूर्तींनी स्वत: निर्माण केल्या आहेत काय? लोकानो! तुम्हाला निशाणी पाहिजे, जेव्हा संपूर्ण विश्व अल्लाहच्या निशाण्यांनी भरलेले आहे? तुमची शरीर-रचना घ्या, किती आश्चर्यकारक गुंतागुंतीची व तरी किती सुरेखपणे नियंत्रित केली गेली आहे. दिवस व रात्र यांचे अविरत चक्र, जन्म आणि मृत्यू, तुमची निद्रावस्था व जागृतावस्था, ईशवैपुल्यातून प्राप्त करून स्वत:साठी संचय करण्याची तुमची अभिलाषा, ईशकृपेचे प्रतीक म्हणून पुढे धावणारे आणि आपल्याबरोबर काळ्या मेघांना घेऊन सुसाट वाहणारे वारे, मानवाच्या वंशांची विविधता, तरीही त्यांच्यातील आप्तभाव व मिलाफ, तसेच फळे, फुले, प्राणी, खुद्द मनुष्य - विलक्षण बुद्धिमत्ता बाळगणाऱ्या महान अस्तित्वाची जाण होण्यास या सर्व निशाण्या पुरेशा नाहीत काय?

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सत्याचे पुरावे तात्त्विक दृष्टीने गहन अगर दुर्बोध नाहीत. ते समजण्यासाठी फार मोठ्या कल्पनाशक्तीची गरज नाही. तशीच गरज जर असती तर ते मानवजातीच्या भल्या मोठ्या समूहासाठी-सामान्य माणसासाठी, जे अनिवार्यत: लाकडे फोडतात, विहिरीतून पाणी उपसतात, त्यांना मोठ्या दुर्दैवाची बाब ठरली असती. या काही पुराव्यांच्या संयुक्तिकपणाचे सामर्थ्य पहाण्यासाठी आणि जाणण्यासाठी प्रश्नांशी तात्त्विकपणे झगडण्याची काटेकोर पद्धती थोडीशी बाजुला ठेवली पाहिजे. तसेच जिला समंजस निष्क्रियता म्हटले जाते तिच्याऐवजी आचरण व सराव आणि त्याच्या जोडीला काही नीतिमूल्ये उदा. आदरभाव, मनाचा सरळपणा व जे अंतर्बाह्य पुरावे पुढे मांडल्यावर त्यांच्याबद्दल मनाचा खुलेपणा असणे आवश्यक आहे. विश्वाचे रहस्य पैगंबर मुहम्मद (स.) तसेच गतकाळातील अवलोकन करणाऱ्यांना बौद्धिक छाननीतून उमगले, इतकेच नाही तर प्रामाणिकपणे व प्रांजळपणे अंत:करणाची देवाण-घेवाण व उपयोग केल्यानेही उकल झाली होती. ही अवस्था पवित्र कुरआनने अत्यंत सुंदर शैलीत वर्णिली आहे.

''आणि हे पैगंबर (स.), अशाच प्रकारे आम्ही याला अरबी भाषेत कुरआन अवतरले आहे आणि यात वेगवेगळ्या प्रकारे इशारे दिले आहेत कदाचित या लोकांनी तिरक्या चालीपासून दूर राहावे अथवा त्यांच्यात काही शुद्धीवर येण्याची चिन्हे याच्यामुळे दिसावीत.''

(दिव्य कुरआन, २० : ११३)

परंतु पवित्र कुरआनच्या एकूण आग्रही उपदेशाकडे कुरैशच्या लोकांनी ऐकून न ऐकल्यासारखे केले. अल्लाहच्या निशाण्या पाहण्यास ते आंधळे झाले होते, सदाचाराकडे बोलविणारी आणि भ्रष्टाचार व घाणेरड्या सवयीपासून दूर राहण्यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दिलेली हाक ऐकण्यास ते बहिरे झाले होते. पवित्र कुरआनच्या शब्दांत त्यांच्याबद्दल सांगायचे झाले तर,

"त्यांच्याजवळ मने आहेत पण ते त्यांनी विचार करीत नाहीत, त्यांच्यापाशी डोळे आहेत पण ते पाहात नाहीत, त्यांच्याजवळ कान आहेत पण ते ऐकत नाहीत. ते जनावरांसारखे आहेत किंबहुना त्यांच्यापेक्षाही तुच्छ आहेत, हे ते लोक होत जे गफलतीत हरपले आहेत."

(दिव्य कुरआन, ७ : १७९)

पवित्र कुरआन ही वास्तवता दाखवून देतो की, चमत्कार दाखवून देण्याची त्या अश्रद्ध लोकांची मागणी ही प्रांजळपणावर आधारित नव्हती. पैगंबराचे उदात्त जीवन आणि ईशसंदेशाची भव्यता या दोनच गोष्टी कोणाही प्रामाणिक व प्रांजळ मनाच्या माणसाला, पैगंबर मुहम्मद (स.) हे अल्लाहचे खरे पैगंबर आहेत, हे पटण्यास पुरेशा होत्या. अश्रद्ध लोकांचा स्वत:चा अहंगंड, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शिकवणीविरूद्ध त्यांची गाऱ्हाणी व कुरकुर आणि त्यांचा अनुवांशिक कलह या सर्व गोष्टीमुळे त्यांना अशा तऱ्हेवाईक मागण्या करणे भाग पडले. सत्याचा शोध घेण्यात ते जर प्रामाणिक असते तर मुहम्मद (स.) यांच्या पैगंबरत्वावर विश्वास ठेवण्यासाठी खूप पुरावे उपलब्ध होते.

"ज्यांना ज्ञान नाही ते म्हणतात की अल्लाह स्वत: आमच्याशी कां बोलत नाही? किंवा आमच्याकडे एखादा संकेत कां येत नाही? अशाच गोष्टी यापूर्वीचे लोकही बोलत होते. त्या सर्वांची मनोवृत्ती सारखीच आहे. विश्वास ठेवणाऱ्यांसाठी तर आम्ही स्पष्टपणे संकेतवचने उघड केली आहेत. (यापेक्षा स्पष्ट संकेत कोणता असेल कि) आम्ही तुला सत्य ज्ञानासह शुभवार्ता देणारा आणि सावध करणारा बनवून पाठविले आहे."

(दिव्य कुरआन, २ : ११८-११९)

अद्‌भूत चमत्कार करून दाखविण्याच्या निकडीच्या तगाद्याच्या उत्तरादाखल पवित्र कुरआनने म्हटले आहे की मुहम्मद (स.) यांचे असाधारण पवित्र व पुण्यशील जीवन आणि त्यांच्यावर प्रकटलेला व थक्क करणारा अल्लाहचा ग्रंथ, या दोन गोष्टीच खुद्द महान चमत्कार असून, ते पैगंबराच्या दाव्यातील सत्यता सिद्ध करतात. हे महान चमत्कार आहेत आणि खचितपणे महान चमत्कारच ते आहेत. या मुद्द्यावर जोर देताना कुरआन म्हणतो,

"हे लोक म्हणतात, "का उतरविले गेले नाहीत या व्यक्तीवर संकेतचिन्हे याच्या पालनकर्त्याकडून?" सांगा, "संकेतचिन्हे तर अल्लाहपाशी आहेत आणि मी केवळ सावध करणारा आहे उघडपणे." आणि काय या लोकांसाठी हे संकेतचिन्ह पुरेसे नाही की आम्ही तुमच्यावर ग्रंथ अवतरला जो यांना वाचून दाखविला जातो? वास्तविक पाहता यात जे लोक श्रद्धा ठेवतात त्या लोकांकरिता कृपा आणि उपदेश आहे."

(दिव्य कुरआन, २९ : ५०-५१)



या सर्व आयतींमध्ये, कुरआन हेच सर्वात मोठे चमत्कार असल्याचे म्हटले आहे, कारण ते एका प्रेरित जिभेत ओतले गेले आणि त्या जिभेतून अज्ञात निसर्गाच्या अविष्काराचे, सद्‌सद्विवेकबुद्धीचे आणि भविष्य कथनाचे शब्द अविरतपणे बाहेर पडले. यापेक्षा मोठा चमत्कार तुम्ही मागत आहात, हे अश्रद्ध लोकांनो! ज्या अतुलनीय ग्रंथाने तुमचे तोंड बंद केले, ज्याच्या एका ओळीने तुमची सारी सोनेरी कवित्वशक्ती लाजीरावाणी व खजील केली आणि ती बंद पाडली आणि ते सर्व वैश्विक कृपाप्रसादाची सुवार्ता देण्यासाठी व जुलूम-अहंकाराला कडक ताकीद देण्यासाठीच.

पैगंबर मुहम्मद (स.) चे आगमन व उदय हा काही अनपेक्षित नाही, ही गोष्ट पवित्र कुरआनने विशद करून सांगितली आहे. त्यांच्यापूर्वी होऊन गेलेल्या सर्व पैगंबरांनी त्यांच्याविषयी स्वागतपर गीते गाईली होती, त्यांच्या अनुयायांना काटेकोरपणे त्यांचे अनुसरण करण्याचा आग्रही उपदेश केला होता, त्यांच्याकरवी असाधारण सुधारणा व विस्मयकारक घटना घडून येण्याची भाकिते वर्तविले गेली होती, त्यांच्या शिकवणीची परिपूर्णता व उदात्तता घोषित केली गेली होती आणि स्वत:ला त्यांच्या आगमनाची पूर्वसूचना देणारे असे म्हटले होते. कारण तीच ईशसूत्राच्या वाटणीची अंतिम योजना पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या वाट्याची होती.

" काय या (मक्कावासी) लोकांसाठी हा संकेत नाही की यास बनीइस्राईल (यहुदी) चे विद्वान जाणतात?" (दिव्य कुरआन, २६ : १९७)

"ते म्हणतात, हा इसम आपल्या पालनकर्त्याकडून एखादा संकेत (चमत्कार) का आणत नाही? आणि त्यांच्यापाशी पूर्वीच्या धर्मग्रंथाच्या सर्व शिकवणुकीचे वर्णन स्पष्टपणे आले नाही का?" (दिव्य कुरआन, २० : १३३)

पवित्र कुरआन आणखी एक गोष्ट उघड करतो की विश्वास न ठेवणारे लोक, अद्‌भूत चमत्कार दाखविण्याची जी निकडीची मागणी करत होते, ती त्यांच्या मागणीच्या प्रांजलपणामुळे नव्हे, तर सर्व प्रकारच्या आचरट बाष्कळपणाचे प्रश्न करून पैगंबर मुहम्मद (स.) यांना व त्यांच्या अनुयायांना मानसिक क्लेश पोहोचविण्याचा त्यांचा मूळ उद्देश होता, सर्व प्रकारच्या शंकाकुशंकांच्या आणि अपसमजांच्या गदारोळात, आपण सत्याच्या दिशेलाच वाहत जात आहोत हे जेव्हा त्यांना आढळून आले, तेंव्हा त्यांचा हटवादीपणा आणि त्यांचा स्वार्थ व आपलपोटेपणा आडवा आला. ते आपला धर्म त्यागण्यास तयार नव्हते, कारण त्यांना हे चांगले ठाऊक होते की, त्यामुळे इतरांचे शोषण करण्याच्या आणि स्वत:चे उखळ पांढरे करण्याच्या कित्येक साधनांना त्यांना मुकावे लागेल, त्यापासून वंचित व्हावे लागेल. त्यांना चांगली जाण होती की, जीवनाची आचारसंहिता म्हणून जर इस्लामचा स्वीकार केला तर त्यांच्या बेलगाम व स्वैर इच्छावासनांना

अनेक बंधनात पडावे लागेल आणि अन्याय व अनैतिक मार्गांनी जी भरमसाठ धनदौलत ते गोळा करीत, तसे कित्येक भौतिक लाभ त्यांना सोडून द्यावे लागतील. असे भौतिक लाभ ते शतकानुशतकापासून उपभोगत होते. ते जाणूनबुजून इस्लामला टाळत होते आणि त्याच्या वाढत जाणाऱ्या लाटेला थोपविण्याचा प्रयत्न करीत होते. इस्लाम विरोधकांची ही अंतिम उद्दिष्टे होती. त्यांना अद्भूत चमत्कार करूनही दाखविले असते, तरी त्यांच्याजवळ एखादा हिणकस हेतू त्यांनी उच्चारला असता आणि अल्लाहच्या महिमा व शक्तीला कमी लेखण्याचा प्रयत्न त्यांनी केला असता.

पवित्र कुरआन अशा अनेक उदाहरणांनी भरलेले आहे की, जेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी चमत्कार करून दाखविले तेव्हा अश्रद्ध लोकांपैकी दुराग्रही माणसांनी ते बाजुला झटकून टाकले व त्याचे महत्त्व कमी करण्यासाठी लोकांना त्यांनी सांगितले, ''हे तर केवळ जादूचे प्रयोग आहेत.'' उदाहरणार्थ, जेव्हा पैगंबर मूसा (अ.) यांनी एक अद्भूत चमत्कार घडवून दाखविला, तेव्हा अश्रद्ध लोकांनी कुत्सितपणे टोमणे मारले की ते केवळ जादूचे खेळ होते, ज्यांच्यायोगे ते त्यांची मति गुंग करण्याचा प्रयत्न करीत होते.

''परंतु जेव्हा आमची उघड उघड संकेतचिन्हे त्या लोकांसमोर आली तेव्हा त्यांनी सांगितले की, ही तर उघड जादू आहे. त्यांनी सर्रास अत्याचार आणि घमेंडीच्या मार्गाने त्या संकेतचिन्हांचा इन्कार केला, वस्तुतः त्यांच्या मनाला ते पटले होते. आता पहा, त्या उपद्रवी लोकांचा शेवट कसा झाला.'' (दिव्य कुरआन, २७ : १३-१४)

त्याचप्रमाणे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हातून जेव्हा काही चमत्कार घडवून दाखविण्यात आले, अश्रद्ध लोकांनी ते पूर्णतः नाकबूल केले आणि म्हणाले, ''ती केवळ जादू होती.''

'' मग फिरला आणि अहंकारात आला. सरतेशेवटी म्हणाला, हे काहीच नसून एक जादू जी पूर्वीपासून चालत आली आहे.'' (दिव्य कुरआन, ७४ : २३-२४)

या आयतीमध्ये नाकारणारे लोक इस्लामच्या छत्रछायेत का आले नाहीत, याचे कारणही सांगितले आहे. त्यांच्या ताठ्याने, अहंकाराने व त्यांच्या इस्लामद्वेषाने त्यांना सदाचाराचा मार्ग अंगीकारण्यापासून रोखून धरले होते.

नाकारणारे लोकांची हेकेखोरी होती की त्यांच्या आग्रहाने जेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या इशाऱ्यावर अल्लाहच्या चमत्काराने चंद्राचे दोन भाग करून टाकले, तेव्हा त्याकडे त्यांनी दुर्लक्ष केले आणि तो एक दृष्टीभ्रम आहे, असे म्हणत डोळ्यांवर पापण्या ओढून घेतल्या.

'' पुनरुत्थानाची घटका जवळ येऊन ठेपली आणि चंद्र दुभंगला. परंतु या



लोकांची स्थिती अशी आहे की मग कोणती का निशाणी पाहू नये, पराङ्मुख होतात आणि म्हणतात की ही तर नित्याचीच जादू आहे. यांनी (यालाही) खोटे ठरविले आणि आपल्या मनोवासनांचे अनुसरण केले. प्रत्येक बाबीला अखेरीस एक शेवट गाठावाच लागणार आहे.'' (दिव्य कुरआन, ५४ : १-३)

पवित्र कुरआन पुढे स्पष्टीकरण देतो की, नाकारणारे लोक धर्माबद्दल खोटा अभिमान बाळगणारे असत्याने व त्यांची दृष्टी वक्र व संकुचित असत्याने चांगले-वाईट, खरे-खोटे याबद्दल ते शहाणपणाने निर्णय घेऊ शकले नाहीत. भविष्यसूचक चिन्हे व अल्लाहच्या निशाण्या कितीही ठळकपणे व स्पष्टपणे दिसल्या तरी त्यांच्या खरेपणाचे आव्हान त्यांना नसे, कारण अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांना उद्धटपणाची व चढेलपणाची जी प्रवृत्ती ते सतत दर्शवित होते. त्यामुळे त्यांची सारासार विवेकबुद्धी जणू मृतप्राय झाली होती.

''त्यांच्या पालनकर्त्याच्या संकेतांपैकी एकही संकेत असा नाही जो त्यांच्यासमोर आला आणि ते त्यापासून पराङ्मुख झाले नाहीत.'' (दिव्य कुरआन, ६ : ४)

इतकी सर्व विधाने करूनही पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हेतुवर निंदानालस्ती व आक्षेप केले जात. नाकारणाऱ्या लोकांनी सामान्यजनांना असे पटविण्याचा निष्फळ प्रयत्न केला की, ज्या धर्माची प्रेरणा त्यांना ईशआदेशातून मिळाली आहे, असा जो दावा पैगंबर मुहम्मद (स.) करतात, त्याच्या पाठीमागे भौतिक लाभाची काही तर बाब होती. धर्माच्या नावाने क्लृप्त्या करून ते सत्ता, प्रतिष्ठा मिळवून त्यांच्यावर वर्चस्व मिळवू पाहात होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी जोडण्यात आलेल्या या आक्षेपांचे खंडन कुरआन जोरदारपणे करतो आणि पुन्हापुन्हा प्रतिपादन करतो की ते केवळ सावध करणारे आहेत, त्यांचे कार्य केवळ भयसूचना देणे, ताकीद देणे इतकेच आहे आणि धर्माच्या ऐरणीवर तापवून ठोकायला त्यांच्यापाशी स्वतःची कुऱ्हाड नाही.

''(हे पैगंबर (स.)) यांना सांगा की मी या प्रचाराबद्दल तुमच्याकडे कोणताही मोबदला मागत नाही, आणि मी बनावट लोकांपैकीही नाही. हा तर एक उपदेश आहे सर्व जगवासियांसाठी आणि थोडाच अवधी लोटेल जेव्हा तुम्हा स्वतःला याची स्थिती कळून चुकेल.'' (दिव्य कुरआन, ३८ : ८६-८८)

''यांना सांगा, ''जर मी तुमच्याकडे काही मोबदला मागितला असेल तर तो तुम्हालाच लखलाभ असो. माझा मोबदला तर अल्लाहकडे आहे आणि तो प्रत्येक वस्तूवर साक्षी आहे.'' (दिव्य कुरआन, ३४ : ४७)

पैगंबराच्या जीवन-चरित्राच्या अधिकारवाणीने केलेल्या नोंदीमध्ये असे दिसून येते

की मक्केतील त्या नेत्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांना महत्त्वाकांक्षेची लालसा दाखविण्याचे ठरविले. म्हणून वारंवार त्यांना आमिषे दाखवू लागले. एके दिवशी मक्केतील प्रतिष्ठित माणसांपैकी काहीजण काबागृहाच्या आवारात जमले, पैगंबर मुहम्मद (स.) यांना त्यांनी बोलावून घेतले आणि त्यांना उद्देशून म्हणाले,

''आम्ही संपूर्ण अरबस्तानात असा माणूस पाहिला नाही, ज्याने राष्ट्रावर इतके मोठे संकट आणले, जितके मोठे संकट तुम्ही उभे केले आहे. तुम्ही आमच्या देव-दैवतांची व आमच्या धर्माची निंदानालस्ती केली आहे, आमच्या पूर्वजांना आणि शहाण्या माणसांना तुम्ही अश्रद्धेची व घोर चुका केल्याची दूषणे लावली आहेत आणि आमच्यात कलह लावून टाकला आहे. आमच्याशी संबंध तोडण्यात तुम्ही कसलीही कसर शिल्लक सोडली नाही. हे सर्व तुम्ही धनसंपत्ती मिळविण्याच्या हेतुने जर करीत असाल, तर आम्ही सगळे जण मिळून तुम्हाला इतके द्रव्य द्यायला तयार आहोत, जितके धनद्रव्य कोणाही कुरैशी माणसापाशी आजवर नव्हते. तुम्हाला जर महत्त्वाकांक्षा असेल, तर तुम्हाला आमचे प्रमुख करायला आम्ही तयार आहोत. जर तुम्हाला राजेपद हवे असेल, तर तेही तत्काळ द्यायला आम्ही कबूल आहोत. एखाद्या दुष्टात्म्याने तुम्हाला झपाटले असेल आणि तुम्हाला भारावून त्यांच्या प्रभावाखालून सुटका करून घेण्याचा प्रयत्न करीत असाल तर आम्ही निपुण मांत्रिकाला बोलावून तुम्हाला बरे करतो.''

''तुमचे सर्वकाही सांगून झाले काय?'' पैगंबर मुहम्मद (स.) यांनी विचारले आणि सर्व सांगून पुरे झाल्याचे कळल्यावर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी बोलायला सुरूवात केली,

''तुम्ही देऊ केलेल्या गोष्टींपैकी कशाचीही मला आवश्यकता नाही. माझी मागणी काहीच नाही, धनसंपत्ती नाही, उच्च प्रतिष्ठा व मानमरातब नाही, राजेपदही नाही. मी तुम्हाकडे जे आणून पोचविले आहे त्याच्या मोबदल्यात मला काहीही नको आहे. मला तुमच्याकडे अल्लाहचा पैगंबर म्हणून पाठविण्यात आले आहे. सुवार्तेचा आणि ताकिदीचा तो एक संदेश आहे. मी ईशसंदेश तुमच्यापर्यंत पोहोचविण्याचे माझे कर्तव्य केले आहे आणि त्यात तुमचेच हित व कल्याण आहे. तुम्ही जर त्याचा स्वीकार केला तर या जगात तसेच पारलौकिक जीवनात तुमच्या कल्याणाची मी हमी देतो. तुम्ही जर तो संदेश नाकारला तर मी स्तब्ध राहीन आणि अल्लाहच्या निर्णयाची प्रतीक्षा करीन.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनात धरसोडवृत्तीचा व नैराश्याचा मागमूसही आपणास आढळून येत नाही. या सर्व काळात त्यांनी शांत व उत्तुंग प्रवृत्ती धारण केली होती. त्या काळात झालेल्या दिव्यबोधाच्या प्रकटीकरणाचा एकूण मुखवटा पाहिल्यास,



त्यावेळचा त्यांचा शांत आत्मविश्वास ठळकपणे उठून दिसतो आणि ते पैगंबर मुहम्मद (स.) यांचे बलस्थान होते.

नाकारणारे लोक आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यामधील हे संभाषण स्पष्टपणे दाखवून देते की, कुरैशच्या लोकांचा विरोध कोणत्या कारणास्तव होता.

मॉटगॉमेरी लिहितो, ''इस्लामला विरोध करण्याची ही अशी कारणे होती, त्याशिवाय, स्वार्थ, त्याच्या राजकीय व आर्थिक परिणामांची भीती आणि निव्वळ रूढीप्रियता असे होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांना ज्या प्रकारच्या अवस्थेला सामोरे जावे लागले, ती अत्यंतिक बेचैनी व अस्वस्थता होती. जिची लक्षणे राजकारणात, अर्थकारणात, समाजकारणात आणि बुद्धीवादात पसरलेली होती. त्यांचा संदेश हा मूलतः धार्मिक स्वरूपाचा होता, कारण त्याद्वारे, धार्मिक अस्वस्थेतेची कारणे दूर करण्याचा प्रयत्न केला गेला होता, परंतु त्यांचा परिणाम अन्य गोष्टींवरही झाला आणि त्यामुळे विरोधकांना अनेक पैलू मिळाले.

प्रकरण ५

# मक्काकालीन जीवनाची शेवटची अवस्था

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या मक्केतील वास्तव्याची अखेरची काही वर्षे महत्त्वाच्या घडामोडींची होती. इस्लामच्या लोकप्रियतेची लाट दिवसेंदिवस वाढत चालली होती आणि कुरैशांचा कडवा विरोध असतानाही पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अनुयायांची संख्या बरीच मोठी झाली होती. या काळातच दोन प्रभावशाली व्यक्ती, पैगंबर मुहम्मद (स.) यांचे चुलते माननीय हमजा (रजि.) आणि खत्ताबचे पुत्र उमर (रजि.) (जे नंतरच्या काळात दुसरे खलीफा) हे या नव्या श्रद्धेला येऊन मिळाले. 'अकबाह'ची प्रतिज्ञा झाली आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांना रात्रीचा प्रवास करण्यास सांगण्यात आले. या प्रवासाला 'मेअराज' म्हणून संबोधले जाते.

## नवे बळ

ही घटना 'इब्ने हिशाम' मध्ये नमूद केलेली आहे की, एके दिवशी पैगंबर 'सफा'च्या टेकडीवर बसलेले होते. अबू जहल तेथून चालला होता. त्याने जवळ येऊन पैगंबर शिकवण देत असलेल्या धर्माबद्दल, त्यांना हटकले. पैगंबर मुहम्मद (स.) शांत राहिले व त्यांनी एक शब्दही उच्चारला नाही. नंतर तो तेथून निघून गेला आणि काबागृहाजवळ कुरैशी लोकांचे एक टोळके बसले होते, त्यांच्यात जाऊन मिसळला. त्यानंतर थोड्याच वेळात माननीय हमजा (रजि.) शिकार करून परत येत होते, धनुष्य त्यांच्या खांद्यावर लटकलेले होते आणि त्याच वाटेने ते चालले होते. अब्दुल्लाह बिन जुदानच्या एका दासीने अबू जहलचा संतापलेला चेहरा पाहिला होता. ती माननीय हमजा (रजि.)यांना म्हणाली, ''हे अबू उमराह! तुमच्या पुतण्याला अबुल हकमने अर्वाच्य भाषा वापरली, ते दृश्य तुम्ही पाहिले असते तर? त्याने लाजीरावाण्या शब्दांत त्यांना खडसावले आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांना अगदी विपरीत शब्द वापरले. परंतु त्यांनी काहीच उलट उत्तर दिले नाही.''

हे ऐकताच माननीय हमजा (रजि.) यांना असा धक्का बसला की ते लगबगीने काबागृहाकडे गेले. ते पवित्र धर्मस्थळाच्या आवारात कुरैशी टोळक्याच्या मध्ये अबू जहल बसलेला त्यांना दिसला. माननीय हमजा (रजि.) त्याच्या अंगावर धावून गेले आणि आपले धनुष्य जोराने त्याच्या डोक्यावर हाणून म्हणाले, ''तू मुहम्मद (स.) यांना अर्वाच्य भाषा करीत होतात, मी सुद्धा त्याच्या धर्माचे अनुयायित्व पत्करतो आणि त्याच्या शिकवणीचे पालन करतो. तुझी हिंमत असेल तर माझ्यावर उलट प्रहार कर.'' बनू



मखजुमची माणसे अबू जहलच्या मदतीला धावून आली पण अबू जहलने त्यांना परत जाण्यास सांगितले व म्हणाला, अबू उमराहला एकटाच सोडा. ईश्वराची शपथ मी त्याच्या पुतण्याची लज्जास्पद शब्दांत निर्भर्त्सना केलीच आहे.'' तेथून माननीय हमजा (रजि.) तडक अरकमच्या घरी थेट गेले. पैगंबरांकडून इस्लाम धर्माची दीक्षा घेतली. माननीय हमजा (रजि.) यांनी इस्लाम धर्मात प्रवेश केल्याने ते नव्या श्रद्धेला आणि तिच्या अनुयायांना मोठे बळ प्राप्त होण्याचे साधन ठरले.

इस्लामच्या बळात आणखी एक लक्षणीय भर पडली ती, खत्ताबचे पुत्र माननीय उमर (रजि.) यांनी इस्लाममध्ये प्रवेश केल्याने. ते अत्यंत निर्भय, शूर व करारी निश्चयाचे होते, मक्केतील सर्वांवर त्यांचा दरारा व आदर होता आणि इस्लामची दीक्षा घेईपर्यंत ते या नव्या श्रद्धेचे कडवे शत्रू होते. परंपरागत निवेदनावरून असे कळते की, एकदा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपले दोन्ही हात आकाशाकडे उंचावून प्रार्थना केली की, ''हे अल्लाह, इस्लामला शक्ती दे, विशेषकरून उमर बिन खत्ताब यांच्याकरवी.'' ही प्रार्थना स्वीकारली गेली आणि त्यांनी इस्लामला कवटाळले. त्यांच्या इस्लाम दीक्षा घेण्याचा वृत्तान्त फारच मनोरंजक आहे.

एके दिवशी हातात नंगी तलवार घेऊन पैगंबर मुहम्मद (स.) यांना ठार करण्याच्या इराद्याने उमर घराबाहेर पडले. त्यांना संतापाचा मोठा झटका आला होता. ते दात ओठ खात संतापाचे फूत्कार सोडत होते. अर्ध्या वाटेतच त्यांचे मित्र नुअएम बिन अब्दुल्लाह (रजि.) यांच्याशी त्यांची योगायोगाने भेट झाली. त्याने सहज विचारले की ते संतापाने इतके बेभान का झाले आहेत आणि त्या संतापाचा विस्फोट कोणावर होणार आहे?

क्रुद्ध स्वरात उमरने उत्तर दिले, ''त्या साबई (धर्मभ्रष्ट) माणसाला, मुहम्मदला ठार करण्यासाठी निघालो आहे, ज्याने कुरैशी लोकांचा एकोपा मोडून टाकला, त्यांच्या धर्माला भगधाडे पाडली, त्यांच्या शहाण्या पूर्वजांचे दोष काढले आणि त्यांच्या देव-दैवतांची निंदा-नालस्ती केली आहे.''

''देवाची शपथ, माननीय उमर (रजि.)! तुमच्या अंत:करणाने तुमची दिशाभूल व फसगत केलेली दिसते. तुम्ही पैगंबर मुहम्मद (स.) यांना ठार केलेत तर बनू अब्द मनाफ तुम्हाला भूमीवर हिंडायला-फिरायला जिवंत सोडतील, असे तुम्हाला वाटते? तुम्ही आधी तुमच्या कुटुंबातील लोकांबद्दल दक्षता घ्या आणि त्यांना ताळ्यावर आणण्याचे काम आधी का करत नाही.''

''माझ्या कुटुंबातले कोणते लोक?'' माननीय उमर (रजि.) यांनी रागाने थरथरत विचारले.

"तुमचे चुलतबंधु व मेव्हणे सईद बिन जैद आणि तुमची बहीण फातिमा. अल्लाहची शपथ, त्यांनी इस्लाम धर्म स्वीकारला असून मुहम्मदचे अनुयायित्व त्यांनी पसंत केले आहे. म्हणून तुम्ही आधी त्यांच्याकडे पाहा."

माननीय उमर (रजि.) यांनी आपली पावले त्यांच्या बहिणीच्या घराकडे वळविली. जेव्हा ते घरापाशी पोहोचले तेव्हा घरातून माननीय खब्बाब बिन अरत (रजि.) यांचा कुरआन पठनाचा स्वर ऐकू आला. ते कुरआनातील 'तॉहा'चा अध्याय त्या दोघांना वाचून ऐकवत होते. माननीय खब्बाब बिन अरत (रजि.) यांनी बाहेर पावलांचा आवाज ऐकला आणि एका कपाटात लपून बसले. माननीय फातिमा (रजि.)ने कुरआनचे ते पान उचलून लपविले. परंतु उमरने ती वाणी ऐकलीच होती.

"आता मी जे ऐकले ते कसले स्वर होते?" संतापाने लाल होऊन खत्ताबपुत्राने विचारणा केली.

त्यांच्या बहिणीने व तिच्या पतीने उत्तर दिले, "तुम्हाला काहीच ऐकू आले नाही."

रागाने तलवार परजत उमर म्हणाले, "तुम्ही मुहम्मदच्या धर्माची दीक्षा घेऊन त्याचे अनुयायी बनला आहात अशी भीती मला वाटते."

त्यांनी माननीय सईद बिन जैद (रजि.)च्या अंगावर झेप घेतली परंतु रक्षणासाठी माननीय फातिमा (रजि.) आडवी आली. त्यावर उमरने बहिणीवर हल्ला करून तिच्या डोक्यावर एक जोरदार प्रहार केला.

पति-पत्नी दोघेही गौप्यस्फोट रोखू शकले नाहीत. त्यांनी ओरडून सांगितले, "होय! आम्ही मुस्लिम झालो आहोत. आम्ही अल्लाहवर व त्याचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर विश्वास व इमान धारण करतो. काय करणार आहात ते तुम्ही करून घ्या."

माननीय उमर (रजि.) यांनी आपल्या लाडक्या बहिणीचा रक्ताने माखलेला चेहरा पाहिला तेव्हा त्यांचे अंत:करण थोडेसे द्रावले ते शांत झाले व म्हणाले, "तुम्ही काय वाचत होता ते जरा मला पाहू द्या म्हणजे मुहम्मदने काय आणले आहे, ते तरी मला कळेल."

माननीय फातिमा (रजि.) आढेवेढे घेत म्हणाली, "ते तुमच्या हातात देण्याची मला भीती वाटते."

माननीय उमर (रजि.) यांनी अल्लाहची शपथ घेऊन सांगितले की वाचून झाल्यावर ते त्यांच्या हवाली करतील. त्याच्या आश्वासनाने माननीय फातिमा (रजि.) यांची खात्री पटली, परंतु ती उद्‌गारली, "मूर्तीपूजेने तुम्ही मलीन झालेले आहात, म्हणून



हे बंधु! शूचिर्भुत माणसाखेरीज त्याला कोणीही स्पर्श करू शकत नाही. कमीत कमी तुमचे दोन्ही हात तरी तुम्ही स्वच्छ धुवून घ्यावे."

म्हणून उमर उठले आणि त्यांनी आपले दोन्ही हात स्वच्छ धुवून घेतले. त्यांनी कुरआनचे पान हातात घेतले आणि 'तॉहा' च्या अध्यायातील सुरवातीच्या ओळी वाचू लागले,

"आम्ही हे कुरआन तुमच्यावर यासाठी अवतरले नाही की तुम्ही संकटात पडावे. हे तर एक पुन:स्मरण होय. अशा प्रत्येक इसमासाठी ज्याने भीती बाळगावी. अवतरले गेले आहे त्याच्याकडून ज्याने निर्माण केले पृथ्वी आणि उत्तुंग आकाशांना. तो परमदयाळू (सृष्टीच्या) राजसिंहासनावर विराजमान आहे. स्वामी आहे त्या सर्व वस्तूंचा ज्या आकाशांत व पृथ्वीत आहेत, ज्या पृथ्वी व आकाशांच्या दरम्यान आहेत आणि ज्या मातीखाली आहेत." (दिव्य कुरआन, २० : २-६)

माननीय उमर (रजि.) यांनी मोठ्या आस्थेने ते वाचले आणि त्याच्या लयबद्धतेने त्यांचे देहभान हरपले. त्याच्या चित्ताकर्षक आवाहनाने त्यांची इतकी समाधी लागली की जेव्हा ते या ओळीला पोहोचले, "खचितच मी, मीच तुमचा स्वामी आहे, माझ्याखेरीज अन्य कोणीही ईश्वर नाही. म्हणून माझीच बंदगी करा आणि स्मरणाखातर उपासना करीत राहा."

तेव्हा ते उद्‌गारले, "किती उत्कृष्ट आहे हे, किती शानदार!"

हे माननीय खब्बाब (रजि.) यांनी जेव्हा ऐकले. तेंव्हा लपलेल्या जागेतून ते समोर येऊन म्हणाले, "हे उमर! मला वाटते अल्लाहने पैगंबर मुहम्मद (स.) यांची प्रार्थना मान्य केली, कारण कालच ते असे उद्‌गारल्याचे मी स्वत: ऐकले की, हे अल्लाह! उमरकरवी तू इस्लामची शक्ती वाढव."

माननीय उमर (रजि.)! म्हणाले, "हे खब्बाब! मला पैगंबराकडे घेऊन चल, म्हणजे मी त्यांच्यासमोर समर्पण करतो."

माननीय खब्बाब (रजि.) त्यांना घेऊन 'सफा'च्या घरी गेले, जेथे पैगंबर मुहम्मद (स.) आपल्या साथीदारांसह राहात होते. आपल्या हातातील तलवार वर्तुळाकार डुलवितच माननीय उमर (रजि.) त्या ठिकाणी पोहोचले. त्यांनी दार ठोठावले. अनाहूत कोण आले, हे पाहण्यासाठी सोबती डोकावू लागले. एकाने दारातील एका छिद्रातून पाहिले. आणि लगेच मान मागे वळविली आणि उद्‌गारला, "उमर नंगी तलवार हातात घेऊन आला आहे."

अब्दुल मुत्तलिबचे पुत्र माननीय हमजा (रजि.) आपल्या मित्रांच्या मनातील भीती दूर करीत म्हणाले, ''त्याला आत येऊ द्या. मित्र म्हणून आम्ही त्याचे स्वागत करू, शत्रू म्हणून आला असेल तर त्याच्याच तलवारीने त्याचे शीर छाटून टाकू.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सोबत्यांना दार उघडण्यास सांगितले. खत्ताबपुत्र आत आले. त्या भयंकर अनाहूत पाहुण्याचे स्वागत करण्यास पैगंबर मुहम्मद (स.) समोर आले आणि त्याच्या येण्याचे कारण विचारले.

त्यावर माननीय उमर (रजि.) म्हणाले, ''हे अल्लाहचे पैगंबर! मी एवढ्यासाठी येथे आलो आहे की अल्लाहवर व त्याच्या पैगंबरावर आणि जे काही त्याने आपल्या स्वामीकडून आणले आहे, त्यावर विश्वास व इमान धारण करावे.''

अत्यानंदाने पैगंबर मुहम्मद (स.) मोठ्याने ओरडले, ''अल्लाहु अकबर!'' (अल्लाह सर्वश्रेष्ठ आहे!)

माननीय उमर (रजि.) यांच्या इस्लाम प्रवेशाची ही साधी घटना ठळकपणे दर्शविते की, ज्यांनी कुरआन लक्ष देऊन ऐकला किंवा वाचला तर त्याचा किती मोठा प्रभाव त्यांच्या मनावर पडत असे. ईशवाणी, त्यांची अंत:करणे कशी जिंकत असे, हे ती घटना दर्शविते. उदात्त शैलीतील त्याच्या संक्षिप्त ओळी, लयबद्ध असणारी त्याची छोटी अर्थपूर्ण वाक्ये, यांच्यात अभिव्यक्तीची इतकी शक्ती होती की, एखाद्या कडव्या शत्रूला ते उत्कट कौतुक करणाऱ्या मित्रात रूपांतर करीत. मातीचे सोन्यात रूपांतर होणे, ही गोष्टसुद्धा तुलनेत फिकी ठरेल, या घटनेसमोर जेंव्हा ठार मारण्यासाठी विडा उचलेला शत्रू रातोरात बदलतो आणि त्यांच्यावर मनस्वी श्रद्धा बाळगणारा मित्र होतो. तसेच मानवजातीबद्दल पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अंत:करणात किती अतीव प्रेम होते, हे या घटनेने दिसून येते. त्यांच्या शांत व प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्वात एक आगळेच आकर्षण होते. नेकीच्या व सात्त्विक मार्गावर बोलावण्याच्या तीव्र इच्छेने त्यांचे अंत:करण सदासर्वदा किती तळमळत असे. आपल्या कट्टर शत्रूलासुद्धा सर्वोच्च प्रेम देण्यास ते नेहमी तत्पर असत. कसल्याही पूर्वग्रह दोषापासून त्यांचे मन निर्मळ होते.

माननीय हमजा (रजि.) आणि माननीय उमर (रजि.) यांची इस्लामदीक्षा हे इस्लामचे महान यश ठरले. त्यांच्या इस्लाम प्रवेशाचा परिणाम इतका मोठा झाला की, जे इमानधारक लोक त्यावेळपर्यंत आपापल्या घरात, लपतछपत व गुप्ततेने अल्लाहची प्रार्थना व उपासना करीत, ते आता उघडपणे काबाच्या धर्मस्थळात गोळा होऊन अल्लाहची उपासना करू लागले. यामुळे त्यांचे मनोबल उंचावले आणि कुरैशी लोकांच्या मनात धास्ती आणि अस्वस्थता घर करू लागली.



## मेअराज

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या मक्केतील जीवनाचा शेवटचा कालावधी मक्केपासून अतिदूर असलेल्या जेरूसलेम येथील मस्जिदीपर्यंतचा प्रवास आणि तेथून अंतराळ आणि सप्त-आकाशातील उड्डान (प्रवास). तेथील स्नेहयुक्त आदर देणाऱ्या अन्य पैगंबरांच्या गाठीभेटीचा आनंद घेत आणि ईशदूतांच्या भेटी घेत, ते प्रत्यक्ष सर्वशक्तिमान अल्लाहच्या समक्ष जाऊन पोहोचले. जेथे जिब्रिलशिवाय अन्य कोणीही जाऊ शकत नव्हते; या सर्व घटनांसाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या मक्केतील जीवनाचा शेवटचा कालावधी विख्यात आहे.

या महत्त्वाच्या प्रवासाला 'मेअराज' असे म्हटले जाते, ज्याचा शब्दश: अर्थ ऊर्ध्वगमन असा आहे. इस्लामी परिभाषेत पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सप्त-आकाशातील ऊर्ध्वगमनाला 'इस्त्रा' असे म्हटले जाते व त्याचा अर्थ रात्रीचा प्रवास असा होतो. या प्रवासाचे वर्णन कुरआनमध्ये सूरह १७ व सूरह ५३ मध्ये दिललेले आहे.

''पवित्र आहे तो जो घेऊन गेला एका रात्री आपल्या भक्ताला मस्जिदेहराम (काबा मस्जिद) पासून दूरच्या त्या मस्जिदपर्यंत जिच्या वातावरणाला त्याने समृद्धी दिली आहे जेणेकरून त्याला आपल्या काही संकेतांचे निरीक्षण घडवावे.''

(दिव्य कुरआन, १७ :१)

या ओळीवरून पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या प्रवासाचा पहिला टप्पा मक्का ते जेरूसलेम होता, हे दिसून येते. तसेच त्या प्रवासाचा उद्देश अल्लाहच्या शक्तीचा महिमा अद्‌भूत चमत्कार घडवून दाखविण्याचा होता, हेही कळते. लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की, या प्रवासाला रात्रीचा एक अंश इतकाच वेळ लागला, जेव्हा मक्का व जेरूसलेम यांच्या दरम्यानचे अंतर शेकडो मैल आहे.

कुरआनचा दुसरा एक अध्याय क्रमांक ५३ मध्ये सप्त-आकाशात पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जे अनुभवले आणि ईशतेजाचा अविष्कार अगदी जवळून पाहिला, त्याबद्दल सविस्तर वर्णन दिले गेले आहे.

या दोन्ही ठिकाणी त्या घटनांचे वर्णन अनन्यसाधारण असे करण्यात आले आहे आणि कुरआनचे कथन हा निष्कर्ष खोटा सिध्द करते की ती संपूर्ण घटना म्हणजे एक स्वप्नानुभव होता.

'बुखारी' आणि 'मुस्लिम' यासह अधिकारवाणी असणाऱ्या अनेक हदीसच्या ग्रंथांमध्ये आणि हदीसीच्या अन्य विश्वासार्ह संकलनामध्ये पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या उक्ती-आचरणाचा उल्लेख आहे. येथे, त्यापैकी काही आम्ही उद्‌धृत करीत आहोत. तो

अनन्यसाधारण अनुभव पैगंबर मुहम्मद (स.) यांनी खालील शब्दांत वर्णन केला आहे.

''अबू तालीबची कन्या आणि अलीची बहीण उम्मे हानीच्या मक्का येथील घरात, एके रात्री मी झोपलो असताना 'जिब्रिल' माझ्यापाशी आले. त्यांनी घराचे छत फाडून मला काबानजीक हतीम येथे आणले. त्यांनी हृदयाच्या बाजूने माझी छाती उघडून मोकळी केली, एका सोन्याच्या भांड्यात 'जमजम' च्या पाण्याने ती स्वच्छ धुतली, अक्कल, चातुर्य आणि दया-कृपा त्यात भरली आणि पुन्हा हृदय जागच्याजागी, होते तसे ठेवून दिले. नंतर त्यांनी 'बुराक' नावाचा एक घोडा आणला. त्याच्यात विद्युल्लतेची चपलता व तेज होते. त्याचा रंग पांढरा शुभ्र, आकार खेचरापेक्षा लहान पण गाढवापेक्षा उंच होता. त्याची गती इतकी वेगवान होती की माणसाची नजर पोहोचेल त्या अंतरावर त्याचे दुसरे पाऊल पडे. मला त्याच्यावर त्यानी स्वार होऊ दिले व जेरूसलेममध्ये तेथील एका उपासनागृह (अक्सा) आल्यानंतर जेथे सर्व पैगंबर आपले घोडे बांधीत असत, तेथे तो घोडा बांधला त्या उपासनागृहात दोन रकअत नमाज अदा करण्यात मी अन्य सर्व पैगंबरांचे नेतृत्व केले. त्यानंतर त्याच घोड्यावर बसवून जिब्रिलने मला सप्तआकाशात नेले.

आम्ही पहिल्या आकाशात पोहोचलो, तेव्हा तेथील द्वारपाल ईशदूत म्हणाला, ''तुमचे आगमन आदरणीय असो'' आणि त्याने प्रवेशद्वार उघडले. इतर ईशदूतांनी माझे अभिनंदन केले व दरवाजा उघडला. मी आदरणीय येशू (अ.) आणि आदरणीय याहया (अ.)(त्यांच्यावर शांती असो) यांना भेटलो आणि त्यांना अभिवादन केले. त्यांनी अभिवादनाचे प्रत्युत्तर दिले. आणि म्हणाले, ''हे आमच्या चांगल्या बंधु! तुमचे आगमन आदरणीय असो.'' नंतर माझ्या पैगंबरत्वावर आपली इमान व्यक्त केली. मग मी तिसऱ्या आकाशात पोहोचलो. तेथे मला आदरणीय यूसुफ (अ.) भेटले. (त्यांच्यावर अल्लाहची शांती असो.) आणि त्यांना सलाम केला. त्यांनी सलामचे उत्तर दिले. आणि माझे स्वागत केले. आणि माझ्या पैगंबरत्वावर त्यांनी विश्वास व इमान प्रगट केली. मग मला पाचव्या आकाशात नेण्यात आले. त्यांनी सलामचे उत्तर दिले. आणि मग मी सहाव्या आकाशात पोहोचलो. तेथे मला आदरणीय मूसा (अ.) भेटले तेथे मला आदरणीय हारून (अ.) भेटले. मी त्यांना सलाम केला. त्यांनी प्रत्युत्तर दिले. नंतर मी सातव्या आकाशात पोहोचलो. तेथे मला आदरणीय इब्राहीम (अ.) भेटले. मी त्यांना सलाम केला त्यांनी उत्तर दिले. तेथून मला 'सिदरतुल-मुन्तहा'कडे नेण्यात आले. नंतर मला 'बैत-अल् मामूर' दाखविण्यात आले. ही काबाची प्रतिकृती असून त्याला दररोज हजारो ईशदूत परिक्रमा घालीत असतात. एकदा एक ईशदूताने परिक्रमा घातली की कयामतच्या दिवसापर्यंत त्याचा नंबर पुन्हा येत नाही. मी जन्नत (स्वर्ग) आणि जहन्नम (नरक) पाहिले. मग



आदरणीय जिब्रिल (अ.) तेथेच थांबले आणि मला अल्लाहच्या समक्ष रूजू करण्यात आले.

अल्लाहचे दैदिप्यमान वैभव, त्याचे तेजोवलय पाहून मला थरार-अनुभूती झाली. माझ्या अनुयायांनी दररोज पन्नास वेळा नमाज अदा करावी, अशी आज्ञा झाली. परत येताना मी आदरणीय मूसा (अ.) यांना भेटलो आणि सांगितले की माझ्या अनुयायांना दिवसातून पन्नास वेळा नमाज अदा करण्याची आज्ञा झाली आहे. आदरणीय मूसा (अ.) म्हणाले, ''तुमचे अनुयायी इतक्या वेळा नमाज अदा करू शकणार नाहीत. मी इस्त्राईलच्या संततीवर तो प्रयत्न पूर्वीच करून पाहिला आहे.'' मी आदरणीय मूसा (अ.) यांना हे सांगितले तेव्हा त्यांनी मला नमाजची संख्या कमी करून आणण्यास सांगितले. मी अल्लाहच्या हुजुरात पुन्हा रूजू झालो आणि सांगितले की, माझे अनुयायी इतक्या मोठ्या संख्येतील दररोजच्या नमाजचा भार पेलवू शंकणार नाहीत. सर्वशक्तिमान अल्लाहचे वैभव असो, त्याने दहा वेळची नमाज कमी केली. मग परतताना पुन्हा आदरणीय मूसा (अ.) भेटले. आणखी सूट मिळविण्याची त्यांनी मला गळ घातली. मी पुन्हा जाऊन माझ्या स्वामीची विनवणी करून आणखी कपात विचारली. मी मूसाच्या सुचनेवरून पुनःपुन्हा अल्लाहच्या हुजुरात जात राहिलो आणि कपातीची विनवणी करीत राहिलो.

अखेरीस दिवसात पाच वेळा नमाजची संख्या राहिली. मूसाने आणखी संख्या कपातीचा प्रयत्न करून पाहण्यास मला सांगितले, मी म्हणालो, ''पवित्र व सर्वोच्च अल्लाहसमोर आणखी कपात मागण्यास जाण्याची आता मला लाज वाटत आहे. मी दिवसात पाच वेळेची नमाज कबुल करतो. अल्लाहने आदेश दिला आहे की, या पाच वेळेच्या नमाजचे पुण्यफळ पन्नास वेळेच्या नमाज अदा करण्याच्या पुण्यफळाइतके असेल.''

हदीसमध्ये याचीही नोंद आहे की बैतुल मक्दिसमध्ये पैगंबर मुहम्मद (स.) यांनी इतर सर्व प्रेषितांसह नमाज अदा करताना त्यांचे नेतृत्व केले होते.

'मेअराज'च्या वृतान्ताचे पवित्र कुरआनमध्ये जे वर्णन आलेले आहे आणि हदीसमध्येही जे वर्णन आले आहे, ते स्पष्टपणे दर्शविते की ती काही स्वप्नातली घटना नव्हती, तर तो एक थक्क करणारा थरारक असा प्रत्यक्ष अनुभव होता. १७ व्या अध्यायातील वर्णनाचा आरंभ, मुहम्मद (स.) यांच्यावर त्याने दाखविलेल्या अनन्यसाधारण अनुग्रहासाठी, अल्लाहच्या वैभवाच्या प्रशंसेने व गुणगानाने होतो. ते जर स्वप्नच असते तर त्याचा विशेष उल्लेखही अनाठायी व विसंगत व अर्थशून्य ठरला असता, कारण स्वप्नात तर काही सेकंदातच दोन्ही 'लोकां'चे दर्शन माणूस करू शकतो.

आणखी 'मेअराज'चा उल्लेख 'इस्त्रा' या शब्दाने झाला आहे. त्याचा अर्थ सदेह

प्रवास रात्रीच्या वेळेचा, असा होतो आणि पवित्र कुरआननेसुध्दा तसेच दर्शविले आहे.

''तेव्हा दूतांनी त्याला सांगितले, ''हे लूत (अ.), आम्ही तुझ्या पालनकर्त्याचे पाठविलेले दूत आहोत, हे लोक तुझे काहीच बिघडवू शकणार नाहीत बस्स तू थोडी रात्र उरली असता आपल्या कुटुंबियांना घेऊन निघून जा.''

(दिव्य कुरआन, ११ : ८१)

तसेच पवित्र कुरआनच्या दुसऱ्या एका अध्यायात हे स्पष्टपणे सांगण्यात आले आहे,

''आम्ही मूसा (अ.) ला दिव्यबोध (वह्य) पाठविला की, ''रात्रीच्या रात्रीच माझ्या दासांना घेऊन निघून जा, तुमचा पाठलाग केला जाईल.'' (दिव्य कुरआन, २६:५२)

येथे 'असरा' शब्द रात्रीचा प्रवास असा अर्थ दर्शवितो आणि सदेह हालचालीचा तो संदर्भ देतो.

या गोष्टीचीही नोंद झाली आहे की, मेअराजचे वृत्त जसे चहूकडे पसरले, तसे नाकारणारे माणसे त्याची टर उडवू लागले. ते जर केवळ स्वप्न असते, तर त्याबद्दल अशी प्रतिक्रिया होण्याचा प्रसंग उद्‌भवला नसता.

तरीही पवित्र कुरआन आम्हाला सांगतो की त्या घटनेने लोकांमध्ये चांगलीच खळबळ माजविली आणि कुशंकेखोर श्रोत्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर सर्व प्रकारच्या प्रश्नांचा भडिमार केला,

''तुझ्या पालनकर्त्याने या लोकांना वेढून टाकले आहे. आणि हे जे काही आम्ही तुम्हाला आता दाखविले आहे याला आणि त्या झाडाला ज्याला कुरआनमध्ये धिक्कारले गेले आहे, आम्ही या लोकांसाठी केवळ एक उपद्रव बनवून ठेवले आहे. आम्ही यांना इशाऱ्यावर इशारा देत राहिलो आहोत, परंतु प्रत्येक इशारा त्यांच्या शिरजोरीत वाढ करीत राहिला आहे.'' (दिव्य कुरआन, १७ : ६०)

ही ओळ स्पष्टपणे दर्शविते की ती अनन्यसाधारण घटना, ही मानवासाठी एक दिव्य बनले. एक सर्वसाधारण माणूस या गोष्टीची कल्पनाही करू शकत नाही की, माणूस सदेह सप्त आकाशांत उर्ध्वगमन करू शकतो. ते जर स्वप्नच असते तर त्या घटनेची इतकी सर्वदूरपर्यंत चर्चा झाली नसती, जशी या घटनेने झाली. अब्दुल्लाह बिन अब्बास, ज्यांचा पवित्र कुरआनचा व्यासंग फार गाढा होता, म्हणतात की वरील ओळीत जो 'रूया' शब्द आला आहे, त्याने प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेले दृश्य असा अर्थ निघतो. झोपेत असताना स्वप्नात पाहिलेले ते दृश्य होते असा जे दावा करतात, तो दावा ते पूर्णत: खंडित करतात.



ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे की अरबी भाषेत 'रूया' स्वप्नात पाहिलेले दृश्य आणि जागृतावस्थेत प्रत्यक्षात डोळ्यांनी पाहिलेले दृश्य, या दोन्ही अर्थांनी वापरला जातो व त्याच्या वापरातील वाक्याच्या संदर्भानुसारच त्याचा अर्थ लावला जातो. सुप्रसिध्द कवी मुतनब्बी बद्र बिन अम्मार, त्याची प्रशंसा करताना लिहितो,

''रात्र संपली आहे, परंतु तुझी प्रशंसा संपली नाही. झोपेत स्वप्नातील तुझ्या दर्शनापेक्षा, प्रत्यक्ष डोळ्यांनी तुला पाहणे अधिक मोहक व आकर्षक आहे.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे सदेह उर्ध्वगमन झाले, या घटनेला, पवित्र कुरआन, सूरह 'नज्म'मध्ये पुष्टी देतो,

''तो समोर येऊन उभा राहिला जेव्हा तो वरील क्षितिजावर होता, मग जवळ आला आणि वर अधांतरी झाला, येथपावेतो की दोन धनुष्याइतके किंवा त्याहून काही कमी अंतर उरले.तेव्हा त्याने अल्लाहच्या दासाला दिव्यबोध पोचविले जे काही दिव्यबोध त्याला पोहोचवायचे होते. दृष्टिने जे काही पाहिले, मनाने त्यात असत्य मिसळले नाही. आता काय तुम्ही त्या गोष्टीवर त्याच्याशी भांडता ज्याला तो डोळ्यांनी पाहतो? आणि एकदा पुन्हा त्याने 'सिदरतुल मुन्तहा' (चरम सीमेवरील बोरीचे झाड) जवळ त्याला उतरताना पाहिले जेथे जवळच निवासाचा स्वर्ग (जन्नतुल मावा) आहे. त्यावेळी बोरीला आच्छादित होते जे काही आच्छादित होते. दृष्टी न विचलित झाली न मर्यादेपलीकडे गेली, आणि त्याने आपल्या पालनकर्त्याचे मोठमोठे संकेत पाहिले.'' (दिव्य कुरआन, ५३ :६-१८)

हदीसचे गाढे विद्वान नक्वी, त्यांच्या 'मुस्लिम सही' हदीससंग्रहात भाष्य करताना संक्षिप्तपणे लिहितात,

''फार मोठ्या बहुसंख्येत, लोक ही गोष्ट मान्य करतात, ज्यांच्यामध्ये सुरूवातीच्या काळातील नोकरवर्ग, धर्मशास्त्रज्ञ, न्यायशास्त्र, मुहद्दीसीन (हदीस लिहिणारे) आणि गाढ्या अभ्यासकांचा समावेश आहे की, पैगंबर मुहम्मद (स.) यांचे सप्त आकाशातील उर्ध्वगमन, हे सदेहच झाले. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सोबत्यांनी जी परंपरागत निवेदने व वृत्तांत वर्णिले, त्यांचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यास व चिंतन केल्यास, त्यातील सत्यता पटते.''

हदीसच्या या नामांकित भाष्यकाराचे मत, त्या वास्तवतेला दर्शविते की मेअराजची घटना ही पैगंबर मुहम्मद (स.) यांची अनन्यसाधारण अनुभूती होती, ज्यात देह आणि आत्मा दोन्हीही सहभागी झाले होते. या मताचा सर्व जगभराच्या मुस्लिम विद्वानांनी स्वीकार केला आहे, तसेच अनेक पंथाच्या गूढवादी तत्त्ववेत्यांनीही स्वीकार केला आहे. जर काही मतांतर असलेच तर, या मुद्यावर की स्वत:च्या डोळ्यांनी पैगंबर मुहम्मद (स.)

यांनी आपल्या स्वामीला पाहिले किंवा नाही. या संदर्भात जी मतभिन्नता आढळते ती या वास्तवतेवर आधारित आहे, की पवित्र कुरआनच्या आयतीचा अर्थ पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अनेक सोबत्यांनी वेगवेगळा लावला,

''आणि खचितच त्याने 'त्याला' आणखी दुसऱ्यांदा खाली येताना पाहिले. अब्दुल्लाह बिन अब्बासचे मत आहे की 'त्याला' हा शब्द 'अल्लाहला' असा अर्थ दर्शवितो, तर अब्दुल्लाह बिन मसऊद आणि माननीय आएशा (रजि.) यांचे म्हणणे आहे की 'त्याला' हे सर्वनाम 'जिब्रिल'यांचा संदर्भ दर्शविते.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या या अनन्यसाधारण अनुभवाने वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिक्रिया उमटल्या. नाकारणाऱ्या लोकांना मुस्लिमांची व त्यांच्या धर्माची टर-टवाळी करण्याची ती नामी संधी असल्याचे वाटले. त्यांनी जेरूसलेमचे मंदिर कशा प्रकारचे आहे, याचे वर्णन करण्यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांना प्रश्न विचारून त्रस्त करून सोडले, कारण जेरूसलेमला ते कधीही गेले नव्हते. अनेकजण त्यांचे उत्तर ऐकून अचंब्याने थक्क झाले की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्या शहराची इत्यंभूत माहिती तंतोतंतपणे वर्णन केली. परंतु सच्च्या मुस्लिम लोकांसाठी, त्यात असाधारण असे काही नव्हते. सर्वशक्तिमान अल्लाह, जो केवळ त्या इच्छेने सप्त आकाश आणि धरती निर्माण करावयास पुरेसे सामर्थ्य बाळगतो तो त्याचे पैगंबर मुहम्मद (स.) यांना सप्त-आकाशाच्या वरती नेऊन त्याच्या निशाण्या प्रत्यक्षपणे डोळ्यांना दाखवितो, जी गोष्ट एरवी माणसाच्या आवाक्याबाहेरची होती, ती दाखविण्याचेही सामर्थ्य राखतो. माननीय अबू बकर (रजि.) यांना जेव्हा त्या अनन्यसाधारण घटनेबद्दल विचारले तेव्हा त्यांनी दिलेल्या उत्तरावरून अल्लाहच्या सर्वशक्तिमान असण्यावर व पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या विविध क्षमतेवर मुस्लिमांची खोलवर श्रद्धा व दृढविश्वास असल्याचे दिसून येते. हदीसमध्ये नोंद आहे की नाकारणारे लोक माननीय अबू बकर (रजि.) यांच्याकडे आले आणि त्यांच्या मित्रांच्या, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या त्या कहाणीवर ते विश्वास करतात काय, अशी त्यांनी पृच्छा केली. एका रात्रीत अल्प वेळेत ते जेरूसलेमला गेले आणि परत आले? माननीय अबू बकर (रजि.) यांनी उत्तर दिले, होय, मी या घटनेपेक्षाही अधिक अद्‌भूत चमत्काराच्या असणाऱ्या गोष्टीच्या सत्यतेची साक्ष द्यायला तयार आहे, ती म्हणजे ईशसंदेशांचे पैगंबरांकडे अहोरात्र येणे होय. ही घटना (त्यांचे उर्ध्वगमन) काही त्याच्यापेक्षा अधिक थक्क करून सोडणारी नाही?

माननीय अबू बकर (रजि.) यांनी, पैगंबर मुहम्मद (स.) यांचे उर्ध्वगमन मान्य करणे, हे त्यांचे पैगंबरत्व मान्य करण्यासारखेच होते. या प्रसंगापासूनच त्यांना अल्-सिद्दिक (सत्याची साक्ष देणारा) हा किताब लोकांनी बहाल केला.



माननीय अबू बकर (रजि.) यांनी दिलेले हे मुद्देसूद उत्तर फार अर्थपूर्ण असून, ते सुंदर रीतीने अल्लाहबद्दल, विश्वाबद्दल त्यांच्यामधील परस्पर संबंधाबद्दल, तसेच अवतरित धर्मांमधील अद्‌भूत चमत्कारांबद्दल इस्लामी दृष्टिकोनाचा संक्षिप्तपणे सारांश सांगतो.

## पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दाखविलेले चमत्कार

सर्व विश्वाचा निर्माणकर्ता व पालनकर्ता अल्लाह, आपले पैगंबर पृथ्वीवर पाठवितो, या सिध्दान्तावर विश्वास बाळगणाऱ्या कोणाही माणसाला पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अलौकिक चमत्कारांवर विश्वास बाळगण्यास कसलीही मूळ अडचण नसते, यात शंका नाही. तसे चमत्कार काही अल्लाहला अयोग्य व अनुचित नसतात. तसेच ते केवळ लहरीनुसार केले जात नसतात. खरेतर, ते चमत्कार, त्याचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या संबंधात, अल्लाहचे विश्वामधील जे विशेष उद्दिष्ट असते, त्याचा ते प्रसंगोपात अविष्कार असतात. पापकृत्यांनी कुमार्गाला लागलेल्या जगाचा आंधळेपणा घालवून त्यांचे डोळे उघडण्यासाठी, असे अद्‌भूत चमत्कार योजिले जातात. निसर्गव्यवस्थेतील क्षुब्धता किंवा गडबड नसून ती ईशकृत्येच असतात. लोकांना त्यांच्या गैरसावधपणाच्या निद्रेतून खडबडून जागे करून, पापी जनांच्या पाठीचा कणा मोडून जगाची सुव्यवस्था व सुरचना करणे, हाच त्यांच्यामागचा हेतु असतो, पापापासून मुक्त करून तारूण्याच्या प्रक्रियेचाच तो एक भाग असून, त्याचा उद्देश निसर्गव्यवस्थेत ईशव्यवस्था पुनर्स्थापित करण्याचा असतो, ती झुगारून देण्याचा नसतो. जो माणूस विश्वाला यंत्रवत दृष्टीने पाहतो, त्याला निसर्ग हा पूर्णत: बांधील आणि स्वयंपूर्ण पध्दत असल्याचे वाटते. म्हणून त्याच्यात बाहेरून आगंतुक अतिक्रमणाचा किंवा त्याच्या नियमित कायद्यात व व्यवस्थेत अडथळा येण्याचा विचारच त्यांना संभवत नाही. परंतु अद्‌भूत चमत्कारांमध्ये अयोग्य काहीही नसते, अशी मुस्लिमांची धारणा असते, कारण विश्वाची निर्मिती ही एखाद्या अंधशक्तीकडून झालेली नसून, ती चिरस्थिर असणाऱ्या स्वामीकडून झाली आहे, विश्वातील व्यवहाराची त्याला सतत चिंता आहे आणि त्यातील घडामोडी त्याच्या इच्छेनुसार तो घडवीत असतो; यावर याचा गाढ विश्वास असतो. नि:शंकपणे, निसर्गामध्ये एकसूत्रीपणा आहे. परंतु त्याचा अर्थ असा होत नाही की हे विश्व एक उत्पादित तयार वस्तू असून ते पूर्ण झाल्यावर आता निर्माणकर्त्याच्या हातांचा त्याच्याशी काही संबंध उरलाच नाही आणि आता ब्रह्मांडात मृत भौतिक वस्तूंचा एक महाकाय ढीग होऊन तरंगत आहे आणि अल्लाहला आता त्याच्याशी काहीच देणे घेणे नाही. असा दृष्टिकोन इस्लामी स्वभावाच्या विरूध्द आहे. निसर्गाचा एकसूत्रीपणा अल्लाहच्या परिपूर्ण व्यवस्थेतचा

निदर्शक आहे. परंतु निसर्गाच्या एकसूत्रीपणाच्या तत्त्वाचा अर्थ आंधळेपणाची यांत्रिक पद्धत असा केला जाऊ नये. सर्वश्रेष्ठ अल्लाहची, विश्वनिर्मात्याची मुक्त इच्छा, असाच त्याचा अर्थ निघतो.

एका परिपूर्ण कायद्याच्या संकल्पनेत नैतिक स्वातंत्र्याची कल्पना, ही मूलत:च विरोधी नाही. निसर्गाला जर मुक्तपणा देऊन चैतन्यमय करायचे आहे, केवळ आंधळी निकडीची गरज म्हणून नव्हे, तर अद्‌भूत चमत्कारांमध्ये अविचारणीय काहीच नाही, कारण या विश्वाच्या निर्धारक शक्तींच्या व निर्धारित शक्तींना अंतरंगात खोलवर, निर्मात्याची मुक्त इच्छाच असते, परंतु आधुनिक वैज्ञानिकांना मात्र तो उमजण्यात अपयश आले आहे.

आधुनिक माणूस केवळ निसर्गाच्या वैज्ञानिक संकल्पनामध्येच रत आहे, निसर्गाचे नियम अविरत व अटळ आहेत आणि ते अद्‌भूत चमत्कारांना मान्य करण्यास तयार नाहीत, ही वास्तवता नाकारता येत नाही. परंतु आपण ही गोष्ट मनात पक्की समजून घेतली पाहिजे की अंतिम सत्त्याप्रत पोहोचण्याचा विज्ञान हाच एकमेव मार्ग नाही. त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचा एक नैतिक मार्गही आहे आणि तो अद्‌भूत चमत्कारांचा अस्तित्वाला पुष्टी देतो. या गोष्टीची अपेक्षा करणे की काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये, सर्वशक्तिमान अल्लाहने आपल्या काही विशेष निशाण्या दाखवून द्याव्यात, जेणेरून सर्व लोकांचे लक्ष प्रभाविपणे व परिणामकारवरितीने वेधावे; हे विवेकबुद्धीच्या विरूद्ध नाही.

सर्वसाधारण नैसर्गिक जीवनक्रमात जो (ईश्वर) अदृश्य आहे, त्याला अंतश्चक्षुनी पहाता यावे व त्याचे अस्तित्व  मान्य करणे, यातच इमानची व विश्वासाची कसोटी आहे. परंतु माणसांची इंद्रियगोचर ग्रहणशक्ती जेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शिकवणीचे मोल उमजण्यात अपयशी ठरते, तेव्हा काही असाधारण घटना दाखवून लोकांची समजूत दुरूस्त  करणे, हे अगदी तर्कसंगत आहे. ते अनिवार्यपणे अशक्यच आहे, असे मानणे, हा मानवी विवेकबुद्धीचा उद्दामपणा ठरतो.

कुरआनमध्ये अद्‌भूत चमत्काराबद्दल बालिश प्रेम बाळगायला प्रोत्साहन दिल्याचा आधार आपणास कोठेही आढळत नाही. परंतु निर्माणकर्त्या स्वामीलासुद्धा निसर्गनियमांची बंधने आहेत, असे प्रतिपादन करणे म्हणजे अल्लाहची विवेकबुद्धी आणि त्याची शक्ती व सत्ता नाकारण्यासारखे होत नाही काय? चमत्कार जेव्हा घडतो, तेव्हा प्राकृतिक व्यवस्थेमध्ये केवळ अधिक खोल नैतिक व्यवस्था रूजविण्यासाठी आणि मानवजातीच्या जीवनासाठी खुद्द अल्लाहच तसे फेराबदल घडवून आणित असतो.

एक गोष्ट चांगली लक्षात ठेवायला पाहिजे की चमत्कार फार क्वचितच घडत



असतात. तेच त्यांचे सार आहे. चमत्कार ही निसर्गक्रमातील अशी घटना असते, जिचे निसर्ग म्हणजे अनुभवलेली व्यवस्था, कसलेही स्पष्टीकरण देऊ शकत नाही. ती घटना म्हणजे अल्लाहची एक विशेष व अनन्यसाधारण कृती असून एका विशिष्ट हेतुसाठी लोकांचे लक्ष वेधून घेणारे कृत्य आहे, असे मानायला भाग पाडते.

चमत्काराची ही व्यवस्था सर्वाग्रही व परिपूर्ण आहे. ती आपणास सांगते की त्या सामान्य घटना नसून अत्यंत क्वचितच घडतात. दुसरी गोष्ट म्हणजे त्या माणसांना थक्क करून सोडणाऱ्या घटना असतात आणि शेवटी, चमत्कार हे काही पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हातून घडल्याचे जरी दाखविण्यात आले, तरी प्रत्यक्षात ते अल्लाहच्या आज्ञेनेच घडविलेले असतात.

इमाम गजाली त्यांच्या 'अहयाउल अलूमुद्दीन' या सुप्रसिद्ध पुस्तकात लिहितात, ''अद्‌भूत चमत्कार (मोजिजा) पैगंबरांच्या सत्यतेचा पुरावा असतो, कारण सामान्य माणसे तसे करण्यात असफल ठरतात. ते सर्वसत्ताधीश स्वामीचेच कृत्य असते.

इमाम गझाली यांनी 'तोहफतुल फलसफा' या त्यांच्या दुसऱ्या एका सुप्रसिध्द पुस्तकात, हा मुद्दा आणखी विशद करून सांगितला आहे. चमत्कार हे अल्लाहचेच कृत्य आहे, यावर त्यांचा विश्वास आहे, परंतु तो घडून येण्याची जी वेळ असते, ती वेळ मात्र पैगंबरांचा निश्चय, जेव्हा त्याच्याकडे आज्ञा करतो तेव्हाच येते. मग ईशकायद्याची पद्धत मजबूत करण्याचे एक साधन म्हणून, चमत्काराचा अविष्कार हा ईशअवस्थेच्या प्रस्थापनेची एक विशिष्ट अवस्था होते. पवित्र कुरआन हाच पैगंबर मुहम्मद (स.) यांचा सर्वात मोठा चमत्कार आहे. त्यांचे निष्कलंक आचरण, त्यांची उच्च नैतिकता आणि त्यांचे शिष्टाचार हेच त्यांच्या सत्यतेचे तेजस्वी पुरावे आहेत.

इब्ने रूश्द म्हणतात, ''मोजिजा- अद्‌भूत चमत्कार (म्हणजे नेहमीच्या निसर्गक्रमाच्या नियमांचे उल्लंघन ज्याची कार्यकारण मीमांसेचे आकलन सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर असते) हाच मूळ उद्देश नसतो, तर लोकांचा अल्लाहवरील आणि त्याच्या पैगंबरांवरील विश्वास दृढ होण्यास त्यापासून पुष्टी व शक्ती प्राप्त होते.''

## धर्म प्रसारकार्याचे प्रयत्न (इस्लामी जीवनपद्धतीचा प्रचार)

अद्‌भूत चमत्कार घडवून दाखविणे, हा काही पैगंबर मुहम्मद (स.) यांचे चित्त एकाग्र करण्याचा मुख्य विषय नव्हता, त्यांच्या सर्व शक्ती ईशवाणीच्या शिकवणुकी देण्यात एकवटल्या होत्या आणि सत्कर्माच्या मार्गाकडे लोकांना बोलावण्याची एकही संधी ते वाया दवडीत नसत. मक्का शहरात वारंवार येणाऱ्या टोळ्यांकडे ते गाठभेट घेण्यासाठी जात. तसेच शेजारील व आजूबाजूच्या गावांत उत्सव व मेळाव्यासाठी येणाऱ्या लोकांच्याही गाठीभेटी घेत असत. उकाज येथे आणि इतर ठिकाणी त्यांनी लोकांच्या जमावापुढे भाषणे दिली आणि मक्का व मीना येथील यात्रेकरूच्या तळांवर प्रवचने दिली. त्या प्रसंगी ते लोकांनी मूर्तीपूजेचा त्याग करून विश्वाचा एकमेव निर्माणकर्ता व पालनकर्ता अल्लाहच्या सार्वभौम अधिपत्याखाली येण्याचे जोरदार आवाहन करीत. अल्लाहची उपासना व दास्यत्व केल्याने पारलौकिक जीवनात त्यांच्यासाठी स्वर्गाची दारे खुली होतील, इतकेच नाही तर या पृथ्वीवरही त्यांच्या उत्कर्ष-उन्नतीची आणि त्यांच्या प्रभुत्वाची हमी देत असत. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पाठोपाठ इस्लामचा कट्टर शत्रू अबू लहब सावलीप्रमाणे चिकटून, लोकांना ओरडून सांगत असे, ''हा माणूस 'लात' व 'मनात' या दैवतांचे जोखड मानेवरून तुम्ही फेकून द्यावे, म्हणून तुम्हाला आग्रहाने सांगत आहे. त्याचे म्हणणे तुम्ही मुळीच ऐकू नका, त्याच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करा.''

पैगंबर मुहम्मद (स.) मुळीच निराश होत नसत. त्यांच्यावर सोपविण्यात आलेले धर्मप्रचाराच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्याचे कार्य, सर्व प्रकारची संकटे झेलून, त्यांनी नेटाने पुढे चालविले. अरब टोळ्यांबरोबर ते हिंडले, ते त्यांच्यात दूरपर्यंत फिरले, मोठे भवितव्य त्यांना हाक देत आहे, याची त्यांना जाणीव करून दिली आणि संशय व काळोखाच्या शक्ती, ज्या त्यांना अडसर झाल्या होत्या, त्यांच्यापुढे आव्हाने उभी केली.

या कालावधीत मदिनेतील (त्याकाळी यसरब या नावाने परिचित) अरबी टोळ्यांना इस्लामकडे येण्याचे निमंत्रण देण्याची संधी त्यांना मिळाली. एकदा सहा-सात माणसांचा एक गट त्यांना भेटला व ते लोक मदीना येथील रहिवाशी होते, हे त्यांनी ओळखले. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी विचारणा केली, तुम्ही कोणत्या कबिल्याचे आहात?''

''आम्ही 'खजराज'' टोळीपैकी आहोत.'' त्यांनी उत्तर दिले.

''मग आपण थोडा वेळ का बसू नये. मला तुमच्याशी बोलायचे आहे.'' ही सूचना तत्काळ मानली गेली. कारण त्या वेळेपर्यंत पैगंबर मुहम्मद (स.) यांची कीर्ती मदीनापर्यंत पसरली होती. ती अनोळखी माणसे त्या माणसाबद्दल अधिक माहिती जाणण्यास उत्कंठित होती, ज्याने त्या संपूर्ण प्रदेशात खळबळ माजवून ठेवली होती. पैगंबर मुहम्मद



(स.) यांनी त्यांना आपली श्रद्धा कोणती आहे, हे उघड करून सांगितले. या श्रद्धेची कर्तव्ये, जबाबदाऱ्या व लाभ विशद करून सांगितले व ज्यांनी त्या श्रद्धेचा स्वीकार केला त्यांच्यावर त्या सर्व जबाबदाऱ्या येऊन पडतात, हे स्पष्टपणे सांगितले.

हदीसमध्ये याचीही नोंद आहे की मदीनेतील यहुदी व अनेकेश्वरवादी (ख्रिश्चन) लोक, एका नवीन पैगंबराच्या उदयाची उत्कंठतेने वाट पाहत होते. यहुदी लोक हे धनसंपत्तीच्या आणि ज्ञानाच्या बाबतीत दोहोपेक्षा अधिक सरस होते. म्हणून त्यांच्यात जेव्हा भांडणे होत असत, तेव्हा यहुदी लोक त्यांना नेहमी ही धमकी देत असत की एका नव्या पैगंबराचा लवकरच उदय होणार असून एका नव्या दैवी-योजनेची वेळ आली आहे. अल्लाहचेच अनुयायित्व ते लोक करतील आणि त्यांच्या शत्रूंना ते ठोकून काढतील जसे पूर्वी 'आद' व 'इरम' संततीला ठोकून काढले होते.

म्हणून पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्या मदिनेतील यात्रेकरूंच्या गटाला उद्देशून जी वक्तव्य केली, त्यावरून त्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांना ओळखले, व म्हणाले, ''जाणून घ्या, खात्रीने हाच तो पैगंबर मुहम्मद (स.) आहे, ज्याची यहुदी लोक आपणास वारंवार भीती घालीत आहेत, म्हणून त्वरेने त्यांच्यात सामील होऊ या.''

## मदीनेहून निमंत्रण

म्हणून त्यांनी तात्काळ इस्लामचा स्वीकार केला आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांना म्हणाले, ''आम्ही आमच्या समाजाला सोडून आलो आहोत, कारण त्यांच्याइतका द्वेषाने व हाडवैराने दुभंगलेला समाज कोठेही नाही. कदाचित तुमच्या माध्यमाने अल्लाह आमच्यातील एकोप्याचे संबंध पुन्हा पूर्ववत जुळवील. म्हणून आपण तिकडे जाऊ या आणि तुमच्या या धर्माकडे येण्याचे त्यांनाही आवाहन करू या आणि अल्लाहने जर त्यांची मने सांधली, तर तुमच्यापेक्षा अधिक बलशाली कोणीही असणार नाही.'' या अन्सार लोकांना ज्यांनी इस्लामी सिद्धान्तांचा स्वीकार केला, तेंव्हा त्यांच्या सत्यतेबद्दल थोडीशी जाण त्यांना होती, यात शंकाच नाही, परंतु त्यांच्यापैकी अधिकांश लोक यासाठी मुस्लिम झाले होते, की त्यांची अशी समजूत व विश्वास होता की अल्लाहने पैगंबर मुहम्मद (स.) यांना अरबांसाठी एक संदेश देऊन पाठविले आहे.

ते मूठभर धर्मांतरित मदीनावासी लोक त्यांच्या निष्ठेशी ठामपणे चिकटून राहिले आणि त्या नव्या श्रद्धेचा त्यांनी मोठ्या उत्साहाने व मन:पूर्वक प्रचार केला आणि परिणामस्वरूप त्यांच्या सहनागरिक बांधवांपैकी काही लोकांची मने इस्लाम स्वीकारण्यासाठी जिंकली. दुसऱ्या वर्षी यात्रेसाठी बारा विश्वासू अनुयायांचा एक गट आला आणि मुहम्मद (स.) यांना पैगंबर मानल्याची शपथ घेतली, ''आम्ही एकमेव अल्लाहखेरीज अन्य

कोणाचीही उपासना-आराधना करणार नाही, आम्ही चौर्यकर्म करणार नाही, आम्ही व्यभिचार कर्म करणार नाही, आम्ही नेकीच्या सर्व गोष्टीत अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांचे आज्ञापलन करू.''

जेव्हा त्यांची ती शपथ वा प्रतिज्ञा पूर्ण झाली तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले, ''जो याचे काटेकोरपणे पालन करील, त्याला इनाम म्हणून स्वर्गप्राप्त होईल आणि जो त्याच्याकडे दुर्लक्ष करील आणि इहलोकांच्या मोहात गुंतून राहील, त्याला परलोकात त्याची किंमत चुकवावी लागेल. त्याचे पाप लोकांच्या नजरेतून दडलेले असले आणि कटू फळे चाखण्याचे दु:ख त्याला भोगावे लागले नाही, तरी त्याचा मामला अल्लाहशी आहे. तो त्यांना क्षमा करील किंवा करणार नाही.''

ही प्रतिज्ञा 'अकबाहची पहिली प्रतिज्ञा' म्हणून ओळखली जाते. अकबाह नावाच्या एका टेकडीच्या सपाट माथ्यावर ती घेतली गेली होती.

ही बारा माणसे मदीनेस जेव्हा परतली तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मुसअब बिन उमैरा बिन हाशिम यांना मदीनेकडे पाठविले. त्या लोकांना इस्लामचे सिद्धान्त शिकविण्यास आणि त्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यास सांगितले, मुसअबनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या संगतीत ते शिक्षण आधीच घेतले होते. मदीनेत ते जुराराचे पुत्र असद यांच्याबरोबर राहत असत. अशा तऱ्हेने पार्श्वभूमी तयार करण्यात आली होती आणि इतक्या उत्साहाने प्रचारकार्य करण्यात आले होते की, या नव्या श्रद्धेचा घराघरांतून व टोळ्याटोळ्यांमधून झपाट्याने प्रसार झाला. यहुदी लोक त्यांच्याकडे विस्मयाने पाहात राहिले. ज्या लोकांना त्यांच्या रानटी अधर्माच्या चुका पटविण्यासाठी त्यांनी पिढ्यानपिढ्या व्यर्थ प्रयत्नांची पराकाष्ठा केली होती; तेच लोक स्वखुषीने आपल्या सर्व देवांच्या मूर्ती भिरकावून देऊन एकमेव अल्लाहवर आपली श्रद्धा व निष्ठा व्यक्त करू लागले होते.

दुसऱ्या वर्षी यात्रेच्या मोसमात मदीनेतील मुस्लिम झालेले माणसे, पैगंबर मुहम्मद (स.) यांना पुन्हा एकदा त्या ठिकाणी भेटली, जेथे एक वर्षापूर्वी त्यांची गाठभेट झाली होती. या वेळी आदल्या वर्षाच्या विपरीत त्यांची संख्या अठ्ठ्याऐंशी झाली होती. आदल्या वर्षी ती केवळ बारा हाती. त्यांनी त्यांच्यावर श्रद्धा व विश्वास व्यक्त केला. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे चुलते अब्बास बिन अब्दुल मुत्तलीब तेथे हजर होते, (अब्बासनी तोपर्यंत इस्लामची दीक्षा घेतली नव्हती) अब्बासनी त्यांना सांगितले की जोपर्यंत ते लोक, वेळ पडल्यास प्राणाची किंमत देऊनही, त्यांच्या नातलगांचे पूर्णपणे रक्षण करण्यास तयार होत नाहीत, तोपर्यंत त्यांनी त्यांच्या पुतण्याचा शपथपूर्वक त्याग करावा. प्रथम बोलताना ते म्हणाले, ''हे खजरजच्या माणसांनो! आमच्या परिवारात मुहम्मद (स.) चे स्थान कोणते आहे, हे तुम्ही सर्व जाणत आहात. आमच्यातील विरोधक लोकांपासून त्यांचे



करता येईल तितके रक्षण आम्ही केले आहे. त्यांच्या लोकांत त्याला आदर-सन्मान आहे, तो तुमच्याशिवाय इतर कोणाबरोबरही जाण्यास नकार देतो. तुमच्या शहराकडे त्याला निमंत्रण देताना, त्याच्या रक्षणाचे वचन तुम्ही पार पाडू शकाल, असे तुम्हाला वाटत असेल आणि शत्रूपासून तुम्ही त्याचे रक्षण करू शकत असाल तर तुम्ही अंगावर घेतलेल्या जबाबदारीचा भार उचला. पण जर तुम्ही येथून त्याला बरोबर नेऊन विश्वासघात करणार असाल आणि त्याला विरोधकांच्या ताब्यात देणार असाल, तर येथेच त्याला सोडून द्या, कारण त्याच्या जागी तो सन्मानित व सुरक्षित आहे.''

मदीनावासियांनी अब्बास आणि त्यांच्या सोबत्यांना उद्देशून पैगंबर मुहम्मद (स.) यांना आणि त्यांनी हाती घेतलेल्या उदात्त कार्याला त्यांचा मन:पूर्वक पाठिंबा असल्याचे सांगितले व म्हणाले, ''हे अल्लाहचे पैगंबरा! आता तुम्ही बोला आणि आमच्याकडून अल्लाहबद्दल आणि त्याच्या पैगंबराबद्दल जशी प्रतिज्ञा हवी असेल तशी वदवून घ्या.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी इमानबद्दल पुन्हा एकदा शिकवणूक दिली व म्हणाले, ''अल्लाहच्या नावाने मी तुम्हाला हाक देतो की एकमेव अल्लाहखेरीज अन्य कोणाचीही तुम्ही पूजा व उपासना करू नका आणि अल्लाहच्या कार्यासाठी तुम्ही मला मन:पूर्वक सहकार्य कराल अशी प्रतिज्ञा करा.''

बरा बिन मारूर आपला हात पुढे करून म्हणाला, ''हे अल्लाहचे पैगंबरा! आम्ही प्रतिज्ञा करतो की आम्हाला तुमच्या सर्व अटी मान्य आहेत.''

नंतर अबुल हैसम बिन तय्यीहान म्हणाला, ''हे अल्लाहचे पैगंबरा! आमच्यामध्ये आणि यहुदी लोकांमध्ये काही करार झालेले आहेत, आम्हाला ते नंतर मोडावे लागतील. अल्लाहने जर तुम्हाला यश आणि सत्ताबळ दिले, तर तुम्ही आम्हाला सोडणार नाही, अशी आम्ही अपेक्षा करतो.''

त्यावर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उत्तर दिले, ''नाही, तसे कधीच होणार नाही. तुमचे रक्त ते माझे रक्त असेल. जीवन-मुत्यूमध्ये मी तुमच्याबरोबर असेन आणि तुम्ही माझ्याबरोबर असाल. तुम्ही ज्याच्याशी शांततेने राहाल, त्याच्याशी मी शांततेने राहीन.''

श्रोतेगण प्रतिज्ञा करण्यास तयार होते, परंतु तेवढ्यात नदला अन्सारीचा पुत्र अब्बास बिन उबादा म्हणाला, ''हे खजरज च्या लोकांनो! या माणसाशी तुम्ही जो करार करीत आहात त्याचे महत्त्व तुमच्या लक्षात आले आहे का? खरे तर तुम्ही अशी शपथ घेत आहात की तुम्ही सर्वांशी लढणार आहात. तुमची धनसंपत्ती पणाला लागली आहे किंवा तुमच्या महाकुलिनांचे जीवित धोक्यात आहे. असे जर तुम्हाला वाटणार असेल, तर त्यांना (पैगंबर मुहम्मद (स.) यांना) आत्ताच सोडून दूर व्हा, कारण एकदा शपथ

घेऊन झाल्यावर जर तुम्हाला तसे वाटले, तर ते इहलोकांत तसेच मरणोत्तर जीवनांत तुम्हाला अवनतीकारक ठरेल. परंतु जे कार्य तुम्हावर सोपविण्यात येत आहे. ते जीवीत-वित्त हानीचीही किंमत चुकवून पार पाडू शकाल असे तुम्हाला वाटत असेल, तर मग ही भारी जबाबदारी आपल्या शिरावर घ्या आणि अल्लाहची शपथ वाहा. त्यातच इहलोकाचे आणि परलोकीचे कल्याण सामावलेले आहे.''

सर्वजन एकमुखाने म्हणाले, ''आम्ही हे सर्व मान्य करतो, मग आमच्या प्राणांची व धनसंपत्तीची किंमत चुकवावी लागली तर बेहतर परंतु हे अल्लाहचे पैगंबरा! आम्ही जर आमच्या निर्धारात ठामपणे दृढ राहिलो, तर मग आमचा भवितव्यात काय असेल?''

उत्तर आले, ''स्वर्ग.''

त्या सर्वांनी हात पुढे करून प्रतिज्ञा केली, ती पुढीलप्रमाणे, ''आम्ही सर्वजन तुमच्या आज्ञांचे पालन करू, हे अल्लाहचे पैगंबरा! सर्वप्रकारच्या अवस्थांमध्ये विपुलतेत तसेच अभावात, सुखात तसेच दु:खात तुमचे आज्ञापालन करू. आम्ही कोणावरही अन्याय करणार नाही, आम्ही सर्वकाळ तोंडाने सत्यच बोलू आणि अल्लाहची उपासना व सेवा करण्यात आम्ही कोणाच्याही भयाची अगर कोपाची पर्वा करणार नाही.''

अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मदीनेतील लोकांना इस्लामची शिकवण देण्यासाठी आणि इस्लामच्या प्रचारकार्यात त्यांच्या टोळींच्या लोकांना उचित मार्गदर्शन करण्यासाठी बारा 'नायब' (प्रतिनिधीं) ची नियुक्ती केली.

मदीनावासी लोकांशी ऐन वाळवंटात झालेल्या त्या गुप्त बैठकीची बातमी, कशीतरी फुटली आणि तिचा तपशील जाणण्यासाठी कुरैशी लोकांनी मदीनेतील अनेक मूर्तिपूजक लोकांवर प्रश्नांचा भडिमार करून तपासणी केली, परंतु त्या बाबतीत तथ्य नसल्याचे त्यांनी प्रामाणिकपणे सांगून टाकले.

जसा जसा काळ लोटत गेला, तसे कुरैशांना त्या प्रतिज्ञेबद्दल अधिकाधिक माहिती मिळू लागली. म्हणून संतापाच्या भरात, तीर्थयात्रेसाठी निघालेल्या जमावाचा त्यांनी मदीनेपासून पाठलाग केला. बाकीचे सर्वजण निसटले. फक्त साद बिन उबादा त्यांच्या हाती लागले. त्यांनी साद बिन उबादा यांचा अनन्वित छळ केला. नंतर त्यांना जुबैर बिन मुतीन व हारिस बिन हर्ब यांनी सोडविले. त्याच्याशी त्यांचे व्यापारी संबंधही होते आणि मागे एकदा त्यांना आश्रयही दिला होता.



## मदीनेला प्रयाण

उकबाहच्या प्रतिज्ञेनंतर, पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्या अनुयायांना मदीनेस स्थलांतर करण्यासाठी प्रोत्साहन देण्यास सुरूवात केली. अबू सलमा तेथे प्रतिज्ञेपूर्वीच गेल्याचे कळते. या मोहीमेमुळे कुरैशांच्या वैराची धार आणखी वाढली. स्थलांतराबद्दल ते नाखूष होते, कारण त्यामुळे सर्व मुस्लिम एकवटतील आणि त्यांच्या आवाक्याच्या बाहेर राहातील. ते एका सुरक्षित ठिकाणी वसतील आणि तेथून ते आपल्या सर्व योजना निर्विघ्नपणे अमलात आणू शकतील. म्हणून जोरदारपणे छळणूक करण्यास कुरैशांनी पुन्हा सुरूवात केली. जी काही सत्ता व शक्ती त्यांच्या हातात होती, त्याचा वापर करून इमान धारण केलेल्या लोकांना, तिचा त्याग करण्यास भाग पाडण्यासाठी छळू लागले. आणि त्यांनी निसटून जाऊ नये म्हणून त्यांना कोंडून ठेवले जाई. या अविचारी धोरणाच्या पाठपुराव्याखातर उम्मे सलमांना (ज्यांचा विवाह अबू सलमाच्या निधनानंतर पैगंबरांशी झाला होता.) जबरदस्तीने मक्का येथे डांबून ठेवण्यात आले आणि त्यांचे मूलही त्यांच्यापासून हिसकावून घेण्यात आले होते. दुसऱ्या वर्षाच्या अखेरीस मुलासह त्यांच्या पतीला जाऊन मिळण्यात त्यांना यश मिळाले. त्यानंतर आमिर बिन रबीया व त्यांची पत्नी लैला-अबू हासमाची कन्या मदीनेला स्थलांतर करून गेले. नंतर अबू अहमद बिन जहश व त्यांचे बंधु अब्दुल्लाह गेले. अशा तऱ्हेने मुस्लिमांचे मदीनेला इतक्या जलद गतीने स्थलांतर चालू राहिले की मक्का शहराचे कैक भाग ओस पडले.

एकेवेळी गजबजलेल्या वस्त्या ओस पडल्याचे पाहून रबीयाचा पुत्र उतबा याला अतीव दु:ख झाले. सुस्कारे सोडीत त्याने एक जुनी ओळ पुटपुटली, ''प्रत्येक गजबजलेली वस्ती कितीतरी काळ चैतन्यमय राहण्याचा आशीर्वाद लाभलेली असली, ती निर्मनुष्य होऊन त्यामध्ये भयानक वारे वाहत राहतील.''

तो दु:खाने पुढे उद्गारला, ''आणि हे सर्व कोणामुळे घडले, तर आमच्याच एका बंधुच्या पुत्राच्या कर्तृत्वाने, ज्याने आमच्या बैठकी विस्कळीत केल्या, आमचे सर्व व्यवहार मोडले आणि आमच्यात फाटाफुट करून टाकली.''

दोन महिन्याच्या कालावधीत माननीय अबू बकर (रजि.), अली (रजि.), खुद्द पैगंबर (स.) खेरीज आणि ज्यांना बंदिस्त करून ठेवले होते, असे काही कुलीन लोक किंवा ज्यांची गुलामगिरीतून सुटका होणे अशक्यप्राय होते; असे लोक सोडून, बाकीचे सर्व लोक, मदीनेला स्थलांतर करून गेले. मदीनेतील त्यांच्या बांधवानी त्यांचे मोठ्या उत्साहात मन:पूर्वक स्वागत केले. या पाहुण्यांना आपल्या घरात आश्रय द्यावा, त्यांचे यथोचित स्वागत व आदरातिथ्य करावे, यासाठी त्यांच्यामध्ये चढाओढ लागली होती.

मूरच्या शब्दांत सांगायचे तर - ''काळजीपूर्वक आखलेल्या त्या योजनेमुळे कुरैश पक्षाघात झाल्याप्रमाणे लुळे पडले होते. त्याची अंमलबजावणीही तडकाफडकी झाली होती. ते विस्मयचकित होऊन नुसते पाहात राहिले, जेव्हा कुटुंबे निघून जाऊ लागली व घरे ओस पडू लागली. त्यात दृढ निश्चय होता, स्वार्थत्यागाची ज्वलंत भावना होती, ज्याचा कुरैशच्या लोकांना अंदाज नव्हता.''

त्या स्थितीने कुरैश खडबडून जागे झाले आणि ती स्थलांतराची लाट थोपविण्यासाठी काहीतरी परिणामकारक पावले उचलण्याचे ठरविण्यासाठी त्यांनी एक सभा बोलाविली. जन्मभर तुरूंगात डांबणे, शहरातून हद्‌पार करणे, वगैरे उपाय करण्यावर मोठी चर्चा झाली. ठार मारण्याचाही प्रस्ताव पुढे आला. पण एका व्यक्तीने ठार केले तर तो व त्याचे संपूर्ण कुटुंब सूडचक्राचे लक्ष्य होईल, अशी भीती होती. ही समस्या अबू जहलने सोडविली. त्याने सुचविले की प्रत्येक टोळीचा एक तरूण, याप्रमाणे सर्व टोळ्यांच्या तरूणांचा एक गट करावा. त्या प्रत्येक तरूणाने आपल्या तलवारीने एकाच वेळी पैगंबर मुहम्मद (स.) वर वार करायचे, म्हणजे हत्येची जबाबदारी सर्वांवर येईल आणि तिचा बदला घेणे कठीण होईल.

ही सूचना सर्वांना पसंत पडली आणि हे रक्तलांच्छित कृत्य करण्यासाठी नवतरूणांचा एक गट निवडण्यात आला. त्यांच्याविरूद्ध शिजलेल्या कटाची खबर पैगंबर मुहम्मद (स.) ईशदूत जिब्रिल (अ.) यांनी दिली व पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर खालील ओळी अवतरल्य,

''आणि तो प्रसंग देखील आठवण्याजोगा आहे जेव्हा सत्य नाकारणारे तुझ्याविरूद्ध युक्त्या योजीत होते की, एक तर तुला कैद करावे अथवा ठार मारावे किंवा देशांतर करावे. ते आपल्या चाली खेळत होते आणि अल्लाह आपली चाल खेळत होता. नि:संशय अल्लाह सर्वोत्तम चाल खेळणारा आहे.'' (दिव्य कुरआन, ८ : ३०)

आणि ते वचन किती सुरेखपणे खरे ठरले. त्या कटात सामील झालेले अकराजण थोड्याच दिवसांत बदरच्या लढाईत मारले गेले आणि उरलेले तिघे, माननीय अबू सुफियान, जाबिर आणि हाकिम (रजि.) यांनी इस्लाम धर्माची दीक्षा घेतली. त्यांच्या हातून पैगंबर सुखरूपणे निसटले. त्यांच्या त्या निर्घृण मसलतीचा उल्लेख करताना, पवित्र कुरआन म्हणतो,

''आणि तो प्रसंग देखील आठवण्याजोगा आहे जेव्हा सत्य नाकारणारे तुझ्याविरूद्ध युक्त्या योजीत होते की, एक तर तुला कैद करावे अथवा ठार मारावे किंवा देशांतर करावे. ते आपल्या चाली खेळत होते आणि अल्लाह आपली चाल खेळत होता.



नि:संशय अल्लाह सर्वोत्तम चाल खेळणारा आहे.'' (दिव्य कुरआन, ८ : ३०)

ती स्थिती अत्यंत बिकट होती, परंतु मुहम्मद (स.) जराही डगमगले नाहीत. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मक्केतून प्रयाण करावे, अशी अबू बकर (रजि.) यांनी गळ घातली होती. त्या प्रवासात पैगंबर मुहम्मद (स.) यांना सोबत करण्यास ते स्वत:ही उत्सुक होते आणि त्या महत्त्वाच्या दिवसाची ते आतुरतेने वाट पाहात होते. परंतु पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांना सांगितले की ती वेळ अद्याप आलेली नाही. त्यांच्या स्वामीने स्थलांतराचा आदेश त्यांना अद्याप दिलेला नव्हता. पैगंबर मुहम्मद (स.) यांची अशी तीव्र इच्छा होती की, त्यांच्या सर्व साथीदारांनी मक्केतून सुखरूपणे प्रयाण करावे व मगच त्यांनी मक्का सोडावा. त्यांच्या या दुर्दम्य इच्छेपोटीच कदाचित त्यांच्या प्रयाणाच्या ईशआदेशाला विलंब लागला होता. शिवाय त्या आदेशाला विलंब लावून अल्लाहला, लोकांना हे दाखवून द्यायचे होते की, मुहम्मद (स.) हे अल्लाहचे पैगंबर असून त्यानेच लोकांना सत्त्याच्या व सदाचाराच्या मार्गाकडे हाक देण्यासाठी नाकारणारे आहे आणि म्हणून पैगंबर मुहम्मद (स.) यांना कशाचीही चिंता बाळगण्याचे काही कारणच नव्हते. घडलेल्या घटनांनीही हे उघड झाले आहे की, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या प्राणाची व त्यांच्या सुखरूपतेची हमी खुद्द केवळ अल्लाहच्या इच्छेवरच अवलंबून होती, म्हणून पाठबळासाठी कोणीही व्यक्तीच्या अगर गटाच्या साहाय्यावर विसंबण्याचे कारण नव्हते. तो सर्वशक्तिमान, ज्याच्यापाशी माणसाची व विश्वाची निर्मिती करण्याची शक्ती आहे, त्याच्यापाशी मुहम्मद (स.) वर आलेल्या संकटातून त्यांचे संरक्षण करण्याचीही शक्ती आहे, हेही अल्लाहला दाखवून द्यायचे होते.

अल्लाहची प्रयाणाबद्दलची आज्ञा लवकरच येणार, असे गृहित धरून माननीय अबू बकर (रजि.) यांनी प्रवासाची तयारी केली. त्यांनी वेगवान चालीचे दोन उंट आणले. वाळवंटातील लांबच्या प्रवासात त्यांनी तग धरावी म्हणून भरपूर चारापाणी घालून त्यांना धष्टपुष्ट केले.

## पैगंबर मुहम्मद (स.) यांचे प्रयाण

चार महिने लोटले. एके दिवशी पैगंबर मुहम्मद (स.) माननीय अबू बकर (रजि.) यांची घरी आले आणि सांगितले की अल्लाहने त्यांना मदीनेला प्रयाण करण्याचा आदेश दिला आहे. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे ते विश्वासू चाहते (त्यांच्यावर अल्लाहची शांती व कृपा असो) हे ऐकून त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू थरारले. शेवटी स्थलांतराची घटका येऊन ठेपली आणि त्या प्रवासात ते पैगंबरांना सोबत घेणार होते. त्या प्रसंगासाठी अगोदरच खरेदी केलेल्या दोन उंटांपैकी एक उंट त्यांनी पैगंबरांना दिला. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उंटाचा स्वीकार केला, पण त्याची किंमत स्वत: देणार या अटीवरच.

माननीय अबू बकर (रजि.) यांची मुलगी माननीय असमा (रजि.) हिने प्रवासात खाण्यासाठी शिदोरी तयार करून थैली भरली. दुसरीकडे मक्केतील लोक सावध होऊन पाळतीवर होते. रात्र जशी वाढत गेली, तसे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या निवासस्थानाभोवती हल्लेखोरांना दबा धरून बसविले. त्यांनी रात्रभर जागता पहारा ठेवला आणि पहाटे पैगंबर मुहम्मद (स.) घराबाहेर पडल्याबरोबर त्यांना तत्काळ ठार करण्याच्या प्रतिक्षेत राहिले. अधूनमधून दारावरील एका छिद्रातून ते पाहात असत आणि अद्याप अंथरूणावर आहेत याची खात्री करून घेत असत. पैगंबर मुहम्मद (स.) पाशी अनेक माणसांच्या ठेवी विश्वासाने ठेवलेल्या होत्या. त्या सर्व त्यांनी आपले चुलत बंधु माननीय अली (रजि.) यांच्या सुपूर्द केल्या आणि त्या त्यांच्या मालकाला परत करण्यात सांगितले. मग माननीय अली (रजि.) यांना अल्लाहच्या रक्षणाची पूर्ण हमी दिली आणि त्यांना कसलाही धोका होणार नाही असे सांगितले. माननीय अली (रजि.) हे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या बिछान्यावर झोपले आणि संपूर्ण शरीरावर हिरवी चादर पांघरून घेतली. पैगंबर मुहम्मद (स.) घराबाहेर आले आणि एक मूठभर माती उभ्या असलेल्या हल्लेखोरांवर फेकली आणि पवित्र कुरआनच्या आयती तोंडाने म्हणत त्यांच्यासमोरून निघून गेले व कोणालाही ते दिसले नाहीत.

हल्लेखोर दिवस उगवेपर्यंत टेहळणीच करीत राहिले. नंतर ते घरामध्ये घुसले आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अंथरूणावर झोपलेले पैगंबर मुहम्मद (स.) नसून माननीय अली (रजि.) आहेत, हे पाहून त्यांची घोर निराशा झाली. या बातमीने सबंध शहरात मोठी खळबळ उडाली. पैगंबर मुहम्मद (स.) थेट माननीय अबू बकर (रजि.) यांच्या घरी गेले. अबू बकर लगेच त्यांच्या बरोबर निघाले. दोघेही दक्षिण दिशेने निघाले. सौर डोंगराचा माथा चढून गेले आणि तेथे एका गुहेत लपून आश्रय घेण्याचे ठरविले. माननीय अबू बकर (रजि.) आधी गुहेत शिरले, काही भोके गुहेला होती, ती अंगावरच्या कपड्यांची लोंबती लक्तरे फाडून ती झाकली. गुहा स्वच्छ केली आणि मग पैगंबर मुहम्मद



(स.) यांना आत प्रवेश करण्यास सांगितले.

पैगंबर मुहम्मद (स.) आणि त्यांचे साथीदार त्या गुहेत तीन रात्र राहिले. रात्री अंधार पडल्यावर माननीय अबू बकर (रजि.) यांचा पुत्र अब्दुल्लाह त्यांना भेटायला येऊन शहरातील स्थितीची खबर देत असे. आमिर बिन फुहैरा, इतर शेळ्या राखणारांच्या कळपाबरोबर त्यांचे मालक माननीय अबू बकर (रजि.) यांच्या शेळ्या सांभाळीत असे. अंधार पडल्यावर इतरांच्या नजरा चुकवून व काही शेळ्या हाकत बरोबर घेऊन गुहेकडे येत असे आणि गुहेतील दोघांना भरपूर दूध पुरवीत असे.

दुसरीकडे कुरैशचे लोक पूर्णत: बावचळून गेले आणि त्यांची दमछाक झाली होती. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे शीर आणून देणारास फार मोठे इनाम देऊ करण्यात आले. निवासस्थानाभोवती तैनात केलेले तथाकथित हल्लेखोर अपयशी झाले होते आणि पैगंबर मुहम्मद (स.) त्यांच्या हातून सुखरूपपणे निसटून गेले, हे कळल्यावर, त्यांनी क्रोधाने आणि वैफल्याने दात-ओठ चावले. घोडेस्वार प्रदेशात चहूकडे सोडण्यात आले. एकदा तर ते पैगंबर व माननीय अबू बकर (रजि.) लपलेल्या गुहेच्या तोंडापर्यंत आले. शत्रू जेव्हा अगदी जवळ आल्याची चाहूल लागली, तेव्हा माननीय अबू बकर (रजि.) यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कानांपाशी कुजबुजले, ''त्यांनी जर गुहेच्या आत डोकावून पाहिले आणि आपणाला हुडकले तर? आपण दोघेच व नि:शस्त्र आहोत आणि गुहेच्या तळाशी आहोत.''

आदरणीय पैगंबर मुहम्मद (स.) यांनी ईशप्रेरणेने लाभलेले उत्तर शांततेने दिले, ''हे माननीय अबू बकर (रजि.)! ज्या दोघांबरोबर तिसरा अल्लाह आहे, त्या दोघांबद्दल तुम्हाला काय वाटते?''

या गुहेच्या दृश्याचा अप्रत्यक्षरीतीने उल्लेख करताना पवित्र कुरआन म्हणतो,

''जर तुम्ही पैगंबराला मदत केली नाही तर काही पर्वा नाही. अल्लाहने त्याला त्याप्रसंगी मदत केली आहे जेव्हा अइमानधारकांनी त्याला काढून टाकले होते. जेव्हा तो फक्त दोनपैकी - दुसरा होता, जेव्हा ते दोघे गुहेत होते, तेव्हा तो आपल्या साथीदाराला सांगत होता, ''दु:खी होऊ नकोस. अल्लाह आमच्यासमवेत आहे.'' त्यावेळी अल्लाहने आपल्याकडून त्याच्यावर मन:शांती उतरविली आणि त्याला अशा लष्काराद्वारे मदत केली जे तुम्हाला दिसत नव्हते व अइमानधारकांचे वचन खाली पाडले व अल्लाहचे वचन तर उच्चच आहे, अल्लाह जबरदस्त आणि द्रष्टा व बुद्धिमान आहे.''

(दिव्य कुरआन, ९ : ४०)

आदरणीय मुहम्मद (स.) आणि माननीय अबू बकर (रजि.) तीन दिवस गुहेत

वास्तव्य करून होते आणि त्यांना पकडण्यासाठी कुरैशचे लोक पिसाळलेल्या अवस्थेत त्यांना हुडकीत होते.

अब्दुल्लाह बिन अरैकित जे अदिल बिन बकरच्या कुटुंबापैकी होते, त्यांनी तोवर इस्लामची दीक्षा घेतली नव्हती, तरी माननीय अबू बकर (रजि.) यांचा त्यांच्यावर विश्वास होता. त्यांना मजुरी देऊन वाटाड्याचे काम करण्यास नेमले होते. ते तिन्ही दिवस रात्र पडल्यावर गुहेपाशी, योजनेनुसार जात. त्यांनी दिलेल्या बातम्यांनी त्या दोन थोर आश्रितांची खात्री झाली की त्यांचा शोध घेण्याचे काम शिथिल झाले आहे. पुढे प्रयाण करण्याची संधी आली आहे. कोणाच्याही दृष्टीस न पडता ते जाऊ शकत होते. जितक्या लवकर जातील तितके चांगले होते.

ते उंटावर स्वार झाले. पैगंबर मुहम्मद (स.) वाटाड्यासह बसले आणि दुसऱ्या उंटावर माननीय अबू बकर (रजि.) त्यांचा चाकर इब्न फुहैरासह बसले आणि प्रवासाला सुरूवात झाली. सौरचा डोंगर उतरून खाली आले आणि मक्केच्या खालच्या भागाचा प्रदेश सोडून थोडेसे उजवीकडे आले, तेव्हा त्यांना रूळलेली वाट लागली. ती वाट हमरस्त्याच्या डावीकडून बऱ्याच अंतराने जात होती. ते जलदगतीने जात होते. नंतर ते पश्चिमेच्या दिशेने वळले आणि त्यांना अस्फान नजिकचा समुद्रकिनारा लागला.

हा चिमुकला काफिला रात्रीच्या वेळी प्रवास करी आणि दुपारच्या प्रहरी प्रखर उन्हाचा त्रास टाळण्यासाठी विश्रांती घेत. एके दिवशी त्यांना कोठे सावलीच आढळली नाही. माननीय अबू बकर (रजि.) यांनी चौफेर नजर फिरविली आणि एका खडकाच्या मागे थोडीशी सावली असल्याचे त्यांना दिसले. त्यांनी ती जागा साफ केली. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी थोडे अंग टाकावे म्हणून आपली चादर अंथरली व स्वत: खायला काही मिळते काय याचा शोध घेण्यासाठी गेले. हिंडता हिंडता त्यांना शेळ्या राखणारा एक बदावी मुलगा आढळला. माननीय अबू बकर (रजि.) यांनी त्याला शेळ्यांचे दूध मागितले, ते त्या मुलाने दिले.

वर म्हटल्याप्रमाणे, कुरैशनी अशी जाहीर घोषणा केली होती की जो कोणी पैगंबर मुहम्मद (स.) यांना पकडून आणील, त्याला शंभर उंट इनाम दिले जाईल. या मोठ्या इनामाच्या लालसेने अनेक लोकांना पैगंबर मुहम्मद (स.) यांना पकडून आणण्याची प्रेरणा दिली होती.

पैगंबर आणि त्यांच्या सोबत्यांचा शोध घेऊन इनामाचे घबाड मिळविण्यासाठी धडपडणाऱ्यांपैकी मलिकचा मुलगा सुराका हाही होता. एका विशिष्ट वाटेने चार माणसे जाताना दिसल्याची बातमी त्याला मिळाली, तेव्हा गुपचुपणे त्यांचा पाठलाग करण्याचे



त्याने ठरविले, जेणेकरून ते मोठे इनाम त्याच्या एकट्याच्याच पदरात पडावे. तो एका वेगवान घोड्यावर स्वार होऊन त्यांच्या पाठलागावर निघाला. जाताना वाटेत घोड्याला ठोकर लागून तो जमिनीवर पडला. तेव्हा अरब लोकांमध्ये प्रचलित असलेल्या रिवाजानुसार फासे टाकून प्रवास पुढे चालू ठेवण्यास दैवाचा कल त्याला अनुकूल आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी त्याने फासे टाकून पाहिले. पण दैवाचा कौल त्याला प्रतिकूल लागला. परंतु भौतिक संपत्तीच्या लालसेने आंधळा बनला असल्याने त्याने पाठलागाला पुन्हा सुरूवात केली. पुन्हा एकदा तशीच घटना घडली, परंतु त्याने लक्ष दिले नाही. तो घोड्याच्या खोगीरावर उडी मारून बसला आणि भरधाव वेगाने तीरासारखा निघाला आणि त्याने पैगंबर मुहम्मद (स.) यांना गाठले. माननीय अबू बकर (रजि.) यांचे हृदय चळवळू लागले आणि ते पैगंबर मुहम्मद (स.) यांना म्हणाले, ''हे अल्लाहचे पैगंबरा! आपला घात झाला.''

परंतु पैगंबर मुहम्मद (स.) यांनी शांतपणाने व परिपूर्ण आत्मविश्वासाने उत्तर दिले, ''हवालदिल होऊ नका. अल्लाह आपल्या बरोबर आहे.''

प्राणांतिक संकटांच्या वेढ्यात असताना इतका आश्चर्यकारक व नवल वाटण्यासारखा खंबीरपणा व धैर्य पैगंबर मुहम्मद (स.) यांना ईशदिव्यबोधाने लाभला त्यानेच पैगंबर मुहम्मद (स.) यांना बलशाली केले आणि जीवनात पावलोपावली त्यांना स्वस्थ केले.

पाठलाग करणाऱ्या सुराकाच्या घोड्याचे ठेचाळून वारंवार खाली पडणे आणि सुराकाचे जमिनीवर आपटणे या घटनांनी सुराकाच्या मनात त्या अवस्थेची जाग निर्माण केली आणि पैगंबराबद्दल त्याच्या दुष्ट इराद्याविरूद्ध अल्लाहने वारंवार दिलेली भयसूचना असल्याचे त्याला वाटले. त्याचे मन चटकन बदलले आणि एका शपथ वाहिलेल्या कडव्या शत्रूचे रूपांतर एक प्रामाणिक इमानधारकात झाले. तो पश्चात्तापदग्धपणे पैगंबराजवळ आला आणि त्याला क्षमा करण्यासाठी अत्यंत लीनतेने तो पैगंबर मुहम्मद (स.) यांची विनवणी करू लागला. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्याला माफी दिली आणि क्षमेची खूण म्हणून एका चर्मपटाच्या तुकड्यावर माननीय अबू बकर (रजि.) यांच्या हस्ते तसे लिहून दिले. सुराकाने हाच माफीचा चर्मपटाचा तुकडा मुहम्मद (स.) यांना जेव्हा त्यांनी विजय प्राप्त करून मक्केत प्रवेश केला, तेव्हा दाखविला. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्याला बक्षिसी दिली आणि म्हणाले, ''हा मेहरबानीचा व निष्ठेचा दिवस आहे.'' सुराका लगबगीने मक्केकडे परतला आणि मुहम्मद (स.) यांचा आणि त्यांच्या थोर सोबत्यांचा शोध घेण्यासाठी पाठलाग करणाऱ्यांचे प्रयत्न विफल करू लागला.

या छोट्या काफील्याने त्याचा प्रवास उम्मे माबद खुजरी यांची वसाहत येईपर्यंत

चालू ठेवला. ती दयाशील महिला आपल्या तंबुच्या दारासमोर गालिचा अंथरून एखादा दमलेला वाटसरू कोणी जातो का याची प्रतिक्षा करीत बसत असे. प्रवासाच्या श्रमाने अगदी थकलेले आणि तहानलेले पैगंबर मुहम्मद (स.) आणि त्यांचे सोबती यांना काही खाऊन व थोडे दूध प्राशन करून ताजेतवाने व्हायचे होते. त्या वृद्ध महिलेने सांगितले की शेळ्यांचा कळप चरण्यासाठी कुरणात गेला आहें आणि जवळ उभी असलेली एक शेळी पूर्ण आटलेली असून तिला मुळीच दूध नाही. त्या महिलेच्या अनुमतीने पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्या शेळीच्या सडामधून दुधाच्या धारा काढून भरपूर दूध मिळाल्याचे पाहून त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी घरमालकिणीला प्रथम दूध दिले आणि जे उरले, ते सर्वांनी मिळून प्राशन केले.

ताजेतवाने होऊन त्या स्थलांतरितांनी पुढे वाटचाल सुरू केली. संध्याकाळी उम्मे माबदचा पती अबू माबद घरी आल्यावर त्या महिलेने ती विलक्षण घटना त्याला सांगितली. यावर तो उद्‌गारला, ''ईश्वराशपथ, हा तोच मनुष्य होय, ज्याला अल-कुरैशचे लोक शोधीत आहेत. तू मला त्याचे वर्णन सांगू शकतेस काय?''

उम्मे माबद म्हणाली, ''त्याचा चेहरा अत्यंत तेजस्वी व रूंद होता. त्याचे शिष्टाचार फार सुरेख होते. त्याच्या पोटाची तोंद पुढे आलेली नव्हती तसेच त्याच्या डोक्यावर केसांचा अभाव नव्हता. त्याचे डोळे काळेभोर व आकर्षक होते आणि त्यांच्यावर दाट केसांच्या व जुळलेल्या कमानदार भुवया होत्या. त्याचे केस काळेभोर, तुकतुकीत व लांब असून किंचितसे कुरळे होते. त्याचा आवाज फार प्रभावशाली होता. त्याचे डोके मोठे व सूडौल असून मान सडसडीत होती. त्याच्या चेहऱ्यावरील भाव विचारमग्नतेचे व ध्यानस्थपणाचे, निश्चल शांततेचे व उदात्ततेचे होते. अनोळखी माणसाचे लक्ष दुरूनच त्याच्याकडे वेधले जाते. त्याच्याशी परिचय होताक्षणीच त्याच्याबद्दलच्या ओढीचे रूपांतर त्याच्याविषयी वाटणाऱ्या प्रेमात व आदरात होते. चेहऱ्याचे हावभाव मधळ व स्पष्ट होते. त्याची वाणी खणखणीत वायफळ शब्दापासून मुक्त होती. मोत्याच्या गुंफलेल्या माळेसारखे शब्द त्याच्या मुखातून बाहेर पडत. त्याच्या शरीराचा बांध अप्रिय वाटण्याइतका अतिउंच नव्हता की अतिखुजाही नव्हता. त्या दोघांमध्ये तोच जीवनदायी धमणीसारखा वाटत होता, अतिशय तेज:पुंज व टवटवीत. त्याच्या सभोवती त्याच्या सोबत्यांच नेहमी गराडा असे. जेव्हा तो काही उच्चार करी तेव्हा ऐकणारे लक्षपूर्वक त्याचे म्हणणे ऐकत आणि जेव्हा तो काही आदेश देई, तेव्हा तो पुरा करण्यात त्याच्या सोबत्यामध्ये एकमेकांत चढाओढ लागे. तोच धनी व आदेश देणारा होता. त्याच्या बोलण्यात सत्य व प्रामाणिकपणा ओतप्रोत भरलेला असून सर्व प्रकारच्या असत्यापासून व खोटारडेपणापासून मुक्त होता.''



हे शब्द ऐकल्यानंतर अबू माबद म्हणाला, ''ईश्वराची शपथ! हा तोच माणूस आहे, ज्याच्याबद्दल कुरैश लोकांत मोठ्या औत्सुक्याने व तावातावाने जोरदार वादविवाद हल्ली चालू आहे. त्याच्या अनुयायित्वाचे जोखड मानेवर घेण्याचा निश्चय मी आनंदाने केला आहे.''

उम्मे माबदचा तंबु सोडल्यानंतर पगंबर मुहम्मद (स.) व त्यांचे सोबती यांनी वेळ न दवडता पुन्हा जोरात वाटचाल सुरू केली. पाण्याच्या अभावाचा आणि रणरणत्या उन्हाची होरपळणारी उष्णता सहन करीत त्यांनी आडवाटेनेच प्रवास चालू ठेवला. वाटेने जात असताना त्यांना या खेपेस एका तांड्याचे नेतृत्व करीत चालेल्या व सीरियाहून परतणाऱ्या जुबैरशी भेट झाली. प्रेमळ शुभेच्छांचे आदान प्रदान झाले. मदीनावासी आपले मोठ्या उत्कंठेने प्रतीक्षा करीत आहेत. त्याने पांढरे अंगरखेही त्यांना भेट म्हणून दिले आणि त्यांचा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी साभार स्वीकार केले.

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे आगमन झाले, या बातम्या पसरू लागल्याक्षणीच मदीन्यातील लोकांनी गोळा हाऊन मोठी गर्दी केली. दररोज सकाळी ते गोळा होऊन पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या आगमनाची उत्कंठतेने वाट बघत थांबत असत. दुपारच्या उन्हाची प्रखरता वाढेपर्यंत ते थांबत असत. ऐके दिवशी कंटाळवाणी वाट बघून ते घरांकडे परतल्यानंतर तीन प्रवासी वळणे असलेल्या वाटेने मदीनेकडे येत असल्याचे दृश्य एका यहुद्याने पाहिले. तो एका टेकडीच्या माथ्यावरून ओरडला, ''हे अरबस्तानच्या लोकहो! ते आले आहेत, ते, ज्यांची तुम्ही आतुरतेने प्रतिक्षा करीत होता. ते आलेत.''

ती आनंदाची बातमी सर्व शहराभर वाऱ्यासारखी पसरली आणि सर्व माणसे त्या उदत्त पाहुण्यांचे स्वागत करण्यासाठी लगबगीने पुढे आली. बनू अम्रमध्ये ''अल्लाहो अकबर'' (अल्लाह सर्वश्रेष्ठ आहे) च्या गर्जना आकाशाला भिडल्या. पैगंबर मुहम्मद (स.) यांचा हर्ष व आनंद त्या प्रमाणात वाढू लागला. परंतु वेळ-प्रसंगाच्या औचित्याची दुर्मिळ जाण दर्शवित, पैगंबर मुहम्मद (स.) यांनी तो हर्षोन्माद थांबविण्यास सांगितले. तो सोमवारचा दिवस होता आणि पैगंबरत्वाच्या जीवनाला तेरा वर्षे झाली होती व रब्बिल अव्वल महिन्याचा तो आठवा दिवस होता. इंग्रजी तारीख २० सप्टेंबर इ. स. ६२२ अशी होती. अम्र बिन औफच्या टोळीचा प्रमुख कुलसुम बिन हादम् या आदरातिथ्यातील माणसाकडे कुबा येथे मुहम्मद (स.) चे वास्तव्य झाले. स्थलांतरितांच्या पहिल्या तुकडीतील बरेच जण आधीच त्यांच्याकडे आश्रय घेऊन राहिले होते. याच ठिकाणी, माननीय अली (रजि.) नंतर येऊन या गटात सामील झाले. कुटुंबातील उरलेले सर्वजण लवकरच येऊन मिळतील अशी आनंदाची बातमी त्यांनी आणली. माननीय जैद (रजि.) एका गटाचे नेतृत्व करीत असून त्या गटात त्यांची पत्नी माननीय जैनब, पैगंबर मुहम्मद (स.) यांची

पत्नी सौदाह, कन्या फातिमा व उम्मे कुलसुम होते. अब्दुल्लाह बिन अबु बकर त्यांच्या बहिणी आएशा व असमा यांना घेऊन व त्यांची आई उम्म रूमान यांच्यासह येत होते.

कुबामधील वास्तव्याचा कालावधी, 'बुखारी'च्या कथनानुसार एक पंधरवडा होता. त्या कालावधीत एका मस्जिदचा पाया घालण्यात आला. तिचा वैभवशाली गौरव पवित्र कुरआनमध्ये खालील शब्दांत करण्यात आला आहे,

''जी मस्जिद प्रथम दिनापासून ईशपरायणतेवर स्थापन करण्यात आली होती तीच यासाठी अधिक योग्य आहे की तुम्ही तिच्यात (उपासनेसाठी) उभे राहावे.''

(दिव्य कुरआन, ९ : १०८)

मस्जिदच्या बांधकामात सोबत्यांच्या खांद्याला खांदा लावून पैगंबर जातीने कष्ट करीत होते, त्यांनी आपल्या पाठीवरून दगड वाहून आणले आणि ते उचित जागी बसविण्यात मदत केली.

शुक्रवारी सकाळी पैगंबर मुहम्मद (स.) स्वार होऊन मदीना शहराकडे निघाले. दुतर्फा उभे असलेल्या लोकांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. बनू सलीमच्या दारात एके ठिकाणी ते थांबले आणि शुक्रवारची पहिली नमाज अदा केली. त्यावेळी त्यांनी जे प्रवचन केले, ते अद्वितीय वक्तृत्वाने, आग्रही निमंत्रणाने व ईशस्तुतीने ओथंबलेले होते, इमानचे गुणगान करणारे व इस्लामचे सार संक्षिप्तपणे वर्णन करणारे होते,

''अल्लाहची स्तुती असो! मी त्याचेच सहाय्य शोधतो, त्याचे मार्गदर्शन इच्छितो आणि सत्याच्या इन्कारापासून दूर राहतो. मी घोषित करतो की अल्लाह एकमेव आहे आणि मुहम्मद ज्याला त्याच्या अल्लाहने मार्गदर्शन, प्रकाश व ज्ञान प्रदान करून आशिर्वादित केले आहे, त्याचा तो पैगंबर आहे. अल्लाहनेच त्यांना अशा वेळी लोकांकडे पाठविले आहे, जेव्हा प्रेषितांचे आगमन थांबले आहे आणि माणसांना आधीच्या प्रेषितांच्या शिकवणीचा विसर पडला आहे आणि ते मार्गभ्रष्ट होऊन भरकटत आहेत. पुनरूत्थानाचा दिवस समीप आला आहे. अल्लाहच्या व त्याचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या आज्ञांचे जो पालन करील, त्याला पुण्याचा व नेकीचा मार्ग सापडेल आणि जो त्यांची अवज्ञा करील, तो पथभ्रष्ट होऊन भरकटत जाईल. यात कसलीही शंका नाही. तो एका उघड मार्गभ्रष्टतेत गुरफटलेला असेल. अल्लाहचे भय बाळगण्याची मी तुम्हाला भयसूचना व ताकीद देतो. एका मुस्लिमाने त्याच्या बांधवाला द्यावयाचा सर्वोत्तम सल्ला म्हणजे त्याला धार्मिक आचरणाचा आग्रह करणे होय. अल्लाहने ज्या गोष्टींच्या मनाईचा आदेश दिला आहे, त्या गोष्टींच्या जवळपासही फिरकू नका. ईशभय बाळगणे आणि धर्मनिष्ठ आचरण करणे, यापेक्षा अधिक मोलाचा विधी कोणताही नाही. तेच इहलोकातील शक्तीचे साधन असून



मरणोत्तर जीवनात तेच सहाय्यभूत ठरणार आहे. तुमच्या जीवनातील दृश्य, तसेच अदृश्य क्षेत्रात, अल्लाहशी तुमचा संबंध सत्यावर व एकनिष्ठेवर आधारलेला हवा. हे उद्दिष्ट तुम्ही सर्वोत्कृष्ट रीतीने तेव्हाच गाठू शकाल जेव्हा अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करण्याच्या हेतुखेरीज तुमच्या डोळ्यांसमोर अन्य कोणताही हेतू नसेल. अशा जीवनचर्येने तुम्हाला या जगातही आदर व कीर्ती मिळेल आणि पारलौकिक जीवनात तर ते मोठे वरदान ठरेल, त्या वेळी माणसाला सत्कर्माची व पुण्याईची तीव्र गरज असेल आणि त्यांची इच्छा असेल की त्याच्यापासून दुष्कृत्ये व पाप खूप दूर असते तर बरे झाले असते. अल्लाह त्याच्या माणसांशी अत्यंत दयाशील व कृपावंत आहे. अल्लाह सत्यवचनी असून त्याने दिलेले वचन तो पुरे करून राहील. पवित्र कुरआनमध्ये तो फर्मावितो-

''माझ्या येथे शब्द बदलला जात नाही, आणि मी आपल्या दासांवर जुलूम करणारा नाही.''

(दिव्य कुरआन, ५० : २९)

''म्हणून या जीवनात व नंतर येणाऱ्या जीवनांत अल्लाहचे भय उघडपणे व सुप्तपणे बाळगा, कारण जो त्याचे भय बाळगतो, त्याला त्याच्या पापांबद्दल तो क्षमा करतो आणि त्याला मोठे बक्षीस प्रदान करतो. वास्तविकत: असाच माणूस सर्वाधिक सफल ठरतो. ईशभय माणसाला त्याच्या कोपापासून वाचविते. त्याच्या क्रोधापासून व त्याच्या शिक्षेपासून वाचविते. त्यामुळे माणसांचे चेहरे तेज:पुंज होऊन निवाड्याच्या दिवशी त्यांचा दर्जा बुलंद होईल. अल्लाहचे भय बाळगा व सद्गुणांच्या व धार्मिकतेच्या वाटेने जा तो क्षमाशील आहे. म्हणून त्याच्या आज्ञापालनात कसलीही कुचराई करू नका, त्याच्यावर प्रगाढ श्रद्धा व विश्वास बाळगा व त्याचे भय बाळगा. अल्लाहने त्याचा ग्रंथ तुमच्या शिकवणीसाठी अवतरला आहे आणि तुमच्या मार्गदर्शनासाठी सत्य व सरळ मार्ग तुम्हाला स्पष्टपणे दाखवून दिला आहे, जेणेकरून सत्य आणि असत्य यामधील फरक ठळकपणे दिसावा. अल्लाहने जशी तुम्हावर कृपा केली आहे, त्याप्रमाणे तुम्हीही पूर्ण निष्ठेने त्याच्या आज्ञांचे पालन करायला पाहिजे. त्याचे शत्रू हे तुमचे शत्रू समजा आणि त्याची प्रसन्नता संपादण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करा. अल्लाहने त्याच्या कार्यासाठी तुम्हाला निवडले असून, तुमचे नामाभिधान 'मुस्लिम' असे केले आहे. अल्लाहने व्यवस्था केली आहे की ज्यांचा नाश व्हायचा आहे, ते वाहवले जातील आणि ज्यांना जिवंत ठेवायचे आहे, ते लोक अल्लाहच्या स्पष्ट निशाण्या त्यांच्यापर्यंत पोहोचल्यानंतर त्यांनी सूक्ष्मदृष्टीने व पूर्ण ज्ञान बाळगून आणि पुराव्याच्या (ईशनिशाण्या) बळावर राहिले पाहिजे. कसलेही सामर्थ्य व बळ, कोणाच्याही उपयोगी पडणार नाही, याला अपवाद केवळ अल्लाहचे सामर्थ्य. म्हणून तुम्हाला जितके शक्य आहे, तितके अल्लाहचे स्मरण करीत जा आणि मरणोत्तर जीवनाखातर जगा. अल्लाहशी ज्यांचे संबंध प्रामाणिकपणावर

अधिष्ठित आहेत, त्याचे सहाय्य तो सर्व प्रकारच्या संकटात करील. कोणीही त्याला इजा करू शकणार नाही. अल्लाह एकटाच सर्व लोकांवर वर्चस्व बाळगतो. परंतु लोक अल्लाहला आज्ञा करू शकत नाहीत. अल्लाह एकटाच सर्व माणसांचा स्वामी असून, माणसाचा त्याच्या स्वामीत्वामध्ये कसलाही वाटा नाही. म्हणून अल्लाहशी तुमचे संबंध यथोचित पायावर राखा. इतर लोकाबद्दल त्रास करून घेऊ नका. अल्लाह सर्वांत मोठा रक्षणकर्ता आहे. अल्लाह सर्वश्रेष्ठ आहे आणि त्याच्याखेरीज अन्य कोणाचीही सत्ता नाही.''

हे वक्तृत्व इतके बोलके व स्पष्ट आहे की त्याला स्पष्टीकरणाची गरज नाही. एक माणूस तेरा वर्षे कुरैशांकडून मानहानी व सर्व प्रकारची अवहेलना सोसतो, दगडधोंडे त्यांनी मारले जातात व विष्टा-घाण त्यांच्यावर फेकली जाते, तरूणांकडून व वृद्धांकडून त्यांना त्रास दिला जातो. त्यांच्यावर संपूर्ण बहिष्कार टाकून वाळीत टाकले जाते. मग त्यांचे जीवनच संपवून टाकण्यासाठी त्यांना ठार करण्याची कट-कारस्थाने शिजविली जातात आणि त्यांना आपले आवडते घरदार सोडायला भाग पाडले जाते. त्यांचा कसलाही अपराध नसताना, त्यांना सर्व प्रकारच्या यातना व क्लेश-शारीरिक तसेच मानसिक दिल्या जातात. ते केवळ इतकेच सांगते की तुम्ही अल्लाहची शरणागती घ्या. त्यांच्या जन्मस्थानातून, त्यांना घालवून दिल्यानंतर आणि लांबच्या प्रवासाच्या इतक्या खडतर हालअपेष्टा सोसल्यानंतर, जेव्हा लोकांना संबोधून भाषण करण्याची पहिली संधी त्यांना मिळाली, तेव्हा कडुतेचा, वैरभावाचा एक शब्दही ते उच्चारत नाहीत. त्यांना व्यक्तिगत त्रासाबद्दल व दु:खाबद्दल काही सांगायचे नाही. मक्केच्या लोकांनी त्यांच्यावर जे जुलूम  व अत्याचार केले त्याबद्दल किंवा त्यांना सार्वजनिकरितीने बहिष्कृत करून वाळीत टाकल्याबद्दल, त्यांना काहीही सांगायचे नाही. व्यक्तिगत यातना व मनोवेदनांच्या कलंकापासून ते थोर हृदय अगदी अलिप्त आहे. आपल्या श्रोत्यांना ते अल्लाहची जाणीव धरण्याचे व सत्य-सदाचाराचा मार्ग अनुसरण्याचे, वारंवार आग्रह करीत असत.



## पैगंबर मुहम्मद (स.) मदीनेत पोहोचतात

शुक्रवारच्या नमाजचे नेतृत्व करून झाल्यावर पैगंबर मदीनेकडे जायला निघतात. मदीनेतील टोळ्या आणि कुटुंबे गर्दी करून पुढे येतात आणि त्या थोर पाहुण्यांना आपल्या स्वागतासाठी घेऊन जाण्यात, ते एकमेकांशी चढाओढ करू लागतात. ती एक विजयोत्सवी मिरवणूकच होती. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या उंटाच्या सभोवती आणि त्यांच्या सोबत्यांच्या सभोवती शहरातील प्रमुख माणसे उत्तमोत्तम पोषाख परिधान करून व लखलखती शस्त्रे घेऊन घोड्यावर स्वार होऊन चालले होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे स्वागत करण्याचा प्रत्येकाला ध्यास लागून राहिला होता. जो तो म्हणत होता, ''येथेच उतरा, हे अल्लाहचे पैगंबरा! आमच्या घरात वास्तव्य करा.''

पैगंबर मुहम्मद (स.) प्रत्येकाला आदरशीलतेने व कृपाशीलतेने विनम्रपणे उत्तरे देत की, ''या उंटाला ईशआदेश आहे, तो ज्या जागी थांबेल, तेथे माझे निवासस्थान असेल.''

लगाम सैल सोडलेला उंट पुढे जात राहिला. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे आईकडून नाते असलेल्या बनू नज्जार टोळीचे लोक राहात असलेल्या शहराच्या भागात शिरला. तेथे अबू अय्यूब नावाच्या इसमाच्या घरापुढे थांबला. त्या ईशकृपेने अत्यानंदित झालेला यजमान पुढे सरसावला व त्याने पवित्र पाहुण्यांचे स्वागत केले आणि घरात येण्याची विनंती केली. अबू अय्यूबला पैगंबराबद्दल मनस्वी आदर असल्यामुळे त्याने इमारतीचा वरचा मजला रिकामा करून देण्याची सूचना केली, परंतु पैगंबर मुहम्मद (स.) यांनी खाली राहण्याचे पसंत केले, कारण भेटीला येणाऱ्या लोकांना ते सोयीचे होते. पैगंबर या घरात सात महिने वास्तव्य करून होते. मस्जिदचे बांधकाम व त्यांची राहण्याची खोली बांधून होईपर्यंत ते तेथे राहिले.

## मक्केतील यश

इस्लामला महान यश मदीनेत मिळाले, यात शंका नाही, परंतु मक्केतील संपादणूकही कमी महत्त्वाची नव्हती. मक्केमध्येच या नव्या धर्माचा पाया घातला गेला होता आणि मुस्लिमांच्या जीवनात आणि त्यांच्या विचारधारणेत विलक्षण क्रांतिकारक बदल घडून आला.

मूर म्हणतो, ''प्राचीन ख्रिस्ती धर्ममताने जगाला झोपेतून खडबडून जागे केले आणि रानटी धर्माशी जीवघेणा संघर्ष केला, त्या दिवसापासून माणसांनी आध्यात्मिक चेतना व सद्सद्विवेकबुद्धीपोटी सोसल्याचे पूर्वी कधीही दिसले नव्हते.''

त्या तेरा वर्षांनी किती क्रांतिकारी बदल आज घडवून आणला! शेकडो माणसांच्या समूहांनी मूर्तिपूजा नाकारली, एकमेव अल्लाहची उपासना अंगीकारली आणि ईशदिव्यबोध म्हणून ज्यावर त्यांचा गाढ विश्वास होता, त्याच्या मार्गदर्शनाखाली स्वत:ला त्यांनी पूर्णपणे समर्पित केले, सर्वशक्तिमान अल्लाहची, अनेकदा उत्साहाने व कळकळीने प्रार्थना करायची, त्याच्या कृपाशीलतेपासून क्षमेची याचना करायची आणि सत्कृत्ये करण्यासाठी, दानधर्म करण्यासाठी स्वच्छ व निर्मळ राहण्यासाठी आणि न्यायीपणासाठी धडपड करायची. आता ते सर्वशक्तिमान अल्लाहच्या सत्तेची जाण सतत बाळगून वावरत असत आणि त्यांची लहानातील लहान अडचणी अल्लाहच्या देखरेखीखाली होती, याची सतत जाणीव असे. निसर्गाच्या सर्व देणग्यात, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात, त्यांच्या प्रत्येक व्यवहारात, वैयक्तिक जीवनात आणि सामाजिक जीवनात अल्लाहचा हात आहे. पैगंबर मुहम्मद (स.) हे त्यांचे जन्मभराचे धर्मोपदेशक आहेत, त्यांच्या ईशअधिपत्याखालील त्यांच्या नवीन जन्मलेल्या आशा आकांक्षांचे पैगंबर मुहम्मद (स.) हे जोपासक साधन होते आणि पैगंबर मुहम्मद (स.) पुढे ते निखालसपणे अनन्यभावाने समर्पित झाले होते.

इमानधारकांनी त्यांच्यावर झालेले अत्याचार व छळ-यातना मोठ्या धैर्याने व सहनशीलतेने सोसल्या. तसे हाल सोसणे हे जरी त्यांचे शहाणपणाचे कृत्य होते, तरी त्यांनी दाखविलेल्या प्रंचड संयमाचे व सोशिकपणाचे श्रेय त्यांना दिलेच पाहिजे. नव्या मौलिक श्रद्धेचा त्याग करण्यापेक्षा शंभर पुरूषांनी व महिलांनी आपली घरेदारे सोडून देऊन देशोधडीला गेले. ते वादळ पूर्णपणे शमेपर्यंत हद्दपारीच्या अवस्थेत ते ॲबिसीनियामध्ये राहिले आणि आता खुद्द पैगंबरांबरोबर, त्याहून मोठ्या संख्येत लोक, त्यांचे लाडके शहर व पवित्र काबा सोडून देऊन स्थलांतरासाठी निघाले होते. मक्का येथील काबागृह जे त्यांना जगातील कोणत्याही पवित्र स्थळापेक्षा अधिक पवित्र होते, पण ते सोडून लोक मदीनेला स्थलांतरित होत होते. तेथे गेल्यानंतर दोन किंवा तीन वर्षाच्या कालावधीतच त्या अलौकिक मोहिनीने असा बंधुभाव निर्माण केला की, तेथील जनता आपल्या प्राणांचे मोल देऊनही पैगंबर मुहम्मद (स.) यांचे व त्यांच्या सोबत्यांचे संरक्षण करण्यास तयार झाली.



**प्रकरण ६**

# पैगंबर मुहम्मद (स.) यांना बळ मिळते

आता आपण पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मदीनेत जे यश संपादन केले, त्या वास्तवतेकडे वळू या. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे धर्मप्रचार कार्य आरंभापासून ते अखेरपर्यंत आध्यात्मिक होते. वर वर पाहणाऱ्याला त्यांचे कार्य लौकिक व सांसारिक वाटत असले, तरी ते अध्यात्मिक उद्दिष्टांनीच प्रेरित होते. ते अल्लाहचे पैगंबर होते आणि अल्लाहच्या अंतिम पैगंबराच्या दर्जानेच त्यांनी त्यांच्या निर्माणकर्त्याच्या शब्दांना मूर्तस्वरूप देऊन सत्य आचरणात आणून दाखविले. त्यांचे सर्व प्रयत्न व शक्ती या एकमेव उद्दिष्टासाठी खर्ची पडली. त्यांचे सर्व विचार किंवा योजना, त्यांच्या सर्व उक्ती व कृती; हे सर्व या इच्छेपोटीच जन्मल्या होत्या की मानवजातीने अल्लाहला ओळखावे आणि त्याच्या इच्छेची पूर्तता करावी आणि त्याच्या आज्ञांचे निष्ठेने पालन करावे.

## मस्जिद - नव्या अनुयायींचे केंद्रस्थान

मदीनेतील आगमनानंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जे पहिले कार्य हाती घेतले, ते मस्जिदच्या बांधकामाचे होते. त्याच्यासाठी योग्य अशा एका जागेची निवड केली. दोन अनाथ मुलांच्या मालकीची ती जागा होती. दहा सोन्याच्या नाण्यांची किंमत देऊन ती जागा खरेदी करण्यात आली आणि मस्जिदसाठी ती दान करण्यात आली. त्या जागेत असलेली झुडपे, खजुरीची झाडे, गवत केरकचरा साफ करण्यात आला आणि मस्जिदच्या बांधकामाला आरंभ झाला. बांधकामात पैगंबर स्वत:च सहभागी झाल्याने मुस्लिमांचा उत्साह वाढला. मुहाजरीन आणि अन्सार हे दोन्ही लोक मस्जिदचे बांधकाम लवकरात लवकर पुरे करण्यासाठी जिवापाड श्रम करीत होते.

मुस्लिमांपैकी एकजण गुणगुणला - ''पैगंबर मुहम्मद (स.) जातीने खपत असताना आपण जर स्वस्थ बसलो तर आपले ते कृत्य अत्यंत वाईट ठरेल.''

मस्जिदचे बांधकाम चालू असताना श्रमपरिहारासाठी मुस्लिम माणसे खालील गाणे म्हणत होती,

*''परलोकीय जीवनाखेरीज दुसरे जीवन नाही.*
*हे अल्लाह! अन्सार लोकांवर व मुहाजरीन लोकांवर दया कर.''*

परंतु पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्या गाण्याचा शब्दक्रम खालीलप्रमाणे बदलला-

*''हे अल्लाह! मुहाजरीन लोकांवर आणि अन्सार लोकांवर तुझी दया होऊ दे.''*

मस्जिदची इमारत आकाराने चौरस असून तिची प्रत्येक बाजू सुमारे पन्नास यार्ड लांबीची होती. तिचा पुढचा भाग व प्रवेशद्वार उत्तरेकडे होते आणि तिचा बाकीच्या तिन्ही भिंतींना प्रवेशासाठी एकेक फाटक ठेवले होते. दक्षिणेकडचे दार येण्या-जाण्यासाठी होते, पश्चिमेच्या दाराला बाबे रहेमान हे नाव दिले होते. पूर्वेकडचे प्रवेशद्वाराकडे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कुटुंबियांसाठी निवासाच्या खोल्या असून त्याला बाबे निसा हे नाव होते.

मस्जिदच्या उत्तरेची जागा मुहम्मद (स.) यांच्या अशा सोबत्यांसाठी राखीव ठेवली होती, ज्यांना घरदार व बायकापोरे नव्हती. त्यांना 'असहाबे सुफ्फा' या नावाने ओळखत असत. ती इमारत म्हणजे मस्जिदला संलग्न असणारी एक प्रकारची पाठशालाच होती. धर्माच्या अभ्यासाखातर वाहून घेणाऱ्या व पूर्ण वेळ देणाऱ्यासाठी तेथे सोय होती. मस्जिदला लागूनच पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कुटुंबासाठी दोन खोल्या बांधण्यात आल्या होत्या. मस्जिदची इमारत अगदी साधी होती. भिंती मातीच्या विटांच्या होत्या आणि छताला खुजुरीच्या झाडांच्या खोडांचा आधार दिलेला होता. छत काटक्या टाकून खजूरीच्या पानांनी झाकलेले असल्याने जागोजागी गळत असे आणि कधी कधी त्यामुळे आतल्या कच्च्या जमिनीमध्ये चिखल होत असे. हिच मस्जिद अनेक वैभवशाली दृश्ये दाखविणारे स्थान होती. येथेच पैगंबर मुहम्मद (स.) यांनी येऊन मुस्लिमांना शिकवण व संस्कार दिले. याच ठिकाणी विविध टोळ्यांचे प्रतिनिधीं पैगंबर मुहम्मद (स.) यांना येऊन भेटत असत. येथूनच सम्राटांना व बादशाहांना आज्ञापत्रे दिली जात असत. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या निवासाच्या खोल्या तर मस्जिदपेक्षाही अत्यंत साध्या होत्या. काही खोल्या कच्च्या विटांच्या होत्या, तर काही खजुरीच्या डहाळ्यांनी तयार केलेली खोपटी होती. फाटलेल्या घोंगड्या भिंतींना बांधून आडोसा तयार करण्यात आला होता.

हसन बिन अली म्हणतात, ''माननीय उस्मान खलीफा असण्याच्या काळात जेव्हा त्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पत्नींच्या निवासस्थानांना भेट दिली, तेव्हा त्या घराचे छप्पर आम्हाला इतके ठेंगणे दिसले की आम्ही हाताने त्याला सहज स्पर्श करू शकलो.''

तसेच दुसरा एक निरीक्षक दाऊद बिन कैस पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या घराचे वर्णन करताना म्हणतो, ''पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पत्नी ज्या घरात राहत असत, ते अवलोकन करण्याचे भाग्य मला मिळाले. खजुरीच्या फांद्या वापरून बांधलेल्या त्या खोल्या होत्या आणि उंटाच्या केसांच्या बनविलेल्या घोंगड्या दारात लटकविलेल्या होत्या. अंगण सहा ते सात पावलांचे होते तर खोल्यांची लांबी-रूंदी दहा पावलांपेक्षा अधिक नव्हती.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पत्नींच्या निधनानंतर या सर्व खोल्या मस्जिदला



जोडण्यात आल्या आणि ती जागा मस्जिदच्या विस्तारासाठी वापरण्यात आली. त्या खोल्या जर तशाच जतन करून ठेवल्या असत्या, तर ज्या पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हातात सर्व भौतिक खजिन्याच्या किल्ल्या होत्या, त्यांची स्वत:ची राहणी किती साधीसुधी व सोज्वळ होती; हे जगाला दिसून आले असते. त्या भौतिक संपत्तीबद्दल आसक्तीचा कल, पैगंबर मुहम्मद (स.) यांनी कधीही दाखविला नाही.

## अजान

मुस्लिमांचा मक्केत जो छळ झाला, त्याची नोंद आम्ही वर केलेली आहे. ते जाहीररीतीने व उघडपणे प्रार्थनासुद्धा करू शकत नव्हते. तोपर्यंत त्या प्रार्थना त्यांना लपून छपून गुप्तपणे कराव्या लागत असत. घरामध्ये प्रार्थना चालू आहे, हे बाहेर कोणालाही कळू नये, याची कटाक्षाने काळजी घेतली जात असे. मदीना शहरात शांततेच्या काळात लोकांना धार्मिक स्वातंत्र्य पूर्णपणे उपभोगायला मिळत होते, तेथे प्रश्न उद्‌भवला की लोकांना मस्जिदमध्ये कसे बोलवावे? यहुदी त्यांच्या लोकांना त्यांच्या मंदिरात शिंग फुंकून बोलवित असत, ख्रिश्चन लोक चर्चमध्ये असलेली मोठी घंटा वाजवून त्यांच्या लोकांना बोलवित असत. मुहम्मद (स.) यांना त्या प्रथांचे आकर्षण नव्हते. प्रार्थनेच्या पवित्र हेतुसाठी त्या पद्धती अनुचित असल्याचे त्यांना वाटले. मानवी स्वरानेच ती प्रेरणा व भावना लोकांना कळवावी आणि तीच प्रसंगाच्या गांभिर्यासाठी निर्धारित करावी, असे त्यांना वाटले.

असे म्हटले जाते की या प्रश्नाची जेव्हा चर्चा चालू होती, तेव्हाच्या काळात एके दिवशी अब्दुल्लाह बिन जैद पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे येऊन म्हणाले, मी काल रात्री स्वप्नात अजान पाहिली ती अशी,

१) अल्लाहु अकबर - अल्लाहु अकबर!
अल्लाहु अकबर - अल्लाहु अकबर!!

अनुवाद : अल्लाह महानतम आहे, अल्लाह महानतम आहे,
अल्लाह महानतम आहे, अल्लाह महानतम आहे.

२) अश्हदु अल्ला इलाह इल्लल्लाह!
अश्हदु अल्ला इलाह इल्लल्लाह!

अनुवाद : मी साक्ष देतो की अल्लाहखेरीज कोणीही ईश्वर नाही.
मी साक्ष देतो की अल्लाहखेरीज कोणीही ईश्वर नाही.

३) अश्हदु अन्न मुहम्मदर रसूलुल्लाहा!

अश्हदु अन्न मुहम्मदर रसूलुल्लाह!!

अनुवाद : मी साक्ष देतो की मुहम्मद अल्लाहचे पैगंबर आहेत,
मी साक्ष देतो की मुहम्मद अल्लाहचे पैगंबर आहेत.

४) हय्या लस्सलाह!
हय्या लस्सलाह!

अनुवाद : नमाजकडे या,
नमाजकडे या,

५) हय्या लल्फलाह!
हय्या लल्फलाह!

अनुवाद : कल्याण व सफलतेकडे या,
कल्याण व सफलतेकडे या.

६) अल्लाहु अकबर - अल्लाहु अकबर!
लाइलाहा इल्लल्लाह!''

अनुवाद : अल्लाह महानतम आहे - अल्लाह महानतम आहे,
अल्लाहखेरीज कोणीही ईश्वर नाही.

पैगंबर मुहम्मद (स.) उद्‌गारले, ''अल्लाहच्या कृपेने तुमचे स्वप्न खरे आहे. जा आणि माननीय बिलाल (रजि.) यांना सांगा की प्रार्थनेसाठी लोकांना, त्यांनी या शब्दांत बोलवावे.''

माननीय उमर (रजि.) यांनी जेव्हा घरात हे शब्द ऐकले तेव्हा आपला झगा फरफटत तेथे आले आणि उद्‌गारले, ''त्याची शपथ ज्याने तुम्हाला सत्यानिशी पाठविले आहे! मी सुद्धा तंतोतंतपणे तेच स्वप्न काल रात्री पाहिले, जे अब्दुल्लाह बिन जैदला दिसले.''

त्यावर पैगंबर म्हणाले, ''त्यासाठी अल्लाहची स्तुती असो. सकाळच्या प्रार्थनेसाठी स्मराणिकेची खालील ओळ पुरवणी म्हणून जोडावी,

*अस्सलातु खैरूमम्मिननौम! अस्सलातु खैरूमम्मिननौम*

निद्रेपेक्षा नमाज अधिक श्रेयस्कर आहे. निद्रेपेक्षा नमाज अधिक श्रेयस्कर आहे.''

दररोज ठराविक वेळी पाच वेळा ही परिचित हाक लोकांना धर्मनिष्ठेकडे साद देत असते. गेली चौदा शतके हीच साद मस्जिदींच्या मनोऱ्यांवरून अविरतपणे दिली जात आहे.



ती हाक केवळ प्रार्थनेसाठी हजर राहण्याची आज्ञा आहे, इतकेच नसून इस्लामच्या एकूण शिकवणींचा तो अर्क आहे. अल्लाहखेरीज अन्य कोणीही ईश्वर नाही, जो एकमेव निर्माणकर्ता, स्वामी व विधाता आहे. पैगंबर मुहम्मद (स.) त्याचे पैगंबर आहेत. त्यांच्या माध्यमानेच आम्ही ईशइच्छा जाणू शकतो व तिचे अनुसरण करू शकतो. प्रार्थना ही धार्मिक जीवनाचा मूळ पाया आहे आणि प्रार्थनेतूनच माणसाला मुक्ती व उद्धाराचा मार्ग सापडू शकतो.

## बंधुभाव

प्रार्थनेची अशी शिस्त लावून झाल्यानंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपले लक्ष मदीनेतील मुस्लिमांमध्ये, ज्यांना अन्सार (मदीनेचे रहिवाशी) व मुहाजरीन (मक्केहून स्थलांतर करून आलेले) असे म्हटले जाई, अत्यंत व प्रेमाचे संबंध मजबूत करून बंधुभाव वृद्धिंगत करण्यात दिले. असे पाऊल उचलणे अत्यंत निकडीचे होते, कारण ते स्थलांतरित आश्रयार्थी लोक आपली आवडती घरेदारे सोडून आणि आपल्या जिवाभावाच्या आप्तेष्टांचा व इष्टमित्रांचा विरह सहन करून त्यांना सोडून आलेले असल्याने, त्यांना जीवनात एकाकीपणा व खिन्नता वाटणे स्वाभाविक होते. आपल्या घरांच्या व नातलगांच्या आणि इष्टमित्रांच्या विरहाचे दु:ख भोगणाऱ्या मनोल्हास वाढविण्यासाठी, त्यांची एकाकीपणाची भावना घालवण्यासाठी आणि बदलत्यांचा वातावरणात व परिस्थितीत त्यांना रममाण करण्यासाठी, मक्केहून आलेल्या आणि मदीनेतील लोकांच्या बंधुप्रेमावर आधरित एका नव्या समाजाची बांधणी करण्यात आली.

हा बंधुभाव जगाच्या इतिहासात खचितच अद्वितीय होता. सहानुभूती, प्रेम व कळवळा यावर आधारलेल्या नव्या बांधिलकीची अभिव्यक्ती अत्यंत सुरेखपणे झाली. उदाहरण द्यायचे झाल्यास, माननीय साद बिन सबी अन्सारी (रजि.) त्यांचे साथीदार अब्दुल रहेमान बिन औफ (रजि.) यांना म्हणाले, ''मी अन्सार लोकांमध्ये सर्वांत अधिक धनवान आहे. मी माझ्या एकूण धनसंपत्तीपैकी निम्मी तुम्हाला देऊन टाकू इच्छितो. मला दोन पत्नी आहेत. एकीला मी तलाक देतो आणि तिचा इद्दतचा काळ संपल्यानंतर तुम्ही तिच्याशी निकाह करा.''

परंतु माननीय अब्दुल रहेमान बिन औफ (रजि.) कशाचाही स्वीकार करण्यास राजी नव्हते. धनसंपत्तीचाही नाही आणि घरकुलाचाही नाही. म्हणून त्यांनी त्या बंधुचे आभार मानले आणि म्हणाले, ''कृपया मला बाजाराचा मार्ग दाखवा. तेथे जाऊन मी स्वत: काही कमाई करतो.''

ते अन्सारी मदतगार लोक त्यांच्या धर्मबांधवांशी अत्यंत औदार्याने वागत असत.

ते सर्वजण मिळून एकदा पैगंबर मुहम्मद (स.) यांना जाऊन भेटले व म्हणाले, ''आमच्या सर्व फळबागा मदीनेतील मुस्लिमांना आणि मक्केहून आलेल्या बांधवात समसमानपणे वाटून टाका.'' परंतु हा मोठा भार त्यांच्यावर टाकण्यास पैगंबर मुहम्मद (स.) यांनी नकार दिला. तरी असे ठरले की, फळबागांमध्ये अन्सार लोकांसह स्थलांतरित आश्रयार्थी माणसे कामे करतील आणि जे उत्पन्न निघेल ते दोहोंमध्ये समसमान वाटून घ्यावे.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्या अनुयायांच्या अंत:करणांना प्रेरणा देऊन रूजविलेल्या त्यागभावनेचे हे काही एखादे दुसरे उदाहरण नाही. ती त्यांच्या जीवनांची विशेष छटा व खुबी झाली होती, जी त्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या प्रभावाखाली जोपासली होती व वृद्धिंगत केली होती. हे प्रेमाचे व बांधिलकीचे संबंध इतके सुदृढ व घनिष्ट होते, की रक्ताच्या नात्यांवरही त्याने कडी केली होती. ज्या दोन धर्मबंधुची जोड करण्यात आली होती, त्यांच्यापैकी एकाचे निधन झाले, तर त्याची मालमत्ता वारसाहक्काने त्याच्या धर्मबंधुला मिळे. ही प्रथा कुरआनची खालील आयतीचे अवतरण होईपर्यंत चालू होती. त्या आयतीच्या अवतरणानंतर वारसा कायद्याचा नियमित अंमल झाला.

''आणि ज्या लोकांनी नंतर श्रद्धा ठेवली आणि स्थलांतर करून आले व तुमच्याशी मिळून संघर्ष करू लागले, त्यांचासुद्धा तुमच्यात समावेश आहे. पण अल्लाहच्या ग्रंथात रक्ताचे नातेवाईक आपापसांत एक दुसऱ्याचे अधिक हक्कदार आहेत. नि:संशय अल्लाह प्रत्येक गोष्टीला जाणतो.'' (दिव्य कुरआन, ८ : ७५)

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी निर्माण केलेल्या या प्रेमाच्या बंधुभावाच्या आणि सहानुभूतीच्या वातावरणाला अत्यंत निकोप फळे लागली. पिढ्यानपिढ्या विविध टोळ्यांमध्ये सतत चालू असणारे हाडवैर संपुष्टात आले. विशेषत: औस व खजरज टोळीतील ज्या माणसांनी इस्लामची दीक्षा घेतली, ते त्यांच्यातील कट्टर हाडवैर विसरले. इस्लामची दीक्षा घेतांना अशी निकडीची गरज होती की मुस्लिमांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांची आध्यात्मिक सत्ता कबूल करावी; इतकेच नव्हते, तर त्यांची लौकिक सत्ता व अधिकारही मान्य करावा लागे आणि नातीगोती व वांशिक श्रेष्ठता दुय्यम मानून, परस्परांना बंधु समजणे आवश्यक होते. हा बंधुभाव एक महान वरदान असल्याचा पवित्र कुरआनमध्ये खालीलप्रमाणे उल्लेख आहे,

'' सर्वजण मिळून अल्लाहच्या दोरीस घट्ट धरून असा आणि आपसांत फाटाफूट होऊ देऊ नका. अलाहच्या त्या उपकाराची आठवण ठेवा, जो त्याने तुम्हावर केला आहे. तुम्ही एक दुसऱ्याचे शत्रू होता, त्याने तुमची मने जोडली आणि त्याच्या मेहेरबानी व



कृपेने तुम्ही बंधू-जन झालात. तुम्ही अग्नीने भरलेल्या एका खड्ड्याच्या तोंडावर उभे होता, अल्लाहने तुम्हाला त्यापासून वाचविले.'' (दिव्य कुरआन, ३ : १०३)

इतिहासाची पाने या गोष्टीला साक्ष आहेत की, ती सुधारणा अत्यंत आश्चर्यकारक व प्रेक्षणीय होती. पैगंबराच्या आगमनापूर्वी अरब लोक तडजोडवादी मुळीच नव्हते. घराण्यांच्या व टोळ्यांच्या परस्परांमधील वैरामुळे तो देश अत्यंत फाटाफुटीचा व दुभंगलेला होता. क्षुल्लक कारणांसाठी ते आपली तलवार म्यानाबाहेर काढून रक्त सांडण्यास तयार असत. इस्लामची शिकवण व पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अविरत प्रयत्नांमुळे अरबस्तानच्या प्रदेशात बंधुभाव वृद्धिंगत होऊन चहूकडे ती भावना पसरू लागली. टोळ्यांमधील शत्रूत्वाने कलंकित बनलेला भूतकाळ पुसून टाकला गेला आणि एक अशा समाजाची जडणघडण करण्यात आली, ज्याची मानवाबद्दल बंधुत्वाची भावना खोलवर रूजली होती, ज्याला हक्क व कर्तव्याची आणि प्रेमळपणाच्या महत्तेची जाण होती, आणि ज्याच्या जीवनांचा दृष्टिकोन लीनता व उदात्तता यांनी ओसंडत होता. वास्तविकपणे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या प्रचंड यशाचेच हे गमक होते, की त्यांनी अशा समाजाची जडणघडण केली, ज्याच्यात प्राचीन धर्माच्या पूजा पद्धतीच्या कसल्याही खाणाखुणा नव्हत्या, पुरोहितांना स्थान नव्हते, तर माणसांना न दिसणाऱ्या अशा अदृश्य अल्लाहशी आध्यात्मिक संबंधावर तो आधारलेला होता. एखाद्या विशिष्ट समाजगटाला प्रतिष्ठा मिळण्यासाठी त्याची आखणी केलेली नव्हती, तर जगातील भिन्न वंशीय लोकांमध्ये आणि सर्व थरातील माणसांमध्ये, जे कोणी या अल्लाहचा स्वीकार करून त्याच्या पैगंबरांशी निष्ठेने राहण्याची प्रतिज्ञा करतील, अशा सर्वांसाठी होता. विश्वबंधुत्व निर्माण करण्यासाठी त्याची आखणी झाली होती.

## नवा तह व करार

दुसऱ्या एका महत्त्वाच्या व जिकरीच्या कामाने पैगंबर मुहम्मद (स.) यांचे लक्ष वेधून घेतले, ते अरबस्तानामधील मुस्लिम टोळ्यांमध्ये आणि मुस्लिमेतर टोळ्यांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचे होते. विशेषत: बनू नजीर, कुरैजा आणि कैनुका या टोळ्यांसंबंधी होते. मुस्लिम व मुस्लिमेतर लोकांमधील तो अगदी पहिलाच राजकीय करार असल्याने, आम्ही त्या करारातील थोडक्याच तरतुदींचा अगदी संक्षेपाने उल्लेख करतो; यावरून एका इस्लामी राज्यामध्ये मुस्लिमेतरांना काय अधिकार असतात याची स्पष्ट कल्पना येते.

## मदीना करार

''अल्लाहाच्या नावाने, जो अत्यंत दयाशील व कृपावंत आहे.''

अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी केलेला हा दस्तऐवज असून, स्थलांतरित लोक व मदतनीस (अन्सार) संबंधी तो असून त्यात यहुदी लोकांबरोबर मैत्रीचा करार करण्यात आला आहे, त्यांचा धर्म व त्यांची मालमत्ता प्रस्थापित करण्याची त्यांना मोकळीक देण्यात आली असून त्याच्या बदल्यात खालील कर्तव्ये त्यांना नेमून दिली गेली आहेत-

(१) त्यांचा एक स्वतंत्र गट असेल आणि इतर लोकांचा त्यांच्यात अंतर्भाव असणार नाही. स्थलांतरित कुरैशी लोकांचा एक गट असेल आणि ते परस्परांना सहाय्य करतील आणि त्यांच्या नातलग माणसांची कैदेतून सन्माननीय सुटका करून घेण्यासाठी ते खंडणी देतील. हाच शब्दप्रयोग पुन:पुन्हा (बनू सईदा, बनू अल हारिस, बनू जुशाम, बनू अल नज्जारा, बनू अम्र बिन औफ, बनू अल नवित आणि बनू औस वगैर घराण्यांच्या संदर्भात) वापरला गेला आहे. श्रद्धावान लोक, कोणालाही त्याची खंडणी न भरता किंवा रक्ताची किंमत न भरता, कोणालाही निराश्रित किंवा कंगाल अवस्थेत सोडून देणार नाहीत.

(२) जो कोणी बंडखोर असेल किंवा वैरभाव अगर राजद्रोह फैलावण्याचा प्रयत्न करील तर ईशभय बाळगणाऱ्या प्रत्येक मुस्लिमांचा हात त्याच्यावर पडेल, मग तो त्याचा स्वत:चा पुत्र का असेना.

(३) एक इमानधारक माणूस दुसऱ्या इमानधारक माणसाचा प्राण घेणार नाही, तसेच एखाद्या अइमानधारक माणसाला इमानधारकाविरूद्ध मदत करणार नाही. अल्लाहचे संरक्षण एक आहे (आणि समानतेने आहे) आणि ते गरीबातील गरीब श्रद्धावानालाही लागू आहे.

(४) इमानधारक माणसे एकमेकांचे मदतनीस आहेत. यहुद्यांपैकी जे आमच्या मागे येतील त्यांना सहाय्य व कुमक असेल. त्यांना जायबंदी केले जाणार नाही व त्यांच्याविरूद्ध त्यांच्या शत्रूंना मदत केली जाणार नाही.

(५) इमानधारकांची शांती विभाजनीय नाही. इमानधारक लोक जेव्हा अल्लाहच्या नावाने लढत असतील तेव्हा वेगळा व स्वतंत्र शांततेचा तहनामा केला जाणार नाही. अटी सर्वांना न्याय्य, रास्त व समान असाव्यात.

(६) या दस्तऐवजापुढे जे लिहिलेले आहे, हे जो मुस्लिम स्वत:ला बंधनकारक समजतो, जो अल्लाहवर आणि अंतिम निवाड्याच्या दिवसावर अढळ श्रद्धा



बाळगतो, त्याच्यासाठी हे कदापिही उचित नाही, त्याने कोणाही गुन्हेगाराला मदत करावी किंवा त्यांना आश्रय द्यावा. यहुदी लोक त्यांचा धर्म अनुसरतील आणि मुस्लिम लोक त्यांचा धर्माचे पालन करतील. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या संमतीविना कोणीही एकमेकांविरूद्ध युद्धाची सुरवात करणार नाहीत. पण यामुळे कायदेशीर बदला घेण्याची कोणालाही आडकाठी नाही. यहुद्यांचा खर्च यहुदी पाहतील आणि मुस्लिमांच्या खर्चाची जबाबदारी मुस्लिमांवर असेल. पण दोहोंपैकी कोणा एकावर जर हल्ला झाला, तर दुसरा त्याच्या मदतीला धावून जाईल. जे या तहनाम्यात सामील आहेत, त्या सर्वांसाठी मदीना हे पवित्र शहर असेल व तेथे कसलाही हिंसाचार व रक्तपात केला जाणार नाही.

त्या सुविख्यात तहनाम्यातील व शांतता करारातील काही कलमे वरीलप्रमाणे आहेत. तो त्रिपक्षिय करार असल्यासारखे दिसतो. त्यात मुहाजरीन म्हणजे मक्केहून स्थलांतर करून आलेले आश्रयार्थी, अन्सार म्हणजे मदीनेतील स्थायिक मुस्लिम लोक व यहुदी लोक, सहभागी झाले होते. त्यातील तरतुदींचा बारकाईने अभ्यास केला, तर असे दिसून येते की नुसत्या युतीच्या करारापेक्षा ते बरेच काही अधिक आहे. त्यांच्या पहिल्या भागात आपणाला भिन्न टोळ्यांमध्ये समेट व मेळमिलाफाच्या यत्नापेक्षा थोडे अधिक दिसते. खरे तर सर्व अरब टोळ्यांमधील परस्परामधील हाडवैराची भावना वितळवून, मदीनेमध्ये एकराष्ट्रीयत्वाच्या मुशीत ओतून, असे एक नवीन राष्ट्र बनविण्याचा यत्न आहे, जे इतर सर्व लोकांपेक्षा ठळकपणे भेददर्शक व विशिष्ट असेल. दुसऱ्या शब्दांत सांगायचे, तर ती इस्लामी राज्याच्या घटनेची गर्भावस्थाच होती, तर भिन्न टोळ्यांच्या युतीची सैलसर अशी बांधणी नव्हती. एक भव्य दिव्य धर्मतत्त्वाखाली आणून आणि नवीन धर्मावर व नवीन राज्यांवर लक्ष केंद्रीभूत करायला लावून संकुचित टोळीनिष्ठा, संपुष्टात आणण्याचा प्रयत्न होता.

दुसरी गोष्ट अशी की मदीनेतील सर्व व्यवहारावर पैगंबर मुहम्मद (स.) यांचे नियंत्रण किती होते, या बाबतीतही हा करार मोठा प्रकाश पाडतो. या घटनेत असे लिहिले होते की कोठेही कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाला की तो अल्लाहकडे आणि त्याच्या पैगंबराकडे आणायचा. असे संभवनीय वाटते की मुहम्मद (स.) आणि मदीनावासी लोकांमध्ये मूळ करारामध्ये याबद्दल विचारविनिमय झाला होता की विविध प्रतिस्पर्धी टोळ्यांच्या कलहामध्ये ते लवादाचे कार्य करू शकतील आणि त्या पाणथळ प्रदेशात ते शांतता राखण्यास मदत करू शकतील. करारनाम्याचा जो उत्तरार्ध आहे, तो सर्व अरबी टोळ्यांचा समावेश असणार एक पक्ष आणि सर्व यहुदी लोकांचा दुसरा पक्ष, यांची युती करण्यात आली. यावरून मुस्लिम लोक व मुस्लिमेतर लोक यांच्यामध्ये प्रेमभावाचे व

सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्याची तत्त्वे स्थूलमानाने दर्शविली गेली आहेत.

हा करारनामा घडवून आणण्याचे सगळे श्रेय, पैगंबर मुहम्मद (स.) यांनी शांततेची प्रस्थापना करण्यासाठी घेतलेल्या कष्टांना व त्यांच्या प्रयत्नांनाच जाते आणि मानवी इतिहासात ती एक अत्यंत महत्त्वाची बाब ठरते. चौदाशे वर्षांपूर्वीच्या काळात, त्या करारनाम्याने माणसांना विचार स्वातंत्र्य आणि उपासना व धर्म स्वातंत्र्याची हमी दिली होती. लोकांच्या जीविताचे व त्यांच्या मालमत्तेचे रक्षण हे सर्वमान्य तत्त्व होते आणि त्यांच्या संबंधातील सर्व प्रकारच्या गुन्ह्यांना कायद्याने बंदी होती. वास्तवत: हा नवा सन्मान व गौरव पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्या काळच्या राजनीतीत व समाजकारणात प्रामुख्याने मिळविला होता. कारण जुलमी व अत्याचारी शक्तींच्या टाचेखाली दु:खाने विव्हळणाऱ्या त्याकाळी प्रचलित असलेल्या बेबंदशाहीने, अराजकतेने आणि अनियंत्रित पिसाटांनी चालविला होता.

## पैगंबर मुहम्मद (स.) यांचे कुटुंब

समाजातील बेबनाव व भांडणे असणाऱ्या सर्व भेसूर घटनांचा उचित मेळ बसविल्यानंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपले लक्ष, आपल्या कौटुंबिक बाबींकडे दिले. त्यांची पत्नी माननीय सौदा (रजि.) आणि त्यांच्या कन्या माननीय फातिमा (रजि.), माननीय उम्मे कुलसुम (रजि.) त्यांच्यासह त्या वेळी राहत होत्या.

त्यांची नववधू आएशा (रजि.) नुकत्याच वयात आल्या होत्या आणि अद्याप त्यांच्या पित्याच्या घरीच राहात होत्या. लहान वयातच त्या परिपक्व बुद्धीच्या होत्या. अशा अनन्यसाधारण व्यक्तीसाठी आवश्यक असणारी, मानसिक व शारीरिक गुणवैशिष्ट्यांची, त्यांच्यामध्ये मोठ्या झपाट्याने वाढ झाली होती. माननीय अबू बकर (रजि.) व त्यांच्या पत्नीच्या सूचनेवरून मुहम्मद (स.) यांनी विवाहाची परिपूर्ती करण्याचे ठरविले.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनातील इतर विधीप्रमाणेच, हा विधीही अत्यंत साधेपणाने उरकण्यात आला. माननीय आएशा (रजि.) यांना स्नान करवून स्वच्छ कपडे घातले गेले. त्यांची आई उम्मे रूमाननी त्यांना एका खोलीत नेले, जेथे अन्सारच्या काही महिला वधूच्या आगमनाची उत्कंठतेने वाट पाहात बसल्या होत्या. माननीय आएशा (रजि.) यांनी खोलीत पाऊल टाकताच त्यांनी प्रार्थना केली, ''तुझ्यावर अल्लाहची कृपा असो! तुझे भाग्य हेवा करण्यासारखे आहे.''

तो विवाह इस्लामी इतिहासात अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे मुहम्मद (स.) आणि त्यांचे निष्ठावान मित्र, जे विपत्तीच्या काळात त्यांच्या खांद्याला खांदा लावून भक्कमपणे उभे ठाकले आणि ज्यांनी इस्लामखातर आपले सर्वस्व बलिदान करून



टाकले होते; या विवाहने ते संबंध अधिक मजबूत बनले. दुसरी गोष्ट या विवाहाची अशी की, शारीरिक व मानसिकदृष्ट्या अद्वितीय गुणवत्ता असलेल्या एका महिलेला, शीघ्रसंस्कारग्रहणक्षम वयात पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जनानखान्यात प्रवेश करण्याची अनुमती मिळाली आणि मुहम्मद (स.) यांच्या जीवनातील अंतर्गत कानाकोपऱ्यापर्यंत शिरकाव करण्याची संधी लाभली. त्यांच्या पवित्र सहवासात राहिल्याने त्यांच्यातील अव्यक्त शक्तींचा विकास आणि अभिरूची अधिक शुद्ध करू शकल्या. या महान स्त्रीच्या जीवनाकडे नुसता एक दृष्टीक्षेप टाकला, तर असे वास्तव दर्शन होते की, पैगंबरांशी झालेला त्यांच्या विवाहाने त्यांचे स्वत:चे अपरिमित कल्याण झाले, अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या आदरणीय व्यक्तिमत्वाने त्यांचे संवर्धन केले आणि त्यांचा विकास यथोचित मार्गाने केला. हे तरूण वय विवाहासाठी समयोजित होते. मनोवैज्ञानिकांनी केलेल्या संशोधन कार्यात हे दाखवून दिलेले आहे की एक प्रौढ माणसाचे भावनामय जीवन आणि ज्याला स्वभाववैचित्र्य म्हटले जाते असे कल, अभिरूची व प्रवृत्तीच्या खाणाखुणाचा, माग, अशा आकार घेण्याच्या वयात, बाल्यावस्थेच्या अखेरीस पौगंडावस्थेच्या सुरूवातीमधील अनुभवात आढळतो.

लैंगिक-मानसशास्त्राच्या दृष्टिकोनातूनही तो विवाह एक सुखी मीलनच होते, ही बाब हदीसच्या नोंदीवरून सिद्ध होते. टी एच व्हॉन डी वेल्ट. हार्लेम येथील स्त्रीरोगविज्ञान शास्त्रज्ञ म्हणतो, ''जेव्हा पतिपत्नीच्या वयातील अंतर जास्त असते म्हणजे १५-२० वर्षांपेक्षा अधिक असते, तेव्हा त्याचा परिणाम श्रेयस्कर असतो. वाढत्या वयाच्या प्रौढ माणसाशी-वार्धक्याने जीर्णशीर्ण झालेल्या नव्हे- एक युवतीचा विवाह झाल्यास तो सफल व सुसंगत ठरतो. नेमस्त समागमाशी नववधूचा थेट परिचय घडून येतो.''

या विवाहावर टीका करणारे पाश्चिमात्य टीकाकार, ही गोष्ट संपूर्णपणे विसरतात की या विवाहात केवळ लैंगिक विचारच केला गेला नव्हता. त्याच्या पाठीमागे अन्य कितीतरी कारणे होती. पहिले असे की माननीय अबू बकर (रजि.) यांचा सन्मानाचा व त्यांच्या दर्जाचा-प्रतिष्ठेचा प्रश्न होता आणि त्यांनी केलेल्या वैभवशाली सेवेची ती अभिव्यक्ती होती. तसेच तरल बुद्धीमत्ता व खोल ज्ञानपीपासा असलेल्या युवतीला शिक्षण-संस्कार देण्याचा प्रश्न होता. अन्य युवतींना, जीवनाच्या विविध क्षेत्रात प्रशिक्षण देऊ देण्याचा प्रश्न होता.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सर्व पत्नी, माननीय आएशा (रजि.) यांचा अपवाद वगळता, वयस्कर होत्या. म्हणून तरूण पिढीच्या भावनात त्या सहभागी होऊ शकल्या नाहीत किंवा त्यांचा दृष्टिकोनही नीटपणे जाणू शकल्या नाहीत. वयांमधील अंतर हे सतत त्यांच्यामधील व नवयुवतीमधील अडसर ठरले आहे. नवयुवती व त्यांच्या समस्यांबद्दल

चर्चा करू शकत होत्या, अशी एकमेव महिला म्हणजे माननीय आएशा (रजि.) होत्या. म्हणून तारूण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या माननीय आएशा (रजि.) यांचा विवाह पैगंबरांशी होणे अत्यंत गरजेचे होते त्यांच्या माध्यमातून इस्लाममध्ये नव्याने प्रवेश केलेल्या युवतींना सफलतेने शिकवण व मार्गदर्शन देणे शक्य झाले. हे कर्तव्य, माननीय आएशा (रजि.) यांनी मोठ्या कुशलतेने पार पाडले. अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी केलेली त्यांची निवड सार्थ ठरविली.

आणखी असे की लोकांच्या मनांत खोलवर रूजलेल्या एका चुकीच्या कल्पनेच्या मुळावरच या विवाहाने घाव घातला. ती प्रथा अशी की मानलेल्या बंधुच्या मुलीशी विवाह करणे, हे धर्मनीतीविरूद्ध आहे. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी स्वत:चे उदाहरण देऊन लोकांना दाखवून दिले की मानलेल्या भावात आणि रक्ताच्या नात्याच्या भावात खूप फरक आहे. इस्लामने जो विवाह निषिद्ध करून मनाई केली आहे, तो श्रद्धेच्या बंधनाने भाऊ बनलेल्या माणसांच्या मुलीशी नव्हे, तर रक्ताच्या नात्याने पुतणी असलेल्या मुलीशी विवाहाची मनाई केली गेली आहे.

आपल्या अनुयायींना शिकवण व प्रशिक्षण देण्याची पैगंबर मुहम्मद (स.) यांना मुख्य चिंता होती. मक्केतील लोकांच्या सूडभावनेतून आणि त्यांच्या संभाव्य हल्ल्यापासून पूर्णपणे मुक्त नसले,तरी तुलनात्मक दृष्टीने मोकळ्या वातावरणात इस्लामच्या सदाचाराची तत्त्वे, उपासनेचे विधी, लोकांपुढे विचारार्थ ठेवीत असत.

## रमजान महिन्याचे रोजे (उपवास)

हिजरी सन सुरू झाल्यानंतर अठरा महिन्यांनी रमजान महिन्यातील 'रोजे' अनिवार्य ठरले गेले. 'सौम' या शब्दाचा अर्थ मितोपभोग - संयमन असा असून तो अल्लाहच्या उपासनेचा एक महत्त्वाचा विधी आहे, मुस्लिमांचे आध्यात्मिक शुद्धिकरणासाठी ती एक परिणामकारक बाब असल्याचे इस्लाममध्ये मानले गेले आहे. त्या आज्ञेनुसार पूर्वेकडील क्षितिजावर प्रकाशाची पहिली लकेर दिसण्याच्या क्षणापासून ते सूर्यास्त होईपर्यंत काही खाणे, पिणे (विडी सिगरेट ओढणे सुद्धा) आणि समागमसुख घेणे; याची सक्त मनाई आहे, हे संपूर्ण महिनाभर दरवर्षी चालते.

पूर्वाश्रमीचे लिओपोल्ड– मुहम्मद असद म्हणतात, ''उपवासाच्या महिन्याचा हेतू दुहेरी आहे असे मला आढळले. एक उद्देश असा आहे की गरीब व भुकेलेल्या माणसाच्या वेदनांचा अनुभव खाणे-पिणे वर्ज्य करून घेण्याचा. अशा रीतीने सामाजिक जबाबदारी व बांधिलकीची जाणीव लोकांच्या मनावर बिंबवून, ते धार्मिक तत्त्व व सिद्धान्त असल्याचे मानले गेले आहे. रमजानमधील उपवासाचा दुसरा हेतू स्वत:ला



शिस्त लावणे व स्वयंनियमन करण्याचा आहे. व्यक्तिगत नैतिकतेची ही बाब सर्व इस्लामी शिकवणीमध्ये जोरदारपणे प्रतिपादन करण्यात आलेली आहे. (उदाहरणार्थ- सर्व मादक पदार्थावर संपूर्ण बंदी, कारण त्यांच्या नशेमुळे विवेक, जाण व जबाबदारी यांच्यापासून निसटून जाण्याची ती एक सोपी पळवाट आहे, असे इस्लाम मानतो.) या दोन गोष्टींमध्ये- मानवाबद्दल बंधुभाव आणि व्यक्तिगत संयमत्व व शिस्त मला इस्लामच्या नैतिक दृष्टिकोनाच्या रूपरेषा कळू लागल्या.

शिवाय उपवास करणे, हे अल्लाहबद्दल कृतज्ञतेची भावना जागृत करण्याचे एक साधन आहे. स्वामीच्या अगणित देणग्यांचे व कृपावर्षावाचे खरे मोल (किंमत) आपणाला तेव्हाच कळू शकते, जेव्हा अल्पकाळासाठी का होईना, त्यांचा उपभोग घेण्यापासून अलिप्त राहतो व निर्माणकर्त्याचे आपण आभार मानू शकतो. या मुद्याकडे पवित्र कुरआनमधील खालील 'आयत' नेमका उल्लेख करते.

''ही पद्धत ह्यासाठीच सांगितली जात आहे की तुम्ही उपवासांची संख्या पूर्ण करावी व ज्या सरळ मार्गावर अल्लाहने तुम्हाला आणले आहे आणि जे मार्गदर्शन अल्लाहने तुम्हाला प्रदान केले आहे त्यावर तुम्ही अल्लाहची थोरवी वर्णावी तसेच तुम्ही अल्लाहचे ऋण व्यक्त करावे.'' (दिव्य कुरआन, २ : १८५)

## जकात

याच काळात जकात देणे, हे सर्व मुस्लिम लोकांवर सक्तीचे व बंधनकारक असल्याचे अल्लाहकडून निर्धारित करण्यात आले. अनाथ-पोरक्यांना, विकलांग व अपंगांना आणि वार्धक्याने जीर्णशीर्ण झालेल्या माणसांना, दुसऱ्यांच्या औदार्यावर व दानधर्मावर जगण्यासाठी, इस्लाम त्यांना वाऱ्यावर सोडून देत नाही. धनवान लोकांवर जकात सक्तीची करून अल्लाहने समाजाच्या संपत्तीत गरिबांनाही हिस्सा दिला आहे. पवित्र कुरआन स्पष्टोक्ती आहे,

''विशेषत: सहाय्य करण्यास पात्र ते गरीब आहेत जे अल्लाहच्या कार्यात असे गुंतले आहेत की स्वत:च्या उपजीविकेसाठी पृथ्वीवर काही धावपळ करू शकत नाहीत.''
(दिव्य कुरआन, २ : २७३)

वरील आयत हे स्वच्छपणे दर्शविते, की जकातपोटी आपल्या संपत्तीचा जो भाग दरवर्षी मुस्लिम लोक देतात, ते त्यांच्यावरील अनिवार्य कर्तव्य पार पाडीत असतात, ज्यांना तो दिला जातो, त्यांच्यावर उपकार म्हणून नव्हे गरिबांना जे त्यांच्याकडून मिळते, ती त्यांच्यावर अनाठायी कृपा नाही जिला आपली मानखंडना अगर पाणउतारा मानून गरिबांनी आपली मान शरमेने खाली घालावी. धनवान लोकांकडून त्यांना जे काही धन

मिळते, तो त्यांचा हक्क असल्याने त्यांनी स्वत:ला छोटे वाटून घेण्याचे काही कारण नाही. जकात कोणकोणत्या उद्दिष्टांसाठी द्यायची, ही गोष्टही पवित्र कुरआनने ठरवून दिली आहे. ती पवित्र कुरआनच्या आज्ञेनुसार वाटली जावी. जे लोक स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहेत, उदाहरणार्थ- अनाथ पोरकी मुले, अगतिक विधवा, अपंग व विकलांग माणसे, वार्धक्याने थकलेली माणसे आपत्तीग्रस्त प्रवासी; तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे उपजीविकेच्या साधनाशी मुकलेले अथवा त्यांच्या हातात नसलेल्या संकटामुळे कमाई करण्याच्या संधीला वंचित झालेल्या लोकांना ती द्यायची असते. त्याचप्रमाणे गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी धडपड करणाऱ्या गुलामांना अथवा कर्जाच्या बोजाखाली खितपणाऱ्या माणसांच्या कर्जमुक्तीसाठी जकात द्यायची असते कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"हे दान तर खऱ्या अर्थी फकीर आणि गोरगरिबांसाठी आहे. आणि त्या लोकांसाठी जे दान वसुलीच्या कामावर नेमले आहेत आणि त्या लोकांकरिता ज्यांची दिलजमाई अपेक्षित आहे. तसेच हे, गुलामांच्या मुक्ततेसाठी व कर्जदारांना मदत करण्यासाठी व ईशमार्गात आणि वाटसरूंच्या सेवेसाठी उपयोगात आणण्याकरिता आहे. एक कर्तव्य आहे अल्लाहकडून आणि अल्लाह सर्वकाही जाणणारा द्रष्टा व बुद्धिमान आहे."

(दिव्य कुरआन, ९ : ६०)

म्हणजे जे लोक धन कमावतात व जे संपत्ती निर्माण करतात, त्यांनी आपल्या मिळकतीचा व बचतीचा ठराविक भाग अल्लाहचा वाटा म्हणून शासनाच्या ताब्यात द्यायचा आणि शासनाने, समाजातील वर वर्णन केलेल्या लोकांमध्ये त्याचे काटेकोरपणे वाटप करायचे असते; ही गोष्ट कुरआनने सक्तीची केली आहे. जकातची ठरवून दिलेली रक्कम वसूल करण्याची सक्तीवर इतका जोर देण्यात आला आहे की अनिवार्यपणे प्रार्थना करण्याच्या आदेशाबरोबरच जकात अदा करण्याचा आदेश जोडला गेला आहे. इतकी जकात देण्याची सक्ती होती की खलीफा माननीय अबू बकर (रजि.) यांच्या कारकीर्दीमध्ये काही मुस्लिम अरब-टोळ्यांनी शासकीय खजिन्यात जकात देण्यात नकार दिला, तेव्हा त्यांच्याविरूद्ध जिहाद पुकारून ते लोक शरण येऊन जकात देईपर्यंत तो चालू राहिला.

## 'किबला'चा बदल

याच काळात किबल्याच्या बदलाचाही अल्लाहने आदेश दिला होता. मक्केत असताना व मक्केतील मूर्तिपूजकांमध्ये राहाताना पैगंबर (स.) प्रार्थनेच्यावेळी जेरूसलेम येथील पवित्र मस्जिदच्या दिशेला आपले तोंड वळवीत असत. परंतु जेव्हा ते मदीनेला आले, तेथे यहुदी लोकांचा समुदाय बलवान व शक्तीशाली होता, तेव्हा किबल्यासाठी 'काबा'कडे तोंड वळविण्याची त्यांना अल्लाहची आज्ञा झाली. हा बदल दूरगामी



महत्त्वाचा होता आणि विविध वर्तुळात त्याच्या वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटल्या.त्यामुळे इस्लामवरील आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावरील मुस्लिमांची निष्ठा वृद्धिंगत झाली. त्यांची अंतर्गत निष्ठा मुहम्मद (स.) यांच्यावर असल्याचे प्रदर्शित केले आणि तेच ईशसंदेश घेणारे आहेत, हे मान्य करून हा बदल आनंदाने स्वीकारला. मक्केतील मूर्तिपूजक म्हणू लागले, "ज्या तऱ्हेने मुहम्मदनी आपले तोंड प्रार्थनेसाठी आमच्या किबल्याकडे वळविले, त्यावरून अशी आशा वाटते की एका शुभदिवशी ते आमच्या धर्मश्रद्धेकडेही परत येतील."

यहुदी लोक या बदलामुळे फार संतापले होते. उपरोधिक भाषेत ते म्हणाले, "प्रार्थनेच्या दिशेमध्ये असा बदल करून मुहम्मदनी अगोदरच्या सर्व पैगंबरांच्या विरोधी कृत्य केले आहे. ते जर खरेखुरे पैगंबर असते, तर त्यांनी जशा प्रकारचे कृत्य कधीही केले नसते."

जे दांभिक (जे मुस्लिम असल्याचे खोटे सोंग करीत) होते त्यांनी इस्लामच्या वाढत्या प्रभावाला दडपण्यासाठी या संधीचा लाभ घेण्याचे ठरविले. आपल्या विधानात झोंबणारी व टोमण्यांची भाषा वापरीत ते म्हणू लागले, "प्रार्थनेसाठी कोणत्या दिशेला तोंड वळविण्याची पैगंबर मुहम्मद (स.) यांची इच्छा आहे, याबद्दल आम्हाला शाश्वती नाही. पहिली दिशाच जर बरोबर असेल, तर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी तिचा त्याग करून टाकला आहे, व जर ही आताची नवी दिशा बरोबर आहे, याचा अर्थ असा होतो की अगोदर त्यांनी चूक केलेली आहे."

विविध वर्तुळातून घेतले गेलेल्या विविध आक्षेपांना पवित्र कुरआनाने दिलेले उत्तर मोठे बोलके आहे. कुरआन सांगतो,

"पूर्वी जिकडे तुम्ही तोंड करीत होतात तिकडे किबला (उपासना दिशा) यासाठी ठरविली होती की आम्ही पाहू इच्छित होतो की कोण पैगंबराचे अनुकरण करतो आणि कोण उलट फिरतो. ही बाब अत्यंत कठीण होती. परंतु त्यांच्यासाठी मुळीच कठीण सिद्ध झाली नाही ज्यांना अल्लाहचे मार्गदर्शन लाभले." (दिव्य कुरआन, २ : १४३)

आर्नल्ड म्हणतो, "दिशेच्या या बदलामागे प्रथमदर्शनी वाटते, त्यापेक्षा खूप खोलवर महत्त्व सामावलेले आहे. इस्लामी राष्ट्रीय जीवनाची ती खऱ्या अर्थाने सुरवात होती, जगातील सर्व मुस्लिमांसाठी मक्केतील 'काबागृह' हे अतिमहत्त्वाचे धार्मिक केंद्र बनले, जसे पुरातन काळापासून अरबस्तानातील सर्व टोळ्यांचे ते यात्रेसाठी पवित्र क्षेत्र बनले होते."

## जिहाद, त्याचे स्वरूप व महत्त्व

मुस्लिमांनी अल्लाहच्या मार्गात आपली तलवार म्यानातून बाहेर काढण्यावरुन पुढे येणाऱ्या काही घटनांच्या संदर्भात प्रस्तावना म्हणून काही शब्द सांगणे आवश्यक वाटते. जिहादचे महत्त्व इस्लामी इतिहासात फार मोठे आहे, परंतु त्याच्याबद्दल कुशंकांचे व अपसमजांचे एक भलेमोठे वलय निर्माण करण्यात आले, ही दुर्भाग्याची गोष्ट आहे. जिहादचे खरे स्वरूप व त्याचे महत्त्व तेव्हाच नीटपणे कळू शकते, जेव्हा इस्लामच्या एकूण शिकवणीच्या आणि ज्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी तो संघर्ष करीत आहे, त्यांच्या पार्श्वभूमीतून त्यांच्याकडे पाहिले जाते. आणखी आपणाला युद्धाच्या भूमिकेचाही विचार करायला हवा. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे शक्ती व सत्ता हीच निकोप समाजरचनेचे एक साधन असते.

पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये जगाकडे केवळ भौतिक दृष्टिकोनातून पाहण्याची जी प्रथा रूढ झाली आहे, त्या दृष्टिकोनात इस्लाम सहभागी नाही; ही गोष्ट चांगली लक्षात ठेवायला हवी. ''ईशसंबंधीची एक तीव्र जाणीव असून ईशनिर्मित निसर्गाचा स्वीकार बुद्धिवैशिष्ट्याने व सुज्ञपणाने करून स्वत:ची अभिव्यक्ती करते, बुद्धी आणि इच्छावासना यांचा सुंदर मेळ बसविते, त्याचबरोबर, आत्म्याची गरज आणि सामाजिक मागण्यांचाही सुंदर मेळमिलाफ इस्लाम साधते.'' म्हणून ही गोष्ट स्पष्ट आहे की, इस्लाम श्रद्धेच्या धर्मविधीच्या व व्यक्तिगत नीतिचारित्र्यावर खूप भर देतो आणि त्यांचे परिणामस्वरूप व्यक्तींमध्ये नैतिकतेचा कल व प्रवृत्ती जोपासतो, तो दगड पायाचा खडक असतो, ज्यावर इस्लामी समाजाची इमारत उभारली जाते. तसेच या नैतिक प्रवृत्तीचे रूपांतर एका ठराविक व विशिष्ट समाजरचनेत करतो, ज्यात समाजातील प्रत्येक व्यक्तीला जास्तीत जास्त सृष्टीविषयक व भौतिक कल्याणाची हमी लाभते आणि त्याचबरोबर त्याचा आध्यात्मिक विकास होण्यासाठी संधी उपलब्ध करून देतो. जीवनाबद्दल इस्लामच्या बहुसमावेशक दृष्टीने, बल व सत्ता याच्या भूमिकेचा परामर्श घेण्यात पाश्चिमात्य विचारवंतांनी इस्लामच्या या महत्त्वाच्या अंगाकडे -सामाजिक पैलूकडे दु:खकारक रीतीने दुर्लक्ष केले आहे. ख्रिश्चन धर्ममताने त्या प्रारंभीच्या काळात राज्य स्थापनेचे उद्दिष्ट बाळगले नव्हते, पण इस्लाम अगदी सुरवातीपासूनच राजकीय-धार्मिक संस्था होती ही गोष्ट ते विसरतात. आपले उद्दिष्ट साकार करण्यासाठी विवेक आणि विशिष्ट धार्मिक संप्रदाय नसलेल्या काही दुष्ट शत्रूंशी त्याला लढावे लागले.

एक गोष्ट येथे स्पष्ट करायला हवी की इस्लाममध्ये युद्ध व लढाई हे काही आकस्मिक अगर नैमित्तिक हिंसाचार व रक्तपाताचे दृश्य नसून, जे जे काही वाईट व दुष्ट आहे, मग ते विचारात असो, भावनेत असो अथवा कृतीत असो त्यांच्याविरूद्ध



माणसाच्या संघर्षाचे (जिहाद) एक अंग आहे. पृथ्वीवर इस्लामी जीवनपध्दतीची प्रस्थापना करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या सर्वंकष संघर्षाचा एक अंश म्हणजे तलवार हाती घेणे होय. मुस्लिम कायद्यात त्याला 'प्राथमिक संघर्ष' अशी संज्ञा आहे.

''मुस्लिमांपैकी ते लोक की जे एखाद्या निमित्ताविना घरी बसून राहतात व जे अल्लाहच्या मार्गात प्राण व संपत्तीनिशी जिहाद (प्रयत्नांची पराकाष्ठा) करतात, दोघांची स्थिती एकसमान नाही. अल्लाहने बसून राहणाऱ्यापेक्षा प्राण व संपत्तीनिशी युद्ध करणाऱ्यांचा दर्जा श्रेष्ठ ठेवला आहे असे अल्लाहने प्रत्येकासाठी भलाईचेच वचन दिले आहे परंतु त्याच्याजवळ जिहाद करणाऱ्यांच्या सेवेचा मोबदला बसून राहणाऱ्यांपेक्षा फार जास्त आहे.'' (दिव्य कुरआन, ४ : ९५)

वरील आयत स्पष्टपणे सांगते की जिहाद (प्रयत्नांची पराकाष्ठा करणे) हे ऐदीपणाच्या उलटची वास्तवता आहे.

अनेक लोकांच्या मनात दृढ झालेला एक अपसमज दूर करणे आवश्यक वाटते. जिहाद या शब्दाचा 'किताल' (लढाई, संघर्ष) या शब्दाशी अनेकदा घोळ केला जातो आणि एकाच अर्थाने त्या दोहोंचा वापर केला जातो, जेव्हा की कुरआनने त्या दोहोंमध्ये ठळक फरक दाखविला आहे. 'जिहाद फी सबिल अल्लाह' (अल्लाहच्या मार्गातील युद्ध) हे सर्वंकष संघर्षाकडे निर्देश करतो. तर दुसऱ्या शब्दाचा अर्थ केवळ 'लढाई' असा होतो. वरील आयत क्र.४:९५ याबाबतीतील पुरेशा पुरावा आहे. पवित्र कुरआनने हे स्पष्टपणे दाखवून दिले आहे की 'जिहाद' चे दोन प्रकार आहेत. अल्लाहने प्रदान केलेल्या क्षमता-पात्रतेचा उपयोग करून केलेला वैचारिक संघर्ष व शारीरिक संघर्ष व जी साधने हाताशी आहेत त्यांचा वापर करून झगडणे.

इब्न रूश्द म्हणतात, जिहाद हा शब्द सर्वंकष संघर्ष असून प्रत्येक मुस्लिम माणसाला हे अनिवार्य ठरते की त्याने आपली सर्व बौद्धिक कुवत व शारीरिक शक्ती पणाला लावून किंवा त्याला लाभलेली वक्तृत्वाची देणगी, त्याचे बळ, शौर्य व भक्कमपणा पणाला लावून, संकटांचा मुकाबला करावा व भौतिक धनसंपत्तीचे बलिदान करावे.

पवित्र कुरआनने हा जिहादचा मुद्दा निरनिराळ्या अध्यायाच्या काही भागामध्ये सुरेख रीतीने विशद करून सांगितला आहे. जिहादचे खरे स्वरूप व त्याचे महत्त्व स्पष्ट करण्यासाठी काही अध्यायातील काही भाग आम्ही खाली उद्धृत करीत आहोत,

''अल्लाहच्या येथे तर त्याच लोकांचा दर्जा मोठा आहे ज्यांनी श्रद्धा ठेवली व ज्यांनी अल्लाहच्या मार्गात घरेदारे सोडली आणि जीवित व वित्तानिशी संघर्ष (जिहाद) केले, तेच यशस्वी आहेत.'' (दिव्य कुरआन, ९ : २०)

"अल्लाहच्या मार्गात प्रयत्नांची पराकाष्ठा करा जशी ती करायला हवी. त्याने तुम्हाला आपल्या कार्यासाठी निवडले आहे आणि धर्मामध्ये तुमच्यावर कोणतीही अडचण ठेवली नाही. दृढ व्हा आपल्या पिता इब्राहीम (अ.) च्या परंपरे (मिल्लत) वर."

(दिव्य कुरआन, २२ : ७८)

वरील आयती, इस्लाममध्ये जिहादचा स्थायी भाव संक्षिप्तपणे दाखवून देतात. तो अल्लाहच्या मार्गातील संघर्ष असून त्याला व्यापक अर्थाचा वाव आहे, केवळ लढाई एवढाच त्याचा अर्थ नाही.

एकदा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी खऱ्या 'मुजाहिद'च्या (धर्मयोद्धयाच्या) गुणवैशिष्ट्यांचे स्पष्टीकरण देताना म्हटले, "मुजाहिद तो आहे, जो स्वत:विरूद्ध झगडत असतो. म्हणजे स्वत:तील दुष्ट प्रवृत्तीविरूद्ध व कुवासनाविरूद्ध झगडतो."

इब्न अल कय्यिमने जिहादच्या बाबतीत खुलासा करताना लिहिले आहे- अल्लाहचा खरा दास, आपल्या स्वामीखातर स्वत:च्या अंतर्गत असणाऱ्या दुष्ट इच्छावासनांशी व कुप्रवृत्तींशी जो संघर्ष करीत असतो, त्याचाच एक भाग अल्लाहच्या शत्रूशी प्राणपणाने मुकाबला करणे हा होय, त्याच्या मनमस्तकावर ताबा गाजविणाऱ्या दुष्ट प्रवृत्तीविरूद्ध झगडणे, हे बाह्य जगातील शत्रूशी लढण्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. खरे तर तोच मूळपाया आहे, ज्यावर अल्लाहच्या मार्गातील यशस्वी लढा उभाराला जाऊ शकतो. जिहाद हा एक सर्वंकष संघर्ष असल्याने आणि विविध मार्गांनी तो करावा लागत असल्याने, त्याच्या विविध आणि विस्तारीत जबाबदाऱ्यांची विश्वसनीय रीतीने ओळख होण्यासाठी निरनिराळ्या पद्धतींचा अवलंब करणे गरजेचे असते.

इमाम रागिबच्या मतानुसार मुस्लिमांना तीन शत्रूंविरूद्ध लढावे लागते. १) डोळ्यांना दिसणाऱ्या शत्रूविरूद्ध, २) सैतानाविरूद्ध आणि ३) त्याच्या अंतर्गत असणाऱ्या पाशवी प्रवृत्तीविरूद्ध.

इब्ने रूश्दचे म्हणणे आहे की इमान माणसाला चार प्रकारे झगडावे लागते. विचाराने, वाणीने, हाताने आणि तलवारीने. पहिल्याचा अर्थ असा की मुस्लिम माणसाने आपली प्रतिमाग्राहकता सद्‌गुणाच्या उंचीपर्यंत विकसित करावी, ती इतकी की कोणत्याही दुर्गुणाचा त्याच्या मनाला खोलवर तिटकार वाटावा आणि वाईटांशी, मग ते अंतर्गत असो की बाह्य जगातील असो, जिद्दीने मुकाबला करण्याची त्याच्या मनाची प्रखर इच्छा असावी.

मग वक्तृत्वाचे, विचारांच्या अभिव्यक्तीचे कार्य येते, ज्याचे एक निकोप व न्यायी व शोषणमुक्त समाजाची जडणघडण करण्यात फार महत्त्वाचे स्थान असते. अभिव्यक्तीच्या



या कुवतीवर दुहेरी जबाबदारी असते, म्हणजे वक्तृत्व हे सोज्वळ व सभ्य शब्दात असावे, त्यातील भावना व हेतू उदात्त असावेत, ज्यामुळे माणसाचे मन उचंबळून येईल व त्याचा कायमचा ठसा लोकांच्या मनावर उमटेल. त्याचप्रमाणे वक्तृत्वकलेच्या ईशदेणगीचा वापर मानवी जीवनावर आघात करणाऱ्या वाईट गोष्टींच्या निषेधासाठीही करावा लागतो. लोकांना अल्लाहच्या मार्गावर निमंत्रित करण्यासाठी अभिव्यक्ती कुवतीचा उपयोग कशा रीतीने करावा, ते पवित्र कुरआन दाखवून देतो.

"हे पैगंबर (स.), आपल्या पालनकर्त्याच्या मार्गाकडे आमंत्रित करा मुत्सद्देगिरीने व उत्तम उपदेशासहित, आणि लोकांशी विवाद करा अशा पद्धतीने जी उत्तम असेल."

(दिव्य कुरआन, १६ : १२५)

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्या विशिष्ट शैलीत खुलासा केला आहे की, केवळ तलवारीचा उपयोग करण्यातच जिहाद आहे असे नाही, तर जुलूम करणाऱ्यांच्या अघोरी कृत्यांच्या निषेधासाठी जेव्हा एक मुस्लिम माणूस आपल्या जिभेचा वापर करतो, तेव्हा तो जिहादच करीत असतो.

एकदा पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले, "ज्या कोणाला एखादे निंद्य, तिरस्करणीय कृत्य दिसेल, तेव्हा ते बदलण्याचा प्रयत्न आपल्या हाताने करावा, जर त्याच्यात तितके बळ नसेल किंवा, वाचेचाही वापर करण्याइतकी त्याची कुवत नसेल, तर ते कर्म अंत:करणापासून तिरस्करणीय मानायला पाहिजे आणि ती श्रद्धेची सर्वात क्षीण अवस्था आहे."

अबू सईद अल खुद्री यांच्या निवेदनाच्या आधारे एक कथन असे सांगितले जाते की एकदा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले- "एखाद्या जुलमी व क्रूर शासनकर्त्याच्या तोंडावर बेडरपणे सत्य सांगणे, हा सर्वोत्तम जिहाद आहे."

यावरून ही गोष्ट खूपशी स्पष्ट होते की इस्लाममध्ये जिहाद म्हणजे हिंसाचारी कृत्य नव्हे, तो अल्लाहच्या मार्गात केला जाणारा सर्वंकष संघर्ष व लढा आहे.

या सर्वंकष संघर्षामध्ये, ज्यात मानवी जीवनाच्या सर्व बाबींचा अंतर्भाव असतो, प्रत्यक्ष लढाईलाही वेगळे व विशेष स्थान इस्लामने दिलेले आहे. असे प्रसंग कधी कधी उद्‌भवतात, जेव्हा शस्त्रांचा वापर करण्याची अत्यंत निकडीची गरज असते आणि त्या स्थितीत जर किंचितसाही दुर्बलपणा दाखविला तर त्यातून फार मोठे हानीकारक परिणाम घडून येतात.अशा प्रसंगी कंबरा बांधून उभे राहण्यावर आणि संकटापुढे ठामपणे तोंड देण्यावर व धाडसाने व हिंमतीने त्याचा प्राणपणाने प्रतिकार करण्यावर मोठा भर इस्लामने दिला आहे. अशा रीतीने बळाचा वापर करण्याची इस्लामने नुसती अनुमतीच

दिली असे नसून त्याच्या आवश्यकतेवर कुरआनमध्ये व हदीसमध्ये मोठा भर देण्यात आला आहे. परंतु ही गोष्ट स्पष्ट व्हावी की इस्लाममध्ये लढाई म्हणजे पिसाट व निर्घृण पाशवी कृत्य नव्हे, मुस्लिम कायद्यात त्याचा अर्थ, पाश्चिमात्यांचा न्यायशास्त्रातल्या अर्थाप्रमाणेच 'न्याय लढाई' असा आहे.

इस्लाममध्ये रक्तपात व मारझोड यांचा खरा अर्थ नीट कळण्यासाठी ज्या उद्दिष्टांमुळे माणसे रक्तपात करण्यास उद्युक्त होतात त्यांचे पहिल्यांदा पृथ:करण करून पाहिले पाहिजे.

१) भौतिक लाभ मिळविण्यासाठी 'युद्धजन्य आक्रमण' करणे ही सर्वांत मोठी उत्तेजनेची बाब आहे. मुलुखगिरी करून नवा प्रदेश मिळविणे व त्यातील विविध प्रकारची लूट प्राप्त करणे हाच सर्व युद्धांचा मूळ हेतू असे. याच गोष्टीचा सर्व लोकांना व घराण्यांना मोठा मोह असे.

२) प्रतिकार करणे जेव्हा शक्य असे तेव्हा जखमी होण्याचे भय व प्रत्यक्ष झालेल्या जखमांबद्दल संताप, या गोष्टींनी न चुकता संरक्षणात्मक युद्धासाठी उद्युक्त केले आहे. कसलीही किंमत मोजून ज्या गोष्टीचे रक्षण करण्यास राष्ट्रे नेहमी तयार असत, त्यात भूप्रदेशाखेरीज आपली हुकूमत व आदर-प्रतिष्ठा या बाबींचाही समावेश होता.

३) सत्ताप्राप्ती आणि वैभवाची दुर्दम्य आकांक्षा व हव्यास, हेच जगातील महान जेत्यांचे व त्यांच्या सैन्यांचे उद्दिष्ट होते. ही गोष्ट खरी आहे की, प्रदेश जिंकण्यासाठी व स्वत:च्या धनसंपत्तीत व त्यांच्या माणसांच्या संपत्तीत भर घालण्यासाठी महत्त्वाकांक्षेने पेटलेल्या माणसांनी साधन म्हणून बळाचा वापर केला आहे. तरीसुद्धा आपले वर्चस्व गाजविणे हेच साध्य म्हणून अनेक राष्ट्रानी व व्यक्तींनी त्यातच हर्ष व समाधान मानण्याची उदाहरणेही नाकारता येत नाहीत. या लालसेचा अविष्कार जेव्हा एखादे राष्ट्र किंवा एखादा वर्ग दुसऱ्या राष्ट्रांवर अगर दुसऱ्या वर्गावर आपले वर्चस्व व सत्ता स्थापण्याचा यत्न करते तेव्हा होतो. सत्ताप्रेमापोटी सत्ता मिळविणे हेच मानवाच्या हालचालीमागील प्रमुख कारण ठरले आहे. त्यामुळेच चढाओढीमधील ते कमी महत्त्वाचे कारण नव्हते. हीच गोष्ट प्राचीन इतिहासातील अथेन्स व स्पार्टा यामधील युद्धातील दोस्तराष्ट्रांची होती. आधुनिक काळात पर्शियाच्या सर्वश्रेष्ठ धुरीणत्वात आणि मांडलिक जर्मन राज्यांतील संघर्ष याचे प्रतीक आहे.

४) द्वेष व सूडभावना यांनी एक स्वतंत्र व वेगळेच उद्दिष्ट पुरविले आहे. एखादे राष्ट्र पाशवी स्वार्थांधपणाच्या खालच्या पातळीची प्रवृत्ती धारण करू शकते. राक्षसी



द्वेषभावनेने प्रेरित होऊन तिरस्कृत शत्रूवर प्राणांतिक घाव घालण्याचे समाधान मिळविण्यासाठी, स्वत:च्या हिताच्या सत्याकडेही दुर्लक्ष करतात. द्वेषभावनेची निर्मिती, भिन्न आचरण आणि भिन्न संस्कार-संस्कृती यात खोलवर दडलेले द्वेषभावनेचे बीजही कधी कधी अंकूराले जाते.

रक्तपात व संहार यांच्यामागे इस्लामपाशी कसलाही दुष्ट मानस नाही. केवळ मानवी प्राण्यांचेच नव्हे तर अशा सर्व प्राण्यांच्या व वनस्पतींच्या बाबतीतही इस्लामला मोठा आदर आहे आणि केवळ उच्चतर हेतु सिद्धीसाठी आणि उच्चतर साधना माध्यमानेच एकदा मुस्लिम यांच्यावर हात टाकू शकतो. जीवांच्या पावित्र्याबद्दल स्पष्टपणे सांगणाऱ्या कितीतरी आयती पवित्र कुरआनमध्ये भरलेल्या आहेत.

''जमिनीवर चालणाऱ्या एखाद्या प्राण्याला आणि हवेत पंखाने उडणाऱ्या एखाद्या पक्ष्याला पहा, हे सर्व तुमच्यासारख्याच प्रजातींमध्ये मोडतात. आम्ही त्याच्या भाग्यलेखात कोणतीही कसर ठेवली नाही, मग हे सर्व आपल्या पालनकर्त्याकडे एकवटले जातील.''

(दिव्य कुरआन, ६ : ३८)

माणसाचाच नव्हे तर एखाद्या चिमुकल्या पक्षाचाही जीव अंत्यत मोलाचा आहे आणि पुरेशा कारणाखेरीज तो घेतला जाऊ शकत नाही; या वास्तवतेवर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अनेकदा भर दिला, ''जो कोणी एखादी चिमणी अथवा त्याहूनही लहानसा क्षुद्र पक्षी अकारण ठार करील, त्याला अल्लाहसमक्ष त्या हत्येचा जाब द्यावा लागेल.''

दुसऱ्या एका प्रसंगी त्यांनी लोकांना प्राणिमात्रांशी त्यांच्या कठोर व निर्दय वर्तणुकीबद्दल ताकीद दिली. ''अल्लाह त्याच्या कृपासागरातून तुमच्या हातून प्राण्यांशी केलेले निर्दयी व कठोर वर्तन क्षमा केले जाते. त्याचा अर्थ तुमच्या हातून घडलेल्या पापकृत्यांचे मोठे ओझे कमी व्हावे.''

पक्ष्यांबद्दल व प्राण्यांबद्दल इस्लाम असेच मोल दर्शवित आहे. सर्व मुस्लिम जगतामध्ये प्राण्यांशी अत्यंत दयाळूपणाने व प्रेमाने वर्तणूक केली जाते, ती इस्लामी शिकवणुकीच्या परिणामस्वरूपच होय. उदाहरणार्थ, बॉस्वर्थ स्मिथच्या मतानुसार, भार वाहून नेणाऱ्या व अन्य प्राण्यांना तुर्कस्तानमध्ये जितक्या प्रेमाने व दयाळूपणाने वागविले जाते तितक्या प्रेमळपणाने व दयाळूपणाने ख्रिश्चन जगतात कदाचित एक नार्वेचा अपवाद वगळता कोठेही वागविले जात नाही.

मानवी जिवाला त्यापेक्षा अधिक सुरक्षिततेची हमी दिली गेली आहे आणि सबळ व पुरेशा कारणाखेरीज एखाद्याचा प्राण घेण्याची अनुमती कोणालाही दिली गेली नाही.

''ते अल्लाहशिवाय इतर कोणत्याही उपास्याचा धावा करीत नाहीत, अल्लाहने

निषिद्ध ठरविलेल्या कोणत्याही जिवाला हकनाक ठार करीत नाहीत आणि व्यभिचारही करीत नाहीत, हे कृत्य जो कोणी करील तो आपल्या गुन्ह्याचे फळ भोगील.''

(दिव्य कुरआन, २५ : ६८)

''याच कारणास्तव बनीइस्राईलकरिता आम्ही हे फर्मान लिहिले होते की, ज्याने एखाद्या माणसाला खुनाबद्दल अथवा पृथ्वीतलावर उपद्रव पसरविण्याव्यतिरिक्त अन्य कारणाने ठार केले तर त्याने जणू काही सर्व मानवांना ठार केले आणि ज्याने कोणाला जीवनदान दिले त्याने जणू काही सर्व मानवजातीला जीवन प्रदान केले.''

(दिव्य कुरआन, ५ : ३२)

कुरआनची वर उल्लेख केलेली आयत निःसंदिग्धपणे व स्पष्टपणे मानवी जिवाचे मोल दर्शविते. प्रत्येक माणसाचा जीव मोलाचा व पवित्र आहे, म्हणून त्याचे रक्षण करणे हे समाजाच्या प्राथमिक कर्तव्यांपैकी एक आहे.

एका ख्यातनाम इस्लामी विद्वानाने वरील आयतीबद्दल अभिप्राय व्यक्त केला आहे-कुरआनच्या या आयतींचे सखोल विवेचन केल्यास असे आढळून येते की अल्लाहने माणसाचा प्राण हा आदरणीय ठरविला आहे आणि मानवी प्राणाचे रक्षण करणे हे मानवजातीचे अग्रेसर कर्तव्य आहे. परंतु या कलमालाही काही शर्ती किंवा अटी जोडलेल्या आहेत. उदाहरणार्थ, 'न्यायोचित कारणाविना' तसेच या शब्दांनी- ''जर एखाद्याने कोणत्या माणसाची हत्या केली, तर त्याने सर्व मानवजातीची हत्या केल्याप्रमाणे आहे.'' या शब्दांनाही अशी अट जोडली गेली आहे- ''भूप्रदेशात दुष्टपणा व खोडसाळपणा करणाऱ्याच्या हत्येखेरीज'' असे विधान आहे. त्याचा अर्थ असा की मानवी जीवांच्या रक्षणाची हमी निःसंशयपणे देण्यात आली आहे. पण ती सशर्त आहे. जुलूम व अत्याचाराला जगामध्ये अनर्थ माजवू देऊ नये. ही न्यायोचित निकडीची मागणी आहे. तसेच दुष्टपणाला मानव समाजात पायबंद घातला गेला पाहिजे, माणसाचा प्राण मोलाचा व आदरणीय आहे. जोवर त्याच्या हालचाली वाजवी मर्यादांच्या व सीमारेषांच्या आत होत आहेत. त्या मर्यादांचे उल्लंघन करून तो जेव्हा धाक-दडपशाहीचे व आक्रमकतेचे प्रतीक व साधन बनतो आणि त्याला संपुष्टात आणणे अनिवार्य बनते आणि यातच मानवजातींचे कल्याण सामावलेले आहे. म्हणूनच पवित्र कुरआन म्हणतो- ''प्रक्षोभप्रसार करण्याचा खोडसाळपणा हा मानवाची प्रत्यक्षपणे हत्या करण्यापेक्षा अधिक गंभीर बाब आहे.''

पवित्र कुरआनने ही बाब स्पष्ट उघड केलेली आहे की, रक्तपात हे इस्लामचे साध्य व उद्दिष्ट नसून उच्चतर व उदात्त उद्दिष्टांच्या मानव कल्याण पूर्ततेसाठी ते एक साधन आहे. म्हणूनच इस्लामने आपल्या अनुयायांना पाशवी क्रूरपणाच्या भावनेने नव्हे, तर मानव कल्याणाच्या भावनेने हाती शस्त्र घेण्याचे आग्रही आवाहन केले आहे.



मानवतेच्या अंगावरील फोडांना एक शल्यविशारद ज्या भावनेने शस्त्र हातात घेतो, त्याच भावनेने इस्लाम अनुयायांना शस्त्र घेण्यास सांगतो. ज्यांना मानवतेबद्दल कसलीही जाणीव नाही आणि ज्याला कोणत्याही नीतितत्त्वांचे बंधन नाही, अशा दुष्ट माणसांकडून निष्पाप, अजाण व अश्राप लोकांवर केले जाणारे अन्याय-अत्याचार व जुलूम स्तब्धपणे बघणारी व्यक्ती किंवा जमात हे मानवजातीचे उपकारकर्ते कधीही असत नाहीत. मानवाच्या वंशात मूळ पायाच्या खडकाचे स्थान असणाऱ्या नैतिक रचना मजबूत करण्यासाठी जो झटत नाही, तो मानवतेचे कर्तव्य पार पाडीत नाही. जो माणूस किंवा जे राष्ट्र दुष्टपणा व वाईटपणाचा बिमोड व निर्मूलन करण्याचा प्रयत्न करते, ते खऱ्या अर्थाने मानवतेचा उपकारकर्ता असते कारण निर्धास्तपणे केलेला दुष्टपणा हा शिक्षेचे भय बाळगत केलेल्या दुष्टपणापेक्षा अधिक वाईट असतो. माणसाची आपल्या नगरबांधवाशी व देशबांधवांशी कसली जबाबदारी असते, याचे अतिसुंदर वर्णन पैगंबर मुहम्मद (स.) यांनी निवेदनात खालील काही ओळीत चित्रित केले आहे.

''माननीय अनस (रजि.) यांच्या निवेदनाच्या आधारे असे कथन केले जाते की, एकदा अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी म्हटले- ''तुमच्या बंधुला मदत करा, मग तो अन्याय करणारा असो की अन्यायपीडित असो.'' यावर उपस्थितीत माणसांनी विचारले, ''हे अल्लाहचे पैगंबरा! आम्ही अन्यायपीडिताला मदत करू शकतो पण अन्याय करणाराला कशी मदत करावी, हे काही आम्हाला उमगले नाही.'' यावर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उत्तर दिले, ''तुम्ही त्याचा अन्याय करणारा हात पकडून व थांबवून त्याला मदत करू शकता.''

ज्याच्यापाशी अणुरेणु इतकीही सद्सद्विवेकबुद्धी आहे असा माणूस दृष्टींना बिनधास्तपणे गुन्हे करण्याचा व नंतर उजळ माथ्याने मुक्तपणे समाजात वावरण्याचा परवाना कधीही देऊ शकत नाही. समाजातील कमकुवत घटकातील लोकांवर जुलूम व अन्याय-अत्याचार होत असताना, गुन्हेगारांवर कसलाही प्रतिबंध न घालणे, हे मानवतेवरील प्रेम नसून तिच्याशी वैरच ठरते.

डब्लू. पी. पॅटर्सन लिहितो- प्रतिकार न करण्याचे धर्मतत्त्व हे समाजविरोधी आहे. कारण स्वतःच्या हक्कांचेच नव्हे, तर इतरांच्या हक्कांचेही प्रतिपादन नसते आणि त्यात इच्छित आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्याच्या टप्प्यापर्यंत पोहोचण्याचा मार्ग सापडण्याचा संभव नसतो.

ग्रोशियस म्हणतो- युद्धाचा अवलंब निसर्ग-नियमांना संमत असतो. तसेच शूर माणसांच्या, राष्ट्रांच्या कायद्याच्या आणि धर्मग्रंथांनी जारी केलेल्या आणि पुष्टी दिलेल्या ईशनियमांच्या अनुमतीने युद्धाचा अवलंब संमत असतो.

निसर्गाच्या कायद्याला दोन शाखा असतात. उपजत नैसर्गिक प्रेरणेने दाखविलेला मार्ग आणि विवेकबुद्धीने पसंत केलेली तत्त्वे. हा कायदा युद्धाची अनुमती कळवितो ती स्वरक्षणाच्या जागतिक प्रेरणेतून, त्याबरोबर संरक्षणाची साधने उपलब्ध करून सर्व निर्मित जीवांना निसर्ग आपले उद्दिष्ट जणू उघड करतो. त्याचप्रमाणे विवेकबुद्धीचा आवाज ही गोष्ट स्पष्ट करून सांगतो की, समाजाचे कल्याण व झोटिंगशाहीचा अनिर्बंध व बेलगाम हिंसाचाराचा अंमल या दोन बाबी विसंगत व परस्परविरूद्ध आहेत.

वरील निष्कर्ष ही गोष्ट खूप स्पष्ट करते की काही विशिष्ट परिस्थितीत बळाचा वापर अनिवार्य असतो. जेणेकरून मानवी प्राणाचे पावित्र्य राखले जावे आणि जगामध्ये नैतिक व्यवस्थेचे जतन केले जावे. मुस्लिमांना बळाचा वापर करण्यास अनुमती देणाऱ्या आदेशाचा पहिलाच उतारा त्या सर्व उदात्त आदर्शाकडे निर्देश करतो.

''परवानगी दिली गेली युद्ध करण्याची त्या लोकांना ज्यांच्यावर अत्याचार केले गेले, कारण ते अत्याचारपीडित आहेत आणि अल्लाह निश्चितपणे त्यांच्या मदतीला समर्थ आहे. हे ते लोक आहेत जे आपल्या घरांतून नाहक बाहेर काढले गेले, केवळ या अपराधापायी की ते म्हणत होते,''आमचा पालनकर्ता अल्लाह आहे.'' जर अल्लाह लोकांना एक दुसऱ्याकरवी हटवीत नसता तर मठ, आणि चर्च व 'सिनेगॉग' आणि मस्जिदी ज्यांत अल्लाहचे नाव मोठ्या प्रमाणात घेतले जाते, सर्व उद्ध्वस्त केली गेली असती. अल्लाह जरूर त्या लोकांना सहाय्य करील जे त्याला सहाय्य करतील. अल्लाह मोठा शक्तीशाली आणि जबरदस्त आहे.'' (दिव्य कुरआन, २२: ३९-४०)

'' हे ते लोक आहेत ज्यांना आम्ही जर पृथ्वीवर सत्ता बहाल केली तर ते नमाज कायम करतील, जकात देतील, सत्कर्माचा आदेश देतील आणि वाईटाला प्रतिबंध करतील, आणि सर्व बाबींचा अंतिम परिणाम अल्लाहच्या अखत्यारीत आहे.''

(दिव्य कुरआन, २२ : ४१)

इस्लाममध्ये 'किताल'ची (सशस्त्र लढाई) उद्दिष्टे व हेतू यांचा स्पष्ट सारांश वरील उताऱ्यात दिला गेला आहे. भूप्रदेश मिळविणे, सत्ता काबीज करणे, वर्चस्व व अग्रहक्क प्रस्थापित करणे, यापैकी कोणतेच उद्दिष्ट नाही. मुस्लिमांना बळाचा वापर करण्याची परवानगी केवळ एवढ्यासाठीच दिली गेली की अरबस्तानातील मूर्तिपूजक लोकांनी त्यांची सतत छळणूक करून त्यांचे अस्तित्वच अवघड करून सोडले होते. त्यांच्या हातून त्यांना अनन्वित क्लेश व शारीरिक यातना देण्यात आल्या, त्यांना अमानुष मारझोड झाली, त्यांची सतत मानखंडना केली गेली, आणि नंतर त्यांना आपल्या आवडत्या घरकुलांचा त्याग करून परागंदा होण्यास भाग पाडले गेले. कारण फक्त एवढेच होते की, ते अल्लाहची उपासना करीत. त्यांच्या जन्मगावी वास्तव्य करण्याचा



तसेच काबागृहात उपासना करण्याचा इतर अरब लोकांइतकाच त्यांनाही हक्क व अधिकार होता. परंतु त्यांच्याशी सहिष्णूता कोणीही दाखविली नाही. पैगंबर मुहम्मद (स.) यांना व त्यांच्या सोबत्यांना त्यांच्या जन्मगावातून घालवून दिल्यानंतरही कुरैशांचे वैर संपले नाही.

मक्का येथील अप्रामाणिक व अनुचित प्रवृत्तीच्या लोकांनी, पैगंबर मुहम्मद (स.) यांनी प्रचार केलेल्या ईशवाणीकडे-संदेशाकडे संपूर्ण दुर्लक्ष केले. इतकेच नव्हे तर तो प्रचार तसाच पुढे चालू ठेवल्यास पैगंबर मुहम्मद (स.) यांनी तेथे राहू देण्यासही ते तयार नव्हते. ज्या निष्पाप व अजाण लोकांनी मदीनेस स्थलांतर केले, त्या सर्वांचा पाठलाग करून त्यांना वाटेतच ठार करण्याचे अगर त्यांच्या नव्या घरात पोहोचल्यास तेथे त्यांची हत्या करून टाकण्याचे कट-कारस्थान मूर्तिपूजक अरब लोकांनी शिजविले होते. त्या परिस्थितीत युद्ध करणे केवळ समर्थनीयच नव्हे, तर एक मूलभूत निकडीची गरज ठरते आणि प्रतिकार न केल्यास, किंबहूना ते अनैतिकही ठरते; असा जो निर्वाळा प्राचीन व अर्वाचीन सर्वच धर्मांनी, नीतितत्त्वज्ञांनी दिला आहे, तोच बरोबर आहे. एखाद्या राष्ट्रावर, धनसंपत्तीची अतितृष्णा बाळगणाऱ्या दुसऱ्या राष्ट्राने जर हल्ला केला, तर स्वरक्षणासाठी शस्त्र हाती घेऊन प्रतिकार करण्याला नैतिक पांठिबा देण्याच्या मुद्यावर प्रत्यक्षपणे एकमत झाले होते.

पवित्र कुरआन आणखी खुलासा करतो की युद्धाची कृती ही एक नैतिक गरज आहे. बळाच्या सहाय्यानेच मानवी जीवनात सतत वाढती दुष्कृत्ये व दुष्टपणाला आळा घातला जाऊ शकतो, कारण तो जर अनिर्बंधपणे तसाच वाढू दिला तर नीतिव्यस्थेचा व न्यायव्यस्थेचा पाया तो इतक्या जबरदस्त रीतीने हादरून टाकील की मानववंशातील दुष्ट सैतानाच्या तावडीतून प्रार्थनागृहे सुद्धा सुटणार नाहीत. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट अशी की शत्रूच्या दुष्ट व अघोरी कृत्यापासून स्वत:च्या प्राणांचे आणि मस्जिदींचे संरक्षण आपल्या जिवावर उदार होऊन करण्याचा आदेश मुस्लिमांना देण्यात आला आहे; एवढेच नाही तर चर्च, सिनेगॉन व मठांचेही रक्षण प्राणपणाने करण्याचा आदेश दिला गेला आहे. याचा अर्थ असा होतो की मानवी इतिहासाच्या वेगवेगळ्या टप्प्यात ईश्वराच्या पैगंबराकरावी नैतिक सुव्यवस्थेची देणगी कृपावर्षाव म्हणून मानवजातीला मिळाली, तिचे रक्षण व जतन करण्याची इस्लामची इच्छा आहे. तीच कल्पना दुसऱ्या एका ठिकाणी व्यक्त करण्यात आली आहे.

''जर अल्लाह अशा प्रकारे मानवाच्या एका समुदायाला दुसऱ्या समुदायाच्या हस्ते हटवीत नसता तर पृथ्वीची व्यवस्था बिघडली असती - परंतु जगातील लोकांवर अल्लाहची मोठी कृपा आहे की (तो अशा तऱ्हेने हिंसाचाराच्या विनाशाची व्यवस्था करीत

असतो.)'' (दिव्य कुरआन, २ : २५१)

राष्ट्रांचा उदय व अस्त, ही योगायोगाने घडणारी घडामोड नसून, विश्वामध्ये एका ठराविक साच्यात नीती-व्यवस्था साकार करण्याचाच प्रकार आहे. काही राष्ट्रांचे प्रभावी अस्तित्व झटकून टाकले जाते, याचे कारण ते नखशिखांत व हाडातल्या गाभ्यापर्यंत भ्रष्ट बनलेले असतात. त्यांचे जगातील वर्चस्व व प्रभाव हे शांततापूर्ण मानवी सहजीवनाला एक मोठा धोका असतो. म्हणून अन्य मानव समूहाच्या लोकांच्या प्रयत्नांद्वारे अस्पष्ट व अंधाऱ्या पार्श्वभूमीत फेकले जातात आणि मानवजातीला त्यांच्या भ्रष्ट व कुप्रभावापासून वाचविणे, हाच दृष्टिकोन असतो.

मानवी समाजात समाजविरोधी घटकांचा समावेश सतत असतो. त्यांना पायबंद घालणे, मग त्यासाठी बळाचा वापर करावा लागला तरीही, गरजेचे असते. असत (पाप) जेव्हा जळूप्रमाणे सद् (पूण्याई) चे शोषण करीत बांडगुळाप्रमाणे पोसू लागते, तेव्हा जे जे म्हणून सद् (चांगले) असते, त्या सर्वांची पारध करूनच ते फोफारत असते, तेंव्हा उपलब्ध सर्व साधनशक्तीनिशी त्याला प्रतिबंध करणे, हे मानवतेचे प्रथम कर्तव्य बनते.

जोड लिलितो- एक तत्त्ववेता, त्याचा शेजारी त्याची पत्नी पळवून नेत असताना, तत्त्वज्ञान सांगू शकत नाही, तसेच एक चित्रकार त्याचे चित्र एखादा चोर चोरून नेत असताना दुसर रंगवू शकत नाही. याच अर्थाने, सर्व सुसंस्कृत उद्योगधंदे किमान सुरक्षाव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर विसंबून असतात आणि ती पार्श्वभूमी हीच ते उद्योगधंदे चालू राहण्याची अट व शर्त आहे. म्हणून तलवारीचा वापर हा मानववंशातील समाजविरोधी घटकांच्या कारवायांना प्रतिबंध घालण्यासाठी असतो. समाजविरोधी व्यक्तीविरूद्ध तसेच राष्ट्रांविरूद्ध तो असतो. एखाद्या युद्धपिसाट राष्ट्राला, अन्य राष्ट्रांनी शांततेने चालविलेल्या मानवतावादी कार्याला वेठीस धरण्याची परवानगी कधीही दिली जाऊ नये. हृदयशून्य जुलूमकर्त्यांच्या जुलूम व अत्याचाराला बळी पडलेल्या पद्दलितांचे साहाय्य, पडेल तितकी किंमत मोजून, करायलाच पाहिजे आणि ईशभय बाळगणाऱ्या माणसांचे हे अनिवार्य व बंधनकारक कर्तव्य आहे. की मानवतेच्या शत्रूंच्या पकडीतून त्या असहाय्य व अगतिक माणसांची सुटका करावी.

'' मग काय कारण आहे की तुम्ही अल्लाहच्या मार्गात त्या असहाय पुरुष स्त्रियां आणि मुलांकरिता लढू नये ज्यांचे दुर्बल असल्यामुळे दमन केले गेले आहे आणि धावा करीत आहेत की, हे पालनकर्त्या! आम्हाला या वस्तीतून बाहेर काढ ज्याचे रहिवाशी अत्याचारी आहेत, आणि तुझ्याकडून आमचा एखादा वाली व सहायक निर्माण कर.''

(दिव्य कुरआन, ४ : ७५)



अत्याचारपीडितांच्या मुक्ततेसाठी केले जाणाऱ्या युद्धाला पवित्र कुरआनने 'अल्लाहच्या मार्गातील युद्ध' असे शीर्षक दिले आहे. नंतरच्या पुढील ओळीत या दोन प्रकारच्या युद्धामधील फरक स्पष्ट करून दाखविला आहे. एक म्हणजे अल्लाहखातर केलेले युद्ध आणि दुसरे म्हणजे दुष्टांचा नि:पात करण्यासाठी केलेले युद्ध.

''ज्या लोकांनी इमानचा मार्ग अवलंबिला आहे ते अल्लाहच्या मार्गात लढतात आणि ज्यांनी अइमानचा मार्ग अवलंबिला आहे ते तागूतच्या (विद्रोही लोकांच्या) मार्गात लढतात, तर शैतानाच्या साथीदारांशी लढा आणि खात्री बाळगा की शैतानाची कारस्थाने खरे पाहता अत्याधिक दुर्बल आहेत.'' (दिव्य कुरआन, ४ : ७६)

न्यायधिष्ठित युद्ध व अन्यायावर आधारलेले युद्ध यामधील फरकाची सीमारेषा अत्यंत ठळक व स्पष्ट केली आहे. जे स्वत:ची शान व वैभवासाठी युद्ध करतात, स्वत:ची भरभराट करण्यासाठी व आपले महत्त्व वाढविण्यासाठी लढतात, अथवा दुर्बलांची साधनसंपत्ती हडप करून त्याचे शोषण करण्यासाठी रक्तपात करतात; ते खऱ्या अर्थाने सैतानाचे मित्र आहेत. जे लोक जुलूम, अन्याय व अत्याचाराचे निर्मूलन करण्यासाठी आणि दुष्टांना संपुष्टात आणण्यासाठी प्राण पणाला लावतात, ते भाग्यवान आत्मे आहेत आणि ते अल्लाहच्या मार्गात युद्ध करीत असतात. म्हणून आपले स्वत:चे किंवा राष्ट्राचे वैभव वाढविण्यासाठी, इतराच्या जीवितवित्ताची किंमत मोजून जाणारे प्रत्येक युद्ध, हे सैतानाच्या मार्गातील युद्ध असून इस्लाम त्याचा तीव्रपणे धिक्कार करतो. त्याउलट अत्याचारपीडितांच्या रक्षणार्थ केलेले युद्ध, ज्याचा हेतू दुष्कृत्याचे निर्दालन करून त्यांचा फैलाव करणाऱ्यांना दडपून टाकणे, असा असतो त्याला 'पवित्र युद्ध' असे म्हणतात. इस्लाम अशा युद्धाला समर्थन देतो, कारण जगात न्याय व शांतता यांच्या स्थापनेसाठी दुष्ट घटकांच्या वर्चस्वाच्या मुळाशी घाव घालणे आवश्यक असते.

''हे इमानधारकांनो! या अइमानधारकांशी युद्ध करा इथपर्यंत की हिंसाचार शिल्लक राहू नये आणि धर्म सर्वस्वी अल्लाहसाठी व्हावा. मग जर ते हिंसाचारापासून परावृत्त झाले तर त्यांची कृत्ये पाहणारा अल्लाह आहे.'' (दिव्य कुरआन, ८ : ३९)

या आयतीमध्ये इस्लाममधील युद्धाचे हेतू व उद्देश यांची स्पष्ट व्याख्या करण्यात आली आहे. स्वप्रेमापोटी नव्हे, जेणेकरून आपल्या दुष्ट कट-कारस्थानांनी, निष्पाप लोकांचे जीवन असह्य करून सोडणाऱ्या उन्मत्त बंडखोरांना, त्यांच्या दुष्ट कारवाया करण्यापासून बळाने रोखले जावे आणि मानवी समाजामध्ये न्याय, सलोखा, बंधुभाव आणि सदिच्छा नांदावी.

इस्लामी युद्धातून स्वत:ची शान अगर राष्ट्राचे वर्चस्व वाढविण्याची भावना

पूर्णपणे काढून टाकण्यात आली आहे. अबू मूसा अल्-अशरीच्या आधारे, असे निवेदन केले जाते की, एक इसम एकदा पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे आला व म्हणाला, ''एकजण लुटीच्या मालासाठी लढतो, दुसरा एकजण कीर्ती प्राप्त व्हावी म्हणून लढतो, तिसरा आपली वीरता व शौर्य दाखवून देण्यासाठी लढतो, तर त्यांच्यापैकी कोणाला 'अल्लाहच्या मार्गात युद्ध करणारा' मानले जाईल?'' या प्रश्नाचे उत्तरादाखल पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले, ''केवळ ईशवाणीचे वर्चस्व व प्रभाव स्थापण्याच्या एकमेव उद्देशाने जो शस्त्र हातात घेतो, तोच अल्लाहच्या मार्गात युद्ध करणारा होय.''

म्हणून प्रत्येक युद्धाला इस्लाममध्ये धर्मयुद्ध अथवा 'जिहाद' समजले जात नाही. मानवजातीवर जुलूम-अत्याचार व शोषण करणाऱ्याविरूद्ध शस्त्र हाती घेण्याच्या एकमेव व उदात्त हेतूमुळे मुस्लिमांनी लढण्याचे समर्थन प्राप्त केले आहे. युद्धाच्या या उद्देशाचे महत्त्व इतके विशाल आहे की 'बुखारी'ने आपल्या पुस्तकात त्याला एक स्वतंत्र अध्याय दिला आहे. त्यात म्हटले आहे की एखादा माणूस लढाईत मारला गेला, तर तो हुतात्मा ठरला किंवा नाही, हे खात्रीपूर्वक सांगणे अत्यंत बिकट आहे. कारण योद्धा कोणता हेतू मनात ठेवून युद्धात सहभागी होतो, यावर त्याचे हौतात्म्य अवलंबून असते आणि तो हेतू मानवाच्या नजरेपासून दडलेला असतो. म्हणून या बाबतीत केवळ अल्लाहच निर्णय देऊ शकतो. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जोरदारपणे प्रतिपादन केले आहे- ''अल्लाह चांगल्या रीतीने पूर्णपणे जाणतो की त्याच्या कार्यासाठी झुंजणारा आणि त्याच्याखातर जखमी होणारा कोण आहे.''

असे सांगितले जाते की रणांगणात शत्रूशी झुंजताना पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सैन्यात एका 'दांभिक' माणसाचा समावेश होता. त्याचे नाव कझमान असे होते. तो युद्धभूमीवर जीवावर उदार होऊन लढला. त्याच्या शौर्याबद्दल मुस्लिमांना मोठी प्रशंसा होती. त्यांच्यापैकी एकजण पैगंबर मुहम्मद (स.) समक्ष उद्गारला ''या माणसाने आपली उपयुक्तता जितकी सिद्ध करून दाखविली आहे, तितकी अन्य कोणीही दाखविलेली नाही.'' यावर पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले, ''त्यांचे निवासस्थान नरकाग्नीमध्ये आहे.'' बद्र अल-दिन अल्-आयनी, बुखारीचा ख्यातनाम भाष्यकार म्हणतो, की योद्धा जेव्हा झालेल्या जखमांतील रक्तस्त्रावामुळे प्राणोत्क्रमणाच्या क्षणी, पैगंबर मुहम्मद (स.) यांचा एक सोबती कतादा बिन नुमान याने त्याची वाहवा करीत त्याला हौतात्म्य मिळण्याची सुवार्ता सांगितली. यावर त्या मरणोन्मुख माणसाने लढण्यामागील त्याच्या मनातील उद्देश व्यक्त करताना सांगितले, ''ईशशपथ! मी इमानपोटी लढलो नाही. माझ्या कुटुंबाची व माझ्या कबिल्याची शान वाढविण्याचा उत्कट इच्छेनेच मी लढण्यासाठी उद्युक्त झालो.''



इब्ने हजर अल्-अस्कलानी यांनी या विशिष्ट आयतीचा आणि बुखारीच्या ग्रंथात ज्या प्रकरणात ती आयत आलेली आहे, त्याचा परस्परसंबंध विशद करताना खालीलप्रमाणे लक्षणीय निष्कर्ष काढला- हौतात्म्य कोणाला लाभले आणि कोणाला मिळाले नाही, हे ईशदिव्यबोधाखेरीज अन्य कोणत्याही प्रकारे खात्रीने सांगणे कठीण आहे. हीच गोष्ट माननीय उमर (रजि.) यांच्या भाषणाला लागू पडते. तेव्हा माननीय उमर (रजि.) म्हणाले, ''युद्धात जे मारले जातात, त्यांना तुम्ही हुतात्मे म्हणता? मी तुम्हाला सल्ला देतो की असे ठाम विधान कधीही करत जाऊ नका आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांनी म्हटले होते, ''जो कोणी आपला प्राण अल्लाहच्या मार्गात देतो अगर जो कोणी त्याचा काही अपराध नसताना ठार केला जातो, तो हुतात्मा ठरतो. ''यावर पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले, ''कैक लोकांना जखमा होऊन ते मरतात, परंतु ते हुतात्मे नसतात व त्यांचे बलिदान वाखाणण्यायोग्य नसते, या उलट कित्येक माणसांना बिछान्यात नैसर्गिकपणे मृत्यु येतो, परंतु जगाच्या स्वामीच्या दृष्टीत तो सत्य व न्यायाचा खंदा पुरस्कर्ता असतो आणि हुतात्मा ठरतो.'' पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या तोंडचे हे उद्गार स्पष्टपणे ही वास्तवता दर्शवितात. की अमुक एक माणूस हुतात्माच झाला, हे खात्रीने सांगणे कठीण आहे, म्हणून अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दिलेल्या शिकवणीनुसार आपण असे सर्वसाधारण विधान करावे, केवळ अल्लाहच जाणतो की कोण त्याच्याखातर लढत असतो आणि जखमी होतो. इमाम बुखारी यांनी कजमानच्या मृत्युसंबंधीची रिवायत (परंपरागत निवेदन) देताना, त्याला असे शीर्षक दिले होते आमुक माणूस हुतात्माच झाला, असे कोणाबद्दलही खात्रीने सांगू नये. कारण तो माणूस केवळ अल्लाहखातर लढला असे नव्हते, तर त्याला आपल्या कबिल्याबद्दल व त्याच्या वंशावळीबद्दल फाजील गर्व दुराभिमान होता.

इस्लाममध्ये जिहादच्यामागे अशी उदात्त भावना असते. भौतिक लाभापोटी केलेले ते सशस्त्र आक्रमणाचे कृत्य नसते. अगर राष्ट्राच्या वा कबिल्याच्या शक्तीचे ते स्वैर प्रदर्शन नसते. जगामध्ये मानवजातीच्या हितासाठी प्रत्येक मुस्लिमांवर नेमून दिलेले ते आद्य कर्तव्य आहे, जेणेकरून जगामध्ये न्याय व शांतता नांदावी. उदात्त उद्देश असणाऱ्या त्या युद्धालाच 'अल्लाहच्या मार्गात युद्ध करणे' असे नामकरण करण्यात आले आहे. पवित्र कुरआनमध्ये त्याचेच गुणगान करण्यात आले आहे.

ही गोष्ट मनोरंजक आहे की जगातील अन्य सर्व धर्मांनी, अशा पवित्र उद्दिष्टांसाठी केल्या जाणाऱ्या युद्धाला नुसती अनुमती दिली आहे, असे नव्हे, तर त्यांची तोंडभरून स्तुती करण्यात आली आहे. ख्रिश्चनांच्या शिकवणीत काही ज्ञानविषयक आहेत, जे प्रथमदर्शनी असे दर्शविते की युद्धात भाग घेणे, हे त्यांच्या नैतिक आदर्शांशी विसंगत

आहे, परंतु थोडासा अभ्यास करण्याची तसदी घेतल्यास असे सत्य असल्याची खात्री पटते की एखाद्या अयोग्य युद्धाचा धिक्कार करण्यासाठी खुद्द ख्रिश्चन चर्चसुद्धा पुढे सरसावत नाही. 'कौन्सिल ऑफ ऑल चर्च'च्या धर्माधिकाऱ्यांनी एका शास्त्र नियमांत, अशा लोकांवर ठपका ठेवला होता, ज्यांनी काही न्यायनिष्ठ अडचणीपोटी शांततेच्या काळात सैन्यातील सेवा सोडून दिली होती. मूर्तीपूजा संपुष्टात आणण्यासाठी पवित्र युद्धात तलवारी म्यानाबाहेर काढावेसे वाटले. अंब्रोझने दास्यत्व व मानखंडनेपेक्षा मृत्युला कवटाळणाऱ्या वीरश्रीचे व शौर्याचे गुणगान केले आहे आणि जुना करार योद्ध्यांना आपले आध्यात्मिक पूर्वज असे म्हटले आहे. जो माणूस आपल्या मित्राला घायाळ होण्यापासून वाचवित नाही, तो घायाळ करणाऱ्या गुन्हेगाराइतकाच दोषी असतो. ट्युटॉनिकाचे स्थलांतर व सम्राज्यावर आलेल्या संकटाच्या गडबडीत ऑगस्टीनला या प्रश्नाला तोंड देणे भाग पडले. त्याने त्या विषयाचे खोलवर संशोधन केले. त्याने काढलेले निष्कर्ष लक्षात घेण्यासारखे आहेत.

ख्रिश्चन तत्त्वानुसार काही वेळा युद्ध कायदेशीर असते आणि त्याची कारणे खालीलप्रमाणे असतात.

१) ईश्वराच्या नियुक्तनुसार आजवर अशी युद्धे केली गेली आहेत आणि गेली जाण्याचा संभव आहे.

२) एखाद्या राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर स्वैरपणे व निर्घृण हल्ला केला तर ते कृत्य खून आणि घरफोडी-सारखेच नसून तो अपराध त्या गुन्ह्यांच्या कायद्यानुसार कारवाईस पात्र आहे.

३) अभिषिक्त याहया यांनी सैनिकांना, सैनिकी सेवा सोडण्यास सांगितले नव्हते, तर केवळ कोणाचेही रक्त न सांडण्यास सांगितले आहे आणि मिळणाऱ्या पगारात संतुष्ट राहायला सांगितले. डोंगरावरील धर्मोपदेशाचा लक्ष्यार्थाचे संपूर्ण विवेचन मार्सेलिनसच्या लांबलचक व महत्त्वाच्या पत्रात केलेले आहे. मूर्तिपूजकांच्या आक्षेपावरून ते मागविले गेले की प्रतिकार न करण्याची धर्माज्ञा ही सार्वजनिक हिताच्या धोरणाविरूद्ध असून हे राष्ट्राला घातक आहे. थोबाडीत मारणाऱ्याच्या समोर दुसरा गाल द्यावा, हे वचन शब्दश: पाळणे शक्य नाही. त्याचा अर्थ असा की अंतर्मनाची मांडणी करून प्रसंगी एकसारखीच राखावी असा नियम त्यात सांगितलेला नाही. ही वास्तवता यावरून दिसून येते की खुद्द 'येशू'ने जुलूम दांडगाईतून स्वत:चे रक्षण केले होते. (जॉन १८-२३ सी.एफ. ए.सी. २३-३) दया व सौम्यतेचा भाव, आपण सतत अंत:करणात ठेवायला हवा आणि दुष्कृत्यांना उत्तर द्यायला सतत तयार असायला पाहिजे. परंतु अनेक अशी कृत्ये



करणे, आपणाला आवश्यक असते. ज्यात केवळ आपल्यात दयाळूपणाच्या कलाचा विचार करावा लागतो; इतकेच नाही, तर दुसऱ्यांच्याही खऱ्या हितसंबंधाचाही विचार करावा लागतो. त्यांच्या हितासाठी कधी कधी त्यांना अप्रिय वाटेल अशी वागणूक द्यावी लागते आणि दयाशील कठोरता दाखवावी लागते.

याच तऱ्हेने युद्धासंबंधी ख्रिश्चन धर्मतत्त्वांच्या दृष्टिकोनाचा खुलासा करताना थॉमस अकिनास लिहितो- येशू म्हणाला जो कोणी तलवार हाती घेतो, तो तलवारीनेच नाश पावतो. ''आम्ही दुष्टपणाचा प्रतिकार करीत नाही, या आज्ञेशी युद्धकर्म विसंगत आहे.'' (मॅथ्-५-३८) तसे करून आम्ही स्वत:वर सूड उगवू नये. परंतु आपल्यामध्ये सांत्वनीय भाव जोपासून आपण वरील आज्ञांची परिपूर्ती करू शकतो आणि दुष्टपणाला शिक्षा न होता मोकाट सोडून, खोडसाळपणा करण्यास मोकळीक देऊ शकत नाही. शांती करणाऱ्यांना जर आशिर्वाद दिला जातो, तर युद्धखोरांवर दोषारोप केले जातात. परंतु शांती प्रस्थापीत करण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी, युद्ध हेच सर्वोत्तम अथवा कदाचित एकमेव साधन ठरते. ल्यूथट म्हणतो की, या धर्माज्ञेने नैसर्गिक हक्क व कर्तव्ये गृहित धरलेली असून ख्रिश्चन सैनिकांचे समर्थन जोरदारपणे केले आहे. कॉल्विनचा युक्तिवाद असा आहे की युद्ध हे दुष्कर्मांचे पारिपत्य करणाऱ्या न्यायाचीच एक शाखा आहे आणि दृष्टीव्याचे निर्दालन करण्याची जबाबदारी ईश्वरानेच मानवी न्यायाधीशावर सोपविली आहे. पोलीस ज्याप्रमाणे गुन्हेगार लोकांपासून जनतेचे रक्षण करतात, तसेच नैतिक, समर्थन युद्धालाही असते.

कॅल्विनच्या शब्दात सांगायचे तर-दुष्टपणा करणारा एखादा राजा असो किंवा छोट्या प्रमाणात दुष्टपणा करणारा एखादा बदमाश असो, त्यांना एकाच मापाने मोजून दरोडेखोरीची शिक्षा व्हायला पाहिजे. त्यात खालील धर्माज्ञेचा कसलाही भंग होत नाही.

''तुम्ही कोणालाही ठार करू नये. अन्यायकारक युद्ध करणाऱ्यांना कापून काढणे म्हणजे त्यांना फासावर लटकवण्यासारखे आहे. ईश्वर त्याचा न्यायधीश आहे आणि सत्याच्या बाजूने लढणारे सैनिक ही ईश्वराची शस्त्रे आहेत. जर आक्षेप घेतला गेला की नवा करार ख्रिश्चनांना युद्ध करण्याची प्रत्यक्ष अनुमती देत नाही, तर नवा करार मुलकी व लोकव्यवहाराचे कायदे करण्याची जबाबदारी घेत नाही. नवा करार हा जुन्या कराराला गृहीत धरतो आणि जुन्या करारानुसार मोझेस (मूसा) व डेव्हिड (दाऊद) सारखे ईश्वराचे महापराक्रमी व शूर पुरूष ईश्वरी सेवेत होऊन गेले.

ख्रिश्चन धर्मतत्त्वावर लिखाण केलेल्या विख्यात लेखकांनी विशद केलेला दृष्टिकोन ही वास्तवता दर्शवितो की, ''युद्ध करणे, हे नेहमीच पापकृत्य असत नाही.'' हे मत ख्रिश्चन धर्मश्रद्धेच्या शांती-प्रेमाचा टोकाचा अर्थ लावणाऱ्यांच्या मतांच्या नेमके विरूद्ध

आहे. असे दृष्टिकोन ख्रिश्चन नीतिविषयक व्यवस्थेवर उथळपणे आधारलेला आहे, दुष्कर्माचे पारिपत्य करणारा न्यायसिद्धान्त म्हणजे दुष्कर्माचे पारिपत्य करून त्याला योग्य शिक्षा झाली पाहिजे, ख्रिश्चन विचारधारणेत तितकीच जागा तो व्यापतो, जितकी जागा प्रतिकार न करण्याचा सिद्धान्त व्यापत असतो.

युद्ध हे क्रोध आणि हिंसाचारी आक्रमकतेचा केवळ लहरी विस्फोट नसल्याने, काही उदात्त हेतू प्राप्त करण्याचे एक साधन असल्याने, इस्लामने ते पूर्णपणे माणसाळून सहृदय केले आहे. निर्घृण पशूतेमध्ये त्याचे रूपांतर होण्यास परवानगी नाही, तर मानवतावादी दृष्टिकोन दृष्टीपुढे ठेवून केला जाणारा तो एक उदात्त संघर्ष असायला हवा. त्याचे नेतृत्व जबाबदार आणि ईशभीरू माणसाच्या हातात पाहिजे आणि त्याचा उद्देश दुष्टपणाचे निर्मूलन करून भलेपणा, औदार्य आणि जनकल्याण याचे बिजारोपण व जोपासना हेच असले पाहिजे.

जगाच्या इतिहासावर ओझरता दृष्टीक्षेप टाकल्यास दिसून येईल, की नेमके याउलट युद्धांत, भूतकाळात आणि आजही, अत्यंत भयानक परिणाम घडविल्याची नोंद आहे. हल्ला केले गेलेले देश अगदी उद्‌ध्वस्त व बेचिराख केले गेले, काबीज केलेल्या शहरांची राखरांगोळी केली गेली आणि अत्याचारामधून वय अगर लिंग कशाचीच सुटका झाली नाही. युद्धाची अशीच परिणीती झाली आहे, अशीच पुढेही चालू आहे आणि हीच युद्धाची सर्वसाधारण पद्धत रूढ बनली आहे. प्रत्यक्षात ही पद्धत कल्पनेपेक्षा कमी प्रमाणात आचरली जाते, ती यासाठी की उद्‌ध्वस्त व निर्जन प्रदेशात लोकवस्ती असणाऱ्या प्रदेशात शोषणाला अधिक वाव असतो. इस्लाम हा जगातील महानतम धर्म असल्याने मानवी दृष्टिकोनाने युद्ध करण्यावर तो भर देतो आणि युद्धाचे असे नियम करतो, की ''युद्ध हे केवळ सामर्थ्याची मुसंडी राहत नाही, केवळ रक्तपाताचा असुरी आनंद त्यात असत नाही, सामूहिक दांडगाव्याचे ते कृत्य असत नाही, तर ती एक सुधारक कार्यपद्धती असते.''

''आणि तुम्ही अल्लाहच्या मार्गात त्या लोकांशी लढा जे तुमच्याशी लढतात परंतु अतिरेक करू नका. अल्लाहला अतिरेक करणारे आवडत नाहीत.''

(दिव्य कुरआन, २ : १९०)

प्रथम: शत्रूची दोन वर्गात विभागणी केली जाते. युद्धात प्रत्यक्ष लढणारे आणि प्रत्यक्ष युद्धात सहभागी न होणारे किंवा होऊ न शकणारे आणि युद्धाची क्षमता गमावलेले. उदाहरणार्थ-वृद्ध, बालके, महिला, अपंग, आंधळे, वेडे, वाटसरू आणि धर्मकार्यास वाहून घेतलेले लोक वगैरे, अशांना युद्धात ठार मराण्यास इस्लामने मनाई केली आहे.



पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्याबद्दल काही मर्यादा घालून दिलेल्या आहेत. त्यांचे उल्लंघन कधीही करता येत नाही.

''मृत्युच्या जवळ असलेल्या वृद्धांना, अर्भकांना व बालकांना, महिलांना कधीही ठार करू नका. लुटीच्या मालातून कशाचीही चोरी करू नका. रणभूमीवर जी वस्तू तुमच्या हाती येईल, ती सर्व एकत्र गोळा करा आणि सत्कर्म करा. सत्कर्म करणारावर अल्लाह प्रेम करतो.''

अब्दुल्लाह बिन उमर (रजि.) यांच्या आधाराने असे निवेदन केले जाते की एकदा पैगंबर मुहम्मद (स.) यांना एका महिलेचे प्रेत दिसले, जिला युद्धात ठार केले गेले होते. त्यांनी आपल्या सैनिकांना फार खडसावले आणि महिलांना व बालकांना ठार न करण्याची त्यांनी सक्त ताकीद दिली.

अशी नोंद केली गेली आहे की पैगंबर मुहम्मद (स.) यांना युद्धभूमीवर बरेच लोक कशाच्यातरी सभोवताली घोळका करून उभे असलेले दिसले. त्यांनी एक माणूस तिकडे पाठवून तिकडे काय आहे, याची चौकशी केली. त्याने परत येऊन पैगंबर मुहम्मद (स.) यांना सांगितले की युद्धात एक महिला मारली गेली आहे आणि लोक तिच्या सभोवती गोळा झाले आहेत. त्यावर पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले, ''त्या महिलेने प्रत्यक्ष युद्धात भाग घेतलेला नव्हता, मग तिला तलवारीचे लक्ष्य का बनविण्यात आले? लोंकानी सांगितले, ''खालिद बिन वलीद सैन्याच्या आघाडीवर होते.'' पैगंबर मुहम्मद (स.) यांनी खाालिद बिन वलीदकडे एक माणूस पाठवून आज्ञा दिली की ''अत:पर कोणीही महिलेवर व गुलामावर शस्त्र उचललेले जाऊ नये. शत्रू सैनिकांना जिवंत जाळू नये.'' अशी सक्त व कडक ताकीद त्यांनी आपल्या सैनिकांना दिली.

हमजा अल अस्लमी यांच्या आधाराने एक निवेदन प्रचलित आहे, की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांना एका सैन्य तुकडीचे प्रमूख म्हणून नेमले आणि सांगितले, ''अमुक अमुक नाकारणारे जर तुम्हाला आढळला तर त्याला ठार करा, परंतु त्याला जिवंत जाळू नका. कारण ज्याने अग्नि निर्माण केला आहे,त्यालाच त्याचा वापर करण्याचा अधिकार असून दुष्टांना शिक्षा देण्यासाठी तोच त्याचा वापर करील.''

समर बिन जुन्दुबचे कथन आहे की पैगंबर मुहम्मद (स.) त्यांना जीवदान देण्यासाठी प्रोत्साहन देत असत आणि मृतदेहाला छिन्नविछिन्न करण्यापासून परावृत्त करीत असत.

एकदा अबू अय्यूब अल अन्सारी (रजि.) यांना बातमी मिळाली की मुस्लिमांनी त्यांच्या तळावर चार कैद्यांची हातपाय बांधून हत्या केली. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या

त्या विश्वासातल्या सोबत्याने ही बातमी ऐकली. दु:ख व संतापाने ते म्हणाले, ''अशा तऱ्हेने शत्रूला ठार न करण्याची ताकीद पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडून मी ऐकली आहे. ज्याच्या हातात माझे प्राण आहेत, त्या अल्लाहची शपथ! अशा तऱ्हेने मी एखादी कोंबडीसुद्धा ठार मारणार नाही.''

संक्षिप्तपणे अशी पैगंबर मुहम्मद (स.) यांची शिकवण आहे. रणभूमीवर शत्रूशी कसे वागायेच, याबद्दल त्यात बोध आहे. इस्लाममध्ये मानवतेबद्दल इतका आदर आहे की हल्ला करताना अगर कब्जा केल्यानंतर शत्रूच्या उभ्या पिकांचा व त्यांच्या मालमत्तेचा स्वैरपणे विध्वंस न करण्याची सक्त ताकीद दिली गेली आहे. खोडसाळपणाची व दुष्टपणाची लक्षणे सांगताना, पवित्र कुरआन स्पष्टपणे फर्मावितो,

''जेव्हा त्याला सत्ता प्राप्त होते, तेव्हा पृथ्वीतलावर त्याची सारी धावपळ केवळ याचकरिता असते की उपद्रव माजवावे, शेतीचा विध्वंस करावा व मानवजात नष्ट करावी - वास्तविक पाहता अल्लाह (ज्याला तो साक्षी ठरवीत होता) त्याला उपद्रव मुळीच आवडत नाही.'' (दिव्य कुरआन, २ : २०५)

युद्धातून सर्व हीन व दुष्ट भावना इतक्या काढून टाकल्या आहेत की रणभूमीवर शक्य तितका गोंगाट-गलबला कमी करण्याचा मुस्लिमांना आदेश दिला गेला आहे, केवळ ईशस्तोत्रे म्हणून विश्वनिर्मात्या अल्लाहचे स्तवन करण्याची अनुमती आहे. कैस बीन अब्दच्या आधाराने असे एक निवेदन आहे की पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सोबत्यांना रणांगणावर मोठ्याने बोलणेही पसंत नव्हते.

हीच मनाई त्या प्रसंगाचे गांभिर्य दर्शविण्यास पुरेशी बोलकी आहे. इस्लाममध्ये युद्ध म्हणजे माणसातील हीन व दुष्ट प्रवृत्तीचे प्रदर्शन नव्हे, ते ठराविक उच्च हेतूसाठी हाती घेतलेला तो एक उदात्त संघर्ष असतो.

पहिल्या चार आदर्श व सन्मार्गी खलिफांनी अल्लाहची व त्याच्या पैगंबराची शिकवण तंतोतंतपणे प्रत्यक्ष आचरणात आणली. त्यांना पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दाखवून दिलेल्या मार्गावरून ते तसूभरही ढळले नाहीत. आपल्या सैन्याला मोहिमेवर जाताना पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जो समारंभपूर्वक निरोप देऊन त्यांना उपदेश सीरियाच्या सरहद्दीवर दिला, तो विचार करण्यासारखा आहे. पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले, ''विश्वासघात कधीही करू नका, सत्यमार्गावरून ढळू नका. प्रेतांचे हातपाय तोडू नका. तसेच बालकांना, वृद्धांना व महिलांना ठार करू नका. खजुरीचे झाड तोडू नका ते पेटवू नका. कोणतेही फळझाड तोडू नका, तुमच्या उदरनिर्वाहाखेरीज कळपातील शेळ्यांमेंढ्यांची व उंटांची हत्या करू नका, मठसेवेला पूर्णत: वाहून घेतलेली माणसे



तुम्हाला आढळतील त्यांना त्यांच्या मठसेवेत सोडून द्या. त्याचप्रमाने तुम्हाला विविध प्रकारचे भोजन देऊ करणारी माणसे भेटतील ते तुम्ही खावे, परंतु सुरवातीस अल्लाहच्या नावाचा उच्चार करण्यास कधीही विसरू नका.''

असे सांगितले जाते की एकदा एका प्रदेशावर विजय मिळविताना एक गायिका युवती पकडली गेली आणि तिला अल-मुहाजिर बिन अबी उम्मैय्याकडे आणले गेले, ती जाहीरपणे कविता करून माननीय अबू बकर (रजि.) यांची टर उडवीत असे. मुहाजिरने तिचा हात छाटायला लावला. खलिफाला जेव्हा ती बातमी समजली, तेव्हा त्यांना मोठा धक्का बसला आणि त्यांनी खालीलप्रमाणे एक पत्र मुहाजिरला लिहिले- ''माझ्यावर जाहीरपणे शिव्यांचा वर्षाव करणाऱ्या एका युवतीवर तुम्ही हात टाकल्याचे मला कळले आहे. तिचा हात तुम्ही छाटायला लावला. हात छाटणे हा मोठा अपराध असून, असा सूड बहुदेववाद्यांशीही घेण्यासाठी अल्लाहने परवानगी दिलेली नाही. यापुढे इतराशी वागताना तुमची प्रवृत्ती विचारशील, समंजस व कृपाशील ठेवा. कधीही हात पाय छाटू नका. कारण तो फार मोठा गंभीर अपराध ठरतो. बेदरकारपणा व अतिरेकी क्रोध यांपासून इस्लाम व मुस्लिमांचे शुद्धीकरण अल्लाहने केलेले आहे. अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर स्वैरपणे अपशब्दांचा वर्षाव अनेक लोक करीत, त्यांनी त्यांच्या निवासस्थानातून हुसकून त्यांना घालवून दिले, त्यांच्याविरूद्ध हिरिरीने ते लढले होते, परंतु पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांचे हातपाय छाटण्याची कधीही परवानगी दिली नाही; ही गोष्ट तुम्हाला चांगली ठाऊक आहे.''

असेच एक पत्र दुसरे खलीफा माननीय उमर (रजि.) यांनी साद बिन अबी वक्कास यांना लिहिले होते. तेही मुस्लिमांना हातात शस्त्र घेण्यास सांगताना किती उदात्त भावना मनात धरायला सांगितल्या, हे पूर्णपणे दर्शविते-तुमच्या मनाचा आणि अंत:करणाचा सतत शोध घेत राहा आणि अल्लाहच्या मार्गात परिपूर्ण निष्ठेची व प्रामाणिकपणाची गरज असते, ही गोष्ट तुमच्या माणसांच्या मनांवर सतत बिंबवत राहा. त्यांच्यासमोर प्राणांचे बलिदान करताना कसल्याही भौतिक लाभाचे उद्दिष्ट असता कामा नये, तर त्यांच्या स्वामीला प्रसन्न करण्याचे व त्याची कृपा प्राप्त करण्याचे ते एक साधन आहे, असे त्यांना समजावे. अशा प्रकारचा नि:स्वार्थी भाव दुर्दैवाने ज्यांच्या अंत:करणात नाही, त्यांच्यात तो रूजवावा. युद्धाच्या ऐन धुमश्चक्रीत भक्कमपणे उभे राहा, कारण अल्लाहच्या मार्गात प्रयत्नांची जितकी चिकाटी एखादा माणूस दर्शवितो तितक्याच प्रमाणात अल्लाहची कुमक व साहाय्य त्याला मिळते. अल्लाहच्या खातर जितकी त्यागाची भावना तो दर्शवील तितक्याच प्रमाणात त्याला इनामही दिले जाईल. जे लोक तुमच्या देखरेखीखाली दिले आहेत, त्यांना तुमच्याकडून कसलीही इजा अगर त्रास होणार नाही याची काळजी घ्या

आणि त्यांच्या न्याय हक्कापासून त्यांना वंचित केले जाणार नाही याची दक्षता घ्या.''

समरभूमीत जेव्हा भावना उद्दीपित होऊन मोकाट झालेल्या असतात, तेथे इस्लाम आपल्या अनुयायांना मानवतावादी आणि उदात्त प्रवृत्ती धारण करण्याचा आग्रह करतो अशी वास्तवता आहे. ही एक अशी प्रवृत्ती आहे जी जगातील कोणत्याही देशाच्या इतिहासात आढळून येत नाही. यापेक्षा अधिक उदात्त व अनुकंपाशील युद्ध-नीती जगातील कोणत्या देशापाशी आहे?

एक ख्रिश्चन इतिहासकार लिहितो,- ''सीरियन सैन्याला सूचना देताना खलीफा माननीय अबू बकर (रजि.) यांनी जो नैतिक सूर लावला होता, तो रोमन शासनाच्या तत्त्वाच्या उलट होता. जनतेचे परिपूर्ण लक्ष त्याने प्रभावित करून आकर्षिले होते. ज्यू आणि ख्रिश्चनांबद्दल जी न्यायाची भावना आणि सहिष्णूतेची तत्त्वे जाहीर केली होती, तशी रोमन सम्राटांनी अगर धर्मभोळ्या व श्रद्धाळू बिशपनीसुद्धा आचारसंहिता म्हणून कधी अंगीकारली नाही.''

पाश्चिमात्य विद्वानांनी इस्लाममधील तलवारीच्या वापराच्या प्रश्नावर खूपशी चिखलफेक केलेली आहे. पण एखाद्याने शांतपणे जर या गोष्टींवर चिंतन केले तर मुस्लिमांनी तलवारीचा वापर स्वैरपणे कधीही केला नाही, अशी त्याची खात्री हाईल. विशाल मानवतावादी दृष्टिकोन नजरेसमोर ठेवून माणुसकीनेच त्यांनी आपली तलवार परजली. मानवी प्राणाबद्दल, अब्रू व मालमत्तेबद्दल, रणभूमीवरही जास्तीतजास्त आदर बाळगला गेला. म्हणूनच पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हयातीत मुस्लिम आणि मुस्लिमेतरांत झालेल्या ८२ सशस्त्र संग्रामात दोन्ही बाजूचे मिळून केवळ १०१८ माणसे युद्धात मारली गेली. त्यापैकी मुस्लिमांची २५९ होती आणि उरलेले ७५९ सैनिक शत्रूतळावरचे होते. चार्ल्स दि ग्रेटच्या धर्मयुद्धात ४५०० ख्रिश्चनेतर सॅक्सन लोकांचे थंड डोक्याने हत्याकांड करण्यात आले, अल्बिकनियन युद्धात पोपच्या प्रतिनिधींनी 'सुप्रसिद्ध उत्तर' म्हणून केलेल्या कारवाईत शंकेखोरांचा आवाज त्यांनी ठार करून बंद केला. त्यावेळी त्यांचे घोषवाक्य होते- ''सर्वांना ठार करा, ईश्वराला सर्व आपोआप कळेल.'' सेंट बार्थोलोम्यू येथे केलेला नरसंहार आणि मॅग्डेबर्ग टिलीच्या पाडावाच्या वेळी केलेले हत्याकांड, त्यांच्याशी तुलना करता वरील लेखकांच्या धारिष्ट्याचा अचंबा वाटतो.

ज्यांचे स्वत:चे हात अगणित निष्पाप माणसांच्या रक्ताने बरबटलेले आहेत; ज्यांच्यापाशी नरसंहाराचे अत्यंत आधुनिक व प्रगत तंत्रज्ञान आहे, ज्यांनी युद्धाचे स्वरूप इतके विस्तृत केले, की लाखो पुरूष आणि महिलांना ठार करण्यात आले. बेसुमार माणसांना कैद्यांच्या छावणीत डांबून त्यांना पोलादी सळ्यांनी मारझोड करण्यात आली आणि कातडी चाबकांच्या वादीने त्यांना फाडून काढण्यात जे अग्रेसर होते व त्यांच्या



सद्‌सद्‌विवेकबुद्धीला जराही ताण पडला नाही; अशा लोकांच्या तोंडी मुस्लिमांवर केलेली निष्ठूर टीका ही आमच्या अचंब्याचा विषय आहे. आधुनिक सुसंस्कृत प्रगत मानवाने केलेल्या भयंकर महायुद्धात १ कोटी सैनिक व तितकीच असैनिक माणसे ठार झाली, असा अंदाज केला जातो. युद्धाच्या परिणामस्वरूप झालेल्या प्रदूषणामुळे उद्‌भवलेल्या रोगांच्या साथीत आणि भीषण दुष्काळामुळे जगभर दोन कोटी माणसे मरण पावली. युद्धाचा आर्थिक बोजा ३३८०० कोटी डॉलर्स इतका असून युद्धाचा प्रत्यक्ष खर्च १८६०० कोटी डॉलर्स इतका झाला.

दुसऱ्या महायुद्धात झालेल्या हानीचे प्रमाण पहिल्या महायुद्धाच्या हानीपेक्षा कितीतरी पटीने अधिक होते. २ कोटी २० लाख माणसे ठार झाली आणि ३ कोटी ४० लाख माणसे जायबंदी व अपंग बनली. युद्धाचा एकूण खर्च १ लाख ३४ हजार ८०० कोटी डॉलर्स इतका आला असून प्रत्यक्ष सैनिकी खर्च १लाख १६हजार ७००कोटी डॉलर्स इतका झाला.

कोरियन युद्धामध्ये आंतरराष्ट्रीय महासंघाने शांती प्रस्थापित करण्यासाठी पहिल्यांदाच बळाचा वापर केला. सैनिकी बळ वापरून आक्रमण थोपविण्याचा प्रयत्न केला. त्या रणधुमाळीत १० लाख सैनिक मृत्युमुखी पडले. कोरियात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांचा त्यात समावेश केल्यास एकून ठार झालेल्यांची संख्या ५० लाखावर गेली.

**प्रकरण ७**

# पैगंबर मुहम्मद (स.) युद्धभूमीवर

पैगंबर मुहम्मद (स.) त्यांच्या निष्ठावान सोबत्यांसह निसटून गेल्याचे पाहून कुरैशचे लोक हबकून गेले.मदीना येथे त्यांची वाढत असलेली सत्ता व शक्ती, याबद्दल त्यांना द्वेष वाटू लागला. मक्केत मागे राहिलेल्या मुस्लिमांवर त्यांनी करडी नजर ठेवली. (त्यात अधिकांश महिला व अगतिक गुलामांचा भरणा होता.) शक्य त्या सर्व मार्गांनी ते त्यांची छळणूक करीत राहिले. इतके सर्व होऊनही मदीनेवर प्रचंड हल्ला करण्यासाठी त्यांनी सर्वंकष तयारी सुरू केली. त्यांना असा विश्वास होता की, तसा हल्ला करून ते मदीनेतील पूर्ण न वाढलेली इस्लामी सत्ता संपवून टाकतील. परंतु हा निर्णायक लढा प्रत्यक्ष सुरू करण्याआधी मदीनेच्या सभोवताली वसणाऱ्या मुस्लिमेतर टोळ्यांचा पाठिंबा व सहानुभूती मिळविण्याची त्यांना चिंता होती. हे उद्दिष्ट त्यांनी विविध प्रकारे साध्य केले. त्यापैकी एक प्रमुख मार्ग म्हणजे आपल्या बळाचे प्रदर्शन करून मुस्लिमांच्या बळाच्या तुलनेत आपली शक्ती किती अतुल्य व अजिंक्य आहे, हे त्यांच्या मनांत बिंबवणे हा होता. त्यांना असे वाटले की तांबड्या समुद्राच्या किनाऱ्याने त्यांचे अवाढव्य तांडे अविरोधपणे सीरियाकडे जाताना पाहून, त्यांच्या बळाचा तो पुरेसा पुरावा ठरेल. तेथे वसणाऱ्या टोळ्या ते प्रचंड तांडे पाहून भयभीत होतील आणि त्यांचा पाठिंबा मिळविण्यापासून मुस्लिमांना वंचित ठेवतील.

या डावपेचाच्या पाठपुराव्यांसाठी मक्केतील लोकांचे तांड्यामागून तांडे सीरियाकडे गेले. या तांड्यामध्ये त्यांचे काही कावेबाज हस्तक होते. त्यांनी मदीनेतील लोकांमध्ये असंतोषाची, फुटीरतेची व उठाव करण्याची बिजे पेरली आणि इस्लामचे अस्तित्वच पुसून टाकण्यासाठी सहानुभूती मिळालेल्यांच्या यादीत त्यांचा समावेश करण्याचा प्रयत्न केला.

या सर्व घडामोडींची व डावपेचांची जाण पैगंबर मुहम्मद (स.) यांना होती. म्हणून त्यांनी लहान गट तिकडे धाडले ज्यायोगे मुस्लिमांच्या प्रचंड उपस्थितीची जाण मक्कावासियांना व्हावी आणि जर त्यांनी हल्ला केल्यास त्यांना डोकेदुखी ठरेल इतके बळ मुस्लिमांत आहे, हे त्यांना कळून यावे. अशा कृतीने त्यांच्या शिडातील वारे निघून जाईल, असा पैगंबर मुहम्मद (स.) यांना ठाम विश्वास होता.

आदरणीय मुहम्मद (स.) यांना अशी बातमी मिळाली की अबू सुफयान यांच्या नेतृत्वाखाली त्यांचा एक तांडा अगदी मदीनेजवळून चालला होता. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी एक समूह बाहेर काढला व स्वत:त्याचे नेतृत्व करीत त्या तांड्याला अटकाव



करण्यासाठी निघाले, जेणेकरून अरब लोकांच्या उत्सुक नजरेसमोरच मक्कावासियांच्या तथाकथित वर्चस्वाचा व प्राबल्याचा फुगा फुटावा. मुस्लिमांच्या इराद्याची बातमी अबू सुफयानला कळली आणि मुख्य रस्ता सोडून त्याने आपल्या तांड्याचा मार्ग तांबड्या समुद्राच्या दिशेने वळविला. असा बदल केल्याने तो मदीनावासियांच्या अचानक हल्ल्यापासून वाचेल आणि त्याला गाठण्याआधी तो निसटून जाईल, असे त्याला वाटले. सुरक्षिततेचा एक भाग त्याने एक माणूस मक्केकडे पाठवून निरोप दिला की पैगंबर मुहम्मद (स.) जातीने लोकांना घेऊन त्यांचा तांडा कैद करण्यास निघाले.

निरोप घेऊन जाणारा भरधाव दौड करीत निघाला. मनातल्या मनात अबू सुफयानच्या संदेशाला अतिशयोक्त रीतीने सांगण्याची तो जुळणी करू लागला. मक्केला तो पोहोचला, तेव्हा त्याला एक प्रकारचा उन्माद चढला होता. उंटावरून त्याने स्वत:ला जमिनीवर झोकून दिले व नाटकीपणाने तो काबागृहासमोर उभा राहिला. त्याचे खोगीर उंटाच्या कानातून व नाकपुडीतून उलटे लटकू लागले. त्याने स्वत:च्या अंगावरील सदरा पुढून व मागून फाडला आणि तो ओरडू लागला- ''हे कुरैश जनहो! तुमचा माल! तो अबू सुफयानपाशी आहे, तुमच्या तांड्याला पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडून व त्याच्या साथीदाराकडून अटकाव केला जात आहे. त्यांचे काय झाले असेल, हे मी सांगू शकत नाही. मदत! मदत!''

या आरडाओरड्याचा चटकन परिणाम झाला. काही क्षणातच बेभान झालेला एक हजार सैनिकांचा जमाव, बरोबर ७ हजार उंट व घोडे घेऊन आला आणि सैन्यामध्ये आमचाही समावेश करा म्हणून ओरडू लागला. हे सैन्य तांड्यातील प्रत्येक माणसाची केली गेलेल्या तथाकथित हत्येचा बदला घेण्यासाठी निघाले होते. माल लुटीचा प्रश्न बाजुलाच राहिला. या सैन्याचे अधिपत्य अबू जहलकडे होते.

## मदीनातील सल्ला-मसलत

मक्कावासियांच्या हल्ल्याच्या इराद्याची बातमी वाळवंटी प्रदेशातून रहस्यमय रीतीने अत्यंत वेगाने पसरली. पैगंबर मुहम्मद (स.) यांना कळले की तांडा तर निसटला पण अबू जहल फार मोठे सैन्य घेऊन मदीनेवर चाल करून येत आहे. त्यांनी आपल्या माणसांना परिस्थितीच्या गांभिर्याची जाणीव करून दिली आणि त्यांचा सल्ला विचारला. त्याप्रसंगी माननीय अबू बकर (रजि.) सर्वप्रथम बोलले आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या नेतृत्वाला आपला पूर्ण पाठिंबा असल्याचे सांगितले. त्यांचे आज्ञापालन कसल्याही परिस्थितीत करण्याचा आपला निर्धार व्यक्त केला. त्यानंतर माननीय उमर (रजि.) उभे राहिले आणि त्यांच्या आदरणीय सोबत्यांनी व्यक्त केलेल्या विचाराला आपला संपूर्ण

पाठिंबा व्यक्त केला. नंतर अल-मिकदाद उभे राहिले व म्हणाले, ''हे अल्लाहचे पैगंबरा! अल्लाह जिकडे जाण्याचा संकेत तुम्हाला देत आहे, तिकडे तुम्ही निघा, आम्ही तुमच्याबरोबर आहोत. इस्राईलच्या संततीने मूसा (अ.) यांना संकेत दिला, ''तुम्ही आणि तुमचा स्वामी जा व शत्रूशी लढा. पण असे आम्ही करणार नाही. आम्हीही तुम्हास तुम्हासह लढू अल्लाहची शपथ! तुम्ही तर आम्हाला बर्क अल-गिमादकडे नेले, तरी आम्ही त्याच्या रक्षकाशी निश्चयाने लढू आणि ते मिळवीपर्यंत लढू.'' पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्याचे आभार मानले व आशीर्वाद दिला.

नंतर ते म्हणाले, ''माझ्या मणसांनो! मला सल्ला द्या.'' अन्सारला उद्देशून ते बोलत होते. यावर साद बिन मुआज उठून उभे राहिले आणि म्हणाले, ''हे अल्लाहचे पैगंबरा! तुम्हावर आमचा संपूर्ण विश्वास आहे आणि तुम्ही केलेल्या कृपादानाला मी साक्ष आहे आणि आम्ही एकमुखाने अशी घोषणा करतो की तुम्ही आम्हापर्यंत जे काही आणले आहे, ते सत्य आहे. आम्ही कसलाही त्याग व बलिदान करण्याची घोर प्रतिज्ञा करतो. हे अल्लाहचे पैगंबरा! तुम्ही मदीनेतून निराळ्या उद्देशाने बाहेर पडला; परंतु अल्लाहचा मानस काही वेगळाच होता. तुम्हाला पसंत नसलेल्यांशी संबंध तोडून टाका. तुम्हाला पसंत असलेल्या लोकांशी सलोखा व शांतता राखा व जे तुम्हाला शत्रुवत वाटतात, त्यांच्याशी युद्ध करा. कोणत्याही परिस्थितीत आम्ही तुमच्याबरोबर आहोत. आमच्या मालमत्तेतून जे काही तुम्हाला आवश्यक आहे, ते घेण्याचा तुम्हाला संपूर्ण अधिकार आहे. जितके काही घ्यायचे तितके घ्या व तुमची इच्छा असेल तितकेच आम्हाला ठेवा. आम्हाला सोडलेल्या मालमत्तेपेक्षा तुम्ही स्वीकारलेली मालमत्ता आम्हाला मोलाची वाटेल. तुम्ही जी आज्ञा द्याल, त्याचे काटेकोर पालन आम्ही स्वखुषीने व आनंदाने करू तुम्ही जर 'बर्क अल-गिमाद'ला जाण्याची आज्ञा दिली, तर आम्ही तेथेही जाऊ आणि ज्याने सत्यानिशी तुम्हाला पाठविले, त्या अल्लाहची शपथ! आम्ही कसलाही संकोच न करता बिनदिक्कत समुद्रात उड्या घेऊ आणि एकही मागे राहणार नाही. शत्रूशी झुंजण्याचा कल्पनेबद्दल आमची किंचितही कुरकुर नाही. आम्हाला युद्धाचा अनुभव चांगला असून आम्ही विश्वासू लढवय्ये आहोत. आमच्या हातून पराक्रमाची अशी कृत्ये अल्लाह तुम्हाला दाखवून देईल जी पाहून तुमचे नेत्र सुखावतील. अल्लाहच्या नावाने तुम्ही रणभूमीवर आम्हाला घेऊन चला.''

सोबत्यांनी अशा नाजूक प्रसंगी दाखविलेली अढळ निष्ठा असीम बलिदानाची भावना पाहून पैगंबर मुहम्मद (स.) अत्यंत प्रभावित झाले. म्हणून मक्कावासियांना प्रतिकार करण्याचे त्यांनी ठरविले. शस्त्रे व सामुग्रीची कमतरता असल्याने अपुऱ्या सज्जतेनिशी, गडबडीने भरती केलेला एक छोटासा जमाव, अल्लाहवर सारी भिस्त



टाकून कुरैशांचा हल्ला थोपविण्यासाठी मक्केच्या वाटेने चालू लागला. युद्धाच्या झळा त्यांच्या घरापर्यंत मदीनेत येऊ देणे, हिताचे नव्हते. बदर या ठिकाणी दोन्ही सैन्य समोरासमोर आले.

संख्याबळाच्या दृष्टीने मुस्लिमांचे सैन्य शत्रूच्या तोडीचे नव्हते. परंतु अल्लाहच्या सहाय्यावर व सामर्थ्यावर त्यांचा विश्वास होता. त्याप्रसंगी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी घेता येईल तितकी सर्व काळजी व दक्षता घेतली. उदाहरणार्थ- पिण्याच्या गोड्या पाण्याच्या पुरवठ्याची सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली व पाण्याचा पुरवठा निश्चिंत करून टाकला, तसेच सकाळच्या वेळी ऊन तोंडावर न येईल अशा दिशेने सैन्याचा तळ टाकला, परंतु जगरहाटीची ही सर्व पावले त्यांच्या दृष्टीने अगदी क्षुल्लक होती. त्यांच्या निर्मात्या कृपानिधीवर त्यांच्या सर्व आशा केंद्रभूत झाल्या होत्या आणि तारणकर्ता व बंदोबस्त करणारा म्हणून त्याच्यावर त्यांची दृष्टी खिळून राहिली होती. म्हणून तेथील एका झोपडीत ते आले, जी त्यांच्या विश्रामासाठी उभारण्यात आली होती. तेथे डोळे पाण्याने डबडबलेल्या अवस्थेत ते अल्लाहची करूणा भाकीत याचना करू लागले- ''हे अल्लाह! अहंकाराने व गर्वाने फुगलेले कुरैशचे लोक समोर आले आहेत. तुझ्याशी ते झगडा करतात व तुझे पैगंबर मुहम्मद (स.) यांना ते खोटारडा म्हणत आहेत. हे अल्लाह! साहाय्याचे जे वचन तू मला दिले होते, ते साहाय्य प्रदान कर.''

युद्ध सुरू होण्यापूर्वीची संपूर्ण रात्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी प्रार्थना व आराधना करण्यात घालवली. दीर्घ प्रवासाचा शिणवटा आलेले थकून गेलेले मुस्लिम सैनिकांना गाढ झोप लागली. गाढ व शांत झोप लागणे, ही एक ईशकृपा सैनिकांच्या अविचलित मन:स्थितीचे द्योतक आहे.

सकाळच्या वेळी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्या लोकांना बोलाविले. प्रार्थना (नमाज) करायला सांगितले. नंतर अल्लाहच्या मार्गात शत्रूशी लढण्यावर भर देऊन सांगितले.

सूर्य जेव्हा वर आला, तेव्हा हातात धरलेल्या बाणाच्या टोकाने रेषा दाखवीत पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सैन्याच्या एक तुकडीची आखणी केली.

## बदरचे युद्ध

त्या काळातील युद्धाची पद्धत अशी होती की एक एक पराक्रमी योद्धा आपल्या रांगेतून पुढे येई, शत्रूचा अवमान करी, आपल्या नेत्यांनी संपादलेल्या यशोगाथेचे गुणगान करी आणि शेवटी शत्रूपैकी कोणीतरी पुढे येऊन लढण्याची ललकारी देत असे. लढाईचा दुसरा टप्पाही दोघादोघांच्या द्वंद्वाचा असे. लढाईचा तिसऱ्या टप्प्यात संमिश्रपणे लढाई होई. प्रत्येक सैनिक शत्रूपक्षाच्या प्रत्येक सैनिकाशी पाळीपाळीने लढे. बदरच्या लढाईतही ती सर्वमान्य पद्धत अवलंबण्यात आली होती.

कुरैशांच्या बाजुने तिघेजन पुढे आले. संरक्षणासाठी अंगात चिलखत घातलेला, एका हातात ढाल व दुसऱ्या हातात जंबिया घेतलेला उतबा बिन रबीआ, रांगेतून पुढे आला. त्याच्या एका बाजुला त्याचा भाऊ शैबा आणि दुसऱ्या बाजुला त्याचा मुलगा वलिद होता. त्यांनी पुढे येऊन मुस्लिमांवर अपमानकारक शब्दांची फेक केली.

अन्सारच्या बाजूने हारीस व अब्दुल्लाह बिन रवाहाचा मुलगा औफ आणि मुआविया, असे तीन युवक रांगेतून पुढे आले. परंतु मक्कावासियांनी त्यांना ओरडून सांगितले की, त्यांच्याशी त्यांना काहीही कर्तव्य नाही. त्यांना हवे होते, स्वधर्माचा त्याग करून व मक्का सोडून, शत्रूपक्षाला जाऊन मिळालेल्या चुलत भावांची मुंडकी. त्यांना साहस करण्याचे व समोर येण्याचे आव्हान ते सतत देत होते. त्यावर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी माननीय उबैद बिन हारीस (रजि.), पैगंबर मुहम्मद (स.) यांचे चुलते माननीय हमजा (रजि.) आणि चुलतबंधू माननीय अली (रजि.) यांना लढण्यासाठी सामोरे जाण्यास सांगितले. ती तिन्ही द्वंद्वे अतिशय वेगाने झाली. माननीय हमजा (रजि.) यांनी शैबाला ठार केले आणि माननीय अली (रजि.) यांनी वलिदला गारद केले. माननीय उबैद (रजि.) गंभीरपणे जखमी झाले होते, परंतु ते खाली कोसळण्यापूर्वीच, माननीय हमजा (रजि.) व माननीय अली (रजि.) यांच्या मदतीला धावून गेले. माननीय हमजा (रजि.) यांनी उतबावर झेप घेऊन तलवारीच्या एका फटक्यासरशी त्याचे शीर धडावेगळे केले. नंतरच्या काही क्षणताच मक्केच्या तीन नावाजलेल्या योद्ध्यांना कंठस्नान घालण्यात आले. मुस्लिम योद्ध्याला उचलून नेले व पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या समोर ठेवले. त्यांचा एक पाय कापला गेला होता आणि हाडातील मेद बाहेर ठिबकत होता. प्राणांतिक वेदना होण्याच्या अवस्थेत ते पैगंबर मुहम्मद (स.) यांना म्हणाले, ''मी शहीद झालो नाही काय? हे अल्लाहच्या पैगंबरा!'' पैगंबर मुहम्मद (स.) उत्तरले, ''खचितच तुम्ही शहीद झाला आहात.'' त्यावर माननीय उबैद (रजि.) म्हणाले, ''आज जर अबू तालिब हयात असते, तर त्यांचे शब्द- 'आम्ही पैगंबर मुहम्मद (स.) यांना शत्रूच्या हवाली करू देणार नाही, जोपर्यंत त्यांच्या सभोवताली आमच्या प्रेतांचा वेढा पडत नाही आणि आमची



बायका-मुले आम्हाला विसरून जात नाहीत.' खऱ्या अर्थाने मला लागू पडतात.'' त्यांनी खालील काही ओळीही म्हटल्या- ''त्यांनी माझा पाय छाटून टाकला असला तरी मला त्याची पर्वा नाही. मी मुस्लिम असून अल्लाहच्या कृपेने अधिक चांगले पारलौकिक जीवन मिळण्याची मला आशा आहे आणि तसे जीवन प्राप्त होण्याची मी आशा का करू नये? मला तसे करण्यास सबळ कारण आहे, की अल्लाहनेच स्वत:च्या अमर्याद कृपावर्षावाने मला इस्लामच्या छत्रछायेखाली आच्छादून घेतले आहे.''

या द्वंद्वानंतर आणखी काही द्वंद्वे झाली, परंतु मक्कावासियांना दारूण पराभव पत्करावा लागला आणि त्याच्या काही नामांकित योद्ध्यांना मौलिक प्राणास मुकावे लागले.

युद्धाच्या तिसऱ्या टप्प्याची सुरवात अरबांच्या विशिष्ट पद्धतीने झाली. दोन्ही सैन्ये एकमेकांसमोर अगदी जवळ आली. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी इशारा देण्यापूर्वी कोणीही हल्ला करायचा नाही अशी आज्ञा त्यांनी देऊन ठेवली आणि शत्रुंनी जर त्यांना वेढण्याचा प्रयत्न केला, तर त्यांच्यावर बाणांचा वर्षाव करून त्यांना दूर ठेवायचे अशी आज्ञा दिली.

कुरैशचे सैन्य मुस्लिमांवर तुटून पडले. परंतु मुस्लिमांनी आपले पाय भक्कमपणे रोवून, अल्लाहच्या साहाय्याने तो हल्ला परतवून लावला. दोन्ही बाजूने शौर्याची व पराक्रमाची पराकाष्ठा दाखविण्यात आली, परंतु अढळ इमानच्या बळाने मुस्लिमांचे सैन्य पुढे सरकू लागले व अशा श्रद्धेचा अत्यंत अभाव असलेले विमनस्क अवस्थेतील मक्केचे योद्धे मागे हटू लागले, या लढ्यात, इस्लामचा एक नंबर शत्रू अबू जहल, अन्सारच्या दोन नवयुकांच्या हातून मारला गेला.

या युद्धाची तारीख हिजरी सनाच्या वर्षी रमजान महिन्याची १७ तारीख अशी नोंद आहे.

या लढाईत खुद्द पैगंबर मुहम्मद (स.) यांनी केलेली भूमिका अत्यंत महत्त्वाची व उल्लेखनीय आहे. ते सैन्याचे नेतृत्व करीत होते, सैनिकांना गाढ विश्वासाची सतत प्रेरणा देत होते आणि अल्लाहच्या मार्गात जिगरीने मर्दासारखे लढण्यास त्यांना उद्युक्त करीत होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सैनिकांमध्ये चेतना देऊन जो उत्साह निर्माण केला होता, त्याबद्दल एक उदाहरण अत्यंत बोलके आहे. सोळा वर्षे वयाचे माननीय उमैर (रजि.) हा नवयुवक खजूर खात उभा होता, ''हा खजूर मला स्वर्गप्राप्तीत खोळंबा करीत आहे.'' असे पुटपुटत त्याने तो खजूर भिरकावून दिला आणि तीरासारखा तो शत्रूसैन्यामध्ये घुसला. पराक्रमाची शर्थ करीत अनेकांना लोळवून तो धारातीर्थी पडला.

मुस्लिमांचे नेते म्हणून आणि शूर व दूरदर्शी सेनापती म्हणून पैगंबर मुहम्मद (स.) यांचे कार्य नि:संशय महत्त्वाचे होते, परंतु त्यापेक्षा कितीतरी पटीने महत्त्वाचे कार्य

होते ते ईशसंदेश आणणारा म्हणून! येथे लोकांची मने निसर्गाच्या सातत्याकडे आणि चमत्कारांच्या स्वरूपातील अल्लाहच्या निशाण्यांकडे आकृष्ट करण्याची उत्तम संधी असल्याचे त्यांना वाटले.

## बदर येथील अद्‌भूत चमत्कार

मुस्लिमांच्या विजयाच्या कारणांचे विश्लेषण करताना इतिहासकारांनी जे निष्कर्ष काढले त्यावरून काही भौतिक कारणासाठी, मक्केतील सैनिकांत परिपूर्ण अभाव असल्यामुळे, त्यांच्या फाजील आत्मविश्वासामुळे आणि त्यांच्या उलट मुस्लिम सैनिकात परिपूर्ण एकोपा व एकदिली असल्याने त्यांचा उत्साह, स्वर्गप्राप्तीची त्यांच्यातील आसक्ती वगैरे कारणांनी त्यांना विजय मिळाल्याचे लिहिले आहे, परंतु शस्त्रसज्जता व संख्याबळाच्या दृष्टीने त्या दोन सैन्यांत फार मोठा फरक होता, हे लक्षात घेता मुस्लिम सैन्यात वर उल्लेखलेली अनुकूलता असतानाही, ते सर्व निर्णायक विजयप्राप्तीसाठी आसुसले होते; ही बाब नजरेआड करून चालणार नाही. मुस्लिम सैन्यात तीनशेहून थोडेशे अधिक सैनिक होते. त्यांच्यापैकी बरेचसे युद्धकलेत अननुभवी होते. सैन्यात अधिकांश असलेले मदीनेतील अन्सार लोक हे शेती पेशातले होते आणि मक्केतील रक्तपिपासू योद्ध्यांच्या तोडीचे मुळीच नव्हते. शस्त्रसज्जतेच्या दृष्टीने मुस्लिम सैन्याची अवस्था शोचनीय होती. त्यांच्यापाशी केवळ दोन घोडे, सात उंट व थोड्या तलवारी होत्या. याउलट मक्केच्या सैन्याची संख्या मुस्लिमांपेक्षा तिपट्टीने अधिक होती. त्यांची तयारी जय्यत होती. त्यांच्यात महापराक्रमी व भयंकर असे अनेक अनुभवी योद्धे होते. या ठळक तफावतींची व न्यूनाधिक्याची पैगंबर मुहम्मद (स.) यांना पुरेपूर जाण होती. भौतिक बळातील हा भेद, अल्लाहच्या सहाय्याविना केवळ सैन्याच्या नैतिक मनोबलावर या तफावतीची पूर्तता करता येणार नाही, हे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जाणले होते. म्हणून त्यांनी आपल्या स्वामीची अशी करूणा भाकली, की त्याने अशा प्रकारचे साहाय्य पाठवावे की त्यामुळे उघडपणे मक्केच्या सैन्याचा पाडाव व्हावा आणि त्यामुळे अल्लाहच्या अस्तित्वाचा व माणसांच्या कृत्यावर त्याची जागरूक टेहेळणीचा सातत्याने अखंडनीय पुरावा जगाला दिसावा.

पवित्र कुरआनमध्ये त्या लढाईच्या दिवसाला 'यौमुल फुरकान' म्हणजे फरक दाखवून देणारा दिवस असे म्हटले गेले आहे. कारण असे की मानवी इतिहासात या अर्थाने तो निर्णायक लढा ठरतो की तुटपुंजी साधनसामुग्री, साधने व अल्प मनुष्यबळ असतानाही, असत्यापाशी भरपूर भौतिक साधने, अफाट शक्ती व वैभव असूनही त्यांच्यावर सत्याने विजय मिळविला आहे. त्या लढाईचा परिणाम जर वेगळा झाला



असता तर मानवी इतिहासाचा दिशाक्रमच बदलला असता. रणांगणावर एका बाजुला दुष्टशक्तीचे सैन्य आपल्या सर्व समार्थ्यांनीशी उभे ठाकले होते, दुसऱ्या बाजुला अल्लाहचे दास इतिहासाच्या रणभूमीवर प्रकट होऊन त्यांच्या वाढत्या शक्तीला पायबंद घालण्यासाठी उभे होते. ते कमकुवत व अगतिक होते. तो क्षण अत्यंत चिंतेचा होता आणि दुष्ट शक्तीच्या उफळत्या लाटेने, जर नव्याने वाढू लागलेली इस्लामी शक्ती वाहून नेली, तर मानवी समाजाच्या नैतिक व्यवस्थेवर त्याचा मोठाच आघात बसला असता. पैगंबर मुहम्मद (स.) यांना त्या परिस्थितीच्या गांभिर्याची पुरेपूर जाणीव होती, म्हणून ते आपला अधिकांश वेळ, अल्लाहाची याचना करण्यात घालवीत व त्याने त्या मामल्यात हस्तक्षेप करावा आणि सत्याला निर्णायक विजय मिळवून देण्याचे निश्चित करावे, म्हणून त्याची करूणा भाकीत असत. असे करून आपण दुष्ट व चांगल्या यांच्यामधील लढ्याचे केवळ मूकप्रेक्षक नाही, तसेच सत्याची पताका धारण करणारे प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही, जेव्हा दुष्टांचा हल्ला थोपविण्यास कमकुवत ठरतात, तेव्हा तो सत्याची बाजू बळकट करतो आणि अल्लाह दुष्टपणाच्या व अंध:काराच्या शक्तीचा पाडाव करतो.

जॉन हेन्री कार्डियल न्यूमन म्हणतो- ''निसर्ग जेव्हा ईश्वराच्या अस्तित्वाची स्पष्टपणे नोंद करतो की तो आपली नैतिक सत्ता चालवितो, त्याउलट अद्‌भूत चमत्कार त्याच्या नैतिक सत्तेच्या थेट पुरावा देतात आणि तो चमत्कारच नैतिक सत्तेचे ताबडतोबीचे उदाहरण ठरते आणि ईश्वराचे अस्तित्व दर्शवितो. म्हणून आवश्यकतेची कल्पना बाजुला सारून माणसातील जाण जागृत करण्यात व त्यांच्यातील उत्तरदायित्वाची कल्पना सचेत करण्यात, कर्तव्याची जाण करून देण्यात आणि निसर्गाच्या क्रमात आढळणाऱ्या ईश्वरी सत्तेच्या निशाण्याकडे लोकांचे लक्ष आकृष्ट करण्यात साहाय्यभूत ठरतो.

इस्लामी सत्तेच्या वाढीस लागलेल्या रोपट्यास साहाय्य करण्याची सर्वशक्तिमान अल्लाहला पैगंबर मुहम्मद (स.) यांनी केलेली कळकळीची याचना आणि तिच्या उत्तरादाखल मुस्लिमांना त्याच्या अलौकिक शक्तीसाधनांनी केलेली मदत; ही मानवी जीवनाच्या या महत्त्वाच्या वास्तवतेचा पुरेसा पुरावा आहे.

अशा रीतीने पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपला आत्मा, त्यांच्या एकमेव निर्माणकर्त्यापुढे ओतून उघडा केला.- ''हे स्वामी! मी करूणा भाकतो की, तू दिलेले वचन व आश्वासन यांचा विसर पडू देऊ नकोस. हे स्वामी! ही छोटीशी इस्लामी शक्ती जर पराभूत झाली, तर तुझी उपासना करणारा व तुझे नाव घेणारा या पृथ्वीवर कोणीही उरणार नाही.''

वरील शब्दांचा पुनरूच्चार पैगंबर मुहम्मद (स.) यांनी इतक्या वेळा आणि

लीनतेने केला आणि इतक्या कारूण्याने केला की शेजारी उभ्या असलेल्या माननीय अबू बकर (रजि.) यांना रडू कोसळले. त्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या खाद्यांवरून खाली घसरलेली चादर सरळ केली. खोलवर तल्लीनतेच्या अवस्थेत ती घसरली होती. नंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांना धीर देत ते म्हणाले, ''हे अल्लाहचे पैगंबरा! ही याचना व विनवणी पुरेशी आहे. अल्लाह खात्रीने तुम्हाला विजय प्रदान करील आणि तुम्हाला दिलेल्या आश्वासनाची तो पूर्तता करील.''

अल्लाहकडून याचा प्रतिसाद तडकाफडकी आला. त्याने पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या व त्यांच्या सोबत्यांच्या मदतीसाठी आकाशातून आपले दूत पाठविले. पवित्र कुरआनमध्ये निष्कर्ष दिला आहे.

''आणि तो प्रसंग जेव्हा तुम्ही आपल्या पालनकर्त्यापाशी फिर्याद करीत होता. उत्तरादाखल त्याने फर्माविले, मी तुमच्या मदतीकरिता लागोपाठ एक हजार दूत पाठवीत आहे. ही गोष्ट अल्लाहने तुम्हाला केवळ याकरिताच सांगितली की तुम्हाला शुभवार्ता मिळावी व तुमची मने त्याद्वारे समाधानी व्हावीत एरव्ही मदत तर जेव्हा कधीही होते अल्लाहकडूनच होत असते, नि:संशय अल्लाह जबरदस्त आणि बुद्धिमान आहे.''

(दिव्य कुरआन, ८ : ९-१०)

हदीसच्या नोंदी या वास्तवतेची स्पष्टपणे ग्वाही देतात की त्या दिवशी ईशदूत प्रत्यक्षात प्रकटले आणि मुस्लिमांच्या बाजूने त्यांनी लढाईत भाग घेतला होता. जिब्रिलच्या संकेतावरून पैगंबर मुहम्मद (स.) यांनी एक मूठभर माती हातात घेऊन शत्रूवर भिरकावली व म्हणाले, ''त्यांच्या तोंडावर कोसळो.'' पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जेव्हा माती फेकली तेव्हा वाळूकणांचे एक तीव्र वादळ अचानकपणे उठले. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या थेट पाठीमागून अत्यंत तप्त वारे वाहू लागले आणि एखाद्या भट्टीतील धगीप्रमाणे शत्रूसैन्याच्या डोळ्यांत घुसू लागले. कुरैशचे लोक आधीच डळमळू लागले होते. जेथे ते उभे होते तेथील जड वाळूला त्यांचे पाय अडखळू लागले आणि जेव्हा नेतेमंडळीच कोलमडली तेव्हा त्यांच्या गोंधळात आणखीच भर पडली. मुस्लिमांनी माघार घेणाऱ्या त्यांच्या पावलांवर पाऊल टाकून त्यांचा आतुरतेने पाठलाग केला आणि जे त्यांच्या तावडीत सापडले त्यांना त्यांनी ठार केले अथवा कैद केले. या माघारीचे रूपांतर काही वेळात एका अपमानकारक दारूण पराभवात झाले आणि शत्रूने आपली चिलखते, आपली स्वारीची जनावरे, आपल्या राहुट्या व सर्व सामानसुमान सोडून देऊन पळ काढला आणि तितकेच कैद केले गेले. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या बाजूचे चौदा माणसे कामी आली. त्यापैकी आठ अन्सार आणि सहा स्थलांतर करून आलेले लोक होते. मक्केतील अनेक प्रमुख माणसे आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी हाडवैर करणारे अनेक लोक ठार झाले.



त्यांच्यापैकी प्रमुख म्हणजे अबू जहल होता.

पवित्र कुरआनमध्ये या अद्‌भूत चमत्काराचे वर्णन खालील शब्दांत केले आहे,

''तेव्हा वस्तुस्थिती अशी आहे की तुम्ही त्यांना ठार केले नाही तर अल्लाहने त्यांना ठार केले, आणि हे पैगंबर (स.), तू फेकले नाहीस तर अल्लाहने फेकले (आणि इमानधारकांचे हात जे या कार्यात वापरले गेले) तर हे अशासाठी होते की अल्लाहने इमानधारकांना एका उत्तम परीक्षेतून यशस्वीपणे पार पाडावे. खचितच अल्लाह ऐकणारा व जाणणारा आहे. '' (दिव्य कुरआन, ८ : १७)

आलिइमरानच्या अध्यायात पवित्र कुरआन पैगंबर मुहम्मद (स.) यांना आठवण करू देतो आणि त्यांच्या पवित्र व्यक्तिमत्त्वाद्वारे समस्त मुस्लिम जमातीला बदरच्या लढाईतील अल्लाहने केलेल्या विशेष कृपेची आठवण करून देतो. त्याच्या कृपेनेच मनुष्यबळ साधनसामुग्री व शस्त्रास्त्रांच्या बाबतीत कमतरता असलेल्या मुस्लिमांना मक्कावासियांवर विजय मिळविता आला.

''बरे यापूर्वी बदरच्या युद्धात अल्लाहने तुम्हाला मदत केली होती खरे पाहता त्यावेळी तुम्ही फार दुर्बल होता.'' (दिव्य कुरआन, ३ : १२३)

बदरच्या लढाईवर एक फोल आशा बाळगून मक्कावासियांनी जे महत्त्व दिले होते, त्याचाही कुरआनमध्ये अगदी सरळ उल्लेख आहे. त्यांना असा ठाम विश्वास होता की त्यांचे मोठे संख्याबळ, त्यांची साधनसामुग्री व शस्त्रसज्जता, युद्धकलेतील त्यांचा मोठा अनुभव, त्यांना साहाय्यभूत ठरेल आणि वाढीस लागलेल्या इस्लामी सत्तेवर जोरदार आघात करून तिला ते ठेचून काढण्यास समर्थ ठरतील. परंतु अल्लाहची आज्ञा वेगळीच होती. त्याने सत्याच्या शक्तीला विजय प्रदान करण्याचे ठरविले. 'फतह' या अरबी शब्दावर (विजय, निर्णय, निवाडा) विवेचन करताना मक्कानिवासियांना असे सांगण्यात आले,

''ज्याअर्थी तुम्हाला निर्णय हवा होता तर घ्या, निर्णय तुमच्यासमोर आलेला आहे.'' (दिव्य कुरआन, ८ : १९)

पवित्र कुरआन या लढाईला 'निर्णायक' असे संबोधतो, कारण त्याने जगातील दुष्ट शक्तीची पाळेमुळे हादरवून टाकली आणि चांगुलपणाचे वर्चस्व प्रस्थापित केले.

''स्मरण करा तो प्रसंग जेव्हा अल्लाह तुम्हाला वचन देत होता की दोन्ही जमातीपैकी एक तुमच्या हाती लागेल. तुमची इच्छा होती की दुर्बल जमात तुमच्या हाती लागावी. परंतु अल्लाहचा इरादा असा होता की आपल्या वचनांनी सत्याला सत्य करून दाखवावे व अश्रद्धांचे मूळ कापून टाकावे - म्हणजे सत्य, सत्य सिद्ध व्हावे व असत्य,

असत्य ठरावे, मग ही गोष्ट अपराधी लोकांना कितीही अप्रिय का वाटेना.''

(दिव्य कुरआन, ८ : ७-८)

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी व त्यांच्या सोबत्यांनी लढाईत कैद केलेल्यांना विशाल अंत:करणाने जी औदार्याची आणि दयाळूपणाची वागणूक दिली त्याबद्दल काही शब्द लिहिणे, विषयाच्या औचित्याला धरूनच आहे. कैद्यांना दिलेली उदार व उदात्त वागणूक, ज्या कारणासाठी लढाई सुरू झाली, त्यांच्या संदर्भाच्या पार्श्वभूमीवर पाहिल्यास, तिचे खरे कौतुक करता येईल. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी व त्यांच्या सोबत्यांनी संपूर्ण पंधरा वर्षे अवर्णनीय छळ व अन्याय-अत्याचार सोसला. अपमान गिळला. मक्केतील कुरैशांनी त्यांच्यावर एवढा जुलूम केला की त्यांना आपले आवडते जन्मस्थान, घरदार सोडून देऊन एका दूरस्थ ठिकाणी आश्रय घ्यावा लागला. त्यांच्या रक्तासाठी तहानलेल्या मक्कावासियांनी त्यांना त्यांच्या नव्या निवासस्थानात हे शांतपणे जीवन व्यतीत करण्याची परवानगी दिली नाही. ते त्यांचे अस्तित्व कायमचे पुसून टाकण्याच्या उद्देशाने आपल्या सर्व सामर्थ्यानिशी त्यांच्यावर तुटून पडले. नियतीचा निर्णय मात्र वेगळा होता आणि मुस्लिमांच्या छोट्याशा सैन्याने त्यांना पराभूत केले इतक्या कटुतेच्या संबंधानंतरसुद्धा पैगंबर मुहम्मद (स.) शांत व भान राखून होते. युद्धकैद्यांवर कसलेही अत्याचार केले गेले नाहीत. ७२ युद्धकैद्यांपैकी फक्त दोघांना फाशी देण्यात आली होती. त्यांची नावे नजर बिन हारिस आणि उक्बा बिन मुऐत अशी होती. ते मुस्लिमांवर भयानक अत्याचार करण्याबद्दल कुप्रसिद्ध होते. इतर कैद्यांना अत्यंत दयाळूपणाने व समंजसपणाने वागविले गेले. त्यांच्यापैकी एकजण नंतरच्या काही दिवसांनी उद्‌गारला, ''मदीनेतील माणसांवर कृपेचा वर्षाव असो! त्यांनी आम्हाला गव्हाची चपाती खाण्यासाठी दिली, जेव्हा तेथे गव्हाची टंचाई होती आणि ते स्वत: खजूर खाऊन गुजराण करीत होते.'' या सर्व गोष्टींनी प्रभावित होऊन त्या युद्धकैद्यांपैकी काहींनी इस्लाम धर्माला आलिंगण दिले, यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. त्यांची तत्काळ सुटका करण्यात आली. इतरांना खंडणी देऊन सुटका करून घेण्याखातर ठेवून घेण्यात आले. परंतु तसे करण्यासाठी कुरैशची माणसे दीनवाणे होऊन मदीनेत येणे, ही लांबची गोष्ट होती. म्हणून दयाळूपणाची वागणूक देण्याचा कालावधी लांबला आणि त्यामुळे ज्यांनी ताबडतोब इस्लाम धर्माचा स्वीकार केला नाही, त्यांच्याही मनावर यथोचित परिणाम घडून आला.

प्रत्येक कैद्याची खंडणीची रक्कम त्यांच्या आर्थिक कुवतीनुसार वेगवेगळी होती. ती रक्कम एक दिरहमपासून ४००० दिरहमपर्यंत होती. जे गरीब होते आणि खंडणीची रक्कम देऊच शकत नव्हते, त्यांना तसेच सोडून देण्यात आले. त्यांच्याकडून कसलीही भरपाई घेतली गेली नाही, ज्यांना लिहिता-वाचता येत होते, त्यांच्या ताब्यात लहान मुले



शिकविण्यासाठी देण्यात आली. प्रत्येकाला दहा मुले शिकवावी लागत असत आणि लिहिण्या-वाचण्यात ती जेव्हा निपुण होत असत, तेव्हा त्यांच्या शिक्षकांना सोडून मुक्त करण्यात येत असे. मुक्तता प्राप्त करण्याच्या या अटीमुळे, इस्लाम शिक्षणाला किती महत्त्व देतो; यावर खूप प्रकाश पडतो.

## बदरच्या युद्धाचे परिणाम

बदरच्या युद्धातील विजय मुस्लिमांसाठी अतिशय महत्त्वाचा होता. त्यामुळे धरसोड वृत्तीच्या माणसांच्या मनावर पैगंबर मुहम्मद (स.) यांचे सामर्थ्य मजबूत झाले. देशातील प्रत्येक माणसाच्या मनात खालील प्रश्न घोळू लागले. इतके कमी मनुष्यबळ व तुटपुंजी साधनसामुग्री असताना, जर त्यांना ईशसाहाय्य नसते, तर इतक्या मोठ्या शत्रूवर ते कसे मात करू शकले असते? इस्लामच्या कट्टर व सर्वाधिक वाईट शत्रूंना अगदी ठराविक जागी एकसारखे घाव घालून कसे ठार करण्यात आले व एकाच पद्धतीने कसे पकडून कैद करण्यात आले, ज्याबद्दल पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आधीच भाकित केले होते? जी शक्ती विश्वाची निर्माणकर्ती व सार्वभौम सत्ता आहे, त्या ईशसत्तेचेच हे काम नव्हे काय?- अशा प्रकारचे प्रश्न अरबांच्या मनात सतत घोळू लागले आणि त्यांना विचार करायला लावले. या खळबळीच्या प्रश्नांची यथोचित उत्तरे शोधण्याच्या मानसिक स्थितीत, काही माणसांना पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शिकवणीतील 'सत्या'चा शोध लागला आणि इमान व जीवनाची आचारासंहिता म्हणून त्यांनी इस्लाम धर्माचा स्वीकार केला. त्या ऐतिहासिक घटनेबद्दल मुस्लिमांच्या व मुस्लिमेतरांच्या भावनांची कल्पना खालील ऐतिहासिक उताऱ्यावरून केली जाऊ शकते-

अली बिन अबू तालीब म्हणाले, ''तुम्ही पाहिले काय की बलशाली, सामर्थ्यवान व वैभवशाली अल्लाहने त्याचे पैगंबर मुहम्मद (स.) यांचे स्थान उंचावले? त्याने नाकारणाऱ्या अधर्मी लोकांचा कसा पाणउतारा केला, कैद होतांना व ठार केले जाताना किती लाजिरवाणेपणा दिला? जेव्हा अल्लाहच्या पैगंबर मुहम्मद (स.) यांचा विजय दैदिप्यमान व गौरवपूर्ण होता, पैगंबर मुहम्मद (स.) यांना सत्य व सदाचारानिशी पाठविण्यात आले असल्याने, त्यांनी 'फुरकान' (सत्य व असत्यामधील फरक दाखविणारा) आणला, जो अल्लाहनेच पाठविला होता. बुद्धी असणाऱ्या माणसाला त्याच्या निशाण्या दिसतात. काही लोकांनी त्या निशाण्या पाहिल्या व त्यांच्यावर इमान व विश्वास धारण केला. काही लोकांनी त्या निशाण्यांचा इन्कार केला व त्यांची मने भरकटलेली होती. सिंहासनाच्या स्वामीने त्यांच्यावर पुन्हा अनेक आपत्ती कोसळवल्या.''

बदरच्या लढाईच्या दिवशी, आपल्या लढाईत ठार झालेल्या बापाच्या मृत्यूचा

शोक करताना उतबा बिन राबियाची मुलगी हिंदने खालील शब्दात आक्रोश केला होता, ''नशीब आमच्याविरूद्ध आहे. आमच्यावर अन्याय केला पण ते रोखण्यास आम्ही अगतिक आहोत. लुईय बिन गालीबच्या मृत्युनंतर कोणी त्याच्या अगर त्याच्या मित्राच्या मृत्युचा शोक करू शकेल काय? कितीतरी दिवस तो त्यांना पोषाख देत असे. सकाळ संध्याकाळ मौल्यवान देणग्या देत असे. अबू सुफयानला माझा निरोप द्या. आज जर तो मला भेटला तर त्याची चांगलीच खरडपट्टी काढीन. या लढाईमुळे दुसरी लढाई पुन्हा भडकेल कारण सूड घेण्यास प्रत्येकाचा मित्र मागे आहे.''

काळ लोटला गेला. मुस्लिम लोक समाधानी होते. त्यांच्यावर झालेल्या अमर्याद कृपेबद्दल त्यांनी अल्लाहचे शतश: आभार मानले. मक्कावासियांना त्यांचा दारूण पराभव अत्यंत लाजिरवाणा व अतीव दु:खाचा वाटत होता. जवळजवळ प्रत्येक घरात, आपल्या ठार झालेल्या अगर कैद झालेल्या माणसासाठी आसवे ढाळून आक्रोश केला जात असे. झालेल्या मानखंडनेमुळे मक्केतील माणसे जळत होती आणि सूड घेण्यासाठी ते आसुसले होते. त्यांना अबू सुफयानचा उपदेश होता की ''युद्धात मारले गेलेल्यांचा शोक करीत रडू नका. नशीबावर विव्हळूही नका. तुम्ही शोकगिते गाऊन दु:ख करीत बसलात, तर तुमचा क्रोध थंड पडेल आणि पैगंबर मुहम्मद (स.) व त्यांच्या सोबत्यांबद्दलचे तुमच्या मनांतील वैर मृदू होईल. तुमचे रडणे-विव्हळणे जर त्यांच्या कानावर गेले, तर ते आम्हाला हसतील, त्यांचा उपहास आमच्यासाठी सर्वाधिक बोचणारा नाही काय? प्रसंगवशात तशी वेळ येईल व तुम्हाला सूड घेता येईल. माझ्याबद्दल सांगायचे तर मी मुहम्मदवर चाल करून लढाईस जाईपर्यंत तेलाला स्पर्श करणार नाही, अशी प्रतिज्ञा करतो.'' प्रत्येक मक्कावासियाच्या उरात हा राक्षसी अहंकार भरून उफाळून आला होता.

याच काळात पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या एका लाडक्या कन्येचे निधन झाले. त्यांची कन्या माननीय रूकय्या (रजि.) ही ॲबिसीनियाच्या हद्दपारीतून नुकतेच परतलेल्या माननीय उस्मान (रजि.) यांची पत्नी होती. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपली दुसरी कन्या माननीय उम्मे कुलसुमशी उस्मान (रजि.) यांचा विवाह करून देण्याचा दयाळूपणा दाखविला. पैगंबर मुहम्मद (स.) यांची सर्वात धकटी कन्या माननीय फातिमाचा विवाह माननीय अली (रजि.) यांच्याशी झाला होता. माननीय अली (रजि.) हे त्यांचे एकनिष्ठ चुलतभाऊ होते आणि सर्व प्रकारच्या परिस्थितीत ते त्यांच्या पाठीशी दृढपणे उभे होते.

माननीय उमर (रजि.) यांची मुलगी हफसा हिचा पती बदर लढाईत ठार झाला होता. माननीय उस्मान (रजि.) यांनी हफसाशी विवाह करून पहिल्या पत्नीच्या वियोगाचे सांत्वन करावे, ही कल्पना चांगली आहे, असे माननीय उमर (रजि.) यांना वाटले. परंतु या प्रस्तावाकडे माननीय उस्मान (रजि.) यांचा कल दिसला नाही. तो प्रस्ताव घेऊन



माननीय उमर (रजि.) हे माननीय अबू बकर (रजि.) पाशी गेले. परंतु त्यांनीही नकार दिला. माननीय उमर (रजि.) यांच्या मनात क्षोभ उत्पन्न होण्यास एवढे कारण पुरेसे होते. त्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांना त्यांच्या दोन आदरणीय सोबत्यांच्या थंडपणा सांगून टाकला. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांना शांत करीत म्हणाले, ''हफसा कदाचित अधिक चांगल्या माणसाशी विवाहबद्ध होण्यास राखीव आहे.'' शेवटी ते म्हणाले, ''उमर! वास्तविकपणे मीच तिच्याशी विवाह करीन.'' आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांनी पुढे तिच्याशी विवाह केला.

## उहूदचे युद्ध

बदरच्या युद्धातील दारूण पराभव कुरैशी लोकांना अत्यंत अपमानस्पद होता आणि त्याचा सूड उगविल्याविना त्यांचा अहंकार स्वस्थ बसणारा नव्हता. सबंध मक्केत 'सूड' हा एकच शब्द परवलीचा झाला होता. तसेच त्यांची भरभराट व उत्कर्ष बऱ्याच अंशी त्यांच्या प्रतिष्ठेवर अवलंबून होते. या गोष्टीची जाणीव मक्कावासियांना झाली होती. आपली प्रतिष्ठा टिकविणे गरजेचे होते आणि बदरमध्ये जी प्रतिष्ठा गमावली होती, ती परत मिळविणे आवश्यक होते. मक्कावासियांकडून संघर्षाची तीव्रता वाढण्याच्या आणि प्रखर विरोध होण्याशिवाय अन्य कशाचीच अपेक्षा पैगंबर मुहम्मद (स.) यांना नव्हती, कारण धार्मिक आकसाबरोबर मक्केतील लोकांच्या मनांत वैयक्तिक सूड व हाडवैर या भावनाही मिसळल्या होत्या. म्हणून प्रत्येकजण सूडासाठी तळमळत होता. इस्लामी प्रजासत्ताकाचा कायमचा काटा काढून टाकण्याचे त्यांनी ठरविले. आपले हेर सर्व टोळ्यांकडे धाडण्यात येऊन, त्यांना आपल्या बाजुला वळवून समानशत्रू विरूद्ध एकजुटीने फळी उभारण्याचे प्रयत्न करण्यात आले. मूर्तीपूजा व भ्रष्टाचारी रिवाज, देशातून किंबहुना सर्व ज्ञात जगातून झाडून टाकू पाहाणाऱ्या, वाढू लागलेल्या त्या नव्या श्रद्धेला कायमचे संपविण्याचा त्यांचा मानस होता. त्याचे परिणामस्वरूप, दोन प्रमुख अरबी टोळ्या किनानाह व तिहामाहकडून पाठिंब्यांचे आश्वासन त्यांनी मिळविले. असेही ठरविण्यात आले की निसटून गेलेल्या अबू सुफयानच्या तांड्याचा व्यापारी नफा सैनिकांना साधनसामुग्री व शस्त्रासाठी देण्यात यावा. त्यांच्या या निर्णयाला अनुलक्षून कुरआनने खालीलप्रमाणे म्हटले आहे.

''ज्या लोकांनी सत्य स्वीकारण्यास नकार दिला ते मालमत्ता अल्लाहच्या मार्गापासून लोकांना रोखण्यासाठी खर्च करीत आहेत व आता आणखीही खर्च करीत राहतील.''

(दिव्य कुरआन, ८ : ३६)

मक्कावासियांनी या खेपेला त्यांच्या स्त्रियांनाही त्यांच्याबरोबर रणांगणावर नेण्याचे

ठरविले. त्यांच्या प्रोत्साहनाने लढाईत जिगरीने लढण्याची स्फूर्ति मिळेल, असे त्यांना वाटले. अबू सुफयानची पत्नी हिंद पुरूषांपेक्षा अधिक कठोर व भयंकर होती. पहिल्या गटाचे नेतृत्व तिच्याकडेच होते.

अशा प्रकारे ३००० कडव्या योद्धयांचे एक सैन्य तयार झाले. त्यांच्यापैकी ७०० पायदळ सैनिक होते, २००० उंटस्वार व घोडेस्वार होते. उंटांची संख्या ३००० होती. १५ महिलांनी पायीच मदीनेकडे कूच केली.

आक्रमण करणाऱ्यांनी १० दिवस वाटचाल केल्यानंतर उहूदच्या सुपीक मैदानात तळ टाकला. ते स्थान मदीनेपासून ५ मैल अंतरावर असले, तरी डोंगरांच्या रांगामुळे विभागले गेले होते. त्यांनी सभोवतालचा प्रदेश, उभी पिके व फळझाडे यांचा विध्वंस केला. त्या निमित्ताने उत्तेजित झालेले मुस्लिम सपाट पैदानावर येतील व मग त्यांचा फडशा पाडता येईल, अशी त्यांची मनीषा होती.

मक्कावासियांचे सैन्य चाल करून येत असल्याची बातमी पैगंबर मुहम्मद (स.) यांना जेव्हा समजली तेव्हा आपल्या एकनिष्ठ सोबत्यांची एक तातडीची बैठक पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मस्जिदीत बोलाविली व त्या विषयावर चर्चा केली. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अशी एक सूचना समोर ठेवली की ग्रामीण भागातील सर्व स्त्रियांना व मुलांना शहराच्या वेशीच्या आत हालवावे आणि लढाईची जोखीम शिरावर न घेता, शत्रूची दमणूक होईपर्यंत त्याला तिष्ठत सोडावे. परंतु इमानधारकांच्या उसळत्या उत्साहामुळे हा निर्णय बदलून टाकण्यात आला. शत्रूला सपाट मैदानात सामोरे जाणे हेच श्रेयस्कर मुकाबला मदीनेत करावा की उहूदच्या मैदानातच त्यांचा सामना करावा, तेव्हा एक प्रमुख अन्सारी नुअमान बिन मलीक उठून उभे राहिले व पैगंबर मुहम्मद (स.) यांना उद्देशून म्हणाले, ''हे अल्लाहचे पैगंबरा! दयाळू व्हा आणि आम्हाला स्वर्गप्राप्तीपासून वंचित करू नका. ज्याने तुम्हाला सत्यानिशी पाठविले आहे, त्या स्वामीची शपथ घेऊन मी सांगतो की मी निश्चितपणे स्वर्गलोकात जाईन.'' त्यावर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उत्तर दिले, ''कशाच्या आधारवर तुम्ही असा दावा करीत आहात?'' तो म्हणाला, ''कारण ईश्वर एकमेव आहे, या वास्तवतेला मी साक्ष आहे, तुम्ही त्याच्याकडून पाठविलेले पैगंबर मुहम्मद (स.) आहात यावर मी दृढ श्रद्धा बाळगतो आणि रणांगणात मी कधीही पाठ दाखवीत नाही.'' नंतर याबद्दल सर्व साधकबाधक विचारांती शहराबाहेर उहूद येथेच शत्रूशी मुकाबला करण्याचे ठरले.

शुक्रवारच्या नमाजच्या वेळी विचारपीठावरून धर्मोपदेश देताना पैगंबर मुहम्मद (स.) यांनी हिंमतीने लढा देण्यावर भर दिला. ते म्हणाले, ''तुम्ही जर ठामपणे राहिलात तर सर्वसमर्थ अल्लाहच्या शक्तीची तुम्हाला कुमक मिळेल.'' नंतर त्यांनी आपल्या



माणसांना युद्धाची तयारी करण्याची आज्ञा केली. बहुतेक लोकांना मोठा हर्ष झाला. ती दुपारची नमाज संपेपर्यंत लोक मस्जिदच्या आवारात लढाईची शस्त्रे घेऊन गोळा झाले. पैगंबर मुहम्मद (स.), माननीय अबू बकर (रजि.) व उमर (रजि.) यांना घेऊन तयारीसाठी निघून गेले. थोड्याच वेळात ते आपल्या खोलीतून बाहेर पडले. त्यांनी चिलखत व शिरस्त्राण घातले होते. कंबरेला बांधलेल्या कातडी पट्ट्यापासून तलवार लटकत होती व पाठीशी एक ढाल रूळत होती. त्यांना अशा वेषात पाहून लोकांना आपल्या अविचारी वक्तव्याबद्दल पश्चात्ताप झाला. ते म्हणाले, '' पैगंबर मुहम्मद (स.) यांना जे योग्य वाटते ते त्यांनी करावे.'' मुस्लिमांच्या सैन्यात केवळ १००० योद्धे होते. त्यांच्यापैकी फक्त दोन घोडेस्वार होते आणि शंभर लोक चिलखतधारी होते. शहरापासून थोड्याशा अंतरावर त्यांनी रात्र घालविली आणि भल्या पहाटे उठून मार्गक्रमणास सुरवात केली.

दांभिकांचा एक प्रमुख नेता आणि यहुदी संयुक्त समितीशी तहाने बांधलेला अब्दुल्लाह बिन उब्बइ अशा बिकट प्रसंगी मुस्लिमांचे सैन्य सोडून देऊन तीनशे सैन्यांसह बाजुला फुटला आणि मुस्लिम सैनिकांची संख्या रोडावून ७०० झाली. या सैन्याला त्यांच्या चौपटीपेक्षा अधिक असलेल्या सैन्याशी टक्कर द्यायची होती. मक्केचे सैन्य पूर्णतः दृष्टीपथात आले, तेव्हा सकाळची नमाज अदा करण्यात आली. या क्षणी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपले सेनापतित्व दाखवून दिले. पाठीशी उहूदच्या डोंगराचे उभे खडक पाहून तेथे आपले सैन्य उभे केले. त्यामुळे मागच्या बाजूने धोका नव्हता. डोंगराच्या मध्यभागी एक खिंड होती. तेथे आपले तिरंदाज बसवून त्यांना सक्त ताकीद दिली, की लढाईचा निकाल कसाही लागला तरी पैगंबर मुहम्मद (स.) यांची आज्ञा मिळाल्याखेरीज त्यांनी आपले स्थान मुळीच सोडायचे नाही.

अशा तऱ्हेने पैगंबर मुहम्मद (स.) यांनी काळजीपूर्वक आपली सैन्य रचना केली. ती त्यांची नेहमीची पद्धत होती. मुसंडी मारून अचानक हल्ला करण्यास शत्रूला कोणतेही स्थान आरक्षित मिळू नये, यासाठी ते दक्ष असत. नंतर ते शत्रूच्या हल्ल्याची वाट पाहू लागले. दरम्यान मक्केचे सैन्य पुढे सरसावले. मध्यभागी अबू सुफयान सेनापतित्व करीत होता. उजव्या फळीचा प्रमुख खालिद होता व डाव्या बाजुला इक्रमा होता. जेव्हा सर्व बाजूंचे सैन्य समोरासमोर आणि अगदी जवळ आले, तेव्हा महिलांच्या तुकडीत हिंद पुढे झाली. हातात एक डफली घेऊन ती जोरजोराने बडवू लागली आणि समरगीते गाऊन ती आपल्या माणसांना शौर्याने लढण्यासाठी प्रेरणा देऊ लागली, त्या गाणी म्हणू लागल्या,

*''जर तुम्ही चाल करून पुढे सरसावला तर आम्ही तुम्हाला कवटाळू*

*तुमच्या पायाखाली मऊ केसाळ गालिचे अंथरू*
*जर तुम्ही माघार घेतली, तर आम्ही त्याग करू तुम्हाला सोडून देऊ*
*पुन्हा कधीही तुमच्यावर प्रेम करणार नाही.''*

## रणकंदन

कुरैशच्या बाजूने लढाईला आरंभ अबू आमिरने केला. तो आपल्या अनुयायांसही समोर आला परंतु त्यांच्यावर दगडांचा वर्षाव झाल्याने तो माघारी फिरला. तलहा, हा कुरैशचा ध्वजधारक नामांकित योद्धा होता. तो धावत पुढे आला आणि एकेकट्याशी द्वंद्व युद्धाचे मुस्लिमांना आव्हान देऊ लागला. माननीय अली (रजि.) याने त्याचे आव्हान स्वीकारून द्वंद्वाला सुरवात केली आणि तलवारीच्या एका वारात त्याला जमिनीवर लोळवले. तलहाचा भाऊ उस्मानच्या ताब्यात महिला तुकडी होती. तो त्यांना टाकून, पुढे धावला आणि त्याच्या भावाच्या निर्जीव देहापाशी पडलेला ध्वज त्याने उचलला. तो गुणगुणू लागला- ''ध्वजधारकाला आपल्या रक्ताने ध्वज रंगविण्याचा हक्क आहे, जोवर त्याच्या हातातून तो काढला जात नाही.''

जोपर्यंत दोघादोघांची द्वंद्वयुद्धे चालू होती, तोपर्यंत कुरैशांना त्यांच्या योद्ध्यांच्या पतनामुळे एका मागून एक धक्के बसले. त्यांच्या ध्वजधारकांचे एका मागून एक शीघ्र गतीने झालेले पतन पाहून त्यांच्या आघाडीच्या सैन्यामध्ये घोर निराशा पसरली, त्यांची गाळण उडाली. नंतर सर्व सैन्याची झुंज सुरू झाली. मुस्लिमांचे निर्भय साहसासमोर मक्केच्या सैनिकांचे पाय डगमगू लागल्याचे लवकरच दिसू लागले.

अबू दुजानाह याने तलवाराबाजीचे विलक्षण नैपुण्य त्या दिवशी दाखविले. शत्रू सैन्याच्या गराड्यात धुमश्चक्री चालू असतानाही, अन्य मुस्लिम सैनिकाप्रमाणे अल्लाहशी आणि त्याचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी असलेल्या जबाबदारीचे व कर्तव्याचे त्याला चांगले भान होते. असे वर्णन करण्यात येते की लढाईची धुमश्चक्री चालू असताना एक व्यक्ती मुस्लिमांशी जोरात लढण्याची त्यांच्या सैनिकांना ओरडून चिथावणी देत होती. अबू दुजानाह त्या व्यक्तीवर तलवारीचा वार करण्यासाठी हात वर उचलला, तोच ती व्यक्ती मोठ्याने किंकाळली, ''आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या तलवारीचा मान राखतो. एका महिलेवर मी तिचा वापर करत नाही.''

हमजा (रजि.), अली (रजि.), जुबैर (रजि.) आणि अन्य वीर नायकांनी विषम दडपणाखाली विलक्षण पराक्रमाचे प्रदर्शन केले आणि कुरैशांच्या सैन्याची त्रेधा व तारांबळ उडवून दिली आणि त्यांच्यांत गोंधळ निर्माण केला. मूर्तिपूजकांचे पाय अडखळू लागले व त्यांनी माघार घेतली व पळून गेले. मुस्लिमांच्या बाजूने विजयाच्या गर्जना होऊ



लागल्या. पण त्या गर्जना फार लवकर करण्यात आल्या. खिंडीत रक्षणासाठी ज्या तीरंदाजांना बसवून पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मोर्चा बांधला होता, त्यांनी आपली जागा सोडून ते सैनिकांत मिसळले. आता खिंडीचे रक्षण करणारा तेथे कोणीही राहिला नव्हता. कुरैशच्या घोडदळाचा प्रमुख असलेल्या धूर्त खालिद बिन वलीदने ती संधी साधली. तो आपले सैन्य घेऊन चपळाईने खिंडीकडे गेला आणि मुस्लिमांच्या सैन्यावर पाठीमागून जोरदार व निकराचा हल्ला चढविला. त्याने एकूण परिस्थिती पालटून टाकली. मुसबला ठार करण्यात आले. जुबैर बिन मुतीम याचा रोजंदारीवर आणलेला गुलाम वहशी, एका मोठ्या दगडाच्या आड लपून हमजा (रजि.) यांची हालचाल न्याहाळीत होता. ते बेसावध असताना हातातील भाल्याचा त्यांच्यावर त्याने इतका जोरदार प्रहार केला की ते तत्काळ खाली कोसळून गतप्राण झाले. इतर अनेक नामांकित मुस्लिम योद्धे रणांगणात कामी आले.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनाही डोक्यावर आणि गालावर गंभीर जखमा झाल्या होत्या, परंतु त्यांच्या सोबत्यांच्या अप्रतिम निष्ठेद्वारा अल्लाहने त्यांचे रक्षण केले. एका एकनिष्ठ सोबत्याने आपल्या हातावर बाणाचे घाव सोसून त्यांना शत्रूच्या हल्ल्यातून वाचविले. या गोंधळाच्या अवस्थेत एकजण ओरडला, ''पैगंबर मुहम्मद (स.) ठार झाले.'' त्या अफवेने त्यांच्या अनुयायांची त्रेधा उडाली. परंतु ती दुष्ट बातमी खोटी असल्याचे लवकरच सिद्ध झाले. पैगंबर मुहम्मद (स.) हयात आहेत, हे कळल्यावर मुस्लिमांच्या आनंदाला पारावार उरला नाही. परंतु त्या वाईट अफवेने काही थोडा वेळ का होईना, त्यांच्या अनुयायांवर अनिष्ट परिणाम केला. परंतु खुद्द पैगंबर मुहम्मद (स.) अजिबात न डगमगता अद्वितीय धैर्याने सर्व अडचणींना तोंड देत राहिले. मिकदादच्या निवेदनाच्या आधाराने असे वर्णन करण्यात येते की त्या कसोटीच्या प्रसंगात पैगंबर मुहम्मद (स.) यांनी चिंतेचे अगर कमकुवतपणाचे कसलेही चिन्ह आपल्या चेहऱ्यावर दाखविले नाही. ते म्हणाले, ''ज्याने पैगंबराला सत्यानिशी पाठविले आहे, त्या अल्लाहची शपथ घेऊन सांगतो की पैगंबर मुहम्मद (स.) यांचे पाय कधीही अडखळले नाहीत आणि त्या कसोटीच्या क्षणी ते मुळीच विचलित झाले नाहीत.'' ते निर्धाराने ठामपणे आपल्या जागी उभे राहिले, त्यांचे सोबती गटागटाने त्यांना पाहण्यासाठी आले व पुन्हा शत्रूशी लढण्यासाठी त्यांना सोडून निघून गेले. पैगंबर आपली जागा सोडून इंचभरही हलले नाहीत.

ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की शरीरावर झालेल्या अनेक जखमांतून भळभळ रक्तस्त्राव होत असताना व त्यांचे जावई माननीय अली (रजि.) त्यांच्या जखमा धुताना वेदना होत असतानाही पैगंबर मुहम्मद (स.) यांचे मन सामान्य माणसात

आढळणाऱ्या कटुतेच्या व खुनशीपणाच्या भावनांपासून पूर्णपणे अलिप्त होते. शत्रू त्यांच्या जिवावर उठले आणि परिणास्वरूप त्यांना गंभीर जखमा झाल्याच्या दु:खमय अवस्थेतही पैगंबर मुहम्मद (स.) यांचे वर्तन कसे होते, याचे हुबेहुबे वर्णन अब्दुल्लाह बिन मसऊद (रजि.) यांनी केले आहे. ते म्हणतात,

''आधीच्या प्रेषितांना त्यांच्या लोकांच्या हातून झालेल्या दुखापतींचे वर्णन केलेला प्रसंग मला अद्याप चांगला आठवतो. पैगंबर मुहम्मद (स.) त्यांच्या चेहऱ्यावरचे रक्त पुसत म्हणत होते, हे स्वामी! माझ्या माणसांना योग्य वाट दाखव कारण ते जाणत नाहीत.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्या लोकांशी दाखविलेला असीम सभ्यपणा, क्षमाशीलता, मोठेपणाने न बोलता दर्शविलेली सहनशीलता, दया, यांचेच हे निदर्शक आहे.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्या प्रार्थनेमध्ये त्या रक्ताला तहानलेल्या शत्रूबद्दल 'अडाणी' हा शब्द न वापरता 'अनभिज्ञ' असे म्हटले. ही गोष्ट पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या मनाची अद्वितीय थोरवीच दर्शविते आणि मानवतेवर त्यांचे प्रगाढ प्रेमही दर्शविते. तसेच पैगंबर मुहम्मद (स.) यांचे अंत:करण द्वेषापासून पूर्णत: अलिप्त होते. कारण शत्रू त्यांच्यावर व त्यांच्या सोबत्यांवर जो जुलूम व अत्याचार करीत आहेत, ते सत्य त्यांना ठाऊक नाही म्हणून करीत आहेत, असे त्यांना वाटे. याचा अर्थ असा निघतो, सत्य जेव्हा त्यांना कळेल, तेव्हा त्यांच्या द्वेषाची जागा निष्ठा घेईल.

त्या क्षणी कुरैशांच्या मनाची अवस्था किती दंडेलीची व उद्दामपणाची होती, हे दाखविणे प्रसंगोचित आहे. ते पूर्णपणे हिंस्त्र पशू बनले होते. संभाव्य विजयाच्या कल्पनेने त्यांना उन्माद चढला आणि माणसाच्या भावनाबद्दल त्यांची सभ्यता व आदर-प्रतिष्ठा हरपली. पाशवीपणाची भयंकर कृत्ये जिवंत माणसांशीच केली गेली असे नाही, तर असहाय्य मृत माणसांशीही ती केली गेली. मृतांची शरीरे, अवयव तोडून छिन्नविच्छिन करण्यात आली. पुरूषाबद्दल बोलायचे राहू द्या, पण महिलांना पुरूषांपेक्षा कोमल भावना असतात, असे म्हटले जाते. त्या महिलासुद्धा ह्रदयशून्य पशूसारख्या वागल्या. हिंदने हमजा (रजि.) यांचे काळीज कापून बाहेर काढले व दाताखाली कचाकच चावून चघळू लागली. घशाखाली ती गिळू शकली नाही म्हणून तोंडातून काढून तिने फेकून दिले. अन्य शहीदांच्या प्रेतांनाही तशीत वागणूक दिली आणि रस्त्याने प्रेते फरफटत मक्केकडे घेऊन गेले, जणू एक अमोल स्मृतीचा ठेवा त्यांनी आणला होता.

असे वर्णन केले जाते की पैगंबर मुहम्मद (स.) जेव्हा माननीय हमजा (रजि.) यांचा शोध करीत गेले, तेव्हा त्यांना त्यांचे प्रेत दरीच्या तळाशी आढळले. त्यांचे पोट फाडलेले, नाक व कान कापलेले आणि काळीज गायब झालेल्या अवस्थेत होते.



अशा नृशंस क्रौर्यासाठी थोडा वेळ हर्षोन्माद करून झाल्यावर अबू सुफयान उहूदच्या डोंगराच्या पायथ्याशी आला आणि पैगंबर मुहम्मद (स.), माननीय अबू बकर (रजि.) यांच्या नावाने मोठमोठ्याने हाका मारू लागला. हाकेला उत्तर न मिळाल्याने तो उद्‌गारला, ''ते सर्व मारले गेले आहेत, ते जर जिवंत असते तर त्यांनी हाकेला ओ दिली असती.''

माननीय उमर (रजि.) यांच्या भावना अनावर झाल्या. त्यांनी उत्तर दिले, ''हे अल्लाहच्या वैऱ्या! तू खोटे बोलत आहेस. तुझी शोकांतिका करण्यासाठी अल्लाहने त्यांचे प्राण रक्षिले आहेत.''

मग अबू सुफयान ओरडला, ''हुबलचा गौरव असो.''

त्याच्या प्रत्युत्तरादाखल उमर (रजि.) यांना जाहीर घोषणा करण्याची आज्ञा दिली, ''अल्लाह सर्वांत महान व सर्वसमर्थ आहे.''

अबू सुफयान पुन्हा ओरडून म्हणाला, ''आमच्या बाजुला उज्जा आहे, तुमच्या बाजुला कोणी नाही.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी पुन्हा तडाखा देण्यासाठी सोबत्यांना उत्तर देण्यास सांगितले, ''आमचा अल्लाह आमचा साहाय्यक आहे. तुम्हाला कुमक देणार मात्र कोणी नाही.''

मुस्लिम लोकांनी डोंगराचा आश्रय घेतल्यामुळे मदीना शहर अगदी उघडे पडले. परंतु कुरैशच्या सैन्यात इतके साहस व धैर्य नव्हते की मदीनेवर थेट हल्ला करावा किंवा उहूदच्या डोंगरावरून मुस्लिमांना पिटाळून लावावे. मोठ्या त्वरेने ते मक्केच्या दिशेने धावत सुटले आणि त्याच दिवशी त्यांनी मक्का शहर गाठले. त्यांनी मुस्लिमांस जी हानी पोहोचवली, तेच त्याच्यासाठी पुरेसे इनाम आणि त्यामुळेच त्यांचे गतवैभव त्यांना पुन्हा प्राप्त होईल असे त्यांना वाटले.

मदीनेला परतल्यानंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपल्या अनुयायांचा एक मोठा गट, परतणाऱ्या शत्रूचा पाठलाग करण्यासाठी त्यांना असा संदेश देण्यासाठी पाठविला की, ''मुस्लिमांची रणांगणावर जरी हानी झाली असली, तरी त्यांची हिंमत खचलेली नसून उद्दामपणाचा दुसरा हल्ला मोडून काढण्याचे त्यांच्याजवळ सामर्थ्य आहे.'' मुस्लिमांनी त्यांच्या नेत्यांचे सर्व संकेत व आज्ञा, ते थकलेले व हानी पावलेले असूनही, मोठ्या आनंदाने पार पाडल्या. आपला पाठलाग होत आहे. असे अबू सुफयानला कळल्यावर तो त्वरेने मक्केकडे निघाला. ते एक विलक्षण दृश्य होते. विजयी सैन्य उलट पळत होते आणि खिन्न झालेला व हानी पोहोचलेला छोटा समूह पाठलाग

करीत होता.

पवित्र कुरआनने तो प्रसंग खाली शब्दांत वर्णन केला आहे,

''लवकरच ती वेळ येणार आहे जेव्हा आम्ही सत्याचा इन्कार करणाऱ्यांच्या मनावर दरारा बसवू यासाठी की त्यांनी अल्लाहबरोबर अशांना भागीदार ठरविले आहे ज्यांच्या भागीदार असण्यासंबंधी अल्लाहने कोणतीही सनद उतरविली नाही. त्यांचे शेवटचे ठिकाण नरक आहे आणि फारच वाईट आहे ते ठिकाण जे त्या अत्याचाऱ्यांच्या नशिबी येणार आहे.'' (दिव्य कुरआन, ३ : १५१)

## उहूदच्या युद्धाबद्दल कुरआनचे निष्कर्ष

उहूदच्या युद्धाचे पुरेपूर विवेचन पवित्र कुरआनमध्ये केलेले आहे आणि त्यातील सर्व महत्त्वाच्या बाबी दाखवून दिलेल्या आहेत. इब्ने कय्यीमने त्याच्या 'जादुल मआद' या पुस्तकात त्यांचा नेमका उल्लेख केला आहे. ते बुद्धिमान व विचारप्रवर्तक निष्कर्ष आम्ही खाली देत आहोत.

**१. अल्लाह मुस्लिमांना तोवरच साहाय्य करील, जोवर ते पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या आज्ञांचे काटेकोरापणे पालन करतील.**

तीरंदाजांना पैगंबर मुहम्मद (स.) यांनी स्पष्ट आज्ञा दिली होती की त्यांनी तो मोर्चा सांभाळावा आणि कोणत्याही परिस्थितीत त्यांनी आपली जागा सोडू नये. या आज्ञेचे त्यांनी उल्लंघन केले व निष्काळजीपणाने तिचा भंग केला. या प्रसंगाचे वर्णन पवित्र कुरआनने खालील शब्दात केले आहे.

'' अल्लाहने (समर्थन व सहाय्याचे) जे वचन तुम्हाला दिले होते ते तर त्याने पूर्ण केले. सुरवातीला त्याच्या हुकुमाने तुम्हीच त्यांना ठार करीत होता. पण जेव्हा तुम्ही दुबळेपणा दाखविला व आपल्या कार्यात आपापसांत मतभेद दाखविले, आणि ज्या क्षणी ती वस्तू अल्लाहने तुम्हाला दाखविली जिच्या प्रेमात तुम्ही गुरफटला होता (म्हणजे युद्धातील लुटीचा माल) तेव्हा तुम्ही आपल्या सरदाराच्या आज्ञेविरूद्ध गेला. - कारण की तुम्हापैकी काहीजण इहलोकाचे इच्छुक होते आणि काहीजण मरणोत्तर जीवनाची इच्छा बाळगून होते. - तेव्हा अल्लाहने तुम्हाला अइमानधारकांच्या विरोधांत पराभूत केले की ज्यायोगे तुमची परीक्षा घ्यावी आणि सत्य असे आहे की असे असूनसुद्धा अल्लाहने तुम्हाला माफच केले कारण श्रद्धावंतांवर अल्लाह फार कृपादृष्टि ठेवतो.''

(दिव्य कुरआन, ३ : १५२)



वरील आयत स्वच्छ शब्दांत हे सांगते की मुस्लिमांची यशप्राप्ती ही पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या आज्ञांचे पालन करण्यावर अवलंबून आहे, जोवर ते त्यांचा शब्द पाळतील. कसल्याही अडचणीच्या प्रसंगी अल्लाह त्यांना साहाय्य करील. परंतु भौतिक मालमत्तेखातर पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या आज्ञा मोडतील, तर त्यांच्या वाट्याला दु:ख येणे क्रमप्राप्तच आहे.

**२. पैगंबर काही ईश्वर नाहीत.**

दुसरी गोष्ट अशी की पैगंबर मुहम्मद (स.) यांना व त्यांच्या सोबत्यांना झालेल्या दुखापती, या गोष्टीचे निदर्शक आहेत की तेसुद्धा मानवच आहेत. त्यांना महत्त्वाचे विजय मिळतात आणि ते शिकवण देत असलेले सत्य प्रभावी ठरते, तरी इतर मानवप्रमाणेच त्यांना मानवी अस्तित्वातील सुख-दु:खाचा वाटा उचलावा लागतो.

**३. संकटांनी मुस्लिमांना व दांभिकांना निवडून वेगळे केले.**

बदरच्या लढाईतील विजयाने आणि उहूदच्या लढाईत सोसाव्या लागणाऱ्या दु:खाने मुस्लिमांना पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनाच्या आदर्शापासून बरेच काही शिकण्याची संधी उपलब्ध करून दिली. आनंदाच्या क्षणी ते किती शांत चित्ताने राहत तसेच आपत्तीमध्येही ते शांत व निश्चल असत. विजयप्राप्तीने त्यांना उन्माद चढला नाही की जखमा व दुखापतीमुळे ते खचून गेले नाही.

बदरच्या लढाईत मुस्लिमांचा शानदार विजय झाल्याने, अनेक दांभिकांनी इस्लाममध्ये शिरकाव केला. त्यांची पैगंबर मुहम्मद (स.) यांवर प्रामाणिक निष्ठा कधीच नव्हती. तोंडाने ते पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या नेतृत्वावर विश्वास असल्याचे सांगत असत. कारण अरबस्तानात वाढीस लागलेल्या एका शक्तीचे ते प्रतीक होते आणि त्यांच्याशी युती साधल्याने त्यांना काही भौतिक लाभ मिळणे संभवनीय होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या संदेशाच्या सत्याचा त्यांच्यावर प्रभाव पडलेला नव्हता, तर त्यांच्या नेतृत्वाखाली जे बळ मुस्लिमांना मिळू लागले होते, त्याचे आकर्षण होते. प्रामाणिक इमानधारकांना व इस्लामवर इमान बाळगण्याचे ढोंग करणाऱ्या दांभिकांना निवडून पाखडून वेगळे करणे अत्यावश्यक होते, कारण इस्लामी राजकीय वर्तुळात दांभिकांचा मोठ्या प्रमाणावर भरणा असणे, त्याच्या मुळ पायालाच धोका होता. उहूदच्या लढाईत मुस्लिमांना सोसाव्या लागलेल्या दु:ख यातनामुळे पैगंबर मुहम्मद (स.) यांचे सच्चे व केवळ शाब्दिक सहानुभूती दर्शवून आदर करणारे व प्रत्यक्षात मनातून पैगंबर मुहम्मद (स.) यांशी निष्ठा नसणारे दांभिक, यांच्यामधील सीमारेषा अधिक स्पष्ट झाली, कारण त्यांच्यात

इमान नव्हते. कुरआनच्या शब्दांत,

''अल्लाह इमानधारकांना त्या परिस्थितीत कदापि राहू देणार नाही ज्या परिस्थितीत तुम्ही या वेळेस आढळता. तो पवित्र लोकांना अपवित्र लोकांपासून वेगळे केल्याशिवाय राहणार नाही. परंतु अल्लाहची ही प्रथा नाही की त्याने तुम्हाला परोक्षाची पूर्वसूचना द्यावी. (परोक्षाच्या गोष्टीची माहिती देण्याकरिता तर) तो आपल्या पैगंबरांपैकी ज्याला इच्छितो त्याची निवड करतो म्हणून (परोक्षाच्या गोष्टीच्या बाबतीत) अल्लाह आणि त्याच्या पैगंबरावर श्रद्धा ठेवा. जर तुम्ही श्रद्धा आणि ईशपरायणतेचे वर्तन स्वीकाराल तर तुम्हाला फार मोठा मोबदला लाभेल.''

(दिव्य कुरआन, ३ : १७९)

''यावेळी जरी तुम्हाला आघात पोहचला आहे तरी यापूर्वी असाच आघात तुमच्या विरोधकांना देखील पोहचला आहे. हे तर कालचक्र आहे ज्याला आम्ही लोकांदरम्यान भ्रमण करवीत असतो, तुमच्यावर ही वेळ अशासाठी आणली गेली की अल्लाह हे पाहू इच्छित होता की तुमच्यात खरे इमानधारक कोण आहेत, आणि त्या लोकांना वेगळे करू इच्छित होता जे खरोखर (रास्त मार्गाचे) साक्षीदार आहेत. कारण अत्याचारी लोक अल्लाहला अप्रिय आहेत.''

(दिव्य कुरआन, ३ : १४०)

या आयतीमध्ये स्पष्टपणे असे म्हटले आहे की सत्यासाठी झालेल्या त्या लढ्यात मुस्लिमांना इजा व दुखापती सोसाव्या लागलेल्या असल्या तरी त्यांच्या शत्रूंनाही तशा इजा व दुखापती अगोदर सोसाव्या लागलेल्या आहेत आणि त्यांच्यापाशी इमानचे बळ नसल्याने त्यांना त्या अधिकच त्रासदायक ठरल्या आहेत. या आयतींनी अगदी स्पष्ट करून दाखविले आहे की त्यांना झालेल्या हानीबद्दल कुरकुर करायला मुळीच जागा नाही, करण ईशयोजना संपूर्णपणे त्यांना ठाऊक नव्हती. यश आणि अपयश मुळीच हे आळीपाळीने येत असते आणि दुरावस्थेत माणसाचे गुण सिद्ध होतात.

### ४. हौतात्म्य ही श्रेष्ठतम कृत्य आहे.

मृत्यू येणे ही नेहमीच दुर्दैवाची निशाणी नाही. अल्लाहच्या आज्ञेनुसार सत्य व न्याय कारणासाठी ओढवून घेतलेला मृत्यू हा दु:ख व शोकाला कारणीभूत नसतो, तर हेवा वाटावा असा तो मान व विशेषाधिकार आहे, कारण त्यामुळे इमानधारकांना सरळ स्वर्गलोक प्राप्त होतो. म्हणून हानी अशी मुळीच मानायची नाही.



मक्कावासियांनी विजय मिळविला नव्हता, परंतु त्यांच्या विनाशाकडे जाण्यासाठी त्यांना थोडी सवलतीची ढील देण्यात आली होती, या लढाईत आढळून येते- की विजय मिळाला असे समजून घेतल्यानंतर त्यांनी क्रौर्याचे जे थैमान उहूदमध्ये घातले, त्यामुळे त्यांच्या पापाचा घडा काठोकाठ भरला. त्यामुळे त्यांच्याच काही सर्वोत्तम लोकांचा पाठिंबा व त्यांच्याशी झालेली युती त्यांना गमवावी लागली आणि अरबस्तानच्या भूमीरून मूर्तीपूजेचे उच्चाटन अधिक शीघ्र गतीने होण्यात त्यामुळे हातभार लागला.

### ५. भविष्यकाळात संभाव्य पीछेहाटीबद्दल घेण्याची दक्षता

उहूदच्या लढाईने मुस्लिमांना एक वस्तुनिष्ठ धडा शिकविला गेला की पैगंबर मुहम्मद (स.) हे अल्लाहचे सच्चे पैगंबर आहेत ते लवकर अथवा उशिरा, या इहलोकाचा निरोप घेणार आहेत. ही वास्तवता कायम मनात ठेवण्यावर कुरआन सतत मुस्लिमांना भर देऊन सांगतो. कारण रणांगणावर पैगंबर मुहम्मद (स.) ठार झाल्याची अफवा पसरता क्षणीच काही मुस्लिमाचे भान हरपले आणि मोठाच गोंधळ माजला, असे निदर्शनास आले.काही मुस्लिम तर अति दु:खाने व वैफल्याने म्हणू लागले, ''पैगंबर मुहम्मद (स.) हेच आपल्यात राहिले नाहीत, तर आता लढून तरी काय उपयोग आहे.'' अशा प्रकारचा निराशावाद न दाखविण्याबद्दल कुरआन सक्त ताकीद देतो. व्यक्तीनिष्ठेपेक्षा अल्लाहवरील निष्ठा हीच इमान ठरते व त्या उलट व्यक्तीनिष्ठा अइमान ठरते असे बजावतो,

''मुहम्मद (स.) याशिवाय काही नाहीत की ते केवळ एक पैगंबर आहेत, त्यांच्यापूर्वी इतर पैगंबर देखील होऊन गेले आहेत, मग काय जर ते मरण पावले अथवा त्याना ठार केले गेले तर तुम्ही लोक मागच्या पावली परताल? लक्षात ठेवा! जे परत फिरले ते अल्लाहचे काहीही नुकसान करणार नाही, परंतु जे अल्लाहचे कृतज्ञ दास बनून राहतील तो त्यांना त्याचा मोबदला देईल.''

(दिव्य कुरआन, ३ : १४४)

या आयतींमध्ये कुरआनने ही गोष्ट स्पष्ट केली आहे की पैगंबर मुहम्मद (स.) त्यांच्या आधीच्या सर्व पैगंबरांप्रमाणे अल्लाहचे पैगंबर आहेत, त्यांनाही एके दिवशी मृत्यूची चव चाखावी लागणार आहे, त्यापासून सुटका नाही. ते स्वत: अमर नसून जे उद्दिष्ट त्यांनी हाती घेतले व जी शिकवण व संदेश देत आहेत, ते अमर आहे आणि ईश्वराकडून आहेत. उहूदच्या घटनेच्या ७ वर्षाच्या कालावधीनंतर, जेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांचा आत्मा परलोक निवासी झाला आणि त्यांचे अचेत शरीर बिछाण्यात पडून राहिल्यानंतर, त्यांच्या एकनिष्ठ अनुयायांमध्ये

इतकी तारांबळ उडाली की आकाश व धरणी फाटण्याची ते अपेक्षा करू लागले. प्रिय माननीय उमर (रजि.) यांना स्वत:चे भान नव्हते. कोमल हृदयाचे पण सतत शांत चित्त राखणारे माननीय अबू बकर (रजि.) जेव्हा मदीनातील उपनगरामधील त्यांच्या निवासस्थानातून तेथे आले आणि जमलेल्या लोकांना त्यांनी ठाम मनाने खालील शब्दात संबोधले, ज्यावरून त्यांना 'सिद्दीकी' अशी बिरूदावली लोकांनी दिली ते म्हणतात,

''हे लोकहो! जे पैगंबर मुहम्मदची (स.) यांची भक्ती करीत होते, त्यांना कळू द्या की मुहम्मदचे प्रयाण होऊन चुकले आहे. परंतु जे अल्लाहची उपासना करतात त्यांना कळू द्या की अल्लाह चिरंतन व शाश्वत आहे, त्याला कधीही मरण नसते.'' नंतर त्यांनी म्हटले, ''आणि मुहम्मद (स.) पैगंबर होते, अधिक काही नव्हते.''

यावरून सर्व शंकांचे व भयाचे निराकरण झाले आणि मोठी शांतता पसरली. माननीय अबू बकर (रजि.) यांनी समयोचितपणे उल्लेख केलेली आयत पुन्हा पुन्हा सतत वाचणाऱ्या लोकांनी म्हटले की, जेव्हा माननीय अबू बकर (रजि.) यांनी त्या अविस्मरणीय प्रसंगी ती आयत म्हटली, तेव्हा जाणवले की ती नुकतीच अवतरली आहे.

मुस्लिमांसाठी नैतिक तसेच सामाजिक व राजकीय दृष्टिकोनातून उहूदमधील दुर्दैव जितके महत्त्वाचे होते, तितकेच बदर येथील विजयाचेही होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या आज्ञांचे कडक पालन करण्याची किती गरज आहे, हे त्यांनी दाखवून दिले. इमानधारकांमध्ये त्यांच्यावर येऊन ठेपलेल्या गंभीर व महान जबाबदारीची जाणीव जागृत केली, कारण त्या ईशसंदेशाचे तेच ध्वजधारक राहिले होते आणि त्या संदेशाची जगभर प्रस्थापना करण्याखातर त्यांच्यापुढे येणाऱ्या संकटांचीही त्यांना जाण होती. अल्लाहचे संदेशवाहक या नात्याने पैगंबर मुहम्मद (स.) यांचा खरा दर्जाही त्यानी स्पष्ट केला. तसेच स्वामीची दया व कृपा आशेचा व धैर्याचा दीपस्तंभ दाखविण्यासाठी आहे. अन्यथा संकटाच्या दु:खाच्या प्रसंगी ते नैराश्यग्रस्त होऊन, 'अल्लाहच्या धर्माकडे' त्यांनी पाठ फिरविली असती.



## अरबी आणि यहुदी टोळ्यांवर उहूदच्या युद्धाचा परिणाम

उहूदच्या युद्धाचे इस्लाम-शत्रूवर अनेक परिणाम घडून आले. एकीकडे मुस्लिमांच्या सतत वाढणाऱ्या बळाने ते चिंतातुर व गोंधळलेले होते, तर उहूदमधील घटनांमुळे त्यांच्या गळालेल्या उत्साहाला नवजीवन प्राप्त होण्याचा नवा जोम मिळाला आणि ईशश्रद्धा पूर्णत: नष्ट करण्याचा ते विचार करू लागले. यहुद्यांनी उहूदमध्ये लढाईत मोठा आघात मुस्लिमांवर केला होता, आता त्यांच्या पाठीत खंजीर खुपसण्याची एक नामी संधी त्यांना मिळाली. त्यांना असे वाटले की सर्वांनी एकत्रित प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यास ते इस्लामची शक्ती उलथून टाकू शकतील व त्यांना उद्ध्वस्त करू शकतील. त्यांनी विश्वासघाताचे पहिले कृत्य असे केले, की मुस्लिमांविरूद्ध सार्वजनिक असंतोष व कटुता निर्माण करण्यासाठी अगदी आटापिटा केला. कुरआनमधील पवित्र शब्दांचा हेतुपुरस्सर चुकीचा उच्चार करून अर्थाचा अनर्थ करू लागले. इस्लामची व त्याच्या अनुयायांची निंदानालस्ती करण्यासाठी एक मोहीम आखण्यात आली. अल्लाहच्या धर्माची टिंगल-टवाळी करण्यासाठी विडंबनात्मक काव्ये रचून सार्वजनिक जागी ते कविता गाऊ लागले. अश्लील, बिभत्स व शृंगारिक गाणी म्हणून व प्रियजनांच्या नावाने उद्धार करून, ते मुस्लिम महिलांचा अपमान करून सतावू लागले. इस्लामशी वैरभाव असणाऱ्या टोळ्यांमध्ये वैराची भावना पेटत ठेवण्यासाठी ते प्रक्षोभकारक व चिथावणी देणारी काव्ये जाहीरपणे करू लागले.

अशा रीतीने पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अनुयायांना यहुदी गटाने जीवन दु:सह्य करून सोडले. त्यांच्या चिथावणीखोर कृत्यांकडे पैगंबर मुहम्मद (स.) यांचे लक्ष होते. प्रथम ते कैयनुकाच्या टोळीकडे गेले आणि त्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी केलेल्या कराराचा आदर व पालन करण्यास सांगितले. परंतु त्यांच्या बोधप्रद बोलण्याकडे त्यांनी मुळीच लक्ष दिले नाही. इतर टोळ्यांकडून मदतीचे आश्वासन त्यांना मिळाले होते. त्यांचे उत्तर अगदी आव्हानपूर्ण होते आणि त्यांनी आपला निवास एका मजबूत बालेकिल्ल्यावर नेला. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांना वेढा घातला व पंधरा दिवसांपर्यंत तो ठेवला. बाहेरून कसलीही मदत मिळू न शकल्यामुळे ते असहाय्य झाले आणि शरण आले. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मदीना सोडून जाण्याची व अन्य कोठेही वसाहत करण्याची त्यांना आज्ञा दिली. अशा तऱ्हेने हद्दपार होऊन ते खैबरला गेले आणि तेथे स्थायिक झाले.

आणखी एका यहुदी टोळी- बनू नजीरचीही तशीच वागणूक करण्यात आली. त्यांनाही त्यांची घरे सोडून जाण्यास भाग पाडण्यात आले, कारण शांततेच्या कराराच्या नूतनीकरणास त्यांनी विरोध दर्शविला व नकार दिला. उलट पैगंबर मुहम्मद (स.) यांना ठार करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

## आकस व वैराचे नवे लोंढे

अशा अत्यंत बिकट प्रसंगी, जेव्हा 'अज्ञाना'च्या शक्तींनी मुस्लिमांवर चौफेर आक्रमण सुरू केले होते आणि मुस्लिमांचे अस्तित्वच धोक्यात आणले होते, अशा परिस्थितीतही अल्लाहच्या धर्माचा प्रसार करण्याचे कार्य चालूच ठेवले होते; याची नोंद घेणे महत्त्वाचे आहे. या एकाच उद्दिष्टासाठी त्यांनी आपली सर्व शक्ती खर्ची घातली होती. इस्लामचा प्रकाश निरनिराळ्या टोळ्यांमध्ये प्रसार करण्यासाठी त्यांनी धर्मोपदेश देणाऱ्यांचे गट तयार केले. इस्लामशत्रूंनी या उदात्त उद्दिष्टाचा गैरफायदा उपटण्यात दिरंगाई केली नाही. धर्मप्रसाराच्या उत्साहाने भारलेल्या या धर्मोपदेशकांना, काही कपटी लोक, पैगंबर मुहम्मद (स.) यांची शिकवण जाणून घेण्याच्या निमित्ताने आपल्याकडे बोलावून घेत आणि तावडीत आल्यानंतर त्यांना ठार करून टाकीत. त्या कृत्यांचा त्यांना किंचितही पश्चात्ताप होत नसे. अशा प्रकारची विश्वासघाताची एक घटना हिजरी सनाच्या चौथ्या वर्षी सफराच्या महिन्यात बेअरे-माऊन येथे घडली. ७० धर्मोपदेशकांच्या एका गटावर बनू अमिर आणि बनू सुलैम या टोळ्यांनी पाशवी हल्ला चढविला होता. धर्मोपदेशकांना ठार करण्यात आले. केवळ एक माणूस अम्र बिन उमैय्या निसटला आणि त्यानेच पैगंबर मुहम्मद (स.) यांना, त्यांच्या सोबत्यांची हृदयद्रावक हत्येची बातमी मदीनेत येऊन दिली. त्या टोळीचा विश्वासघात व रानटीपणा पाहून पैगंबर मुहम्मद (स.) यांना व त्यांच्या अन्य सोबत्यांना मोठाच धक्का बसला.

तशीच आणखी एक शोकांतिका 'रजी' या ठिकाणी करण्यात आली. काही टोळ्यांनी त्यांचे एक शिष्टमंडळ पैगंबर मुहम्मद (स.) याकडे पाठविले आणि इस्लामची तत्त्वे शिकवण्याची त्यांची इच्छा असल्याचे प्रदर्शित केले. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांची विनंती तत्काळ मान्य केली आणि सहा मुस्लिमांना ईशधर्माची मूळतत्त्वे शिकविण्यासाठी त्यांच्याकडे पाठविले. जेव्हा ते रजी येथे पोहोचले, तेव्हा लिहयान टोळीच्या सशस्त्र युवकांनी त्यांच्यावर अचानक हल्ला केला. तीन धर्मोपदेशक शौर्याने लढत ठार झाले. अन्य तिघांना कैद करून मक्का शहरात नेऊन विकण्यात आले. एकाने त्याला बांधलेली दोरी सैल करून निसटून पळाला. तोच एक मोठा दगड त्यांच्यावर टाकण्यात आला व तो चेंगरून ठार झाला. उरलेल्या दोघांना जैद व खुबैब यांना सफवान बिन उमैय्या आणि हरिस टोळीने विकत घेतले, जेणेकरून त्यांची हत्या करता यावी आणि बदरच्या लढाईत ठार झालेल्या त्यांच्या टोळीप्रमुखांच्या मृत्युचा सूड उगवता यावा. इस्लामवर अप्रतिम प्रेम असणाऱ्या त्या दोघांच्या मृत्युचे दृश्य अविस्मरणीय होते. अल्लाहच्या मार्गात त्यांनी खुषीने प्राणार्पण केले आणि इस्लामचा त्याग करून सुटका करून घेण्यास साहसपूर्ण निर्धाराने नकार दिला.



जैदला जखडून तमीमकडे नेण्यात आले आणि गंमत पाहाण्यासाठी मक्केहून आलेल्या मोठ्या समूहासमक्ष त्यांचे प्राण घेण्यात आले. त्यांना जेव्हा वध करण्याच्या खांबाला जखडून बांधले गेले, तेव्हा सुफयान बिन हर्ब त्यांना म्हणाला, "जैद! मी तुला ईश्वराची शपथ देऊन सांगतो, आता तुला अशी इच्छा होते की नाही की तुझ्या या अवस्थेत मुहम्मद असायला हवे होते आणि त्यांच्या ठिकाणी तू सुरक्षितपणे घरी बसला असता."

त्यावर जैदने निर्भयपणे उत्तर दिले, "अल्लाहची शपथ, मुहम्मद (स.) आता जेथे आहेत, तेथे त्यांना एक काटाही टोचू नये आणि मी माझ्या कुटुंबासमवेत असावे असे मला वाटते."

यावर त्यांना ठार मारण्यात आले. अल्लाह त्यांच्याशी आणि त्यांच्या मित्रांशी प्रसन्न राहो. अबू सुफयान नेहमी म्हणत असे, "मुहम्मदवर त्यांच्या मित्रांचे नितांत प्रेम होते, तसे अन्य कोणाही माणसावर त्यांच्या मित्रांनी प्रेम केल्याचे मी कधीही पाहिले नाही."

खुबैबनेही त्यांच्या मित्रांप्रमाणे धैर्याने व निर्धाराने मृत्युला आलिंगन दिले. त्यांच्या मित्रांप्रमाणे त्यांनाही एका मोठ्या पटांगणात नेण्यात आले. तेथे पुरूष, स्त्रिया व मुलांचा एक मोठा समूह ते रक्तरंजित दृश्य पाहण्यासाठी गोळा झाला होता. आपणाला प्रार्थना करण्यासाठी थोडा अवधी द्यावा अशी वध करण्याऱ्यांना त्यांनी विनवणी केली. त्यांची विनंती मान्य करण्यात आली. अत्यंत विनम्रमणे त्यांनी आपले शीर जमिनीवर टेकले आणि त्यांच्या अंत:करणपूर्ण निष्ठा व उद्देशून म्हटले, "मी जर लगबगीने माझी नमाज पुरी केली नसती, तर तुम्हाला असे वाटले असते की मृत्युच्या भयाने मी विलंब लावत आहे." त्या जालिमांनी एका लाकडावर त्यांना उभे करून करकचून बांधले. त्या ठिकाणी प्रसंगाच्या अवस्थेतही ते पूर्णपणे अविचलित होते. जे सत्य उचलून धरण्याचे व त्याचा प्रसार करण्याचे त्यांचे कर्तव्य होते, त्यावर ठाम आत्मविश्वास होता आणि आपल्या प्राणाची आहुती देण्यामुळे, पारलौकीक जीवनात त्यांना प्रचंड इनाम मिळणार आहे, याची पूर्ण खात्री होती. मोठ्या उत्साहाने त्यांनी पुढील शब्द उच्चारले, "हे अल्लाह! तुझे पैगंबर मुहम्मद (स.) यांना तू कळव." त्या क्लेश व वेदनांच्या समयी त्यांनी खालील ओळी म्हटल्या, यावरून त्यांनी किती यातना सोसल्या आणि अल्लाहवर त्यांची किती अढळ श्रद्धा होती हे दिसून येते,

"त्या संयुक्त समितीने त्यांच्या टोळ्या माझ्या भोवताली गोळा केल्या. जे कोणी येऊ शकले, त्या सर्वांना निमंत्रित केले. त्यांच्यापैकी प्रत्येकजण संतापाने जळत होता. मी अगतिकपणे त्यांच्या हातात होतो. त्यांनी त्यांची बायकामुलेही आणली होती. मला उंच

जागी झाडाच्या खोडाला घट्ट जखडून बांधले होते. माझ्या असहाय्यतेची व यातनांची तक्रार मी केवळ अल्लाहकडेच करतो. संयुक्त समितीचे लोक मला ठार करणार आहेत हे सिंहासनाचे स्वामी! त्यांच्या योजनेविरूद्ध मला सहनशक्ती प्रदान कर. ते माझ्या मांसाचे लहान लहान लचके कापून काढीत आहेत. जीवनाची सर्व आशा कायमची मावळली आहे, स्वामीची इच्छा असल्यास माझ्या छाटलेल्या अवयवांना व मोडलेल्या सांध्यांना तो आशीर्वाद देईल. त्यांनी माझ्यासमोर पर्याय ठेवला. परंतु अश्रद्ध व बेईमानीपेक्षा मृत्यू अधिक श्रेयस्कर आहे. माझ्या डोळ्यांतून आसवे गळत आहेत, पण ती मृत्यूच्या भयाने नव्हेत. भय वाटायला मी कोण आहे. अल्लाहची शपथ, मुस्लिम राहून जर मला मृत्यू आला, तर मी भीत नाही. अल्लाहखातर मी कोणत्या कुशीवर माझा देह टाकू. मी शत्रूसमोर शरणागती पत्करणार नाही आणि मी चिडणारही नाही व संतापणारही नाही. मी माझ्या स्वामीकडे परत जात आहे.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सोबत्यांचे त्यांच्यावर आणि त्यांनी शिकवण दिलेल्या धर्मश्रद्धेवर जिवापाड किती प्रेम होते, त्याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

दु:खाची ही दीर्घ कहाणी संक्षिप्त करून सांगायची झाल्यास इस्लामविरूद्ध आकसाने व वैराने संपूर्ण अरबस्तान धुमसत होता. यहुदी, दांभिक व मूर्तिपूजक, वास्तविकपणे विरोधी सर्व शक्तींनी हातमिळवणी केली होती आणि इस्लामचे अस्तित्वच पुसून टाकण्याचा निर्धारपूर्वक चंग बांधला होता. पैगंबर मुहम्मद (स.) यांना लक्ष द्यायला व संघर्ष करायला एकच आघाडी नव्हती, तर अनेक आघाड्यांवर त्यांना लक्ष देण्याची गरज होती. काळाच्या सर्व कसोट्यांत पैगंबर ठळकपणे उतरले आणि त्यांच्या ईशप्रदत्त बुद्धीमत्तेने सर्व आपत्तीवर मात केली.

## खंदकाचे युद्ध

आम्ही वर पाहिले आहे की बनू नजीरच्या टोळीला मदीनेहून हद्दपार होऊन खैबरला जाऊन राहावे लागले होते. ते अत्यंत श्रीमंत लोक होते आणि त्यांचा नेता हुय्य बिन अख्तब हा पैगंबर मुहम्मद (स.) यांचा हाडवैरी होता. त्याने सर्व अरबस्तानभर आपले हेर पाठविले आणि सर्व वेगवेगळ्या टोळ्यांना त्यांना येऊन मिळण्याचे आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर व त्यांच्या अनुयायांवर एकत्रितपणे हल्ला करण्याचे आवाहन केले. तसे केल्यास एकदाच त्यांचा पूर्णपणे काटा काढता येईल, असे त्यांना भरविले. कुरैशी लोकांनी त्याला मोठ्या उत्साहाने प्रतिसाद दिला आणि म्हणाले, ''हे यहुदी लोकांनो! ईशग्रंथधारकांपैकी तुम्ही प्रथम आहात आणि मुहम्मदशी आमच्या संघर्षाचे स्वरूप तुम्हाला चांगले ठाऊक आहे. आमचा धर्म अधिक चांगला आहे की



त्यांचा?'' त्यांनी उत्तरादाखल सांगितले, ''मुहम्मद प्रचार करीत असलेल्या धर्मापेक्षा तुमचा धर्मच अधिक चांगला आहे आणि तसा दावा करण्याचा तुम्हाला हक्क आहे.'' हे शब्द ऐकून कुरैशचा आनंद गगनात मावेनासा झाला आणि समान शत्रूशी लढण्यासाठी त्यांनी यहुद्यांशी युती केली. मोठमोठ्या रकमा गोळा करण्यात आल्या. युद्धाच्या तयारीसाठी यहुद्यांनी व मक्केतील लोकांनी सढळ हाताने देणग्या दिल्या. संयुक्त समितीत सामील करून घेण्यासाठी नाकारणाऱ्या एकाही टोळीशी संपर्क साधण्याचे सोडले गेले नाही. इस्लामच्या उगवत्या शक्तीमधील व बाकीच्या सर्व अरबस्ताना-मधील ते एक निर्णायक युद्ध होते.

पैगंबर मुहम्मद (स.) यांना त्यांच्या दुष्ट योजनेची बातमी समजली, तेव्हा पर्शियन असलेल्या सलमानच्या सल्ल्यानुसार, मदीना शहराभोवती सर्व बाजुंनी खंदक खोदण्याचा त्यांनी निश्चय केला, हा लष्करी डावपेच अरबांना तोवर ठाऊक नव्हता. घरांच्या बाहेरच्या भिंती इतक्या भक्कम बांधण्यात आल्या होत्या की तो एक उंच दगडी तट बनला होता आणि शत्रूच्या हल्यापासून अभेद्य संरक्षण होते. खंदक खोदण्याचे कष्टप्रद काम ताबडतोब सुरू करण्यात आले. जबाबदारीच्या जाणिवेचे, विनम्रतेचे, सहानुभूतीचे व समतेचे एक अपूर्व उदाहरण होते. हे सर्व गुण पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या स्वभावाचाच एक भाग होता. ते अंतिम पैगंबर असल्याने अल्लाहचे लाडके पैगंबर होते. मुस्लिमांच्या निष्ठांचे व विश्वासाचे ते केंद्रबिंदू होते, ते सर्वाधिक सदाचारी होते आणि त्यांच्या सोबत्यांमध्ये ते सर्वाधिक आदरणीय होते. इतका आदर मिळत असूनही त्यांनी स्वत:साठी कसलाही विशेष हक्क कधीही घेतला नाही. कसलेही क्षुल्लक व हलक्या प्रतीचे काम ते स्वत: आनंदाने करीत. माणसाला कल्पना करता येण्यासारख्या कसल्याही सुखसोई, सवलती व विशेष हक्क त्यांना मिळू शकले असते, परंतु त्या ऐहिक व भौतिक हिताकडे त्यांनी पूर्ण दुर्लक्ष केले आणि एका कफल्लक वंचित व कष्टकरी माणसाप्रमाणे जीवन व्यतीत करणे पसंत केले.

कार्लाईल लिहितो- ''कसल्याही प्रकारच्या इच्छेवर मात करणारे, उत्तम असे काहीतरी त्यांच्यात नक्कीच होते. अन्यथा त्यांच्याशी निकटच्या संपर्कात असलेले व त्यांच्याशी तेवीस वर्षापर्यंत लढायांच्या धुमश्चक्रीत झुंजणाऱ्या अरब लोकांनी, त्यांच्याबद्दल मनोमन, इतका आदर दाखविला नसता. ते अगदी कोपिष्ट लोक होते, तत्काळ त्यांच्यात भांडणाचा विस्फोट होई आणि भयंकर रक्तपात ईर्ष्यापूर्ण लढाया होत. त्याला कसलेही समर्पक कारण लागत नसे. त्यांच्या बंडखोर प्रवृत्तीला कोणीही वेसण घालू शकत नव्हते. ते त्यांना पैगंबर म्हणत असत. तुम्ही विचाराल का? पैगंबर मुहम्मद (स.) त्यांच्या समोरासमोर उभे राहात, कसल्याही गूढतेच्या आच्छादनात नव्हे तर मोकळेपणाने,

स्वत:च्या कपड्यांना आपल्या हातांनी ठिगळ लावत, स्वत:ची पादत्राणे स्वत: दुरूस्त करीत, त्यांच्यामध्ये लढणारे, सल्ला देणारे आणि आज्ञा करणारे असल्याने, ते कशा प्रकारचे मनुष्य आहेत, हे त्यांनी पाहिलेले असेलच. मग त्यांना जे काही म्हणायचे असेल ते म्हणू द्या. रत्नजडीत मुकुट परिधान केलेल्या कोणत्याही सम्राटाच्या आज्ञांचे इतके जिवापाड व काटेकोर पालन कधीही झाले नाही जितके आज्ञापालन, स्वत:च्या अंगरख्याला स्वत:च ठिगळ जोडणाऱ्या या माणसाचे झाले.''

हदीसच्या दप्तरात या गोष्टीची नोंद आहे की मुस्लिमांनी त्या खंदकाचे खोदकाम अत्यंत जिकिरीच्या व त्रासदायक परिस्थितीत केले. अंगाला झोंबणाऱ्या थंड वाऱ्याच्या वेदना सोसल्या. कोणीतरी त्यांना जेव्हा थोडेसे खायला देऊ करीत असे तेव्हा ते एकटे कधीच खात नसत, तर इतरांनाही त्यात वाटेकरी करीत असत. जबिरा बिन अब्दुल्लाह यांच्या निवेदनाच्या आधाराने असे कथन केले जाते की, ''खोदकाम करण्यात पैगंबर मुहम्मद (स.) जेव्हा गढलेले होते, तेव्हा त्यांना फारच भूक लागलेली आहे, असे मला दिसले. मी माझ्या पत्नीकडे आलो, आम्ही आमच्याजवळ असलेली छोटी मेंढी कापून पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यासाठी ती भाजून देण्यास सांगितले.'' रात्र झाली आणि पैगंबर मुहम्मद (स.) खंदकातून वर आले, कारण दिवसभर आम्ही काम करीत असू आणि संध्याकाळी घरी परतत असू. मी पैगंबर मुहम्मद (स.) यांना म्हणालो की आमच्या घरी त्यांच्यासाठी भाकरी व मटनाचे जेवण तयार केले आहे.तेव्हा त्यांनी काही थोडे सोबती बरोबर घेऊन माझ्या घरी जेवायला आले, तर मला आनंद होईल असे सांगितले. परंतु आपले सर्व साथीदार भुकेच्या यातनांनी व्याकूळ झालेले असताना पैगंबर मुहम्मद (स.) एकटे काही खात नसत. म्हणून त्यांनी सर्वच सोबत्यांना जेवणात सहभाग घेण्यासाठी बोलाविले. जाबिरच्या पत्नीला त्यांनी निरोप पाठविला की अन्न शिजत असलेले मातीचे भांडे पैगंबर मुहम्मद (स.) तेथे पोहचेपर्यंत चुलीवरून खाली घेऊ नये. जाबिर म्हणतात, ''माझी पत्नी अत्यंत गोंधळून व घाबरून गेली होती, कारण आम्ही थोड्या माणसांचेच जेवण बनविले होते आणि पैगंबर मुहम्मद (स.) तर आपल्या सर्वच सोबत्यांना घेऊन आले होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अल्लाहचे नाव घेऊन अन्नाला बरकतीचा शुभाशीर्वाद दिला. प्रत्यक्षात घडले असे की ते अन्न एक हजारांपेक्षा अधिक लोकांना पुरले.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हातून घडलेल्या एका अद्‌भूत चमत्काराची ही घटना, पैगंबर मुहम्मद (स.) यांना आपल्या सोबत्यांशी किती प्रेम व कळवळा होता, या गोष्टीवर बराच प्रकाश टाकते. त्यांच्याखातर कितीही मोठा त्याग करण्यास ते नेहमी तत्पर राहत आणि स्वत:च्या गरजांवर ते सोबत्यांच्या गरजांना अधिक प्राधान्य देत असत. या



तीव्र बंधुभावाच्या जाणिवेमुळे आणि मित्रांशी अत्यंत सहानुभूतीच्या प्रवृत्तीमुळे, तसेच मानवाबद्दल त्यांच्या मनात असलेल्या असीम प्रेमामुळेच, पैगंबर मुहम्मद (स.) यांना विविध टोळ्यांमधून, विविध वंशामधून आणि निरनिराळ्या देशांमधून अनेक निष्ठावान अनुयायी मिळविण्यात यश आले. अशा अनुयायांची निष्ठा इतकी होती की पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या इशाऱ्यावर ते आपल्या प्राणांची आहुती देण्यास खुषीने तयार होते.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सोबत्यांचा उत्साह जागृत करण्याखातर कुरआनमध्ये ज्या आयतींचा उल्लेख केला गेला, त्यात अल्लाहवरील प्रगाढ निष्ठेशी ती एकवटली आहे. त्याच ओळी मस्जिद बांधतानाही म्हटल्या गेल्या होत्या.

''हे स्वामी! पारलौकिक जीवनातील सुखासारखे दुसरे कोणतेही सुख नाही. हे स्वामी! अन्सार व स्थलांतरितांवर दया व कृपा करा.''

खंदकाचे खोदकाम करतानाही पैगंबर मुहम्मद (स.) अनुयायांनी अल्लाहवरील त्याच्या प्रगाढ निष्ठेची, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पैगंबरत्वाची आणि इस्लामला त्यांच्या परिपूर्ण पाठिंब्याची जाहीर घोषणा केली.

''अल्लाहच्या नावाने आम्ही आमच्या कार्याचा आरंभ करतो. त्याला सोडून आम्ही अन्य कोणाची उपासना केली तर हे आमचे किती दुर्भाग्य ठरले असते. आपला पालनकर्ता किती भला व चांगला आहे. आमचा धर्म किती सुंदर व सर्वोत्तम आहे. आम्ही पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी प्रतिज्ञेने बद्ध झालेले लोक आहोत. आम्ही जिवंत असेपर्यंत झटत राहू. आम्ही अखेरच्या श्वासापर्यंत इस्लामशी कटिबद्ध राहण्याची प्रतिज्ञा केलेले लोक आहोत.''

पैगंबर मुहम्मद (स.) स्वत: अनेकदा खालील ओळी तोंडाने म्हणत असत,

''हे स्वामी! तुझ्याशिवाय आम्हाला योग्य मार्गदर्शन लाभणार नाही. आम्ही दानधर्मही केला नसता व प्रार्थनाही केली नसती. आम्हावर शांती उतरव आणि रणांगणात आम्हाला सहनशक्ती दे, कारण ते आमच्याविरूद्ध उठले आहेत आणि आम्हाला खोडसाळपणाच्या त्यांच्या जाळ्यात अडकविण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यांच्या जाळ्यात अडकण्याचे आम्ही नाकारले, होय आम्ही नकार दिला.''

मानवी जीवनांशी इस्लामने कशी पद्धतशीर एकात्मता साधली होती, याची वाचकांना नीटशी कल्पना यावी, म्हणून वरील ओळी उद्‌धृत करण्यात आल्या. जीवनामध्ये विविध क्षेत्राची विभागणी करून अगदी घट्ट विभाग निर्माण करणारी कृत्रिम बंधने त्याने नष्ट करू शकत नाही. माणूस जेव्हा अल्लाहला शरण जातो, तेव्हा त्याचे संपूर्ण जीवनच पारमार्थिक बनते. स्वरक्षणासाठी खंदक खोदण्याचे काम, वरवर पाहणाऱ्याला

अगदी जगरहाटीचे काम वाटेल, ते सुद्धा धार्मिक निष्ठेचे बनते. माणसाची धर्माची ओड म्हणजे काही क्षणाची नैतिक व शारीरिक विकास असेही समजत नाही, तर धार्मिक निष्ठा हेच माणसाच्या सर्व विचारांचे, त्याच्या सर्व कृतीचे आणि नैतिकतेचे उगमस्थान आहे, असे इस्लाम मानतो.

मानवी जीवन हे एकेकट्या स्वतंत्र घटनाची मालिका नव्हे, तर त्याच्या जीवनाच्या विविध पैलूंमध्ये त्याचा पाहण्याचा दृष्टिकोन हाच त्या माळेत ओवलेल्या सोनेरी धाग्यासारखा आहे. मॅकिएवलीने म्हटले की व्यवहाराचा एक नियम असतो आणि धर्माचा दुसरा नियम असतो. असा युक्तिवाद करण्यास इस्लामध्ये वाव नाही. कारण अशा प्रवृत्तीमुळे बिनदिक्कतपणाची दारे उघडी होतात आणि त्या बिनदिक्कतपणाच्या मालिकेने मानवी प्रतिष्ठाच दाबली जाते.

## भावी विजयांची भाकिते

विश्वासार्ह आधाराने असे वर्णन केले जाते की खंदक खोदताना एक कठीण दगड लागला आणि मुस्लिमांना तो फोडता येत नव्हता. सोबत्यांची अगतिकता पाहून पैगंबर मुहम्मद (स.) यांनी एक टिकाव हातात घेतला आणि ते खंदकात उतरले. त्यांनी त्या दगडावर जोराचा प्रहार केला. दगड हलला आणि त्यातून ठिणगी पडली. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मोठ्याने ''अल्लाहो अकबर'' (अल्लाह सर्वांत महान आहे.) अशी आरोळी दिली. पुढे ते म्हणाले, ''माझ्याकडे सीरियाच्या किल्ल्या देण्यात आल्या आहेत. त्या देशातील लाल रंगाचे राजवाडे व प्रसाद माझ्या डोळ्यांनी मी पाहात आहे.'' त्यांनी दगडावर दुसरा प्रहार केला आणि तो फुटला आणि पुन्हा ठिणगी पडली. त्यांनी पुन्हा ''अल्लाहो अकबर''ची घोषणा केली व म्हणाले, ''मला पर्शियाच्या किल्ल्या देण्यात आल्या. अल्लाह शपथ! मला मदयनचे पांढरे शुभ्र राजवाडे व प्रसाद दिसत आहेत.'' तिसऱ्या प्रयत्नात त्या दगडाचे तुकडे तुकडे झाले आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले की त्यांना येमेनच्या किल्ल्या दिल्या जातील. ते म्हणाले, ''अल्लाह शपथ! मला या जागी सनाचे प्रवेशद्वार दाखविण्यात आले आहे.''

इतिहासातील नोंदी या वास्तवतेचा पुरावा आहे, की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी केलेली ती भविष्यवाणी अगदी तपशिलासह पुढील काळात खरी ठरली. हे भाकीत करताना ती राज्ये इतकी सामर्थ्यशाली होती की कल्पना ताणूनही मुस्लिमांना ती राज्ये जिंकता येतील, असे वाटत नव्हते. परंतु वाढत्या इस्लामी बळापुढे ती पत्त्याच्या बंगल्यासारखी कोसळली.



## प्रत्यक्ष युद्ध

मुस्लिमांची युद्धाची तयारी अद्याप पूर्ण झाली नव्हती, तोच संयुक्त समितीचे २४,००० प्रशिक्षित योद्ध्यांचे एक बलाढ्य सैन्य, इस्लामला चिरडून टाकण्याच्या निर्धाराने मदीनेच्या दारावर येऊन ठेपले. अरबस्तानच्या इतिहासात इतके मोठे सैन्य कधीही गोळा झाले नव्हते. संपूर्ण अरबस्तान मुस्लिमांच्या रक्तासाठी तहनलेला होता. याच अडचणीच्या वेळी दांभिक लोकांची भली मोठी संख्या, या ना त्या निमित्ताने पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यापासून फुटून वेगळी झाली. बनू कुरैजा बराच काळपर्यंत पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या बाजूने होता, तोही फुटला आणि शत्रूच्या गोटास जाऊन मिळाला, कारण बनू नजीर या टोळीचा प्रमुख असलेल्या हुय्य बिन अख्तब याने त्याला सर्व प्रकारचे साहाय्य व इनाम देण्याचे वचन दिले होते.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्याशी बोलणी करण्यासाठी साद बिन मुआद (रजि.) आणि साद बिन उबादाह (रजि.) यांना त्यांच्याकडे पाठविले आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी त्याने केलेल्या कराराचे पालन करण्यास त्याचे मन वळविण्यास सांगितले. या निष्ठावान इस्लामी पुत्रांचे सर्व प्रयत्न विफल झाले. मुस्लिमांना ती वेळ अत्यंत दडपणाची होती. त्या प्रसंगाचा उल्लेख पवित्र कुरआनमध्ये खालील शब्दांत केला आहे,

''जेव्हा वरून व खालून तुम्हावर शत्रू चाल करून आले, जेव्हा भीतीपोटी डोळे थिजले, काळीज तोंडाशी आले आणि तुम्ही लोक अल्लाहसंबंधी तऱ्हेतऱ्हेचे ग्रह करू लागला, त्या वेळी इमानधारकांशी चांगलीच परीक्षा घेतली गेली आणि भयंकरपणे हादरवून सोडले गेले. स्मरण करा ती वेळ जेव्हा दांभिक आणि ते सर्व लोक ज्यांच्या हृदयांत रोग होता, स्पष्टपणे सांगत होते की अल्लाह आणि त्याचे पैगंबर (स.) यांनी जे वचन आम्हाला दिले होते ते फसवणुकीशिवाय अन्य काहीच नव्हते. जेव्हा त्यांच्यापैकी एका गटाने सांगितले की, ''हे यसरिब (मदीना) च्या लोकांनो, तुमच्यासाठी आता थांबण्याचा कोणताही प्रसंग नाही, परत फिरा.'' जेव्हा त्यांचा एक गट असे म्हणून नबी (स.) कडून परवानगी मागत होता की, ''आमची घरे धोक्यात आहेत.'' वस्तुतः ते धोक्यात नव्हते, खरे तर ते (युद्ध आघाडीपासून) पळ काढू इच्छित होते.''

(दिव्य कुरआन, ३३ : १०-१३)

परंतु दहशतीच्या आणि भीतीच्या स्थितीतही अल्लाहने दिलेल्या वचनाची पूर्तता होण्याचे पैगंबर मुहम्मद (स.) यांना ठाऊक होते. ते शांत राहून आपल्या अनुयायांना भक्कम तटबंदीप्रमाणे असल्याचे दाखवून दिले. प्रसन्नचित्तता व शांतता त्यांच्या चेहऱ्यावर

दिसत होती. त्यांनी निर्णय घेतला आणि विस्मयकारक शांतपणाने त्यांनी आज्ञा दिली.

संयुक्त समितीच्या सैन्यांनी परिपूर्ण शस्त्रे व रसद पुरवठा घेऊन मदीनेला वेढा घातला होता आणि उपाशी, दमलेले मुस्लिम अहोरात्र खंदकाचे रक्षण करीत होते. दोस्तराष्ट्रांनी मुस्लिमांना खंदकाच्या बाहेर खेचण्याचा अनेकदा प्रयत्न केला. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी शत्रूंशी समोरासमोर लढण्याचा मोह टाळला आणि फक्त आपल्या अटीवरच समोरासमोर लढण्याची तयारी दर्शविली. खंदकावर केलेला प्रत्येक हल्ला, शत्रूची जबर हानी करून परतविण्यात आला. अधून मधून बाणांचा वर्षाव होई, घोडदळाचे निकराचे हल्ले होत आणि पायदळ सैन्याच्या मोठमोठ्या पलटणी धडका मारीत असत. परंतु हे सर्व डावपेच करूनही मदीनेत, मक्केच्या लोकांना व दोस्तांना शिरकाव करता आला नाही.

दिवसामागून दिवस जात राहिले. शत्रूचे मनोबल खचत गेले. त्यांच्या सैन्यात असंतोष, फुटिरता वाढू लागली. वेढा टाकण्याचे काम अगदी दमछाक करणारे बनले. रसदही त्यांना अपुरी पडू लागली होती.

त्याच वेळी निसर्गानेही इस्लामच्या शत्रूविरूद्ध कट केल्यासारखे दिसले. तुफानी वाऱ्याने त्यांच्या राहुट्या व तंबू फडफडू लागले. त्यांच्या चुलीतील अग्नी विझून गेला. वाऱ्याने उडणारी वाळू त्यांच्या तोंडावर सपासप बसू लागली आणि त्यांच्याविरूद्ध या अपशकुनांनी ते अगदी भांबावून गेले. वादळ जास्तच वाढत जाऊन त्याने अक्राळविक्राळ स्वरूप धारण केले. ते त्यांच्या तळावरच आडवे धडपडू लागले आणि वेढा उठवून माघार घेण्याच्या विचारात होते. भयानक वादळ त्यांना लादलेल्या उंटावरील काडीसारखे ठरले आणि त्यांची पाठ मोडली. ते दुर्दशा झालेले सैन्य खजील होऊन मक्केला परतले. त्यांचे उद्दिष्ट अपूर्णच राहिले. त्यांच्या खोट्या देवतांनी त्यांच्या माना निराशेने खाली वाकवल्या. आपल्या बाहुबलाने मुस्लिमांना जे करता आले नव्हते, ते वादळी वाऱ्यांनी त्यांना मिळवून दिले. त्या घटनेचे कुरआनने असे वर्णन केले आहे-

"हे लोकहो ज्यांनी श्रद्धा ठेवली आहे, स्मरण करा अल्लाहच्या उपकाराचे जे (नुकतेच) त्याने तुम्हावर केले आहे. जेव्हा फौजा तुम्हावर चालून आल्या तेव्हा आम्ही त्यांच्यावर एक भयंकर वादळ पाठविले. आणि अशा फौजा रवाना केल्या ज्या तुम्हाला दिसत नव्हत्या. अल्लाह ते सर्वकाही पाहात होता जे तुम्ही लोक त्यावेळी करीत होता."

(दिव्य कुरआन, ३३ : ९)



**प्रकरण ८**

# विजयाच्या वाटेवर

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनक्रमातील घटनांचे मार्गक्रमण आतापर्यंत पाहिले. त्यात त्यांनी शत्रूंच्या प्रचंड हल्ल्यातून इस्लामी राष्ट्रकुलाचे संरक्षण केले.

## पैगंबर मुहम्मद (स.) यांचे घर

पुढे जाण्यापूर्वी खुद्द पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या घरात, त्याच्या कुटुंबातील स्थितीला आपण जाणून घेऊ या.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जैनबशी विवाह करण्याची कृपा केली होती. त्या खुजैमाह बिन अल् हारिस यांच्या कन्या होत्या त्यांचा पहिला विवाह त्यांचा चुलतबंधु जहम बिन अम्र बिन अल् हारिस याच्याशी झाला होता. नंतर उबैदा बिन अल् हारिसशी त्यांचा विवाह झाला, पण ते उहूदच्या लढाईत मारले गेले. त्यांच्या उदारपणामुळे त्यांना निष्कांचन लोकांची माता (उम्मुल मिस्किन) अशी उपाधी मिळाली होती. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी झालेल्या विवाहानंतर दोन तीन महिनेच त्या हयात राहिल्या. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हयातीत मरण पावलेल्या त्या त्यांची दुसरी पत्नी होत्या. पहिली पत्नी माननीय खदीजा (रजि.) या पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हयातीत निधन पावल्या होत्या. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपल्या पवित्र हातानेच त्यांचे दफन केले.

माननीय उम्मे सलमा (रजि.) या पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या घरात प्रवेश करणाऱ्या त्यांच्या तिसऱ्या पत्नी होत्या. अबू उमैय्यच्या त्या कन्या होत्या. अबू उमैय्या हा कुरैशांच्या एक ख्यातनाम पुढारी होता. तरूण असतानाच त्यांनी इस्लाममध्ये प्रवेश केला होता. आरंभीच्या काळात इस्लाम धर्माचा स्वीकार केलेला आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी मोठी निष्ठा असणाऱ्या अब्दुल्लाहशी त्यांचा पहिला विवाह झाला होता. दोघा पतिपत्नींनी मक्केतील लोकांचा फारच छळ सोसला आणि ते ॲबिसीनियाकडे आश्रयाला गेले होते. तेथून ते मक्केला परत आले होते. आता पुन्हा त्यांच्या तशाच प्रकारच्या छळाचा आरंभ झाला होता. काही वर्षांनंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी व त्यांच्या सोबत्यांनी मदीनेत आश्रय घेतला. अब्दुल्लाह ज्यांना अबू सलमाह या नावाने ओळखत असत. ते पैगंबर मुहम्मद (स.) यांना येऊन मिळाले; परंतु त्यांच्या प्रिय पत्नीला त्यांच्या कठोर बापाने बळेच थांबवून ठेवले. आपल्या प्रिय पतीच्या वियोगाने त्या स्त्रीला मोठा धक्का बसला. परंतु त्यांनी आपल्या बापावर प्रभाव पाडून मदीनेला स्थलांतर करण्याची परवानगी मिळविली. त्या आपल्या मुलाला घेऊन त्वरेने मदीनेला गेल्या आणि

तेथे त्यांच्या पतीला जाऊन मिळाल्या.

परंतु त्यांचे दुर्भाग्य अद्याप संपले नव्हते. त्यांचा पती अब्दुल्लाह यांना उहूदच्या लढाईत अनेक गंभीर दुखापती झाल्याने ते त्यांना सुख देण्यासाठी फार काळ जगले नाहीत. त्यांच्या निधनसमयी त्यांची पत्नी गर्भवती होती. इस्लाम स्वीकारल्यापासून धक्क्यामागून धक्के सहन करणाऱ्या बिचाऱ्या पत्नीला पतीनिधनाचे मोठे दु:ख झाले. त्यांचा पिता इस्लामचा कट्टर शत्रू होता. त्यांचा संताप सहन करण्यापेक्षा काळाचा क्षोभ सोसायला त्या तयार होत्या. त्या असहाय्य व निराधार झाल्या होत्या. अल्लाहच्या मार्गात त्यांनी दाखविलेल्या दृढपणासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांना त्यांच्याबद्दल आधीच सहानुभूती निर्माण झाली होती. तसेच इस्लामखातर त्यांनी अनेक शारीरिक यातना सोसल्या होत्या, त्याबद्दल पैगंबर मुहम्मद (स.) यांना त्यांच्याबद्दल अनुकंपा निर्माण झाली. त्यांच्या मनावर पतीच्या निधनाचा आणखी एक आघात त्यांच्यावर झाला होता आणि त्यांना पतीच्या प्रेमळ छत्रापासून वंचित केले होते. त्यांची कारूण्यमय दुरावस्था पाहून पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्याशी विवाह करण्याचे ठरविले.

पैगंबर मुहम्मद (स.) यांना त्यांनी म्हटले, ''माझे वय बरेच झाले आहे आणि माझे कुटुंबही मोठे आहे.''

परंतु अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांना सांगितले, ''त्या गोष्टी महत्त्वाच्या नाहीत.''

ते म्हणाले की त्यांच्या मुलांची काळजी घेण्यात त्यांना आनंदच वाटेल. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांना दिलेला शब्द त्यांनी शेवटपर्यंत पाळला.

## जहशची कन्या माननीय जैनब (रजि.)

पैगंबर मुहम्मद (स.) यांचा आणखी एक विवाह जहशची कन्या माननीय जैनब (रजि.) यांच्याशी झाला. दत्तक नात्याबद्दल प्रचलित असलेल्या रूढीवर आघात करण्याचा, या विवाहाचा उद्देश होता. पाश्चात्य टीकाकारांनी या अनुषंगाने इस्लामवर प्रखर टीका केली आहे. या विवाहाबद्दल ज्या मनोरंजक काहाण्या घडविण्यात आल्या, हे त्यांच्या तयार केलेल्या खोट्या कथा आहेत, त्यांच्यात अणुरेणुइतकेही तथ्य नाही.

त्या विवाहाची कहाणी अगदी साधी आहे. माननीय जैनब (रजि.) ही पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या आत्याची मुलगी होती. पैगंबर मुहम्मद (स.) यांना अल्लाहने जातीची, वंशाची व वर्णाची बंधने व त्यांचा वेगळेपणा नष्ट करण्यासाठी आणि मानवामध्ये समता प्रस्थापित करण्यासाठी पाठविले होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्या आत्याला सांगितले की जैनबचा (त्यांच्या आतेबहिणीचा) विवाह जैद बिन हारिस या गुलामीतून मुक्त



केलेल्या माणसाशी करून द्यावा. सर्वांची व खुद्द जैनबचीही इच्छा होती की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी स्वत:च पत्नी म्हणून त्यांचा स्वीकार करावा. परंतु पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सांगण्याच्या दबावाखाली ते मान्य केले, कारण उच्च कुळाचा, वर्ण व वंशाचा भेद नष्ट करण्याची पैगंबर मुहम्मद (स.) यांना मोठी चिंता होती. ते लग्न मोठ्या अडचणीत झाले, परंतु ते सुखकारक व अनुकूल ठरले नाही. जैद व त्यांची पत्नी हे स्वभावाने स्वत: चांगले होते आणि दोहोंचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर अतिशय प्रेम होते. परंतु त्यांचे एकमेकांशी पटत नव्हते आणि त्यांचा संसार सुखी होण्याच्या मार्गात तो एक मोठा अडसर झाला होता.

म्हणून दोघांनाही विभक्त होण्याची मोठी आतुरता होती. परंतु पैगंबर मुहम्मद (स.) यांना ती गोष्ट पसंत नव्हती. म्हणून त्यांनी त्यांचा संसार खुषीने-नाखुषीने काही काळ तसाच ओढला. ताणलेले संबंध तुटण्यापर्यंत येऊन ठेपले. त्या दोघांच्या स्वभावात इतकी तफावत होती, की पतिपत्नी म्हणून ते एकत्र नांदू शकतच नाही, याची त्या दोघांनाही खात्री पटली. म्हणून त्यांनी शेवटचा पर्याय तलाक अनुसरण्याचे ठरविले आणि ते एकमेकांपासून विभक्त झाले.

या घटस्फोटाने दोघांचीही हानी झाली होती. परंतु माननीय जैनब (रजि.) यांना जास्त मानसिक त्रास होत होता, कारण त्या उच्च कुळात जन्मलेल्या असताना गुलामीतून मुक्त झालेल्या माणसाने त्यांना तलाक दिला होता. जैनबची व त्यांच्या परिवाराची मोठी जबाबदारी पैगंबर मुहम्मद (स.) यांवर होती. सगळ्या कुटुंबाचा विरोध असताना त्यांनीच हे लग्न जमविले होते. या तलाकने त्यांची सर्वांची अवस्था आणखी लाजिरवाणी करून टाकली, पैगंबर मुहम्मद (स.) यांना स्वत:च त्यांच्याशी विवाह करण्याचे औदार्य दाखविले आणि त्यांच्या परिवाराची गेलेली प्रतिष्ठा मिळवून दिली. त्याचबरोबर एका गुलामगिरीतून मुक्त झालेल्या माणसामुळे त्यांचा दर्जा खालवला, ही चुकीची समज कायमची खोडून काढली.

त्या विवाहामागे अशा प्रकारची विचारधारणा नि:संशयपणे होती. परंतु त्याचे खरे उद्दिष्ट लोकांच्या मनात खोलवर रूढ झालेल्या दत्तक नात्याच्या गैरइस्लामी चुकीच्या रूढीचे उच्चाटन करणे, हे होते. पैगंबर मुहम्मद (स.) हे पैगंबरांच्या सोनेरी मालिकेत शेवटीची कडी असल्याने मानवी समाजातील इस्लाम तत्त्वाविरोधी सर्व रूढी व अंधश्रद्धा निपटून काढण्याचे कार्य त्यांना करावे लागले.

अशा रीतीने माननीय जैनब (रजि.) यांच्याशी म्हणजे आपल्या दत्तकपुत्राच्या तलाक दिलेल्या पत्नीशी पैगंबर मुहम्मद (स.) यांचा विवाह झाल्याकारणाने, दत्तकपुत्र रक्ताच्या मुलाच्या तोडीचा असतो, ही चुकीची कल्पना कायमची गाडून टाकली. या

घटनेबद्दल कुरआन खालील शब्दांत स्पष्टोक्ती केली आहे,

"मग जेव्हा जैद (रजि.) ने तिच्याशी आपली गरज पूर्ण केला तेव्हा आम्ही तिचा (घटस्फोटित स्त्रीचा) तुमच्याशी विवाह केला, की जेणेकरून इमानधारकांवर आपल्या मानलेल्या पुत्रांच्या पत्नींच्या मामल्यात कोणतीही अडचण राहू नये जेव्हा की त्यांनी त्यांच्याशी आपली गरज पूर्ण केली असेल आणि अल्लाहचा हुकूम तर अंमलात येणारच होता." (दिव्य कुरआन, ३३ : ३७)

कुरआन नि:संदिग्ध शब्दांत पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पैगंबरत्वाबद्दल अशी मूलभूत वास्तवता दर्शवितो की पैगंबर मुहम्मद (स.) हे इमानधारकांपैकी कोणाही पुरूषाचे पिता नाहीत, ते अंतिम पैगंबर आहेत. म्हणून अशा गैरइस्लामी सर्व रूढींचे उच्चाटन करणे त्यांना भाग आहे आणि मानवजातीला सर्व दृष्टीने परिपूर्ण असलेली ईशआचारसंहिता देऊन, जोवर जगाचे अस्तित्व आहे, तोवर आणखी कोणाही पैगंबराची आवश्यकता लागू नये असे केले आहे.

"(लोकहो!) मुहम्मद (स.) तुमच्या पुरुषांपैकी कोणाचे पिता नाहीत परंतु ते अल्लाहचे पैगंबर आणि अंतिम पैगंबर आहेत, आणि अल्लाह प्रत्येक वस्तूचे ज्ञान राखणारा आहे." (दिव्य कुरआन, ३३ : ४०)

आशिया खंडातील भाषा व इतिहास जाणणाऱ्या तज्ञांनी रचलेल्या कल्पित कथांचा आणि कुभांड निंदानालस्तीचा जेथवर संबंध आहे, त्याबद्दल आम्ही इतकेच म्हणू शकतो की कणभर बुद्धी असणारा कोणताही माणूस त्यांना निव्वळ कुभांड म्हणून काहीही अवमान न करता खोडून टाकील. विल्यम मूर आणि त्यांच्याप्रमाणे कित्येक लोक म्हणतात की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी एकदा अर्ध्या उघड्या दारातून योगायोगाने झैनबला पाहिले. त्यांच्या सौंदर्याने ते मोहित झाले. झैदना आपल्या धन्याचा कल समजला, म्हणून त्यांनी तलाक दिला आणि नंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी जैनबचा विवाह झाला. या संदर्भात रचलेली ही कुभांडे आहेत व त्यात किंचितही तथ्य नाही. जैनब पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सख्ख्या आत्याची मुलगी होती. त्यांच्या लग्नाच्या आधी पैगंबर मुहम्मद (स.) समोर येण्यास त्यांना गोशा नव्हता. म्हणून त्यांच्या लग्नाच्यापूर्वी त्यांना पैगंबर मुहम्मद (स.) यांनी पाहिलेले होते इतकेच नाही, तर जवळचे नाते असल्याने त्यांना ते चांगले जाणत होते आणि तरूण वयात त्यांनी केलेला इस्लामप्रवेशही त्यांना माहीत होता. सर्व कुटुंबाने एकत्रित विचाराने पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशीच त्यांचा विवाह गुलामीतून त्यांनी मुक्त केलेल्या गुलामाशी करण्याचा आग्रह धरला होता, जेणेकरून उच्च कुळात जन्म झालेल्यांचा भेदभाव नष्ट करायचा होता.



बॉसवर्थ स्मिथ म्हणतो, "पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जैनबशी विवाह केल्याने अज्ञानी अरबांनी जी ओरड केली, ती पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जैनबशी सख्य होते, या संशयामुळे नसून दत्तक घेतलेल्या मुलाला ते सख्ख्या मुलासारखे मानत होते आणि म्हणून तो विवाह निषिद्ध नात्यातील होता असे त्यांचे मानणे होते, त्या कारणास्तव त्यांनी ओरड केली. हे बंधन, कोणत्याही कारणासाठी का असेना, ते लहरी व जुलमी आहे, असे पैगंबर मुहम्मद (स.) यांना वाटले. तो विवाह करून ती चुकीची कल्पना त्यांनी उखडून टाकली. ती केवळ स्वहितापोटी नव्हे तर सर्व अरबांच्या हितासाठी ते केले. या सर्व घटनांवर एकत्रीतपणे दृष्टिक्षेप टाकल्यास दिसून येते की त्यात वास्तवतेचा व कल्पित गोष्टींचा विलक्षण मिलाफ आहे. ते तुलनात्मक निष्पाप आहेत, त्यांच्यावर अपराधीपणाचा पोषाख चढविण्यात आला आहे." तो पुढे म्हणतो, "काहीही असले, तरी एक निश्चित आहे की जैदला, ख्रिश्चन लोकांनी जसे केले त्याप्रमाणे पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जैनबशी सख्य जमल्याचा, त्याच्या पत्नीचे प्रेम त्याच्यापासून काढून घेण्याचा त्याला संशय आला असता, तर एक उत्साही अनुयायी या नात्याने, पैगंबरांवर प्रगाढ निष्ठा ठेवून, जिवापाड प्रेम करून, अखेरच्या श्वासापर्यंत त्यांची इमानेइतबारे सेवा त्याने केली नसती."

## हुदैबियाचा तह

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी ईशधर्माच्या प्रसारासाठी प्रयत्नांची जी पराकाष्ठा केली, तीच गोष्ट आम्ही पुन्हा हातात घेत आहोत.

पैगंबर मुहम्मद (स.) हे अल्लाहचे पैगंबर असल्याने त्यांची सर्व शक्ती एकाच ध्येयापायी लावली गेली की, लोकांनी आपली अज्ञानरूपी कात टाकून द्यावी आणि इस्लाम धर्मात त्यांनी दाखल व्हावे. त्यांच्या सर्व संघर्षाचे हेच सार होते. त्यांच्या उत्कृष्ट इच्छेचे हेच पहिले व शेवटचे अक्षर होते. या ध्येयाकडेच वाटचाल करण्यासाठी त्यांनी शक्य ती सर्व पावले उचलली. त्यांनी प्रसार व प्रचार करून या उद्दिष्टाकडे लोकांना आणण्याचा प्रयत्न केला. शत्रूच्या हल्ल्यापासून त्या उद्दिष्टांचे रक्षण केले आणि गरज वाटली तेव्हा तहनामे व करार केले. तलवारीचा उपयोग हेच त्यांच्या उद्दिष्टप्राप्तचे एकमेव साधन नव्हते. तर अन्य कितीही शांततापूर्ण साधनांचाही त्यांनी वापर केला. जेणेकरून लोकांची अंत:करणे, त्या सत्याच्या प्रति जागृत व्हावीत, ज्यांच्यासाठी अल्लाहने त्यांना पाठविले होते. इस्लामच्या प्रसाराखातर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जे चौफेर यत्न केले, त्यामध्ये हुदैबियाचा तह हा एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे.

हिजरी सनाच्या सुमारे सहाव्या वर्षी पैगंबर मुहम्मद (स.) यांना एक स्वप्न पडले

ते पवित्र काबागृहाच्या हद्दीत, सुरक्षा व्यवस्थेत आपल्या सोबत्यांसह प्रवेश करीत आहेत. आणि ते हज यात्रेचा विधी करीत आहेत त्यांच्या डोक्याचे मुंडन केले जात आहेत. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपले स्वप्न आपल्या सोबत्यांना सांगताक्षणीच, त्यांची मने आनंदाने नाचू लागली, कारण फार दीर्घकाळपर्यंत ते हज यात्रा करण्यासाठी आसुसले होते. ती त्यांची उत्कट इच्छा स्वप्नाद्वारे पुरी होईल, असे त्यांना वाटले. सहा वर्षांच्या हद्दपारीच्या कालावधीनंतर त्यांना तो पवित्र विधी करायला मिळणार होता.

तो महिना शांतता पालनाचा होता- 'जिल्कद,' त्या महिन्यात 'उमरा' यथोचित केला जात असे. म्हणून पैगंबर मुहम्मद (स.) यांनी शेजारच्या टोळ्यांना निमंत्रण देऊन बोलाविले आणि एकून १५०० लोक बरोबर घेऊन त्यांचे नेतृत्व करीत त्यांनी प्रयाण केले. त्या जमावात अन्सार व स्थलांतरित असे दोन्हीही लोक होते. काबागृहाला भेट द्यायला मिळणार या कल्पनेने त्यांना मोठा हर्ष झाला होता. म्हणून सर्व मुस्लिम आत्मविश्वासाने प्रवासाला निघाले. कुर्बानी देण्यासाठी बरोबर ७० उंटही त्यांनी घेतले होते.

त्या पवित्र प्रदेशापर्यंत पोहचताच सर्वांनी 'इहराम' (यात्रेचा पोषाख) अंगावर घातला आणि गर्जना केली,

''लब्बैक, अल्लाहूम्मा लब्बैक.'' (हे अल्लाह आम्ही हजर आहोत.)

म्यान केलेल्या तलवारीखेरीज त्यांच्यापाशी दुसरे कसलेही शस्त्र नव्हते. लढाई वगैरे करण्याचा त्यांचा इरादाही नव्हता. परंतु त्यांना अडविण्याचा मक्केतील लोकांनी निश्चय केला होता. एक मोठे सैन्य गोळा करण्यात आले आणि मक्केकडे जाणारा रस्ता पूर्णपणे अडविण्यात आला. पैगंबर मुहम्मद (स.) यांना ते वर्तमान कळल्यावर त्यांनी आपला मार्ग बदलला. वळून ते दुसऱ्या बाजुने निघाले आणि मक्केच्या सरहद्दीनजीक हुदैबियामध्ये पोहोचले व तेथे त्यांनी आपला तळ टाकला. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी थोडी विश्रांती घेतली. त्यांच्या नंतर बुदैल बिन वर्का अल् खुजा टोळीची काही माणसे बरोबर घेऊन पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे आला आणि त्यांच्या येण्याचे कारण त्याने विचारले. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले की ते लढाई करण्यासाठी आलेले नाहीत. ''आमची दुसरी कसलीही योजना नाही, तर पवित्र काबागृहाची यात्रा करण्यासाठी आम्ही आलो आहोत.'' नंतर दुसरा एक माणूस बोलणी करण्यासाठी आला. तो मिकराज बिन हफ्स बिन अल् अखयाफ होता. त्याच्या पाठोपाठ अल् हुलैस बिन अल् कमाह नावाचा एक हेरही येऊन ठेपला. पवित्र काबागृहाबद्दल मुस्लिमांच्या मनातील अतीव आदर पाहून व त्यांच्या मनातील निष्ठा पाहून तो फारच प्रभावीत झाला. तो परत आपल्या माणसात गेला व सांगू लागला, ''हे कुरैशच्या माणसांनो! यासाठी आम्ही तुम्हाशी युती



व कराराची बोलणी केलेली नाही. अल्लाहच्या गृहाचा आदर करण्यासाठी भक्तीभावाने आलेल्या माणसाला आम्ही तसे करण्यापासून दूर ठेवावे काय? आमचे प्राण ज्याच्या हातात आहेत, त्या अल्लाहची शपथ घेऊन सांगतो, एकतर तुम्ही मुहम्मदला, ते जे करण्यासाठी आले आहेत ते करू द्या अन्यथा माझे सैन्य तुमच्यातून काढून बाजुला होईल व माझा एकही सैनिक तुमच्यात राहणार नाही.'' हुलै सनर 'उर्वाह' मुस्लिमांशी बोलणी करण्यासाठी आला. चर्चेमध्ये तो पैगंबर मुहम्मद (स.) यांना म्हणाला, ''मुहम्मद! तुम्ही आपल्याबरोबर अनेक वंशाचे मिलाफ असलेले लोक घेऊन आलात आणि आपल्याच नात्यागोत्याच्या माणसांना नष्ट करण्यासाठी आला आहात काय? आमच्या दुभत्या सांडणी घेऊन आणि वाघाच्या कातड्याचा वेष धारण करून कुरैशचे लोक निघाले आहेत. ते शपथा घेत आहेत की बळाचा वापर करून ते तुम्हाला मक्केमध्ये प्रवेश करू देणार नाहीत. ईश्वराशपथ! तुमच्या बरोबरचे हे सर्व लोक, उद्या तुम्हाला सोडून जातील, असे मला वाटते. यावर अबू बकर (रजि.) उठून उभे राहिले आणि त्या अपमानाबद्दल आपला संताप व्यक्त केला. दरम्यानच्या वेळात, उर्वाहा, त्याच्या मुस्लिमांच्या तळावरील वास्तव्याच्या कालावधीत बारकाईने निरीक्षण करीत होता. पैगंबराबद्दल मुस्लिमांचे जिवापाड प्रेम व अथांग निष्ठा आदर , हे त्याला न उमगणारे गूढ वाटले. तो कुरैशच्या लोकांत परतला आणि आपले मत सांगितले की पैगंबर मुहम्मद (स.) यांचे सोबती कसल्याही परिस्थितीत त्यांना सोडून जाणार नाहीत. त्याने आपल्या भावना खालील शब्दांत सांगितल्या,

''मी खुस्रोकडे त्याच्या राज्यात जाऊन आलो आहे, सीझराकडे त्याच्या राज्यात गेलो आहे, नेगुसकडे त्याच्या राज्यात भेटून आलो आहे, परंतु सोबत्यांमध्ये असलेल्या मुहम्मदप्रमाणे, एकही राजा त्यांच्या लोकांसमवेत मला आढळला नाही. ते (मुहम्मद) जेव्हा वुजू (शुचिर्भुत होण्यासाठी हात, पाय, तोंड वगैरे धुणे) करतात, तेव्हा त्यांचे सोबती ते पाणी जमिनीवर पडू देत नाहीत आणि ते मिळविण्यासाठी एकमेकांशी चढाओढ करतात. कसल्याही परिस्थितीत, कशासाठीही ते त्यांना सोडून जाणार नाहीत. तुम्हाला हवे ते तुम्ही करा.''

## कुरैशी लोकांचा चढेलपणा

काळ लोटत गेला. बोलणी चालतच राहिली, परंतु ती निष्फळ ठरली मुहम्मद (स.) यांनी कुरैशांना भेटण्यासाठी एक निरोप्या पाठविला आणि आपली व आपल्या सोबत्यांची काबागृहाची यात्रा करण्याची इच्छा असल्याचे, त्यांना पटवून सांगितले. परंतु कुरैशांनी त्या निरोप्याशीच गैरवर्तन केले. तो निरोप्या बसून आलेल्या उंटाचे पाय छाटून टाकले. त्याला स्वत:ला कसेबसे जिवंत सोडले मुस्लिमांवर अचानक छापा मारण्यासाठी कुरैशी जवानांची एक सशस्त्र तुकडी बाहेर पडली. परंतु त्यांनाच कैद करण्यात आले. परंतु मुस्लिमांची लढाई करण्याची इच्छा नव्हती, म्हणून त्यांनी त्या कैद केलेल्यांना सोडून दिले. कुरैशी लोकांच्या प्रमुखांशी, उमर (रजि.) यांनी जाऊन आपल्या वतीने बोलणी करावित, अशी पैगंबर मुहम्मद (स.) यांची इच्छा व्यक्त केली. उमर (रजि.) यांनी कुरैश लोकांशी त्यांचे वैयक्तिक वैर असल्याचे आणि तेथे आपला कोणीही प्रभावशाली व संकटातून रक्षण करणारा नातलग नाही, अशी सबब सांगितली. त्यांनी उस्मान बिन अफ्फान (रजि.) यांच्याकडे बोट दाखविले. ते मक्केतील बलशाली परिवारातील असल्याने, तेच योग्य दूत ठरतील असे सांगितले. उस्मान (रजि.) अबू सुफयानकडे व अन्य प्रमुखाकडे गेले आणि त्यांना सांगितले की ते फक्त पवित्र काबागृहाला भेट देण्यासाठी व तेथे प्रार्थना करण्यासाठीच आलेले आहेत व लढाई करण्याचा त्यांचा कसलाही इरादा नाही.

माननीय उस्मान (रजि.) यांनी त्यांना असेही आश्वासन दिले की विधी पूर्ण झाल्याबरोबर ते शांतपणे लगेच निघून जातील. परंतु कुरैश लोक हट्टावर अडून बसले आणि काबागृहाला भेट घेऊ देण्यास ते तयार नव्हते. व्यक्तिगत माननीय उस्मान (रजि.) यांना काबागृहाला भेट देण्याची अनुमती त्यांनी दिली व त्यांची इच्छा असल्यास तसे करावे असे म्हटले. परंतु माननीय उस्मान (रजि.) यांना ते नाकाराले व म्हणाले,

''जेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांना काबागृहाला भेट देण्याची परवानगी नाकाराली जाते,तेंव्हा व्यक्तिगत रीतीने मी तशी संधी साधून घेणे कसे शक्य आहे?''

माननीय उस्मान (रजि.) परत येण्याची, आनंद व भीतीच्या मिश्र भावनांनी, मोठ्या आतुरतेने मुस्लिम लोक प्रतीक्षा करीत बसले होते. परंतु त्यांच्या परत येण्यास फारच विलंब लागला होता आणि कुरैशांनी काहीतरी दगाफटका केला असल्याचा संशय येऊ लागला. मुस्लिमांत मोठी खळबळ उडाली. त्यांनी पैगंबरांपुढे अशी ठाम प्रतिज्ञा केली की प्राण देऊन त्यांच्या सोबत्याच्या मृत्यूचा बदला घेतल्याशिवाय ते मुळीच राहणार नाहीत आणि कोणत्याही परिस्थितीत त्यांच्या कल्याणकर्त्या पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पाठीशी ते भक्कमपणाने उभे राहातील. या प्रतिज्ञेला बैत-अल्-रिजवान या नावाने



ओळखले जाते. सत्याखातर आपले प्राण अर्पण करण्याचा आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर असलेल्या नितांत प्रेमाचा व प्रगाढ निष्ठेचा तो ठराव होता. या प्रतिज्ञेचा पवित्र कुरआनने खालीलप्रमाणे निर्देश केला आहे.

''अल्लाह इमानधारकांवर प्रसन्न झाला जेव्हा ते वृक्षाखाली तुमच्याशी बैअत (प्रतिज्ञा) करीत होते. त्यांच्या हृदयांची स्थिती त्याला माहीत होती, म्हणून त्याने त्यांच्यावर 'सकीनत' (शांती) उतरविली. त्यांना बक्षीस म्हणून निकटचा विजय प्रदान केला. (दिव्य कुरआन, ४८ : १८)

मुस्लिमांनी त्यांच्या धर्माच्या रक्षणासाठी रक्ताचा शेवटचा थेंब शिल्लक असेपर्यंत लढण्याचा निर्धार दाखवून दिला, तेव्हा कुरैशांचे डोके ताळ्यावर आले आणि डावपेच करून मुस्लिमांना नमविता येणार नाही, याची त्यांना जाणीव झाली. आणखी काही निरोपाची देवाणघेवाण झाल्यावर मुस्लिमांशी शांततेचा तहनामा करण्यास राजी झाले. प्रस्तावनेतच काही वादग्रस्त मुद्दे समोर आले.

उदाहरणार्थ, करार जेव्हा लिहिला जात होता, तेव्हा लिखाण करणारे, माननीय अली (रजि.) होते. त्यांनी लिखाणाचा आरंभ ''बिस्मिल्लाहहिर्रह्मानिर्रहीम्'' (अल्लाह असीम दयावंत व परम कृपावंतच्या नावाने) अशा शब्दांनी केला.

सुहैल बिन अम्र यांनी जाहीर केले की अर्रहमानबद्दल ते काहीच जाणत नाहीत आणि तत्कालीन प्रचलित रूढीनुसार ''बिस्मिका अल्लाहुम्मा'' (तुझ्या नावाने हे अल्लाह) असे लिहावे, असा आग्रह धरला. मुस्लिम अस्वस्थ होऊन कुरकुर करू लागले, परंतु पैगंबर (स.) त्यास राजी झाले. नंतर पुढे काय लिहायचे अल्लाहचे पैगंबर मुहम्मद आणि सुहैल बिन अम्र यांच्या मध्ये खालीलप्रमाणे ठराव झाला व दोघांनी तो मान्य केला. यावर सुहैलने पुन्हा आक्षेप घेतला. तो म्हणला, ''तुम्हाला अल्लाहचे पैगंबर म्हणून मी जर मान्य केले असते, तर मी तुमच्या विरूद्ध लढाईच केल नसती. तुम्ही फक्त तुमचे व तुमच्या पित्याचे नाव लिहा.'' मुस्लिमांनी आधीप्रमाणे अस्वस्थ होऊन चुळबुळ केली आणि बदल करण्यास नकार दिला. परंतु पैगंबर मुहम्मद (स.) यांनी, इस्लामच्या हिताच्या विशाल दृष्टिकोनातून तशा क्षुल्लक तपशीलाला महत्त्व न देता त्याऐवजी पुढीलप्रमाणे लिहायला सांगितले, 'मुहम्मद वल्द अब्दुल्लाह.'

**तहनाम्यातील कलमे**

**खालील अटी दोन्ही पक्षांना कबूल आहेत.**

१. या वर्षी त्यांना मुस्लिम लोकांनी काबागृहाची यात्रा करायची नाही.

२. पुढच्या वर्षी त्यांना तशी अनुमती दिली जाईल, परंतु त्यांनी मक्केमध्ये आपला मुक्काम तीन दिवसापेक्षा अधिक काळपर्यंत करता कामा नये.

३. पुढच्या भेटीच्या वेळी म्यान केलेल्या तलवारीखेरीज मुस्लिमांनी कसलेही शस्त्र जवळ बाळगू नये.

४. जो कोणी मुहम्मदना जाऊन मिळण्याची किंवा त्यांच्याशी तह करण्याची इच्छा करील, त्याला तसे करण्याचे स्वातंत्र्य राहील. त्याचप्रमाणे ज्या कोणाची कुरैशांना जाऊन मिळण्याची व त्यांच्याशी तहनामा करण्याची इच्छा असेल, त्यालाही तसे करण्याची परवानगी असावी.

५. एखादा माणूस, त्याच्या पालकाच्या संमतीविना मुहम्मदना जाऊन मिळाला, तर त्याला कुरैशांकडे परत पाठवावे. परंतु मुहम्मदच्या अनुयायांपैकी कोणी एखादा कुरैशांना येऊन मिळाला, तर त्याला परत पाठविले जाणार नाही.

६. दहा वर्षांपर्यंत युद्ध तहकूब करण्यात यावे, जेणेकरून लोकांना शांततेने राहता येईल.

अनेक मुस्लिमांना तहनाम्यातील अटी रूचल्या नाहीत, परंतु त्यापैकी बहुतेकजण स्तब्ध राहिले. त्यांनी असा विचार केला की हा तहनामा अल्लाहने त्याचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर अवतरला आहे. त्याची गूढता आकलन होण्याइतकी त्यांची बुद्धी प्रगल्भ नाही. मुस्लिमांना उदासवाणे व खिन्न वाटत असतानाच सुहैलचा मुलगा अबू जंदल (रजि.) तेथे आला. त्याला निर्दयपणे साखळीने जखडून बांधले हेते. उपवासाने व थकव्याने त्याचे पाय अडखळत होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांना व त्यांच्या सोबत्यांना त्याची कीव आली आणि त्यांनी त्याच्या सुटकेचा प्रयत्न केला. पण सुहैल हट्टाग्रही होता. तो म्हणाला, ''तुमच्या कराराशी तुम्ही प्रामाणिक आहात, हे दाखवून देण्याची संधी तुम्हाला आली आहे.''

''परंतु तुमच्या मुलाने आमच्या तळावर पाय ठेवला तोपर्यंत तहनाम्यावर सह्या झालेल्या नव्हत्या.'' असे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले.

त्यावर तो उसळून म्हणाला, ''परंतु तहनाम्यातील अटी मान्य करण्यात आल्या होत्या.''



तसे दृश्य पाहून अंत:करण न द्रवणारा माणूस पाषाणहृदयीच असला पाहिजे. अबू जंदलला जुलमी लोकांच्या हातात परत करणे, हे मुस्लिमांना असह्य दृश्य वाटू लागले. माननीय उमर (रजि.) यांना आपल्या हृदयातील खोलवर सलणारे दु:ख मोकळे केल्याशिवाय राहावले नाही.

माननीय उमर (रजि.) पैगंबर मुहम्मद (स.) यांना म्हणाले, ''तुम्ही अल्लाहचे खरे पैगंबर आहात की नाही?''

माननीय उमर (रजि.) पुन्हा बोलले आणि विचारले, ''आपण सत्य मार्गावर आहोत आणि आपले शत्रू चुकीच्या मार्गावर आहेत, होय की नाही?''

कसलाही राग न दर्शविता पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उत्तर दिले, ''होय, ते असेच आहे.''

हे उत्तर मिळाल्यानंतर त्यांनी पुन्हा युक्तिवाद केला, ''मग धर्माच्या व इमानच्या बाबतीत आपली कसलीही अवहेलना होऊ नये.''

यावरही क्षुब्ध न होता पूर्ण आत्मविश्वासाने पैगंबर म्हणाले, ''मी अल्लाहचा सच्चा पैगंबर आहे. मी त्याची कधीही अवज्ञा करीत नाही. तो मला साहाय्य करील.''

यावर ''आपण काबागृहाची यात्रा करू, असे तुम्ही सांगितले नव्हते काय?'' माननीय उमर (रजि.) यांनी विचारले.

''पण याच वर्षी यात्रा करू, असे मी म्हणालो नाही.'' असे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उत्तर दिले.

यावर माननीय उमर (रजि.) स्तब्ध झाले, परंतु त्यांचे मन अस्वस्थ होते. ते माननीय अबू बकर (रजि.)कडे गेले आणि आपल्या भावना त्यांच्याजवळ व्यक्त केल्या. अबू बकर (रजि.) यांना शंका माहीतच नव्हती आणि आपल्या नेत्याचे शब्द ईशवाणीप्रमाणे सत्य मानण्यास, त्यास अनुमोदन देण्यास ते सतत तप्तर असत.

## पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपले वचन पाळले

थोडक्यात सांगायचे म्हणजे अबू जंदाल (रजि.) यांच्या नशिबाबद्दल मुस्लिमांना मोठी चिंता वाटत होती, परंतु मुस्लिमांनी दिलेल्या शब्दाचा ते किती आदर करतात, हे पाहाण्याची कसोटीची ती वेळ होती. मूकपणे सहन करीत अबू जंदाल (रजि.) यांना साखळयात बांधून परत पाठविण्यात आले. तो क्षण अत्यंत चिंतेचा होता. एकीकडे आर्त स्वरात अबू जंदल (रजि.) टाहो फोडीत होता, ''हे मुस्लिमांनो! मला बहुदेववाद्यांकडे परत पाठविणार काय, जेणेकरून मला फूस लावून त्यांनी माझ्या धर्मापासून दूर करावे?''

पण दुसरीकडे, दिलेल्या शब्दाचे पालन करणेसुद्धा अत्यंत गरजेचे होते. अन्य सर्व गोष्टीवर त्याला प्राधान्य द्यायला हवे होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दिलेला शब्द हा पवित्र होता, त्याच्यात संदिग्धतेला कसलाही वाव नव्हता. करार मोडला जाऊ शकत नव्हता. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे अंत:करण सहानुभूतीने भरून आले होते, पण कोणतीही किंमत मोजून आपल्या शब्दाची प्रतिष्ठा त्यांना राखायची होती. त्यांनी अबू जंदल (रजि.) चे सांत्वन केले व म्हणाले, ''सहनशील हो. अल्लाहच्या भरवशावर स्वत:ला सोडून दे. अल्लाह तुला व तुझ्या अगतिक सोबत्यांचा दु:खपरिहार करील व सुटका करून घेण्याची साधनेही तुम्हाला उपलब्ध करून देईल. आम्ही त्यांच्याशी शांततेचा करार केला आहे आणि अल्लाहचे नाव घेऊन आम्ही त्यांच्याशी प्रतिज्ञा केली आहे. म्हणून कसल्याही परिस्थितीत आम्ही ती मोडण्यास तयार नाही.''

जेव्हा तहनामा पूर्ण झाला, तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपल्या जवळील उंटाचा बळी दिला, डोक्याचे केस काढले आणि आपली पावले मदीनेकडे वळविली. काही मुस्लिम फार उदास होते. वाटचाल करीत असताना मक्का व मदीनेच्या मध्यावर, अल्लाहने कुरआनचा एक सूरह 'अल् फत्ह' (विजय) अवतरली. पैगंबर मुहम्मद (स.) यांना फार मोठा आनंद झाला, कारण त्या सूरहमध्ये अल्लाहने स्पष्टपणे फर्मावले की हुदैबियाचा तहनामा हा मुस्लिमांना मानखंडनेचा नसून तो एक स्वच्छ विजय आहे आणि भविष्यकाळात विजयामागून विजयाचे आश्वासन त्यात आहे, पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जे काही केले त्याला त्यात अनुमोदन दिलेले आहे आणि इमानधारकांच्या खिन्न मनांचे त्यात सांत्वन केले आहे.

''हे पैगंबर (स.), आम्ही तुम्हाला उघड विजय प्रदान केला जेणेकरून अल्लाहने तुमच्या पुढील व पाठीमागील उणिवांना माफ करावे आणि तुमच्यावर आपली देणगी परिपूर्ण करावी व तुम्हाला सरळमार्ग दाखवावा आणि तुम्हाला जबरदस्त सहाय्य प्रदान केले.'' (दिव्य कुरआन, ४८ : १-३)



इब्ने हिशाम म्हणतो, ''याच्या इतका मोठा विजय पूर्वी कधीही मिळाला नव्हता. कारण अल्-जुहरीच्या उचित निष्कर्षानुसार, जेव्हा युद्धाची परिस्थिती असे, तेव्हा एकमेकांच्या गाठीभेटी घेण्यास घाबरत असत. परंतु जेव्हा शांततेचा तह झाला, तेव्हा युद्धाचे भय दूर झाले आणि लोकांमध्ये शांततेची भावना निर्माण झाली. ते एकमेकांच्या जवळ आले आणि आपापसात चर्चा करू लागले. एक माणूस इस्लामविषयी दुसऱ्या माणसांशी काही बोलत नसे. परंतु दुसरा इस्लामची गोष्ट उचलून धरत असे. अशा प्रकारे दोन वर्षांच्या कालावधीमध्ये (हुदैबियाचा तह झाल्यापासून ते कुरैशांनी तो तह मोडेपर्यंत) इस्लाम धर्माला इतक्या लोकांनी आलिंगन दिले, तितके त्यापूर्वी कधीही इस्लाम धर्मात लोक आले नव्हते.''

मुस्लिमांच्या गोटात आक्षेपार्ह व क्लेशदायक समजले गेलेले तहनाम्यातील कलम असे होते की कोणीही इमानधारक माणूस आश्रय घेण्यासाठी मदीनेत आला व त्याच्या पालकाने जर त्याला परत देण्याची मागणी केली, तर त्याला मक्केला परत पाठवायचे. पण ही गोष्ट सुद्धा एक कृपाच ठरली. उलट जे मुस्लिम मक्केला परत नेले जात, ते इस्लामचा प्रभाव तेथे पसरविण्याचे केंद्रबिंदू सिद्ध होत असत. ते शरणागती पत्करून इस्लामचा त्याग करतील, असे मानण्याची शक्यताच नव्हती.

शिवाय मक्केला परत पाठविलेले मुस्लिम त्यांच्या क्रूर पहारेकऱ्यांच्या तावडीतून निसटून वाटेतूनच पळून जात असत आणि अरबस्तानच्या समुद्र किनाऱ्याजवळ जाऊन राहात असत. क्रमाक्रमाने, जे मुस्लिम कुरैशांच्या जुलूमांमुळे दयनीय अवस्थेत राहात होते, तेही तेथे जाऊन त्यांना मिळत व वसाहत करीत असत, अशा रीतीने ती वसाहत हळूहळू चांगलीच मोठी होत गेली. तेथून जाणाऱ्या येणाऱ्या कुरैशांच्या तांड्यावर हल्ले करून ते आपले उट्टे काढू लागले. त्या हद्दपार केलेल्या वसाहतवाद्यांवर नियंत्रण ठेवता येत नाही असे जेव्हा मक्केतील मूर्तिपूजकांना दिसून आले, तेव्हा त्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांना विनंती केली की तहातील आश्रयाला येणाऱ्या माणसाला परत पाठविण्याचे ते कलम काढून टाकावे. अशा प्रकारे मार्ग काढून देऊन, अल्लाहने आपले वचन पुरे केले.

## तो तहनामा मुस्लिमांना अनुकूल ठरला

वास्तवत: त्या तहनाम्यातील प्रत्येक कलम व्यवहारी, मुत्सद्दीपणाचे उत्कृष्ट उदाहरण होते. नि:संशयपणे ते एक मोठे यश होते. जेव्हा कुरैशी लोक पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यासमोर येऊन उभे होते, तेव्हा कोणालाही तसे वाटले नाही. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी कदाचित सुहैलने त्यावर विचार केला असावा. ते दोघे सोडल्यास अन्य कोणालाही मारझोड केलेली, धोंडेमार केल्याची, रात्रीच्या समयी निसटून जाऊन सुटका करून घेतल्याची आणि गुहेमध्ये आश्रय घेतल्याची आठवण झाली नाही. कोणालाही ७० अनुयायांना झालेली व कष्टप्रद हद्दपारी आठवली नाही. आताच्या परिस्थितीत आणि त्या काळच्या परिस्थितीतील फरक, विश्वास न बसण्याइतपत विस्मयकारक होता. कुरैशी लोक आता पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी तडजोड व व्यवहार करायला तयार झाले होते, त्यांचे लक्ष वेधण्यास पात्र असे पैगंबर मुहम्मद (स.) यांचे व्यक्तिमत्त्व त्यांनी मानले होते. सगळ्या अरब जमातीचे धनी असे त्यांना मानणे, ही गोष्ट सर्व अपेक्षांच्या पलीकडची होती. पैगंबर मुहम्मद (स.) लहान सहान तपशीलावर शब्दछल करून कीस काढणारे नव्हते. याकरिता व्यापार करणाऱ्या व प्रगल्भ भाषण करणाऱ्यांची आपण स्वत: होऊन गाठभेट घेऊन बोलणी करण्याचा, सुहैलच्या मर्यादित बुद्धिमत्तेचा जरी मेळ बसला नसला, तरी काही बिघडले नव्हते. मक्केला मोकळेपणाने जाता येणे, महत्त्वाचे होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांना व त्यांच्या सोबत्यांना हे पक्के ठाऊक होते की ज्या दिवशी ते त्या पवित्र भूमीवर पाय ठेवतील, तो दिवस तेथे कायमचे वास्तव्य करण्याच्या दिवसापासून फार लांब नव्हता. दहा वर्षांचा शांतता कराराचा काळ त्यांना धर्मप्रसार करण्याची संधी म्हणून उपयोगी पडणारा होता आणि कुरैशांच्या मतांवर मात करण्यासाठी बळ देणारा होता. पालकाच्या देखरेखीखालील कोणीही पालकाच्या अनुमतीविना कुरैशांना सोडून जाऊ नये, ही तहनाम्यातील अट मदीनेत अप्रिय असली तरी, अरब समाजाच्या तत्त्वांना धरून होती. तसेच पैगंबर मुहम्मद (स.) यांना त्यांच्या अनुयायांच्या निष्ठेबद्दल पुरेसा आत्मविश्वास होता. इस्लामचे सर्वोत्तम आकर्षण त्या कलमापासून कसल्याही वाईट परिणामाचे भय बाळगायचे नाही आणि ज्यांने आपल्या निष्ठेचा त्याग केला त्याला, त्याची सुटका नाही. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे इमानधारकांना मक्केला दुसऱ्या वर्षी जाण्याची मूक्त परवानगी दिली गेली. तसेच मक्केत तीन दिवसांपर्यंत बिनदिक्कत मुक्काम करण्याचीही परवानगी मिळाली.

तो तहनामा म्हणजे उत्कृष्ट लिखाणाचा एक सुंदर नमुना असून शांततेची कलमे त्यात स्पष्टपणे घातलेली आहेत. कसलीही संदिग्धता त्यात नाही. त्यात काहीही अस्पष्ट नाही. प्रत्येक शब्द चपखल व अर्थपूर्ण असून अनावश्यक पाल्हाळ नाही. त्यात



शब्दच्छल नाही. मजीद खादुरी म्हणतात, ''तहनाम्याचा स्थानीय टोळ्यांवर मोठा प्रभाव पडला आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांनी या संदर्भात अगोदर जे ताडले होते, पूर्णपणे बरोबर सिद्ध झाले. ज्यामुळे मोठी खळबळ माजली होती, त्या तहनाम्यावर सह्या झाल्यानंतर थोड्याच दिवसांत, सभोवतालच्या सर्व टोळ्यांचे प्रमुख, त्यांच्याशी एकनिष्ठेची शपथ घेण्यासाठी येऊ लागले होते.''

## इस्लाम हा विश्वधर्म

इस्लामी शिकवण विश्वव्यापी स्वरूपाची आहे, ही बाब मुहम्मद (स.) यांच्यापेक्षा अधिक कोण जाणू शकत होता? तसेच त्याचा प्रचार जगभर करण्याची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली होती, याची त्यांना जाणीव होती. इस्लामचा अल्लाह 'रब्बुलआलमीन' (सर्व विश्वाचा स्वामी आहे). तोच 'रब्बुन्नास, मलिकीन्नास, इलाहीन्नास' म्हणजे अल्लाह माणसांचा ईश्वर व राजा आहे. तो केवळ यहुद्यांचा, ख्रिश्चनांचा व मुस्लिमांचाच नव्हेत, तर सर्व चराचर वस्तूंचा व जिवांचा निर्माता आहे. मानवजातीचा तोच निर्माणकर्ता व पालनकर्ता असून प्रत्येक टोळीची व राष्ट्राची एक वेगळी देवता, जी काही थोडक्या लोकांच्या सोईनुसार सर्व लोकांची व्यवस्था पाहते; ती नव्हे. अल्लाह जसा सर्व विश्वाचा स्वामी आहे, त्याचप्रमाणे त्याचे अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) हे सर्व विश्वाचे कृपानिधी आहेत.

''हे पैगंबर (स.), आम्ही तर तुम्हाला जगवासियांसाठी कृपा बनवून पाठविले आहे.'' (दिव्य कुरआन, २१ : १०७)

ते शिकवण देत असलेल्या धर्माची बाबही तशीच आहे. तो वैश्विक धर्म असून, जात, वर्ण, वंश यांच्या कुंपणाच्या आणि भौगोलिक मर्यादांच्या पलीकडे तो जातो.

''हे नबी (स.)! आम्ही तुम्हाला पाठविले आहे साक्षीदार बनवून, शुभवार्ता देणारा आणि भय दाखविणारा बनवून.'' (दिव्य कुरआन, ३३ : ४५)

## अरबस्तानच्या बाहेर इस्लामी संदेशाचा प्रसार करण्याची पैगंबरांची योजना

अल्लाहचे पैगंबर या नात्याने मानवजातीबद्दल आपल्या जबाबदारीची पैगंबर मुहम्मद (स.) यांना पूर्ण जाणीव होती. म्हणून हुदैबियाच्या तहाने सार्वजनिक सुरक्षिततेचे जे वातावरण उपलब्ध करून दिले होते, ती अल्लाहने दिलेली एक नामी संधी मानून अरबस्तान बाहेरील राष्ट्रांकडे लक्ष देण्याचे ठरविले, जेणेकरून अल्लाहचा संदेश त्यांच्यापर्यंत पोचविता यावा. एकदा त्यांनी आपल्या सर्व सोबत्यांना एकत्र गोळा करून

त्यांच्यासमोर खालील भाषण दिले,

"हे लोक हो! सर्व माणसांसाठी अल्लाहने माझ्याकडे एक कृपा पाठविली आहे. इस्लामचा संदेश जगाच्या सर्व कानाकोपऱ्यापर्यंत नेऊन पोचवा. मरियमपुत्र येशूच्या अनुयायांमध्ये जसे भेदाभेद झाले, तसे भेद तुमच्यात पडू देऊ नका."

"त्यांच्यात कसे भेद पडले?" त्यांच्या सोबत्यांनी पृच्छा केली.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उत्तर दिले, "मी आता तुम्हाला ज्याच्याकडे बोलविले आहे, त्याच्याकडेच येशूनेही त्यांच्या लोकांना बोलाविले होते. परंतु प्रसारासाठी ज्यांना छोट्या प्रवासावर त्याने पाठविले त्यांनी आज्ञांचे पालन केले व त्याचा संदेश मान्य केला. परंतु ज्यांना दूरवरच्या प्रवासावर पाठविले होते, त्यांनी आपल्या स्वामीसमोर विन्मुखता व नाखुषी दर्शविली आणि त्या सर्वशक्तिमानाने त्यांना अशी शिक्षा दिली की ज्या लोकांकडे त्यांना पाठविण्यात आले होते, त्यांचीच भाषा केवळ त्यांना बोलता आली."

## परकीय सत्ताधीशांकडे दूत

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी, जेथे जेथे अंधार होता त्या सर्व कानाकोपऱ्यात इस्लामचा प्रकाश पोहोचविण्यासाठी आपले दूत निवडले. आपल्या दूतांच्या शिफारसपत्रांना एक चांदीच शिक्का बनवून घेतला होता, त्यात पुढील शब्द कोरलेले होते- "अल्लाहचे पैगंबर-मुहम्मद".

## हेराक्लिअसकडे दूत

पहिला दूत हेराक्लिअसकडे पाठविण्यात आला. मुस्लिम दूत दिह्याह कल्बी जेव्हा पॅलस्टाइनमध्ये पोहोचला, तेव्हा त्याला सांगण्यात आले की बादशाहने पर्शियन लोकांवर मिळविलेल्या विजयाचा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी ख्रिश्चन धर्माचे उगमस्थान असणाऱ्या येरूसलेमला भेट देणार होता आणि म्हणून तेथेच पैगंबर मुहम्मद (स.) यांचा खलिता त्याला देण्यात आला. अनेक सोहळ्यांच्या दरम्यान मुस्लिम दूताचे स्वागत करण्यात आले. तो खलिता देण्यापूर्वी खालीलप्रमाणे प्रस्ताविक भाषण त्याने केले.

"हे रोमचे सीझर! ज्याने आपला दूत म्हणून मला तुमच्याकडे पाठविले आहे, ते तुम्हांपेक्षा अधिक चांगले आहेत आणि ज्या अत्युच्च स्वामीचे पैगंबर म्हणून त्यांना आमच्याकडे पाठविले आहे, तो अल्लाह सर्वश्रेष्ठ आहे. म्हणून माझे म्हणणे मनापासून लक्षपूर्वक ऐकून घ्या आणि मनापासून उत्तर द्या. जर तुम्ही संपूर्ण लक्ष दिले नाही, तर त्याचा अर्थ समजण्यास तुम्ही अक्षम ठराल आणि प्रांजल अंत:करणापासून तुमचे उत्तर जर आले नाही, तर ते न्याय्य असणार नाही. हे राजा! तुम्हाला चांगले माहीत आहे की



मरिअमपूत्र येशूने प्रार्थना केल्या होत्या." राजाने होकारात्मक उत्तर दिले.

दाह्याह कल्बी पुढे म्हणाले, "तर मी तुम्हाला त्या महान स्वामीकडे बोलावित आहे, ज्याची प्रार्थना डोके जमिनीला टेकवून खुद्द येशूने केली, ज्याने मरियमच्या गर्भाशयात त्यांना आकार दिला व घडविले आणि ज्याने पृथ्वी आणि आकाशांची निर्मिती केली आहे. नंतर मी तुम्हाला त्या निरक्षर पैगंबरांकडे बोलवित आहे, ज्याचा आगमनाबद्दल मूसा व येशू यांनी भाकीते केली होती. त्या सर्व गोष्टींचे तुम्हाला प्रचंड इनाम मिळेल. तसेच भावी जगातही ते मिळेल. जर तुम्ही त्याचा इन्कार केला, तर तुम्हाला ते नाकारले जातील. माझ्यावर विश्वास ठेवा, एक महान स्वामी आहे, जो नाकारणाऱ्या माणसांना शिक्षा करतो आणि त्यांचे नशीब पालटून टाकतो."

## अबू सुफयानची साक्ष

योगायोगाने अबू सुफायान, ज्याने तोपर्यंत इस्लाम धर्माचा स्वीकार केलेला नव्हता, त्याला दरबारात बोलावले गेले होते आणि हेराक्लिअसने त्याला पैगंबर मुहम्मद (स.) संबंधी अनेक प्रश्न विचारले आणि ते शिकवण देत असलेल्या धर्मासंबंधी प्रश्न विचारले. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या उघड कट्टर शत्रूने पैगंबर मुहम्मद (स.) यांचे व्यक्तिगत नीतिचारित्र्य अत्युत्तम व अत्युच्च असल्याची साक्ष दिली. तसेच मानवजातीच्या कल्याणासाठी इस्लाम जे काही करीत होता, तेही सांगितले. हेराक्लिअसला विस्मयकारक अवस्थेत सोडून तो निघून गेला.

## पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या खलित्यातील मजकूर

मग पैगंबर मुहम्मद (स.) यांनी पाठविलेले पत्र मोठ्याने वाचण्यात आले. इंग्रजीत त्याचा अनुवाद झालेला आहे, त्याचा मथितार्थ खालीलप्रमाणे,

"परम दयाळू व कृपाळू अल्लाहच्या नावाने आरंभ करतो.

पैगंबर मुहम्मद (स.)कडून हे पत्र, रोमच्या सम्राट हेराक्लिअसला पाठविले जात आहे. ज्यांना खरे मार्गदर्शन मिळाले आहे, ते भाग्यवान आहेत, इस्लाम धर्माला आलिंगन देण्यासाठी तुम्हाला मी आमंत्रण देत आहे. तुम्ही जर तसे केले, तर तुम्ही सुरक्षित व स्वस्थ व्हाल. तुम्ही जर इस्लाममध्ये दाखल झालात, तर अल्लाह तुम्हाला दुहेरी इनाम देईल आणि जर त्याच्याकडे तुम्ही पाठ फिरवलीत, तर जनतेच्या पापांचे व अपराधांचे ओझे तुमच्या खांद्यावर राहील. हे ईशग्रंथधारकांनो! आपण दोघांमध्ये जी गोष्ट समान आहे, ती ही की अल्लाहखेरीज आपण आपापसात कोणाचेही स्वामित्व स्वीकारायचे नाही. नंतर जर ते परत फिरले तर सांगा, खचितच आम्ही मुस्लिम आहोत."

सम्राटाचे निरीक्षण आणि शेवटी इस्लामी संदेशाचे निश्चित स्पष्टीकरण, यामुळे दरबारात हजर असलेल्या ख्रिश्चन धर्मोपदेशकामध्ये तंग वातावरण निर्माण झाले. सम्राटाने इस्लामला कवटाळले नाही, कारण ईशइच्छा वेगळीच होती. पण सम्राटाने आंनद प्रदर्शित केला व त्यांचे अभिनंदन घेऊनच मुस्लिम दूत मदीनेत परत आला.

## खुस्त्रोला पत्र

त्यानंतर थोड्यात दिवसांनी आणखी एक पत्र तशाच शब्दात व तशाच शिक्क्यानिशी पर्शियाचा सम्राट खुस्त्रोला पाठविण्यात आले. पत्राची शैली पाहून, ज्यात त्याच्या नावाच्या वरती पैगंबर मुहम्मद (स.) यांचे नाव लिहिल्याचे आढळल्याने, त्या गर्विष्ठ बादशाहला फार संताप आला. असा उद्धटपणा त्याला सहन होऊ शकत नव्हता. त्याने रागाने त्या पत्राचे तुकडे तुकडे केले आणि त्यांच्या येमन येथील व्हॉइसरॉयला तातडीने एक हुकूम लिहायला लावून पाठवून दिला, की दोन घोडेस्वार पाठवून व पैगंबर मुहम्मद (स.) यांना अटक करून ताबडतोब त्याच्यासमोर हजर करावे. बझान नावाच्या त्या गव्हर्नरने तात्काळ त्याकरता दोन माणसे पाठवून दिली. त्यापूर्वीच्या काळात त्याच्या सैनिकांनी कोणाही अरब माणसाला अटक करणे, ही अगदी जुनी प्रथा होती. सम्राटाची प्रतिक्रिया अब्दुल्लाह बिन हुजैफाने (मुस्लिम दूत) पैगंबर मुहम्मद (स.) यांना कळविली, तेव्हा ते शांतपणे म्हणाले, ''ज्याप्रमाणे त्याने माझे पत्र फाडून त्याचे तुकडे केले त्याचप्रमाणे त्याच्या राज्याचे अल्लाह तुकडे तुकडे करून विखरून टाकील.'' बझानची माणसे मदीनेस पोहोचताच ईशवाणीने पैगंबर मुहम्मद (स.) यांना कळविण्यात आले की पर्शियाचा सम्राट परवेझ याला त्याच्या मुलाने ठार केले. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी, त्यांना हे वर्तमान सांगितले आणि ते त्या धक्क्याने थिजून गेले. ते लगबगीने त्याच्या राज्यात परतले. त्यांना आढळून आले की पैगंबर मूहम्मद (स.) यांनी सांगितलेला शब्द अगदी खरा होता. परवेझची हत्या करण्यात आली होती आणि त्याचा मुलगा गादीवर बसला होता. पर्शियाचे वैभव निघून गेले होते. बझानने तात्काळ इस्लाम धर्माचा स्वीकार केला आणि पैगंबरांशी आपली निष्ठा प्रदर्शित केली.

## ॲबिसीनियाकडे शिष्टमंडळ

इतर ज्या राज्यांना पैगंबर मुहम्मद (स.) यांनी पत्रे पाठविली होती, त्यांच्यापेक्षा ॲबिसीनियाच्या दरबाराचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी संबंध वेगळ्या प्रकारचे होते. तेथे त्यांच्या अनुयायांचे तेथील राजाने यथोचित स्वागत केले व त्यांचे चांगले आदरातिथ्य केले. अरबांच्या वैमनस्याविरूद्ध तो एक आसरा आहे असे मानत असे. त्या ख्रिश्चन राजाबद्दल पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अंत:करणात मृदू भावना होती आणि मुस्लिमांशी



तो करीत असलेल्या सौहार्दपूर्ण वर्तणुकीची ते प्रशंसा करीत.

त्याला लिहिलेल्या पत्राचा मजकूर खालीलप्रमाणे होता,

''परम दयाळू व कृपाळू अल्लाहच्या नावाने आरंभ करतो.

अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडून हे पत्र, ॲबिसीनियाचे राजे नेगूस यांना पाठविण्यात येत आहे.''

''अभिनंदन! अल्लाहचा गौरव असो. त्याच्याखेरीज अन्य कोणीही ईश्वर नाही. तो सार्वभौम पवित्र सुरक्षितता निर्माण करणारा, शांतता प्रदान करणारा, रक्षणकर्ता व सामर्थ्यवान आहे. मी साक्ष देतो की मरियमचा पूत्र येशु हा ईशात्मा आहे आणि त्याची वाणी कुमारिका, सच्छील, शुद्ध व चांगली वर्तणूक असलेल्या मरियमच्या शरीरात ओतल्याने तिला गर्भधारणा झाली. अल्लाहने आपल्या चैतन्यापासून आणि श्वासापासून त्यांना निर्माण केले, जसे आदमना त्याने आपल्या हाताने व फुंकरीने निर्माण केले होते. मी तुम्हाला अल्लाहकडे बोलावित आहे. तो एकमेव आहे व त्याचा कोणीही सहकारी नाही. त्याच्या आज्ञापालनाकडे तुम्हाला बोलावतो. माझे अनुयायित्व करून माझ्याकडे जे काही आले आहे त्यावर श्रद्धा व विश्वास ठेवावा, कारण मी अल्लाहचा पैगंबर आहे. मी त्या महान स्वामीकडे तुम्हाला व तुमच्या लोकांना बोलवित आहे. मी जे म्हणतो, ते कृपया लक्ष देऊन ऐका आणि माझा उपदेश स्वीकारा. जो खरे मार्गदर्शन स्वीकारतो, त्याच्यावर शांती असो.''

## राजा अत्यंत आदराने दूतांचे स्वागत करतो

राजाने दूतांचे आणि त्यांनी आणलेल्या पत्रांचे विशेष आदरातिथ्य करून स्वागत केले आणि मोठ्या अदबीने उत्तर देऊन पाठविले. त्यात इस्लामवर विश्वास आणि निष्ठा व्यक्त करून पैगंबर मुहम्मद (स.) यांचा आदर करण्यासाठी स्वत: येऊ शकत नाही यासाठी खेद व्यक्त केला. त्याचे पत्र आम्ही खाली उद्धृत करीत आहोत.

''परम दयाळू व अत्यंत कृपाळू अल्लाहच्या नावाने आरंभ करतो.

हे पत्र नेगूसकडून अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांना लिहिले गेले आहे. तुम्हांवर शांती असो, हे अल्लाहच्या पैगंबरा! आणि अल्लाहची दया व कृपा असो, ज्याच्याखेरीज अन्य कोणीही ईश्वर नाही. मला तुमचे पत्र मिळाले. त्या पत्रात तुम्ही लिहिले त्यापेक्षा येशू अधिक काहीच नाही. जे देऊन तुम्हाला आमच्याकडे पाठविण्यात आले आहे, ते आम्ही पूर्णत: मान्य करतो आणि आम्ही तुमच्या पुतण्याचे आणि त्याच्या मित्रांचे स्वागत आणि आदरातिथ्य केले आहे, तुम्ही अल्लाहचे सच्चे पैगंबर आहात,

अशी मी साक्ष देतो आणि मंजूर करतो (ते तुमच्यापूर्वी होऊन गेले) तुमच्या पुतण्याकरवी मी निष्ठेची प्रतिज्ञा करतो आणि त्याच्या हाती मी विश्वांच्या स्वामीची शरणागती पत्करतो.''

## हौझाकडे दूत पाठविला

पैगंबर मुहम्मद (स.) यांना येमेनमधील बनू हनीफा या ख्रिश्चन टोळीचे प्रमुख हौझा याच्याकडे पाठविलेल्या दूताचे चांगले आदरातिथ्य झाले. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पद्यात्मक पत्रास उत्तर देताना इस्लाम पसंत असल्याचे कळविले पण अशी अट घातली की त्यांना सत्तेमध्ये वाटा दिला पाहिजे. ही एक विक्षिप्त मागणी पुरी केली जाऊ शकत नव्हती.

या मागणीने मुहम्मद (स.) यांच्या दर्जाबद्दल व स्थानाबद्दल मोठे अज्ञान असल्याचे आणि ते शिकवण देत असलेल्या धर्माबद्दलचे अज्ञान दर्शविले. या धर्माचा प्रसार ही काही एखाद्या राजकारणी मुत्सद्याने स्वत:च्या हितापोटी हाती घेतलेली विस्तारवादी मोहीम नव्हती, तसेच शक्ती व सत्ता प्राप्ती वास्तविकपणे त्यांचे कर्तव्य नव्हते. म्हणून सत्तेत वाटा देण्याचा प्रश्न विक्षिप्त होता, कारण निरनिराळी प्रलोभने व आमिषे दाखवून सत्ता काबीज करण्याचा डाव, प्रभावशाली माणसे खेळत तसा शक्तीच्या राजकारणाचा तो खेळ नव्हता. आपल्या निर्माणकर्त्याशी असलेल्या कर्तव्यबद्धतेचा तो भाग होता. आपल्या स्वामीसमोर ती एक बिनशर्त शरणागती होती. इस्लामला जर जीवनाची आचारासंहिता म्हणून स्वीकारायचे असेल तर ती अगदी त्याच्या गुणवत्तेवरच केले पाहिजे, तिला कसल्याही अटींचे कुंपण घालून नव्हे.

## खैबरचा पाडाव

यहुदी लोक खिन्न मन:स्थितीत असले तरी मुस्लिमांना उपद्रव देण्यासाठी मार्ग व साधने हुडकण्याचे त्यांचे कार्य मोठ्या उत्साहाने करण्यात ते सक्रिय होते. मदीनेच्या ईशान्या दिशेला तीन-चार दिवसांचा प्रवासाच्या अंतरावर एक भक्कम तटबंदी केलेला प्रदेश त्यांच्या ताब्यात होता. त्यात मोठमोठे राजवाडे, प्रासाद होते. अल् कमूस नावाचा एक विशेष राजवाडा एक दुर्गम टेकडीवर होता. या किल्ल्यांच्या समूहाला 'खैबर' म्हणजे तटबंदी केलेली जागा असे म्हणत. खैबरची एकून लोकसंख्या बनू नजीर टोळीच्या विविध शाखांची बनलेली होती. तसेच तेथे आश्रय घेऊन वसलेल्या कुरैशांचीही तेथे वस्ती होती. खैबरच्या यहुदी लोकांना मुहम्मद (स.) बद्दल आणि त्यांच्या सोबत्यांबद्दल सक्रिय व कट्टर द्वेष होता आणि त्यांचे भाऊबंद तेथे येऊन राहिल्यापासून तो द्वेष आणखी बळावला होता.



## पैगंबर मुहम्मद (स.) यांची खैबरवर स्वारी

खैबरच्या यहुदी लोकांची, बनू गतफान या खेडूत अरबांच्या प्राचीन टोळीशी युती होती. तसेच त्यांच्या विचाराच्या कित्येक इतर टोळ्यासुद्धा मुस्लिमांविरूद्ध एक मोठी फळी उभी करण्यासाठी अहोरात्र झटत होत्या. त्यांच्या हालचाली थोपविण्यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी, हिजरी सनाच्या सातव्या वर्षी, मुहर्रम महिन्याच्या सात ताराखेला चौदाशे लोकांचे सैन्य बरोबर घेऊन खैबरवर चाल केली. त्यांनी 'इस्त्र'च्या मार्गाने वाटचाल केली आणि तेथे त्यांच्यासाठी एक मस्जिद बांधण्यात आली. नंतर सैन्य घेऊन ते पुढे गेले आणि अल्-राजीच्या खिंडीत पोहोचल्यावर तेथे थांबले. खैबरच्या व गत्फान लोकांच्या मध्ये त्यांनी तळ टाकला, जेणेकरून गत्फान लोकांना खैबरला कुमक पाठविता येऊ नये, कारण त्यांच्याशी त्यांचा युती-करार झालेला होता.

खैबरचा किल्ला जेव्हा दिसू लागला तेव्हा खालील शब्दांत पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अल्लाहची प्रार्थना केली,

''हे अल्लाह! पृथ्वीच्या व आकाशांच्या स्वामी! धरणीच्या व ती जे पिकविते त्यांच्या स्वामी! दुष्ट माणसांच्या व जेथपर्यंत ते शरासंधन करतात त्यांचे स्वामी! वाऱ्यांच्या व ज्यांना वारे असूडतात त्यांचे स्वामी! या वस्तीसाठी तुझ्या चांगुलपणाची आम्ही विनवणी करतो. या वस्तीत राहणाऱ्या लोकांच्या कल्याणाची तसेच या वस्तीत आढळणाऱ्या सर्व वस्तूंच्या कल्याणाची आम्ही तुला विनंती करतो. या वस्तीच्या दुष्टपणापासून, येथे वसणाऱ्या लोकांच्या दुष्टपणापासून आणि येथे आढळणाऱ्या सर्वच दुष्टपणापासून रक्षण होण्यासाठी आम्ही तुझा आश्रय मागतो.''

नंतर आपल्या स्वामीचे नाव घेऊन पुढे वाटचाल करण्याची आज्ञा त्यांनी सैनिकांना दिली.

## युद्धला प्रत्यक्ष सुरवात

यहुदींचे छोट छोटे बालेकिल्ले काबीज करून त्यांची संख्या घटवीत पैगंबर मुहम्मद (स.) यांनी युद्धास सुरवात केली. ते पूर्ण झाल्यावर त्यांनी अल्-कमूस या खैबरमधील मुख्य किल्ल्यावर हल्ला चढविला. मोठ्या दगडांच्या अवाढव्य भिंती असलेला ते भक्कम बांधकाम केलेला किल्ला होता. किल्ल्यात जाणाऱ्या सर्व वाटांवर मजबूत तटबंदी होती. तटाच्या आतल्या बाजुला भरपूर शस्त्रे जवळ असलेले व भरपूर अन्नधान्याचा पुरवठा असलेले सैन्य तयारीत होते. इस्लामच्या मोठमोठ्या अनुभवी शूर वीरांना पुन्हा पुन्हा हल्ले चढवूनही प्रबळ यहुदींनी काहीच दाद दिली नाही. मग इस्लामचा ध्वज अलींच्या हाती देण्यात आला. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे चुलतभाऊ आणि जावई

असलेले अली (रजि.) आपल्या माणसांना घेऊन वारंवार निकराचे हल्ले परतविले होते. ती एक कठीण लढाई होती. तरीही मुस्लिम लोक निराश झाले नव्हते. वीस दिवसांपर्यंत त्यांनी वेढा टिकवून धरला आणि सतत लढा देत त्यांनी किल्ले काबीज केले. मुस्लिमांच्या हाती लुटीची गडगंज संपत्ती व माल पडला. शिवाय खजुरीचे, मधाचे व सातुचे प्रचंड साठे तसेच मेंढ्यांचे व उंटांचे मोठमोठे कळप तसेच तिजोऱ्यातील हिरे माणकेही मोठ्या प्रमाणात होते. खैबर सुपीक जमिनीसाठी व सुंदर फळबागांसाठी फार प्रसिद्ध होते आणि त्यांचे मालक जास्तीत जास्त लागवड करून उत्पादन वाढविण्यात सतत गढलेले असत. म्हणून पैगंबर मुहम्मद (स.) यांना भेटून त्यांनी विनंती केली की त्यांच्या जमिनींची लागवड करण्यास त्यांना परवानगी असावी व उत्पादनाचा निम्मा वाटा ते मुस्लिमांना देतील. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांची विनंती मान्य करण्याचा दयाळूपणा दाखविला.

## सफियाशी विवाह

त्यांच्याशी मैत्री वाढविण्यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आणखी पावले उचलली. कैद केलेल्या लोकांमध्ये एका अग्रेसर यहुदी हुय्य बिन अख्तब सफिया होती. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी तिला मुक्त केले आणि तिच्याशी विवाह केला.

ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे, की खैबरच्या लढाईत गडगंज धनसंपत्ती मुस्लिमांच्या हातात पडूनही पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अत्यंत साध्या व सरळ जीवनात कसलाही फरक पडला नाही. साधी राहणी व संतुष्टपणाचे ते मूर्तीमंत रूप होते आणि भौतिक धनसंपत्तीकडे त्यांचा मुळीच कल नव्हता. धनसंपत्तीबद्दल त्यांची प्रवृत्ती दर्शविणारे एक उदाहरण फार बोलके आहे. बनू नजीरच्या टोळीच्या प्रमुखाच्या कन्येशी झालेला त्यांच्या विवाहप्रसंगी इतका साधा लग्नसोहळा करण्यात आला होता की पाहुण्यांनी आपल्या घरूनच भोजन आणावे असे सांगण्यात आले होते. त्याच भोजनाने लग्नाची मेजवानी झाली होती. एका विजेत्याने मुस्लिमांना इतकी प्रचंड धनसंपत्ती मिळाली असताना, आपला विवाह इतक्या साध्या रीतीने साजरा केल्याचे इतिहासात आढळून येते काय?

## मुस्लिमांची मक्केला भेट

हुदैबियात झालेल्या शांतता तहनाम्यातील कलमानुसार हिजरी सनाच्या सातव्या वर्षाच्या अखेरीस पैगंबर मुहम्मद (स.) काबागृहाची यात्रा करण्यासाठी निघाले. त्या आधीच्या वर्षी यात्रा करण्यापासून माघारी फिराविण्यात आले होते. दोन हजार माणसांसह सत्तर उंट कुर्बानीसाठी बरोबर घेऊन पैगंबर निघाले. काबागृहाची यात्रा कराराचे काटेकोर पालन करण्यात आले. कोणीही सशस्त्र माणूस शहरात शिरला नाही. मक्केपासून आठ



मैल अंतरावर दोनशे माणसांचा एक गट तेथे ठेवून, तेथेच सर्व शस्त्रे ठेवण्यात आली होती. मक्का शहर रिकामे झाले होते. कुरैशांचे सर्व लोक तेथून निघून गेले होते आणि शेजारच्या डोंगरात आपल्या तंबूत आणि राहुट्यात त्यांनी आश्रय घेतला होता.

तो स्वारांचा थवा अल्लाहच्या पुढे थांबून 'लब्बैक, अल्लाहुम्मा लब्बैक.' (आम्ही येथे आहोत, हे अल्लाह तुझी सेवा करण्यास आम्ही हजर आहोत) मुस्लिमांनी मोठ्या विनम्रपणे पवित्र गृहात प्रवेश केला. सर्वप्रथम पैगंबर मुहम्मद (स.) काबागृहाच्या कोपऱ्यापर्यंत स्वारीवरून गेले आणि काळ्या दगडाचे त्यांनी चुंबन घेतले. मग त्यांनी पवित्र स्थानाला सात प्रदक्षिणा घालायला सुरवात केली.

हे सर्व झाल्यावर पैगंबर मुहम्मद (स.) लोकांना घेऊन त्यांचे नेतृत्व करीत 'सफा'च्या डोंगराकडे निघाले. तेथे एका टोकाकडून दुसऱ्या टोकापर्यंत स्वार होऊन त्यांनी सात फेऱ्या मारल्या. यात्रेचा हा विधी आदरणीय हाजरा वेडेपिसे होऊन आपले बालक इस्माईलसाठी पिण्याच्या पाण्याचा शोध घेतला होता; त्याचे स्मरण करून देणारा होता.

नंतर कुर्बानीच्या जनावरांचा बळी देण्यात आला. त्यानंतर सर्व यात्रींनी आपल्या डोक्याचे मुंडन केले.

यात्रेकरूतील मुख्य समूहाने यात्रेतील आरंभीचे सर्व विधी पूर्ण केले होते, परंतु मागे ठेवलेल्या शस्त्रांच्या रक्षणासाठी काही लोकांना मागे ठेवण्यात आले होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांना सोडविले. त्या माणसांनीही इतराप्रमाणे आपले सर्व विधी पुरे केली.

दुसऱ्या दिवशी पहाटे पैगंबर मुहम्मद (स.) मस्जिदमध्ये आले आणि दुपारपर्यंत तेथेच थांबले. बिलाल (रजि.) यांनी काबाच्या छतावर चढून इमानधारकांना प्रार्थनेसाठी बोलावले. मक्केच्या खोऱ्यात दिसलेले ते दृश्य खचितपणे आश्चर्यकारक होते. अनेक वर्षांच्या विजनवासानंतर मुस्लिम लोकांनी स्वामीच्या घराला भेट दिली होती. आपल्या सोडलेल्या घरांमध्ये शिरण्याची कोणालाही तळमळ वाटली नाही. मुस्लिमांनी त्यांना कायमचा निरोप दिला होता, परंतु तो ऐहिक महत्त्वाकांक्षेपोटी नव्हे तर केवळ अल्लाहखातर त्यांची मालमत्ता, त्यांची आवडती घरेदारे ही सर्व त्यांच्या दृष्टीने महत्त्वशून्य होती. त्यांना केवळ अल्लाहचे व त्याच्या पैगंबर मुहम्मद (स.) यांचे प्रेम सर्वाधिक मोलाचे होते. त्याच्या तुलनेत बाकी सर्वकाही क्षुल्लक हाते. सभोवतालच्या डोंगरावर उच्चस्थानी असलेले मक्केतील लोक, मोठ्याने केलेले एकेश्वरवादी घोषणा, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पैगंबरत्वाची घोषणा, प्रार्थनेचे मोल, याबद्दलची घोषणा लक्षपूर्वक ऐकत होते

आणि इमानधारक लोकांच्या नमाजच्या हालचालींचे निरीक्षण करीत होते. ती उन्नत व उदात्त घोषणा अविरोधपणे त्यांच्या अंत:करणात शिरत होती. ''अल्लाह सर्वश्रेष्ठ आहे, अल्लाहखेरीज कोणीही देवता नाही.'' या घोषणांचा त्यांना विस्मय वाटला. ते उद्‌गारले, ''हे मुस्लिम कशा प्रकारचे लोक आहेत? ते शांत व स्तब्ध आहेत, टाळ्यांचा कडकडाट नाही, शिट्या मारीत नाहीत, पुरूष-स्त्रियांची सरमिसळ नाही. त्यांच्या अनेक देवतांच्या मूर्ती ज्या तोपर्यंत काबागृहातच स्थापलेल्या होत्या, त्या देवता या नव्याने स्थापलेल्या उपासना पद्धतीविरूद्ध विरोध का करीत नाहीत? कोणत्याही दैवताने विजेचा लोळ उठविला नाही, वज्रघात केला नाही की पृथ्वी हादरवून टाकली नाही. त्यांनी त्या देवता हे थोतांड आहे, अशी जाहीरपणे घोषणा केली, त्या मुहम्मदवर, त्या सूड का उगवत नाहीत? केवळ अल्लाहची उपासना करायची, त्या देवता अगदी सामर्थ्यहीन आहेत?'' हे आणि अशा प्रकारचे प्रश्न त्यांच्या मनात घोंगावू लागले आणि त्यांच्या श्रद्धांचा पायाच त्यामुळे हादरला होता. ईश्वराच्या सर्व पैगंबरांनी त्यांच्या काळात दिलेले आणि शेवटी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मानवतेला दिलेल्या त्या महान सत्याचा स्वीकार करण्याची तयारी करायला लागले. मक्केंतील काही लोक मूर्तीपूजेबद्दल नापसंती व तिटकारा दर्शवू लागले. ही गोष्ट कुरैशांतील प्रतिष्ठितांना भयसूचक होती. वेळ जात होता आणि असूयेने ते वेळ संपण्याची वाट पाहात होते. यात्रेच्या चौथ्या दिवशी सकाळी त्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांना सोबत्यांसह शहर सोडून जाण्यास सांगितले. मुहम्मद अल् अमीन असल्याने कराराचा भंग करण्याची कल्पनाही त्यांच्या डोक्यात नव्हती. म्हणून त्यांनी आपल्या माणसांना मक्केतून निघण्याची आज्ञा दिली.

मुस्लिमांची ही मक्केची भेट, मदीनेतील नागरिकांना एक मोठे वरदान ठरले. इमानधारकांनी दाखवून दिलेला संयम, उच्च नीतिचारित्र्याचा दर्जा, दिलेल्या शब्दाचा मान कटाक्षाने राखण्याची वृत्ती आणि त्याचबरोबर इमानधारकांनी दाखविलेले अल्लाहबद्दलचे प्रेम आणि त्यांच्या पवित्र पैगंबरांबद्दल नितांत आदर पाहून मक्केतील लोकांच्या मनावर मोठी छाप पडली. त्यांच्या परिणामस्वरूप, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या विरोधात कुरैशांची जी माणसे अग्रेसर व जहाल होती, त्यांच्या धर्माला ज्यांचा कट्टर विरोध होता, अशी प्रभावशाली व प्रतिष्ठित कुरैशांची माणसे जे प्राणपणाने त्यांच्याशी लढले होते; ते आता त्यांचे विरोधक राहिले नव्हते. म्हणून त्यांनी इस्लाम धर्माला आलिंगन दिले. अशा लोकांमध्ये प्रामुख्याने खालिद बिन वलीद, अम्र बिन आस होते.



## मैमुना बिन हारिसची पैगंबर मुहम्मद (स.) यांचा विवाह

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या मक्का यात्रेच्या वेळी त्यांचे चुलते अब्बास यांनी त्यांची मेहुणी मैमुना – हारिसची मुलगी पैगंबर मुहम्मद (स.) यांना देऊ केली. मुस्लिमांचे ख्यातनाम सेनापती खालिद यांची ती आत्या होती. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी तो प्रस्ताव स्वीकारण्याची यासाठी दया दाखविली की त्यामुळे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या आणि मक्केतील प्रभावशाली माणसांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध आणखी दृढ होतील.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी केलेल्या विवाहांमुळे त्यांच्यावर टीका करणाऱ्यांना हल्ला करण्याचे मोठे साधन मिळाल्यासाखे झाले आणि त्यांच्यापैकी काहींनी न्यायीपणाच्या व सभ्यतेच्या मर्यादांचे उल्लंघनही केले. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या विवाहसंबंधी खालील वास्तवता समर्पक व प्रसंगोचित आहे.

## बहुपत्नित्व ही मानव समाजातील प्रस्थापित संस्था आहे

अनादि काळापासून बहुपत्नित्व ही मानव समाजातील प्रस्थापित संस्था आहे. बायबलच्या व तल्मुदच्या काळातही प्रचलित होती. मोझेसच्या (मूसाच्या) कायद्याने त्याला पायबंद तर घातला नाही. उलट त्याला प्रोत्साहनच दिले. मूळ पुरूषांनी व सन्माननीय वृद्ध जनांनी बहुपत्नित्व आचरले. तसेच न्यायाधीशांनी, राजे लोकांनी आणि यहुद्यांतील अध्यात्माकडे वळलेल्यांनीही ते आचरले. एनसायक्लोपीडिया ब्रिटानिकाच्या अनुसार ''सर्वसाधारण यहुदी माणूस चार बायका करू शकत असे आणि राजा अठरा राण्या ठेवू शकत असे.''

प्राचीन भारतात ऋषिमुनींच्या काळात, बहुपत्नित्वाला केवळ मान्यता होती असे नव्हे, तर प्रत्यक्षात ती आचरणात होती. हिंदुंच्या ऋग्वेदातून आणि अन्य धार्मिक ग्रंथातून बहुपत्नित्वाचे भरपूर पुरावे सिद्ध करता येतात. राजे लोकांच्या बाबतीत चार राण्यांचा उल्लेख तर उघडपणे आढळतो. वेदकालीन वीर आणि ब्राह्मण यांना अनेक पत्नीं असल्याचे वारंवार म्हटले गेले आहे.

धर्मांचा इतिहास हे स्पष्टपणे दाखवून देतो की बहुपत्नित्वामध्ये अनिवार्यत: काहीतरी अशुद्धपणा अगर कमीपणा आहे किंवा मानवी कमकुवतपणाला कुरकुरत दिलेली ती सवलत आहे ही कल्पना, थोर धर्मांच्या शिकवणींमध्ये आढळत नाही. ज्यांना पैगंबर म्हटले गेले, अशा थोर आध्यात्मिक नेत्यांमध्ये, केवळ दोघांचा अपवाद सोडून उदा. येशू (अ.) (ते अविवाहितच राहिले) अणि याहया (अ.); बाकी सर्वांनी बहुपत्नित्व आचरले होते. त्यांच्यापैकी काहींना तर शंभर पत्नी होत्या, असे आढळून येते.

ख्रिश्चन धर्माच्या शिकवणीमध्ये संन्यस्तवृत्तीने राहण्याचे सर्वसामान्य तत्त्व बिंबविले गेले असले, तरी एकपत्नित्व हे बहुपत्नित्वाच्या अवस्थेपेक्षा अधिक उच्च दर्जाचे व पवित्र आहे; असे सूचित करणारे, त्या धर्माच्या शिकवणीमध्ये आढळत नाही. येशू (अ.) च्या आदर्शाच्या आधाराने जर काटेकोरपणे निर्णय घ्यायचा असला, तर कोणीही विवाहच मुळात करू नये. परंतु आपणाला असे दिसून येते की काही ख्रिश्चन धर्मीय सुधारणावाद्यांनी आणि विचारवंतांनी विवाह करण्याला दुजोरा दिला, इतकेच नव्हे तर बहुपत्नित्वाचे काही विशिष्ट प्रकरणात त्यांनी मोठ्या धार्मिक उत्साहाने समर्थनही केले आहे. एनसायक्लोपीडिया ब्रिटानिकाचा लेखक लिहितो, ''एकपत्नित्व हे या अर्थाने अद्वितीय व विवाहाचा एकमेव प्रकार आहे की द्विभार्या पद्धत हा दंडात्मक गुन्हा मानला तसेच त्याला पाप व पावित्र्याचा भंग असेही मानण्यात येते आणि ते फार क्वचितच आढळते, इतका सर्वसमावेशक आदर्श आणि विवाहाबद्दल कायद्याचा इतका कडक दृष्टिकोन आधुनिक आणि अगदी अलीकडच्या पाश्चिमात्यांचा संस्काराच्या बाहेर कदाचित आढळणार नाही. ख्रिश्चन धर्मतत्त्वातही तसा गर्भितार्थ सूचित केलेला नाही.'' चर्च ऑफ लेटर डे सेंट्स (मॉर्मान्स) आणि ॲनाबाप्टिस्ट पंथाचे थोतांड (१६ वे शतक) हे थोडके अपवादाचे दृश्य वगळता: मध्ययुगात बहुपत्नित्व कायदेशीरपणे आचरणात होते आणि चर्चने त्याचा स्वीकार केला होता. अगदी १७ व्या शतकाच्या मध्यापर्यंत बहुपत्नित्व ही कायदेशीर संस्था म्हणून अधूनमधून दिसून येई आणि चर्चला ती मान्य होती.

म्हणून बहुपत्नित्वाच्या संस्थेला जगातील सर्व भागात कायद्याची व धर्मांची मान्यता होती आणि त्यामध्ये अपकीर्तीकारक असे काहीही नाही, असे पाश्चिमात्य देशांत आज दिसून येते.

म्हणून विवाहाच्या बाहेरच्या कामेच्छा पूर्ण करण्याच्या स्वैराचाराच्या गर्तेतून विवाहसंस्थेला पैगंबर मुहम्मद (स.) यांनी शुद्ध केले. त्यासाठी फक्त चार पत्नींना समान वागणूक देण्याची भारी जबाबदारी टाकली.

''आणि जर तुम्हाला भय असेल की तुम्ही अनाथांशी न्याय करू शकणार नाही तर ज्या स्त्रिया तुम्हाला पसंत पडतील त्यांच्यापैकी दोन-दोन, तीन-तीन, चार-चारशी विवाह करा. परंतु जर तुम्हाला भय असेल की तुम्ही त्यांच्याशी न्याय करू शकणार नाही तर मग एकच पत्नी करा.'' (दिव्य कुरआन, ४ : ३)

आता प्रश्न उद्‌भवतो तो असा की काही अटीवर का होईना, बहुपत्नित्व अस्तित्वात राहण्याची पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जी परवानगी दिली, ती खऱ्या अर्थाने मानवी हिताची आहे काय? उत्तर असे आहे की, मानवजातीचा उपकारकर्ता या नात्याने पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मानवांची सेवा या क्षेत्रातही केली आहे. तशीच जीवनाच्या



अन्य अंगातही केली आहे. मनुष्यजातीच्या आचार व रूढींच्या अभ्यासकांनी अलीकडेच संशोधनाद्वारे हे संशयातीतपणे सिद्ध करून दाखविले आहे.

जी. आर. स्कॉट लिहितो,

''पुरूष हा आवश्यकरित्या बहुपत्नी असणार आहे. संस्कृतीच्या विकासाबरोबरच हे अंगचे बहुपत्नित्व ही चालत आले आहे.''

विल ड्युरांट लिहितो,

''पुरूष हा निसर्गप्रकृतीनुसार स्वभावानेच बहुपत्नित्ववादी असतो. त्याच्यावर नीतिशास्त्राची कडक बंधने असतील, सहाय्यभूत अत्यंत दारिद्र्य असेल, अत्यंत लबाड व कष्ट उपसावे लागत असतील किंवा पत्नीवर अखंड देखरेख ठेवावी लागत असेल, तरच पुरूषाला एकच पत्नी करण्याचे उत्तेजन मिळते.''

## पुरूष स्वभावसिद्ध बहुपत्नित्ववादी आहे

प्रोफेसर एन. डब्ल्यु. इंगेल्सने लिहिलेल्या 'बायॉलाजी ऑफ सेक्स ॲंड द अनमॅरीड' या निबंधात लिहितो,

''पुरूष आवश्यकपणे सतत एक पत्नित्ववादी राहिला आहे की स्वैराचारी व अनिर्बंध कामेच्छा पुरी होताच उपलब्ध पुरावा दुसऱ्या पर्यायाकडे बोट दर्शवितो. प्राणिमात्र असल्याने माणसाची लैंगिक मानसिकता आम्हाला जेथपर्यंत ज्ञात आहे, पुरूष एकपत्निव्रती नाही आणि एकपत्नित्ववादाच्या प्रवृत्तीचा हा अचानक बदल कसा घडून आला, याचे स्पष्टीकरण जीवशास्त्राच्या आधाराने आम्ही देऊ शकत नाही.''

बहुपत्नित्ववाद हा जीवशास्त्रानुसार निकोप असून निसर्गाच्या मागणीशी पूर्णत: अनुरूप आहे, इतकेच नाही, एक संस्था म्हणून त्याचे मोठे मोल आहे. डॉक्टर मॅकफर्लेन यांनी लिहिलेले 'दि केस फॉर पॉलिगामी' हे डोळे उघडणारे पुस्तक आहे. त्यात तो लिहितो,

''सामाजिक दृष्टिकोनातून अथवा धार्मिक दृष्टीने या प्रश्नावर विचार केला, तर बहुपत्नित्वाची प्रथा ही उच्च संस्कृतीच्या दर्जाविरूद्ध नाही. पश्चिमेतील निराधार व नकोशा झालेल्या महिलांचा प्रश्न सोडविण्यास ही सूचना एक व्यवहारी तोडगा प्रस्तुत करते. त्याचा दुसरा पर्याय व्यभिचार, वेश्या व्यवसाय आणि कुमारी मातांची समस्या असा आहे.''

बहुपत्नित्व आचरणात राहिले आहे, ही वस्तुस्थिती या गोष्टीचा पुरावा आहे, स्त्री-पुरूष समप्रमाणात नाहीत. तरी त्या प्रथेच्या परिणामस्वरूप गतकाळात स्त्रियांचा फार मोठा

अभाव पडला होता, असे अद्याप आम्हाला कळायचे आहे. जगात पुरूषांची व स्त्रियांची संख्या समान असली तरी त्याची दुसरी बाजू अशी आहे की एकपत्नी-विवाहाची प्रत्येक पुरूषावर सक्ती करावी लागेल. हा एकच मुद्दा अन्य कसल्याही युक्तिवादाच्या सहाय्याविना एकपत्नित्वाची पद्धत सार्वत्रिक होण्यास निरूपयोगी व दोषकारक ठरते.

स्त्रियांचे पुरूषांवरील प्राबल्य हेच बहुपत्नित्व आवश्यक होण्याचे एकमेव कारण नसून दुसऱ्या अनेक अशा अवस्था आहेत, ज्यामध्ये समाजाच्या नैतिक व शारीरिक कल्याणाखातर बहुपत्नित्वाचा अंगीकार करणे भाग पडते. उदाहरणार्थ, मुले असलेल्या विधवा स्त्रीशी विवाह करून तिचे व तिच्या मुलांचे पोषण व सांभाळ करणे. वैध लैंगिक गरजाही पुरूषाला बहुपत्नित्वाला उद्युक्त करतात. समाजाला जर स्वैर लैंगिक अनाचारापासून, व्यभिचारापासून, नग्नतेपासून व अनैतिकतेपासून वाचवायाचे असेल, तर पुरूषाच्या नैसर्गिक प्रवृत्तीचा व त्याच्या खऱ्याखुऱ्या गरजांचा कायदा व रूढी यांनी वास्तववादी व यथार्थ दृष्टिकोन ठेवायला हवा. बहुपत्नित्वाबद्दल कोणी काहीही म्हणोत, आधुनिक संस्कृतीवर सर्वांत मोठा कलंक असणारा वेश्या व्यवसाय आणि वेश्यांची संतती, ही समस्या व्यवहार्यता बहुपत्नित्व आचरणात आणणाऱ्या देशांमध्ये आढळत नाही. या गोष्टीचा इन्कार करता येत नाही.

डॉ. अनिबेझंट म्हणतो,

''पाश्चात्य देशांत एकपत्नित्वाचे ढोंग वठविले जाते, परंतु प्रत्यक्षात तेथे जबाबदारीविना बहुपत्नित्व आचरण्यात येते. पुरूषाला कंटाळा आला की प्रेयसीला-रखेलीला दूर लोटले जाते. हळूहळू ही स्त्री रस्त्यावर येऊन बाजारी वेश्या बनते. पहिल्या प्रियकरावर तिच्या भविष्याची जबाबदारी नसते. तिची अवस्था एका बहुपत्नित्ववादी कुटुंबाच्या निवाऱ्याखालील स्त्रीपेक्षा शतपटीने अधिक वाईट असते.

पाश्चात्य देशांत रात्रीच्या समयी हजारो महिला साजशृंगार करून रस्त्यात गर्दी करताना दिसतात, तेव्हा आम्हाला खात्रीपूर्वक असे वाटते की इस्लामला बहुपत्नित्वासाठी नावे ठेवणे पाश्चिमात्यांच्या तोंडी शोभत नाही. एखाद्या स्त्रीसाठी भुलवून व फूस लावून वाममार्गाला लावणे जाणे, मग तिला धुडकावले जाऊन तिचे रस्त्यावर येणे व बाजारी वेश्या होणे, कदाचित तिच्या हातामध्ये, कायद्याचे कसलेही संरक्षण नसलेली अनौरस संतती असणे, रात्रीमागून रात्री कोणीही येणाऱ्या जाणाऱ्याच्या वासनांचे बळी होणे, मातृत्वक्षमता गमावून बसणे आणि सर्वांच्या तिरस्कारास पात्र ठरणे; यापेक्षा एका स्त्रीला हे अधिक सुखाचे, अधिक मानाचे व आदराचे आहे की तिने एकाच पुरूषाशी संलग्न होऊन एखाद्या बहुपत्नी कुटुंबामध्ये पत्नी म्हणून राहावे. तिची औरस संतती ठेवावी आणि सर्वत्र तिला मान व आदर प्राप्त व्हावा.''



वर मांडलेले विचार ही वास्तवता दर्शविण्यात पुरेशी बोलके आहेत की बहुपत्नित्ववाद हा जीवशास्त्रनुसार अनैसर्गिक नाही, विवेकबुद्धीनुसार आक्षेपार्हही नाही अथवा नैतिकतेनुसार हीन दर्जाचेही नाही. त्याचे शारीरिक, सामाजिक, धार्मिक व नैतिक असे अनेकविध फायदे आहेत. अल्लाहने आपल्या परिपूर्ण बुद्धिकौशल्याने बहुपत्नित्व संस्थेतील दोष काढून त्याला कसे शुद्ध करावे, हे त्याच्या अंतिम पैगंबराला दाखवून दिले. त्या संस्थेत हे दोष शिरले होते आणि मुस्लिम समाजातही ते भिनले होते. सामाजिक दोष निपटून काढण्यासाठी त्याचा वापर केला.

## पैगंबर मुहम्मद (स.) यांचे विवाह

आता आम्ही पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या विवाहांकडे वळतो.

ते नुसतेच पंचवीस वर्षांनी अधिक होते. आपल्या तारूण्याचा काळ केवळ माननीय खदीजा (रजि.) यांच्याबरोबर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी काढला. हिजरी सनाच्या सहाव्या वर्षी त्यांचे निधन झाले, त्यावेळी पैगंबर मुहम्मद (स.) यांचे वय पन्नास वर्षांचे होते. खदीजा (रजि.) यांच्या दु:खद निधनानंतर त्यांनी एका विषन्नावस्थेतील निराधार विधवेशी विवाह केला. त्यांनी फार लवकर इस्लाम धर्माचा स्वीकार केला होता आणि सत्याखातर त्यांनी फार छळ सोसला होता.

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे निष्ठावान मित्र माननीय अबू बकर (रजि.) यांची कन्या माननीय आएशा (रजि.) यांच्याशी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी विवाह केला. तीच मुहम्मद (स.) यांची एकमेव कुमारी पत्नी होती.

मदीना येथील परिस्थितीने अत्यंत गंभीर स्वरूप धारण केले. कुरैशांबरोबरच्या वैरामुळे सशस्त्र लढाया झाल्या होत्या आणि त्यामध्ये अनेक थोर मुस्लिम शहीद झाले होते. म्हणून पैगंबर मुहम्मद (स.) यांचे आणि त्यांच्या सोबत्यांचे ते अनिवार्य कर्तव्य होते की पतीला व पित्याला पारख्या झालेल्या शहिदांच्या विधवांचे व त्यांच्या मुलाबाळांचे दु:ख निवारण करावे. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मुख्य भार स्वत:वर घेतला आणि उमर (रजि.) यांची कन्या हपसा (रजि.) यांच्याशी विवाह केला. त्यांचे पती बदरच्या लढाईत ठार झाले होते. याच दयेच्या व सहानुभूतीच्या आधारावर खुजैमाची कन्या जैनबशी त्यांनी विवाह केला त्यांनी उहूदच्या लढाईत त्याचा पती गमावला होता. त्यांचे आईबाप मुस्लिमेतर होते व ते मक्केत राहत होते. त्यांचा पती शहीद झाल्यानंतर त्यांचा सांभाळ करणारा कोणीही नव्हता. त्यानंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अतिथ्यशील कुटुंबात गृहप्रवेश करणारी स्त्री उम्मे सलमा होत्या. त्यांचे पती उहूदच्या लढाईत गंभीर जखमी होऊन निधन पावले होते. त्यांच्यामागें त्यांची गर्भवती पत्नी व एक मुलगी होती. पैगंबर

मुहम्मद (स.) यांना त्यांच्या दुरावस्थेची कीव आली व पत्नी म्हणून त्यांचा स्वीकार करून त्यांना सन्मानित केले. जहश (रजि.) ची मुलगी जैनबशी झालेल्या विवाहांचे सविस्तर वर्णन आधीच्या प्रकरणात दिले गेले आहे आणि तो विवाह काही महत्त्वाच्या सामाजिक कारणाखातर करण्यात आला होता, ही गोष्ट सिद्ध केली आहे. उदाहरणार्थ, दत्तक नात्यासंबंधी काही रूढी नष्ट करण्यासाठी, तसेच अरबांमध्ये प्रचलित असलेली रूढी म्हणजे गुलामीतून मुक्त झालेल्या पुरूषाने प्रतिष्ठित कुळातील महिलेला तलाक दिला, तर तिची मानखंडना होते, ही अन्यायकारक रुढी पुसून टाकण्यासाठी तो विवाह झाला होता.

आपल्या निष्ठावान अनुयायांच्या विधवांचे दु:ख निवारण करण्याचे व त्यांना संरक्षण देण्याचे कार्य तर त्यांनी केलेच, परंतु शत्रूच्याही तीन विधवांशी त्यांनी विवाह करून घेतला. त्या तीन स्त्रियांच्या– जवैरियाह, मैमुना आणि सफिया-यांच्या पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या घरात प्रवेशामुळे विविध टोळ्यांशी त्यांचे संबंध अधिक बळकट झाले आणि अशा तऱ्हेने वैराचे व आकसाचे लढे व रक्तपात थांबले.

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे विवाह, आपल्या निष्ठावान अनुयायांच्या विधवांच्या दुरावस्थेबद्दल करूणा व दया भावनेच्या पोटीच झाले होते, कारण त्या अगदी निराधार झाल्या होत्या. पतीच्या प्रेमापासून व रक्षणापासून त्या वंचित झाल्या होत्या. त्यांचे पुनर्वसन करण्याची अत्यंत निकडीची गरज होती. ही वास्तवता पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या टिकाकारांनीसुद्धा मान्य केली आहे.

बॉस्वर्थ स्मिथ म्हणतो,

''ही गोष्ट लक्षात ठेवायला पाहिजे की पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या बहुतेक विवाहांचे स्पष्टीकरण करताना निराश्रित व निराधार झालेल्या संबंधित व्यक्तींच्या कळवळ्यामुळे ते झाले होते, अन्य कसलीही भावना व उद्देश त्यात नव्हता; हे सिद्ध होते.''

इतर विवाह, शत्रुपक्षातील प्रमुखांशी मेळमिलाफ करण्याच्या धोरणासाठी केले होते.

त्याशिवाय आणखी एक कारण होते आणि ते वर विवेचन केलेल्या कारणांपेक्षा कमी महत्त्वाचे नव्हते. त्या कारणांपायीच ते विवाह झाले. पैगंबर मुहम्मद (स.) जसे पुरूषांसाठी अल्लाहचे ध्वजधारक होते, तसे ते स्त्रियांसाठी ही होते. महिलांना पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या मार्गदर्शनाची गरज होती. तसेच पुरूषांप्रमाणेच त्यांनाही शिक्षण व प्रशिक्षणाची गरज होती. मुस्लिम समाजाच्या या गरजेचीही पैगंबर मुहम्मद (स.) यांना जाणीव होती. म्हणून मुस्लिमांच्या व्यापक हितासाठी, महिलांमध्ये नवीन नेतृत्व निर्माण



करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. हे नेतृत्व निर्माण करायचे होते, ज्यामुळे त्यांनी इस्लामचे प्रतिनिधित्व करावे. मुस्लिम महिलांचा एक परिपूर्ण नमूना तयार केल्याशिवाय, हे उद्दिष्ट कसे साधले जाऊ शकत होते? समाजाच्या विविध गटातील स्त्रियांना, त्यांच्या वेगवेगळ्या अभिरूचींसह आणि निरनिराळ्या कलासह, तसेच त्यांच्या भिन्नभिन्न बौद्धिक दर्जासह, पत्नी म्हणून त्यांचा स्वीकार करून, पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपल्या घरात त्यांना प्रवेश दिला आणि मग आपल्या निकटच्या सहवासाने व व्यक्तिगत संपर्काने त्यांच्यामधील अल्लाहने दिलेली क्षमता व बुद्धिमत्ता यांची जोपासना करून व शिक्षण दिले, इस्लामच्या शिकवणीनुसार त्यांना परिपूर्ण तयार केले आणि केवळ इस्लामी राष्ट्रकूलातील महिलांपुरत्याच नव्हेत तर अखिल स्त्रीजातीसाठी त्या प्रकाश दाखविणारे दीपस्तंभ ठरले. एक किंवा दोन स्त्रिया ही मोठी जबाबदारी पेलू शकत नाहीत तर संपूर्ण गटाला ही जबाबदारी पार पाडणे भाग होते.

शिवाय पुरूषवर्गाला व महिलावर्गाला द्याव्या लागणाऱ्या शिक्षण-प्रशिक्षणाच्या स्वरूपात फार मोठा फरक होता. पुरूषाच्या जीवनात सामाजिक उद्योगांना अधिक प्राधान्य असते, परंतु महिलांच्या कार्यांचे प्राथमिक क्षेत्र निसर्गत: त्यांचे घरच असते. केवळ पत्नीच पतीच्या जीवनातील सर्व सुखदु:खात आणि जीवनातील अत्यंत गुप्त बाबतीत पतीशी सहभागी असते. जोपर्यंत त्यांच्या जीवनातील अंतर्भागात काही महिलांना प्रवेश दिला नाही, तोपर्यंत पैगंबर मुहम्मद (स.) यांना तशा प्रकाराचा इस्लामी महिला गट तयार करता येत नव्हता. महिलांना पुरूषापासून विभक्त राखण्याच्या इस्लामी शिकवणीनुसार केवळ पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या थोर पत्नींनाच त्या दर्जाच्या पातळीवर राहण्याची सोय केली जाऊ शकली. त्यांनी विश्वासपूर्वक व प्रामाणिकपणाने पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या खाजगी जीवनाबद्दल, जी पवित्र माहिती आम्हाला पुरविली, त्यासाठी त्या थोर स्त्रियांबद्दल समस्त मानवजात त्यांची ऋणी आहे. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या खाजगी जीवनात त्यांच्या लौकिक जीवनक्रमाप्रमाणे अनेक वास्तव गोष्टी होत्या. इमानधारकांसाठी त्या वास्तवता एक मोठा आदर्श बनली आहे. पवित्र कुरआनमधील ताकीद देणारी आज्ञा,

''वस्तुत: तुम्हा लोकासाठी अल्लाहचे पैगंबर एक उत्कृष्ट आदर्श आहेत''

(दिव्य कुरआन, ३३ : २१)

त्याची व्यापकता त्यांच्या पवित्र जीवनापुरतीच नसून त्यांच्या संपूर्ण जीवनक्रमाला ती लागू आहे. ते उद्दिष्ट साध्य करण्यांच्या दृष्टीने लोकांना पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनक्रमाची माहिती अधिकारवाणीने पोहचविण्यासाठी काही थोर स्त्रियांना, त्यांची पत्नी बनून, त्यांच्या घरात प्रवेश करायला लावण्यात आले. कुरआनची आणखी एक आयत.

''यानंतर तुमच्यासाठी अन्य स्त्रिया वैध नाहीत, आणि याचीही परवानगी नाही की

यांच्या जागी अन्य पत्नी आणाव्यात'' (दिव्य कुरआन, ३३ : ५२)

या आयतीचा गर्भितार्थ असा आहे की, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अन्य कृत्यांप्रमाणेच, त्यांनी विवाहसुद्धा पूर्णत: ईशइच्छेनुसारच केले होते. त्यांच्या पाठीमागे एक ईशउद्देश होता. तो उद्देश जेव्हा पूर्ण झाला, तेव्हा आणखी विवाह करण्यास त्यांना मनाई करण्यात आली.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्या तारूण्याचा काळ केवळ एकाच पत्नीच्या, खदीजा (रजि.) यांच्या सहवासात व्यतीत केला, यारून त्या स्त्रियांशी त्यांनी केलेले विवाह, ही एक धार्मिक गरज होती, हे चांगल्या प्रकारे सिद्ध होते. चाळीस वर्षांच्या वयात त्यांना पैगंबरत्व प्रदान करण्यात आले. पैगंबरत्व मिळाल्यानंतरच्या बारा वर्षांच्या कालावधीत, त्यांना मनांत श्रद्धेची मूलतत्त्वे बिंबविण्याची आवश्यकता होती. उदाहरणार्थ, अल्लाहचे एकमेवत्व, पैगंबरत्व व पारलौकिक जीवन, इत्यादी. म्हणून कोणत्याही स्त्रीशी विवाह करण्याची त्यांना गरज भासली नाही. माननीय खदीजा (रजि.) यांच्या निधनानंतर त्यांनी माननीय सौदा (रजि.) या वयस्कर विधवा महिलेशी विवाह केला. परंतु मदीनेत स्थलांतर केल्यानंतर, जेव्हा इस्लामी समाजाची प्रस्थापना झाली आणि इस्लामच्या शिकवणीनुसार मुस्लिमांना आपले व्यक्तिगत व सामाजिक वर्तन घडवावे लागले, तेंव्हा जीवनाच्या आदर्शातून जावे लागले. जीवनाच्या सर्व अंगासंबंधी एकच समस्या नव्हती, तर अनेक प्रश्न व समस्या उभ्या होत्या आणि ते सोडविण्यासाठी पावलेपावली तोडग्यांची गरज होती. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी ते प्रश्न कशा रीतीने सोडविले, ते लोकांना कळणेही गरजेचे होते, तो सुद्धा एक भाग होता, कारण-

''तो आपल्या इच्छेने बोलत नाही, हा तर एक दिव्यबोध आहे जो त्याच्यावर अवतरला जातो.'' (दिव्य कुरआन, ५३ : ३)

अल्लाहच त्यांच्या मुखाने बोलतो. आध्यात्मिक मार्गदर्शन करताना अगर व्यावहारिक नियमावली करताना ते जे काही उच्चारत असत, ते अल्लाहच बोलत असे. आता सार्वजनिकपणे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जी उक्ती व कृती केली ती लोकांच्या मार्गदर्शनासाठी सहजपणे पोचती केली जात असे. परंतु त्यांच्या खाजगी जीवनाबद्दल काय, कारण ते सुद्धा तितकेच महत्त्वाचे व ईशप्रेरित होते आणि इमानधारकांना आदर्श उदाहरण म्हणून त्यांचा उपयोग होणार होता, पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या त्या थोर पत्नींच्या माध्यमातूनच त्यांच्या व्यक्तिगत प्रश्नाबद्दलची इस्लामची शिकवण मुस्लिमांना कळाली. ते साधारण काम नव्हते, ते फार महत्त्वाचे व अत्यंत विशाल असे खडतर काम होते, जे त्या सदाचारी स्त्रियांनी पार पाडले. (अल्लाह त्यांच्याशी प्रसन्न असो) पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या विवाहांच्या संदर्भात वरील वास्तवतेकडे दुर्लक्ष केल्यास त्याचे



समर्थन कसे केले जाऊ शकते?

परंतु ही गोष्ट खचितपणे विलक्षण आहे की इस्लामवर आणि पैगंबरांवर टीका करणाऱ्या पाश्चिमात्य टीकाकारांनी व त्यांच्या नीच प्रयत्नांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांची निंदानालस्ती करताना या सर्व झगझगीत सत्याकडून व वास्तवतेकडून आपले डोळे झाकून घेतले. ती सत्यें हे सिद्ध करतात की त्यांचे जीवन अत्यंत उन्नत व भव्य होते आणि कसल्याही हीन वासनांपासून ते शुद्ध होते. एकमेव अल्लाहवर त्यांची प्रांजळ व शुद्ध निष्ठा होती. जाबिर बिन अब्दुल्लाह (रजि.) यांच्या आधारे असे निवेदन केले जाते की अबू जहल व कुरैश लोकांचे काही प्रमुख पैगंबर मुहम्मद (स.) यांना येऊन भेटले आणि म्हणाले, ''तुम्हाला नेतृत्व प्राप्त करण्याची उत्कट इच्छा असेल, तर तुम्ही आमचे नेते आहात, अशी घोषणा करायला आम्ही तयार आहोत, तुम्हाला जर धनाची आवश्यकता असेल, तर आम्ही तुम्हाला इतके प्रचंड धन द्यायला तयार आहोत की तुमच्या आयुष्यात तर ते पुरेलच, परंतु तुमच्या कित्येक पिढ्यांनाही ते पुरेल, लैंगिक ओढीने तुम्ही उद्युत झाला असाल तर संपूर्ण कुरैशांच्या लोकांमधून दहा रूपवती ललनांची तुम्ही निवड करा. पैगंबर मुहम्मद (स.) स्तब्ध, राहिले व एक शब्दही त्यांनी उच्चारला नाही. त्यांचे बोलणे जेव्हा संपले, तेव्हा पवित्र कुरआनमधील खालील आयत पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उच्चारली,

'' हामीऽऽम, ही परमदयाळू व परमकृपाळू ईश्वराकडून अवतरलेली वस्तू आहे, एक असा ग्रंथ जिची संकेतवचने खूप उघड करून सांगितली गेली आहेत, अरबी भाषेतील कुरआन, त्या लोकांसाठी जे ज्ञान बाळगतात,खुशखबरी देणारा व भय दाखविणारा. परंतु या लोकांपैकी बहुतेकांनी त्याकडून तोंड फिरविले आणि ते ऐकून घेत नाहीत.'' (दिव्य कुरआन, ४१ : १-४)

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी कुरआनच्या वरील आयती म्हटल्या व पुढील ओळी म्हटल्या,

''आता जर हे लोक तोंड फिरवीत असतील तर यांना सांगा, मी तुम्हाला त्याच प्रकारच्या एका अकस्मात कोसळणाऱ्या प्रकोपाचे भय दाखविले जसा आद व समूदवर कोसळला होता.'' (दिव्य कुरआन, ४१ : १३)

ही एकच घटना पैगंबर मुहम्मद (स.) यांचे अल्लाहवरील नितांत प्रेम सिद्ध करण्यास पुरेशी आहे. त्यांच्या पवित्र संदेशकार्यावरील त्यांची निष्ठा आणि ऐहिक सुखाकडे क्षुल्लकपणाची त्यांची दृष्टी सिद्ध होते. जे महान उद्दिष्ट घेऊन ते उभे राहिले आणि ज्यासाठी त्यांनी अपरिमित क्लेश यातना भोगल्या, विजनवास भोगला त्या

उद्दिष्टापासून ऐहिक सुखाचा मोह त्यांना क्षणभराही ढळवू शकला नाही. त्यांनी जर इंद्रियसुखलोलुपतेकडे कल दाखविला असता तर तिच्या पूर्ततेसाठी कुरैशांच्या प्रमुखांनी त्यांना देऊ केलेल्या पर्यायापेक्षा अधिक मोठी संधी ठरू शकत नव्हती.

## मक्केवर विजय

हुदैबियाच्या तहनाम्यातील कलमानुसार अरबी टोळ्यांना असा ऐच्छिक पर्याय देण्यात आला होता की दोन्ही पक्षापैकी कोणत्याही एकाशी त्यांना तह व युती करता येईल. परिणामत: बनू बकर कुरैशांना जाऊन मिळाले व खुजाहा टोळी पैगंबर मुहम्मद (स.) यांना येऊन मिळाली. बनू बकरच्या टोळीने कराराच्या अटींची कसलीही पर्वा न करता बनू खुजाहाच्या टोळीवर हल्ला केला. कुरैशांनी शस्त्रे व माणसे देऊन त्यांना मदत केली. शत्रूच्या दबावाखाली बनू खुजाहाच्या टोळीच्या माणसांनी पवित्र काबागृहाचा आश्रय घेतला. पण तेथेही त्याच्या प्राणांचा आदर राखला गेला नाही आणि सर्व मान्यताप्राप्त रूढी मोडून, बनू बकर टोळीचा प्रमुख नौफल याने पवित्र गृहाच्या हद्दीत शिरून त्यांचा पाठलाग केला आणि जेथे रक्ताचा एक थेंब सांडण्यासही मनाई आहे, त्या ठिकाणी त्याच्या शत्रूची त्याने नृशंस कत्तल केली.

त्या दुखावलेल्या पक्षाने जेव्हा त्यांच्या मुस्लिम मित्रांकडून न्याय मिळवून देण्याची मागणी केली तेव्हा त्यांचे नेते असलेल्या पैगंबर मुहम्मद (स.) यांनी ताबडतोबीने केवळ तहनाम्यातील कराराच्या अटींच्या भंगासाठी आणि पवित्र काबागृहाच्या हद्दीत केलेल्या रक्तपाताचा बंदोबस्त व भरपाईची मागणी केली. त्यांनी तीन मागण्या पुढे ठेवल्या. त्यापैकी एक मागणी तरी मान्य करावी असा आग्रह होता.

१. खुजाहा टोळीच्या लोकांनी रक्ताची भरपाई द्यावी.

२. बनू बकरशी असलेली त्यांची युती संपुष्टात आणावी.

३. तहनामा व शांतता करार रद्द झाला असे समजावे.

त्यांच्या गर्वाच्या एका झटक्यात त्यांनी उद्दामपणे उत्तर दिले, ''आम्ही रक्ताची भरपाईही देणार नाही किंवा बनू बकरबरोबरची आमची युतीही संपुष्टात आणणार नाही परंतु तहनामा रद्द केल्याची घोषणा करण्यास आम्ही तयार आहोत.''

नंतर आपल्या लोकांच्या अदूरदर्शीपणाला चकाकी देण्यासाठी अबू सुफियान मदीनेला आला व तहनाम्याचे पुनरूज्जीवन करावे असे म्हणू लागला. तो त्याच्या मुलीच्या उम्मे हबीबाह (पैगंबर मुहम्मद (स.) यांची पत्नी) घरीही गेला. तेथे तो पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या चटईवर बसणार होता, तितक्यात त्यांनी तीच चटई गुंडाळून



ठेवली. तेव्हा तो म्हणाला, ''ती चटई माझ्यासाठी योग्य नाही की मी त्या चटईवर बसण्यास योग्य नाही, असे मला वाटते, ते मला काहीच ठाऊक नव्हते?'' मुलीने उत्तर दिले, ''ती पैगंबर मुहम्मद (स.) यांची चटई आहे आणि तुम्ही अमंगळ अनेकेश्वरवादी आहात.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पत्नीने दिलेले ते उत्तर त्यांच्या जीवन सहचारीचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर किती अलोट प्रेम होते आणि त्यांच्याबद्दल किती अतोनात आदर होता, हे दाखवून देण्यास पुरेसे बोलके आहे. जीवनाच्या सर्व भागात, अगदी कडक सुरक्षिततेच्या विभागात ज्याला मुक्त प्रवेश आहे, अशा माणसाकडून एखादा तोतयाला इतका आदर व स्नेह मिळू शकतो काय? पैगंबर मुहम्मद (स.) यांचा प्रांजलपणा, खोलवरचे प्रगाढ आणि खराखुरा प्रांजलपणानेच त्यांच्यासमोर येणाऱ्या माणसांकडून ते कौतुक व प्रशंसा मिळवित असत, ते कसल्याही लौकिक वैभवाच्या व गूढतेच्या आवरणाविना अगदी मोकळेपणे लोकांच्या पुढे येत. कोणीही त्यांच्या कृती पाहात असत आणि त्यांच्या अंत:करणातील अगदी आतल्या कण्यातील भावनामध्ये डोकावून पाहू शकत. इतकेच नव्हे, तर त्यात वाटेकरीही होऊ शकत असे. अशा स्थितीत चेहऱ्यावर ते मुखवटा कसा चढवू शकत होते अथवा त्यांच्या मनातील आशा व महत्त्वाकांक्षा ते कसे लपू शकत होते?

मुलीने संक्षिप्त उत्तर दिल्याने वैतागलेला अबू सुफयान त्यांच्या खोलीच्या बाहेर पडला आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे गेला. पैगंबर मुहम्मद (स.) यांना त्याचे डाव व लबाडी चांगली ठाऊक होती, म्हणून त्याला आश्वासन पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दिले नाही. नंतर तो माननीय अबू बकर (रजि.) यांच्याकडे गेला. परंतु त्यात हस्तक्षेप करण्यास त्यांनी नकार दिला. मग त्याने उमर (रजि.) यांची भेट घेतली व मध्यस्थी करण्यास सांगितले. परंतु त्यांनी सरळ नकार दिला. या संदर्भात तो अली बिन अबी तालीब (रजि.) यांना जाऊन भेटला. परंतु त्याच्यासाठी काहीहि करण्यास आपण असमर्थ असल्याचे सांगून त्यांनी खेद प्रदर्शित केला.

अबू सुफियान ने घोर निराशेत आपली पावले मक्केकडे वळविली. तेथे पोहोचल्यावर त्याच्या मुलीच्या भेटीचा वृतांत सांगितला. माननीय अबू बकर (रजि.), उमर (रजि.) व अली (रजि.) यांच्या वर्तनाचे वर्णन केले. तसेच पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अर्थपूर्ण स्तब्धतेची बातमीही सांगितली. मक्केतील लोक भयग्रस्त झाले. परंतु मोठ्या धोक्याची त्यांना अपेक्षा नव्हती.

## मक्केवरील स्वारीची तयारी

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी हल्ल्याची तयारी करण्याचा हुकुम दिला. प्रथम ती मोहीम गुप्त ठेवण्यात आली, परंतु नंतर त्यांनी मक्केकडे सैन्य घेऊन जाण्याची त्यांची इच्छा असल्याचे सांगितले. मुस्लिमांशी युती असलेल्या शेजारच्या टोळ्यांनाही पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सैन्यास येऊन मिळण्याचे निमंत्रण देण्यात आले.

एकवीस वर्षाच्या दीर्घ काळापर्यंत कुरैशी लोक मुस्लिमांशी दुष्टपणाची अघोरी कृत्ये करीत राहिले. त्यांनी त्यांचा शारीरिक छळ केला, क्लेश व यातना दिल्या, त्यांना गंभीर दुखापती केल्या. त्यांना दलदलीतून ओढत नेले, उन्हाने भाजून निघालेल्या मक्केच्या वाळवंटात उघडे करून फरफटत नेले. खरे तर त्यांना जीवन जगणे अशक्य करून सोडले. त्या निर्लज्ज कृत्यांच्या दबावाने, मुस्लिमांनी आपले घरदार सोडून दिले व मदीनेत आश्रय घेण्यासाठी ते गेले. परंतु त्या सूडबुद्धीने पेटलेल्या खुनशी मक्कावासियांनी तिथेही त्यांना स्वस्थपणे राहू दिले नाही. त्यांच्या नव्या निवासस्थानावरसुद्धा त्यांनी हल्ले केले. म्हणून लढाईच्या त्या तयारीचा अर्थ लोकांना चांगला ठाऊक होता. सर्वत्र भय व दहशत पसरली होती. अशा परिस्थितीत पैगंबर मुहम्मद (स.) यांचा एक विश्वासू अनुयायी असलेल्या हातिब य नावाच्या माणसाने मक्केला एक पत्र एका महिला जासुसाच्या हाती देऊन रवाना केले. हातिबचे हे कृत्य पैगंबर मुहम्मद (स.) यांना ईशवाणीद्वारे कळले. त्यांनी अली (रजि.) व  जुबैर बिन अव्वाम (रजि.) यांना तिचा पाठलाग करून गाठण्याची आज्ञा केली. त्यांनी त्या महिला जासुसाला गाठले. तिची बारकाईने झडती घेतल्यानंतर तिच्या केसांच्या झुलुपात एक पत्र लपविल्याचे आढळून आले. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी हातिब (रजि.) यांना बोलावून घेतले आणि ते कृत्य करण्यास तो का उद्युक्त झाला, त्याबद्दल विचारले. त्याने उत्तर दिले, ‘‘हे अल्लाहचे पैगंबरा! कुरैशांची माझे रक्ताचे नाते नाही. त्यांच्याशी माझे केवळ मैत्रीचे संबंध आहेत. माझे कुटुंब मक्केत आहे आणि त्यांची काळजी घेणारे कोणी नाही. माझ्या भूमिकेत आणि स्थलांतरितांच्या भूमिकेत मोठा फरक आहे, कारण त्यांची कुटुंबे कुरैशांशी रक्ताचे नाते असल्याकारणाने सुरक्षित आहेत. माझे त्यांच्याशी रक्ताचे नाते नसल्याने माझ्या मुलांच्या सुरक्षिततेसाठी, काहीतरी चांगले करून त्यांची कृतज्ञता अर्जित करावी असे मला वाटले. मी अल्लाहची शपथ घेऊन सांगतो की मी हे कृत्य, इस्लामचा त्याग करून धर्मभ्रष्ट होऊन केले नाही. वर सांगितलेल्या विचारांमुळे हे कृत्य करण्यास मी उद्युक्त झालो.’’

एक दांभिक माणूस समजून त्याचा शिरच्छेद करण्याची माननीय उमर (रजि.) यांची इच्छा होती. परंतु पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्याचा खुलासा मान्य केला व त्याला क्षमा करून माननीय उमर (रजि.) यांना उद्देशून म्हणाले, ‘‘उमर! हातिबने बदरच्या



लढाईत आपल्या खांद्याला खांदा लावून लढा दिला आहे. माझ्या सोबत्या! तो दांभिक आहे, हे तुम्हाला कसे समजले? त्या लढाईत सहभागी झालेल्यांशी कदाचित अल्लाह प्रसन्न झालेला असेल.’’

मग हातिबकडे वळून ते म्हणाले, ‘‘तुझ्या मर्जीनुसार राहा. मी तुला क्षमा केली आहे.’’ लढाईची पूर्ण तयारी झाल्यानंतर, १० हजार सैन्य घेऊन त्यांचे नेतृत्व करीत पैगंबर मुहम्मद (स.) मक्केकडे निघाले. हिजरी सनाच्या आठव्या रमजान महिन्याची १० तारीख होती. मर्राउल जहरान या ठिकाणी त्यांनी आपल्या सैन्याचा तळ ठोकला. या घडामोडीपासून कुरैशचे लोक अगदी गैरसावध होते. परंतु त्यांना अचानकपणे गाठणे पैगंबर मुहम्मद (स.) यांना पसंत नव्हते. म्हणून स्वयंपाकसाठी चहूकडे चुली पेटवून जाळ करण्याची त्यांनी आपल्या लोकांना आज्ञा केली त्यामागे अशीही कल्पना होती की कुरैशांना परिस्थितीचे यथोचित मूल्यमापन करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. त्यांच्यासमोर उभ्या ठाकलेल्या परिस्थितीची त्यांना पुरेपूर जाण व्हावी आणि डोळे बंद करून रणांगणात उडी घेऊन त्यांनी आपले प्राण धोक्यात घालू नये. पैगंबर मुहम्मद (स.) यांचा इरादा शक्यतो रक्तपात टाळण्याचा होता आणि तापट डोक्याच्या मक्केतील लोकांना सुबुद्धी यावी, यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) चिंतातुर होते. त्यांनी रणांगणात उतरण्यापूर्वी या गोष्टीचा साधकबाधक विचार करावा. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे चुलते अब्बास हे त्यांचे बंधु तालीबप्रमाणेच, त्यांच्या पुतण्याशी- पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी मैत्रिपूर्ण संबंध ठेवून होते. मक्कावासियांच्या मदिनेवरील हल्ल्याची त्यांनी वेळे वर सूचना दिली होती. वाटेतच पैगंबर मुहम्मद (स.) यांची त्यांची भेट घेतली. अब्बास यांना मक्केतील आपल्या नात्यागोत्यातील माणसांबद्दल फार कोमल भावना होत्या. त्या नातलगांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखावे आणि मुस्लिम सैन्याच्या आनिवार्य लाटेला शरण जावे अशी त्यांची इच्छा होती. त्यांचा सर्वनाश ठरलेला होता आणि गमावलेली लढाई लढणे व्यर्थ होते, असे त्यांना वाटले.

## अबू सुफियानची मुस्लिमांच्या तळाला भेट

मुस्लिम सैन्याचे मर्राऊल जहरान येथे तळ टाकल्यावर, मधल्या काळात अबू सुफियान व हकीम हे टेहळणी करण्यासाठी निघाले. हकीम हा खदीजा यांच्या पुतण्यांपैकी एक होता. हकीम हा कुरैशच्या बाजूने होता आणि एका स्थानिक टोळीचा प्रमुख होता.

ते मुस्लिमांच्या जवळपास पोहोचण्यापूर्वीच, एक मोठी पांढरी आकृती अंधारात काही अंतरावर त्यांना अस्पष्टपणे दिसली. ती आकृती त्यांच्यासमोर येऊन थांबली, तेव्हा स्वरक्षणासाठी काय करावे या विचारात ते पडले. ती व्यक्ती पैगंबर मुहम्मद (स.) यांचे

चुलते अब्बास होते, हे समजल्यावर त्यांच्या आश्चर्याला पारावार उरला नाही. त्यांनी अबू सुफियानला परिस्थितीची जाणीव करून दिली. त्यांनी इस्लामचा स्वीकार करावा आणि त्यांच्या माणसांना पैगंबर मुहम्मद (स.) यांना शरण जाण्यास यांचे मन वळवावे असा उपदेश केला, कारण लढाई त्यांनी आधीच जिंकली होती. जो आदर्श घेऊन पैगंबर मुहम्मद (स.) उभे राहिले होते, त्याला सर्व बाजूने मोठ्या प्रमाणात अनुयायी व मित्र मिळू लागले होते. मक्केतील लोकांमध्ये मतभेद झाले आणि त्यांच्यात फूट पडली. त्यांच्यापैकी अनेकांना मूर्तीपूजेचा वीट आला होता आणि इस्लामी शिकवणीचे ते मूक प्रशंसक बनले होते. एकेश्वरत्वाची कल्पना पैगंबर मुहम्मद (स.) यांचे पैगंबरत्व इमानधारकांचा उच्च नैतिक दर्जा आणि ज्याच्याबरोबर त्यांच्या नेत्याचे उदात्त सदाचारी जीवन, यामुळे त्यांच्या मनावर मोठा प्रभाव पडला. त्यांच्या या जीवनात आणि मुस्लिमांच्या जीवनात डोळ्यांत भरण्याइतका मोठा फरक होता, हे पाहण्यासाठी त्यांना डोळे होते व विचार करायला मन होते. त्यांचे नेते दुष्टपणाने युक्त्या क्लृप्त्या करून, लबाडीचा व खोटा प्रचार करून त्यांना काही काळ मूर्ख बनवू शकले, पण सदासर्वकाळ त्यांना फसविणे व अंधारात ठेवणे त्यांना अवघड नव्हे, अशक्य झाले. त्यांना सद्सद्विवेकबुद्धी होती. त्यांची मने होती आणि स्वत:च्या मनोनिर्णयाकडे ते फार काळपर्यंत डोळेझाक करू शकत नव्हते. त्यांच्या अंतर्मनाच्या आवाजापासून ते आपले कान बंद कसे करू शकत होते? इमानधारकांच्या डोळ्यात भरण्यासारख्या नैतिक श्रेष्ठत्वापासून ते आपले डोळे कसे झाकून घेऊ शकत होते? सत्य हे शेवटी सत्यच असते आणि अगदी कट्टर शत्रूंच्या अंत:करणातही ते शिरकाव करून राहते.

अब्बास (रजि.) यांना अधिकांश मक्कावासियांच्या मनातील घडून आलेला बदल उमगला होता आणि ती परिस्थिती अबू सुफियानला पटविण्यात ते सफल झाले. हुदैबियाच्या तहामुळे शांतता प्रस्थापित झाल्याने त्यांना तुलनात्मक शांत वातावरणात अवलोकन करण्याचा व विचार करण्याचा अवधी मिळाला. मनाच्या विवेकपूर्ण बैठकीत स्वच्छ भावनांनी, इस्लाम स्वीकारलेल्या लोकांमध्ये घडून आलेली आध्यात्मिक नीतिचारित्र्याची महान क्रांती त्यांना दिसून आली. त्यांच्या अंत:करणांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आणलेल्या ईशसंदेशाच्या सत्याची ग्वाही दिली. केवळ मुखाने तशी कबुली देण्याचेच उरले होते.

इस्लामला थोडाही प्रतिकार न करता, त्या शहराचा ताबा घेऊ देणे आणि अखंडनीय सत्य म्हणून त्याचा स्वीकार करणे; हे मक्केच्या अधिक हिताचे होते. अब्बास यांच्या मध्यस्थीने आणि अबू सुफियानला पटल्याने त्या 'शांततेच्या विजया'चा मार्ग सुकर झाला.



## सार्वत्रिक क्षमा

पैगंबर मुहम्मद (स.) पेक्षा रक्तपात टाळण्यासाठी अधिक चिंतातुर कोणीच नव्हते. म्हणून त्यांचा व त्यांच्या सोबत्यांचा छळ केलेल्यांना, त्यांना अनन्वित शारीरिक क्लेश व यातना दिलेल्या लोकांना आणि त्यांच्या प्राणावर उठलेल्या लोकांनाही, सार्वत्रिक माफीची घोषणा त्यांनी केली. परंतु ते 'सर्व विश्वाचे कृपानिधी' असल्याने, त्यांच्या अगदी कट्टर शत्रूलाही माफी द्यायची होती. त्यांनी घोषणा केली की, ''तुमच्यावर आज कसलाही सूड उगवला जाणार नाही.'' अबू सुफियानला अशी घोषणा करण्यास त्यांनी सांगितले. ''जो कोणी अबू सुफियानच्या घरात आश्रय घेईल, तो सुरक्षित असेल, जो कोणी आपल्या घराची दारे बंद करून बसेल तो सुरक्षित असेल व त्या घरातील सर्व सुरक्षित असतील, तसेच जो कोणी मस्जिदमध्ये प्रवेश करील तोही सुरक्षित राहील.''

अशा सार्वत्रिक क्षमेच्या भावनेनिशी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मक्का शहरात प्रवेश केला. सय्यद अमीर अली लिहितात,

''जो एकेकाळी छळणूक झालेला स्थलांतरित होता, तो आता दयाक्षमेची कृत्ये करून तो आपला धर्मसंदेश सिद्ध करण्यासाठी आला होता. ज्या शहराने त्याला इतक्या क्रूरपणाची वागणूक दिली होती, त्याला आणि त्याच्या विश्वासू मित्रांना घालवून दिले होते आणि अपरिचित लोकांमध्ये त्यांना आश्रय घेण्यास भाग पाडले होते; तेच लोक आता त्यांच्या पायाशी लोळण घेत होते. कठोर मनाचे पाषाणहृदयी त्यांचे जुने छळकर्ते, ज्यांनी निष्पाप व निरापराध माणसांचे अनन्विक छळ व अत्याचार केले होते, अगदी मृत शरीरांचीही विटंबना केली होती; तेच लोक आता त्यांच्या दयाक्षमेची आशाळभूतपणे प्रतीक्षा करीत होते. परंतु त्या विजयाच्या क्षणी भोगलेल्या सर्व यातना विसरल्या गेल्या होत्या, सोसलेली प्रत्येक इजा व दुखापतीची माफी दिली गेली होती आणि मक्केच्या लोकांना सार्वत्रिक व सामूहिक माफी दिली गेली. सैन्यानेही त्यांच्याप्रमाणे वागणूक केली आणि शांततेने व सभ्यतेने शहरात प्रवेश केला. कोणतेही घर लुटले गेले नाही, कोणाही स्त्रीची विटंबना व मानखंडना केली गेली नाही.''

''विजयाच्या उन्मादातच खादाडपणाचे फाजील खाणेपिणे, महिलांचा विनयभंग व अन्य आपत्तींचे दर्शन सर्वसामान्ययपणे होत असते.'' पण येथे विजयाचा अर्थ अविवेकी सत्तेचे किंवा सैनिकी बळाचे प्रदर्शन नव्हते. पैगंबर मुहम्मद (स.) व त्यांच्या सोबत्यांना त्या विजयाचा अर्थ त्या महान स्वामीच्या श्रेष्ठत्वाचा होता आणि आपली शान, वैभव किंवा डामडौल प्रदर्शित करणे असा मुळीच नव्हता. पैगंबर मुहम्मद (स.) यांना जर अशा प्रकारची ऐहिक लालसा व मोह असता, तर त्याला पायबंद घालणारे मक्केत कोणीही उरले नव्हते.

बॉस्वर्थ स्मिथ लिहितो, ''जर त्यांनी चेहऱ्यावर मुखवटा चढविलेला असता तर आता त्या प्रसंगी तो नक्कीच काढून टाकून त्याने भिरकावला असता. हीन उद्दिष्टांनी जर उच्च ध्येय नष्ट केले असते किंवा गिब्स समजतो तसे, त्यांचा नेमस्तपणा जर त्यांच्या स्वार्थी हितसंबंधाकडे अंगुलीनिर्देश करणारा असता तर त्याचा परिणाम आता आपणाला दिसून आला असता. त्यांची महत्त्वाकांक्षा पुरी करण्याचा, त्यांची इच्छावासना तृप्त करण्याचा व सूडाची आग शांत करण्याचा तो प्रसंग होता. तशा प्रकारचे काही तर घडले काय? पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या मक्काप्रवेशाचा वृत्तांत, सुलाहच्या मारिअसने रोममध्ये प्रवेश केल्याचा वृत्तांत बाजुला ठेवून एकाच वेळी पाहा. दोहांच्या बरोबर असणारी परिस्थिती पाहा व त्यांची तुलना करा, त्या प्रसंगी झालेले जुलूम, बलात्कार व मानहानी पाहा आणि गेलेली सत्ता परत मिळविल्याचा प्रत्येकाने कसा उपयोग करून घेतला ते पाहा व तुलना करा, तेव्हाच आपण अरबस्तानच्या पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या औदार्याचे व मनाच्या मोठेपणाचे आणि त्यांच्या नेमस्तपणाचे यथोचितपणे रसग्रहण करू शकू. बहिष्कृत व हद्दपार कोणाला करायचे याच्या याद्या तयार केल्या नव्हत्या, लूटमार नव्हती, कोणावर स्वैर सूड उगवला नव्हता.

## पैगंबर मुहम्मद (स.) मक्केत प्रवेश करतात

शहरात प्रवेश केल्यानंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सर्वसमर्थ अल्लाहची ज्याने आपल्या असीम कृपेने त्यांना वैभवशाली विजय मिळवून दिला, त्याची आभारप्रदर्शनार्थ प्रार्थना केली. त्यांच्यासाठी शिब येथे एक तंबू उभारण्यात आला. याच ठिकाणी त्यांच्या नातलगांनी त्यांना बहिष्कृत केल्यावर, त्यांनी दिवस काढले होते.

''तुम्ही तुमच्या स्वत:च्या घरी उतरणार नाही काय?'' असा प्रश्न त्यांच्या अनुयायांनी त्यांना विचारला.

''नाही, त्यांनी शहरात माझ्यासाठी दुसरे एखादे घर सोडले काय?''

एक मोठा ध्वज त्यांच्या तंबूसमोर उभारण्यात आला आणि त्यांनी विश्रांतीसाठी तंबूत प्रवेश केला. होऊन गेलेल्या घटना त्यांच्या डोळ्यांपुढे तरळल्या असतील. विविध भावना उचंबळून येण्याचे ते विलक्षण दृश्य असेल. त्यांचे बालपण तेथे कसे घालविले होते, मानवजातीला ईशसंदेश पोहोचविण्यासाठी त्यांच्या स्वामीने, त्यांना पैगंबरत्व कसे प्रदान केले होते, त्यांच्या निकटच्या नातलगांनी त्यांना कशी क्रूरपणाची वागणूक दिली होती आणि त्यांना अव्हेरले होते, त्यांना विजनवासात लोटून दिले होते; परंतु तेच उद्दाम व बंडखोर शहर आज त्यांच्या पायाशी होते. अल्लाहची केवढी अपरिमित कृपा! त्यांचा निर्माणकर्ता स्वामी! अशा विचारात ते खोलवर गढले असतील.



## काबागृह स्वच्छ केले

परंतु फार वेळ त्यांनी विश्रांती घेतली नाही. ते उठले आणि काबागृहाकडे गेले. अल्लाहच्या एकमेवतेचे आणि त्याच्या श्रेष्ठत्वाचे ते बोधचिन्ह होते. दुर्दैवाने तेथे मूर्तींचा उपद्रव होता. त्यांनी त्या सर्व मूर्ती तेथून काढून टाकल्या आणि कुरआनची खालील ओळ उच्चारली.

''आणि घोषणा कर की, ''सत्य आले आणि असत्य नष्ट झाले. असत्य तर नष्ट होणारच आहे.'' (दिव्य कुरआन, १७ : ८१)

एक एक करून दैवतांच्या दगडाच्या सर्व मूर्ती काढून टाकण्यात आल्या. पुतळे काढण्यात आले. मग प्रार्थनेसाठी त्यांनी आपले मस्तक जमिनीवर टेकले. उठून बसल्यावर काबागृहाच्या किल्ल्या घेऊन येण्यासाठी, माननीय बिलाल (रजि.) यांना पाठवून त्यांनी उस्मान बिन तलहा यांना निरोप पाठविला. उंबरठ्याच्या पायऱ्या चढून जाऊन आणि कुलुप उघडून त्यांनी मूर्ती काढून टाकण्याची व पुतळे नष्ट करण्याची आज्ञा दिली. नंतर ते दारातून आत आले. तेथे एका उच्च पायरीवर उभे राहून त्यांनी खाली उभ्या असलेल्या जनसमुदयाकडे कृतज्ञतापूर्वक नजर फिरवली. हिजरी सन ८, रमजान महिन्याची ती २० तारीख होती. पवित्र काबागृहाच्या प्रवेशद्वाराशी त्याच्या किल्ल्या हातात धरून त्यांनी पुढील भाषण केले.

''अल्लाहखेरीज अन्य कोणी ईश्वर नाही. त्याचा सहभागी कोणीही नाही. त्याने आपले वचन पुरे केले, जे त्याने आपल्या दासांना दिले होते. त्यांना साहाय्य केले होते आणि संयुक्त समितीच्या सर्व युत्त्यांचा पराभव केला. लक्षात ठेवा, विशेष हक्काचा कसलाही दावा मी पायाखाली तुडवीत आहे, याला दोन गोष्टी अपवाद आहेत. एक काबागृहाचा ताबा आणि दुसरे यात्रेकरूंना पिण्यासाठी पाण्याचा पुरवठा करणे. नीट ध्यानात ठेवा, जो कोणी ठार झाला, अगदी अहेतुकपणेही मारला गेला, काठीने अगर चाबकाने ठार केला गेला, त्याच्यासाठी रक्ताची भरपाई फार मोठी आहे, शंभर उंट, त्यापैकी चाळीस गाभण सांडणी. हे कुरैशी लोकहो! अल्लाहने अज्ञानकाळापासून तुमच्यात मुरलेला गर्व व अहंकार, खचितपणे काढून टाकला आहे. तसेच तुमच्या पूर्वजांचा सर्व गर्व नष्ट केला आहे, (कारण) सर्व माणसे आदमची संतती आहेत आणि आदमला चिखलमातीपासून घडविले गेले.''

नंतर त्यांनी लोकांना कुरआनची खालील आयत उच्चारून दाखविली,

''लोकहो, आम्ही तुम्हाला एका पुरुष व एका स्त्रीपासून निर्माण केले आणि मग तुमची राष्ट्रे आणि वंश बनविले जेणेकरून तुम्ही एकमेकांना ओळखावे. वास्तविकत:

अल्लाहजवळ तुमच्यापैकी सर्वात जास्त प्रतिष्ठित तो आहे जो तुमच्यापैकी सर्वात जास्त ईशपरायण आहे. निश्चितच अल्लाह सर्वकाही जाणणारा आणि खबर राखणारा आहे.''

(दिव्य कुरआन, ४९ : १३)

नंतर पुढील शब्द त्यांनी उच्चारले, ''हे जनहो! मी तुम्हाला कशा प्रकारची वागणूक देणार आहे, असे तुम्हाला वाटते?''

त्यांनी उत्तरादाखल म्हटले, ''हे थोर बंधु आणि थोर बंधुच्या पुत्रा! आम्ही तुमच्याकडून चांगुलपणाखेरीज अन्य कशाचीही अपेक्षा करीत नाही.''

त्यावर पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले, ''ज्या शब्दांत यूसुफ (अ.) ने त्यांच्या बंधुला संबोधले होते, त्याच शब्दांत मी तुमच्याशी बोलत आहे. आज तुम्हावर कशाचाही सूड घेतला जाणार नाही. जा, तुम्ही मुक्त आहात.''

इस्लामचा सारांश वरील भाषणात सुंदर रीतीने वर्णन करण्यात आला आहे. अल्लाह केवळ एक आहे, याची ती घोषणा आहे. त्याच्याखेरीज उपासना करण्यास अन्य कोणीही पात्र नाही. तोच विश्वाचा निर्माणकर्ता व पालनकर्ता आहे. तोच एकमेव सार्वभौम आहे आणि विश्वाचा मालक आहे. त्याच्या सत्तेमध्ये आणि सार्वभौमत्वामध्ये कोणाचाही वाटा नाही, याची ती घोषणा आहे.

रेव्हरंड सी. एफ. अँड्र्यूजने त्याच्या लेखनात लिहिले आहे- ''इस्लामने मानवी इतिहासात एकेश्वरत्वावर भर देऊन पौर्वात्य देशात, तसेच पाश्चात्य देशांत, एका खडतर काळात एक मोठे प्रासादिक वरदान दिले आहे. कारण त्या अंधाऱ्या युगात, पूर्वेतही आणि पश्चिमेतही, इ. स. ६०० पासून ते इ. स. १००० पर्यंत, हा एकेश्वरत्वाचा सिद्धान्त, हिंदू धर्मात आणि ख्रिश्चन धर्मातही झाकोळलेला व अस्पष्ट, दुर्बोध झाला होता, कारण त्यांच्या दैवतांची भरपूर वृद्धी होऊन दुय्यम उपासना सुरू झाली होती. एकेश्वरत्वाच्या सार्वभौम सत्यापासून मार्गभ्रष्ट होण्याच्या त्यांच्या अंधारलेल्या काळात, युरोपात तसेच भारतात इस्लामने सुधारक व प्रतिरोधक म्हणून बहुमोल कार्य केले आहे. इस्लामने आपल्या मध्यवर्ती स्थानातून युरोपात आणि भारतात या सत्यावर जो भर दिला, त्याच्याशिवाय या एकेश्वरत्वाच्या कल्पनेला मानवी विचारात एक प्रस्थापित स्थान लाभले असते याबद्दल शंका वाटते. आजच्या बुद्धीवादी जगतात ते एक वादातीत सत्य आहे.''



## मानवाबद्दल बंधुभाव

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी इस्लामच्या मूलतत्त्वांच्या व्यावहारिक उपयुक्तेचा लोकांच्या मनांवर ठसा उमटविला, म्हणजे अल्लाहच्या एकमेवतेचा. ही कल्पना सर्व मानवनिर्मित उच्चनीच भेदांच्या मुळावरच घाव घालते. उदाहरणार्थ- वंशभेद, वर्णभेद आणि भिन्न भाषांमधील भेद वगैरे, तसेच जन्मावर आधारलेले विशेष हक्क व अधिकार, सामाजिक राजकीय सर्व विशेषाधिकार इस्लाम पूर्णपणे झटकून टाकतो. ती एक अत्यंत बहुमोल घोषणा होती. माणसाला अनेकविध पूर्वज असण्याच्या विचारधारणेची ही घोषणा मृत्युघंटा ठरते आणि माणसामाणसांमध्ये विभाग व तुकडे पाडणारी जातपातीची व वर्णभेदाची बंधने तो झुगारून देतो. माणसामाणसांत कसलाही भेदभाव नाही. ते सर्वच समान आहेत. कारण माणसे एकाच पूर्वजांची संतती आहे. या विशाल बंधुत्वामध्ये माणसाचे श्रेष्ठत्व दर्जावर अवलंबून नसते. तर जाणीवपूर्वक तो अल्लाहच्या आज्ञांचे किती काटेकोरपणे पालन करतो त्यावर आधारलेले असते. पैगंबरांना जगात यासाठी पाठविण्यात आले होते की त्यांनी सर्व प्रकारच्या बंधनांच्या बेड्या तोडून टाकाव्यात. ती बंधने माणसांमधील चाणाक्ष लोकांनी लबाडीने यासाठी निर्माण केली होती की अनेक माणसांना स्वहितासाठी कायमचे दास्यत्वात डांबून ठेवावे. पाषाणाच्या मूर्तींबरोबरच जात, वंश व वर्ण यांच्याही मूर्ती नष्ट करण्यात आल्या. त्यांचा जर नाश केला गेला नसता, तर मानवतेला तिची गमावलेली प्रतिष्ठा परत प्राप्त होऊ शकली नसती. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्या घोषणेद्वारे सर्व प्रकारच्या खोट्या भेदाभेदाच्या मुळावरच घाव घातला आणि माणसांच्या बंधुभावाची प्रस्थापना केली.

कबिले, टोळ्या, वंश व राष्ट्र ही सर्व सोईस्कर मथळे असून त्यामुळे लोकांचे विशिष्ट गुणधर्म जाणले जातात. परंतु त्यांच्यात कसलेही साम्राज्यवादी इरादे असता कामा नयेत, जसे आपणाला आक्रमक राष्ट्रवादात गत काळातही आढळून आले आहेत आणि आताही आढळत आहेत, जो राष्ट्रवाद गर्वावर आणि अहंकारावर, उद्दामपणावर आणि इतरांबद्दल द्वेषावर उभारलेला असतो, तसा तो उग्र राष्ट्रवाद असता कामा नये.

## अन्सार लोकांचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावरील प्रेम

आपले भाषण संपल्यावर काबागृहापासून थोड्याशा अंतरावर असलेल्या 'सफा' नावाच्या छोट्या टेकडीकडे घोड्यारून गेले. पवित्र काबागृहाकडे तोंड करून प्रशंसा करणाऱ्या निष्ठावानांच्या मोठ्या जमावाच्या मध्ये अल्लाहची अंत:करणापासून प्रार्थना करण्यासाठी त्यांनी आपले दोन्ही हात वर उचलेले. मदीनेतील जे नागरिक त्यांच्या सभोवती गर्दी करून उभे होते, त्यांना चिंता पडली होती की अल्लाहने पैगंबर मुहम्मद

(स.) यांना त्यांच्या जन्मस्थानाच्या शहरावर विजय प्रदान केला होता म्हणून कदाचित पैगंबर मुहम्मद (स.) तेथेच राहतील. त्यासरशी पैगंबर मुहम्मद (स.) यांना ताबडतोब ईशवाणी झाली आणि अन्सार लोकांच्या मनातील विचार त्यांना कळविण्यात आले.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्या मनातील भीती दूर करीत, त्यांना खालील शब्दांत आश्वासन दिले, ''हे अन्सार लोकांनो! तुम्ही असे विचार मनात आणलेत?''

त्यांनी होकारार्थी उत्तर दिले.

त्यावर पैगंबर म्हणाले, ''नीट लक्षात ठेवा. मी येथे कधीही राहणार नाही. मी अल्लाहचा दास व त्याचा पैगंबर आहे आणि मदीनेला त्याच्या आज्ञेनेच मी स्थलांतर केले आहे. मी तुमच्यामध्येच राहीन व तुमच्या-मध्येच मला मृत्यू येईल.''

मग जे लोक इस्लामचा स्वीकार करण्यासाठी आले होते, त्यांचे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी स्वागत केले. त्या माणसांनी खालील शब्दांत इस्लामची प्रतिज्ञा केली,

''आम्ही अल्लाहखेरीज अन्य कोणाचीही आराधना, उपासना करणार नाही. आम्ही त्याच्या आज्ञांचे पालन करू. तसेच त्याच्या पैगंबराच्या आज्ञांचे पालन आमच्या सर्वोत्तम क्षमतेनुसार करीत जाऊ.''

## माननीय अबू बकर (रजि.) यांनी आपल्या वयोवृद्ध पित्याला पैगंबरांकडे आणले

माननीय अबू बकर (रजि.) यांचे वयोवृद्ध वडीलही आपल्या मुलाच्या हातावर रेलत पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यापाशी आले. मुहम्मद (स.) यांनी अत्यंत प्रेमाने त्यांना बोलावले. ते म्हणाले, ''अबू बकर! तुम्ही तुमच्या वडिलांना घरीच का थांबवून ठेवले नाही. मी स्वत: तेथे जाऊन भेटलो असतो?''

''हे पैगंबरा! तुम्ही त्यांना घरी जाऊन भेटण्यापेक्षा, त्यांनीच येथे येऊन तुमची भेट घेणे अधिक उचित होते.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्या वयोवृद्ध माणसाला आपल्या शेजारी बसवून घेतले. त्यांचा हात हातात धरून प्रेमाने स्वत:च्या छातीवर ठेवून दाबला व त्यांना इस्लामचा स्वीकार करण्याची कबुली देण्यास सांगितले आणि त्यानी तात्काळ ती दिली.



## महिलांनीही प्रतिज्ञा केली

महिलांनी पाण्याच्या एका पेल्यात आपले हात बुडविले आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांनीही बुडविले. महिलांनी प्रतिज्ञा केली, ''आम्ही एका अल्लाहखेरीज, ज्याचा कोणीही सहभागी नाही, अन्य कोणाचीही उपासना करणार नाही. आम्ही चोरी, व्यभिचार, बालहत्या करणार नाही, खोटे शब्द उच्चारणार नाही. तसेच इतर महिलांची निंदानालस्ती करणार नाही.''

मागील अपराधापायी फारच थोडक्या लोकांना पैगंबर मुहम्मद (स.) यांना यातना दिल्याबद्दल शिक्षा देण्यात आली. खून केलेल्या व इतर भीषण गुन्हे केलेल्या चौघाजणांना फक्त फाशी देण्यात आले. अबू जहलचा मुलगा इक्रमा, ज्याने मुस्लिमांच्या सैन्यावर मक्केत प्रवेश करताना छापा मारला होता, त्याला माफी देण्यात आली. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे चुलते माननीय हमजा (रजि.) यांना ठार करणाऱ्या हबशीला व हिंद, जिने त्यांचे काळीज कच्चे चावून चघळले होते, त्यांनाही औदार्यपूर्ण माफी देण्यात आली. तशीच औदार्यपूर्ण वागणूक हब्बारलाही देण्यात आली. त्याने पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कन्येवर मक्केहून मदीनेला जाताना खुनी हल्ला केला होता. त्या गंभीर जखमी झाल्या आणि शेवटी त्यांचे निधन झाले.

## फक्त चौघांना मृत्यूदंड देण्यात आला

मक्केच्या लोकसंख्येपैकी फक्त चार जणांना मृत्युदंडाची शिक्षा देण्यात आली होती. एकजण बनू नईम बिन गालिब कबिल्याचा अब्दुल्लाह बिन खताब हा होता. तो मुस्लिम झाला होता. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्याला एका अन्सार माणसाबरोबर जकातची रक्कम वसूल करण्याच्या कामावर पाठविले होते. त्यांच्याबरोबर एक गुलामही होता. एका क्षुल्लक गोष्टीवरून संतापाच्या भरात अब्दुल्लाहने त्या असहाय्य गुलामाला ठार मारले. इस्लाम धर्माचा त्याग करून तो मूर्तिपूजकांच्या पक्षाला जाऊन मिळाला होता. जकातची वसूल केलेली रक्कम लादलेला उंटही त्याने आपल्याबरोबर नेला. या हिडीस अपराधाबद्दल त्याने कधीही पश्चात्ताप व्यक्त केला नव्हता, उलट त्या दोन गायिकांना चाकरीला ठेवून पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याबद्दल त्याने विडंबनात्मक गाणी म्हणायला लावली. मृत्यूदंड देण्यात आलेला दुसरा माणूस मिकयास बिन हुबाब हा होता. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्याला रक्ताच्या भरपाईची रक्कम देवविली होती व ती त्याने स्वीकारली होती. परंतु त्याच्या खुनशी स्वभावाचे समाधान झाले नव्हते. म्हणून त्याने त्या अन्सारी माणसाला ठार केले व इस्लामचा त्याग करून तो मक्केला निघून गेला होता. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्याला मृत्यूदंडाची सजा दिली. त्याचप्रमाणे हुवैरिसला आणि

एका गायिकेला मृत्यूदंड देण्यात आला.

वर्षानुवर्षे जे शहर सर्वाधिक वाईट अशा जुलूम अत्याचाराच्या भट्टीसारखे तापलेले होते, त्या शहराला इतक्या शांततामय रीतीने जिंकल्याचे, असे एकतरी उदाहरण इतिहास दाखवून देऊ शकतो काय? इतक्या औदार्याने व दिलदारपणाने पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जशी सार्वत्रिक माफी देऊन टाकली, तसे उदाहरण दाखवायलाही इतिहासात आढळत नाही.

## त्याग केलेली मालमत्ता परत देण्याचा प्रश्न

मुस्लिम आश्रितांपैकी काही लोकांनी मागणी केली की त्यांची घरे व शेती, जमिनी त्यांना कसलाही कायदेशीर मोबदला न देता मक्केतील कुरैशी लोकांनी बळकावल्या होत्या. त्या त्यांना परत मिळाव्यात, अशी रास्त मागणी करणाऱ्यांपैकी अबू अममद बिन जहश (रजि.) हे होते. त्यावर पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले, ''अल्लाहच्या मार्गात तुमच्या ज्या जमिनी व मालमत्ता तुमच्यापासून हिरावून घेतल्या गेल्या, त्या परत तुमच्या ताब्यात घेण्यास माझी पसंती नाही.'' हे शब्द ऐकून सर्व आश्रित लोक स्तब्ध राहिले आणि अल्लाहखातर ज्या जमिनी त्यांनी गमावल्या होत्या, त्या परत ताब्यात घेण्याची त्यांची लालसा उरली नाही. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी स्वत:च्या घराबद्दल, जेथे त्यांचा जन्म झाला होता आणि जेथे माननीय खदीजा (रजि.) यांच्याशी विवह झाला होता. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे त्याचा किंचितही उल्लेख केला नाही. स्थलांतरीतांपैकी कोणीही आपल्या जन्मस्थानी राहायाला तयार नव्हते. सर्वांना मदीनेला त्यांच्या नवीन निवासस्थानी जाणेच अधिक पसंत होते. कारण इस्लामखातर त्यांना जेव्हा हुसकून लावले गेले होते, तेव्हा त्याच निवासस्थानात त्यांनी आश्रय घेतला होता.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपले संदेश प्रसाराचे कार्य पूर्ण झाल्याचे पाहिले. त्यांनी सर्व दिशांना आपली माणसे पाठविली आणि मूर्तीपूजेचे उरलेसुरलेले सर्व अवशेष नष्ट करण्यास सांगितले. तसेच सर्व वाळवंटी टोळ्यांना इस्लाममध्ये येण्याची हाक देण्यास सांगितले. हे संदेशप्रसारणाचे कार्य शांततेने व सदिच्छापूर्वक करण्याचे त्यांना बजावण्यात आले. ते हुकूम अगदी निष्ठापूर्वक पाळण्यात आले. केवळ खालिद बिन वलीद (रजि.) यांच्या माणसांनी बनू खुजैमाह कबिल्याच्या काही खेडवळ अरबांना चुकीने शत्रूसैनिक समजून ठार केले होते. जेव्हा रक्तपात झाल्याची ती बातमी पैगंबर मुहम्मद (स.) यांना समजली, तेव्हा ते फारच दु:खी झाले. त्यांनी दोन्ही हात आकाशाकडे उचलून म्हणाले, ''हे स्वामी! खालीदने जे केले, त्याबद्दल मी अगदी अनभिज्ञ व निरपराध आहे.'' त्यांनी तत्काळ माननीय अली (रजि.) यांना पाठवून हानी झालेल्यांची



ताबडतोब भरपाई करण्याचे सर्व प्रयत्न करण्यास सांगितले. काळजीपूर्वक तपास करून माननीय अली (रजि.) यांनी, हानी झालेल्या सर्वांना रक्ताची भरपाई करून दिली. उरलेली रक्कमसुद्धा त्याच टोळीतील लोकांमध्ये वाटण्यात आली, जेणेकरून त्यांचा दु:खपरिहार व्हावा. माननीय अली (रजि.) यांनी परत येऊन, त्यांनी जे जे केले त्याचा सर्व वृत्तांत पैगंबर मुहम्मद (स.) यांना दिला आणि त्यांची प्रशंसा मिळविली. मग पैगंबर मुहम्मद (स.) पुन्हा उभे राहिले आणि 'किबला'कडे तोंड करून आपले दोन्ही हात त्यांनी प्रार्थनेसाठी वर उचलेले व उद्‌गारले, ''हे स्वामी! खालीदने जे काही केले, त्याबद्दल मी तुझ्यासमोर निरपराधी आहे.''

अशा रीतीने मक्का काबीज करण्यात आला. तलवारीने नव्हे तर शांततेने व सदिच्छेने तो जिंकण्यात आला. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दिलेल्या अत्यंत औदार्यपूर्ण वागणुकीने विरोधाची शस्त्रेच काढून घेतली, इतकेच नव्हे तर पैगंबर प्रचार करीत असलेल्या सत्याप्रति मक्केतील लोकांमध्ये जागृती निर्माण केली. त्यांच्या मनांत चलबिचल झाली आणि त्यांची विवेकबुद्धी चाळवली गेली आणि त्या ईशधर्मामुळे त्यांना जे प्रासादिक वरदान मिळणार, त्याबद्दल ते शांत चित्ताने विचार करू लागले. आंधळ्या वैराची जागा गंभीर विवेकाने घेतली आणि परिणामस्वरूप, एक दुसऱ्याने नव्हे तर लोकांनी झुंडी-झुंडीने इस्लाम धर्मात प्रवेश केला. ही महत्त्वाची घटना, पवित्र कुरआनने खालील शब्दांत वर्णिली आहे.

''जेव्हा अल्लाहची मदत आली आणि विजय प्राप्त झाला आणि (हे पैगंबर स.) तुम्ही पाहिले की लोक झुंडी झुंडीने अल्लाहच्या धर्मात प्रवेश करीत आहेत.''

(दिव्य कुरआन, ११० : १-२)

माणसांच्या स्वत:च्या वैभवाचा तो विजय नव्हता, तर विनम्रतेचा तो विजय होता. सत्तेचा व शक्तीचा तो विजय नव्हता, तर मानवजातीची व तिच्या निर्माणकर्त्याची प्रामाणिकपणे व अखंड केलेल्या सेवेचा तो विजय होता, माणसाच्या स्वार्थी व स्वहितपरायणतेचा तो विजय नव्हता, स्वार्थत्यागाचा आणि त्याच्या जीवनात पावलोपावली अल्लाहच्या दया-कृपेच्या परिपूर्ण जाणिवेचा तो विजय होता.

## प्रकरण ९

# संदेशकार्याची परिपूर्ती

मक्केतील मोठ्या संख्येतील लोकांनी आणि शेजारच्या टोळ्यांनी इस्लाम धर्माला आलिंगन दिले असले, तरी काही लोक अद्याप मूर्तीपूजेला धरून होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांना अरबस्तानचे सत्ताधीश म्हणून त्यांनी स्वीकारले होते परंतु ते अल्लाहचे पैगंबर आहेत, ही गोष्ट त्यांना मान्य नव्हती. दुसरीकडे, त्या लोकांनी अल्लाहच्या शरणात यावे, याची पैगंबर मुहम्मद (स.) यांना चिंता होती. त्या एकाच उद्दिष्टाखातर त्यांची सर्व शक्ती खर्च पडली. बाहेर पडून त्या लोकांना धर्मोपदेश देण्याचा ते विचार करीत असत, परंतु अचानक दुसरी एखादी बातमी येऊन थडकते आणि त्यांना थांबावे लागे. पैगंबर मुहम्मद (स.) यांना बातमी लागली की हवाजिनच्या टोळ्यांनी व सकीफ यांनी, त्यांच्या विरूद्ध एक बलवान फळी उभी केली असून पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या विरूद्ध आणि त्यांच्या साथीदारांविरूद्ध ते चाल करून येत आहेत.

पैगंबर मुहम्मद (स.) हे अव्यवहारी नव्हते, तसेच कल्पनासृष्टीत रमणारेही नव्हते. व्यवहारी कल्पनावादावर त्यांचा विश्वास होता. ती बातमी त्यांना मिळताक्षणीच, आक्रमण करणारे सैन्य फार पुढे येण्याआधीच त्यांचा प्रखर मुकाबला करण्याचे त्यांनी ठरविले.

बारा हजार सैनिकांना घेऊन त्यांचे नेतृत्व करीत ते त्वरेने बाहेर पडले. त्यात मदीनेतील दहा हजार लोक होते आणि दोन हजार सैनिकांची स्थानिक सैनिक भरती करण्यात आली.

### हुन्नैनचे युद्ध

हवाझिन आणि सकीफ टोळ्यांनी चार हजार सैनिक घेऊन शस्त्रानिशी मक्केवर चाल करून आले आणि हुन्नैनच्या दऱ्यात आपला तळ टाकला. त्यांचा प्रमुख मतिक बिन औफ अल्-नसारी यांच्या सल्ल्यानुसार त्यांनी सर्व लवाजमा, बायका-मुले, उंट आणि गुरेढोरे आपल्याबरोबर रणांगणावर आणली होती. त्यांच्या उपस्थितीने आपण त्वेषाने व ईर्षेने लढू आणि मरेपर्यंत कडवा प्रतिकार करू. त्यांची उपस्थिती आपल्याला प्रेरणादायक ठरेल, असे त्यांना वाटले.

मुस्लिमांचे सैन्य, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अधिपत्याखाली आतापर्यंत गोळा केलेल्या मोठ्या सैन्यदलापैकी एक होते. म्हणून त्यांच्यापैकी काही लोकांना त्यांची संख्या



व तयारी पाहून आनंद झाला होता. त्यांच्यापैकी एकजण चेकाळत भावनावश होऊन स्तुती करण्यासाठी ओरडला,

''आजच्या दिवशी फार कमी संख्येतील लोकांकडून आम्ही पराभव पत्करणार नाही.''

हवाझिनची माणसे तिरंदाजी करण्यात फार तरबेज होती आणि त्यांनी मोक्याच्या सर्व जागा धरल्या होत्या. विविध टेकड्यांवर त्यांनी आपले सर्वोत्तम तिरंदाज बसविले होते.

सकाळच्या प्रार्थनेनंतर मुस्लिम सैन्याने दरीत प्रवेश केला. आघाडीवर बनू सुलैमचे लोक होते. नावाजलेले सेनापती खालिद सैन्य घेऊन पुढे चालू लागले आणि चढाच्या अरूंद खिंडीतून जाऊ लागले. दबा धरून बसलेल्या शत्रुंनी अचानक त्यांच्यावर छापा मारला व त्वेषाने त्यांच्यावर तुटून पडले. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे सैनिकांची प्रेते एकामागून एक पडू लागली व खिंडीतील अरूंद वाट, तुंबली. ती विलक्षण वेळ व खाचखळग्यांची अतिअरूंद वाट त्यामुळे सैनिक अगदी भांबावून गेले. ते सर्व माघारी वळले आणि पळू लागले सैन्याची दाणादाण उडाल्यासारखे सर्वसाधारणपणे दिसत होते. ज्या टेकडीवर पैगंबर मुहम्मद (स.) उभे होते ते आता एकाकी पडले होते. तिरंदाजांनी त्यांच्या माऱ्याचा रोख आता तिकडे केंद्रित केला होता. शत्रू सरळ त्या ठिकाणाकडे चालून येत होते. परंतु पैगंबर मुहम्मद (स.) यांना ईशसहाय्याच्या आश्वासनावर परिपूर्ण आत्मविश्वास होता. त्या कसोटीच्या क्षणी ते शांत निग्रही होते. त्यांनी कसलाही मन:क्षोभ अगर भय दर्शविले नाही. समाधानाचा तोच अचूक स्रोत-अल्लाहच्या सामर्थ्यावरची अढळ श्रद्धा व विश्वास आणि आपल्या उद्दिष्टाच्या सत्यतेबद्दल अंतर्मनाची खात्री तेच त्यांच्या अंतिम विजयाची पक्की खात्री होती. यामुळेच नेहमीप्रमाणे ते टिकून राहिले. मक्केतील कुरैशी लोकांतून नव्याने भरती झालेले सैनिक अगदी गर्भगळित होऊन गेले. त्यांच्यापैकी काहींनी अशा भावनांना वाट मोकळी करून दिली जी कोणाही मित्राकडून अपेक्षित नाही.

अबू सुफयान बिन हर्ब म्हणाला,

''आमचा संपूर्ण नाश होईपर्यंत त्यांची लढाई थांबणारच नाही.''

जब्ला बिन अल्-हन्बल ओरडला,

''जादुगरी आज खचितच विफल झाली.''

शैबा बिन उस्मान बिन अबू तलहा म्हणाला,

''मी मुहम्मदवर माझा सूड उगवीन.'' (त्याचा बाप उहूदच्या लढाईत मारला गेला होता.)

अशा विपरीत व प्रतिकूल अवस्थेच्या गराड्यात पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या थोडक्या निष्ठावान मित्रांचा व चाहत्यांचा अपवाद वगळता, सर्वत्र एकच गोंधळ उडाला होता.

पैगंबर मुहम्मद (स.) आपल्या भव्य आवाजात मोठ्याने म्हणाले,

''मी अल्लाहचा पैगंबर मुहम्मद (स.) आहे, मी कोणी तोतया नाही. मी अब्दुल मुत्तलिबचा वंशज आहे.''

अब्बासनीही त्यांच्या प्रभावी आवाजात हाक मारली,

''हे मदतनीसांच्या समूहानो! हे बाभळीच्या झाडाच्या सोबत्यांनो!''

तोच चहूबाजुंनी प्रतिसाद मिळाला,

''लब्बैक, तुमच्या आज्ञेसाठी आम्ही येथे हजर आहोत.''

हळूहळू त्यांचे पळ काढणारे सैनिक थांबू लागले. त्यांनी आपली पुनर्रचना केली आणि ज्वलंत धार्मिक उन्मादाने ते शत्रूवर तुटून पडले. त्यांनी शत्रूहल्ल्याची लाट थोपविली आणि मरू किंवा मारू या आवेशाने ते लढले.

मुस्लिमांना त्यांच्या फाजील आत्मविश्वासाचा अथवा मनुष्यबळावर, त्यांच्या संख्येवर आणि शस्त्रसामुग्रीवर विसंबून राहण्याबद्दल पुरेसा धडा मिळाला होता. त्या सर्वांना त्याबद्दल पश्चात्ताप झाला होता. मग अल्लाहकडून सहाय्य आले, ज्याने अदृश्य थवे पाठविले जे मुस्लिम सैन्याच्या बरोबरीने लढले. या ईशसहाय्याच्या परिणास्वरूप सैरावैरा पळणाऱ्या सैनिकांचे दृश्य, एका निकराच्या लढाईत बदलून गेले. डोंगरात दबा धरून बसलेल्या टोळीवाल्यांनी पराक्रमाची शर्थ करीत प्रतिकार केला, परंतु त्यांचा दारूण पराभव झाला. त्यांची पुरती दाणादाण झाली. त्या घटनेचा पवित्र कुरआनने खालील शब्दांत उल्लेख केला आहे.

''अल्लाहने यापूर्वी अनेक प्रसंगी तुम्हाला मदत केलेली आहे. नुकतेच हुनैनच्या युद्धाच्या दिवशी (त्याने केलेल्या मदतीचे वैभव तुम्ही पाहिले आहे) त्या दिवशी तुम्हाला आपल्या मोठ्या संख्येचा गर्व होता, पण ती तुमच्या काहीच उपयोगी पडली नाही व जमीन विस्तृत असूनदेखील तुमच्याकरिता तंग झाली व तुम्ही पाठ दाखवून पळत सुटला. मग अल्लाहने आपली 'सकीनत' (मन:शांती) आपल्या पैगंबरावर व इमानधारकांवर उतरविली; आणि ते लष्कर उतरविले जे तुम्हाला दिसत नव्हते आणि सत्याचा इन्कार



करणाऱ्यांना शिक्षा दिली की हाच बदला आहे त्यांच्याकरिता जे सत्याचा इन्कार करतील.'' (दिव्य कुरआन, ९ : २५-२६)

मुस्लिमांचा तो मोठा शानदार विजय होता. शत्रूच्या सहा हजार लोकांना कैद करण्यात आले. शत्रूच्या काही सैनिकांनी ताइफच्या तटबंदी असलेल्या किल्ल्यात आश्रय घेतला. त्या काळच्या तुलनेत मुस्लिमांच्या हाती पडलेल्या लुटीच्या मालाची किंमत प्रचंड होती कारण पराभूत शत्रूने चोवीस हजार उंट, चाळीस हजार मेंढ्या आणि चार हजार औस चांदी, पळताना मागे सोडली होती.

कैदी आणि लुटीचा माल अल्-जिर्रान या ठिकाणी पाठवून देण्यात आले आणि पळणाऱ्या शत्रूचा पाठलाग करण्यासाठी माणसे पाठविली गेली. मुस्लिमांनी नख्लाहपर्यंत त्यांचा पाठलाग केला. तेथून औतासपर्यंत त्यांचा पिच्छा केला आणि शेवटी ताईफपर्यंत त्यांच्या मागे लागले होते. ताईफच्या किल्ल्याला एक महिनाभर वेढा होता. पण तटबंदी भक्कम होती. धान्यपुरवठा भरपूर होता. तसेच तटबंदीच्या आत पिण्याचे पाणीही भरपूर होते. वेढा घालणाऱ्यांचे स्वागत बाणांच्या वर्षावाने झाले होते. बाणांचा वर्षाव इतका दाट व किंचितही खंड न पडता चालू असल्याने एखाद्या टोळधाडीप्रमाणे आकाश झाकोळून गेले होते. दहा माणसे ठार झाली होती व अनेकजण जायबंदी झाले होते.

वेढा लांबतच चालला होता. शेवटी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्या मित्रांशी सल्लामसलत केली. त्यातून असे ठरले की शत्रूची इतकी त्रेधा उडालेली आहे की आता ते मुस्लिमांना कसलाही उपद्रव देऊ शकणार नाहीत. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी वेढा उठविण्याचा हुकूम दिला. परत जाताना शत्रूवर अल्लाहचा प्रकोप ओढविण्यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांना सांगण्यात आले. परंतु ते सर्व जगांचे कृपानिधी असल्याने, ते असे कसे करू शकत होते? त्यांना शाप देण्याऐवजी त्यांच्या कल्याणासाठी त्यांनी प्रार्थना केली,

''हे स्वामी! सकीफच्या टोळीच्या लोकांना मार्गदर्शन कर आणि माझ्याकडे पाठव.''

त्या प्रार्थनेचा स्वीकार झाला आणि थोड्या दिवसातच त्या लोकांनी स्वयंस्फूर्तपणे इस्लाम धर्माला कवटाळले.

## युद्धप्राप्त माल

ताईफहून परतल्यानंतर युद्धप्राप्त माल गोळा केलेल्या जागी पैगंबर मुहम्मद (स.) गेले. शत्रूपक्षाचे शिष्टमंडळ कैद्यांना सोडविण्यासाठी येण्याची एका आठवड्यापेक्षा अधिक काळपर्यंत त्यांनी वाट पाहिली. परंतु कोणीच आले नाही. शेवटी लुटीच्या मालाची कुरआनच्या आज्ञेनुसार वाटणी करण्यात आली. एकपंचमांश भाग अल्लाहचा व त्याचे पैगंबर मुहम्मद (स.) यांचा होता. उरलेला सर्व माल सैनिकांचा होता.

युद्धप्राप्त मालाची वाटणी झाल्यानंतर विविध टोळ्यांची शिष्टमंडळे येऊन पोहोचली व पैगंबर मुहम्मद (स.) यांना भेटली. त्यांच्यावर आलेल्या आपत्तींची त्यांनी गणती केली आणि त्यांच्या कृपेवर आपला हक्क असल्याचे सांगितले. ते म्हणाले,

''तेथे त्या कैद्यांमध्ये झोपड्यांतून तुमच्या दाया व दूध-भगिनी आहेत. त्यांनी तुमची जोपासना केली आणि तुम्हाला छातीशी धरून गोंजारले होते. स्तनपान करताना तुम्हाला आम्ही पाहिले आहे. स्तनपान सोडलेले बालक म्हणून आम्हाला तुम्ही ठाऊक आहात, तेव्हा आमच्यावर कृपा करा, जसा स्वामी तुमच्यावर कृपावंत झाला आहे.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे कृपाशील हृदय ही कळकळीची विनवणी ऐकून कसे द्रवणार नाही? ते करूणेने ओसंडू लागले. परंतु भावनेने वाहून जाण्याइतके ते लहरी नव्हते. त्यांना तशी इच्छा झाली असती. त्यांच्या सोबत्यांच्या वाट्याला आलेला लुटीचा माल पुन्हा जमा करायला भाग पाडण्यास ते सहज सांगू शकले असते. परंतु हुकूम आणि सक्ती यामुळे त्यांच्या उदात्त योजनेचा मूळ उद्देश नष्ट झाला असता, कारण कृपेची, करूणेची बीजेच माणसांच्या अंत:करणात खोलवर रूजतात. म्हणून हुकूम सोडण्याऐवजी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्या हृदयाच्या तारा छेडल्या. त्यांनी त्यांना सांगितले की त्यांच्या वाट्याला आलेले कैदीही ते सहजपणे सोडू शकत होते तसेच आश्रित मदतनिसांच्या वाट्याला आलेले कैदीही ते सहजपणे सोडू शकत होते. परंतु त्यांच्याबरोबर इस्लाममध्ये येणारे बरेच नवागत मूर्तिपूजक होते, म्हणून त्यांना लुटीचा माला सोडून देण्यास भाग पाडण्याऐवजी तो सोडून देण्यास त्याचे मन वळविणे, हेच अधिक श्रेयस्कर आहे.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी शिष्टमंडळाला सांगितले,

''जे कैदी माझ्या वाट्याला आणि माझ्या कुटुंबाच्या वाट्याला आले आहेत, त्यांना मी तुम्हाला देऊन टाकतो आणि बाकीच्या कैद्यांसंबंधी मी लगेचच लोकांशी बोलतो. तुम्ही दुपारच्या प्रार्थनेच्या वेळी या. लोक प्रार्थनेसाठी जमतील तेव्हा त्यांच्याशी मध्यस्थी करण्यास तुम्ही मला सांगा.''



ठरलेल्या वेळी ते जमा झाले त्यांनी त्यांचा विनंती अर्ज सादर केला. मदीनेच्या नागरिकांनी आणि मक्केच्या नागरिकांनीसुद्धा स्वखुषीने पैगंबर मुहम्मद (स.) यांचा कित्ता गिरवला. परंतु युतीतील काही टोळ्यांनी, फिझार टोळीचा प्रमुख युऐना याने कैद्यांना सोडण्यास नकार दिला. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी इस्लाम धर्मात आलेल्या नवागतांच्या हक्कावर भर दिला. त्यांनी सांगितले की युती केलेल्यांपैकी जे कोणी कैद्यांना सोडून देण्यास राजी नसतील, त्यांनी जर त्यांच्या वाट्याला आलेल्या कैद्यांना सोडून दिले, तर पहिल्या लुटीच्या मालातून एका कैद्याच्या बदल्यात सहा उंट देण्यात येतील, असे आश्वासन दिले. या गोष्टीला ते राजी झाले आणि सर्व कैद्यांना सोडून देण्यात आले.

सय्यद आमिर अली लिहितात,

''हवाजिनच्या सोडून दिलेल्या कळपांची वाटणी करून झाल्यानंतर जी घटना घडली तिने हे दाखवून दिले की, पैगंबर मुहम्मद (स.) यांची मदीनेतील लोकांच्या मनावर किती घट्ट पकड होती आणि त्यांच्यात किती अपार निष्ठा त्यांनी निर्माण केली होती. शिवाय ती घटना हेही सिद्ध करते की त्यांच्या जीवनकालात आपल्या अनुयायांना कसलेही ऐहिक व भौतिक बक्षीस त्यांनी देऊ केले नाही. त्यांच्या मनाचे सुरेख संतुलन दाखविणारा आदर्श ती घटना प्रस्तुत करते. तसेच त्यांचा स्वच्छ दृष्टीकोन, त्यांची विवेकबुद्धी, दयाकरूणेचा दर्जा, मानवाच्या हक्काबद्दल त्यांच्या मनातील आदर आणि आपले म्हणणे इतरांना पटवून देण्याची कला; हेही ती घटना दाखवून देते.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अशा दयाळूपणाने व औदार्याने ज्या टोळ्यांनी आपली निष्ठा इस्लामला वाहून विश्वासू मुस्लिम बनले होते; त्या सर्वांची मने जिंकली.

युद्धप्राप्त मालातील भला मोठा वाटा मक्केतील नव्याने धर्मांतर करून इस्लाममध्ये दाखल झालेल्या लोकांना मिळाला. तितका वाटा मदीनेतील लोकांना मिळाला नाही. हे कृत्य पक्षपातीपणाचे आहे. अशा दृष्टीने काही अन्सार माणसे त्या वाटणीकडे पाहू लागले आणि असंतोषाची गोष्ट पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कानावर गेली. त्या सगळ्यांना एकत्र जमा होण्याची त्यांनी आज्ञा दिली. मग त्यांना उद्देशून पैगंबर मुहम्मद (स.) यांनी खालील भाषण केले.

''हे अन्सार कबिल्याच्या लोकांनो! माझ्यापर्यंत पोहोचलेली ही कसली बोलणी आहेत? तुमच्या मनांत सलणारी कसली व्यथा आहे? तुम्ही अल्लाहपासून दूर भरकटत चालला नव्हता आणि अल्लाहने माझ्या माध्यमाने तुम्हाला मार्गदर्शन केले नाही? तुमच्यात फाटाफूट होती आणि तुम्ही एकमेकांवर तुटून पडत नव्हता काय? अल्लाहने माझ्या माध्यमाने तुमच्यात एकोपा केला नाही काय? तुम्ही गरजवंत होता आणि

अल्लाहने माझ्याद्वारा तुम्हाला श्रीमंती दिली नाही काय?''

प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरादाखल ते ओरडले,

''अल्लाहच्या पैगंबराला उत्तर देण्यात तुम्हाला कोणती गोष्ट रोखीत आहेत? हे अन्सार लोकहो!''

ते म्हणाले,

''जेव्हा सर्व उपकार, बुद्धी व वैभव अल्लाहचे व अल्लाहच्या पैगंबराचे असताना आम्ही काय उत्तर द्यावे.''

पैगंबर मुहम्मद (स.) पुन्हा म्हणाले,

''अल्लाहची शपथ! तुम्ही उत्तर दिले असते आणि सत्य उत्तर दिले असते आणि मी स्वत:च त्या सत्याला साक्ष झालो असतो. मला खोटे लेखले होते आणि खिन्न होऊन तुम्ही आला होता आणि आम्ही तुमचा स्वीकार केला, तुम्ही असहाय्य होऊन आला होता, आम्ही तुम्हाला सहाय्य दिले, तुम्ही देशोधडीला लागला होता आम्ही तुम्हाला घरात घेतले. तुम्ही दरिद्री होता, आम्ही तुम्हाला सुख दिले. हे अन्सार लोकांनो! ऐहिक जगातील वस्तूंबद्दल तुम्हाला चिंता वाटते. ज्याद्वारा, या नवागतांचा कल इमानकडे वळविण्यासाठी साहस करीत आहे आणि तुम्ही तर इमानधारक म्हणून प्रस्थापित झालेले आहात! हे अन्सार लोकांच्या समूहवाल्यांनो! जेव्हा अन्य माणसे मेंढ्या आणि उंटाबरोबर जात असतात, तेव्हा तुम्ही अल्लाहच्या पैगंबरासह तुमच्या निवासस्थानाकडे जात असता, या गोष्टीने तुमचे समाधान झाले नाही? माझा प्राण ज्याच्या हातात आहे, त्याची शपथ! जर स्थलांतर झालेच नसते, तर मी अन्सारांपैकीच एक झालो असतो. लोक जर एका दरीतील वाटेने जात असतील आणि अन्सार लोक जर दुसऱ्या दरीच्या वाटेने जातील, तर मी अन्सार लोक जात असलेल्या दरीच्या वाटेने गेलो असतो.

''माझ्या पश्चात एक भयानक स्वार्थीपणाच्या लाटेला तुम्हाला तोंड द्यावे लागेल. म्हणून अल्लाहची व त्याचे पैगंबर मुहम्मद (स.) यांची पुन्हा भेट होईपर्यंत धीर धरा. खचितच मी मैदानापाशी असेन, अल्लाह! अन्सार लोकांवर दया कर. त्यांच्या पुत्रांवर आणि पुत्रांच्या पुत्रांवर दया कर.''

श्रोत्याच्या डोळ्यांतून घळाघळा अश्रूधारा वाहू लागल्या आणि अश्रूंनी त्यांच्या दाढ्या भिजून चिंब झाल्या. ते म्हणले,

''होय, आमचे पूर्ण समाधान झाले आहे, हे अल्लाहच्या पैगंबर (स.)! आमच्या वाट्याबद्दल आमचे समाधान झालेले आहे.''



नंतर जमावाला सोडून निघून गेले आणि जमावही पांगला.

या बाबतीत पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उचललेले पाऊल अगदी योग्य होते. नव्याने इस्लाम धर्मात प्रवेश केलेल्या टोळ्यांना, इस्लाम काय आहे, हे फारसे ठाऊक नव्हते. म्हणून त्यांना काही भौतिक धनसंपती देण्याची अत्यंत निकडीची गरज होती, जेणेकरून त्यांची मने जिंकता यावीत. तात्पुरता उपाय म्हणून तसे केले गेले आणि अशी आशा बाळगण्यात आली की काही काळ लोटल्यावर इस्लामी शिकवणीचे सौंदर्य जेव्हा त्यांना दिसून येईल, तेव्हा इमान हीच त्यांची जीवनातील सर्वांत महत्त्वाची बाब बनेल आणि धनदौलत व संपती त्यांच्या नजरेत महत्त्वशून्य ठरेल.

अन्सार लोक हे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पवित्र व्यक्तिमत्त्वाच्या थेट सहवासात व प्रभावाखाली असल्या कारणाने, भौतिक संपत्तीबद्दल त्यांनी जी चिंता दर्शविली, ती एक क्षणिक चूक होती; ही गोष्ट येथे नमुद करावीशी वाटते. त्यांच्या इमानची दृढता पैगंबर मुहम्मद (स.) यांनी प्रमाणित केली आहे. त्यांच्या मनाला जी गोष्ट खटकली होती, ती अशी की इस्लाममधील नवागतांना पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जी भौतिक स्वरूपाची कृपा केली, ती त्यांच्याबद्दल पैगंबर मुहम्मद (स.) यांचा हृदयपालट झाल्यामुळे झालेली असावी, असे त्यांना वाटले. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या वक्तव्याने त्यांच्या सर्व शंकांचे निरसन झाले आणि भौतिक धनसंपती त्यांच्या दृष्टीत गौण आहे, हे पटले. पैगंबर मुहम्मद (स.) यांची अशी उत्कट इच्छा होती की त्यांच्या अनुयायांनी जीवनातील ऐहिक लालसेच्या व मोहाच्या पलीकडे जाऊन, इस्लामसंबंधीची आपली कर्तव्ये पार पाडीत राहावे.

## अन्सार लोकांवरील पैगंबर मुहम्मद (स.) यांचा विश्वास

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्यावर धनसंपत्तीची पारखण केली नव्हती, हीच वास्तवता पैगंबर मुहम्मद (स.) यांचा त्यांच्या इमानच्या भक्कमपणाचा किती विश्वास होता, या गोष्टीचा निर्णायक पुरावा आहे. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी लुटीच्या मालाच्या वाटणीच्या संदर्भात त्यांच्यापुढे जे भाषण दिले, त्याचे रूपांतर त्यांच्या अंत:करणातील उदात्त भावना उचंबळून आल्या आणि डोळ्यांतील अश्रूमध्ये त्यांचे रूपांतर झाले. ही गोष्ट संशयातीतपणे सिद्ध करते की त्यांच्या त्यागी वृत्तीवर, त्यांच्या निष्ठेवर आणि पैगंबरांवरील त्यांच्या प्रेमावर जो पैगंबर मुहम्मद (स.) यांचा भरवसा होता, तो अनाठायी नव्हता. अल्लाहवरील आणि पैगंबर (स.) वरील त्यांची निष्ठा वर्णन करताना पवित्र कुरआन म्हणतो,

"ते मुहाजिर व अन्सार ज्यांनी सर्वप्रथम श्रद्धेच्या हाकेला ओ देण्यात पुढाकार घेतला व तसेच जे प्रांजळपणे त्यांच्या मागे आले, अल्लाह त्यांच्याशी प्रसन्न झाला व ते अल्लाहशी प्रसन्न झाले. अल्लाहने त्यांच्याकरिता अशा बागा उपलब्ध केल्या आहेत ज्यांच्या खालून कालवे वाहात असतील व ते त्यांच्यात सदैव राहतील, हेच महान यश आहे." (दिव्य कुरआन, ९ : १००)

## व्यक्तिगत दु:खे

हिजरी सनाच्या नवव्या वर्षी पैगंबर मुहम्मद (स.) यांची कन्या माननीय जैनब (रजि.) यांचे निधन झाले. मक्केतून निसटून जाताना त्यांच्यावर हल्ला होऊन गंभीररित्या जखमा झाल्याने दुखापतीतून त्या बऱ्या झाल्याच नाहीत. माननीय उम्मे कुलसुम (रजि.), ज्यांचा विवाह माननीय उस्मान बिन अफ्फान (रजि.) यांच्याबरोबर झाला त्यांची पहिली पत्नी रूकैय्या (रजि.)यांचे निधनानंतर झाला होता; त्याही मरण पावल्या. कन्यांपैकी फक्त माननीय फातिमा(रजि.)यांच हयात होत्या.

त्यांच्या मनाला अल्पावधीसाठी दिलासा मिळाला होता, जेव्हा त्यांना इब्राहीम नावाचा मुलगा झाला. त्यांची पत्नी माननीय मारिया (रजि.)यांनी त्यांना जन्म दिला. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या मायेखाली ते अर्भक वाढत होते. एक वर्ष व तीन महिने झाले असताना ते फार आजारी पडले आणि दैदिप्यमान पित्याच्या हातातच त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. त्यांच्या निधनाचा त्यांच्या माता-पित्यांना फार शोक झाला आणि पैगंबर (स.) मुहम्मद (स.) यांच्या डोळ्यांतून अश्रू ओघळले. उपस्थित लोकांनी त्यांचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला. शोक करतानाही नेमस्तपना दाखवावा, असे इतर लोकांना केलेल्या बोधाची त्यांना आठवण करून दिली.

"नाही." पैगंबर मुहम्मद (स.) उद्‌गारले.

त्या वेळी ते निधन पावत असलेल्या बालकाच्या देहावर ओणवे झालेले होते.

ते पुढे म्हणाले,

"अधिर होऊन शोकविलाप करण्यास आणि मोठमोठ्याने मृताचे गुणगान करीत अक्रोश करण्यास मी प्रतिबंध करतो.

"आम्ही मुलाचा शोक करीत आहोत आणि आसवे डोळ्यांतून गळत आहेत आणि हृदय आतल्या आत पिळवटत आहे. परंतु आमच्या स्वामीला दुखावणारे बोल आम्ही उच्चारत नाही.

"इब्राहीम! हे इब्राहीम! आश्वासन जरी विश्वासार्ह नसले, तरी पुनरूत्थान



खात्रीचे आहे. हीच वाट सगळ्यांना चोखाळायची नसती आणि आपल्यातील शेवटचा माणूस जर पहिल्या माणसाला येऊन मिळायचा नसता, तर मी तुझ्यासाठी यापेक्षा कितीतरी मोठा शोक केला असता."

परंतु त्याचा आत्मा निघून गेला होता आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांचे शेवटचे प्रेमळ शब्द त्यांना ऐकता आले नाहीत.

"त्यांच्या संगोपनाचा उर्वरित भाग स्वर्गात पुरा होईल." असे म्हणत पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांचे कलेवर खाली ठेवले.

नंतर त्या बालकाच्या मातेचे त्यांनी सांत्वन केले. त्यांच्या बहिणीचे आणि कुटुंबातील इतर माणसांचे सांत्वन केले. आता मूल गेले आहे, तरी स्तब्ध राहण्याची व ईशइच्छेपुढे सहिष्णूपणे मान वाकविण्याची त्यांनी आज्ञा केली.

योगायोगाने इब्राहीमचे निधन झालेल्या दिवशी सूर्यग्रहण झाले होते. ती घटना इब्राहीमच्या निधनावर आकाशांत प्रदर्शित झालेले सांत्वन असल्याचे लोक म्हणू लागले. लोकांच्या मनातील धार्मिक वृत्तीचा स्वहितासाठी अतिवापर करण्यास, त्यापेक्षा अधिक फलदायी दुसरा कोठलाही प्रसंग असू शकत नाही. एखाद्या तोतयाला माझे निसर्गाचे शक्तीवर किती नियंत्रण व प्रभाव आहे, हे भोळसट लोकांच्या मनावर बिंबवण्यासाठी ती एक दुर्मिळ संधी होती.

पैगंबर मुहम्मद (स.) हे अल्लाहचे सच्चे पैगंबर असल्याने ते मानववंशाच्या धार्मिक भोळसटपणाशी खेळणारे नव्हते. त्यांनी त्या कल्पनेचे सरळ खंडन केले. त्यांनी त्यांच्या अनुयायांना सांगितले, "सूर्य आणि चंद्र या अल्लाहच्या निशाण्या आहेत. कोणाही मर्त्याच्या मृत्यूमुळे त्यांना ग्रहणे लागत नाहीत. परंतु तुम्ही जेव्हा ग्रहण पाहाल, तेव्हा प्रार्थना करा आणि ते संपेपर्यंत करीत राहा."

## तबूकवर चाल

मुस्लिमांनी सीरियातील तबूकवर चाल करून गेल्याचा आता उल्लेख करायला हवा. तेथे रोमन साम्राज्याचे मांडलिक मुख्यत: घस्सान, लखम आणि जंझाम राज्यांच्या अरब प्रमुखांनी त्यांच्या स्वामीला गळ घालून मदीनातील मुस्लिमांवर हल्ला करण्यात त्यांना मदत करण्यासाठी त्यांचे मन वळविले. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपल्या अनुयायांना आवश्यक सर्व तयारी करण्यास सांगितले, जेणेकरून आगामी धोक्याला तोंड देता यावे. परंतु त्या मार्गात बरेच अडथळे व अडचणी होत्या. प्रवास खूप लांबचा होता आणि भाजून काढणारे ऊन व उष्णता होती. दिवस सुगीचे होते. शेतातील पिके

तयार झाली होती आणि कापणीला आली होती. शिवाय इतका दूरवरचा प्रवास पायी केला जाऊ शकत नव्हता आणि जनावरे बाळगण्याची कुवत सगळ्या लोकांची नव्हती.

अशा गंभीर अडचणी लक्षात घेऊन पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपला विचार मुस्लिमांना सांगितला. वेळेत सूचना देणे आवश्यक आहे असे जाणून तसे करण्यात आले. कारण खडतर प्रवासाच्या कष्टाची त्यांना पूर्वकल्पना यावी हा त्यामागचा हेतू होता.

ज्या लोकांचे इमान क्षीण होती ते लटक्या सबबी सांगून आपल्या घराचा निवारा सोडण्यास राजी नव्हते. मोहिमेवर येण्यास त्यांची असमर्थता ते दाखवू लागले. त्यांचे एक निमित्त असे होते, ''हे अल्लाहचे पैगंबरा! मला घरी राहण्याची परवानगी द्या. अल्लाहची शपथ! माझ्या सर्व लोकांना चांगले माहीत आहे की स्त्री जातीचे मोठे आकर्षण मला आहे. तो माझा एक अवगुण आहे. मी जर बनू अस्फारच्या युवतींना पाहिले, तर स्वत:वर मी ताबा ठेवू शकणार नाही, असे मला भय वाटते.'' पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांना सवलत दिली. त्याविषयी कुरआनची खालील आयत अवतरली.

''त्यांच्यापैकी कोणी असा आहे जो म्हणतो की ''मला परवानगी द्या व मला संकटात टाकू नका.'' ऐकून घ्या! उपद्रवातच तर हे लोक गुरफटले आहेत आणि नरकाने या अइमानधारकांना वेढून ठेवले आहे.'' (दिव्य कुरआन, ९ : ४९)

काही दांभिक लोक एकमेकांस सांगत असत, ''कडक उन्हात बाहेर पडू नकोस.'' यावर अल्लाहने त्यांना नरकाग्नीच्या प्रखरतेची आठवण करून दिली की त्याची उष्णता व प्रखरता सूर्याच्या उन्हाच्या प्रखरतेपेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे.

''यांना सांगा की नरकाची आग याच्याही पेक्षा अधिक उष्ण आहे, किती छान झाले असते जर यांना याचा विवेक असता!'' (दिव्य कुरआन, ९ : ८१)

अशी अनुचित प्रवृत्ती दर्शविणारे फार थोडे लोक होते. निष्ठावान आणि प्रामाणिक मुस्लिमांच्या बहुसंख्येने पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हाकेला, अल्लाहच्या मार्गात नेहमीच्या तत्परतेने व उत्साहाने ओ दिली. व कष्ट व सायास त्यांना रोखू शकले नाही. जे सत्य पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्यापर्यंत आणले होते त्यावर त्यांचा दृढविश्वास होता. आयुष्यभरातील त्यांच्या अनुभवामुळे तो विश्वास आणखी दृढतर बनला होता. त्या खोलवर रूजलेल्या विश्वासाने त्यांची अशी पक्की खात्री झाली होती की पृथ्वीवरील कोणतीही शक्ती पैगंबर मुहम्मद (स.) यांचे शब्द खोटे करू शकत नाही, कारण त्याची प्रेरणा अल्लाहकडून मिळालेली होती. त्या मोहिमेत सहभागी होण्यासाठी ते उत्कंठीत बनले होते. जेव्हा मोहिमेच्या खर्चासाठी धनाची मागणी करण्यात आली तेव्हा सर्व बाजुंनी स्वयंस्फूर्त देणग्यांचा वर्षाव झाला आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अग्रेसर सोबत्यांनी



देणगी देण्यात एकमेकांशी स्पर्धा करून उदारपणाने आपली संपत्ती ओतली. उस्मान (रजि.) यांनी तीनशे उंट दिले आणि दहा हजार दिनार दिले. माननीय उमर (रजि.) यांनी आपल्या एकूण मालमत्तेचा निम्मा हिस्सा देणगी दिली. माननीय अबू बकर (रजि.) यांनी त्यांच्यापाशी जे काही होते ते सर्व देऊन टाकले.

त्यावर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांना विचारणा केली, ''अबू बकर! तुमच्या कुटुंबासाठी तुम्ही काही मागे ठेवले आहे?''

त्या अत्यंत विश्वासू मित्राच्या तोंडून उद्‌गार बाहेर पडले,

''अल्लाह व त्याचा पैगंबर मुहम्मद (स.)!''

अब्दुल रहेमान बिन औफ यांनी दोनशे औस चांदी आणून ओतली. महिलांनी आपले अलंकार काढून दिले. गरीब व कष्टकरी मजुरांनी घामाने मिळविलेल्या कमाईचा अधिकांश हिस्सा देणगी म्हणून दिला.

इमानधारकांचा उत्साह असा होता. परंतु उदारहस्ते दिलेल्या त्या सर्व देणग्या, मोहिमेचा खर्च भागविण्यास पुरेशा नव्हत्या. युद्धात सहभागी होण्यास आतुरलेल्या मुस्लिमांना विलंबामुळे मोठा धक्का बसला, परंतु ते काही तरतूद करू शकले नाहीत. डोळ्यांत आसवे आणून ते स्वस्थ राहिले. त्यांचा प्रांजळपणा, त्यांची उत्कंठा आणि त्यांची अगतिकता, यांचे शब्द-चित्रण पवित्र कुरआनमध्ये खालील शब्दांत रेखाटले आहे.

''अशाच प्रकारे त्या लोकांवरदेखील आक्षेपास कोणतेही स्थान नाही ज्यांनी स्वत: येऊन तुम्हाला विनंती केली होती की आम्हाला स्वारी उपलब्ध करून दिली जावी आणि जेव्हा तुम्ही सांगितले की मी तुमच्यासाठी स्वारीची व्यवस्था करू शकत नाही तेव्हा ते निरुपाय होऊन परत गेले आणि स्थिती अशी होती की त्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहात होते'' (दिव्य कुरआन, ९ : ९२)

अशा सर्व अडचणी असताना, कित्येक टोळ्यांनी मोहिमेत येण्याचे वर्ज्य केले असताना आणि दांभिक लोकांनी मोहिमेतून माघार घेतली असतानाही, बऱ्याच मोठ्या संख्येत सैन्य- लोकांचा समुदाय- बाहेर पडला. पूर्वीच्या जमावापेक्षाही तो मोठा होता. पाणथळ जागेपाशी लोकांचा जमाव अविरतपणे वाढत होता. तीस हजार लोकांच्या प्रचंड सैन्यात दहा हजार घोडेस्वार होते व त्यांना पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याबरोबर ठेवण्यात आले होते. बद्रच्या लढाईत, शस्त्रसामुग्री पुरेशी जवळ नसलेले केवळ तीनशे निष्ठावान होते, उहूदच्या लढाईत सातशे लोक होते, दोनच वर्षा आधी झालेल्या खैबरच्या लढाईत

सोळाशे लोक होते आणि आता तीस हजार लोकांचे सैन्य होते. शहराचा बंदोबस्त मुहम्मद बिन मुस्लमा यांच्या ताब्यात सुपूर्द करून पैगंबर मुहम्मद (स.) यांनी तबूककडे कूच केले. त्यांच्या कुटुंबाच्या देखरेखीसाठी, त्यांच्या गैरहजेरीत, अली (रजि.) यांना मदीनाकडे पाठविण्यात आले होते.

अब्दुल्लाह उबई नेहमीच्या कुटिलतेने व दुष्टतेने सैन्यात सामील होऊन त्यांच्याबरोबर वाटचाल करू लागला. परंतु सैन्याने मदीनेची सरहद्द ओलांडताच तो आणि त्याचे सर्व साथीदार सैन्याला सोडून देऊन नेहमीप्रमाणे निघून गेले.

दांभिक लोकांखेरीज, काही मुस्लिमांनीही सैन्यात सामील होण्याचा निर्णय घ्यायला फार वेळ लावला. त्यांनी इतका विलंब लावला होता की सैन्य निघून गेले आणि ते मागे राहिले होते. त्यांनी इस्लामसाठी व पैगंबर मुहम्मद (स.)यांसाठी बऱ्याच यातना नि:स्संशयपणे भोगल्या होत्या. त्यांची नावे काब बिन मलिक, मुरारा बिन अल-राबी आणि हिलाल बिन उमैय्या अशी होती. ते निष्ठावान मुस्लिम होते आणि त्यांचा इमान संशयातीत होता. दिरंगाई केल्याच्या साध्या चुकीमुळे मोहिमेची त्यांची संधी हुकली होती. श्रद्धेच्या क्षीणतेमुळे, भयामुळे, धोक्यामुळे अगर कष्टसायासाच्या विचारामुळे नव्हे. त्या अपराधासाठी, त्यांनी व्यक्त केलेला पश्चात्ताप फार तीव्र होता म्हणून अल्लाहने त्यांना क्षमा केली.

ते रखरखीत वाळवंट ओलांडून जाणे, हे मुस्लिम सैन्यासाठी एक कठीण दिव्य होते. सूर्य मावळल्याशिवाय वाटचाल करण्याची सुरवात केली जात नसे परंतु ते सुद्धा फार सवलतीचे नव्हते. अंधार असल्याने सूर्याचे प्रखर ऊन चिलखतीवर व शिरस्त्राणांवर थेट पडत नसले तरी तापलेली जमीन व तप्त हवा थंड होण्यासाठी रात्र पुरेशी नव्हती. दिवसा मोठमोठ्या खडकांची व शिळांचीच सावली मार्गात होती. परंतु ते खडक शिळा इतक्या तापलेल्या असत की त्यांना स्पर्शही करता येत नसे. जमीन जळत्या निखाऱ्याप्रमाणे पायाचे तळवे भाजून काढत होती. पाण्याच्या दुर्भिक्ष्यामुळे हालअपेष्टात भरच पडली. उष्ण वाऱ्यामुळे जीव नकोसा झाला होता. कोणाही माणसाने अगदी जुन्या भटक्या अरबांनी सुद्धा उष्णतेच्या व टंचाईच्या इतक्या बिकट कसोटीला कधीही तोंड दिले नव्हते.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी धीर धरून निग्रह केला. त्यांची वर्तणूक उदाहरण घेण्यासारखी होती. ते विमुक्त भटक्यांपैकी नव्हते, ते तारूण्यावस्थेत अथवा मध्यमवयातही नव्हते. स्वत:च्या शारीरिक कसोटीबरोबरच त्यांच्या खांद्यावर असलेल्या हजार जबाबदाऱ्या त्यांना पेलाव्या लागत होत्या. तरीही ते लटपटले नाहीत. एका आठवड्यापेक्षा थोड्या अधिक कालावधीत सर्व सैन्य आणि सर्व सामान-सामुग्रीसह, रोमन साम्राज्याच्या सरहद्दीवर



तबूक येथे येऊन ठेपले.

भरपूर छाया आणि पाण्याची सुबत्ता असलेल्या तबूकला येऊन पोहोचल्यानंतर सैन्य तेथे थांबले. तोवर आक्रमण होणार असल्याची बातमी शांत वाटणाऱ्या सरहद्दीला जाऊन पोचली होती. जर तलवारीच्या बळावर धर्मांतर घडवून आणायचे असते तर त्यापेक्षा अधिक फलदायी सुवर्णसंधी मिळाली असती काय? दमस्कस आणि सीरियाचा तो प्रदेश आपल्या राज्याला जोडून टाकण्याइतपत संख्येत पैगंबर मुहम्मद (स.) यांचे सैन्य होते. आपल्या भौतिक व ऐहिक लालसा पुऱ्या करण्यासाठी त्यांच्यासमोर विशाल आणि विस्तृत भूप्रदेश पडला होता. परंतु त्यांना अलेक्झांडरप्रमाणे सत्तेची हाव नव्हती. केवळ आपल्या शक्तीचे प्रदर्शन करण्यासाठी मुलुख जिंकण्याची लालसा नव्हती. अशा प्रकारच्या महत्त्वाकांक्षापासून त्यांचे मन अगदी निर्मळ होते. इतका मोठा खर्च सोसून आणि हालअपेष्टा सोसून आल्यानंतर निष्ठुरतेची व दडपणाची गरज असायचे कसलेही कारण त्यांना दिसले नाही. तेव्हा लढाई करण्याच्या सर्व कल्पना त्यांनी सोडून दिल्या आणि जे सत्य शिकविण्यासाठी ते आले होते त्या सत्याप्रति लोकांची मने हेलावून सोडली. त्या ऐतिहासिक प्रसंगी तबूकमध्ये त्यांनी केलेले सुंदर व अलौकिक भाषण, त्यांच्या संघर्षाच्या उद्दिष्टांचे सार संक्षिप्तपणे सांगते.

## तबूकमधील पैगंबर मुहम्मद (स.) यांचे भाषण

त्यांनी अल्लाहची स्तुती करून त्याचे आभार मानले व म्हणाले,

‘‘बरे, सर्वांत सत्य प्रवचन म्हणजे अल्लाहचा ग्रंथ आहे. सर्वांत विश्वासार्ह आधार धर्मनिष्ठेचा शब्द आहे. सर्वांत चांगला धर्म इब्राहीमचा धर्म आहे. सर्वांत चांगला मागील दाखला हा मुहम्मदचा दाखला आहे. सर्वांत चांगले बोल अल्लाहचा धावा करणे हे होय. सर्वांत सुरेख वर्णन हे पवित्र कुरआन होय. सर्वांत चांगला व्यवहार म्हणजे जो व्यवहार निश्चितपणे ठरविला गेला आहे तो. धर्मातील सर्वांत वाईट बाब बिनआधारने निर्माण केलेल्या गोष्टी. सर्वांत चांगला मार्ग म्हणजे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अनुसरलेला मार्ग. सर्वांत भव्य व दिव्य मृत्यू म्हणजे एका शहीदचे मरण. सर्वांत हीन दर्जाचा आंधळेपणा म्हणजे मार्गदर्शन मिळाल्यानंतरचा स्वैरपणा. सर्वांत चांगले कृत्य म्हणजे जे कल्याणकारक असते ते. सर्वांत चांगले मार्गदर्शन तेच आहे ज्यानुसार आचरण केले जाते. अंत:करणाचा आंधळेपणा हा सर्वांत वाईट आंधळेपणा आहे.

वरचा हात हा खाली असणाऱ्या हातापेक्षा अधिक चांगला आहे, जे पुरे पडते ते थोडेसे, विपूल आणि भुलविणाऱ्या वस्तूंपेक्षा अधिक चांगले. सर्वांत वाईट क्षमायाचना

म्हणजे मृत्यूपुढे उभा असलेला दिसत असताना भाकलेली क्षमायाचना. सगळ्यात वाईट पश्चात्ताप म्हणजे पुनरूत्थानाच्या दिवशी व्यक्त केला जाणारा पश्चात्ताप होय.

काही लोक शुक्रवारच्या प्रार्थनेला अनमान करीत उशिरा येतात आणि काही लोक अनमान करीतच अल्लाहचे स्मरण करतात. खोटे बोलण्यास सरावलेली जीभ सतत पापाचे कारंजे उडवित असते. मनाचा संतोष ही सर्वांत मोठी मालमत्ता आहे. सर्वांत मोठे शहाणपण सामर्थ्यशील व महान अल्लाहचे भय बाळगणे हे होय. अंत:करणात काळजीपूर्वक ठेवण्याची गोष्ट म्हणजे दृढश्रद्धा व इमान. शंका ही बेइमानी आहे.

मयत झाल्यावर मोठमोठ्याने अक्रोश करीत शोकविलाप करणे आणि हयाताची मोठमोठ्याने स्तुती करणे हे अज्ञानीपणाचे कृत्य आहे. विश्वासघात हा माणसाला नरकाकडे नेतो. मद्यपान अग्नीत जळण्यासारखे आहे. अश्लील व बीभत्स कविता हे सैतानाचे कृत्य आहे. दारू ही सर्व पापांची जननी आहे. खाल्ली जाणारी सर्वांत वाईट वस्तू म्हणजे अनाथांची मालमत्ता खाणे होय. दुसऱ्या लोकांकडून ज्याची कानउघाडणी होते, तो भाग्यवान आहे.

तुम्हांपैकी प्रत्येकजणाने किमान चार कबरी असणाऱ्या कब्रस्तानाला भेट द्यावी. तुमच्या कृत्याचे मापतोल करून अंतिम निर्णय पारलौकीक जीवनात होईल. खोटे स्वप्न हे सर्वांत वाईट स्वप्न आहे. जे आपल्या नशिबात आहे, ते नजीकच आहे.

एखाद्या इमानधारकाला शिवी देणे, हे मर्यादेचे उल्लंघन आहे, त्याच्यावर शस्त्र उचलणे ही मोठी अश्रद्ध व बेइमानी आहे त्याच्या पश्चात त्याची निंदा करणे ही अल्लाहची अवज्ञा आहे, त्याच्या मालमत्तेचे अपहरण करणे हे त्याचे रक्त पिण्यासारखे आहे. जो अल्लाहच्या नावाने खोटी शपथ घेतो तो वास्तविकपणे अल्लाहला खोटे ठरवितो. जो आपत्तींना धैर्याने व चिकाटीने तोंड देतो, त्याला अल्लाह भरपाई देतो. जो आपल्या कीर्तीसाठी व प्रतिष्ठेसाठी केवळ कार्य करतो, अल्लाह त्याला नामुष्की देतो. जो धीर व सहनशक्ती आणि सोशिकता दर्शवितो, त्याला अल्लाह दुहेरी इनाम देतो. जो अल्लाहची अवज्ञा करतो, त्याला अल्लाह शिक्षा करतो.

मी अल्लाहची क्षमायाचना करतो, मी अल्लाहची क्षमायाचना करतो, मी अल्लाहची क्षमायाचना करतो.

''हे भाषण पुरेसे बोलके आहे, त्याला कसल्याही टीका-टिपणीची गरज नाही.''



## पैगंबर मुहम्मद (स.) शत्रुच्या शरणागतीचा स्वीकार करतात

तबूकमधील वास्तव्याचा कालावधीत सीरियाच्या सरहद्दीजवळील शहरांच्या प्रमुखांकडून झालेल्या शरणागतींचा स्वीकार करतात. तसेच ख्रिश्चन राजपुत्र आणि ऐलाचा गव्हर्नर युहान्ना बिन रूआबाकडून आलेला सत्कार स्वीकारतात. खालील तहनाम्यावर त्याच्या आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सह्या झाल्या.

''अल्लाह, असीम दयावंत व अत्यंत कृपावंतच्या नावाने.

अल्लाहकडून आणि त्याचा पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडून ही हमी आहे की युहान्ना बिन रूआबा आणि ऐलाची जनता यांना खुष्कीच्या मार्गाने तांडे व समुद्रमार्गाने जहाजे न्यावीत ते आणि त्यांच्याबरोबर असणारे, सीरियाचे लोक, येमेनचे लोक आणि दर्यावर्दी लोक यांना अल्लाहचे आणि त्यांच्या पैगंबर मुहम्मद (स.) यांचे संरक्षण आहे. जो कोणी या तहनाम्याचा भंग करील त्याची धनसंपत्ती त्याला वाचवू शकणार नाही. जो तहनामा स्वीकारील त्याला रास्त इनाम आहे. ज्या झऱ्यांवर ते सवयीनुसार वारंवार येत असत, त्या ऐलाच्या लोकांना तसे करण्यापासून रोखणे, हे कायदेशीर ठरणार नाही. तसेच त्यांच्या इच्छेप्रमाणे, समुद्रमार्गाने अगर जमिनीवरून प्रवास करण्यापासून त्यांना रोखले जाणार नाही.

अरब ख्रिश्चनांच्या इतर काही टोळ्या, जिब्रा व अद्रुहा यांनीही त्यांची शरणागती पत्करली. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या आदेशानुसार खालीद बिन वलीद (रजि.) चारशे लोकांना घेऊन रोमन प्रभावाखाली असलेल्या दुमतुल जदल या राज्याचा राजा उकैदिर अल्-किंदी या राजावर चाल करून गेले. त्यांनी त्याला अटक करून पैगंबर मुहम्मद (स.) पुढे हजर केले. त्या प्रमुखाने पैगंबर मुहम्मद (स.). पुढे शरणागती घेतली. त्याने खंडणी देण्याचे व एकनिष्ठ राहण्याचे कबूल केल्यावर त्याला सोडून देण्यात आले.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी तबुकमध्ये वीस दिवसांपर्यंत वास्तव्य केले आणि खालिद बिन वलीद (रजि.) पोहचण्याच्या आधी ते राजधानीत आले. लोकांमधील निरनिराळ्या विभागांनी इस्लाम प्रेमानुसार त्यांचे स्वागत केले. प्रांजळ मुस्लिमांनी, त्यांच्या पुरूष व मुलांसहित पैगंबर मुहम्मद (स.) चे आणि त्यांच्या माणसांचे मोठ्या उत्साहाने स्वागत केले. परंतु पैगंबर मुहम्मद (स.) यांनी एखाद्या विजेत्या वीराची भूमिका अंगीकारली नाही. त्यांच्या खेचरासभोवताली लोकांनी गर्दी केली, तेव्हा त्यांनी त्यांची नावे आनंदाने घेऊन संबोधले. लहान मुलांना आपल्या खेचरावर चढू दिले आणि पुढे किंवा मागे बसवून त्यांना छोटीशी रपेट दिली. प्रदीर्घ गैरहजरीनंतर घरी परतलेल्या एका विशाल कुटुंबातील पित्याप्रमाणे त्यांचे वर्तन होते.

जे तीन लोक मोहिमेतून मागे राहून गेले होते, ते अप्रमाणिकपणामुळे किंवा आकसामुळे किंवा दुराग्रहामुळे मागे राहिले नव्हते, तर अविवेकी गलथानपणामुळे आणि मानवी कमकुवतपणामुळे राहिले होते. त्यांना समाज जीवनांतून बहिष्कृत करण्यात आले. त्या वेदना त्यांनी भोगल्या, पण आव्हानात्मक चढेलपणाच्या भावनेने नव्हे, तर पश्चात्तापाच्या व खेदाच्या भावनेने त्या वेदना सोसल्या, कारण इस्लामच्या कर्तव्याच्या बाबतीत त्यांनी निष्काळजीपणा व हलगर्जीपणा दाखविला होता. त्यांनी उघडपणे पश्चात्ताप व्यक्त करून कृतीने हे दाखवून दिले की अल्लाहबद्दल आणि त्याचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याबद्दलची त्यांची निष्ठा मुळीच ढळलेली नव्हती. आपल्या अमर्याद कृपेने सर्वशक्तिमान अल्लाहने त्यांना क्षमा देऊन टाकली.

''अल्लाहने क्षमा केली नबीला व त्या मुहाजिरीन व अन्सार लोकांना (देशांतर करणाऱ्या व त्यांची मदत करणाऱ्या लोकांना) ज्यांनी मोठ्या विपत्तीच्या प्रसंगी नबीला साथ दिली. यद्यपि त्यांच्यापैकी काही लोकांची हृदये डळमळू लागली होती. (परंतु जेव्हा त्यांनी नबीला साथ दिली तेव्हा) अल्लाहने त्यांना क्षमा केली. नि:संशय त्याचा व्यवहार या लोकांशी अत्यंत प्रेमळ व कृपेचा आहे - आणि त्या तिघांनादेखील त्याने माफ केले ज्यांचे प्रकरण पुढे ढकलले गेले होते - जेव्हा जमीन सर्वथैव विस्तीर्ण असूनदेखील त्यांच्यावर तंग झाली आणि त्यांच्या स्वत:चे जीवदेखील त्यांना भारी वाटू लागले आणि त्यांनी जाणून घेतले की अल्लाहपासून वाचण्यासाठी कोणतेही आश्रयस्थान खुद्द अल्लाहच्या कृपाछत्राशिवाय नाही; तेव्हा अल्लाह आपल्या कृपेने त्यांच्याकडे वळला जेणेकरून त्यांनी त्याच्याकडे परत यावे. नि:संशय अल्लाह अत्यंत क्षमाशील व परम दयाळू आहे.''

(दिव्य कुरआन, ९ : ११७-११८)

याच्या नेमक्या उलट, वाळवंटातील रहिवाशी लोक मागे राहण्याची परवानगी स्पष्टपणे नाकारली असतानाही बिनदिक्कतपणे मागे राहिले होते. त्यांना अवज्ञेसाठी, हटवादीपणासाठी मनाच्या धरसोडीच्या वृत्तीसाठी आणि केवळ धनप्राप्तीच्या संधीच्या प्रतिक्षेत टपून बसण्यासाठी, त्यांची कानउघडणी केली.

''हे बदावी अरब द्रोह व दांभिकतेत अधिक कठोर आहेत व यांच्याबाबतीत या गोष्टीची शक्यता जास्त आहे की त्या धर्माच्या मर्यादापासून अपरिचित असतील जो धर्म अल्लाहने आपल्या पैगंबरावर अवतरला आहे. अल्लाह सर्वकाही जाणणारा व बुद्धिमान आहे. या बदावींमध्ये असे असे लोक उपस्थित आहेत जे अल्लाहच्या मार्गात काही खर्च करतात तर त्याला आपल्यावर जबरदस्तीचा भुर्दंड समजतात आणि तुमच्याबाबतीत आपत्तीची वाट पाहात आहेत (की तुम्ही एखाद्या चक्रात अडकावे तेव्हा त्यांनी आपल्या



मानगुटीवरील या व्यवस्थेच्या ताबेदारीचे जू झुगारावे ज्यात तुम्ही त्यांना जखडले आहे.) वास्तविकपणे दुष्टतेचे चक्र खुद्द यांच्याच मानगुटीवर आहे. आणि अल्लाह सर्वकाही ऐकतो व जाणतो.'' (दिव्य कुरआन, ९ : ९७-९८)

## पैगंबर मुहम्मद (स.) यांना ज्यांच्याशी व्यवहार करावा लागला ती माणसे

सूरह 'तौबा' (पश्चात्ताप) चे लक्ष देऊन अध्ययन केल्यास असे स्पष्टपणे आढळून येते की निष्ठावान मुस्लिमांशिवाय तीन प्रकारच्या लोकांशी पैगंबर मुहम्मद (स.) यांना व्यवहार करावा लागला. पहिला प्रकार दांभिक लोकांचा. ते जेव्हा आढळून आले तेव्हा त्यांनी निरनिराळी कारणे व निमित्ते सांगितली, नाही तर त्यांची लाजिरवाणी बदनामी झाली असती. त्यांना नीच अधम समजले गेले आणि त्यांना कसलीही आशा उरली नाही.

''तुमच्या सभोवती जे बदावी राहतात त्यांच्यापैकी बरेचसे दांभिक आहेत, आणि याचप्रमाणे खुद्द मदीनावासियांतसुद्धा दांभिक आहेत, जे दांभिकपणामध्ये पटाईत झालेले आहेत, तुम्ही त्यांना ओळखत नाही, आम्ही त्यांना ओळखतो. जवळ आहे ती वेळ जेव्हा आम्ही त्यांना दुहेरी शिक्षा देऊ, मग ते जास्त मोठ्या शिक्षेसाठी परत आणले जातील.''

(दिव्य कुरआन, ९ : १०१)

मुस्लिमांचा दुसरा प्रकार अशा लोकांचा होता की त्यांचा इमान तर अगदी दृढ होती, परंतु तत्कालीन मानवी कमजोरी व त्रुटींच्या कारणाने अल्लाहची आज्ञा पार पाडण्यात चुकले होते. त्यांच्या चुकीसाठी त्यांनी मोठा पश्चात्ताप केला होता आणि आपल्या त्रुटींची दुरूस्ती करण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता आणि प्रांजलमनाने बिनशर्त माफी मागितली होती. कृपावंत अल्लाहने त्यांना क्षमा केली होती.

''आणखी काही लोक आहेत ज्यांनी आपल्या चुका कबुल केल्या आहेत. त्यांचे कृत्य मिश्रित आहे, काही प्रामाणिक आहेत तर काही दुष्ट. अशक्य नव्हे की अल्लाह यांच्यावर पुन्हा मेहरबान होईल कारण अल्लाह क्षमाशील व दया दाखविणारा आहे.''

(दिव्य कुरआन, ९ : १०२)

तिसरा प्रकार शंकास्पद प्रकरणांचा होता, त्यांचा निवाडा, पुढे कधीतरी अल्लाहला योग्य वाटेल त्या वेळी तो करील.

''काही दुसरे लोक आहेत ज्यांचा मामला अजून अल्लाहच्या हुकूमावरून स्थगित आहे. वाटल्यास त्यांना शिक्षा करील आणि वाटल्यास तो पुनरपि त्यांच्यावर मेहरबान होईल. अल्लाह सर्वकाही जाणतो आणि तो बुद्धिमान आहे.''

(दिव्य कुरआन, ९ : १०६)

## दांभिक लोकांची मस्जिद पाडली

दांभिक लोकांच्या या तीन प्रकाराखेरीज आणखी एक चौथा वर्ग होता, जे आपल्या दुष्ट कारवाया कुबा येथील जरार मस्जिदमध्ये करीत असत. ती मस्जिद त्यांनी अल्लाहवरील निष्ठेखातर बांधली नव्हती तर इस्लामविरूद्ध कट-कारस्थाने करण्यासाठी एक ठिकाण म्हणून ती बांधण्यात आली होती. पैगंबर मुहम्मद (स.) मदीनेला पोहचण्याआधी चार दिवस ते कुबाच्या मस्जिदमध्ये थांबले. येथेच पहिली मस्जिद बांधली गेली होती. ती मस्जिद धर्मनिष्ठेवर आधरित होती. या पवित्र साथीदारांचा लाभ घेऊन गनिमी टोळीच्या काही दांभिक लोकांनी कुबा येथे दुसरी जरार मस्जिद विरोधाकरिता बांधली आणि इस्लामची उद्दिष्टे पुढे नेत असल्याचे ते ढोंग करू लागले. वास्तविकपणे, इस्लामचा कट्टर शत्रू असलेल्या अबू आमिर नावाच्या माणसांशी त्यांनी संगनमत केले होते. हा अबू आमिर उहूदच्या लढाईत मुस्लिमांविरूद्ध लढला होता आणि हुन्नैनच्या लढाईनंतर तो सीरियात जाऊन राहिला होता. त्याच्याच फूस लावण्याने, त्याला आणि त्याच्या साथीदारांना आश्रय घेण्याचा निवारा म्हणून ती मस्जिद बांधण्यात आली होती. तेथूनच ते इमानधारकांविरूद्ध सल्लामसलती करून कट-कारस्थाने शिजवीत होते. त्यांनी पैगंबर (स.)यांना भेटून विनंती केली की त्यांनी त्या जरार मस्जिदमध्ये येऊन प्रार्थना करावी आणि तिचे पावित्र्य वाढवावे. त्या क्षणी ते तबूकला जाण्याच्या तयारीत असल्याने, परत येईपर्यंत ते काम पुढे ढकलेले होते. दरम्यानच्या काळात ईशसंदेशात त्यांना कळून चुकले होते की ती मस्जिद प्रार्थनेसाठी व धर्मनिष्ठेसाठी बांधली गेलेली नसून इस्लामविरोधी घटकांसाठी एकत्र येण्याचे स्थान म्हणून तिची उभारणी करण्यात आली होती. ती वास्तु पाडून टाकण्यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी माणसे पाठविली. पवित्र कुरआनने दांभिकांच्या दुष्ट कारवायांचा खालील शब्दांत निषेध केला आहे.

''काही अन्य लोक आहेत ज्यांनी एक मस्जिद बनविली या हेतूपोटी की (सत्याच्या आवाहनाला) हानी पोहोचवावी, आणि (ईशभक्ती करण्याऐवजी) द्रोह करावा आणि श्रद्धाळूंमध्ये फूट पाडावी, व (त्या दिखाव्याच्या प्रार्थनागृहास) त्या व्यक्तीसाठी पाळतीची जागा बनवावी जो यापूर्वी अल्लाह व त्याच्या पैगंबराविरूद्ध लढला आहे. ते निश्चितच शपथा घेऊन घेऊन सांगतील की आमचा हेतू तर भलाईखेरीज दुसरा कोणत्याही गोष्टीचा नव्हता, पण अल्लाह साक्षी आहे की ते पुरते लबाड आहेत.''

(दिव्य कुरआन, ९ : १०७)

पैगंबर (स.) तबूकला जाण्यासाठी हिजरी सनाच्या नवव्या वर्षात रज्जब महिन्यात निघाले आणि त्याच वर्षी रमजान महिन्यात ते परतले. त्यांनी नेतृत्व केलेली ती शेवटची मोहीम होती.



## पैगंबर मुहम्मद (स.) यांची विशालह्रदयता

मुस्लिम सैन्य तबूकहून परतल्यानंतर सुमारे दोन महिन्यांनंतर दांभिक लोकांचा ओळखला गेलेला नेता अब्दुल्लाह बिन उबई मरण पावला. त्याचा मुलगा निष्ठावान मुस्लिम होता. तो त्याच्या बापाच्या निधनानंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे आला आणि त्यांना विनंती केली की त्यांनी त्यांच्या हाताने बापाच्या मृत शरीरावर पांघरण्यासाठी त्यांचा एक अंगरखा द्यावा. तसेच त्याचा दफनविधी त्यांनी आपल्या हाताने करावा अशीही विनंती केली. पैगंबर मुहम्मद (स.) उठले पण उमर (रजि.) यांनी तो अंगरखा आपल्या हातात घेतला आणि म्हणाले, अब्दुल्लाह एक दांभिक होता आणि अल्लाहकडे त्याच्यासाठी प्रार्थना करण्यास पैगंबर मुहम्मद (स.) यांना या सबबीवर आक्षेप घेतला. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उत्तर दिले, मला आवडनिवड करण्याची मुभा देण्यात आली. कारण अल्लाहने म्हटले आहे,

''हे पैगंबर (स.)! मग तुम्ही अशा लोकांसाठी क्षमेची याचना करा अथवा न करा, जर तुम्ही सत्तर वेळा देखील त्यांना क्षमा करण्याची विनवणी कराल तरी अल्लाह त्यांना कदापि क्षमा करणार नाही.'' (दिव्य कुरआन, ९ : ८०)

पैगंबर म्हणाले की, सत्तरमध्ये आणखी भर टाकल्यास अल्लाह क्षमा करील, असे जर त्यांना कळून आले, तर त्यात ते आणखी भर घालून त्यांच्यासाठी क्षमायाचना करतील, ते त्यांच्या प्रेतयात्रेत मागून चालत गेले, त्यांच्या कबरीपाशी जाऊन प्रार्थनाही केली आणि त्यांचे दफनकार्य पुरे होईपर्यंत तेथे थांबून राहिले. उमर (रजि.) म्हणाले, ''मला माझा स्वत:चा आणि माझ्या निर्भयतेचा विस्मय वाटला. कारण मला पूर्ण जाणीव होती की अल्लाह आणि त्याचा पैगंबर यांना सर्वोत्तम ज्ञान आहे.'' त्यानंतर थोड्याच दिवसांनी खालील दोन आयती अवतरल्या.

''आणि यापुढे यांच्यापैकी जो कोणी मृत्यू पावेल त्याच्या जनाजाची नमाज सुद्धा तुम्ही मुळीच पढू नका व त्यांच्या कबरीजवळ देखील कधी उभे राहू नका. कारण त्यांनी अल्लाह व त्याच्या पैगंबराशी द्रोह केला आहे. आणि ते मृत्यू पावले आहेत अशा अवस्थेत की ते अवज्ञाकारी होते.'' (दिव्य कुरआन, ९ : ८४)

त्यानंतर मात्र कोणत्याही दांभिकाच्या मृत देहापाशी कधीही प्रार्थना केली नाही. माणसांबद्दल त्यांच्या अंत:करणात किती अलोट प्रेम होते, तेच ही घटना दाखवून देते. तसेच आपल्या कट्टर शत्रूशीही ते किती क्षमाशीलतेने व दयाशीलतेने वागत होते, हेही दिसून येते. वाट चुकलेल्या अपराधी लोकांना नरकाग्नीत पडण्यापासून वाचविण्याच्या संधीची ते सतत वाट पाहात असत.

## उर्वाचा इस्लाम प्रवेश

ताईफच्या लोकांचा पवित्रा, तोपर्यंत साधारणत: शत्रुत्वाचाच होता. उर्वा बिन मसऊद अल-सकफी हा अत्यंत बुद्धिमान प्रमुख होता आणि हुदैबियाच्या तहाच्या वेळी बोलणी करण्यासाठी तो सुहेलसह आला होता. त्याला पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याबद्दल आणि ते शिकवण देत असलेल्या धर्माबद्दल बरीच माहिती मिळाली होती. त्यांच्या भावनांमध्ये आवरता न येण्यासारखी क्रांती घडून आली. प्रेमभराने ते पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यापाशी गेले आणि इस्लाम धर्माला त्यांनी कवटाळले आणि ते अल्लाहचे सक्रीय, अत्यंत निष्ठावान आणि विश्वासू सेवक बनले. नव्या श्रद्धेने आणि चैतन्याने ओसांडत ते त्यांच्या माणसांकडे परत आले आणि त्यांनी मूर्तीपूजेचा शपथपूर्वक त्याग केल्याची घोषणा केली आणि लोकांना त्या ईशधर्माच्या कृपेत आणि प्रसादात सहभागी होण्याचे मोठ्या उत्साहाने आवाहन केले. त्यांची स्थिती भक्कम असल्याने त्यांना कसल्याही संकटाला सामोरे जावे लागणार नाही, याचा त्यांना ठाम विश्वास होता. परंतु परिस्थितीचा आढावा घेण्यात त्यांची ती चूक ठरली. त्यांचे धर्मांतर त्यांच्या माणसांना सहन झाले नाही. एके दिवशी ते सर्व लोक त्यांच्या घराभोवती गोळा झाले आणि बाणांचा वर्षाव करून त्यांनी त्यांना ठार केले.

ते जेव्हा शेवटचा श्वास घेत होते, तेव्हा त्यांना विचारले गेले,

''तुम्हाला तुमच्या मृत्यूबद्दल काय वाटते?''

त्यांनी उत्तर दिले,

''ते एक मोठे वरदान आहे, जे प्रदान करून आणि मला हौतात्म्याकडे नेऊन अल्लाहने माझा सन्मान केला आहे. पैगंबर मुहम्मद (स.)यांच्यासह लढताना जे इतर लोक ठार होऊन हुतात्मे झाले, त्यांच्याप्रमाणे मी असून, त्यांच्या कबरीशेजारीच मलाही दफन करावे.''

सय्यद आमिर अली लिहितात,

''उर्वा (रजि.) यांचे मरणसमयीचे बोल ऐकल्यावर जिवंतपणी त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळेही तितका परिणाम घडून आला नव्हता. त्या हुतात्म्याच्या रक्ताने मारेकरी खुन्यांच्या मनांत इमानची सुमने फुलविली. ताईफच्या लोकांना एकाएकी पस्तावा झाला, कदाचित वाळवंटी टोळ्यांशी सततच्या शत्रुत्वाला कंटाळून असेल, त्यांनी माफीसाठी एक शिष्टमंडळ पाठविले.



## ताईफकडून शिष्टमंडळ

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्या शिष्टमंडळाचे सहर्ष स्वागत केले आणि त्यांच्या निवासासाठी मस्जिद शेजारीच एक तंबू ठोकण्यात आला, जेणेकरून त्यांना कुरआनचे शब्द ऐकता यावेत आणि मुस्लिम लोक अल्लाहसाठी नमाज पढताना त्यांना दिसावेत. अल्लाहचे शब्द ऐकून ते खोलवर प्रभावित झाले आणि इमानधारकांची निष्ठा पाहूनही ते अत्यंत प्रभावित झाले. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सार्वजनिक प्रवचनाच्या शैलीमुळेही त्यांच्यावर मोठा प्रभाव पडला. त्या प्रवचनाच्या बाहेर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी स्वत:ची प्रतिमा कधीही बाहेर येऊ दिली नाही. त्यांची वक्तृत्वपूर्ण आणि स्पष्ट वाणी ऐकून, ज्यात कसलेही प्रदर्शन नव्हते, स्वत:च्या दु:खाचा ओझरताही उल्लेख नव्हता. असे त्यांच्या निरीक्षणात आले. ते उद्गारले, ''मुहम्मद अल्लाहचे पैगंबर आहेत, हे मान्य करण्यास आमची मने हेलावली आहेत, कारण त्यांच्या बोलण्यात ते आपल्या स्वत्वाचा उच्चारही करत नाहीत व आपले व्यक्तीमत्वही पुढे आणत नाहीत.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पैगंबरत्वावरील इमान हे इस्लामच्या मूलतत्त्वांपैकी एक असल्याने, पैगंबर मुहम्मद (स.) यांनी तिच्या मूलभूत महत्त्वावर मोठा भर दिला. ते म्हणाले,

''मी अल्लाहचा पैगंबर मुहम्मद (स.) आहे, हे मान्य करणारा मी सर्वांत पहिला माणूस आहे. अल्लाह एकमेव आहे आणि आधीच्या एकूण सर्व पैगंबरांच्या पैगंबरत्वावर आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पैगंबरत्वावर दृढइमान धारण केल्यानंतरच एखाद्या माणसाला इस्लामच्या छत्रछायेत प्रवेश दिला जातो.''

म्हणून पैगंबर मुहम्मद (स.) यांनी नि:संदिग्ध शब्दांत ही घोषणा केली होती,

''त्यांच्या पैगंबरत्वावरील इमान हे ऐच्छिक स्वरूपाचे नाही. तो इस्लामचा मूळ पाया आहे आणि माणसाने कोणताही निर्णय घेण्यापूर्वी त्याबद्दल अगदी स्पष्ट असावे.''

त्या शिष्टमंडळाने आपली काही भीती मोकळेपणाने पैगंबर मुहम्मद (स.) यांना कळविली. त्यांच्यावर अवतरलेल्या इशज्ञानाबद्दल त्यांच्या सर्व शंकांचे व अपसमाजांचे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी निरसन करून त्यांना इमानबद्दल इतक्या सुरेख रीतीने बोध केला की त्यांचा संदेश सत्य असल्याबद्दल त्यांना पटले. तरीही त्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यासमोर आपल्या काही अटी ठेवल्या आणि त्यांना विनंती केली की, त्यांना इमानच्या बाबतीत, निष्ठेच्या बाबतीत आणि इस्लामी नीतितत्त्वांच्या बाबतीत काही सवलती मिळाव्यात. त्यांना केलेल्या विनवणीत एक अशी होती,

''अविवाहित कुमारिकेशी संभोग करण्यास त्यांना मनाई असू नये.''

त्यांनी युक्तिवाद केला की, ''आमच्यापैकी फार मोठ्या संख्येत लोक वैवाहिक जीवनाची जबाबदारी शिरावर घेण्यास तयार नसतात आणि म्हणून त्यांना आपली कामेच्छा जारकर्म करूनच पुरी करावी लागते.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी निग्रहाने उत्तर दिले, ''नाही, तसे होऊ शकत नाही, कारण त्या कृत्याची अल्लाहने सक्त मनाई केली आहे. अल्लाहने म्हटले आहे,

''व्यभिचाराच्या जवळपास फिरकू नका, ते फार वाईट कृत्य आहे आणि अत्यंत वाईट मार्ग.'' (दिव्य कुरआन, १७ : ३२)

त्यांनी पुढे म्हटले की, व्याजाने पैसे कर्जाऊ देण्याची त्यांच्या वहिवाटीवर कसलीही बंधने घातली जाऊ नयेत.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी ती मागणीही मान्य केली नाही. त्याबाबतीत त्यांना कसलीही सवलत ते देऊ शकत नाहीत, असे त्यांनी मोकळेपणाने सांगितले. त्यांना केवळ कर्जाच्या मुद्दलाची रक्कम वसूल करता येईल, व्याजाची रक्कम त्यांना दिली जाणार नाही, असे सांगून टाकले. पवित्र कुरआनने म्हटले आहे,

''हे इमानधारकांनो, अल्लाहचे भय बाळगा आणि जे काही तुमचे व्याज लोकांकडून येणे बाकी असेल ते सोडून द्या, जर खरोखर तुम्ही इमानधारक असाल. ''

(दिव्य कुरआन, २ : २७८)

त्यांनी पुन्हा मागणी केली की मद्यपान करण्यास त्यांना परवानगी असावी, कारण मद्य हे त्यांच्या शेतजमिनीतील अर्क असून त्याच्यावरच त्यांचे जीवन अवलंबून आहे.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांची ही मागणीही नाकारली आणि कुरआनच्या खालील ओळी उच्चारल्या,

''हे इमानधारकांनो, ही दारू आणि जुगार व वेदी आणि शकून ही सर्व अमंगल सैतानी कामे होत, यांच्यापासून दूर राहा, आशा आहे की तुम्हाला यश मिळेल.''

(दिव्य कुरआन, ५ : ९०)

ते आपल्या तंबूकडे परत गेले आणि आपापसात त्या परिस्थितीवर खूप चर्चा केली. ते पुन्हा परत आले आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांना त्यांनी विचारले की त्यांच्या अल्-लात या देवतेशी त्यांनी कसे वर्तन करावे?

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी कसलाही संकोच न करता सरळ सांगितले, ''नष्ट करून टाका.''



त्यांच्यामध्ये मोठा हलकल्लोळ माजला, ते म्हणू लागले की त्यांचे विचार जर त्या मूर्तीला समजले, तर शहरातील सर्व माणसांना ती ठार मारून टाकील.

त्यावर पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शेजारी उभे असलेले माननीय उमर (रजि.) उद्‌गारले, ''अब्द यालील! किती अज्ञानी आहेस तू! ती दगडातून कोरलेली केवळ निर्जीव मूर्ती आहे.''

परंतु त्यांनी विनवणी केली की, अल्-लात या मूर्तीला काही काळ राहू देण्याची कृपा व्हावी. पहिल्यांदा त्यांनी तीन वर्षांची मुदत मागितली.

परंतु पैगंबर मुहम्मद (स.) यांनी निर्धारपूर्वक नकार दिला, कारण इस्लाम आणि मूर्तीपूजा यांचे सहजीवन होऊ शकत नाही. अल्लाहवरही विश्वास धारण करायचा आणि अन्य देवतांनाही उपासनेस पात्र मानण्याचा असा मधला मार्ग नव्हता.

अखेरीस त्यांनी अशी मागणी केली की दररोजच्या प्रार्थनांस उपस्थित राहण्यापासून त्यांना सुटका मिळावी.

पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले, ''मूर्ती स्वत:चे हाताने नष्ट न करण्याची आम्ही तुम्हाला माफी करतो. परंतु प्रार्थनेसंबंधी कसलीही सवलत तुम्हाला देऊ शकत नाही, कारण जेथे प्रार्थना नाही तेथे तसल्या इमानमध्ये काहीच सत्‌गूण नाही.''

नमाज ही वास्तविकपणे धर्माचा प्राण व आत्मा आहे. एक धर्मनिष्ठ माणूस अल्लाहवरील आपला इमान व्यक्त करण्याचे ते पहिले, सर्वोच्च आणि सर्वांत महत्त्वाचे धार्मिक कृत्याचे दृश्य रूप आहे आणि सर्व खऱ्याखुऱ्या धार्मिकतेचे ते मूळ घटक आहे. ती मुस्लिमांची 'मेअराज'- उर्ध्वगमन आहे, असे म्हटले गेले आहे. माणसाचा आत्मा अल्लाहशी निकटचा संपर्क साधण्याचे जितकी रूपें आहेत ती सर्व अद्वितीय व उत्कट उदात्ततेनिशी अगदी शानदार रीतीने आढळते!

## नमाजचे वैशिष्ट्यपूर्ण मुख्य घटक

(१) सतत सजग, कृपावंत, चिरंजीव आणि सर्वशक्तिमान या गुणवैशिष्ट्यांनिशी अल्लाहची हुबेहुब व ठळक जाणीव.

(२) त्याच्या महानतेची न चुकता अनुभूती घेणे. त्यात ठाम विश्वास असणे की केवळ नैतिक सदाचरणानेच माणूस अल्लाहच्या दृष्टीत स्वीकारार्ह होऊ शकतो.

(३) माणसाला आपल्या चुकांची जाणीव आणि त्याउलट सर्वशक्तिमान अल्लाहची सत्ता, त्याची अपरिमित कृपा यांची जाणीव होते; यामुळे रदबदली, प्रार्थना, आभार प्रदर्शन, आर्जवे, कृतज्ञता, प्रेम पश्चात्ताप आणि विनवणी वगैरे प्रदर्शित होतात.

अशा रीतीने चिरंजीवी आणि कृपावंत स्वामी आणि त्याच्या दृष्टिकोनातून सदाचार, हाच माणसाला उन्नत करतो आणि माणसामाणसात एकवाक्यता वा सुसंवाद निर्माण करतो, माणसामध्ये आणि विश्वामध्ये तसेच त्याच्या निर्माणकर्त्यामध्ये सुसंवाद निर्माण करतो. इस्लामी इमानचे ते मूळ घटक आहेत आणि इस्लामी प्रार्थनेची वैशिष्ट्यपूर्ण चिन्हें आहेत.

प्रार्थनेच्या या सर्व बाबी कुरआनमध्ये स्पष्टपणे सांगितले गेल्या आहेत,

''हे पैगंबर (स.), पठन करा या ग्रंथाचे जो तुमच्याकडे दिव्यबोधद्वारे पाठविला गेला आहे आणि नमाज कायम करा, निश्चितच नमाज, अश्लील व अपकृत्यांपासून रोखते आणि अल्लाहचे स्मरण याहूनही मोठी गोष्ट आहे. अल्लाह जाणतो तुम्ही लोक जे काही करता. (दिव्य कुरआन, २९ : ४५)

सकीफचे लोक जे काही म्हणू शकत होते, त्यापैकी उल्लेखाविना काहीही सोडले नव्हते. ईशधर्माच्या सर्व बाबीं पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांना विशद करून सांगितल्या होत्या आणि त्यांच्यावर ज्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्यें येऊन पडणार होती, त्या सर्व त्यांना पटवून दिल्या होत्या. तसेच त्यांच्या व्यक्तिगत जीवनात आणि त्यांच्या सामाजिक जीवनात ज्या स्वरूपाचे बदल घडवून आणणे त्यांना भाग होते, तेही सांगितले. मदीना सोडण्याआधी अल्लाहसमोर बिनशर्त शरणागती पत्करण्यास ते कबूल झाले होते आणि इस्लामच्या सर्व शिकवणींवर त्यांनी इमान धारण केले होते.



## धर्मप्रचारक पाठविले

नव्या धर्मांतरितांच्या गरजांकडे पैगंबर पूर्णपणे सजग होते. धर्मतत्त्वांचे मार्गदर्शन त्यांना करण्यासाठी कोणीतरी हवे होते. उस्मान बिन अबी अल-आस यांची, त्यांचे शिक्षक व नेते म्हणून नियुक्ती केली, कारण कुरआनची शिकवण जाणून घेण्यात त्यांना फार मोठी आस्था व कळकळ होती.

हे शिष्टमंडळ रमजान महिन्यात मदीना येथे राहिले आणि नंतर ते घरी परतले. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्याबरोबर अबू सुफयान (रजि.) व अल् मुगीरा (रजि.) यांना मूर्ती नष्ट करण्यासाठी पाठविले. ते दोघेंही बनू सकीफचे जुने मित्र होते. त्यांनी मूर्तींवर प्रहार केले, त्यावेळी महिला रडत होत्या, परंतु कोणीही हरकतीचा अथवा निषेधाचा एक शब्दही बोलू शकले नाहीत, कारण मूर्ती नष्ट करण्याचे त्यांनी आधीच मान्य केले होते.

ते वर्ष उलटून गेल्यावर, मक्केची यात्रा करण्याची वेळ पुन्हा आली. त्या वेळी पैगंबर मुहम्मद (स.) स्वत: गेले नाहीत. त्यांच्याऐवजी त्यांचे विश्वासू उपनायक अबू बकर (रजि.) यांच्या देखरेखीखाली तांडा पाठविला होता. तांडा निघून गेल्यावर लगेच अल्लाहची वाणी अवतरली. त्या अध्यायाच्या पहिल्या भागाचे शीर्षक 'पश्चात्ताप' असे होते. ज्या मूर्तिपूजक अरबी टोळ्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी केलेल्या शांतता कराराचा आदर राखला नव्हता, त्यांच्या कर्तव्य-बंधनाच्या स्वातंत्र्याची अल्लाहने घोषणा केली आहे.

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे चुलत भाऊ आणि जावई माननीय अली (रजि.) यांना पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या वतीने घोषणा करण्यासाठी पाठवून दिले. त्या घोषणेत मुख्यत: त्यांच्या दर्जाचा आणि त्यांच्या जीवित-वित्ताच्या रक्षणाचा प्रश्न समाविष्ट होता. तो संदेश घेऊन आल्यानंतर आणि कळल्यानंतर माननीय अबू बकर (रजि.) यांनी विचारणा केली,

''पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्याकडे नेतृत्व सोपविले आहे की त्यांना ती घोषणा करण्याचा अधिकार दिला आहे?''

माननीय अली (रजि.) यांनी उत्तर दिले,

''मला फक्त घोषणा करण्यासाठी पाठविण्यात आले आहे.''

काबागृहाच्या यात्रेची सांगता होताना, विधीवत कुर्बानी करण्याच्या दिवशी असंख्य लोकांच्या जमावापुढे, माननीय अली (रजि.) यांनी ती ईशआज्ञा मोठ्याने वाचून दाखविली, ती खालीलप्रमाणे,

''मुक्तीची घोषणा आहे, अल्लाह व त्याचे पैगंबर (स.) कडून त्या अनेकेश्वरवादी लोकांसाठी ज्यांच्याशी तुम्ही करार केले होते. तर तुम्ही देशात आणखी चार महिने संचार करून घ्या आणि जाणून असा की तुम्ही अल्लाहला असफल करणारे नाहीत, आणि अल्लाह सत्याचा इन्कार करणाऱ्यांना अपमानित करणारा आहे. आम सूचना आहे, अल्लाह व त्याचे पैगंबर (स.) कडून हज्जे अकबर च्या दिवशी, तमाम लोकांच्यासाठी, की अल्लाह अनेकेश्वरवादी लोकांकडून जबाबदारीपासून मुक्त आहे, आणि त्याचा पैगंबरसुद्धा. आताही जर तुम्ही पश्चात्ताप केला तर ते तुमच्यासाठीच उत्तम आहे आणि जर तोंड फिरवीत आहात तर चांगले लक्षात ठेवा की तुम्ही अल्लाहला असफल करणारे नाहीत, आणि हे पैगंबर (स.)! सत्याचा इन्कार करणाऱ्यांना कठोर यातनेची खुशखबरी ऐकवा त्या अनेकेश्वरवादींखेरीज ज्यांच्याशी तुम्ही करार केले आणि त्यांनी तुमच्याशी आपला करार पाळण्यांत कोणतीही कसूर केली नाही व तुमच्याविरूद्ध कुणाला मदतही केली नाही, तेव्हा अशा लोकांशी तुम्ही देखील कराराची मुदत पूर्ण होईपर्यंत प्रामाणिक राहा; कारण अल्लाह ईशपरायण लोकांनाच पसंत करतो. मग जेव्हा निषिद्ध महिने लोटतील तेव्हा त्या अनेकेश्वरवादींना ठार करा, जेथे सापडतील तेथे त्यांची नाकेबंदी करा व प्रत्येक पातळीवर त्यांचा समाचार घेण्यासाठी सज्ज रहा. मग जर त्यांनी पश्चात्ताप केला व नमाज कायम केली आणि जकात दिली तर त्यांना सोडून द्या. अल्लाह क्षमाशील आणि दया दाखविणारा आहे. आणि जर अनेकेश्वरवादींपैकी कोणी इसम शरण मागून तुमच्याकडे येऊ इच्छित असेल जेणेकरून अल्लाहची वाणी ऐकावी तर त्याला आश्रय द्या येथपावेतो की त्याने अल्लाहची वाणी ऐकावी. मग त्याला त्याच्या सुरक्षित ठिकाणी पोहचवा. हे अशासाठी करावयास पाहिजे की या लोकांना ज्ञान नाही. या अनेकेश्वरवाद्यांसाठी अल्लाह व त्याच्या पैगंबराजवळ कोणताही करार कसा बरे असू शकतो? - त्या लोकांखेरीज ज्यांच्याशी मस्जिदे हरामजवळ तुम्ही करार केला होता. म्हणून जोपर्यंत ते तुमच्याशी सरळ राहतील तोपर्यंत तुम्ही देखील त्यांच्याशी सरळ राहा, कारण अल्लाह ईशपरायण लोकांना पसंत करतो. परंतु यांच्याशिवाय इतर अनेकेश्वरवाद्यांशी कोणताही करार कसा बरे होऊ शकतो; जेव्हा त्यांची स्थिती अशी आहे की तुमच्यावर ताबा मिळविला तर ते तुमच्यासंबंधी नात्यागोत्याचाही विचार करणार नाहीत एखाद्या कराराच्या जबाबदारीचा? ते आपल्या संभाषणाने तुम्हाला प्रसन्न करू पाहतात परंतु हृदये त्यांची नाकारतात व त्यांच्यापैकी बरेचजण अवज्ञाकारी आहेत. (दिव्य कुरआन, ९ : १-८)

या आयतींचे पठन करून झाल्यानंतर माननीय अली (रजि.) यांनी आयतींचा खुलासा असा केला,



''तुम्हाला अशी घोषणा करण्याचा मला हुकूम देण्यात आला आहे की कोणीही नाकारणारा माणूस स्वर्गात प्रवेश करणार नाही. या वर्षानंतर, कोणीही नाकारणारा काबागृहाची यात्रा करणार नाही. तसेच पवित्र गृहाला नग्न-प्रदक्षिणा घालण्याची कोणालाही परवानगी नाही. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी ज्यांनी तहाचा करार केला आहे, त्या तहाची मुदत संपेपर्यंत आपल्या घरी परतावे. त्यानंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावरील त्यांची जबाबदारी संपुष्टात येईल.''

अलींचे भाषण संपल्यावर यात्रेकरू गटागटाने व एकेकटे तेथून पांगले आणि त्यांनी आपल्या घराचा रस्ता धरला. वाटेने जाता जाता त्यांनी ही बातमी सर्वत्र पसरवली की तेथून पुढे, इस्लाम हाच अरबस्तानचा धर्म झाला आहे. तोपर्यंत वाळवंटी टोळ्यांना हे पूर्णपणे दिसून आले होते की पैगंबर मुहम्मद (स.) हे सच्चे पैगंबर मुहम्मद (स.) आहेत, त्यांचा संदेश अल्लाहचा संदेश आहे आणि त्यांच्या मुखातून बाहेर पडणारे शब्द प्रामाणिकपणा व प्रांजळपणावर आधारित होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांना अत्यंत बिकट आणि परीक्षा पाहणाऱ्या विरोधी परिस्थितीत, त्यांनी जो विचार केला आणि जी कृती केली, ते अन्य कोणीही मर्त्य माणूस तसा विचार व कृती करू शकला नसता. या सर्वांमुळे विरोधाचा पाया ढासळला आणि इस्लामचे छोटे बीज अंकुरून त्यातून मोठा वृक्ष फोफावला.

## अरबस्तानच्या सर्व भागांतून शिष्टमंडळे गर्दी करू लागली

इस्लामचे वर्चस्व अशा रीतीने पूर्णत: प्रस्थापित झाले होते. अज्ञानकाळातील सर्व वाईट गोष्टी व दुष्टपणा नष्ट होऊन त्यांची जागा ज्ञानदानाने, सूज्ञतेने व मानवी कृपेने घेतली. म्हणून मदीनेकडे चहूबाजूंनी शिष्टमंडळांचे मानवी ओघ वाहू लागले आणि इस्लामचा व अल्लाहचे अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) यांचा आदर-सन्मान करू लागले. बनू तमीमकडून बनू साद बिन बकरकडून, तैय्यकडून, फर्वा बिन मसैक अल-मुरादीकडून, बनू जुबैदकडून, किंडाकडून व हिम्मैर राजांकडून शिष्टमंडळे आली.

हिजरी सनाच्या दहाव्या वर्षापर्यंत जवळजवळ सर्वच मूर्तिपूजक अरबांनी इस्लाम धर्म स्वीकारला होता आणि जे अरब अद्यापपर्यंत ख्रिश्चन व यहुदी धर्मातच राहिले होते, ते पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या रक्षणाखाली होते. पण मदीनापासून फार दूरच्या अंतरावर मुस्लिमांची जी फार मोठी संख्या राहात होती, त्या लोकांना धर्माची शिकवण देणे गरजेचे होते. म्हणून पैगंबर मुहम्मद (स.) यांनी नव्या धर्मांतरितांना इस्लाम धर्माची शिकवण देण्यासाठी आणि गरिबांचे देणे (जकात) गोळा करण्यासाठी माननीय अब्दुल्लाह बिन अबू बकर (रजि.) यांच्या आधारे असे निवेदन केले जाते की अल्लाहचे पैगंबर मुहम्मद

(स.) यांनी मुआजला हे कठीण कार्य हातात घेण्यासाठी पाठविले, तेव्हा त्यांना मार्गदर्शनपर खालील तत्त्वे सांगितली गेली.

''लोकांशी सौम्यपणाने वागा आणि त्यांना कसलाही निष्ठुरपणा दाखवू नका. तुम्ही ग्रंथधारी लोकांकडे जात आहात, ते तुम्हास स्वर्गाच्या किल्लीबद्दल प्रश्न विचारतील. त्यांना सांगा, खचितच ती किल्ली, अल्लाहखेरीज अन्य कोणीही ईश्वर नाही आणि त्याचा कोणीही सहभागी नाही, अशी ग्वाही देण्यात सामावलेली आहे.''

इस्लाम धार्मिक कृत्य आणि धर्मनिरपेक्ष कृत्य यातील विभागणी जाणत नाही, म्हणून लोकांना धर्माची शिकवण देण्यासाठी जे दूत पाठविण्यात आले हाते, त्यांनाच न्यायदानाचा अधिकारही सोपविण्यात आला होता. नव्या धर्माच्या स्वीकारामध्येच असा गर्भितार्थ आहे की नवागतांनी त्याबरोबर इस्लामची सामाजिक, राजकीय, नैतिक आणि आध्यात्मिक आचारसंहिता ओळखावी आणि इस्लाममधील नवागतांचे संपूर्ण जीवनच इस्लामी शिकवणीच्या मुशीत ओतून नियंत्रित व्हावे, अशी आवश्यकता आहे. प्रत्येक कृतीचा कुरआनच्या प्रकाशात आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या 'सुन्नाह'च्या प्रकाशात निर्णय घेतला जायला हवा. म्हणूनच ही शिकवण देणारी माणसेंच त्या प्रदेशाचे न्यायाधीशही होते.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनाच्या अखेरीच्या काळात लढायांचे आवाज जवळ जवळ नष्ट झालेले होते. परंतु इस्लाममध्ये धर्मांतर करून येणाऱ्यांचे प्रमाण विस्मयकारक प्रचंड होते. लोकांच्या वृत्तीत झालेला अचानक व अनपेक्षित बदल लढायांच्या परिणामस्वरूप होता, या गोष्टीवर विश्वास बसतच नाही. अरबभूमीचे हे युद्धप्रेमी पुत्र अद्याप बलवान होते आणि त्यांच्या वांशिक प्रथांचा त्यांना अभिमान होता. तलवारीच्या बळावर त्यांना शरण येण्यास भाग पाडले जाऊ शकत नव्हते.

लढाईमध्ये आपले स्वत्व मुस्लिमांच्या विरोधात टिकविण्याइतपत ते बलवान होते किंवा मदीनेच्या वाढत्या सत्तेविरूद्ध तडकाफडकी ते महासंघ स्थापू शकत होते. आणखी लढाईच्या परिस्थितीत चांगले शेजारी असलेल्या मुस्लिमांशी ते तहांचा करार करू शकत असते आणि आपली वेगळी प्रार्थनापद्धत टिकवून ठेवण्याचा हक्क ते बजावू शकत होते. तीच सवलत यहुद्यांना व ख्रिश्चनांना देण्यात आली होती. पण इस्लामपासून रोखून धरण्यासारखे त्यांनी काहीही केले नाही. त्यांच्या शिकवणीतील सत्याबद्दल लोकांच्या मनाला पटले होते आणि ते सत्य देणाऱ्या पैगंबर मुहम्मद (स.) यांचा सच्चेपणा व प्रामाणिकपणाही त्यांना पटला होता. त्यांचे हृदयपरिवर्तन झाले होते आणि ईशधर्माचा स्वीकार करण्यापासून त्यांना कोणीही थांबवू शकत नव्हते.



## शेवटचे भाषण

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या वयाला साठ वर्षे झाली होती आणि हिजरी सनाचे ते दहावे वर्ष होते. ईशसंदेश प्रसाराचे त्यांचे कार्य पूर्ण झाले होते. अज्ञानात खोलवर बुडालेल्या लोकांना पैगंबर मुहम्मद (स.) यांनी प्रकाश दिला आणि अल्लाहवरील गाढ श्रद्धेची त्यांना प्रेरणा दिली. तोच एकमेव विश्वाचा निर्माणकर्ता, धनी व पालकनकर्ता आहे, हे त्यांच्या मनावर बिंबवले. सततच्या लढायात अविरत रक्तपात करणाऱ्या विस्कळित लोकांत विचार व आचाराची एकता निर्माण केली आणि त्यांना प्रेम व बंधुभावाच्या बंधनात गुंफले. त्यांचे जीवन म्हणजे एक उदात्त कार्य, उदात्तपणे व अत्यंत तळमळीने केले की त्यात कसलीही तडजोड नव्हती, ते कार्य कधीही थांबले नाही. इतक्या अतुल्य धैर्याने त्यांनी ते पार पाडले की कसल्याही विरोधाची, प्रतिकाराची व परिणामाची भीती बाळगण्याला त्यात वावच नव्हता. ते कार्य हेच एकमेव उद्दिष्ट ठरवून स्वत:चा विचार त्यापूढे कधी आणला नाही.

त्यांचे कार्य पूर्ण झाले याचा अर्थ त्यांनी आपले ऐहिक घर सोडून आपल्या स्वर्गीय निवासस्थानाकडे जाण्याची वेळ येऊन ठेपली, असा झाला. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी ते स्पष्टपणे पाहिले म्हणून त्यांनी आपला अधिकांश वेळ त्या प्रवासाची तयारी करण्यात घालविला कारण ते लवकरच निघणार होते.

हजयात्रेचा महिना जवळ आला होता आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्या संधीचा लाभ घेण्याचे ठरविले. काबागृह पूर्णत: स्वच्छ व शुद्ध करण्यात आले होते आणि कसल्याही मूर्तीचे किंवा त्यांच्या नेत्यांना उपद्रव होणारा कसलाही मूर्तिपूजनाचा विधी शिल्लक राहिला नव्हता. ते यात्रेसाठी निघाले. या यात्रेला 'निरोप यात्रा' असे संबोधले जाते कारण त्यांनी केलेली ती शेवटची यात्रा होती. अरबस्तानच्या सर्व भागात संदेश देण्यासाठी माणसे पाठविण्यात आली आणि त्या महान यात्रेत सहभागी होण्यासाठी लोकांना निमंत्रणे पाठविण्यात आली. त्यांनी थेट ज्ञानी व्हावे यासाठी त्यांना निमंत्रण देणे गरजेचे होते. त्या सर्व विधीमध्ये अज्ञान काळातील प्रथांचा लवलेशही नव्हता आणि निरंतर काळासाठी ती पद्धत तिच्या निष्ठायुक्त वैभवानिशी टिकवून ठेवायची होती.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जिल्हज महिन्याच्या पाच दिवस आधी यात्रेचा पेहराव अंगावर घातला आणि आपल्याबरोबर एक लाख चौदा हजार मुस्लिमांना घेऊन ते मक्केकडे जाण्यासाठी निघाले. त्यांच्या सर्व पत्नी त्यांच्याबरोबर होत्या. स्वार होऊन जात असताना ते ''लब्बैक! लब्बैक!'' असा उद्‍घोष करीत होते. त्याचा अर्थ ''मी येथे आहे, तुझ्या सेवार्थ, मी येथे आहे, हे अल्लाह! तुझा कोणीही सहभागी नाही. ही घोषणा

करण्यासाठी मी येथे आहे. सर्व स्तुती आणि अनुग्रह तुझ्याचसाठी आहे. तुझेच एकूण सार्वभौमत्व आहे, तुझ्या सेवेसाठी मी येथे आहे, तुझा कोणीही वाटेकरी नाही, हे अल्लाह!'' पैगंबर मुहम्मद (स.) यांनी असा उद्‌घोष करताना त्यांचे सर्व सोबतीही मोठ्याने तसा उद्‌घोष करीत होते.

मानसशास्त्रज्ञ ज्याला जमावाच्या मानसिकतेचा उद्रेक असे म्हणतात, त्याचे रूपांतर गंभीर आध्यात्मिक अभिव्यक्तीमध्ये झाले होते. या इस्लामी विधीमध्ये अद्‌भूत पावित्र्य होते, ज्यामुळे ईशप्रेमाच्या उत्तुंग उंचीवर माणसाला ते घेऊन जाते, त्या थोर धन्याबद्दल गाढ निष्ठा आणि भाव असतो. तेथे राव आणि रंकात कसलाही भेदभाव दिसून येत नाही. जेथे सर्व माणसे बांधव होऊन आपल्या स्वामीचा आदर-सन्मान करण्यासाठी गोळा होतात.

पैगंबर मुहम्मद (स.) मक्केला जिल्हज महिन्याच्या सात तारखेला जाऊन पोहोचले. त्यांनी पवित्र काबागृहाला सात प्रदक्षिणा घातल्या. इब्राहीम (अ.) यांच्या स्थळापाशी दोन 'रकआत नमाज' अदा केली. मग ते 'सफा'च्या टेकडीवर चढले आणि तेथून त्यांनी घोषणा केली,

''अल्लाहखेरीज अन्य कोणीही ईश्वर नाही. त्याचा कोणीही सहभागी नाही. सर्व सार्वभौमत्व व स्तुती केवळ त्याचीच आहे. तोच जीवन देतो, तसेच मरणही देतो. तो सर्व वस्तूंवर सर्वोच्च प्रभावशाली व सर्वसमर्थ आहे. त्याने त्याच्या वचनाची पूर्तता केली. त्याने त्याच्या दासाला सहाय्य केले आणि त्यानेच एकट्याने नाकारणाऱ्या काफिरांची सर्व शक्ती चिरडून टाकली.''

दरम्यानच्या कालावधीत येमेनच्या यात्रेकरूंसह माननीय अली (रजि.) पैगंबर मुहम्मद (स.) यांना येऊन मिळाले.

जिल्हजच्या आठ तारखेला पैगंबर मुहम्मद (स.) आपल्या सोबत्यांना बरोबर घेऊन 'मिना' या स्थळाकडे गेले. सबंध रात्र त्यांनी तेथेच घालविली आणि नऊ तारखेला, सकाळच्या प्रार्थनेनंतर ते 'अरफात' या ठिकाणी गेले आणि तेथे खालील नामंकित भाषण केले.

''सर्व स्तुती अल्लाहची असो. आम्ही त्याचा गौरव करतो आणि त्याच्याच साहाय्याची व क्षमेची याचना करतो आणि आम्ही त्याच्या सन्मुख आहोत. आम्ही स्वत:तील वाईट गोष्टींपासून अल्लाहचा आश्रय घेतो, तसेच आमच्या कृत्यांचा वाईट परिणामांपासून त्याचाच आश्रय घेतो. ज्याला अल्लाह योग्य मार्गावर नेतो, त्याला मार्गभ्रष्ट



करणारा कोणीही नाही आणि ज्याला अल्लाह मार्गभ्रष्टतेत टाकतो, त्याला योग्य मार्गावर आणणारा कोणी नाही. मी ग्वाही देतो की अन्य कोणीही ईश्वर नसून केवळ अल्लाहच आहे. त्याचा सहभागी अगर वाटेकरी नाही आणि मी अशीही ग्वाही देतो की मुहम्मद त्याचे दास आणि त्याचे पैगंबर आहेत. मी तुम्हाला ताकीद देतो, हे अल्लाहच्या दासांनो! तुम्ही अल्लाहचे भय बाळगा, त्याचे आज्ञापालन करा असा मी आग्रह करतो आणि जे सत्य आहे, चांगले आहे त्याच्यासह मी माझ्या भाषणाचा आरंभ करतो.

''तुम्ही लोकांनो! माझे शब्द लक्षपूर्वक ऐका. मी तुम्हाला एक संदेश देत आहे, कारण या वर्षानंतर मी तुमच्यामध्ये पुन्हा असेन की नाही, हे मला ठाऊक नाही. हे लोकहो! तुम्ही तुमच्या स्वामीसमक्ष हजर होण्याच्या काळापर्यंत तुमचे रक्त, तुमची मालमत्ता आणि तुमची अब्रू पवित्र आहे आणि अभंग आहे. आजच्या दिवसाइतके आणि महिन्याइतकेच ते सर्वांसाठी पवित्र आहे. खचितपणे तुमच्या स्वामीला तुम्ही भेटाल आणि तुमच्या कृत्यांबद्दल तुम्ही उत्तरदायी असाल. मी तुम्हाला संदेश पोहोचविला आहे, नाही काय? हे अल्लाह तू साक्ष राहा.

''ज्या कोणाकडे विश्वस्त म्हणून काही ठेवलेले असेल, ते त्याने ठेवीदाराला परत करावे. सावध राहा. जो अपराध करील, त्याच्याखेरीज अन्य कोणावरही त्या अपराधाची जबाबदारी नाही. पित्याच्या अपराधासाठी त्याचा मुलगा जबाबदार नाही, तसेच मुलाच्या गुन्ह्यासाठी त्याचा बाप जबाबदार नाही.

''हे लोकांनो! माझे शब्द नीट ऐका आणि ते नीट समजून घ्या. तुम्हाला हे ठाऊक असायला पाहिजे की एक मुस्लिम दुसऱ्या मुस्लिमांचा भाऊ आहे आणि त्या सर्वांचा मिळून एक बंधुसमाज बनतो. एका मुस्लिमाने स्वखुषीने जे दिले त्याखेरीज त्याचे काहीही घेणे, हे कोणाही मुस्लिमाला कायदेशीर नाही. म्हणून तुम्ही एकमेकांवर जुलूम करता कामा नये. हे अल्लाह! मी संदेश पोचता केला नाही का? पाहा! सर्व अनेकेश्वरवादी रूढी व अज्ञान काळातील रिवाज व परंपरा माझ्या टाचेखाली आहेत. अज्ञान काळातील रक्ताचा सूड उगविण्याचे दिवस क्षमा करून सूट दिली गेली आहे. रक्ताचा बदला घेण्याच्या पहिल्या प्रकरणात मी सूट देऊन तो हक्क संपवितो, ते प्रकरण इब्न रबियाह इब्न हारिसचे आहे. 'साद'च्या कबिल्यात त्यांचे संगोपन व पालनपोषण झाले आणि हुजैल याने त्यांना ठार केले होते.

''व्याज घेण्याची सक्त मनाई आहे, परंतु तुमची मुद्दल वसूल करण्याचा तुम्हाला अधिकार आहे. तुम्ही कोणावर अन्याय करू नका. तुमच्यावरही अन्याय केला जाणार नाही. अल्लाहने हुकूम दिला आहे की व्याजाचा व्यवहार नसावा. मी त्या हुकुमाच्या

पालनाची सुरुवात करतो आणि अब्बास बिन अब्दुल मुत्तलिब यांना येणे असलेली व्याजाची रक्कम सोडून देतो. खचितपणे पूर्ण रक्कमच सोडून देण्यात आली आहे.

''हे लोकांनो! पत्नीच्या संदर्भात अल्लाहचे भय बाळगा. खचितच अल्लाहच्या हमीवरच तुम्ही तिचा हात हातात घेतला आणि अल्लाहच्या शब्दाच्या आधारावरच त्यांचे शरीर तुम्हाला वैध ठरविले. खचितच तुमच्या पत्नीवर तुमचे काही अधिकार आहेत आणि तुमच्या पत्नीचे तुम्हावर काही अधिकार आहेत. वैवाहिक अधिकारांचा आदर राखणे हे त्यांचे अवश्य कर्तव्य आहे.

''अनुचित कृत्यें न करणे त्यांचे कर्तव्य आहे. जर त्यांनी ते केले तर शिक्षा करण्याचा तुम्हाला अधिकार आहे, तरी ती कठोर असू नये. अनुचित कृत्यांपासून तुमची पत्नी अलिप्त झाली आणि तुमच्याशी एकनिष्ठ राहिली तर त्यांच्या कपड्यालत्याची व त्यांच्या खाण्यापिण्याची उचित व्यवस्था करा. पाहा! पत्नींना आदेश द्या, पण ते कृपेने व मायेने द्या. हे लोकांनो! मारझोड झालेला व विद्रूप करण्यात आलेला ॲबिसीनियातील एखादा गुलाम जर तुमचा 'अमीर' (नेता) बनला आणि अल्लाहचा ग्रंथ (त्यातील आदेश) त्याने अमलात आणले तर त्याचे म्हणणे ऐका व त्याच्या आज्ञांचे पालन करा.

''हे लोकहो! प्रत्येक माणसाला वारसाहक्काचा वाटा असावा असा अल्लाहने हुकूम दिला आहे. जन्मलेले मूल हे विवाह-शय्येचे असेल आणि विवाह बंधनाचे उल्लंघन करणारावर धोंडमार केली जाईल. जो आपल्या कुलपरंपरेचा संबंध पित्याखेरीज इतरांकडे लावतो किंवा आपल्या धन्याला सोडून इतरांकडे आश्रयाचा संबंध जो जोडतो त्याच्यावर अल्लाहचा, त्यांच्या फरिश्त्यांचा आणि लोकांचा धिक्कार असो. अल्लाह त्याच्या पश्चात्तापाचा अगर त्याच्या नेकीचा स्वीकार करणार नाही.

''हे लोकांनो! खचितच सैतान निराश झाला आहे की तुमच्या या देशात त्याची पूजा कधीही होणार नाही. परंतु तुम्हाला किरकोळ व क्षुल्लक वाटणाऱ्या पण पूजेचा समावेश नसलेल्या बाबतीत त्याचे आज्ञापालन केले जाण्यात त्याला आनंद वाटेल, म्हणून धर्माच्या बाबतीत त्याच्यापासून सावध राहा.

''खचितपणे, माझ्या मागे अल्लाहचा ग्रंथ आणि त्याच्या पैगंबराची सुन्नाह तुम्हाकडे सोडून जात आहे. ते जर तुम्ही मजबुतीने धरून राहिलात, तर तुम्ही मार्ग सोडून कधीही भरकटणार नाही.

''आणि तुम्हाला माझ्याबद्दल विचारण्यात आले, तर तुम्ही काय सांगाल?''

लोकांनी उत्तर दिले,



''आम्ही ग्वाही देतो की तुम्ही ईशसंदेश आम्हापर्यंत पोहोचविला आणि तुम्ही तुमचे धर्मकार्य पुरे केले.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी शुक्रवारच्या दिवशीही त्या जमावाला उद्देशून प्रवचन दिले. जिलहिज्जा महिन्याची ती दहावी तारीख होती आणि आधीच्या भाषणातील काही महत्त्वाच्या मुद्यांचा पुनरूच्चार करीत काही नव्या बाबींवरही त्यांनी बराच प्रकाश टाकला.

नेहमीप्रमाणे अल्लाहच्या स्तुतीस्तवनाने आणि त्याचे आभार प्रदर्शित करीत त्यांनी आपल्या प्रवचनाचा आरंभ केला.

''हे लोक हो! (प्रतिबंध केलेला महिना) अधिक दिवस मध्ये घुसडणे, खचितपणे अश्रद्धा अधिक वाढविते. त्यामुळे नाकारणाऱ्या लोकांना चुकीच्या मार्गाने नेले जाते. त्याच्यामुळे ते एक वर्ष कायदेशीर मानतात आणि दुसऱ्या वर्षी (महिन्यांचा) मेळ घालण्यासाठी मनाई करतात आणि अल्लाहने तसे करण्याला बेकायदेशीर घोषित केले आहे. म्हणून उल्लाहने उल्लंघनीय नाही असे जे ठरविले आहे, त्याचे ते उल्लंघन करतात. तसेच अल्लाहने ज्या गोष्टीला उल्लंघनीय केले तिला उल्लंघनीय नसल्याचे ठरवितात.

''खचितच पृथ्वी आणि आकाश निर्माण केलेल्या दिवसापासून काळाने ते प्रश्न आपल्या पद्धतीने सोडविले आहे. अल्लाहसाठी महिन्यांची संख्या बारा असून त्यापैकी चार महिने पवित्र आहेत. तीन पवित्र महिने लागोपाठ आहेत, जिल्काद, जिल्हज आणि मुहर्रम व चौथा पवित्र महिना रज्जब हा जमादिल आखर व शाबान या महिन्यांचा दरम्यान आहे.

''हे लोक हो! आज कोणता दिवस आहे, कोणता महिना आहे आणि हा कोणता प्रदेश आहे, ते तुम्हाला ठाऊक आहे?''

याच्या उत्तरादाखल लोकांनी सांगितले,

''आज बलिदान करण्याचा (कुर्बानीचा) दिवस आहे, हा पवित्र महिना आहे आणि हा प्रदेशही पवित्र भूप्रदेश आहे.''

प्रत्येक उत्तरावर पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले,

''म्हणून मी तुम्हाला जाणीव करून देतो की तुमचे प्राण, तुमची मालमत्ता आणि तुमची अब्रू एकमेकांससाठी, या पवित्र दिवसाप्रमाणे, या पवित्र महिन्यात आणि या पवित्र शहरात पवित्र असायला पाहिजे.

''आणि तुमचे गुलाम! तुम्ही स्वत:जे खात असाल तेच त्यांनाही खाऊ घालाल

असे पाहा. तुम्ही जसे कपडे वापराल तसेच त्यांनाही वापरायला द्या. जर त्यांच्या हातून चूक झाली आणि ती माफ करण्याचा तुमचा कल नसेल तर त्यांना मुक्त करून टाका. कारण ते अल्लाहचे दास आहेत आणि त्यांना शिक्षा देता येत नाही.

''पाहा. नीट लक्ष देऊन ऐका. तुमच्या स्वामीची उपासना करा. दिवसात पाच वेळा नमाज अदा करा. रमजानच्या महिन्यात उपवास करा. काबागृहाची यात्रा करा. तुमच्या मालमत्तेवर 'जकात' तत्परतेने द्या आणि मी जे काही आदेश देतो, त्यांचे पालन करा. असे झाले तरच तुम्हाला स्वर्गात प्रवेश मिळेल.

''जे येथे उपस्थित आहेत, त्यांनी अनुपस्थितांपर्यंत हा संदेश पोहचवावा. कारण ज्यांना हा संदेश पोहोचविला जाईल, त्यांच्यापैकी बरेच जण, या श्रोत्यांपेक्षा अधिक सावध असतील, ही समाधानाची गोष्ट आहे.''

दुसऱ्या दिवशी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आदल्या दिवसाच्या आपल्या भाषणाचा धागा पकडला आणि म्हणाले,

''लोकहो, आम्ही तुम्हाला एका पुरुष व एका स्त्रीपासून निर्माण केले आणि मग तुमची राष्ट्रे आणि वंश बनविले जेणेकरून तुम्ही एकमेकांना ओळखावे. वास्तविकत: अल्लाहजवळ तुमच्यापैकी सर्वात जास्त प्रतिष्ठित तो आहे जो तुमच्यापैकी सर्वात जास्त ईशपरायण आहे. निश्चितच अल्लाह सर्वकाही जाणणारा आणि खबर राखणारा आहे.''

(दिव्य कुरआन, ४९ : १३)

''पाहा, तुम्हापैकी जवळ असणाऱ्यांनी दूरवर असणाऱ्यांना हा संदेश पोहोचवावा. मी संदेश तुम्हाला पोहचविला आहे.''

मग आकाशाकडे पाहात ते म्हणाले,

''हे अल्लाह! मी संदेश पोचता केला आहे आणि माझे धर्मकार्य पुरे केले आहे.''

''होय!'' सर्व लोकांनी त्यांच्याभोवती गर्दी करीत म्हटले, ''खचितच तुम्ही संदेश पोहोचविला आहे.''

''हे अल्लाह! मी विनवणी करतो की यावर तू साक्ष राहा.'' असे उद्‌गार काढीत पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपले भाषण संपविले.

पैगंबर मुहम्मद (स.) आपल्या उंटावरून खाली उतरले आणि त्यांनतर दुपारची आणि तिसऱ्या प्रहरीची नमाज एकत्रित अदा केली. या वेळेला धर्म परिपूर्ण केल्याचे आयत त्यांच्यावर अवतरली,



''आज रोजी मी तुमचा धर्म तुमच्याकरिता परिपूर्ण केला आहे आणि आपली कृपा तुम्हावर परिपूर्ण केली आहे आणि तुमच्यासाठी इस्लाम तुमचा धर्म म्हणून संमत केला आहे.'' (दिव्य कुरआन, ५ : ३)

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी या आयतीचे ताबडतोब पठन करून जे तेथे उपस्थित होते त्या सर्वांना ऐकविले. हे वर्तमान ऐकून सर्व मुस्लिमांना मोठा आनंद झाला, पण अबू बकर (रजि.) कष्टी झाले कारण पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपला इहलोकीय निवास सोडून त्याच्या चिरंतन निवास्थानाकडे प्रयाण करण्याचा तो स्पष्ट संकेत असल्याचे त्यांनी जाणले. माननीय अबू बकर (रजि.) यांनी हे अचूक ताडले होते की धार्मिक सत्य परिपूर्ण करण्यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांना उभारले गेले होते. निर्णायकपणे पैगंबर मुहम्मद (स.) यांचे संदेश पोहोचविण्याचे कार्य पूर्णत:पार पाडले गेले होते. यातून असा अर्थ निघतो की या पृथ्वीतलावर त्यांच्या दैहिक अस्तित्वाची गरज उरली नाही आणि त्यांच्या स्वर्गीय निवासस्थानात विश्रांती घेण्यास जाण्याची त्यांची वेळ आली आहे जी ऐहिक जीवनातील चिंतेपासून पूर्णपणे मुक्त असेल.

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे शेवटचे व निरोपाचे भाषण केवळ वक्तृत्वपूर्ण होते, इतकेच नसून ते अखिल मानवजातीला दिलेल्या उदात्त व भव्य संदेशासाठीही उल्लेखनीय आहे. त्यात सांगितल्या गेलेल्या नितितत्त्वापेक्षा अधिक चांगली तत्त्वे पुढे मांडणे, आजपर्यंत जगाला शक्य झालेले नाही. त्यातील प्रत्येक शब्दात भव्यता भरलेली आहे. त्यांचे लक्ष्य धार्मिकता व नेकी प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट आहे. मुस्लिमांमध्ये भौगोलिक, वांशिक आणि वर्णांची वेगवेगळी पार्श्वभूमी असतानाही त्यांच्यामध्ये बंधुभाव निर्माण केला आणि त्यांच्यावर शेवटचा हात फिरवून अन्याय व अत्याचारापासून पूर्णपणे अलिप्त अशी समाजव्यवस्था प्रस्थापित केली.

मदीनेच्या तुकडीला घरी परतण्यापूर्वी सुधारणा करण्यासाठी तीन दिवसांची परवानगी देण्यात आली. वातावरण अत्यंत खेळीमेळीचे आणि सौहार्द्रपूर्ण होते आणि मागील यात्रा-भेटीपेक्षा अगदी वेगळे होते. नातलग नातलगांमध्ये भेटले आणि मित्रांनी मित्रांना ओळखले. अशा भेटींच्या वेळी त्यांची दृष्टी लपविलेल्या तलवारीचा शोध घेत नव्हती. मेजवान्या देण्यात आल्या आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांची बंधुभावाची शिकवण प्रत्यक्षात आचरणात आणली गेली. अबू जहलच्या आणि अबू लहबच्या काळातील मेजवान्यांच्या सोहळ्याइतक्या या मेजवान्या चैनीच्या व विलासाच्या नव्हत्या, परंतु त्या अधिक मोकळ्या मनाने व प्रांजलपणाने दिलेल्या होत्या.

पैगंबर मुहम्मद (स.) खूष होते. त्यांचे चित्त शांत होते. त्यांनी यात्रा पूर्ण केली होती

आणि धार्मिक आचरणाची एका आदर्श स्वरूपात प्रस्थापना केली होती. ते स्वरूप अनेकेश्वरत्वाच्या दूषणांपासून व कलंकापासून पूर्णपणे स्वच्छ होते. त्यांनी दिलेल्या संदेशात इस्लामच्या मूलतत्त्वांचा व इस्लामचे ध्वजधारक असणाऱ्या मुस्लिमांवर येऊन पडणाऱ्या जबाबदाऱ्यांचा सारांश, अतिशय सुरेख रीतीने दिला गेला आहे.

इब्ने हिशाम लिहितो,

''पैगंबर मुहम्मद (स.) यांनी हज यात्रा पूर्ण केली आणि लोकांना त्याचा विधी आणि सोहळा दाखवून दिला ज्या अगदी अनिवार्य आहेत आणि हज यात्रेसाठी जे विधी अल्लाहने अनिवार्य केले आहेत, ते सर्व दाखवून दिले. काबागृहाचे स्थान, खडे मारणे, काबागृहाला प्रदक्षिणा घालणे आणि अल्लाहने कशाची परवानगी दिली आहे आणि कशाची मनाई केली आहे, ते सर्व दाखवून दिले. ती संदेशांची व घोषणांची यात्रा होती, कारण त्यांच्या हयातीत पैगंबर मुहम्मद (स.) यांनी केलेली ती शेवटची यात्रा होती.''

या निरोपाच्या यात्रेनंतर जमाव पांगला व मदीनेला आला. परतीच्या प्रवासात घराकडे येताना लोकांच्या बरोबर पैगंबर मुहम्मद (स.) ही होते आणि जिल्हज महिन्याच्या अखेरीस मदीनेला पोहोचले.

लवकरच आपणाला स्वर्गीय निवासाकडे बोलावणे येणार आहे, याची त्यांना नि:संशयपणे जाणीव झाली होती. परंतु ते विमनस्क अगर भयभीत झाले नव्हते. अल्लाहने त्यांच्यावर फार मोठी जबाबदारी टाकली होती आणि म्हणून त्यांच्या पवित्र जीवनाचा प्रत्येक क्षण धर्मकार्यासाठीच लावण्याची त्यांना मोठी चिंता होती. शीघ्रतेने येत असलेल्या मरणाच्या कल्पनेने हवालदील झाले नाहीत, उलट त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या कार्यावर शेवटचा हात फिरावेण्यासाठी त्यांना प्रोत्साहनच उपलब्ध करून दिले, जेणेकरून स्वर्गात आपल्या स्वामीसमक्ष हजर होण्यापूर्वी कोणतेही कार्य, अपुरे राहू नये वा करण्याचे राहू नये.

## हजयात्रेनंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हालचाली

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्या जीवनाच्या शेवटच्या वर्षाचा अधिकांश भाग मदीनेतच काढला. त्यांनी प्रांतांची उत्तम व्यवस्था केली आणि ज्यांनी इस्लाम धर्म स्वीकारला होता, ते मुस्लिम राज्याचे घटक भाग बनले. त्या प्रांताकडे आणि विविध टोळ्यांकडे अधिकारी पाठविण्यात आले. लोकांना इस्लामी मूलतत्त्वांची शिकवण देणे, इस्लामी आचारपद्धत शिकविणे, कुरआन आणि सुन्नाहनुसार न्यायदान करणे आणि 'जकात' गोळा करणे, वगैरे कामे त्यांना सोपविली गेली होती.



अरब लोकांनी तर इस्लाम धर्म स्वीकारला आहे, पण सीरिया, इजिप्त आणि ॲबिसीनियाचे काय, असा त्यांच्या मनांत विचार आला. त्या देशांनी आणि वास्तविकपणे संपूर्ण जगाने इस्लामचा संदेश वाचायला पाहिजे. त्या देशांनाही धर्मप्रचारक पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली.

## आजार

आतापर्यंत पैगंबर मुहम्मद (स.) यांची तब्बेत चांगली होती. त्यांनी त्यांची कार्ये मोठ्या तडफेने व उत्साहाने केली होती. नमाजमध्ये नेतृत्व केले, पत्रे व वस्तू पाठविणे, गव्हर्नरांची नेमणूक करणे, संपूर्ण अरबस्तानाची शासनव्यवस्था पाहणे इत्यादी कामे ते करीत. परंतु हिजरी सन ११च्या 'सफर' महिन्यात मक्केहून परत आल्यानंतर ते आजारी पडले. खैबरमध्ये एका यहुदी महिलेने त्यांना नकळत विष घातले होते आणि ते अतिशय मंद गतीने त्यांच्या शरीरात भिनले होते व त्याचे परिणाम दिसून येऊ लागले होते. त्यांची प्रकृती अत्यंत झपाट्याने खालावत गेली.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मक्केच्या लोकांचा तर निरोप घेतला होता, पण उहूदच्या लढाईत ठार झालेल्या शहीदांच्यासाठी त्यांनी प्रार्थना केली नव्हती. म्हणून त्यांच्या कबरींच्या दिशेने त्यांनी आपली पावले वळविली. आपल्या शूर आणि विश्वासू सोबत्यांचा कबरीपाशी उभे राहून त्यांनी इतक्या तळमळीने आणि प्रांजळपणे प्रार्थना केली की यांना दफन करून आठ वर्षे लोटली होती तरी पाहणाऱ्याला असे वाटावे की नुकतेच मरण पावलेला माणूस जिवंत असणाऱ्यांचा निरोप घेत आहे.

नंतर ते धर्मोपदेश देण्याच्या मंचाकडे गेले व म्हणाले,

''मी तुम्हाला अग्रेसर होणार आहे आणि मला तुमचा साक्षीदार करण्यात आले आहे. अल्लाहची शपथ! तुम्ही लवकरच मला कौसरच्या हौदावर भेटाल. माझ्यापाशी ऐहिक खजिन्याच्या किल्ल्या देण्यात आल्या आहे. अल्लाह शपथ, माझ्या पश्चात तुम्ही अनेकेश्वरवादी होण्याची भीती मला वाटत नाही परंतु मला अशी साधार भीती वाटते की, तुम्ही ऐहिक धनसंपत्ती प्राप्त करण्यासाठी एकमेकांचे गळे कापू लागाल.''

सफर महिन्याच्या अठरा तारखेला मध्यरात्री ते 'बकी अल्-घरकाद' येथे गेले व मृतांसाठी त्यांनी प्रार्थना केली. नंतर त्यांची पत्नी मैमुना (रजि.) यांच्या खोलीत ते गेले. ताप भयंकर चढला आणि वेदना वाढल्या. परंतु तो सर्व त्रास त्यांनी उल्लेखनीय शांत चित्ताने व प्रसन्नतेने सोसला. प्रकृतीने साथ दिली तोवर प्रार्थनेत त्यांनी नेतृत्व केले होते, पण आता त्यांची तब्बेत अत्यंत ढासळल्याने, ते कार्य आता ते करू शकत नव्हते. एके

दिवशी खोलीतून बाहेर पडण्याआधी त्यांच्या डोक्यावर पाणी ओतावे लागले तसेच डोकेदुखी थांबण्यासाठी त्यांचे डोके रूमालाने घट्ट बांधण्यात आले होते. त्यांनी त्यांच्या पत्नींना बोलाविले आणि म्हटले,

''मी फार आजारी झालो आहे, हे तुम्हाला दिसते. म्हणून आळीपाळीने मी तुम्हाला भेटायला येऊ शकत नाही. तुम्हाला पसंत असल्यास, माननीय आएशा (रजि.)च्या घरी राहण्याची मला परवानगी द्यावी.''

त्या सर्वजणींनी ते मान्य केले आणि पैगंबर मुहम्मद (स.), अली (रजि.) व अब्बास यांचा आधार घेत माननीय आएशा (रजि.) यांच्या खोलीपर्यंत चालत गेले.

आजाराच्या कालावधीत नमाजसाठी नेतृत्व करण्याची माननीय अबू बकर (रजि.) यांना माननीय मुहम्मद (स.) यांनी आज्ञा दिली. माननीय आएशा (रजि.) यांनी सूचित केले की त्यांच्या पित्याला त्या जबाबदारीतून मुक्त करावे कारण त्यांचे अंत:करण अत्यंत कोमल व संवेदनशील आहे आणि पवित्र कुरआनचे पठन करताना त्यांच्या डोळ्यांतून आसवे गळू लागतील. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांनीच त्यांच्याऐवजी नेतृत्व करीत राहावे असा आग्रह धरला. म्हणून माननीय अबू बकर (रजि.) यांना नेतृत्व करीत राहण्याला दुसरा पर्यायच नव्हता.

## अखेरच्या सूचना

गुरूवारी पुन्हा डोक्यावर पाणी ओतण्यात त्यांनी त्यांच्या कुटुंबियांना सांगितले. स्नानामुळे ताजेतवाने वाटून माननीय अली (रजि.) यांचा व माननीय अब्बास (रजि.) यांचा आधार घेत ते पुन्हा मस्जिदकडे गेले. दुपारच्या प्राथनेसाठी ते गेले होते. प्रार्थना संपल्यावर ते व्यासपीठावर बसले आणि सभोवताली असलेल्या लोकांना उद्देशून भाषण केले,

''एक दास आहे आणि त्याच्या स्वामीने त्याला या जीवनात आणि स्वामीच्या निकट असलेल्या जीवनात निवड करण्याचा पर्याय दिला आहे आणि त्या दासाने दुसरा पर्याय निवडला आहे.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या म्हणण्याचा अर्थ माननीय अबू बकर (रजि.) खेरीज मस्जिदमधील अन्य कोणाच्याही लक्षात आला नाही आणि लवकरच पैगंबर मुहम्मद (स.) आपल्यामध्ये असणार नाहीत, या विचाराने त्यांचे डोळे आसवांनी डबडबले.

अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) पुढे म्हणाले,

''अढळ विश्वास, निष्ठा आणि धनसंपत्तीचे बलिदान या बाबतीत माननीय अबू



बकर (रजि.) पेक्षा अधिक उदार माणूस आपल्यात नाही. मला जिवलग मित्र निवडायला जर सांगितले, तर मी त्यांची निवड करीन. परंतु इस्लामने आपणा सर्वांमध्ये निकटचा बंधुभाव निर्माण केला आहे.

''वास्तवता अशी आहे की तुमचा सोबती, हा अल्लाहचा मित्र आहे. अबू बकर (रजि.) यांच्या दरवाज्याखेरीज मस्जिदमध्ये येण्याचे सर्वच दरवाजे बंद करा.

''हे लोकांनो! तुमच्या पैगंबरांकडे येत असलेल्या मृत्यूमुळे तुम्ही भयभीत झाला आहात, तो माझ्यापर्यंत आला आहे. पूर्वीचा कोणी पैगंबर, ज्या लोकाकडे त्याला पाठविण्यात आले होते, त्यांच्यामध्ये निरंतरपणे जिवंत राहिला आहे काय? म्हणून मीही तुमच्यात कायम राहीन असा विचार करू नका.

''पाहा. मी लवकरच माझ्या स्वामीच्या भेटीस जाणार आहे. तुम्हीही लवकर किंवा उशिरा जाणाराच आहात. मी तुम्हाला सूचना देतो की पहिल्यांदा स्थलांतर केलेल्यांशी सद्‌व्यवहार करावा आणि मी स्थलांतरितांना अशी शिफारस करतो की त्यांनी एकमेकांत भलेपणाने राहावे. अल्लाह म्हणतो,

''काळाची शपथ,मानव वस्तुत: तोट्यात आहे, त्या लोकांखेरीज ज्यांनी श्रद्धा ठेवली आणि सत्कर्मे करीत राहिले. आणि एकमेकांना सत्याचा उपदेश आणि संयमाचा आदेश देत राहिले.'' (दिव्य कुरआन, १०३ : १-३)

''खचितपणे सर्व गोष्टी इच्छेप्रमाणे घडत असतात. मागणी पुरी होण्यात विलंब लागला तरी मागणी करताना तुम्ही अधिर होऊ नका. कोणाच्याही गडबडीमुळे सर्वसमर्थ व महान अल्लाह अंकीत होत नाही. जो अल्लाहशी वैर करतो, त्यावर अल्लाह मात देतो. जो अल्लाहला फसविण्याचे कृत्य करतो, त्याला अल्लाह चकित करून सोडतो. नजिकच्या भविष्यकाळात जगाची सत्ता जर तुमच्या हाती आली तर धरणीवर खोडसाळपणा पसरवू नका आणि तुमची रक्ताची नाती तोडू नका. मदतनीस लोकांशी (अन्सार) चांगले वागा, अशी तुम्हाला सूचना देतो. ते असे लोक आहेत ज्यांनी धर्माच्या वृद्धीसाठी व प्रसारासाठी सवलती उपलब्ध करून दिल्या. म्हणून तुम्ही त्यांच्याशी चांगली वर्तणूक ठेवा. त्यांनी त्यांच्या घरामध्ये तुम्हाला आश्रय दिला नाही काय? स्वत:ते दारिद्र्याला तोंड देत होते.

''इमान धारण करणाऱ्यांची संख्या वाढत जाईल, पण अन्सार लोक कमी होत जातील, ती इतकी की अन्नामध्ये मिठाचे जे प्रमाण असते, तसे त्यांचे होईल, ते माझे परिवार आहेत आणि त्यांच्यामध्येच आश्रय मिळाला.

"ज्याच्या हाती माझे प्राण आहेत, त्याची शपथ! माझे प्रेम तुम्हावर खचितच आहे. मदतनीस लोकांनी, त्यांच्यावर येऊन पडलेली जबाबदारी प्रशंसनीय रीतीने पार पाडली आणि आता तुम्ही जे करायचे आहे, ते उरले आहे.

"म्हणून तुम्हांपैकी ज्याला जबाबदारीचे उच्च पद मिळेल आणि ज्याच्यापाशी लोकांना हानी पोहोचविण्याचे किंवा त्यांचे कल्याण करण्याचे सामर्थ्य येईल, त्यांनी त्या उपकारकर्त्यांची मेहरबानी पूर्णत: मान्य करावी आणि तिची कदर करावी आणि त्यांच्या त्रुटीकडे व चुकांकडे डोळेझाक करावी.

"खचितपणे दुसऱ्यावर स्वत:ला कधीही प्राधान्य देऊ नका.

"सावध राहा, उद्या कौसर हौदावर माझ्यापाशी येण्याची ज्यांना चिंता असेल, त्यांनी त्यांच्या जिभेवर आणि त्यांच्या हातांवर पूर्ण काबू ठेवावा. हे लोकांनो! खचितपणे पापकृत्ये माणसाला कृपेपासून वंचित करतात आणि त्यांच्या भाग्यात बदल घडवून आणतात. जेव्हा चांगले असतात, तेव्हा त्यांचे शासनकर्ते त्यांच्यावर जुलूम व अन्याय करतात.

"तुम्हांपैकी काही माणसांचे कदाचित मी काही देणे लागत असेन, कारण मी सुद्धा मनुष्यच आहे. मग असा कोणी माणूस असेल ज्याची प्रतिष्ठा माझ्या हातून दुखावली गेली, तर त्याने माझ्याकडून त्याची परतफेड करून घ्यावी, मी हा तयार आहे. माझ्या हातून कोणाच्या कातडीलाही खरचटले असेल, तर त्याचा बदला देण्यास माझी कातडी तयार आहे. मी कोणाची काही वस्तू देणे असेल, तर माझी मालमत्ता त्याच्या भरपाईसाठी तयार आहे. त्याने त्यातील वस्तू घ्यावी.

"जाणून असा, की तुम्हांपैकी सर्वाधिक निष्ठावान व विश्वासू माझ्या दृष्टीने तो माणूस आहे, ज्याचे मी काही देणे लागत असल्यास त्याने एकतर माझ्याकडून त्याची परतफेड करून घ्यावी किंवा ती त्याने सोडून देऊन मला ऋणमुक्त करावे जेणेकरून मी ऋणमुक्त होऊन माझ्या स्वामीसमोर जाईन. असे कोणीही म्हणता कामा नये, अल्लाहाचे पैगंबर मुहम्मद (स.) बद्दल माझी काही तक्रार आहे अगर शत्रूत्व आहे. कोणाबद्दलही माझ्या मनात कसलीही तक्रार मी जोपासून नाही. त्या गोष्टी माझ्या स्वभावाशी आणि प्रकृतीशी आनोळखी आहेत. मी त्यांच्यापासून दूर राहातो."

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कानावर काही लोकांची तक्रार व कुरकुर आली. सीरियावर पाठविण्यासाठी निर्धारित केलेल्या मोहीमेचा सेनापती म्हणून ओसामा याची नियुक्ती करण्यात आली होती, त्याबद्दल काही लोकांची तक्रार होती. त्यांनी संबंधित



लोकांना बोलावून घेतले आणि त्यांना उद्देशून खालील शब्दांत भाषण दिले.

"हे लोकांनो! मी उसामाची नियुक्ती सेनापती म्हणून केली, त्याविरूद्ध तुमच्यापैकी काही जणांची कुरकुर माझ्या कानी आली आहे, हे काय आहे? अमीर म्हणून मी उसामा याची नियुक्ती केली, याबद्दल तुम्ही टीका करत असाल (तर ती गोष्ट नवीन नाही). मी त्याचा पिता जैदला जेव्हा यापूर्वी 'अमीर' म्हणून नेमले होते तेव्हा त्या नियुक्तीवरही तुम्ही टीका केली होती. आणि मी स्वामीची शपथ देऊन सांगतो की ते खचितच त्या पदासाठी सर्वांपेक्षा अधिक पात्र होते आणि त्यांच्यानंतर त्यांचा मुलगाही त्या पदासाठी सर्वाधिक पात्रता बाळगतो. खरे तर उसामावर माझे फार मनापासून प्रेम आहे, जितके त्याच्या पित्यावर माझे अत्यंत प्रेम होते. त्या दोघांवरही माझे प्रेम आहे."

एके दिवशी, जेव्हा ते अनिश्चित व धोक्याच्या अवस्थेत असताना, त्यांच्या सभोवती असलेल्या सोबत्यांना ते म्हणाले, "इकडे या. मी काही सांगतो ते नीट लिहून ठेवा, जेणेकरून तुमच्या हातून कसली ही चूक घडू नये."

यावर उपस्थितीतांपैकी काहीजण म्हणाले, "अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांना तीव्र वेदना होत आहेत आणि आमच्यापाशी कुरआन आहे. अल्लाहचा ग्रंथ आमच्यासाठी पुरेसा आहे." तरीही बाकीच्या लोकांनी पैगंबर मुहम्मद (स.) म्हणतात ते लिहून घ्यावे असे म्हटले. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी लोकांना त्यावर वादविवाद करताना पाहिले, तेव्हा ते वैतागले आणि त्यांना निघून जाण्याची आणि त्यांना एकांतपणे राहू देण्याची आज्ञा दिली.

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे त्यांच्या हयात असलेल्या एकुलत्या एक मुलीवर फातिमा (रजि.) वर आतिशय प्रेम होते. आपल्या मरणोन्मुख पित्याला भेटण्यासाठी त्या वारंवार येत असत आणि त्यांचे आशीर्वाद व प्रेम घेत असत. अशाच एका प्रसंगी पैगंबर मुहम्मद (स.) त्यांच्या कानात काहीतरी कुजबुजले, तेव्हा त्या रडू लागल्या. नंतर पैगंबर मुहम्मद (स.) पुन्हा त्यांच्या कानात आणखी कुजबुजले, त्यावर त्या हसू लागल्या.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या निधनानंतर माननीय आएशा (रजि.) यांनी माननीय फातिमा (रजि.) यांना त्या रडण्याबद्दल आणि हसण्याबद्दल विचारणा केली.

फातिमा (रजि.) यांनी उत्तर दिले,

"पहिल्यावेळी ते आता आजारातून काही बरे होणार नाहीत, असे म्हणाले म्हणून मी रडले. दुसऱ्यावेळी ते म्हणाले की, पारलौकीक जीवनात त्यांची गाठभेट होणारी, कुटुंबियांपैकी मी पहिली असेन, तेव्हा मी हसले."

शनिवारी रात्री पैगंबर मुहम्मद (स.) यांची प्रकृती फारच बिघडली व तिने गंभीर स्वरूप धारण केले. ताप इतका चढला की, उष्णतेमुळे त्यांच्या शरीरावर हात ठेवला जाऊ शकत नव्हता. वेदनांनी त्यांचे शरीर फुटून निघत होते. तरीसुद्धा लोकांना सदाचाराकडे बोलविण्याचे त्यांचे कार्य चालूच होते. शेजारीच बसलेल्या महिलावर्गाकडे वळून ते म्हणाले,

''हे माझ्या मुली फातिमा! आणि माझ्या आत्या सफिया! तुमचा स्वामी ज्यामुळे प्रसन्न होईल, अशीच कृत्ये करीत राहा. कारण अल्लाहपुढे तुम्हाला वाचविण्याची मला कसल्याही प्रकारची सत्ता नाही.''

कमालीचा अशक्तपणा वाटू लागला असताना, आजाराच्या त्या गंभीर अवस्थेतही त्यांचे मन जागरूक व सावध होते व त्यांच्या भोवती जे काही चालले होते, याचे त्यांना चांगले भान होते. हद्दपार होऊन ॲबिसीनियामध्ये राहून आलेल्या काही महिला तेथील मेरीच्या एका चर्चचे आणि त्यांच्या भिंतीवरच्या अद्भूत चित्रांचे वर्णन करीत होत्या. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांचे बोलणे ऐकले. त्यावर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी नाराजीने म्हटले,

''हे लोक ते आहेत, त्यांच्यातील एखादा संत जेव्हा निधन पावतो तेव्हा त्याच्या कबरीवर छत्री बांधून त्याला उपासना-आराधनांचे स्थान बनवितात. त्याच्या तसबिरी लावून आरास करतात. असे कृत्य स्वामीच्या नजरेत निर्मितीतील सर्वांत वाईट गोष्ट आहे.''

नंतर प्रार्थनेसाठी त्यांनी आपले दोन्ही हात वर उचलले व उद्गारले,

''हे अल्लाह! माझ्या कबरीला मूर्तीचे स्वरूप येऊ देऊ नकोस. ज्या लोकांनी त्यांच्या पैगंबरांच्या कबरींना उपासनास्थळाचे स्वरूप दिले, त्या लोकांवर अल्लाहचा धिक्कार आहे.''

तेवढ्यात त्यांना आठवले की, आएशाजवळ काही सोन्याची नाणी ठेवण्यासाठी त्यांनी दिली होती, ती सोन्याची नाणी गरजू लोकांना तत्काळ दान करण्यात यावीत, अशी त्यांनी इच्छा प्रदर्शित केली. कारण स्वामीची भेट घेताना आपल्यापाशी काही भौतिक धन-संपत्ती उरावी, ही गोष्ट त्यांना आवडली नाही.



## शेवटचा दिवस

हिजरी सन अकरा, रब्बिल अव्वल महिन्याच्या अकरा तारखेची रात्र, ही पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनाची शेवटची रात्र होती. ती रात्र त्यांना फार बिकट गेली. आपल्या स्वामीच्या कृपेसाठी ते सतत प्रार्थना करीत असल्याचे लोकांनी ऐकले. सकाळ झाली तेव्हा त्यांना थोडासा आराम पडला. ताप आणि वेदना शमल्या होत्या. त्यांनी आपल्या खोलीचा पडदा बाजुला सारला, तेव्हा मुस्लिम लोक मस्जिदमध्ये नमाज अदा करीत असल्याचे आणि माननीय अबू बकर (रजि.) त्यांचे नेतृत्व करीत असल्याचे त्यांना दिसून आले.

क्षणभर ते आपल्या खोलीच्या दाराशी थांबले आणि नंतर एका सोबत्याचा आधार घेत हळूहळू चालत मस्जिदमध्ये माननीय अबू बकर (रजि.) उभे असलेल्या ठिकाणी गेले. लोकांनी बाजुला सारून त्यांना वाट दिली. माननीय अबू बकर (रजि.) यांनी लोकांच्या सरकण्याचा आवाज ऐकून ते मंचावरून खाली आले व नेतृत्वाची जागा रिकामी केली. परंतु हाताचा इशारा करून नेतृत्व चालू ठेवण्यास पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांना सांगितले. त्यांचे कार्य पूर्ण झाल्यावर पैगंबर मुहम्मद (स.) मंचाच्या पहिल्या पायरीवर बसले आणि त्यांच्या निष्ठावान सोबत्यांना संबोधून त्यांनी आणखी एकदा भाषण केले,

''अल्लाह शपथ! जी गोष्ट अल्लाहने विहित व विधिवत ठरविली आहे, तीच मी माझ्यासाठी विहित केली आहे. तसेच अल्लाहने ज्या गोष्टीची मनाई केली आहे, तेवढी वगळता मी अन्य कोणत्याही गोष्टीची अगर वस्तूची मनाई केलेली नाही.''

सार्वजनिकपणे लोकांमध्ये उपस्थित असण्याचा हा त्यांचा शेवटचा प्रसंग होता. पैगंबर मुहम्मद (स.) आजारातून बरे झाले आणि आता त्यांच्या जिवाला कसलाही धोका नाही, असे वाटून मुस्लिम लोकांना मोठा आनंद झाला होता. उसामा (रजि.) पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे आले आणि सीरियाकडे सैन्य घेऊन जाण्याची परवानगी मागितली. माननीय अबू बकर (रजि.) यांनी आजारातून बरे झाल्याबद्दल पैगंबर मुहम्मद (स.) यांचे अभिनंदन केले आणि मदीनेत असलेली त्यांची पत्नी अल्-सुनाह (रजि.) यांनी सांगून टाकले की पैगंबर मुहम्मद (स.) आता आजारातून बरे झाले आहेत आणि चिंता करण्याचे काही कारण उरले नाही. त्या बातमीने आनंदी व संतुष्ट झालेले लोक पांगले.

परंतु पैगंबर मुहम्मद (स.) अत्यंत थकल्यासारखे दिसत होते आणि ते माननीय आएशा (रजि.) यांच्या खोलीमध्ये परतले. दिवस वर आला आणि त्यांच्या शरीरातील

ताकद झपाट्याने खचत गेली. अत्यंत क्षाण झाल्याचे पाहून, माननीय आएशा (रजि.) यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांचे डोके उशीवरून उचलून हळूवारपणे आपल्या मांडीवर घेतले. त्यांनी ओल्या कपड्याने पैगंबर मुहम्मद (स.) यांचे डोके पुसून काढले. त्यांना तीव्र ताप होता. परंतु पैगंबर मुहम्मद (स.) शांतपणे ते सहन करीत होते. त्यांनी सर्व काही अल्लाहच्या इच्छेवर सोडून दिले आणि तोंडाने खालील शब्द पुन्हा पुन्हा उच्चारू लागले,

''त्यांच्या संगतीत, त्यांच्यावर अल्लाहची कृपा झाली.''

त्यांना असे वाटत होते की, दुर्निवार प्रवाहात ते टोकांकडे वाहवत आहेत, परंतु नेहमीप्रमाणे ते अत्यंत निर्भय होते. एक क्षणभरही त्यांनी धैर्य गमावले नाही. त्यांच्या स्वामीचा सतत धावा करीत त्यांना साहाय्य करण्याची ते याचना करू लागले,

''हे अल्लाह! मृत्यूच्या यातनात तू मला साहाय्य कर.''

त्या क्षणी माननीय आएशा (रजि.) यांचा भाऊ अब्दुल रहमान (रजि.) हातात एक दातवाणाची हिरवी डहाळी धरून तेथे आला. ते पाहून पैगंबर मुहम्मद (स.) यांची दृष्टी त्या डहाळीवर स्थिरावली. त्यांना ती आवडल्याचे पाहून, ती हवी काय असे माननीय आएशा (रजि.) यांनी विचारले. त्यांनी खुणेने होकार दिला. त्यांनी ती डहाळी थोडीशी चावून नरम व लवचिक करून पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हातात दिली. त्यामुळे पैगंबर खूष झाले. त्यांनी त्या काडीने आपले दात जोरजोरात घासले आणि नंतर ती खाली ठेवली.

## पैगंबर (स.) शेवटचा श्वास घेतात

त्यांची शक्ती झपाट्याने खचत गेली आणि त्यांच्या तोंडचे खालील शब्द ऐकू आले,

''हे अल्लाह! मला क्षमा कर आणि मला उंचस्थानी तुझ्या सहवासात जागा दे.''

अधून मधून खालील शब्दही ते उच्चारीत होते,

''उच्चस्थानी जन्नत व उदात्त सहवासात.''

खालील ताकीदीचे शब्दही ते अधून मधून पुटपुटत होते,

''प्रार्थना व तुमच्या देखरेखीखाली असलेले लोक.''

हे शब्द त्यांनी अनेकदा उच्चारले. काही क्षणांनंतर त्यांच्या शक्तीला पुन्हा ओहोटी लागली. त्यांनी आपले डोळे विस्फारले आणि स्पष्टपणे म्हटले,



''हे अल्लाह! उच्चस्थानावरील उन्नत सहवास प्रासादिक आहे.''

त्यानंतर त्यांच्या शरीराची गात्रे शिथिल पडली. माननीय आएशा (रजि.) च्या मांडीवर ते कलंडले. त्यांची नजर चिंतातुरपणे त्यांच्या चेहऱ्यावर खिळून राहिली. हाकेला प्रतिसाद त्यांच्याकडून मिळेल अशी काळजीयुक्त आशा त्यांना वाटली. त्यांच्या पुसटशा स्मिताने त्यांच्या पतीचे जे ओठ विश्रांत होत असत, ते आता ऐहिक जगात उरले नव्हते, ते पाहून त्यांच्यावर दु:खाचा डोंगर कोसळला. पैगंबर मुहम्मद (स.) आपल्या ऐहिक सोंबत्यावर उपकार करून आता उच्चस्थानी असलेल्याच्या उदात्त सहवासात गेले होते. तो सोमवारचा दिवस होता आणि रब्बीऊल अव्वल महिन्याची १२ तारीख होती. त्या दिवशी, वयाच्या ६३ व्या वर्षी आपल्या स्वर्गीय निवासात जाण्यासाठी त्यांनी हे जग सोडले.

अल्लाह त्यांच्यावर, त्यांच्या कुटुंबियांवर आणि त्यांच्या सोबत्यांवर आपल्या सर्वोत्तम कृपेचा वर्षाव करो.(आमीन)

अशा रीतीने अल्लाहची आणि मानवतेची सेवा करीत एक अत्यंत पवित्र जीवन संपले.

## पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या निधनानंतर सोबत्यांना चिंता

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या निधनाची वार्ता वाऱ्यासारखी सर्व शहरभर पसरली. भीतीने सर्व लोकांत मोठी त्रेधा उडाली. त्यांनी काही वेळापूर्वीच त्यांना जिवंत पाहिले होते. काही लोक अतिदु:खाने रडले. काही माणसे थिजल्यासारखी झाली. काही लोकांचा निधनाच्या बातमीवर विश्वासच नव्हता व ती एक खोटी हूल आहे, असे त्यांना वाटले. दु:खातिरेकात माननीय उमर (रजि.) सुद्धा ही गोष्ट विसरले की पैगंबरसुद्धा एक मर्त्य मानवच होते आणि त्यांना मृत्यू येणे ही एक नैसर्गिक बाब होती.

ते एक असाधारण दृश्य होते व ती एक असाधारण अवस्था होती. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी कोणत्याही रीतीने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने असे सूचित केले नव्हते की ते अमर आहेत. उलट आपण मानव आहोत यावर त्यांनी भर दिला होता. तसेच आपल्या मर्त्यपणावर त्यांनी वारंवार सांगितले होते. त्यांच्या सोबत्यांना त्यांच्या शिकवणीमुळे स्वर्गीय जीवन लाभणार होते आणि त्यांच्यामुळेच वैभवशाली अल्लाहची जाण त्यांच्यात विकसित झाली होती आणि ईशसहाय्याची वारंवार त्यांना प्रचिती येऊन चुकली होती त्यांच्या बोलात व कृतीत त्यांना दया व शक्ती अनुभवली होती. ते पैगंबर मुहम्मद (स.) यांना केवळ एक मानव म्हणून पाहात नव्हते आणि कोणत्याही मर्त्य गोष्टीच्या रांगेत

आपल्या धन्याला बसवायला ते तयार नव्हते. ज्याने त्यांना अंधारातून व अंधश्रद्धेतून बाहेर काढून त्यांना प्रकाश दाखविला आणि ज्ञान दिले, निव्वळ भौतिक लालसेतून बाहेर काढून त्यांना उन्नत अध्यात्म शिकविला, तो माणूस मार्गदर्शनासाठी आपल्यात राहिला नाही व आपल्या आवाक्याबाहेर गेला, ही कल्पनाच त्यांना घोर दु:खाची ठरली. अशी भावना निर्माण होणे, अगदी स्वाभाविक होते.

माननीय उमर (रजि.) माणसांच्या घोळक्याच्या मध्ये उभे होते व त्यांच्या हातात नंगी तलवार होती. त्यांनी घोषणा केली, ''जो कोणी मुहम्मद (स.) मृत झाले, असे म्हणण्याचे साहस करील, त्याला त्याच्या प्राणाची किंमत चुकवावी लागेल.''

## माननीय अबू बकर (रजि.) यांनी परिस्थिती हाताळली

त्याचवेळी माननीय अबू बकर (रजि.) तेथे आले. मस्जिदमधून बाहेर पडत असताना, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याबद्दल हजारो प्रश्नांचा त्यांच्यावर भडिमार करणाऱ्या जमावाकडे लक्ष न देता, ते थेट माननीय आएशा (रजि.) यांच्या खोलीत आले. तेथे पोहचल्यावर काहीही न बोलता, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शरीरावर पांघरलेली येमेनी चादर त्यांच्या चेहऱ्यावरून बाजुला सारली. काही क्षण आपल्या थोर व उज्ज्वल मित्राच्या रेखीव चेहऱ्याकडे पाहात राहिले. नंतर त्यांच्या शेजारी गुडघे टेकून त्यांच्या रूंद कपाळाचे त्यांनी चुंबन घेतले व म्हणाले,

''जीवनातही तुम्ही गोड होता आणि मरणातही तुम्ही गोड आहात. होय तुम्ही मरण पावला आहात.''

ते पुढे म्हणाले,

''अरेरे! माझ्या निवडक मित्रा! माझ्या मातापित्यापेक्षा मला अधिक प्रिय असणाऱ्या मित्रा! अल्लाहने आज्ञा दिलेल्या मृत्यूची चव अखेर तुम्ही चाखलीत. आता दुसरा मृत्यू कधीही येणार नाही.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे डोके हळूवारपणे उशीवर ठेवीत ते पुन्हा झुकले आणि त्यांच्या चेहऱ्याचे पुन्हा चुंबन घेतले. त्यांच्यावर चादर पांघरली आणि ते खोलीबाहेर पडले. ते बाहेर पडले आणि पैगंबरांच्या खोलीबाहेर उडालेली मोठी गडबड त्यांना कळाली.

ते गर्दीच्या दिशेने लगबगीने गेले आणि ''पैगंबर मुहम्मद (स.) मृत झालेले नाहीत.'' असे उमर (रजि.) यांचे शब्द त्यांनी ऐकले.

माननीय अबू बकर (रजि.) यांनी त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला पण ते व्यर्थ



झाले. त्यांचे म्हणणे ऐकूनच घ्यायला माननीय उमर (रजि.) तयार नव्हते. म्हणून ते माननीय उमर (रजि.) यांना सोडून बाजुला झाले आणि त्यांच्याभोवती कडे करून उभे राहिलेल्या जमावापाशी गेले. त्यांनी नेहमीच्या स्वाभाविक शांतपणाणे आणि मृदू पणे मोजक्या शब्दांत जमावाला उद्देशून म्हटले,

''सर्वसमर्थ अल्लाहने त्याचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर खालील आयत अवतरित केली नाही काय? ज्यात म्हटले आहे,

''(हे पैगंबर (स.)) तुम्हीही कालवश होणार आहात व हे लोकसुद्धा मरणार आहेत.'' (दिव्य कुरआन, ३९ : ३०)

दुसऱ्या आयतीत म्हटले आहे,

''मुहम्मद (स.) याशिवाय काही नाहीत की ते केवळ एक पैगंबर आहेत, त्यांच्यापूर्वी इतर पैगंबर देखील होऊन गेले आहेत, मग काय जर ते मरण पावले अथवा त्याना ठार केले गेले तर तुम्ही लोक मागच्या पावली परताल?''

(दिव्य कुरआन, ३ : १४४)

''ज्यांनी मुहम्मद (स.) यांची उपासना केली असेल त्यांना हे कळू द्या की पैगंबर मुहम्मद (स.) मरण पावले आहेत; परंतु ज्याने अल्लाहची उपासना केली असेल त्याला समजू द्या की, अल्लाह चिरंजीवी आहे, त्याला कधीही मृत्यू येणार नाही.''

या छोट्या प्रवचनाने त्या जमावावर मोठा अनुकूल प्रभाव पडला आणि असह्य दु:खात आणि विरहात, मुस्लिमांच्या दुखावलेल्या अंत:करणांना थोडेसे सांत्वन मिळाले. त्यांनी प्रसन्न मनाने अल्लाहच्या इच्छेपुढे माना तुकविल्या व समजले की अन्य सर्वच मर्त्य प्राण्याप्रमाणे पैगंबर मुहम्मद (स.) हेही इहलोक सोडून गेले. कुरआनची जी आयत माननीय अबू बकर (रजि.) यांनी त्यांना ऐकविली ती त्या अवस्थेत इतकी चपखलपणे लागू पडते की, जणू त्या प्रसंगाखातरच ती अवतरली होती.

अतीव दु:ख मनात असूनही, माननीय अबू बकर (रजि.) यांनी आपले डोळे शांत ठेवले होते. त्यांना ठाऊक होते की इस्लामसमोर अनेक गंभीर धोके उभे टाकले होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या निधनाचा धक्का मोठा होता परंतु विरोधकांची प्रतिक्रिया त्याहूनही मोठी होण्याचा संभव होता. म्हणून परिस्थितीने गंभीर वळण घेऊ नये यासाठी ते डोळ्यांत तेल घालून सर्व व्यवहाराकडे दक्षतेने पाहात होते. अन्सारचे लोक बनू यहुदाच्या सभागृहात जमा झाले आहेत आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जागी वारस ठरविण्याची ती चर्चा करीत आहेत, हे समजल्यावर ते लगबगीने तेथे गेले. त्यांची उपस्थिती तेथे अत्यंत गरजेची होती. उमर (रजि.) व अबू उबैदा (रजि.) हे त्यांच्याबरोबर

तेथे गेले. माननीय अबू बकर (रजि.) यांनी अन्सार लोकांचे म्हणणे व त्यांचा युक्तिवाद शांतचित्ताने ऐकून घेतला आणि नंतर निर्विकारपणे तो विषय त्यांच्यापुढे मांडला आणि त्यावर निर्णय घेण्यास त्यांना सांगितले. त्यांनी अन्सार लोकांना सांगितले,

''तुम्ही तुमच्या सर्वोत्कृष्टपणाबद्दल जे सांगितले, ते अगदी सत्य आहे. तुम्ही प्रशंसेला जितके पात्र आहात तितक्या प्रशंसेला पात्र असणारे लोक सबंध जगात नाहीत. परंतु अरब माणूस कुरैश घराण्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही माणसाला प्रमुख म्हणून मान्य करणार नाही. कुरैशी लोक शासनकर्ते असतील व तुम्ही त्यांचे धर्मप्रचारक असाल.''

त्यांनी पटवून देणारे भाषण केले आणि अन्सार लोकांना परिस्थितीच्या गांभिर्याची जाणीव करून देऊन, इस्लामचे विशाल हित लक्षात घेऊन, थंड डोक्याने निर्णय घ्यावा, असे प्रयत्न केले. माननीय अबू बकर (रजि.) यांच्या शब्दांनी त्यांच्या प्रत्येकाच्या हृदयाची तार छेडली आणि त्यात त्यांना एकमताने, निधन पावलेल्या पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जागी खलीफा म्हणून निवडण्यात आले.

हे सर्व चालू असताना, माननीय अली (रजि.) व अब्बास (रजि.) आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कुटुंबातील अन्य सदस्यांनी त्यांच्या देहाला स्नान घातले. तीन कपड्यांनी त्यांचा देह आच्छादित करण्यात आला आणि सरळ स्थितीत त्यांना माननीय आएशा (रजि.) यांच्या खोलीत ठेवण्यात आले. लोकांना त्यांच्या उपकारकर्त्याच्या चेहऱ्याचे अंतिम दर्शन घेण्याची आणि अंत्यसंस्काराची प्रार्थना करण्याची परवानगी देण्यात आली. प्रत्येक गटाने ते केले आणि बाजुला झाले. संबंध दिवसभर असे चालले. पुरूषामागून महिला आल्या आणि महिलामागून मुले आली.

दफन करण्याची वेळ जवळ आली, तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांना नेमके कोणत्या जागी दफन करायचे याबद्दल स्पष्ट कल्पना कोणाच्याही डोक्यात नसल्याचे आढळले. त्यांना मस्जिदमध्ये दफन करावे, या मताचे काही लोक होते. त्यांच्या सोबत्यांच्या कबरीशेजारी पैगंबर मुहम्मद (स.) यांनाही दफन करावे, असे दुसऱ्या एका गटाचे म्हणणे होते. माननीय अबू बकर (रजि.) यांनी पुढील घोषणा करून तो प्रश्न सोडविला,

''पैगंबर मुहम्मद (स.) यांनी असे म्हणताना मी ऐकले आहे की, प्रषितांना ज्या जागी मृत्यू येतो, त्याच जागी त्यांचे दफन केले जाते. म्हणून ज्या बिछाण्यावर पैगंबर मुहम्मद (स.) यांचा अंत झाला, तो बिछाना बाजुला काढण्यात आला आणि त्याच जागी कबर खोदण्यात आली.'' तो पवित्र देह माननीय अली (रजि.), उसामा (रजि.) आणि अल-फज्ल (रजि.) यांनी कबरीत ठेवला. कच्च्या विटांची तळघरासारखी एक छोटी



पोकळी ठेवण्यात आली आणि बाकीचा सर्व भाग माती व वाळूने भरण्यात आला.

अल्लाह त्यांच्यावर त्याच्या सर्वोत्कृष्ट कृपाप्रसादाचा वर्षाव करो.(आमीन)

## पैगंबर मुहम्मद (स.) यांचा स्वभावाचा एक सर्वसाधारण आढावा

हे लेखन पुरे करण्याआधी, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या स्वभावाच्या ठळक गुणवैशिष्ट्यांचा आढावा घेणे यथोचित ठरेल. ती वैशिष्ट्ये त्यांच्या जीवनाच्या विविध टप्प्यातून आणि विविध दृष्टिकोनातून या पानात दिली गेली आहेत. तसा संक्षिप्त प्रयत्न मी करीत आहे.

## त्यांचा चेहरा-मोहरा व त्यांचे व्यक्तिगत स्वरूप

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे व्यक्तिगत स्वरूप अत्यंत आकर्षक व डौलदार होते. त्यांच्या शरीराचा बांधा सरासरी उंचीपेक्षा किंचितसा अधिक होता. डौलदार व छाप टाकणारा होता. त्यांच्या काळ्याभोर डोळ्यांत खोलवर भावना तरळत असत आणि चेहऱ्यावर सदा विजयी अभिव्यक्ती असे. त्यांच्या चेहऱ्यावरील या भावाने, प्रथमदर्शनीच अपरिचिताचा विश्वास व प्रेम ते संपादन करीत असत. त्यांची स्तुती करणारा एक अनुयायी म्हणतो,

''ते अत्यंत देखणे, उजळ चेहऱ्याचे आणि अत्यंत उदार मनाचे होते, जणू सूर्यप्रकाश त्यांच्या मुद्रेवर चकाकत होता.''

## पैगंबर- एक आदर्श

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पत्नी आएशा (रजि.) यांना पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनपद्धतीचे व त्यांच्या वर्तणुकीचे वर्णन करण्याची विचारणा करण्यात आली, तेव्हा त्यांनी उत्तर दिले,

''त्यांचे नैतिक चारित्र्य कुरआन आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर त्यांचा दैनंदिन जीवनक्रम हे कुरआनच्या शिकवणींबरहुकूम हूबेहूब होते.''

कुरआनमध्ये सांगितलेल्या सर्व सद्‌गुणांचे व सदाचारांचे ते साकारलेले स्वरूप होते. बालपणात, एक पित्याच्या भूमिकेत, पतीच्या भूमिकेत, शेजाऱ्याच्या भूमिकेत, योद्धाच्या भूमिकेत, एका सेनापतीच्या भूमिकेत, न्यायाधीशाच्या भूमिकेत, शासनकर्त्याच्या आणि कायदे करणाराच्या भूमिकेत आणि सर्वांत अधिक म्हणजे अल्लाहच्या एकनिष्ठ दासाच्या भूमिकेत; ते अल्लाहच्या ग्रंथाचे साकारलेले मूर्तस्वरूप होते, या बाबींवर त्यांच्या जीवनक्रमाच्या नोंदी भरपूर प्रकाशझोत टाकतात.

## साधी राहणी व साधी सवय

त्यांच्या सवयी अत्यंत साध्या असल्या तरी सुरेख होत्या. त्यांचे खाणे-पिणे, त्यांचा पोषाख अत्यंत साधेपणाचा होता आणि सत्तेच्या शिखरावर पोचल्यावरसुद्धा तोच मुळचा साधेपणा त्यांनी टिकविला होता. सर्व व्यवहारात, भौतिक मोहाला बळी पडण्यापासून ते इतक्या वरच्या पातळीला गेले होते की त्यांनी अपल्या इहलोकीचा प्रवास संपविला, तेव्हा त्यांच्यापाशी कसलेही धन किंवा मालमत्ता मागे उरली नव्हती. त्यांनी त्यांच्या गुलामांना मुक्त केले होते आणि त्यांच्यापाशी असलेली सर्व नाणी त्यांनी कल्पना करता येण्यासारख्या सत्कार्यासाठी दान देऊन टाकली. मृत्यूसमयी त्यांची व्यक्तिगत मालमत्ता म्हणजे एक चिलखत (ते सुद्धा एका यहुद्याकडे गहाण ठेवलेले होते), खजुरीच्या वाळलेल्या पानांची एक चटई आणि पाण्याची एक कातड्याची पिशवी इतकीच होती.

त्यांना असाधारण कल्पनाशक्तीचे वरदाना लाभलेले होते. तसेच विचारांची उदात्तता, मर्यादाशीलता आणि सौजन्यशील भावना, यांची देणगी मिळाली होती. त्यांच्या कनिष्ठाशी ते अत्यंत सौम्यपणाने व कृपाशीलतेने वागत असत आणि त्यांच्या तरूण सेवकांची, खरडपट्टी काढण्याची परवानगी देत नसत, मग त्यांच्या हातून कसलीही चूक झालेली असो. त्यांचा विश्वासू सेवक अनस म्हणतो,

''मी दहा वर्षे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याजवळ होतो, परंतु मला कधी त्यांनी 'ब्र'ही म्हटले नाही.''

त्यांच्या कुटुंबियांशी ते अत्यंत प्रेमळपणाने वागत असत. लहान मुलांवर त्यांचे फार प्रेम होते. रस्त्यात मुलांना थांबवून त्यांच्या मस्तकावर प्रेमभराने थोपटीत असत. फुरसतीच्या वेळी मुलांच्या निरागस खेळातही ते सहभागी होत असत.

त्यांची राहणी जरी साधी होती तरी जीवनात चांगल्या वस्तू त्यांनी कधी टाळल्या नाहीत. चवदार अन्नांचा ते आस्वाद घेत असत. फुलांचे सौंदर्य आणि अत्तराचा सुवास त्यांना आवडत असे. सात्विक व हलके विनोदही त्यांना पसंत होते. प्रेमाबद्दल प्रेम ते देत असत. त्यांचे अंत:करण विशाल होते. मानवाबद्दल करूणेने, विशेषत: कमकुवत व अन्यायपीडितांबद्दल ओतप्रोत भरलेले असे. दुसऱ्या माणसामधील सद्‌गूणांचे ते कौतुक करीत. दुसऱ्याने दिलेला चांगला सल्ला ते तत्परतेने स्वीकार करीत, मग तो कोणाकडूनही आलेला का असेना.

पैगंबर मुहम्मद (स.) हे विश्वासू आणि हृदयाचा ओलावा असलेले मित्र होते. अबू बकर (रजि.) यांच्यावर त्यांचे सख्ख्या भावासारखे प्रेम होते. त्याचप्रमाणे त्यांचे



चुलतबंधु व जावई असलेल्या अली (रजि.) वर त्यांचे प्रेम होते. त्यांचे मुक्त केलेले गुलाम जैद (रजि.) वरही त्यांचे पित्यासारखे प्रेम होते. मुक्त केलेल्या त्या पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या गुलामाचे मन त्यांच्यात इतके गुंतले होते, की मुक्त झाल्यावर त्यांच्या पित्याबरोबर स्वत:च्या घरी जाण्याऐवजी त्यांच्या प्रेमळ धन्यासह मक्केतच राहण्याचे त्यांनी ठरविले. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या मनात त्यांच्याबद्दल मोठा आदर होता. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा मुलगा उसामा (रजि.), त्यांनाही पैगंबर मुहम्मद (स.) यांनी तशीच प्रेमळ व कृपाशील वागणूक दिली, जशी त्यांच्या पित्याला त्यांनी दिली होती. उस्मान (रजि.) आणि उमर (रजि.) हेही त्यांचे अत्यंत लाडके होते. अन्सार लोकांबद्दल त्यांच्या मनात फार आदर होता. त्यांनी इस्लामखातर केलेल्या मोलाच्या सेवेची ते मोकळेपणाने व सुरेखपणाने स्तुती करीत असत. त्यांचे प्रेम कधीही अनाठायी ठरले नाही. त्यांच्या प्रेमाची परतफेड त्यांच्या अनुयायांनी उत्साही त्यागाने व प्रेमानेच केली.

त्यांचा स्वभाव अत्यंत गोड आणि दयाळूपणाचा होता. एक अपवाद वगळता त्यांनी आपल्या हाताने कधीही कोणाला मारले नाही. त्या प्रकरणात त्यांना उघडपणे आव्हान देण्यात आले होते.

संभाषणात जास्तीत जास्त कठोर, त्यांनी वापरले ले शब्द असे होते,

''त्याला काय झाले आहे? त्याचे कपाळ चिखलाने काळे पडो.''

एखाद्याला शाप द्यायला जर त्यांना सांगितले गेले, तर ते म्हणत,

''मला शाप देण्यासाठी पाठविले गेलेले नाही, तर मानवजातीचा दयानिधी म्हणून मला पाठविले गेले आहे.''

आजारी माणसांची गाठभेट घेऊन त्यांची विचारपूस ते करीत. एखादी अंत्य-यात्रा दृष्टीस पडली की त्यांच्या मागे जात असत. एखाद्याने दिलेल्या निमंत्रणाचा स्वीकार करीत असत. अगदी एखादा गुलामानेही भोजनाचे निमंत्रण दिले तरी ते स्वीकारीत असत. स्वत:चे कपडे, पादत्राणे स्वत:च दुरूस्त करीत असत. शेळ्यांचे दूध आपल्या हाताने काढीत असत. हस्तांदोलन करताना आपला हात दुसऱ्या माणसाच्या हातातून प्रथम कधीही काढून घेत नसत आणि दुसरा माणूस तोंड वळवून बाजुला झाल्याखेरीज तोंड वळवित नसत.

त्यांच्या रक्षणाखाली असलेल्यांचे ते अत्यंत विश्वासू रक्षणकर्ते होते. संभाषणात त्यांची वाणी अत्यंत मधुर असे. त्यांना जे लोक पाहत, त्यांच्या मनांत त्यांच्याबद्दल आदराची भावना तत्काळ निर्माण होत असे. जे त्यांच्या सान्निध्यात येत, ते त्यांच्यावर

प्रेम करीत. जे त्यांचे वर्णन करीत, ते म्हणत असत,

''त्यांच्यासारखा मानव आम्ही पूर्वीही पाहिला नाही आणि त्यांच्यानंतरही पाहिला नाही.''

ते फार अबोल होते परंतु ते जेव्हा बोलत असत तेव्हा विचारपूर्वक शब्दांवर भर देऊन बोलत आणि त्यांचे बोल कोणीही विसरू शकत नव्हता.

त्यांना भेटायला येणाऱ्यांशी ते अत्यंत सौजन्याने व विनम्रतेने वागत असत. त्यांनी कोणालाही 'नाही' असे म्हटले नाही. त्यांनी कोणाच्याही म्हणण्याचे खंडन कधीही केले नाही. इस्लामच्या शिकवणीविरूद्ध जर त्यांचे म्हणणे असेल, तर मात्र अपवाद म्हणून ते खोडून काढीत. व्यक्तिगत कारणासाठी ते कधीही कोणावर रागावले नाहीत. धनवानांना व रंकांना ते एकसारखी वागणूक देत असत. स्वत:साठी कसल्याही वैशिष्ट्याचा, प्रतिष्ठेचा त्यांनी दावा केला नाही आणि ते आपल्या मित्रांमध्ये अशा रीतीने मिसळत असत, जणू ते त्यांचे नेतेच नसून एक प्रामाणिक सोबती व निष्ठावान बंधुच आहेत. चालत जात असताना माणसे त्यांच्यापूढे किंवा मागे चालत. स्वत:चे प्रामुख्य दिसावे म्हणून ते कोणतीही विशिष्ट जागा धरीत नसत. नवख्या माणसाला अनुयायांमध्ये त्यांना ओळखणेही कठीण जात असे. त्यांच्या सर्व हालचालीत व कृतीत साधेपणा व विनम्रता यांचेच वैशिष्ट्य असे.

## शांत व निग्रही स्वभाव

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी कोणतेही निर्णय घाईघाईने घेतले नाहीत. ते कोणत्याही विषयाचा सारासार विचार करून काळजीपूर्वक निर्णय घेत असत आणि तत्पूर्वी आपल्या सोबत्यांना ते पूर्णपणे विश्वासात घेत असत. एकदा निर्णय घेऊन झाल्यावर ते साकार करून प्रत्यक्ष आचरणात आणण्यात कसलीही कसर करीत नसत.

त्यांच्या मनाचे औदार्य, केवळ मित्रांसाठीच नव्हे तर त्यांच्या शत्रूशीही त्याच औदार्याने ते वागत आणि इतिहासात त्यांच्या तोडीचे उदाहरण आढळत नाही. मक्केतील लोकांनी त्यांच्याविरूद्ध केलेला अखंड आणि प्रदीर्घ लढा आणि त्यांच्यावर निर्विकारपणे त्यांनी केलेले अन्याय, अत्याचार व छळ; यामुळे दुसऱ्या विजेत्यांना सूड घेण्यास उद्युक्त केले असते आणि पाठीमागे रक्ताचा सडा आणि जळालेल्या घरांची राखरांगोळी सोडली असती. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी काही थोडक्याच गुन्हेगारांना वगळता, सार्वत्रिक माफी जाहीर केली आणि गतकाळातील कटू आठवणी, त्यांची उडवली गेलेली टिंगल-टवाळी आणि त्यांच्या कट्टर शत्रूंनाही त्यांनी कृपाळूपणाची व मित्रत्वाची वागणूक दिली. तितकीच



सहनशीलतेची वागणूक अल्लाहशी दांभिक आणि मदीनेतील आकसाने वागणाऱ्या काही जणांना त्यांनी दिली, ज्यांनी वर्षानुवर्षे त्यांच्या योजनांचा प्रतिकार केला आणि त्यांच्या सत्तेला अविरत विरोध केला होता. तसेच त्यांच्याशी अत्यंत वैरभाव असणाऱ्या टोळ्यांची शरणागतीही त्यांनी, अगदी विजय प्राप्त झाल्यानंतरसुद्धा तितक्याच क्षमाशीलतेने स्वीकारली होती.

## अल्लाहवर मन:पूर्वक अढळ विश्वास

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनातील डोळ्यांत भरण्यासारखा मुद्दा म्हणजे अल्लाहवरील त्यांच्या मनाचा अढळ विश्वास आणि त्याच्याशी सतत संपर्कात राहण्याचे त्यांचे अविश्रांत प्रयत्न हा होय. अल्लाह, त्यांची आध्यात्मिक ज्योत प्रज्वलित करणारी ठिणगी होती. त्यांच्या निर्माणकर्त्याशी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी इतके निकटचे संबंध होते की, कोणालाही अल्लाहच्या सार्वभौमत्वाची शक्ती त्यांच्या स्वत:च्या अंत:करणात बिंबवल्याविना राहत नसत. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हृदयात खोलवर रूजलेल्या अल्लाहवरील उन्नत व अढळ विश्वास हीच त्यांच्या जीवनचरित्राची गुरूकिल्ली होती. नमाज आणि अल्लाहचे सान्निध्य हेच त्यांच्या शक्तीचे मूल स्रोत होते. अल्लाह सर्व गोष्टीवर प्रभावशाली आहे, अशी त्यांच्या मनाची सतत व स्पष्ट धारणा असल्याने त्यांच्या विचारांवर आणि कृतीवर त्याचा मोठा परिणाम झाला होता. कोणतेही लहान अगर मोठे काम अल्लाहचे नाव घेऊनच सुरू करीत असत. आपत्तीत आणि दु:खात, तसेच आनंदात ते सतत नम्रतेने अल्लाहची सार्वभौम सत्ता, परमदयाळू व परमकृपाळू अल्लाहची शक्ती, ते मान्य करीत असत.

पराकोटीची लीनता व विनयशीलता असताना पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यापाशी सर्वाधिक पराक्रमी माणसाचे धैर्य व शौर्य होते. शत्रूंच्या सर्व दुष्ट इराद्यापासून अल्लाहचा सामर्थ्यशाली हात आपले रक्षण करील, असा त्यांचा ठाम विश्वास होता. अशा प्रकारचा विश्वास त्यांच्यात ओसंडत असताना, अत्यंत कसोटीच्या प्रसंगी त्यांनी दृढता व भक्कमपणा दाखविला आणि पाय रोवून शत्रूचा मुकाबला केला. वैफल्य व निराशा त्यांना ठाऊक नव्हती. ते भरभराटीच्या काळात तसेच आपत्तींच्या काळात सतत शांत, निग्रही, संतुष्ट व प्रसन्न असत. संपूर्ण जीवनात त्यांना हालअपेष्टा व अभाव सोसावा लागला. तरीसुद्धा जहाल विरोधात आणि दर्शनी अगतिकतेच्या अवस्थेतही भक्कमपणे उभे ठाकत असत. निष्ठावान पुरूषांचा व महिलांचा छोटासा गट त्यांच्या भोवती असल्याने त्यांच्या निर्माणकर्त्याच्या सामर्थ्यावर उत्तुंग व धैर्यशाली विश्वास ठेऊन त्यांनी अपमान, दहशत, धोके आणि अनन्वित छळ सोसला. त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना वारंवार अन्नाविना

दिवस कंठावे लागले आणि मूठभर खजूर खाऊन त्यांना संतुष्ट राहावे लागले परंतु त्यांच्या मुखातून तक्रारीचा एक शब्दही कोणी ऐकला नाही. ते अल्लाहचे पैगंबर होते आणि बाकीच्या सर्व बाबी गौण व दुय्यम होत्या. अगदी प्रतिकूल परिस्थितीतही त्यांचे मन या विश्वासाने उज्ज्वल झालेले असे की, ज्या काही हालअपेष्टा त्यांना भोगाव्या लागल्या होत्या, त्यांचा मोबदला त्यांच्या निर्माणकर्त्याकडून मिळणार आहे.

## दैनंदिन कार्यक्रम

पैगंबर मुहम्मद (स.) यांचा दैनंदिन जीवनक्रम अतिशय कष्टमय होता. सकाळच्या प्रार्थनेनंतर लोकांना शिक्षण देण्यासाठी त्यांच्या गाठीभेटी घेत असत. वादाचे प्रश्न सोडवून न्यायदान करीत असत. दूतांचे स्वागत करीत असत आणि जाणाऱ्या पत्रांचा मजकूर सांगून लिहून घेत असत. नंतर बैठक विसर्जित होत असे. सार्वजनिक कार्य झाल्यावर त्यांच्या पत्नींपैकी एकीच्या घरी जात असत आणि पत्नीला गरज असलेले एखादे घरकाम करीत असत. वस्तूच्या खरेदीसाठी ते बाजारातही जात असत. नंतर एक छोटी प्रार्थना केली जाई, नंतर ते आजारी माणसांची व गोरगरिबांच्या भेटी घेत असत, मग ते मित्रांच्या घरी जाऊन भेट घेत आणि तेथून मस्जिदमध्ये जाऊन दुपारची प्रार्थना करीत असत. मस्जिदमधून परतल्यानंतर ते भोजन घेत असत. जर जेवण उपलब्ध नसले तर ते त्यांच्या स्वत:च्या खोलीत जाऊन थोडी विश्रांती घेत असत. नंतर तिसऱ्या प्रहरच्या प्रार्थनेसाठी मस्जिदमध्ये जात असत.

प्रार्थनेनंतर पैगंबर मुहम्मद (स.) त्यांच्या पत्नींच्या घराकडे जात व त्यांची भेट घेत असत आणि मुलांना हवे असेपर्यंत ते तेथे थांबत असत. संध्याकाळच्या प्रार्थनेत ते नेतृत्व करीत व नंतर घरी परतून रात्रीचे भोजन करीत. मग ते घरगुती व्यवहार पाहात असत अथवा त्यांच्या निष्ठावान अनुयायांसह बसून त्यांना इस्लामच्या शिकवणींचे स्पष्टीकरण सांगत असत. रात्रीच्या प्रार्थनेत नेतृत्व करून ते मस्जिदहून घरी परत येत आणि विश्रांती घेत आणि एकांतपणे प्रार्थना करीत असत. काही तासच ते झोप घेत असत. मध्यरात्री उठून ते पुन्हा तहज्जुदची प्रार्थना करीत आणि त्याचबरोबर दिनक्रमाची सुरवात होई. त्यांची कामाची शक्ती असाधारण होती. थकव्याबद्दल त्यांनी क्वचितच तक्रार केली.

त्यांच्या उद्दिष्टांची भव्यता, त्यांच्या साधनसामग्रीची कमतरता आणि धर्मप्रचारच्या अल्पशा कालावधीत पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जे महान यश संपादन केले, त्याचा आढावा घेतल्यास माणूस आश्चर्याने थक्क होऊन जातो. विख्यात माणसांनी फक्त शस्त्रे निर्माण केली, कायदे केले आणि साम्राज्ये स्थापिले. त्यांनी कशाची स्थापनाच केली



असेल तर ती भौतिक सत्तेची आणि ती सत्तासुद्धा त्यांच्या डोळ्यांदेखतच रसातळाला गेली. या पुरूषोत्तमाने नुसत्या सैन्याच्या हालचाली केल्या इतकेच नाही तर त्यांनी कायदे केले, साम्राज्ये, मोठमोठी घराणी हलवून सोडली. लोकांना त्याकाळी ज्ञात असलेल्या जगातील एकतृतियांश माणसांना हलवून सोडले. त्याहूनही पुढे जाऊन त्यांनी अनेकेश्वरत्व, देवदेवता यांची कल्पना, विचारधारणा, श्रद्धा व आत्मेही हलवून टाकले.

माणसाच्या महानतेचे सर्व मापदंड लावून निष्कर्ष काढल्यास, आपणास असे आढळून येते की ते कल्पना करता येण्याइतक्या उत्तुंगतेच्या शिखरावर होते. त्यांच्या जीवनाची सर्वांत विस्मयकारक बाब अशी आहे की त्यांनी इतके नेत्रद्दिपक यश संपादन करून आणि अल्लाहशी त्यांचे इतके निकटचे संबंध असूनही आपण केवळ एक मर्त्य मानवच असून मानवजातीला स्वामीच्या संदेशाची घोषणा करण्याचा आपणाला त्याचा आदेश झाला आहे; जेणेकरून अखिल मानवजात, त्यांच्या निर्माणकर्त्याच्या इच्छेनुसार वागेल; या पलीकडे कसलाही दावा त्यांनी केला नाही. त्यांनी ईशत्वाचा स्वत:चा हक्क जोरदारपणे नाकाराला, इतकेच नाही तर आपल्या अनुयायांनाही त्यांनी सक्त ताकीद दिली की त्यांनी ईशत्वाचा कसलाही संबंध त्यांच्याशी जोडू नये. अल्लाहचे एकमेवत्व ईशत्वाचा प्रचार करण्याचे पवित्र व अवघड कार्य त्यांच्यावर सोपविण्यात आले होते. तोच विश्वाचा एकमेव निर्माणकर्ता, पालनकर्ता, धनी आणि सार्वभौम सत्ताधीश असल्याचा प्रचार करण्याची जबाबदारी त्यांच्या शिरावर टाकण्यात आली होती. ते कार्य त्यांनी अत्युच्चपणाने पार पाडले.

अल्लाहचा आणि त्याच्या फरिश्त्यांच्या निवडक कृपेचा (दरुद व सलाम) त्यांच्यावर वर्षाव असो. (आमीन)

***पैगंबर मुहम्मद (स.) दोन्ही जगाचे कृपानिधी आहेत!***

-०- समाप्त -०-